
श्रीकया६६@पुणे.इन
श्रीकांत आठवले

# श्रीक्या ६६ @ पुणे. इन

**पटकथा लेखक**
**सर्व आठवले,**
**खाडिलकर व सप्रे मंडळी**

**शब्दांकन : श्रीकांत आठवले.**
**दि. १५ डिसेंबर २०२०**

**श्रीक्या ६६ @ पुणे. इन**
श्रीकांत आठवले

**पहिली आवृत्ती**
१५ डिसेंबर २०२०

**© श्रीकांत आठवले**

**मुखपृष्ठ**
श्रीकांत आठवले

**अक्षर जुळणी**
सौ. शिल्पा पराग कुलकर्णी

**मुद्रक**
तारा पब्लिकेशन
C-5, संकल्प, शिवानंद सोसायटी, लेन नंबर ३,
सहकारनगर नंबर२, पुणे ४११००९
फोन : 9798956621, 7498956621
इमेल : psatechnogmail.com
तारीख : १५-१२-२०२०

**मूल्य :** ₹ ३५० /-

## अर्पण...




आई, तुला विसरणं शक्य नाही.
तुझ्या आठवणी मनात कायमच्या
घर करून वसलेल्या आहेत.

## मनोगत

नमस्कार मंडळी. ही माझी गेल्या ६६ वर्षांची नोंदवही असे समजून वाचावी. मी काही नामवंत लेखक नाही. सर्व थोर मंडळींना माझा साष्टांग नमस्कार. गेले कित्येक दिवस माझ्या मनात आपल्या भूतकाळाविषयी काहीतरी लिहावे अशी इच्छा होती. आज गुढीपाडवाच्या शुभ मुहूर्तावर हे पुस्तक आपणा सर्वांना अर्पण करतो. मुहूर्तावर कमीतकमी दोन-चार पाने काढावीत अशी मनोमन इच्छा निर्माण झाली. प्रयत्न करीत आहे. मी श्रीकांत आठवले ६६ वर्षे पूर्ण केली आहेत.

मी एक सर्वसामान्य नागरिक आहे, परंतु माझ्या जीवनातील काही अतिशय आनंदी, तर काही अतिशय दुःख देणाऱ्या बऱ्याच घटना घडल्या. एकंदर विचार करता काही सुखवस्तू असे म्हणता येणार नाही. तरीही अतिशय आनंदी, त्याचप्रमाणे कष्टमय असे जीवन जगलो आहे. या प्रवासात मला अनेकांची साथ मिळाली. अनेक जण हे जग सोडून गेले आहेत. सोडून गेलेल्यांची यादी मध्यंतरी एकदा कधीतरी करत होतो आणि मला लक्षात आले की बरीच मंडळी, आपल्या जिवाभावाची, आवडती माझ्यावर जिवापाड प्रेम करणारी, आता काळाच्या पडद्याआड गेली आहेत. अगदीच काही नावे घ्यायची झाली तर सर्वांत प्रथम मला काकांचे नाव घ्यावे असे वाटते. काका म्हणजे माझे वडील, कै. श्री. प्रभाकर नरहरी आठवले, कै. डॉ. भास्कर जगनाथ आठवले हे माझे काका, कै. शालिनीताई आठवले

माझ्या काकू, माझे सासरेबुवा, कै ग. न. सप्रे (अप्पा), व सासूबाई कै. वासंती सप्रे, (हे दांपत्य म्हणायला सासू सासरे, प्रत्यक्षात ते माझे दुसरे आई-वडीलच होते). परमेश्वराचा न्याय कसा असतो पहा, माझ्या वडिलांचा सहवास मला बरोबर २५ वर्षे लाभला व अप्पांचाही तितकाच.

माझे आजोबा, माझ्या आईचे वडील कै. श्री. पु. ल. खाडिलकर, आईची आई - माझी आजी, कै. रमाबाई खाडिलकर, आईचे काका व काकू, कै. ना. ल. खाडिलकर, कै. यशोदाबाई खाडिलकर, माझ्या वडिलांची आई कै. सरस्वतीबाई आठवले व अनेक इतर थोर मंडळी, यादीच करायची झाली तर, किती जण जिवंत आहेत, ती यादी पटकन तयार होईल. याचा अर्थ असा नाही की मला बाकी सर्वांची आठवण येत नाही, परंतु अशी यादी करणे इतके क्लेशदायक ठरेल की, अशी यादी न करणेचे मी ठरविले. या मानवी स्वरूप कॉम्प्युटरमध्ये अशी अनेक नावे जन्मभरासाठी जोडलेली आहेत.

माझ्या जीवनावर एक पुस्तक लिहावे असे तीन-चार वर्षांपूर्वी मनात आले. मी आणि अविमामा भूतान सहलीला गेलो होतो, तेव्हा जाताना कोरे कागद बरोबर घेऊन गेलो. प्रवासामध्ये विमानात जेव्हा वेळ मिळेल तेव्हा, मनात येतील त्या आठवणी लिहून काढत असल्यामुळे या सगळ्या आठवणींचे एक छोटेसे पुस्तक करून ते आपल्या सर्व नातेवाईक मंडळींना द्यावे असे मनात आले. आता थोडेसे पुस्तकाच्या नावाबद्दल. आपणा सर्वांनाच हा प्रश्न पडला असेल की या पुस्तकाचे नाव असे वेगळे कसे?

तर त्यामागे एक आठवण ती अशी की, सांगलीला आजोळी बहुतेक जण मला मन्या म्हणायचे. जरा मोठा झालो तसे बरेच जण मला श्रीकांत म्हणायला लागले. आठवले घराण्यामध्ये बहुतेक सगळीजणं मला बंड्या म्हणायची. विशेषकरून काका मला नेहमी बंड्या आणि अतिशय खुशीत असले की बंडी असं म्हणायचे तर खाडिलकर कुटुंबामध्ये आईच्या पिढीनंतरच्या पिढीमध्ये मी सर्वांत मोठा नातू, नंतर मग अभि मामाला दोन मुली झाल्या, सुरु मामाला एक मुलगा व एक मुलगी झाली तर जगदीश मामाला दोन मुली झाल्या. दुर्दैवाने भाऊमामाला

काही अपत्य नव्हते. मला सर्व मुले मला लहानपणी ‘मनू दादा’ असं म्हणत. अजूनसुद्धा वैजू व विभा (अभि मामाच्या मुली) मला अशीच हाक मारतात.

या पुस्तकाचे नाव श्री क्या ६६ @ पुणे. इन. असे का?

खाडिलकर, मामा कंपनी मला मी जसा थोडा मोठा झालो तसे मन्या, ऐवजी श्रीक्या म्हणायला लागले. सुरू मामा मला अजूनही श्रीक्या असेच म्हणतो. त्याने पूर्ण नावाने म्हणजे श्रीकांत असे म्हटले तर कुठे तरी चुकल्यासारखे अजूनही वाटते. म्हणून खास करून सुरू मामासाठी माझ्या मनात आले की या पुस्तकाचे नाव आपण ‘श्रीक्या’ ठेवावे.

श्रीक्या ६६पुणे.इन, हे पुस्तक मी लिहावयास घेतलेल्याला, २ वर्षउलटून गेली. दरम्यानच्या काळात अनेक काही घडून गेले. सर्व जगाने, करोनाची महामारी सहन केली. दुसऱ्या महायुद्धापेक्षाही कित्येक पटीने, भयंकर असे हे संकट आपण अनुभवले. अनेक मान्यवर, व्यक्ती या काळात , आपण गमावल्या. माझे तीन अगदी जवळचे स्नेही, मार्गदर्शक, अनुक्रमे श्री. मराठे, श्रीमणी, व श्री. पी. व्ही. नारायण, याच काळात परलोकी निघूनगेले.

सर्वांत, अतिशय दुःखद घटना म्हणजे, माझी आई, श्रीमती. लीला प्रभाकर आठवले, दिनांक १६ ऑगस्ट२०२० रोजी , आम्हा सर्वांना कायमची सोडून कैलासवासी झाली. या पुस्तकाचे काम चालू असताना, अधूनमधून काही पाने मी आईला वाचायला देतअसे. आज आई हे पुस्तक प्रकाशित करीत असताना, आपल्यात नाही याचे राहूनराहून वाईट वाटते.

■ ■

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | माझे बालपण | ९ |
| २. | धारवाडची माहिती व आठवणी | २० |
| ३. | गदग व मुळगुंदच्या माझ्या आठवणी | ५५ |
| ४. | कारवारच्या माझ्या आठवणी | ६८ |
| ५. | सांगलीच्या आठवणी | ९३ |
| ६. | दावणगिरीच्या आठवणी | १०१ |
| ७. | काकांना मुले किती आवडायची | १०२ |
| ८. | पाऊस पाण्याच्या काही आठवणी | १०४ |
| ९. | माझ्या प्रवासच्या काही आठवणी | १०७ |
| १०. | विविध ठिकाणचे अपघात | १३८ |
| ११. | माझी करिअर अशी घडत गेली | १५७ |
| १२.१. | माझी करिअर अशी घडत गेली (पूर्वार्ध) | १९५ |
| १२.२. | माझी करिअर अशी घडत गेली (उत्तरार्ध १) | २०४ |
| १२.३. | माझी करिअर अशी घडत गेली (उत्तरार्ध २) | २२७ |

| | | |
|---|---|---|
| १३. | मी रबर टेक्नॉलॉजिस्ट का झालो | २६० |
| १४. | मी रबर टेक्नॉलॉजिस्ट झालो नसतो तर कोण झालो असतो | २६४ |
| १५. | माझे व्यावसायिक मित्र | २६९ |
| १६. | माझी पत्रकारिता | २७३ |
| १७. | माझ्या गत जीवनाने मला काय शिकविले | २९६ |
| १८. | माझ्या पाककृती | ३०१ |
| १९. | काही न विसरता येणारे क्षण | ३०७ |
| २०. | जाता जाता काही न विसरता येणारे क्षण | ३५५ |
| २१. | आपली ही जीवनरूपी कॅसेट रिवाईंड करता येईल का? | ३७० |

# १. माझे बालपण

माझा जन्म सांगली येथे दि. १५ डिसेंबर १९५३ रोजी झाला. खाडिलकर व आठवले घराण्यात बऱ्याच वर्षांनी, एक नातवंड जन्माला येणे व तेही मुलगा! त्यामुळे बालपणी आजोळी खाडिलकर घराण्यामध्ये माझे अमाप कौतुक झाले. काका पोस्टामध्ये नोकरी करीत होते.

माझे वडील म्हणजेच काका (मी वडिलांना 'काका' म्हणायचो) म्हणजेच कै. श्री प्रभाकर नरहरी आठवले हे पोस्टमास्तर. एक अतिशय आत्मविश्वासी, आत्मसंतुष्ट (आहे त्या परिस्थितीत आनंदी), परोपकारी वृत्तीचे व कधीही कुठलेही काम येत नाही असे त्यांनी कधी मानले असे मला वाटत नाही. नेहमी नवीन काहीतरी करण्याचा त्यांचा प्रयत्न



हेमंत दादा व मी

हेमंत दादा



त्यांचा उत्सव हा मला कायम उत्साहवर्धक ठरतो. पोस्ट खात्यात नोकरी असल्यामुळे साधारणपणे दर तीन वर्षांनी काकांची बदली होत असे. त्यामुळे माझे शिक्षण धारवाड, हुबळी, कारवार आणि मग परत धारवाड येथे पार पडले.

बालपणी दर उन्हाळीच्या सुट्टीमध्ये, दोन प्रवास हे अगदी ठरलेले. एक ट्रीप सांगलीला आजोळी (खाडिलकर कुटुंब – आईचे माहेर) व दुसरी गदग व मुळगुंदला दुसऱ्या आजोळी (आठवले कुटुंब – काकांचे (माझे वडील, प्रभाकर नरहरी आठवले). दोन्ही ठिकाणी खूप, धमाल केली. दोन्ही ठिकाणच्या गमतीजमती वेगळ्या, पण तितक्याच हेवा वाटावा अशा.

आमचे आठवले घराणे, मूळचे कोकणातील (बहुतेक देवगड जवळपास), परंतु बरेच वर्षांपूर्वी, म्हणजे पेशवा काळात, कामानिमित्य कर्नाटक दौऱ्यात गेले असता, मुळगुंद (गदग) जवळचे एक खेडेगाव येथे स्थायिक झाले. माझे प्रायमरी म्हणजे पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण, धारवाड येथे बासेल मिशन स्कूलमध्ये झाले. हा काळ होता १९५९ ते १९६३.

मी साधारणपणे २ किंवा ३ वर्षांचा असल्यापासून (कळायला लागल्यापासून – असे मला वाटते!, खरे तर अजूनही मला कळते किंवा नाही हे, माझ्यापेक्षा तुम्हाला सर्वांना जास्त माहीत. असो!) आम्ही धारवाडला सप्तपूर या भागात, देशपांडे (जलालपूरकर), यांच्या बंगल्यात भाडेकरू म्हणून राहात होतो. भाऊसाहेब देशपांडे व सौ. देशपांडे हे आमचे घरमालक. या दांपत्याला ४ मुली (इंदू, उषा, विजू व सुशील ) व सर्वांत धाकटा एक मुलगा दिलीप. दिलीप हा माझा बालपणचा पहिला मित्र. माझ्यापेक्षा ३ ते ५ वर्षांनी मोठा. परंतु अगदी सुस्वभावी, माझी लहान भावाप्रमाणे काळजी घ्यायचा. तसे सर्व देशपांडे कुटुंब म्हणजे, जणू आमचे नातेवाईकच.

त्यांच्या बंगल्यातील एक बाजूला ३ खोल्या म्हणजे आमचे घर. मूळ बंगल्यात देशपांडे कुटुंब राहात असे, बंगल्याच्या दुसऱ्या बाजूस, एक ख्रिस्ती कुटुंब राहात असे. कृपालीज, बायलीज, तेरी, मेरी व आंतोन अशी त्याची नावे. आमच्या व देशपांडे कुटुंबाचे घरामधील दार हे अगदी नेहमी उघडेच असे. अगदी शेजारी, अगदी कसे तर आता एक जाहिरात टीव्ही वर सतत लागते, ''अहो या फॉर्मवर नातेवाईक या समोर तुम्ही शेजारी लिहिले आहे.'' तर एक बाई लगेच उत्तर देते, ''अहो नुसते शेजारी नाही, सख्खे शेजारी'' अगदी तसेच.

या सर्व मुली, मुलगा, व देशपांडे दांपत्य, माझ्या आईला लीला अक्का व काकांना पंत असे म्हणत. मी या सर्व मुलींना 'मावशी' म्हणत असे. अजूनही सुशील मावशी व दिलीपशी आमचे संबंध आहेत. या कुटुंबात अजून ३ व्यक्तींचा समावेश होतो, सौ. देशपांडेंच्या आई म्हणजेच मामी, मामीचे पती व घरी स्वयंपाक करणाऱ्या सीताअक्का. ह्या कुटुंबाचे आम्ही एक भागच जणू असे अतिशय चांगले संबंध. आता असे काही, पूर्वीच्या काळी असायचे यावर विश्वास बसणे किती कठीण आहे नाही का? खरोखर केवळ काल्पनिक कथानक वाटावे तसे.

आमच्या घराच्या अगदी जवळ म्हणजे एक प्लॉट सोडून, सुधा मावशी, श्री. दादा (सुधा मावशीचे वडील) श्री बंडोपंत खाडिलकर व सौ. सरलाकाकू राहत. सुधा मावशी व इंदू, उषा, विजू व सुशील मावशी या सर्व जवळपास एका वयाच्या व सख्ख्या बहिणी इतक्या जवळच्या मैत्रिणी.

बहुतेक तिसरीत असताना काकाची बदली हुबळीला झाली. सराफ कट्टा या भागात, पोस्ट मास्तर म्हणून. हे ठिकाण लक्षात राहण्याचे कारण म्हणजे जवळील बुआ स्टँड, त्याचे नाव दुर्गात बैल व दुसरे म्हणजे अक्काआत्याचे घर किल्ला या भागात. अक्काआत्या व अरुण (अक्काआत्याचा मुलगा), माझे खूप लाड करीत. अगदी बेताची

परिस्थिती परंतु, अतिशय मोठ्या मनाचे. अक्काआत्याची अजूनही आठवण येते. अक्काआत्या माझ्या लक्षात राहण्याचे अजून एक कारण म्हणजे अक्काआत्याच्या सासूबाई. त्या अतिशय प्रिय. एकदा काय झालं, अक्काआत्याच्या सासरेबुवांनी, नित्यनेमानुसार सकाळी अंघोळीनंतर देवपूजा उरकली व सोवळे बदलण्यासाठी दुसऱ्या खोलीत गेले. अक्काआत्याच्या सासूबाईंनी पटकन पूजेचे सारे साहित्य घासूनपुसून जागेवर ठेवले. काही क्षणानंतर, अक्का आत्याचे सासरेबुवा देवघरात आले. पूजेचे सर्व साहित्य जागेवर व न वापरल्यासारखे पाहून, त्यांचा समाज असा झाला की, अरेच्या! आज पूजा करायची राहिली वाटतं? झालं. मग काय, देवांची लॉटरीच, पुनश्च एकदा पूजा.

एक वर्षानंतर, काकांची बदली पुन्हा धारवाडला झाली. योगायोग किंवा काही ऋणनुबंध माहीत नाही, धारवाडला सप्तपूरला देशपांडे बंगल्यात, एक वर्षांपूर्वी राहात असलेले घर रिकामे झाले होते, तेच पुन्हा मिळाले भाड्याने.

१९६४ साली, काकांची बदली कारवार येथे झाली. झाले. नवीन गाव, नवीन शाळा, मग माझे इयत्ता ५ वी ते ७ वी (१९६४ ते १९६६), कारवारला हिंदू हायस्कूल येथे पार पडले. १९६७ साली काकांची बदली पुन्हा धारवाडला झाली. परत एकदा गाव, शाळा बदलली. आम्ही कारवारहून होसयल्लापूर, धारवाड येथे आलो. इयत्ता ८ वी ते १० वी (१९६७ ते १९६९), माझे शिक्षण मग कर्नाटक हायस्कूल येथे पार पडले.

१९६९ साली पुन्हा एकदा काकांची बदली होसयल्लापूरहून, धारवाड हेड पोस्ट ऑफिसला झाली. पुन्हा घर बदलले. होसयल्लापूरहून आम्ही साधनकेरी येथे राहायला गेलो. १९६९ साली मॅट्रिक (१० वी) झाल्यावर मला कर्नाटक कॉलेज, येथे ११ वी (कर्नाटकात याला PUC म्हणतात, म्हणजे प्री युनिव्हर्सिटी कोर्स) ला ॲडमिशन मिळाली. १० वी ला मला ६९% मार्क मिळाले होते, त्या काळात फर्स्ट क्लासला बऱ्यापैकी किंमत होती. PUC पास झालो, पण ४८%

मार्क पडले. मी अक्षरश: हादरून गेलो होतो, पण काकांनी अशावेळी खूप धीर दिला. कदाचित ही घसरगुंडी मॅट्रिकला मराठी मिडीयम आणि कॉलेजमध्ये इंग्लिश माध्यम यामुळे झाली असेल, पण बरेच लवकर या धक्क्यातून सावरलो. B.Sc (पार्ट १), १९६९ ते B.Sc. (पार्ट ३), १९७३ साली पूर्ण केले. दरम्यान १९६९ ते १९७२ या तीनही वर्षी उन्हाळी सुट्टीत जवळपास २ महिने मी पनवेलला भाऊमामाकडे (ग. पु. खाडिलकर) जात असे. भाऊमामाने रबर टेक्नॉलॉजिस्ट केले होते व मी B.Sc. नंतर रबर टेक्नॉलॉजिस्ट पुढील करिअरसाठी मनोमनी निवडले होते. ३ वर्षं, २ महिने मामाबरोबर रबर अधेसिव्ह मॅनुफॅक्चर्स येथे नियमित काम शिकून, बऱ्यापैकी तयार झालो होतो.

परीक्षा एप्रिल १९७३ मध्ये संपल्यावर दावणगिरीला गेलो. काकांची बदली, धारवाडहून दावणगिरीला १९७१ साली झाली. आई व काका दावणगिरीला आणि मी एकटा धारवाडला. सुधामावशीचे आई, बाबा, सौ. सरला काकू व श्री. बंडूकाका यांच्याकडे राहू लागलो.

१९७२ साली सौ. सरला काकू व श्री बंडू काका सुधा मावशीकडे डोंबिवलीला राहायला गेले व पुढील जवळपास एक ते दीड वर्ष मी एकटा राहत असे. अधूनमधून सुट्टीत दावणगिरीला, आई व काकांना भेटायला जात असे.

दावणगिरीला काकांना टेलिग्राफ डिपार्टमेंटच्या (त्या वेळेस पोस्ट व टेलिग्राफ ही दोन वेगळी खाती होती.) वसाहतीत, खोली मिळाली होती. येथे रोज संध्याकाळी, वसाहतीतील ग्राऊंडवर, ड्यूटी संपलेले कर्मचारी व्हॉलिबॉल खेळत. मी पण तिथे टाईमपास म्हणून जात असे.

तसा माझा एक कर्नाटक कॉलेजमधील वर्गमित्र दावणगिरीचा होता. मार्केट यार्डमध्ये त्यांची एक पेढी होती. अधूनमधून एक फेरी त्याच्या पेढीवरही मारत असे.

दावणगिरी कॉफी, कापड व केळी या साठी प्रसिद्ध होते. सोनकेळी खूप छान मिळत होती. माझ्या काकांना एकंदरीत फळाची खूप आवड, घरी नेहमी एक केळीचा घड टांगलेला असे.

दावणगिरीची आठवण आली की, अजून एक आठवण न चुकता मनात खोलवर रुजलेली व ती म्हणजे हरिहर. हरिहरला त्या वेळी नुकतेच लग्न होऊन, शीलाआत्या आली होती. त्यांचे यजमान श्री. श्रीकृष्णराव, हरिहर किर्लोस्करमध्ये कामास होते. दावणगिरी मुक्कामी असताना, एक खेप, हरिहरला अगदी ठरलेली. हे दांपत्य मला फार आवडायचे. दोघेही माझे खूप लाड करीत असत. बहुतेक सर्व भेटीत सिनेमा पाहायचो. शीला आत्या, अगदी बालपणापासूनची माझी आवडती. अतिशय प्रेमळ व सुस्वभावी. सर्व भावांची तिला काळजी, विशेष करून मधूकाकांची.

या वसाहतीत आमच्या घराशेजारी एक तंजावरची फॅमिली राहात असे. ते कायम आम्हीसुद्धा महाराष्ट्रीय असे म्हणत. त्यांचे मराठी मात्र मला कधीच समजले नाही.

मे १९७३ साली माझी आजी श्रीमती सरस्वतीबाई यांचे मोती बिंदूचे ऑपरेशन झाले. त्या काळी मोतीबिंदू हेसुद्धा एक मोठे ऑपरेशन समजले जात असे. ८ ते १० दिवस हॉस्पिटलमध्ये राहावे लागत असे. आजी घरी आली. मे १२ किंवा १३ तारखेस १९७३ साली. कदाचित त्याच दिवशी, पनवेलहून भाऊ मामाची तार (टेलिग्राम) आली. मामा व मामीला बाहेर गावी जायचे होते व माझी परीक्षा व आजीचे ऑपरेशन वगैरे सर्व आटोपले असेल तर लगेच पनवेलला ये व कंपनी जॉईन कर असे कळविले होते. मी १५ मे १९७३ ला पनवेलला दाखल झालो व १६ मे १९७३ ला माझी नोकरी सुरू झाली. बी.एस्सी. चा निकाल जून १९७३ मध्ये लागला. मला ६७% मार्क मिळाले. एम.एस्सी.ला ॲडमिशन नक्की मिळाली असती, परंतु बी.एस्सी. नंतर, पुढील सर्व शिक्षण व करिअर स्वतःच्या पायावर उभे राहून करायचे अशी तयारी केली होती.

त्या वेळी मला पगार होता २२५ रुपये महिना. (अर्थात, उडपी हॉटेलमधील कामगाराप्रमाणे, जेवणखाण, राहणे मोफत या तत्त्वांवर. परंतु त्या काळात स्वस्ताई होती. २२५ मधून जवळपास १२५ ते १५० रुपये शिलकी राहत. गोलमोहर, या मामाच्या घर जवळील, सिंडिकेट बँकेत, स्वतःची कमाई सुरू झाल्यावर पाहिले. अकाउंट उघडले. दर महिना बचत करायची सवय अशी लागली. पहिल्या एक-दोन पगारात, आई, काका, अप्पा काका (श्री. पु. ल. खाडिलकर ), मामा (श्री. ना. ल. खाडिलकर), मोठी आई (आईच्या आईला) व मामी (आईची काकू), या सर्वांना काही ना काही भेटवस्तू घेतल्या. तर अशी झाली सुरुवात.

**चला तर मग पाहूया माझे बालपण**

आम्ही देशपांडे (मोकाशी) बंगल्यामध्ये भाडेकरू म्हणून बरेच वर्षे राहिलो. देशपांडे वाड्याची एक गंमत किंवा योगायोग तो असा की मला कळायला लागल्यावर पहिल्यांदा काकांची बदली हुबळीला झाली. नशिबाने तिथे आम्हाला फक्त एकच वर्ष राहावे लागले.

एका वर्षाने काकांची बदली परत धारवाडला झाली. धारवाड हे एक अतिशय सुंदर धारवाड हे एक छोटेसे गाव अतिशय सुंदर हिरवेगार माणसे अतिशय मनमिळाऊ व चांगली जवळजवळ ६० -७० टक्के लोकांना उत्तम मराठी येत असे साधारणपणे सात वेगवेगळ्या वरती वसलेले गाव.

आम्ही राहायचो तो भाग म्हणजे सप्तपूर. कर्नाटक कॉलेजच्या पाठीमागे आमच्या म्हणजेच देशपांडे यांच्या बंगल्यात व कर्नाटक कॉलेजमध्ये फक्त एक भिंत होती.

धारवाडमधील माझे १९७३ पर्यंतचे वास्तव्य म्हणजे माझ्या आयुष्यातील सुवर्णकाळ म्हटले तर अजिबात वावगे ठरणार नाही. अतिशय सुंदर, थंडगार हवा, वर्षात नऊ महिने थंडी असे हवामान अतिशय सज्जन माणसे म्हणजेच धारवाड. आणखीन एका गोष्टीसाठी

अतिशय प्रसिद्ध. ते म्हणजे बाबू सिंगचे पेढे. बाबू सिंगचे दुकान लाईन बाजार (किंवा गल्ली) आणि येथे होते. आमच्याकडे कोणी पाहुणे मंडळी आली की पाहुणे म्हणजे परत निघण्याच्या प्रवासाआधी एक महत्त्वाचे काम म्हणजे बाबू सिंहकडे जाऊन त्याच्या लाईनमध्ये उभे राहून पेढे घेऊन येणे, हे एक अतिशय आनंदाचे काम असेल. बाबू सिंगच्या आठवणी अजूनही कायम कोरल्या गेल्या आहेत. बाबू सिंग हे काही औरच व्यक्तिमत्त्व होते. माझ्या मते, ते केवळ धंदा करण्यासाठी ते पेढे विकत नसावेत. दररोज ठरल्याप्रमाणे तीन पराती भरून पेढे ते बनवीत असत. विकत घेणारी मंडळी त्यांच्या दुकानाच्या समोर कट्ट्यावर वाट बघत बसून राहात. साधारणपणे नऊ वाजता एखाद्या नाटकाप्रमाणे पेढ्यांचा नैवेद्य दिलेली घंटा वाजू लागली की सर्व मंडळी लगबगीने विकत घेण्यासाठी रांगेत उभे राहात.

हा नैवेद्य देऊन झाल्या वर बाबू सिंह, आपल्या दुकानाची एक फळी बाजूला करून बाहेर येऊन एकंदर परिस्थितीचा अंदाज म्हणजे रांगेमध्ये किती लोक आहेत याचा अंदाज घेऊन आज प्रत्येकी किती पेढे मिळतील म्हणजे एक किलो का अर्धा किलो ते ठरवीत आणि चक्क रेशनच्या दुकानाप्रमाणे तेवढेच पेढे ते प्रत्येकाला विकीत. या त्यांच्या आगळ्यावेगळ्या विक्री व्यवस्थेवर कोणीही कधीही तक्रार केलेली मला आठवत नाही. एखादे वेळेस जर जास्त वेळ हवे असतील तर मग एक ऐवजी दोघांनी किंवा तिघांनी रांगेमध्ये उभे राहायचे व मिळतील तितके मिळतील ते विकत घ्यायचे. त्यांच्या पेढ्याची चव अजूनही जिभेवर ताजी आहे. धारवाडला अजूनही एक पेढे बनवणारे होते ते म्हणजे मिश्राल, पण बाबू सिंह यांच्या पेढ्याची सर मिश्रा यांच्या पेढ्यांना कधीच जाणवली नाही. लाईन आळी हा भाग म्हणजे मुख्य धारवाड शहर. या लाईन आळीतले आणखी एक आकर्षण माझ्यासारख्या बालमनाला ते म्हणजे विशू काका आठवले यांचे घर. ते याच गल्लीत किबे यांच्या वाड्यात राहात असत. विशू काका

म्हणजे माझे चुलत आजोबा, (काकांचे चुलते) म्हणजे एक विलक्षण व्यक्तिमत्त्व. स्वतः वकील. विठूकाका हे एक अतिशय बुद्धिमान असे व्यक्तिमत्त्व. पेशाने वकील, पण वकिली जवळपास केली नसावी. त्यांचा सबंध दिवस मित्र समाज, या क्लबमध्येच व्यतीत होत असे.

घरी कोणी पाहुणे आले की विशू काकांना बोलवायला मित्र समाजमध्ये जायला मला अतिशय आवडायचे. त्याचे कारण मित्र समाजमध्ये पातळ भाजी व ब्रेड केक मिळे. अशा उच्च प्रकारचे नाश्त्याचे आकर्षण मला होतं. आजोबा कधीही नाश्ता करायला दिल्याशिवाय परत पाठवायचे नाही आणि वरती मला म्हणायचे, ''मी येतो. तू पुढे जा बाळा. मी पाठोपाठ आलोच.'' असे कमीतकमी दोन-तीन वेळा बोलावणे पाठवले आहे आजोबा घरी यायचे. अतिशय विनोदी स्वभाव. मला तरी ते कधी रागवलेले आठवत नाही. अतिशय मिळून-मिसळून, गमतीजमती करत कुठल्याही प्रकारचे दडपण न घेता आपले आयुष्य कसे जगावे याचे मूर्तिमंत उदाहरण असेच मला वाटते.

या घरासंबंधीच्या आणखीन माझ्या काही आठवणी. मी, काका व आणि आई काही खरेदी निमित्त धारवाडला गावात गेलो. आणखीन जर आजोबांच्या घरी गेलो तर सहसा मी तिथेच राहत असे. पुढचे कमीतकमी तीन-चार दिवस माझा मुक्काम आजोबांच्या घरी. त्याला कारणही तसेच होते. यांच्या आजी अतिशय प्रेमळ तसेच शीला आत्या, वासंती आत्या, सुरेश काका व मधुकाका ही सर्व मंडळी माझी अतिशय आवडती. त्यातल्या त्यात शीला आत्या माझे प्रचंड लाड करीत असे. तिच्याबरोबर तिच्या मैत्रिणींकडे सुद्धा मला घेऊन जायची आणि परत देताना न चुकता त्यांच्या घराजवळील आइस्क्रीमच्या कंपनीचे, आईसफ्रूट मला विकत घेऊन द्यायची. तेव्हा किती पैसे पडत होते आठवत नाही, कदाचित एक पैशाला मिळत असेल, पण ती सुद्धा खर्च करण्याची त्याची मनापासूनची इच्छा ही मला अजूनही आठवते.

धारवाडच्या आजीची एक आठवण. आजींना कमरेच्या त्रासाला मुले वाकता येत नसे. एकदा आम्ही सर्व जण जेवायला बसलो होतो. आजी तूप वाढीत होत्या. माझ्याशेजारी सुरेश काका बसले होते. वाढत, चुकून सुरेशकाकाच्या डोक्यात तूप पडले आणि एकाच धमाल उडाली.

देशपांडे वाड्यातील काही आठवणी. देशपांडे यांना चार मुली आणि एक मुलगा. त्याचे नाव दिलीप. तो माझा मित्र माझ्याहून वयाने चार-पाच वर्षे आहे तरी मोठा होता, पण अतिशय गरीब आणि खूप मनमिळाऊ चांगला. चार मुलींपैकी सगळ्यात मोठी मुले-इंदा मावशी त्याच्यानंतर उषा मावशी आणि नंतर सुशील मावशी माझी अतिशय आवडती. खूप लाड करायची आणि देशपांडे आणि आमचे कुटुंब ही दोन वेगवेगळी कुटुंब आहेत असं कधी मला जाणवायचं नाही

देशपांडे म्हणजे आमचे घरमालक. त्यांच्या बंगल्याच्या एका बाजूच्या तीन खोल्या त्यांनी आम्हाला भाड्याने दिल्या होत्या, पण माझ्या आठवणीत तरी त्यांच्या घराच्या आणि आमच्या दोन-तीन खोल्यांमधले दार कधीही बंद केलेले नसायचे. मी आपल्या घराप्रमाणेच त्यांच्या घरी कायम वावरत असे. काही खाऊ आणला काही नवीन खेळ आणला की मलासुद्धा त्यातला भाग न मागता मिळत असे.

या वाड्यातील गोष्टी कधीही न विसरण्यासारख्या. एक आमचे घर. देशपांडे हे थोडेसे वेगळे होते. त्यांना बासरी वाजवायचा छंद होता. नेहमी जुन्यापुराण्या बासऱ्या घेऊन त्यावरून ते वाजवत असत. त्यामुळे आवाजात काही फरक पडतो का हे बघत असत. त्यांच्या घरी सुंदरा नावाची एक मोलकरीण काम करीत असे आणि या देशपांडे मालकांना बालगंधर्व यांचे अतिशय गाजलेले नाट्यसंगीत 'नच सुंदरी करू कोपा मजवरी धरी अनुकंपा', हे गाणे बासरीवर कायम वाजवीत. त्यावरून मंदा मावशी, सुशील मावशी खूप धमाल करीत असत.

माझ्या धारवाडच्या बालपणातील अजून काही आठवणी. सर्वांत प्रथम मला कोण आठवते तर नीताताई आणि प्रभा. नीताताईबद्दल मला एक अतिशय वेगळी अशी भावना निर्माण झाली होती. मला जेव्हा कळले की नीताताईचे वडील येतात आणि लहान असताना वारले. ते ऐकून त्या दिवशीपासून मला नीताताईबद्दल एक प्रकारची वेगळी आपुलकी किंवा जवळीक निर्माण झाली होती. प्रभा कर्नाटक कॉलेजमध्ये आर्टस्‌ला आधी बी.ए. आणि नंतर एम. ए. करत होती. कधीकधी आमच्या घरी राहायला यायची. आमच्या घरी अभ्यास करताना एकदा हेमंत आठवले त्याला 'दादा' म्हणायचो आलेला होता.

प्रभा थोडीशी नटखट होती आणि एकदा हेमंतचं पेन तिने त्याला न सांगता घेतले आणि लिहू लागली. नंतर हेमंतने विचारले, ''माझे पेन का घेतल'' तर ती त्याला म्हणाली, ''एकाच पेननं लिहून माझा हात दुखतो म्हणून मी तुझं पेन थोडा वेळ घेतलं होतं. त्यात काय बिघडलं?'' पण हे मात्र मला अजिबात आवडलं नाही. त्यानंतर त्यांचा बराच वेळ याच्यावर वादविवाद झाला. अतिशय गमतीदार आणि अतिशय प्रेमळ अशी आठवण माझ्या मनी कायम आहे.

या पेटीवर झोपण्या संबंधी अजून एक आठवण पण ती विसू काकांच्या बाबतीत. आधी सांगितल्याप्रमाणे विशू काका या वाड्यामध्ये भाड्याने राहात असत. त्यांना पुष्पा नावाची एक मुलगी होती.

पुष्पा ही तब्येतीने अतिशय धष्टपुष्ट आणि चांगली जाडजूड होती. एकदा पेटीवरती ती झोपली असताना विशू काका तिथे गेले आणि वहिनींना विचारलं, ''वाहिनी ह्या पेटीवर पोती कसली ठेवलीत?'' वहिनी म्हणाल्या, ''काका पोती नव्हे, पुष्पा झोपलीय.''

■ ■

## २. धारवाडबद्दल थोडक्यात माहिती व आठवणी

धारवाड जिल्हा आणि शहर कर्नाटक राज्यात स्थित आहे आणि धारवाडमध्ये महानगरपालिका प्रशासन आहे आणि कर्नाटक विद्यापीठासह अनेक शैक्षणिक संस्था आहेत. धारवाड जिल्हा आता ५ तालुक्यात विभागलेला आहे. धारवाड, हुबळी, कलागतागी, कुंडगोला, नवलगुंड.

ट्विन सिटीजमध्ये सामील हुबळी हे एक व्यावसायिक आणि औद्योगिक केंद्र आहे आणि धारवाड एक शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्र आहे. बेंगलोरनंतर कर्नाटकमधील दुसरी सर्वांत मोठी महापालिका आहे. यात ६७ वॉर्डस् किंवा २०२.३ स्क्वेअर किलोमीटरच्या ब्लॉकद्वारे व्यवस्थापित केले जाते.

इतिहासकारांच्या मते, धारवाड म्हणजे दीर्घ प्रवासानंतर लहान घराच्या आरामदायी जागा. शतकानुशतके, संस्कृत शब्द 'दारा' आणि 'वाटा' या शब्दांनी 'द्वार' या शब्दाचा शब्द उच्चार झाला आहे.

**इतिहास**

धारवाडचा इतिहास पौराणिक काळात हंगलमध्ये राहणारे पांडव यांच्यापासून सुरू होते. तांबे वरील शिलालेखानुसार बनवसी विविध राजवटींखाली होते. सातव्या शतकातील कदंबारा, चालुक्य इत्यादी

नवव्या शतकात राष्ट्रकूट, बाराव्या शतकात देवगिरीचे यादव राज्य करत असे. १२ व्या शतकापर्यंत धारवाड जिल्हा चालुक्य वंशाचा भाग होता. मग नंतर विजयनगर साम्राज्याचा भाग बनला.



विजयनगर साम्राज्याचे पतन झाल्यानंतर विजापूरच्या आदिल शाही राज्यात सामील झाल्यानंतर धारवाड जिल्हा अधिकाधिक महत्त्वाचे झाले. याचे मुख्य कारण आदिलशाही सुलतान– मानकीला यांनी बांधलेले किल्ला – जे नंतर नजराबाद म्हणून ओळखले जात असे. आदिलशाही सुलतानानंतर, धारवाड जिल्हा थोडक्यात मुघल साम्राज्याने ताब्यात घेतला, त्यानंतर मराठ्यांनी, हैदर अली आणि टिपू सुलतान आणि ब्रिटिशांनी त्यानंतर कब्जा केला. मुंबईचे राज्यपाल यांनी धारवाड कर्नाटक एकीकरण लढ्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

धारवाडमधील काही सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहास हे आहेत.

१८१८ : ब्रिटिश शासन सुरुवात.
१८२६ : प्रथम मराठी शाळा सुरू झाली.
१८३० : सिव्हिल हॉस्पिटलचे बांधकाम
१८३१ : प्रथम कन्नड शाळा सुरू झाली
१८३६ : बासेल मिशनचे आगमन
१८४० : कॅथोलिक चर्च बांधकाम
१८४४ : मानसिक आरोग्य केंद्राची स्थापना
१८४८ : शासकीय इंग्रजी शाळा स्थापन.

१८ ४ ९ : श्री गुरुनाथराव पाठक यांनी ‘संस्कृत पाठशाला’ स्थापन केली

१८५६ : नगरपालिका सुरू

१८६३ : बासेल मिशन गृहिणी लॉन्च

१८६५ : मुलांसाठी प्रशिक्षण महाविद्यालयातून ‘साप्ताहिक’ सुरू होते.

१८६८ : प्रथम मुलींची शाळा सुरू झाली

१८७९ : कर्नाटक म्युझिक स्कूल द्वारा सुरू

१८९२ : परिवाराजा स्वामी विवेकानंदला भेट देणे

१८९५ : मुलींसाठी प्रशिक्षण महाविद्यालय सुरू

१८९६ : राइटिंग्स मॅगझिनची सुरुवात

१९०२ : द थिओसॉफिकल सोसायटी सुरू

१९०७ : लोकमान्य टिळक यांनी जाहीर भाषण

१९१४ : कर्नाटक इस्टर्न रिसर्च सेंटर सुरू

१९१५ : लोकमान्य टिळक यांचे जाहीर भाषण

१९१७ : कर्नाटक महाविद्यालयाची स्थापना

१९२० : महात्मा गांधी यांनी धारवाडची भारती?

१९२२ : कर्नाटक लिंगायत शिक्षण समितीची सुरुवात

१९२७ : सायमन कमिशन विरुद्ध चळवळ

१९२८ : श्री. नादिगेरा यांनी सुरुवातीस मालाजजजाना जिम्नॅशियमद्वारे

१९३० : साल्ट सत्याग्रह रंगनाथ दिवाकरची अटक. ब्रिटिश ध्वज हॅमरच्या रमरवा, डीपी करमरकर आणि नारायणराव कबूरू यांच्यापासून आला.

१९३३ : प्रसिद्ध नाटककार श्रीरंगम यांनी ‘कर्नाटक नाट्य लक्झरी एमेच्योर ड्रामा सोसायटी’ स्थापन केली.

१९३६ : अलुरु वेंकटराय्यापासून जन्मदिन साजरा म्हणून दशहरा उत्सव सुरू झाला

१९३९ : सुभाषचंद्र बोस यांनी पुन्हा भेट दिली

१९४९ : कर्नाटक विद्यापीठ

१९७४ : भगवान श्री सत्य साईबाबा यांनी सप्तपूर येथे श्री सत्य साई एज्युकेशनल सोसायटीला भेट दिली.

१९८६ : कृषी विद्यापीठ, धारवाड

धारवाडच्या शालेय जीवनाच्या काही आठवणी. मी बासल मिशन या शाळेमध्ये मॉन्टेसरीला व पहिली ते चौथी जात होतो. मुलं शाळेत जाण्यासाठी एक ठिकाणी बसायची. आम्हाला न्यायला-आणायला एक खास माणूस ठेवलेला असायचा. त्याचे नाव होते मायकेल. मायकेल माझ्या मनामध्ये कायम घर करून बसला आहे. त्याचे कारण म्हणजे एकदा मी एका अपघातातून जवळजवळ मरता मरता वाचलो होतो. मी बसमधून उतरलो. पाठीमागच्या बाजूने रस्ता क्रॉस करत होतो समोरून एक दुसरे वाहन येत होते. माझे लक्ष नव्हते. मायकेलचे कसे काय लक्ष गेले कुणास ठाऊक, त्यानं जवळजवळ झेप टाकून मला उचलून बाजूला केले. त्यामुळे मी अजून जिवंत आहे. तो मायकेल आज आहे की नाही, कल्पना नाही पण मायकलच्या आठवणी माझ्या मनात कायम राहतील.

थोडेसे आता बासल मिशन हायस्कूलबद्दल. माझ्या चार ते पाच वर्षांच्या काळाबद्दल. आमच्या क्लास टीचर होत्या, चिकोडी. त्या धर्माने ख्रिश्चन होत्या. पण त्यांना डोसा, इडली वगैरे असे साऊथ इंडियन पदार्थ अतिशय आवडायचे. माझ्या वर्गात केदारी नावाचा एक मुलगा होता. त्यांचे हॉटेल होते. आमच्या मनात आले की त्या केदारीला सांगायच्या, ''अरे तुझ्या हॉटेल मधून गरम-गरम डोसा घेऊन ये.'' केदारी बिचारा निमूटपणे जायचा व डोसा घेऊन यायचा.

त्या काळात अजूनही, कोणाच्याच घरी टेलिव्हिजन नव्हते. बऱ्याच घरी रेडिओ, ट्रांझिस्टरसुद्धा नसायचे. आम्हाला माझ्या मित्रांना क्रिकेट अतिशय आवडता खेळ. त्या काळात क्रिकेट मॅचेस या फक्त पाच दिवसाच्या टेस्ट मॅच असायच्या. मग काय मधल्या सुट्टीत आम्ही शाळेतून कोपऱ्यावर एक रेस्टॉरंट होते धारवाड रेस्टॉरंट. तिथे रेडिओवर

कॉमेंट्री लावलेली असायची आणि सुट्टीत जाऊन कॉमेंट्री थोडा वेळ ऐकून लेटेस्ट स्कोर काय झालं ही माहिती शाळेत येऊन बाकी सर्वांना पुरवायचं. त्याचे कौतुक आता घरी टी.व्ही., रेडिओ किंवा बाकी सगळी माध्यम असले तरी त्या काळचे ती सुविधा ती सुद्धा आमच्या शाळेत जवळची की अजूनही चांगलीच लक्षात आहे.

धारवाड रेस्टॉरंटबदलची एक आठवण नक्कीच सांगावी लागेल. धारवाड रेस्टॉरंटमध्ये दर रविवारी सरदार वडा म्हणून एक अफलातून डिश मिळायची. आम्ही, पण बऱ्याच वेळा मी काका आणि चालत चालत धारवाड रेस्टॉरंटला यायचं आणखी एक एक प्लेट वडा नक्की. चालत जायचो यानिमित्ताने हॉटेलचा खर्च भरून निघायचा. त्या वेळेस दर खूप कमी होते पण तरीसुद्धा थोडीफार बचत ही नेहमीच करावी लागायची आणि आम्ही ती करायचो.

धारवाडची अजून एक आठवण म्हणजे आमचे घरचे किराणा सामान आम्ही तोरगलमठ या एका दुकानातून दर महिन्यात आणायचं. आई महिन्यासाठी लागणाऱ्या सामानाची यादी तयार करायची आणि मग मी आणि आई बसने धारवाड गावात जायचो. यादी त्यांच्याकडे द्यायची. आणखीन नंतर मग श्याम जोशी म्हणजेच वडिलांचे मामा त्यांच्याकडे त्यांच्या घरी थोड्याफार गप्पा मारायला जायचे. परत आलो की लिहून दिलेले सामान तयार असायचे.  जवळपास एक टांगा करून सगळे सामान ठेवून मी आणि आई घरी परत यायचं. व्यवस्थितपणामुळे आमच्या घरी कुठलीही एक वस्तू नाही किंवा संपली असे कधीच झालं नाहीये.

गंमत म्हणजे तोरगलमठ, जातीने लिंगायत पण व्यवस्थित मराठी बोलायचे. त्यांचा पोशाख म्हणजे जवळजवळ अप्पाकाका किंवा सांगलीचे मामा यांच्यासारखाच. धोतर, कोट आणि काळी टोपी आणि बोलायला अतिशय सालस. अतिशय सज्जन माणूस. आता त्यांच्यासारखे दुकानदार शोधून सुद्धा सापडणार नाहीत.

धारवाड संबंधीत अजूनही आठवण ती अशी : आमची घरमालक देशपांडे यांच्या घरी स्वयंपाकाला एक बाई होत्या. त्यांचं नाव सीताबाई. एकदा मी, काका नाशिकला जाण्याचे ठरवले. दादा काकांच्याकडे जाताना प्रवासात पाणी लागेल म्हणून आम्ही सीताबाई यांचेकडील फिरकीचा पितळेचा तांब्या घेऊन गेलो होतो. आम्ही पुढे मुंबईला जायचे ठरवले. नाशिक रोड स्टेशनवर गेलो. साधारण १९६५ चा काळ असेल. पंजाब मेल नाशिक रोड स्टेशनवर आली. तुडुंब भरलेली होती. आता या गाडीतून कसे जाणार हा प्रश्न मला पडला होता, पण हा प्रश्न काकांना अजिबात नव्हता. त्यांनी मला चक्क खिडकीतनं डब्यात टाकले आणि स्वतः प्रयत्न करू लागले, पण त्यांना काही तसे करता आले नाही. त्या लोकांनी दार उघडले नाही आणि एवढ्यात गाडी सुरू झाली. एका माणसाने मला उचलून खिडकीतून बाहेर काकांकडे दिले. नाही तर कदाचित प्रसिद्ध विनोदी किंवा गाजलेले नट-नट्याप्रमाणे, मी मुंबईत १९६५ सालीच दाखल होऊन. एखादा नट वगैरे झालो असतो. कदाचित आणखीन काही तरी झालो असतो परमेश्वरालाच माहीत, पण तसे घडले नव्हते. त्यामुळे ज्या माणसाने मला काकाकडे उचलून दिले तो प्रसंग मला अजूनही ठळकपणे आठवतो.

विशेषतः धारवाडला एकमेकांना मान-सन्मान किंवा सन्मानाने वागवणे हे कसे असायचे याचे एक उदाहरण म्हणजे सीताबाईची आठवण. सगळी जण 'सीताआक्का' असंच म्हणायची. आता याचा अर्थ आहे की मोठी बहीण. त्यामुळे हा नोकर, हा मालक असा भेदभाव पूर्वीच्या काळी अजिबात नसायचा. आता अशा प्रकारची नाती अक्षरशः दुर्मीळ झालेली आहेत.

धारवाडच्या माझ्या प्रायमरी स्कूलच्या काळातील वास याबद्दलची अजून एक अतिशय मनावर परिणाम करून गेलेली अशी आठवण म्हणजे आमच्या देशपांडे वाड्याच्या शेजारी अजून एक डॉक्टर गुर्जर यांचा वाडा. डॉक्टर गुर्जर यांनी कॉलेजच्या मुलांसाठी छानपैकी होस्टेल

बांधलेले होते. त्यांना दोन मुले होती. लहान मुलगा अभय आणि मोठ्या मुलाचे नाव, बहुतेक भय्या असे होते, आता आठवत नाही. एके दिवशी पावसाळ्यात त्यांचे आजोबा, काय वाटले कोणास ठाऊक, ''चला मुलांनो, तुम्हाला मी सिनेमाला घेऊन जातो'' म्हणून ते तयार होऊन निघाले. तेवढ्यात त्यांना आणि मुलांना स्वेटर घालावा असे वाटले.

धारवाड हे त्या वेळी अतिशय थंड आणि छान गाव होते. विशेषतः पावसाळ्यात तर चांगलीच थंडी असायची. त्यामुळे त्या मुलांना स्वेटर घालावा असे वाटणे साहजिक होते. मी स्वेटर घेऊन येतो म्हणून भय्या (मोठा भाऊ) आत गेला. बराच वेळ झाला तर बाहेर आला नाही म्हणून आजोबा आणि अभय बघायला गेले. आणि जे होऊ नये ते नेमके घडले होते. स्वेटर काढण्यासाठी म्हणून कपाट उघडून, त्याच्या चढला आणि त्याचे वजन असल्यामुळे, ते कपाट त्याच्यावर पडले आणि तो जागच्या जागीच ठार झाला.

ती दुर्घटना घडून कमीत कमी ५० ते ५३ वर्षं झाली असतील, पण अजूनही ती आठवण अतिशय कोरून ठेवल्यासारखी ताजी आहे. त्या काळी त्या वयात मरण म्हणजे काय हे कळत नसेल, पण नंतर तो मुलगा कधीच आमच्यात खेळात नसायचा याच्यावरून जे नेहमी लहान मुलांना सांगितले जाते तसे मी माझ्या मनाची समजूत करून घेतली की अभयचा दादा आता देवाघरी गेला आणि तिथून तो कधीच परत येणं शक्य नाही. अजूनही त्या गोष्टीची चुटपुट लागून राहिलेली आहे.




**बासेल मिशन प्रायमरी स्कूल**

माझी शाळा



शाळेतला मी



## १. माझे बालपण व प्राथमिक शिक्षण

माझी शाळा बासेल मिशन प्रायमरी स्कूल. नंतर कर्नाटक हायस्कूल, धारवाड. माँटेसरी व प्राथमिक शाळेच्या आम्ही देशपांडे बंगल्यात, भाड्याने राहा त होतो. माझी पहिली शाळा म्हणजे, बासेल मिशन स्कूल. ही शाळा त्या काळच्या प्रसिद्ध धारवाड रेस्टॉरंटजवळ होती. या काळी धारवाड युनिव्हर्सिटी ते धारवाड मेन बस स्टॅन्ड अशी सिटी बस होती. मासिक पासची व्यवस्था व सप्तपूरचा स्टॉप ते शाळा व परत घेऊन जाण्यासाठी, एक केअर टेकर होता. मायकेल हे त्याचे नाव. मायकेल हा अतिशय प्रेमळ माणूस होता. सर्व मुलांची तो अतिशय काळजी घ्यायचा. माझा अतिशय लाडका होता. एकदा एका मोठ्या अपघातातून त्याने मला वाचविले होते.

धारवाडची अजूनही ताजी आठवण. साधारणपणे, १९५९-६० सालची गोष्ट आहे, मी सहा-सात वर्षांचा असेन, सुरूमामा व जगूमामा सुट्टीसाठी धारवाडला आले होते. त्या वेळी धारवाडला दिवसातून सकाळी एक दोन तासच (बहुतेक पहाटे पाच-सहा वाजता) नळाला पाणी येत असे. अंघोळीसाठी पाणी तापवायला आमच्याकडे एक तांब्याचा बंब होता. सकाळी चहा झाला की बंब पेटवणे, पाणी तापवणे हे काकांचे आवडते काम. बंबासाठी लाकडे मागवून त्याचे छोटे तुकडे करणे (याला ढलप्या असे म्हणत) हेही काकाचे काम. काकाची 'लवकर अंघोळी करा' ही रोजची आज्ञा. दोन-तीन हाका मारूनही काहीही परिणाम ना झाल्यामुळे मग, सुरूमामा व जगूमामाला

झोपेत असताना उचलून बाथरूममध्ये नेऊन अंघोळ घालणे हाही काकांच्या कामाचा एक आवडता कार्यक्रम. अंघोळ करा व हवे तितके झोप असे काकांचे म्हणणे असे.

कर्नाटक हायस्कूल, प्रसिद्ध शाळा किंवा धारवाड महान विद्यालय, महान शिक्षणशास्त्रज्ञ श्री. श्रीनिवासराव यांचे कार्य पुढे नेत लवकरच डॉ. नारायणराव कब्बूर यांनी त्यांच्या कठोर आणि निःस्वार्थी कामाने ते उच्च दर्जाला आणले. शाळेचा आदर्श उपनिषदांनी ठरविला होता. सर्वसमर्थ देव आपल्यातील शिक्षक आणि शिकवलेले दोन्ही रक्षण करेल; तो आपल्याला एकत्रितपणे पोषण देवो, आपण एकत्रितपणे कार्य करूया. आपण एकमेकांवर द्वेष करू नये.

### २. माझे कॉलेज–कर्नाटक कॉलेज, धारवाड

कर्नाटक कला व वाणिज्य महाविद्यालय, धारवाड.

**भौतिकशास्त्र विभाग :** भौतिकशास्त्राचा विभाग सन १९१७ मध्ये स्थापन झाला आणि त्या वेळी भौतिकशास्त्र हे एक अनिवार्य विज्ञान विषय होते. ताज्या विभागांसोबत चालना देण्यासाठी, इलेक्ट्रॉनिक्स (पूर्णपणे सुसज्ज प्रयोगशाळासह) विषय १९९४ मध्ये सादर करण्यात आला आणि १९९५ मध्ये पीएमई, पीएमसी, सांख्यिकी, गणित, संगणक स्कॅन यांसारख्या विषयांच्या संयोजन म्हणून संगणक विज्ञान (पूर्ण सुसज्ज प्रयोगशाळा) बी.एसूसीमध्ये अर्थातच विभागामध्ये तीन व्याख्यान गृह, पाच प्रयोगशाळा, एक दुर्बीण, स्वतंत्र वाचनालय, एक संगणक प्रयोगशाळा इत्यादी. भौतिकशास्त्र अभ्यास मंडळाद्वारे पदवी विद्यार्थ्यांसाठी नियमित व्याख्यान, प्रदर्शन, सेमिनार इ. आयोजित केले जातात. विभागाने केयूडी, बीएआरसी आणि आयआयटी बॉम्बे यांच्या सहकार्याने आंतरशास्त्रीय संशोधनामध्ये सक्रिय रूची घेतली आहे. हे सार्वजनिक आणि विद्यार्थ्यांसाठी नियमितपणे आकाश पाहण्याचे कार्यक्रम, सेमिनार, परिसंवाद इ. आयोजित करते.

**डिपार्टमेंट ऑफ केमिस्ट्री** : रसायनशास्त्र विभाग १९२४ मध्ये

स्थापन झाला. यात १२० विद्यार्थ्यांची क्षमता, ४ प्रयोगशाळा, २ संशोधन प्रयोगशाळा, १ स्वतंत्र वाचनालय, २ स्टोअर रूम, ३ लेक्चर हॉल आहेत. आमंत्रितांची व्याख्याने, प्रदर्शन, सेमिनार इ. नियमितपणे आयोजित केले जातात. केमिस्ट्री अभ्यास मंडळाद्वारे पदवीधर विद्यार्थ्यांसाठी, काही विद्यार्थ्यांना आयआयएससीद्वारा आयोजित किशोर वेंग्रिक प्रयोजन योजनेसाठी प्रशिक्षण दिले जाते. आयकेटीएस आणि जेएनसीने संशोधन क्षेत्रात प्रगतीसाठी बंगलोर आणि उन्हाळी प्रशिक्षण शिबिरे, जक्कुर विभागाचे प्राध्यापक संशोधनमध्ये सक्रियपणे गुंतलेले आहेत, यूजीसीकडून संशोधन प्रकल्पाच्या रूपात तीन लाख रुपये आणतात आणि पी.एच.डी.साठी संशोधन मार्गदर्शक म्हणून ओळखले जातात. सन २००२ मध्ये, बायोटेक्नोलॉजी बी.एस्‌सीसाठी पर्यायी विषयांपैकी एक म्हणून प्रस्तुत करण्यात आली.

**कॉलेज मित्र व मी**



**धारवाडच्या अजून काही आठवणी**

धारवाडला राहत असताना आमच्या शेजारी सुधा मावशी राहायची. तिचे बाबा श्री. बंडोपंत खाडिलकर किंवा काशिनाथ खाडिलकर व सुधा मावशीची आई म्हणजेच सरला काकू अगदी शेजारी राहात. आम्ही देशपांडे वाड्यात राहायचो. मध्ये एक रिकामा प्लॉट होता आणि नंतरच्या प्लॉटमध्ये मोकाशी आडनावाच्या एका बंगल्यांमध्ये सुधा मावशीचे कुटुंब राहात होते. बंडूकाका म्हणजे एक अतिशय साधी, व खूप प्रेमळ व्यक्ती होते. माझे अतिशय आवडते. माझे चुलत आजोबा पण त्यांच्याविषयी जेवढं सांगावं तेवढं कमी. त्यांचा एक

ठरलेला नित्य नियमित कार्यक्रम किंवा काम म्हणजे सकाळचा चहा. त्याची सुरुवात व्हायची ते दूध घेऊन येणेपासून. १९७०-७१ सालची गोष्ट आहे. त्या काळी आतासारख्या दुधाच्या पिशव्या किंवा दुधाच्या बाटल्या मिळत नव्हत्या.

त्यामुळे आपलं स्टील पातेलं घेऊन आपल्या नजीकच्या दुधाच्या सेंटरवर जावं लागे. सकाळी जायचे आणि दूध घेऊन यायचे. साधारणपणे पाच सव्वापाचला पहाटे दुधाच्या गाडीचा हॉर्न वाजला की बंडूकाका घरून निघायचे. मी पहाटे साधारणपणे तीन वाजता उठून अभ्यास करायला बसायचो. तेव्हा मी बी.एस्सी भाग-२ ची तयारी करीत होतो. रोज सकाळी दूध आणायला जाताना बंडूकाका मला न चुकता सांगायचे की, ''श्रीकांत, खूप वेळ झाला अभ्यास करतोयस. आता थोडा वेळ झोप. मी दूध घेऊन येतो, चहा करतो आणि मग तुला हाक मारतो.'' हे असेच चालायचे. अतिशय प्रेमळ माणूस. त्यांची चहा करायची पद्धत पण फारच वेगळी. त्यांच्याकडे एक गोल चिमटा होता. मी नंतर त्याचं एक चित्र काढून पुस्तकात छापायचा प्रयत्न करे. तो चिमटा धरून बराच वेळ दूध उकळून पद्धतशीरपणे चहा करीत आणि चहा झाला की मला हाक मारीत. एक अतिशय विलक्षण अनुभव आणि विलक्षण गंमत होती त्यांच्याबरोबर राहण्यात. बंडूकाका कर्नाटक कॉलेजमध्ये Zoology डिपार्टमेंट मध्ये कार्यरत होते. वेगवेगळे प्राणी किंवा पक्षी मेल्यानंतर त्यांची वरची कातडी काढून आत मध्ये भुसा भरून जणू काही ते जिवंत प्राणी आहेत असे नमुने तयार करणे हे बंडूकाकांचे काम. तसे मित्र फार कमी होते त्यांचे जवळचे असे दोन मित्र होते.

बंडूकाका हे एक वेगळेच व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा माझा सहवास मला कळायला लागल्यापासून म्हणजे दोन-तीन वर्षांपासून ते माझ्या वयाच्या १९ व्या वर्षापर्यंत धारवाडला. त्यानंतर ते सुधा मावशीकडे

डोंबिवलीला राहात असताना, माझ्या शुक्रवारच्या सुट्टीच्या दिवशी हमखास भेट होत असे.

**धारवाडच्या बंडूकाकांच्या काही आठवणी**

बंडू काकांचा एक नित्यनियम होता. दर गुरुवारी ते धारवाड गावात पायी जात असत व दत्त मंदिरात जात. आता तुम्हाला वाटेल की बंडूकाका प्रचंड दत्तभक्त होते का काय? भक्ती होती त्यांची, परंतु दत्ताला जाण्यामागे खरे कारण थोडेसे वेगळे होते. ते दर गुरुवारी दत्त मंदिरात जाऊन नमस्कार करून शेजारी असलेल्या बॉम्बे रेस्टॉरंटमध्ये नाश्ता करायला जात असत.  बॉम्बे रेस्टॉरंटची एक खासियत होती. ती म्हणजे, तिथे बाहेरच्या हॉलमध्ये टेबल-खुर्च्या मांडलेल्या असत व आतील एका छोट्या खोलीमध्ये पूर्वी आपण जसे पाटावर बसून जेवायचो, तशी सोय नाश्त्याची या रेस्टॉरंटमध्ये होती. मनाप्रमाणे, इच्छेप्रमाणे नाश्ता करून परत चालत घरी येत. तसे आम्ही राहात होतो सप्तापूरला. सप्तापूर धारवाड मुख्य गावापासून साधारण चार ते पाच किलोमीटर अंतरावर होते. कर्नाटक कॉलेजच्या बरोबर मागच्या बाजूला होते. कर्नाटक कॉलेज व आमचे राहते घर यामध्ये फक्त एक भिंत होती. परत चालत येत असताना त्यांचे लक्ष नेहमी सिनेमाच्या पाट्यांकडे जात असे. त्या काळी धारवाडला तीन टॉकीज होती.




**बॉम्बे रेस्टॉरंट**




**दत्त मंदिर**

प्रत्येक टॉकीजला शुक्रवारपासून कुठला सिनेमा लागला आहे याची माहिती ते मला परत आल्यावर देत असत. आता परीक्षा चालू होणेआधी हा एक सिनेमा बघ, नंतर परीक्षा झाल्यावर. शेवटच्या आठवड्यापर्यंत ते मला हे सांगत असत. बंडूकाका साधारणपणे ६५ वर्षांचे होते. इतक्या वयाचा एखादा आपला जवळचा नातेवाईक, आपले आजोबा आपल्याला कुणाला हा सिनेमा शेवटचा, परीक्षा सुरू होतेय, असे शेवटच्या आठवड्यापर्यंत सांगणारा गृहस्थ मला या माझ्या ६६ वर्षांच्या आयुष्यात अजून कोणीही भेटलेला नाही

आमच्या शेजारच्या कंपाउंडमध्ये महाले नावाचे एक कुटुंब राहात होते. या कुटुंबात स्वतः महाले, त्याची बायको तुळसा, त्यांच्या दोन मुली शकू आणि गीता. या नवरा–बायकोचे जवळपास रोज व कडाक्याचे भांडण होत असे. बंडूकाकांना हे भांडण ऐकण्यात प्रचंड मजा वाटायची. ते स्वतः ऐकायचे, पण मला सुद्धा आज काय झाले हे मी कॉलेजमधून आल्यावर न चुकता सांगायचे. बंडूकाकांची एक अतिशय आवडती अशी आरामखुर्ची होती. दिवसाचा बराच वेळ अर्थात कॉलेजचे काम करून आल्यावर ते या खुर्चीत बसून असत. माझे त्यांना अतिशय कौतुक होते. मी बऱ्याच गोष्टी करायचो. ते बघून त्यांना खूप बरे वाटायचे व दर वेळेस त्याचे ते अगदी भरपूर कौतुक करायचे. वरती हेसुद्धा सांगायचे की ही तुमची पिढी किती हुशार आहे आमच्यापेक्षा. तुझ्या वयाचा असतानासुद्धा मला साधा शर्टसुद्धा घालता येत नसे. घालायला माझे बाबा मला मदत करीत. इतका निर्मळ मनाचा आणि आपल्याला काही गोष्टी येत नाहीत असं मनापासून कबूल करणारा माणूस सुद्धा थोडासा दुर्मीळ नाही का? बंडूकाका जातीने तसे अतिशय प्रेमळ व थोडेसे खोडकरसुद्धा होते त्यांच्याबद्दलची एक अतिशय विलक्षण अशी आठवण सांगलीची मामी म्हणजे आईची काकू यशोदाबाई खाडिलकर ही नेहमी मला सांगायची.

सांगलीच्या वाड्यात सुट्टीत सगळे जमलेले असताना बंडूकाका

तेव्हा शाळेतले किंवा त्या वयाचे असतानाची ही हकिकत आहे. घरी काही कार्यक्रम असायचे. बरीच मंडळी आलेली असायची. बंडूकाकांचा या सगळ्या गप्पांमध्ये किंवा बाकी काही आज जे काय मोठ्या लोकांचं चाललं आहे त्याच्यात फारसा इंटरेस्ट नसायचा. मग ते काय करायचे तर सगळ्यांनी आपल्या चपला बाहेर अंगणात वाड्यामध्ये काढून ठेवलेला असायच्या. मग बंडूकाका, ह्याची चप्पल त्याला, त्याची ह्याला असे करून सर्व जोड्या बदलून टाकायचे. आणि प्रोग्रॅम संपल्यावर जेव्हा सगळे जण पाहुणे मंडळी परत जायला निघत तेव्हा त्यांचा बराच वेळ आपल्या चपला किंवा बूट शोधण्यात जात असे.


बंडूकाका व सरला काकू

बंडूकाकांना स्वतः चे मित्र असे फारसे नव्हते. एक मला आठवतो ते म्हणजे ठाकूर अगदी जीवश्चकंठश्च मित्र. बंडूकाका कर्नाटक कॉलेजमध्ये झूलॉजी डिपार्टमेंटमध्ये एक मजेशीर काम करत असत. जे प्राणी मिळालेले असत म्हणजे हरीण किंवा कुत्रा किंवा अशा प्रकारची त्यांची कातडी पूर्णपणे आत्मसात केल्यानंतर त्याच्यामध्ये भुसा भरून तू ती कातडी व्यवस्थित शिवून जणूकाही जिवंत प्राणी आहे असा नमुना तयार करणे हे बंडूकाकांचे काम आणि हे काम ते अतिशय उत्तम प्रकारे करत होते किंवा त्यांचा या कामात हातखंडा होता. अतिशय प्रेमळ व्यक्ती अशी व्यक्ती या काळात मिळणे म्हणजे खरोखरच आपले भाग्य असेच मला नेहमी वाटते.

आता थोडेसे सरला काकूबद्दल. सरलाकाकू पण मला अतिशय जवळची वाटायची. तिच्याशी मी अगदी मुक्तपणे काही बोलायचं. सरलाकाकूसुद्धा माझे प्रचंड कौतुक. एक आठवण सांगतो.

तेव्हा नुकताच सचिन पिळगावकरचा एक सिनेमा येऊन गेला. त्याचे नाव बहुतेक, हा 'माझा मार्ग एकला.' राजा परांजपे हिरोच्या

रोलमध्ये होते. त्या सिनेमांमध्ये असे दाखवले आहे की सचिनची आई सावत्र असते. ती ह्या मुलाचा खूप छळ करीत असते. एकदा सचिनला दळण आणायला गिरणीत पाठवते. दळण झाल्यावर तो डबा घेऊन येत असताना वाटेत काही मुलं खेळत असतात. ते बघण्यात सचिन दंग असतो. कुणाचातरी धक्का लागून तो डबा पडतो व सर्व पीठ सांडून जाते. सचिन जेवढं पीठ शिल्लक होतं, तसा डबा घेऊन रडत रडत घरी येतो. त्या दिवशी त्याची सावत्र आई त्याला बडवून काढते. शिक्षा म्हणून त्याला उपाशी पोटी झोपायला लावते. आपल्याला ते बघवत नाही. हा सिनेमा मी, आई आणि मला वाटतं बहुतेक विठूकाका असे आम्ही तिघे बघायला गेलो होतो. या सिनेमाचा माझ्या त्या बालपणावर, बालमनावर काय परिणाम झाला तर सांगू का तुम्हाला, मी लहान असताना माझी आईसुद्धा मला खूप रागवायची व काही वेळा मारायची सुद्धा. काका मात्र मला कधीच रागवलेले आठवत नाही. काकांनी माझ्यावर कधी हात उगारलेला मला आठवत नाही. पण आईचा मात्र मी बऱ्यापैकी मार खाल्लेला आहे. एकदा असेच काहीतरी झाले. आईने मला मारले, मला काय करावे ते काही ते सुचेना. मी पळत मावशीच्या घरी गेलो. सरलाकाकू होती घरी. मी काकूला विचारले, ''मला एक प्रश्न पडला आहे ती माझी खरीच आई आहे का सावत्र?''

सरलाकाकूला मी हा प्रश्न विचारला आणि काकूला कळेना काय विचारतोय? मला नेहमी रागवते का? मला मारते का? मी परवा सिनेमाला गेलो होतो. त्या सिनेमात सचिनची आई सावत्र असते व ती पण अशीच सचिनला सारखी मारत असते.

हे ऐकून सरला काकू मला म्हणाली, थांब मी तुझ्याबरोबर येते. आणि काकू हातातले सगळे काम सोडून माझ्याबरोबर आमच्या घरी आली आणि माझ्यासमोर आईला बऱ्यापैकी रागे भरली. म्हणाली, ''सोन्यासारखं पोर आहे. का बरं त्याला तू नेहमी रागवतेस, मारतेस? तो माझ्याकडे आला आणि मला का काय विचारलं माहीत आहे का

तुला?'' आई म्हणाली, ''काय विचारलं? हा म्हणत होता की ही माझी सख्खी आई आहे का सावत्र? मी काय उत्तर देऊ सांग तूच मला?'' जे मनात येईल ते मी काकूशी बोलायचो. असा अजून एक किस्सा बालपणचा. एकदा काय झाले, आईने मला सांगितलं, ''बाहेर गेल्यावर, कोणी काही खायला दिले तर खायचे नाही.'' आईची ही ऑर्डर म्हणजे त्याच्यापुढे माझ्याकडं कुठल्याही प्रकारचे अपील किंवा ही आज्ञा मोडायची हिंमतच नव्हती. मी त्यानंतर एकदा सरला काकूकडे गेलो होतो. छोटा असल्यामुळे मला सरलाकाकूने हातावरती दोन बिस्किटं ठेवली, ती न खाता, एक नेहमीची जागा होती जिथे गाद्या गुंडाळून ठेवलेल्या असत. त्या गादीवर मी बिस्किटे ठेवली. आणि ''काकू, मी बिस्कीट नाही खाणार.'' असे सांगून धावत आमच्या घरी परत आलो. मी असा का विचित्र वागतोय हे सर्व कळलं नाही म्हणून माझ्या पाठोपाठ, सरलाकाकू पण आमच्या घरी आली आणि मला विचारलं, ''अरे आज असं तू का केलंस? मी दिलेला खाऊ तू खाल्ला का नाहीस?'' मी तिला स्वच्छ सांगितलं. ''मला आईने सांगितले बाहेर कोणी काही दिलं तर खायचं नाही. म्हणून माझी हिंमत झाली नाही, म्हणून मी ती खाल्ली नाहीत.'' मग काय झाले? सरलाकाकूचे आणि आईचे काय संभाषण झाले, हे आपल्याला सांगायची गरज मला भासत नाही. बालमन हे असे असते निष्पाप. आपले आई-वडील आपल्याला सांगतील तेच प्रमाण. तेच जगातले चिरंतन सत्य आहे. नक्की आपल्याला असे वाटले असेल.

सरलाकाकूच्या काही आठवणी अजूनही ताज्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे ती म्हणजे तिने केलेली पातळ भाजी. मावशी एम.ए. झाल्यावर जनता कॉलेजमध्ये लायब्ररियन म्हणून काम करू लागली. तिला सकाळी लवकर बाहेर पडावे लागायचे. मग नाश्त्यासाठी म्हणून पातळ भाजी बऱ्याच वेळा वेळा काकू करीत असे. सरलाकाकूच्या पातळ भाजीची चव अजूनही जिभेवर रेंगाळते आहे. अतिशय साधी,

पण अतिशय रुचकर आणि अतिशय प्रेमाने केलेली अशी ती भाजी. अतिशय भोक्त आहे, मी या भाजीचा. आता इथे पुण्यामध्ये माझ्यावर कधी नाश्ता बनवायची वेळ आली तर बऱ्याच वेळा बनवतो व जेव्हा मी बनवतो तेव्हा न चुकता सरलाकाकूची आठवण त्याचबरोबर दादांची म्हणजे बंडूकाकांची आणि सुधामावशीची आठवण आल्यावाचून राहत नाही.

अजून एक आठवण म्हणजे दुपारचे काम झाले की ती आमच्या देशपांडे वाड्यामध्ये देशपांडे बाईंच्या इथे गप्पागोष्टी करायला येत असे. बऱ्याच वेळा त्या दोघी मिळून धारवाड गावात काही खरेदी निमित्त वगैरे जात असत. साधारणपणे चार-साडेचार वाजता बाहेर पडताना सरलाकाकू न चुकता संध्याकाळच्या जेवणासाठी कुकर लावूनच जात असे. त्या काळी गॅस नव्हता, चुली असायच्या तर कोळसा किंवा लाकडावर चालायचे. काकू संध्याकाळी यायला उशीर होईल म्हणून साधारणपणे दुपारी चार-साडेचारला संध्याकाळच्या जेवणासाठी भात किंवा वरण याचा कुकर या चुलीवर ठेवून जात असे. त्या कोळसाच्या निखाऱ्यावर अतिशय शांतपणे असा भात-वरण शिजलेलं असे.

बंडूकाकांची अजून एक आठवण आहे. खरं तर मी बंडूकाकांना दादा म्हणत असे. तर दादांना कोशिंबीर हवी असायची, पण तसे ते सरळ सांगतील तर मग कसले? त्यांना कोशिंबीर खूप आवडायची.

सरलाकाकूंना ते कोशिंबीर करायला भाग पाडायचे, सरला काकूकडून ते कोशिंबीर करून घेण्यासाठी ते म्हणायचे, ''एखादा कांदा व टोमॅटो चिर.'' काकू चिरायला बसली की म्हणायचे, ''धुऊन घेतलास की नाही?'' काकू म्हणायची, ''धुतला आहे, परंतु तुमच्या समोर पुन्हा एकदा धुते.'' काकूला निश्चितच राग यायचा. बऱ्याच वेळा तो पहिल्यांदाच धुतलेला असायचा. कांदा व टोमॅटो चिरून झाला की दादा म्हणायचे, ''थोडे दाण्याचे कूट घाल तर बर होईल.

आता जरा थोडीशी फोडणी घाल म्हणजे जरा छान लागेल.'' असं करत प्रॅक्टिकली एखादं नाटक किंवा सिनेमा बसवण्यासाठी डायरेक्टर कसे काम करून घेतात तसे दादा सरला काकूकडून कोशिंबीर करून घेत असत. फार गमतीदार असे हे प्रसंग असतात.

पातळ भाजीबद्दल अजून एक आठवण आपल्याला सर्वांना सांगावीशी वाटते. धारवाडला त्या काळी बसस्टँडजवळ 'मित्र समाज' नावाचा एक क्लब होता. माझे चुलत आजोबा म्हणजेच बॅरिस्टर विसूकाका आठवले हे या क्लबचे कायमचे मेंबर. विसूकाका ही आणखीन एक विलक्षण व्यक्ती. अतिशय आनंदी, अतिशय विनोदी स्वभाव अतिशय हुशार, परंतु वकील जरी झाले असले, तरी वकिली जवळपास केलीच नाही. दिवसाचा बराच वेळ ते मित्र समाज या क्लबमध्ये असत. तिथे पत्त्यांचे डाव त्या वेळेस बहुतेक रमी हे चालत असे. विशू काकांचे घर खुद्द धारवाड गावात लाईन बाजार या एका गाजलेल्या गल्लीमध्ये होते ते राहात त्या घराचे मालक होते किबे. या किबेंची सुद्धा एक गंमत आहे, मला तुम्हाला नंतर सांगायची आहे.

आता तूर्तास पातळ भाजीबद्दलची गंमत सांगतो. तर या मित्र समाज या क्लबमध्ये कॅन्टीन होते आणि या कॅन्टीनमध्ये पातळ भाजी अगदी छान मिळायची. आजोबांच्या घरी कोणी पाहुणे मंडळी आली किंवा कोणी भेटायला आलं आणि आजोबा घरी नसतील तर एकच ठिकाण ते म्हणजे 'मित्र समाज.' तिथे कोणी आमच्यापैकी मंडळी जाऊन आजोबांना बोलून घरी परत येत असू. ''तुम्ही पुढे व्हा, मी आलोच.'' असं




**बंडू काका व सहकारी**

नेहमी ते म्हणत. पण निघ म्हणायच्या आधी ''थांब जरा थोडीशी पातळ भाजी आणि ब्रेड खाऊन जा.'' हे न चुकता म्हणायचं. अतिशय छान असायची आणि आजोबा अतिशय प्रेमळ होते. अतिशय विनोदी होते. अशी मंडळी असे नातेवाईक पुन्हा निर्माण होणे किंवा लाभले हे जवळपास अशक्य.

आता आजोबा राहात होते त्या घराचे मालक किबे यांच्यासंबंधी थोडीशी गंमत. ते गृहस्थ रेल्वेमध्ये नोकरीस होते. रेल्वेच्या बोगीतून जे काही येईल उदाहरणार्थ फिनेल. यांच्या घरी रेल्वेच्या बोगीतून काढून घेतलेलं निश्चित आणलेलं असे. त्यांच्या घरी मोठ्या लाकडी पेट्या होत्या. माझ्या अंदाजाप्रमाणे चार ते पाच होत्या. ह्या सुद्धा खरं म्हटलं तर रेल्वेची मालमत्ता. त्यांच्या घरी गेलं की फिनेलचा वास हा नेहमी यायचा.

विसूकाका व त्यांच्या पत्नी म्हणजेच अन्नपूर्णाकाकू. अन्नपूर्णा काकू नावाप्रमाणे अतिशय प्रेमळ, दानशूर, सतत हसत आणि मजेत. त्यांच्या घरची एक गंमत. आजी पाठदुखीमुळे वाकू शकत नसत. एकदा सुरेशकाका, मधुकाका, मी, शीलाआत्या, वासंती आत्या वगैरे सगळे जण जेवायला बसलो होतो. आजी सगळ्यांना वाढत होती. शेवटी तूप वाढत होती. आणि तूप वाढताना, चुकून सुरेशकाकांच्या डोक्यात पडले. सुरेशकाका म्हणाले, ''अगं आई माझ्या डोक्यात तूप वाढलेस.'' आजी म्हणाल्या, ''मी काय करू बाबा? मला वाकता येत नाही तुला माहीत आहे. डोकं बाजूला घ्यायचं नाही का तू मी वाढत असताना?''

आजीची पाठ वगैरे दुखायची त्यामुळे त्यांच्या घरी स्वयंपाकाला एक बाई येत असत. या बाई अतिशय चोरट्या. त्यांची ही सवय आजीला कळली होती. एकदा या बाईंनी चक्क दोन पुरणपोळ्या आपल्या लुगड्याच्या कासोट्यात लपवलेल्या होत्या. वाढताना त्या एकदम खाली पडल्या. मग आजीने काय केले? ही बाई कामाला चांगली






**धारवाडचे पेढे व दुकान**

होती आणि आजीला जमत नव्हते, त्यामुळे या बाईला कामावरून कमी न करता आजीने युक्ती लढवली. ती म्हणजे सगळे स्वयंपाकाचं साहित्य लागायचं ते स्वयंपाकघरात एका कपाटात ठेवून, त्या कपाटाला, आजी कुलूप लावू लागल्या.

एकदा काय झालं की, हे कुलूप उघडलं. आमटी ठेवलेली होती. आजीने गुळाचा डबा या कपाटात ठेवलेला होता. आमटी होत आल्यावर आजीने कुलूप काढून, कपाट उघडून, गुळाच्या डब्यातून, गुळाचा एक खडा काढला व आमटीच्या पातेल्यात टाकला व इतर काम साठी निघून गेल्या. या स्वयंपाकीण बाई पण काही कमी नव्हत्या. गुळाचा खडा जरा बऱ्यापैकी मोठा होता हे तिच्या लक्षात आलं. त्यांनी लगेच, पातेल्यात डाव टाकून, हा गुळाचा खडा अलगद उचलला, व बाहेर काढून आपल्या लुगड्याच्या कासोटीला खोचला. आता अशा बाईला काय म्हणायचे?




विसूकाका राहात होते, ती धारवाडमधली प्रसिद्ध गल्ली, म्हणजे लाईन बाजार. त्यावर अजून काही आठवणी आठवल्या त्या आपल्याला सांगावे अशी असे वाटते.

लाईन बाजारमध्ये एक अतिशय प्रसिद्ध असा पेढेवाला होता. माझ्या मते, अजूनही दुकान चालू आहे. या माणसाचे नाव बाबू सिंग. ते धारवाडी पेढे म्हणजे अतिशय प्रसिद्ध. त्या माणसाची एक खासियत होती हे रोज फक्त तीन पराती भरून पेढे बनवायचे. आमच्या घरी कोणी खास पाहुणा आला, आणि जायचे दिवस जवळ आले की शक्यतो आदल्या दिवशी किंवा प्रवासाला निघण्याच्या दिवशी बाबू सिंगकडे जाऊन पेढे आणणे हे एक मोठे काम मला नेहमीच मिळाले. मी ते अतिशय आवडीने केले. बाबू सिंग यांच्या दुकानाला, उभ्या फळ्या लावलेल्या असत. त्या दुकानासमोर थोडीशी बसायला जागा होती. बाकी उभं राहायला भरपूर जागा होती. तिथे ज्यांना कुणाला पेढे घ्यायचे ते येऊन सकाळी सकाळी रांगेत उभे राहायचे ठरावीक वेळी. मला वाटतं, सकाळी नऊ वाजता असावं, आतून घंटा वाजवायची. बाहेर या घंटेचा आवाज आला की इकडे तिकडे विखुरलेली मंडळी रांगेत शिस्तीत उभी राहात. थोड्या वेळानी दुसरी घंटा होईल आणि मग दुकानाच्या फळ्या, बाजूला करत दुकान उघडले जाईल. बाबू सिंग हे खरेच एक थोर व्यापारी होते असे का मला वाटते. रांगेत माणसं किती आहेत यावरून एक अंदाज बांधून प्रत्येकाला आज पेढे किती मिळतील? एक किलो? किंवा अर्धा किलो किंवा पाव किलो हे ते ठरवत. आणि अशा प्रकारे रेशनिंग केल्यासारखे करून प्रत्येक माणसाला जो रांगेत उभा आहे त्याला पेढे मिळतील याची व्यवस्था ते करीत असत. याच्यावरतीसुद्धा माझ्याकडे एक तोडगा होता. आपल्याकडे पाहुणे जास्त आलेले असतील व आपल्याला पेढे थोडे जास्त हवे असतील तर, मी बरोबर अजून काही जणांना माझे मित्र किंवा घरातल्या लोकांना बरोबर घेऊन जात असे. आम्ही रांगेमध्ये दोघे-तिघे जण उभे रहायचो. यामुळे आपल्याला हवे तेवढे पेढे नक्की मिळत होते. या पेढ्यांची चव अजूनही तोंडावर किंवा जिभेवर कायम आहे.

अशाच प्रकारचे पेढे धारवाडमध्ये लाईन आळीमध्येच पण अगदी

गावाच्या दिशेने बस स्टँडच्या जवळपास एका ठिकाणी मिळत. ते म्हणजे मिश्राचे पेढे. ते सुद्धा चांगले असायचे. परंतु बाबू सिंग यांच्या पेढ्यांची सर या पेढ्यांना अजिबात नसायची. लाईन आळीबद्दल अजून एक आठवण मनात अजूनही ताजी आहे. ती म्हणजे विसूकाकांची मुलगी म्हणजेच शीला आत्या. माझ्यावर ती जिवापाड प्रेम करत असे. मला वाटतं, तेव्हा ती कॉलेजमध्ये शिकत असावी. आम्ही धारवाडला विसूकाकाच्या घरी गेलो की दोन-चार दिवस माझा मुक्काम त्या घरी ठरलेलाच असायचा. त्याला दोन कारणं होती. एक म्हणजे शीलाआत्या आणि दुसरे कारण म्हणजे माझी शाळा बासल मिशन स्कूल. हे या घरापासून अगदी हाकेच्या अंतरावर होते. शाळा झाली की दुपारी शीला आत्या कॉलेजहून परत आल्यावर आपल्या मैत्रिणींकडे जाताना मला नेहमी बरोबर घेऊन जायची आणि परत येताना अगदी नित्यनेमाने त्यांच्या घराजवळ लाईन बाजारमध्येच एक आईस फ्रुट (आईस कॅण्डी) ची फॅक्टरी होती. तेव्हा त्याची किंमत किती होती मला माहीत नाही. मी खूप लहान होतो. एखादा आणा (सहा पैसे तेव्हाचे) वगैरे असेल, पण बहुतेक मी तिथे असताना दररोज मला एक कँडी घेऊन द्यायची. आईस कॅण्डीची चव मला अजूनही अतिशय चांगली लक्षात आहे.

विसूकाका असं म्हटलं की अजून एक आठवण अगदी ताजी मनामध्ये आहे. ती म्हणजे रामकाका दीक्षित. रामकाका नात्याने तसे पाहिले तर कोणीही नाही किंवा अगदी लांबचे नाते कदाचित असावे, परंतु रामकाका म्हणजे चांगल्या माणसाचे एक प्रतीक असे म्हणता येईल. ते कर्नाटक कॉलेजमध्ये प्रोफेसर होते. अतिशय गरीब स्वभाव आणि अतिशय प्रेमळ आणि मुले म्हणजे त्यांचा जीव की प्राण होता. नेहमी ते कोट घालायचे आणि कोटाच्या दोन्ही खिशामध्ये काही न काही गमती कायम ठेवलेल्या असायच्या. मला बऱ्याच वेळा त्यांनी खिशातून काढून एखादं चॉकलेट किंवा एखादी गोटी किंवा एखादा रंगीत खडू वगैरे काही मला दिलेला आहे. या वस्तूंची जर किंमत

करायला गेलं तर माझ्यामते ती नगण्य असू शकेल. पण ज्या प्रेमाने या गोष्टी लहान मुलात वाटायचे त्याची किंमत करणे केवळ आणि केवळ अशक्य आहे.

**आता आपण सप्तापूर ला जाऊया.**

आम्ही राहत होतो तो देशपांडे वाडा. आमचे घरमालक देशपांडे कुटुंबामध्ये अजून दोन व्यक्ती होत्या. त्यांचा उल्लेख याआधी मी केला नाही. एक म्हणजे मामी. मामी म्हणजे सौ. देशपांडे आजींच्या आई व त्यांचे यजमान म्हणजे मोकाशी. मोकाशी थोडेसे वेडसर होते. त्यांचा एक नाद होता. तो म्हणजे बासरी वाजविणे. त्यांच्या बासरीला रोज एखादी नवीन चिंधी बांधणे व बासरी वाजवणे. बासरी छान वाजवायचे. त्यांचे एक अतिशय आवडतं गाणं ते नेहमी वाजवायचे. ते म्हणजे 'नच सुंदरी करू कोपा.' मला बालगंधर्व यांनी गायलेलं हे नाट्यपद चांगलेच आठवते. या गाण्यावर त्यांच्या घरात एक धमाल नेहमी होत असे. त्याचे कारण देशपांडे कुटुंबाकडे घरकाम करायला एक बाई येत होती. आणि तिचं नाव होते चंद्री. इंदूमावशी, उषामावशी, विजूमावशी किंवा सुशीलमावशी या सगळ्या त्यांच्या आजोबांच्या परोक्ष, चंद्रिकेचा शॉर्ट फॉर्म म्हणजे चंद्री असा करून, खूप काही मजा करीत असत.

**आता एक गंमत मामींच्या संदर्भात.**

तशी गंमत म्हणता येणार नाही तर प्रसंग गंभीर होता. वयानुसार एके दिवशी मामी गंभीर आजारी होत्या आणि सगळ्यांचा समज झाला की मामी आता हे जग सोडून गेल्या आहेत. त्यानुसार पुढची सगळी तयारी म्हणजेच तिरडी बांधणी वगैरे सर्व चालू होते. एवढ्यात मामी उठून चक्क बसल्या आणि देशपांडे कुटुंबापैकी सर्व जण अक्षरशः थक्क झाले. त्या वाचल्या हा आनंद होताच त्याचबरोबर आपण त्या गेल्यात असं समजलं हा धक्काही होता.

आता माझी बालपणीची अजून एक आठवण आहे ती म्हणजे दिलीपबद्दल. मी आधी उल्लेख केल्याप्रमाणे देशपांडे कुटुंबाचा सर्वांत लहान मुलगा माझा अतिशय आवडता आणि जवळचा मित्र. दिलीप

पुढे ऑर्थोपेडिक सर्जन झाला आणि खूप नावारूपास आला. त्याने खूप चांगले काम केले. धारवाडमध्ये आता त्यांनी हॉस्पिटल बंद केले आहे, पण अजूनही त्याची वैद्यकीय मदतही चालूच आहे. हा दिलीप दहा-बारा वर्षांचा असताना त्याला कोणीतरी पाहुणे मंडळींनी पिंगपाँग बॉलचा एक डबा भेट म्हणून दिला. दिलीपने विनाविलंब त्यातले दोन बॉल काढून मला भेट म्हणून दिले. टेबल टेनिस मॅच बघितली टीव्हीवर किंवा कुठे बाहेर गेलेला असलो की ही आठवण मला कायम होते. या गोष्टीला माझ्या मते, साठ वर्षे तरी नक्की होऊन गेली, परंतु ते बॉल मला अजूनही आठवतात.

**देशपांडे वाड्याबद्दलची अजून एक लक्षात राहणारी गोष्ट**

दर वर्षी तुळशीचे लग्न अगदी थाटामाटात लग्नं साजरे केले जायचे. आम्ही सगळे बच्चे कंपनी हा एक उत्सवच आहे असे समजून भरपूर आनंद लुटायचो. फटाके नंतर लग्नाबद्दल काही गोड-धोड काही खायला वगैरे सगळ्याची चंगळ असायची

**आता थोडेसे हुबळीसंबंधी.**

मी आधी उल्लेख केला त्याप्रमाणे मी तिसरीत असताना काकांची बदली हुबळीला झाली. हुबळी सराफ कट्टा नावाचा एक भाग आहे तेथे सब पोस्टमास्तर म्हणून काकांची बदली झाली. खूप मोठे घर होते. म्हणजे खोल्या होत्या, आगगाडीच्या डब्यासारख्या आणि पुढच्या भागात पोस्ट ऑफिस होते. इथे मला जाणवलेली एक गोष्ट म्हणजे, माझे धारवाडचे मित्र इथे नव्हते. शाळेत थोडेफार मित्र झाले, परंतु धारवाडची सर भरून निघणे अशक्य होते. या घराजवळ एक भाग होता किंवा एक बस-स्टॉप होता त्याचे नाव होते दुर्गत बैल. या दुर्ग बैलाजवळ एक भाग होता, तो म्हणजे किल्ला. या भागात माझी एक आत्या राहात असे. तिचं नाव अक्काआत्या. तिला एक मुलगा अरुण व एक मुलगी वासंती. मला अरुण आणि अक्का आत्या यांनी त्या वेळी माझे केलेले कौतुक, त्यांनी दाखवलेला जिव्हाळा अजूनही

लक्षात आहे. आक्काआत्याची परिस्थिती तशी बेताची, पण अतिशय मोठ्या मनाची अशी ही बाई. अक्काआत्याने काबाडकष्ट करून, दोन्ही मुलांना वाढविले होते. अक्काआत्या माझ्या आठवणीप्रमाणे एका हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून काम करत असे.

**हुबळीची दुसरी आठवण**

तेथील रंगपंचमीचा उत्सव. आम्ही ज्या भागात राहात होतो ते अगदी व्यापारी भागात असे घर होते. आजूबाजूला बऱ्याच व्यापाऱ्यांच्या पेढी होत्या. रंगपंचमी दिवशी ड्रम मध्ये साधारणपणे २०० लिटर रंग तयार करून रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या सर्वांवर उधळला जात असे. मी तेव्हा खूप छोटा होतो, या प्रसंगाची मला अतिशय भीती वाटली होती. नशिबाने आम्ही हुबळीला फक्त एकच वर्ष राहिलो. चौथीमध्ये मी गेलो आणि आमची बदली अर्थात काकांची धारवाडला परत झाली. आणि काय योगायोग बघा, आम्ही धारवाडला परत गेलो आणि सहज चौकशीसाठी काका देशपांडे बंगल्यामध्ये गेले. आम्ही राहात असलेलं घर नुकतेच रंगकाम झालेलं होतं. आम्हाला परत तेच घर भाड्याने मिळाले. एक विलक्षण योगायोग म्हटलं पाहिजे. चौथी इयत्ता धारवाडमध्ये शिकलो आणि नंतर पाचवीत गेल्यावर काकांची बदली कारवारला झाली.

१९६७ साली कारवारहून काकांची बदली धारवाडला झाली. धारवाडमध्ये होसयल्लापूर नावाचं एक भाग आहे. त्या ठिकाणी काकांची सब पोस्टमास्तर म्हणून बदली झाली. त्या घराच्या मालकाचे नाव होते बोगार. ते तळमजल्यावर राहात होते. वरच्या मजल्यावर काकांचे पोस्ट ऑफिस आणि त्याच्या मागे तीन-चार खोल्या असे होते. धारवाडला परत आल्यावर इयत्ता आठवीसाठी मी कर्नाटक हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. आता घर आणि ऑफिस एकाच ठिकाणी असल्यामुळे काकांची सायकल मला रोज शाळेत घेऊन जायला मिळू लागली. कर्नाटक हायस्कूलमधल्या बऱ्याच काही गमती तुम्हाला सांगायचे

आहेत. त्या पुढे सांगतो. आता तूर्तास या होसयल्लापूरच्या घरातील काही गमती आपल्याला सांगतो. आमचं घर पहिल्या मजल्यावर एक भाग होता आणि दुसऱ्या भागांत दोन–तीन खोल्या अजून एका कुटुंबाला भाड्याने दिलेल्या होत्या. त्या कुटुंबामध्ये एका बाईला महंमद रफींनी गायलेले गाणे, 'बहारो फूल बरसाओ मेरा मेहबूब आय है,' खूप मोठ्या आवाजात नेहमी म्हणत असे. आमच्या या बंगला टाईप घराच्या शेजारी अजून एक घर होतं तिथे श्री. नरेंद्र म्हणून एक गृहस्थ राहायचे. ते रेल्वेमध्ये तिकीट चेकर होते. या नरेंद्र साहेबांच्या घरीसुद्धा धारवाड रेल्वे स्टेशनवर धान्याची, फळांची किंवा भाज्यांची बोगी आली की, त्याच्या घरी हे सर्व मुबलक प्रमाणात यायचं. कित्येक वेळा त्यांनी आम्हाला त्यांचे घरी आलेले टोमॅटो आणून दिलेले मला आठवते. त्यांचा एक छोटा मुलगा होता. त्याचं नाव होतं संजू. लहान मुलगा अर्थातच काकांचा भयंकर आवडता. काका त्याला आमच्या घरी काही नवीन पदार्थ केला की हाक मारायचे. एकदा गंमत असंच काहीतरी नवीन पदार्थ केलेला होता. नेहमीच्या पद्धतीप्रमाणे काही तरी नवीन पदार्थ केल्यावर, आई काकांना म्हणाली, ''आज पदार्थ थोडाच झाला आहे, तरी संजूला नको बोलवायला.'' काकांना नको हे काही ऐकू आले नाही, त्यांना वाटले, ''आई म्हणतेय, संजूला बोलावा, त्यांनी लगेच, पडत्या फळाची आज्ञा सारखं, संजूला हाक मारून बोलाविले. त्यानंतर जी मज्जा आली त्याचे वर्णन करणे केवळ अशक्य आहे.

असेच अजून एक आमचे शेजारी होते यांचं नाव गोदाक्का. या गोदाक्का म्हणजे अतिशयोक्तीचं खरंच एक मूर्तिमंत उदाहरण होतं. फक्त अर्धा लिटर दूध घ्यायच्या व आम्हाला सांगायच्या आज आम्ही अमुक केले तमुक केले. मी, आई हे सगळं ऐकून नंतर अर्ध्या लिटरमध्ये काय, काय करू शकतात, याची यादीच करायचो.

अशीच एक आठवण आमच्या घरासमोर एक मजली आणि

वरती थोडीफार गच्ची असलेलं असं पूर्ण मातीचे बांधकाम असलेलं एक जुनाट घर होतं. अतिशय जाडजूड भिंती, मला आपल्या सांगलीच्या वाड्याची आठवण यायची. एका वर्षी पावसाळ्यामध्ये हे घर अगदी अक्षरश: आमच्या डोळ्यांसमोर पडलं. नशिबाने घरात कोणी नसल्यामुळे मनुष्यहानी झाली नाही.

अशीच अजून एक आठवण या घराबद्दलची म्हणजे भूकंप. मला वाटतं, १९६८ साली असेल (बहुतेक कोयना भूकंप). मी रात्री पलंगावर झोपलो होतो. पहाटे लवकर (तेव्हा बहुतेक रमजान महिना चालू होता) एकदम धाडकन असा काहीतरी आवाज झाला. मी जागा झालो तर खिडकीची दार, जोरजोरात हलत व वाजत होती. मला दोन मिनिटं असं वाटतं की आपल्याला घराला येऊन लॉरी धडकली असावी. नंतर काका व आई जागे झाले आणि मला सांगितलं, भूकंप झाला.

या भूकंपाबद्दलची अजून एक आठवण म्हणजे काकांचे एक सहकारी होते, जे मुसलमान होते. हा भूकंप झाला त्या वेळेस रमजान महिना चालू होता आणि या गृहस्थांची पत्नी पहाटे उठून रमजान साठीच उपास धरायच्या. आधीचे पहाटेचे त्यांचे जेवणासाठी भाकरी भाजत होती. एकाएकी चुलीवरचा तवा हलू लागला आणि एकच बोंबाबोंब झाली.

आठवीत गेल्यावर मघाशी वर म्हटल्याप्रमाणे मी कर्नाटक हायस्कूल येथे जाऊ लागलो. या शाळेच्या अनेक गमती माझ्या मनात अजूनही ताज्या आहेत. माझ्या वर्गातले माझे खास मित्र म्हणजे अंगडी, जोशी, शिंदे, नारायण वगैरे. दोन मारवाडी मुले होते एकाच नाव होतं ललवाणी आणि दुसऱ्याचं नाव विमल.

आमच्या वर्गात मुली पण बऱ्याच होत्या. त्यातील लक्षात राहणाऱ्या म्हणजे, वनिता कारेकर, माणिक खेर, संध्या चिंचोरे, आणखीन अंबाबाई. या सर्व मुलींना आम्ही मुलांनी काही टोपण नावे ठेवली होती. ती नावे आमच्या एका शास्त्र विभागाच्या तासानंतर ठेवण्यात आली होती. प्रत्येक गावी काय प्रसिद्ध यावरून ही नावे ठेवली होती. वनिता

कारेकरला तंबाखू, माणिक खेरला दालचिनीनंतर अंबाबाईला कोल्हापूरची ची अंबाबाई तू मला पाव असे म्हणत होतो. आणि संध्या चिंचोरेला चिंच चोरे असं म्हणत होतो.

फार मजेशीर असा आमचा हा वर्ग होता. आमच्या क्लास टीचर होत्या गायतोंडे मॅडम. अतिशय सालस, सरळ आणि मुलांवर प्रचंड प्रेम करायच्या. माझ्यावर खास त्यांचे प्रेम होते. मला त्या मी बासल मिशनला प्रायमरी स्कूलमध्ये जात होतो तेव्हापासून ओळखत होत्या.

दुसऱ्या आमच्या टीचर होत्या भांडारकर मॅडम. त्या आम्हाला हिंदी शिकवायच्या. आमचे सर होते, त्यांचं नाव बी. टी. कुलकर्णी सर. ते आम्हाला केमिस्ट्री शिकवायचे. हे कुलकर्णी सर म्हणजेच मोकाशी बंगला (आधी मी उल्लेख केला आहे त्या बंगल्या) चे मालक. या बंगल्यामध्ये दादा (बंडूकाका) म्हणजे सुधामावशीचे बाबा भाडेकरू म्हणून राहत होते. कुलकर्णी सर अतिशय सुंदर शिकवायचे. भांडारकर मॅडमबद्दल तर काही प्रश्न नाही. अजून एक आमचे लक्षात राहिलेले एक सर म्हणजे आमचे पीटी व ड्रॉईंगचे सर अष्टपुत्रे. हे सर आमचे एन.सी.सीचे प्रमुख होते. मी या शाळेत असताना ज्युनियर एनसीसी मध्ये भाग घेतला होता आणि आठवी व नववी हे दोन वर्ष आम्ही आठवड्यातून दोनदा एनसीसी परेडला जायचो. आमचा एनसीसी कॅम्प, याच दोन वर्षात, सिरसी या गावी होता. दहा दिवसांचा कॅम्प पहिले एक दिवस खूप छान मजा वाटली. नंतर मात्र आपण बंदिस्त आहोत अशी एक भावना निर्माण झाली. मग मुलांचा खोडकरपणा तो आमच्यात काही कमी नव्हता. एक दिवशी आम्ही सर्व मुलांनी एक शक्कल लढवली. मुख्य दारातून बाहेर कोणाला सोडणे शक्य नव्हते. आम्ही चक्क संडासमध्ये गेलो. पूर्वीच्या काळी संडासात मागील दराने डुकरे आत येऊन, सर्व घाण खाऊन जायची. नशिबाने, त्या वेळी संडास खालून साफ होता. आम्ही खाली उड्या मारून मागील दरवाजाने बाहेर पडलो व सिरसी गावात जाउन एक सिनेमा बघितला. रात्री याच

मार्गे कॅम्पमध्ये परत आलो, कोणालाही आम्ही बाहेर गेलो होतो अशी काही शंका आली नाही.

त्या सिनेमाचे नाव बहुतेक 'रातों का राजा' असे होते. धीरज कुमार बहुतेक त्या सिनेमाचा हिरो होता. सिनेमा संपल्यावर आलेल्या मार्गाने परत कॅम्पमध्ये आत येऊन हात-पाय स्वच्छ धुतले. एव्हाना जेवणाची वेळ झाली होती म्हणून आपली थाळी वगैरे सर्व घेऊन जेवण घेतले. रांगेत उभे राहून जेवलो आणि अगदी झोपी गेलो.

कर्नाटक हायस्कूलमधील अजून काही गमती आमचे पीटीचे सर म्हणजेच अष्टपुत्रे. आम्हाला आठवड्यात बहुतेक दोन वेळा परेड असायच्या.आणि त्यानंतर आम्हाला सर्वांना नाश्ता दिला जायचा. ७० ते ८० टक्के खाववत नसे. त्याची चव अजूनही रेंगाळत आहे. कारण खूप छान असेच म्हणून नाही तर तो अतिशय भयानक असे.

या अष्टपुत्रे सरांची एक गंमत. आम्ही आमच्या ड्रॉईंगच्या वह्या, त्यांच्याकडून परत आणण्यासाठी आम्ही बरेच वेळा जात असू. दर वेळेस ते आम्हाला सांगत, अरे तो पिऊन कोठेतरी टाकला आहे रे. त्यांची मातृभाषा कानडी होती व ते अगदी कामचलाऊ मराठी बोलत असत. मराठी बोलायचे, पण त्यांचा मराठी टोन फारच विनोदी होता. तो एक मोठा विनोद आमच्यासाठी झालेला होता.

आमचे हायस्कूलचे मुख्याध्यापक केजी जोशी हे होते. योगायोग म्हणजे, आत्माराम काका म्हणजे सुरेशकाका, मधुकाका यांचे मोठे भाऊ, ह्या शाळेत शिकत असताना सुद्धा हे त्या शाळेत सर होते. जोशी सर म्हणजे आरएसएसचे खंदे समर्थक. अतिशय शिस्तप्रिय व अतिशय कडक स्वभावाचे. त्यामुळे धारवाडला आत्मारामकाका आमच्या घरी आले की जोशी सरांबद्दल काही गमती नक्कीच नेहमी सांगायचे.

आत्मारामकाका आम्ही होसयल्लापूरला असताना बराच वेळा यायचे. तेव्हा ते बेळगावला राहात असत आणि दरवेळेस येताना

त्यांच्या अतिशय प्रिय अशा 'जावा मोटारसायकल' वरून यायचे. बेळगाव ते धारवाड यायला त्यांना जेमतेम दीड तास लागायचा. मोटारसायकल बऱ्यापैकी फास्ट चालवायचे. त्या काळात म्हणजे १९६७-६८ मध्ये आत्माराम काका म्हणजे माझे बालपणीचे एक प्रकारे हिरो होते. त्याला कारण म्हणजे त्यांची ती 'जावा मोटरसायकल' आणि ते खूप फास्ट चालवतात हे ऐकलेले होते. दरवेळेस मला विचारायचे, ''काय बंड्या येतोस्का बेळगावला?'' मी गेलो नाही. कधी कारण सुट्टी मिळायची नाही. आत्मारामकाकांनीसुद्धा माझ्यावर जिवापाड प्रेम केले. मला अजूनही आठवते. आत्मारामकाकांची अजून एक आठवण म्हणजे हे अतिशय उद्योगी, नवीन प्रयोग करणारे असे गृहस्थ. नशिबाने त्यांना कधी साथ दिली नाही तर त्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे बरेच उद्योग करून बघायचा प्रयत्न केला. शेवटचा त्यांचा कारखाना होता, तो म्हणजे ब्रश बनवायचा. आपल्या फॅक्टरीत बनवलेले ब्रश ते आमच्या साठी घरी घेऊन आले होते. एक अतिशय मजेदार व्यक्ती प्रचंड विनोदी पण तेवढेच कडक किंवा तापट स्वभावाचे होते. घरी म्हणजे तर अगदी असे ते प्रसिद्ध होते. विशेषतः वैजयंतीकाकू बेळगावला एका शाळेमध्ये शिक्षिका होती. त्या शाळेची एनसीसीची प्रमुख होती पण काकूसुद्धा काकांना घाबरून असे.

आता पुन्हा कर्नाटक हायस्कूलकडे वळूया. मघाशी मी उल्लेख केला त्याप्रमाणे बी. टी. कुलकर्णी सर आम्हाला केमिस्ट्री शिकवायचे. खूप छान शिकवायचे. अजूनही माझ्या लक्षात आहे. त्यांची दुसरी ओळख म्हणजे दादा खाडिलकर यांचे घरमालक. त्यामुळे सप्तपूरला गेलो की कुलकर्णी सरांची नेहमी गाठ पडायची. मी त्यांच्या घरी सुद्धा जायचं. मला ते खूप आवडायचे. तसेच बहुतेक कुलकर्णी सरांनी सुद्धा मी खूप आवडायचो. त्यांचा बहुतेक मी आवडता विद्यार्थी होतो.

एक शाळेतील आठवण कुठल्यातरी कार्यक्रम असल्यामुळे आमच्या शाळेतले सगळे बाक काढून टाकलेले होते व आम्हाला मुलांना एखादा आठवडा खाली सतरंजीवर बसायला लागत होते. एक दिवस

केमिस्ट्रीचा तास चालू होता. कुलकर्णी सर आम्हाला काही नोटस् देत होते. मी ते वहीत लिहून घेत होतो. काहीतरी झालं आणि पेनने नीट लिहिले जात नव्हते, म्हणून मी पेन झाडणार, इतक्यात, माझ्या लक्षात आले की आपण सतरंजीवर बसलो आहोत व पेन झाडले तर सतरंजीवर शाईचे डाग पडतील! म्हणून मी वहीचे मागचे पण उघडले व वहीवर पेन झाडले. कुलकर्णी सरांचे कुठून तरी हे मी सगळे करत असताना लक्ष गेले. त्यांचा मोठेपणा म्हणजे त्यांनी आपल्या नोट थांबून सर्व मुलांना सांगितले की, व्यवस्थित राहणे व आपण काय करतो आहे याचे भान ठेवणे म्हणजे काय? ह्याचं एक उदाहरण आत्ता मी पाहिलं. ते तुम्हाला सगळ्यांना मी आत्ता सांगणार आहे. तुमच्या वर्गाचा हा श्रीकांत आता नोट्स लिहून घेत असताना घेत असताना, याचे पेन चालेना म्हणून, तो पेन झाडणार होता एवढ्यात त्याच्या लक्षात आले की आपण सतरंजीवर बसलो आहोत म्हणून त्याने आपल्या वहीच्या मागच्या पानावर पेन झाडले. आपण सर्वांनी आपल्या शाळेच्या संपत्तीची वगैरे काळजी घेतली पाहिजे. मला त्या वेळी खरोखरच मूठभर मांस पडल्यासारखे वाटले होते.

आता भांडारकर मॅडमबद्दल थोडसं. भांडारकर मॅडम या अतिशय कडक होत्या. मनातून प्रेमळ होत्या, पण दाखवायच्या अतिशय कडकपणा. त्या आम्हाला हिंदी शिकवायच्या त्या काळात माझे हिंदी, फारसे चांगले नव्हते. एकदा हिंदीची सहामाही परीक्षा होती. परीक्षा संपली, पेपर तपासले आणि मग तपासलेले पेपर वाटायला त्या एक दिवशी वर्गात घेऊन आल्या. हिंदी किती प्रचंड भारी कोणाचे असू शकते? याचा एक तुम्हाला नमुना सांगते म्हणून त्यांनी माझा पेपर घेतला. त्या म्हणाल्या की, मी तुम्हाला सगळ्यांना शेतकऱ्यावरती एक निबंध हिंदीत लिहायला सांगितला. शेतकऱ्याला हिंदीत काय म्हणतात? बऱ्याच मुलांनी पटकन उत्तर दिले 'किसान'. मलाच माझी लाज वाटली. मला परीक्षा चालू असताना हा निबंध लिहिण्याचे वेळेस काही केल्या, शेतकऱ्याला हिंदीत काय म्हणतात हे काही केल्या आठवत नव्हतं. मग मी एक गंमत केली. शेतीला खेती म्हणतात

म्हणून मी एक नवा शब्द तयार केला, खेतकरी. हे मॅडमनी सगळ्यांना वाचून दाखवलं आणि कधी नव्हे ते त्यांनासुद्धा मी पहिल्यांदा हसताना पाहिले. संपूर्ण वर्गाची तर हसून पुरेवाट झाली होती.

एक गंमत म्हणजे कर्नाटक हायस्कूलमधील अजून एक कायम लक्षात राहणारे सर म्हणजे आळवणी सर. त्यांचे वय झाले होते आणि रिटायरमेंटच्या जवळ आलेले होते. कायम धोतर आणि कोट आणि काळी टोपी या ड्रेसमध्ये असायचे. आम्हाला ते फिजिक्स आणि मॅथेमॅटिक्स शिकवायचे. अतिशय उत्कृष्ट शिकवायचे. ह्या दोन्ही विषयावरती त्यांचा चांगलाच हातखंडा होता. मला ते कायम आठवतात ते त्यांच्या उत्तम शिकवण्यामुळेच, तसेच वर्गातल्या एका गमतीमुळे. एके दिवशी संध्या चिंचोरे ही मुलगी उशिरा आली आणि वर्गाबाहेर उभे राहून, ''May I come in Sir?'' असं तिने विचारले. सरांनी तिला इंग्रजीत प्रश्न केला, ''Why are you late?'', ती म्हणाली, ''नाही सर, उशीर झाला.'' सर म्हणाले की, ''तेच मी विचारतो आहे की उशीर का झाला?'' या संभाषणामुळे आमच्या वर्गात प्रचंड हशा पिकला होता.

आमच्या वर्गातील माझा एक मित्र शिंदे, त्याचे वडील पोलीस डिपार्टमेंटमध्ये होते. त्यांच्या कोर्टस पण पोलीस लाईनमध्ये होत्या. तो मटण वगैरे खायचा. डब्यात बऱ्याच वेळा आणायचा व मला म्हणायचा, ''श्रीकांत, एकदा खाऊन तर बघ.'' अर्थातच आमची हिम्मत कधीच झाली नाही. आमच्या वर्गातील कायम लक्षात राहणारा असा अजून एक मुलगा म्हणजे नारायण. आम्ही सगळेजण त्याला नाऱ्या म्हणायचं. एक नंबरचा लबाड मुलगा आणि थोडासा टपोरी टाईप होता. त्याच्या याच गुणाचा त्याला फायदा झाला होता. आमच्या एनसीसीमध्ये तो सार्जेन्ट म्हणून नेमला गेला होता. मला कॉर्पोरल ही पदवी मिळाली होती. माझ्या गुणांमुळे ही पदवी मिळाली होती मी अगदी बुटका होतो आणि शरीरयष्टी किरकोळ असल्यामुळे, कॉर्पोरल या पदावर मला

समाधान मानावे लागले होते. नारायणला एसएससी बॅचमधील सर्व मुलं टरकून असायची, कारण तो तसा उंच व मजबूत शरीरयष्टीचा होता. कदाचित त्यासाठीच त्याला सार्जंट केले होते.

होसयल्लापूरला राहतानाची अजून एक आठवण म्हणजे मी दहावीला असताना प्रिलिमिनरी परीक्षेत संस्कृतमध्ये मला अतिशय कमी मार्क पडले होते. संस्कृत काही केल्या मला लक्षात येत नव्हते. मग काकांचे एक सहकारी दंडवते म्हणून आमच्या घराजवळच राहात, त्यांच्याकडे माझी सकाळची दोन तास संस्कृतसाठी शिकवणी सुरू झाली. मला त्यांनी साधारणपणे २ महिने शिकवले आणि त्याचा योग्य तोच परिणाम झाला. संस्कृतमध्ये मला ३० पैकी जवळजवळ २८ टक्के मार्क मिळाले याचे श्रेय १००% दंडवते काकांना द्यावे लागेल. काका मला गणित आणि फिजिक्स शिकवायचे. काकांचे शिकवणे अतिशय छान होते. गणित हा तर त्यांचा हातखंडा होता, तसेच फिजिक्ससुद्धा. त्यांच्या शिकवण्यामुळे मला मॅट्रिकला गणिताच्या दोन्ही पेपर मध्ये नव्वदच्या वर मार्क मिळाले होते आणि फिजिक्सला सुद्धा मला वाटतं काहीतरी ऐंशी–पंच्याऐंशी मार्क मिळाले होते. त्याचे श्रेय पूर्णपणे काकांना द्यायला हवे. काका तसे अतिशय हुशार, एकपाठी, कुठलेही काम करायची तयारी असे होते, पण परिस्थितीमुळे त्यांना मॅट्रिकनंतर पुढे शिकता न आल्यामुळे नाइलाजाने पोस्टामध्ये नोकरी करावी लागली. माझे आजोबा नरहरीपंत, माझे काकाच्या वयाच्या चौथ्या पाचव्या वर्षीच वारले. खरंतर आठवले घराण्यात पाच भाऊ आणि दोन बहिणी. यापैकी सगळ्यात मजबूत जवळपास पेहेलवानासारखी तब्येत. परंतु तो काळ इतका विचित्र होता की, त्यांना त्या काळात म्हणजे मला वाटतं, आतापासून साधारण शंभर वर्षांपूर्वी, टायफॉईड झाला. त्या काळात टायफॉईड या रोगाला कुठल्याही प्रकारचे औषध नव्हते. वैद्यबुवा जे काय जे काय उपचार करतील तेवढेच त्यापुढे परमेश्वराचे नाव घ्यायचे. दुर्दैवाने या टायफॉईडने माझ्या आजोबांचा बळी घेतला आणि माझ्या

आजीवर म्हणजेच सरस्वती काकूंवर तीन मुलांची जबाबदारी अगदी तरुण वयात येऊन पडली. शिक्षण नाही त्यामुळे बाहेर कुठे नोकरी वगैरे करणे शक्य नव्हते. कसेबसे तिने आपले घर चालवले. माझ्या आजोबांच्या वाट्याला आलेली जमीन त्यांनी आपल्या कुठल्यातरी विकून जे पैसे आले त्यामध्ये आजींनी कसाबसा आपला संसार चालवला. माझे काका त्या वेळी चार वर्षांचे, दादाकाका त्यांच्या २ वर्षांनी मोठे आणि वसंतकाका दोन वर्षांनी आणि छोटे. दादाकाका पुढे मॅट्रिक झाल्यावर बँकेमध्ये नोकरीला लागले. पंजाब नॅशनल बँकेत त्यांना नोकरी मिळाली. काकांना पोस्ट ऑफिसात मिळाली. वसंत कुठे नोकरी मिळाली नाही, म्हणून ते मॅट्रिक झाल्यावर त्यांनी टेलरिंग व्यवसाय सुरू केला.

काकांच्या बालपणाविषयीची एक आठवण मनात घर करून राहिलेली. आजी धारवाडला देशपांडे बंगल्यामध्ये आमच्याकडे आलेली होती तेव्हा मी बहुतेक दुसरीत होतो. एके दिवशी सकाळच्या नाश्त्यावरून मी काहीतरी हट्ट करत होतो. मला अमुक एक गोष्ट हवी होती आणि जी आईने दिली ती मला नको होती. ते ऐकून आजी माझ्याजवळ आली. मला जवळ घेतलं आणि मला म्हणाली, ''बंड्या, इकडे मी तुला एक गंमत सांगते.'' मला बाजूला घेऊन गेली व म्हणाली, ''तुझ्या बाबांना आणि काकांना लहानपणी मी कसे मोठे केले? तुला माहीत आहे का?'' मी म्हटलं, ''नाही.'' ती म्हणाली, ''थांब, मी सांगते तुला. आता थांब मी सांगते तुला आता. आमची परिस्थिती फारच बेताची होती आणि चहा, नाश्ता असे वेगवेगळे द्यायची आमची ऐपत नव्हती. तर मी बराच वेळ सकाळी चहा झाला की त्यात साखर असतेच म्हणून लाह्याचे पीठ चहात कालवून या तिन्ही मुलांना देत होते आणि तिन्ही



**आई, काका व मी**

मुलं कुठलाही हट्ट न करता ते अगदी गुपचुप खात असत. ''तुला तुझे बाबा खूप काय खाऊ आणून देतात. असा हट्ट करायचा का?'' ही हकिकत ऐकल्यावर त्या माझ्या बालमनावरती असं काही परिणाम झाला की नंतर मी आत्तापर्यंत खाण्यापिण्यावर कधीच एखाद्या गोष्टीचा आग्रह धरला नाही. जे मिळेल ते मी अगदी आनंदाने खात असे. काही प्रसंग असे असतात की जे कायम लक्षात राहतात, अगदी आयुष्यभर.

■ ■

# ३. गदग व मुळगुंदच्या माझ्या आठवणी

२४ ऑगस्ट १९९७ रोजी 'गदग' एक नवीन जिल्हा म्हणून ओळखला जाऊ लागला. कला, विनोद, संस्कृती, आध्यात्मिक आणि उद्योग क्षेत्रात गदगचा बऱ्याच काळापासून स्वतःचा वारसा आहे. हे ग्रीनरीसह एक पर्यटक ठिकाण आहे आणि अनेक निसर्गप्रेमींनी भेट दिली आहे. उत्तरेकडील सीमा, मलप्रभा आणि दक्षिणेकडील तुंगभद्रामध्ये वाहते. याशिवाय बेनेहल रोनजवळील मलप्रभामध्ये सामील होतात. संपूर्ण जिल्ह्यात, काळी माती प्रमुख आहे, परंतु काही भागात लाल माती देखील आहे. मध्यम तापमान, हवामान सुखद आणि निरोगी आहे. एप्रिल आणि मे महिन्यामध्ये जास्तीत जास्त ४२ डिग्री सेंटिग्रेड तापमान आणि काही महिन्यांमध्ये किमान तापमान १६ सेंटिग्रेड आहे.

गदग आणि बेटगेरी येथे संयुक्त शहर प्रशासन आहे. गदगबद्दल एक कल्पित गोष्ट आहे की, जर तुम्ही शहरामध्ये एक दगड फेकला तर तो एक तर छापण्यावर किंवा हातमागवर उतरेल. गदगकडे होम्बाली ब्रदर्स आणि शब्बी मठ प्रिंटिंग प्रेस यासह अनेक छापील प्रेस आहेत. बेटगिरी हे गदगचे जुळे गावच. हे हातमागासाठी प्रसिद्ध आहे. गदग,

उत्तर कर्नाटकमधील हिंदुस्तानी संगीताची महत्त्वाची जागा आहे. हिंदुस्थानी गायक, भारतरत्न पुरस्कार विजेते, पंडित भीमसेन जोशी यांचे माहेरघर आहे. आधुनिक कन्नड साहित्य आणि स्वातंत्र्यसेनानी श्री. हिगलगोला नारायण राव, पंडित पुताररराज गावई हिंदुस्तानी शास्त्रीय परंपरा आणि आमचा प्रसिद्ध क्रिकेटपटू सुनील जोशी. याचप्रमाणे प्रसिद्ध गायक, मल्लिकार्जुन मन्सूर, श्रीमती हिराबाई बडोदेकर, श्रीमती गंगुबाई, कृष्णा हंगल, पंडित बसवराज राजगुरू, श्रीमती शोभा गुर्टू ही सर्व प्रसिद्ध मंडळी, धारवाड, गदग, कुंदगोळ याच भागातील.

**गदगच्या आठवणी**

गदग येथे भास्कर डॉक्टर आणि आठवले घराण्यात कुणाच्याही, तब्येतीची काही तक्रार असली की, थेट गदग गाठणे हा एक जणू काही नियमच झाले होता. काही झालं की, आमचं ठरलेलं ठिकाण म्हणजे गदग. तिथे गेलं की कुणाचे जे काय असेल ते डॉक्टर भास्करकाका मनापासून प्रेमाने करीत असत. शालिनीकाकू पण तितकीच प्रेमळ आणि सगळ्यांचे करणारी होती. वसंत काका नेहमी म्हणायचे की, गदगचे घर म्हणजे धर्मशाळा आहे. कोणीही या व कितीही दिवस राहा. गदगचे घर तसे खूप मोठे होते आणि मुख्य बंगल्याच्या जवळ तीन चतुर्थांश भाग व्यापलेला होता. उरलेल्या छोट्या भागामध्ये या घराचे मालक, दत्तंभट हे राहात असत. त्याला खूप मुलं होते म्हणजे माझ्या आठवणीप्रमाणे त्याला पाच मुली आणि तीन मुलगे. त्यांचे घर जवळपास भास्करकाकाच चालवीत असत. बेताची मिळकत व मोठे कुटुंब. घराचे भाडे जे काय मिळते ते व दत्तंभटाची भिक्षुकी, अशी अगदी तुटपुंजी व इतर सर्व जे लागेल ते देण्यास, भास्करकाका व शालिनीकाकू देत असत. लागेल ते भास्करकाकांच्या घरून मागून घेऊन जाणे हे अगदी नित्य नेमाचे झाले होते.

अशा प्रकारे त्यांचे घर चालत असे. शालिनीकाकू, अतिशय मोठ्या मनाची होती, कोणाचेही खूप करायची. तिची एक लक्षात राहणारी गोष्ट म्हणजे, ती खूप मोठ्यामोठ्याने बोलायची, तिच्या चेहऱ्यावरून तिला राग आलाय का असे वाटे, पण ती कधीच कुणावर रागवायची नाही. येईल त्याचे मनापासून करीत असेल. आमच्या वर्षातून तीन ते चार चकरा नक्कीच होत असत.



**शालिनी काकू, द्वारका आत्या राधा काकू व मुले**

मुळगुंदला उन्हाळ्याच्या सुट्टीत जाताना आधी गदगला मुक्काम. भास्करकाका आणि काकूंना चार मुले. सर्वांत मोठी, प्रभा, नंतर राजा, मग नयना व सर्वांत धाकटी ती माधुरी. राजा जवळपास माझ्या वयाचा होता. प्रभा माझ्याहून आठ वर्षांनी मोठी होती. कॉलेजला गेल्यावर प्रभा धारवाडला कर्नाटक कॉलेजमध्ये शिकायला आली. ती होस्टेलमध्ये राहत असे, पण अधूनमधून, देशपांडे बंगल्यामध्ये आमच्या घरी येत असे. एखादी जोडून सुट्टी आली आणि गदग जायचे असले की सहज मला विचारायची? 'काय बंड्या येणार का गदगला?' आणि मी एका पायावर तयार असे. मग काय प्रभाबरोबर जाणे एवढेच फक्त मला करावे लागायचे. बाकी जाता-येताना तिकीट आणि गदगला गेल्यावर बाकी सगळे अगदी मोफत. राजा, नयना, प्रभाला माणसं आलेली आवडायची आणि तिथे तीन-चार दिवस कसे गेले ते कळायचे नाही. मग प्रभाची सुट्टी संपल्यावर तिच्याबरोबर मी परत येत असे.

डॉक्टर भास्कर आठवले म्हणजे त्या वेळी ते एक अतिशय

नावाजलेले डॉक्टर. स्टेशन रोडला त्यांचे घर होते आणि गावात डॉक्टर आठवले माहीत नाहीत असे कदाचित कोणी असेल. भास्कर काकांच्याकडे काम, त्यांचे काही सहकारी (सहकारी म्हणायचे, परंतु ही सर्व मंडळी म्हणजे त्यांच्या कुटुंबाचेच सदस्य होते असे म्हणावेसे वाटत होते.) लक्षात राहणारे म्हणजे त्यांचा कंपाऊंडर श्रीपाद मामा. घरचाच माणूस असल्यासारखा होता अतिशय प्रेमळ, अतिशय कामसू आणि काकांना अतिशय मानणारा असा. दुसरा माणूस लक्षात राहणारा म्हणजे त्यांचा टांगेवाला. अब्दुल टांगेवाला काकांच्या घरात देवघर सोडून कुठेही जाते. तसे त्याला कुठल्याही प्रकारचे बंधन किंवा बंदी नव्हती. घरचा सदस्य असल्यासारखा होता. खरं सांगतो, कित्येक वर्षं अब्दुल हा मुसलमान गृहस्थ आहे हे सुद्धा मला माहीत नव्हते. तो काळच वेगळा होता. माणसं माणसाला ओळखत होती आणि एकदा आपला माणूस म्हटला की, जीव झोकून त्याच्यासाठी काय वाट्टेल ते करणारी अशी होती. तसाच हा टांगेवाला अब्दुल्ला सबंध दिवस हा काकांच्या सोबत असेल. काका दवाखान्या मध्ये असताना एखादं जवळपास भाडे आले तर जाऊन येत असे. नाही तर सबंध दिवस आपला तेथेच थांबून असे. दुपारनंतर भास्कर काका गावातल्या दवाखान्यात जात. त्यांना दवाखान्यात घेऊन जाणे आणि घेऊन येणे हे अब्दुल्लाचे काम. त्याचबरोबर दवाखान्यात जाताना डॉक्टरांची बॅग बरोबर घेऊन जाणे हेही अब्दुल्ला काम करीत असे. नंतर घरी परत आल्यावर संध्याकाळी काकूला भेटून घरी काय हवे-नको ते बघून काही मदत हवी असेल तर, आणून द्यायचं असेल ते सगळं करून सगळं काम झाल्यावर, आता येऊ का, असे विचारून जात असे. अशी, माणसे जोडणे अथवा मिळणे यासाठी खरोखरीच नशीबच लागते.

गदग मुक्कामी एखाद–दुसरा सिनेमाही बघितला जात असे आणि सिनेमाला गेलो की नंतर मग मध्यंतरी काहीतरी खाणे.  सगळी गंमत धमाल असे. गदगमध्ये वांग्याची भजी व अख्ख्या मिरचीची भाजी बनवणारा एक प्रसिद्ध माणूस होता. भास्कर काकांना येथील भजी खूप आवडत. काही वेळा ते मुद्दाम आठवणीने स्वतः स्कूटर घेऊन जात किंवा अब्दुलला पाठवून तेथून वांग्याची भजी मागवत. कानडी मध्ये वांग्याला बदनीकाई असे म्हणतात. मिरची भजी हे म्हणजे अतिशय आवडते खाद्य. भास्करकाका आणि काकू यांचे प्रेम, कोणासही कधीही, जी लागेल ती मदत करण्याची तयारी. त्यांचे घर कसे चालत असेल परमेश्वर जाणे. नेहमी कोणकोण पाहुणे मंडळी इथे आलेली असत. आठवले कुटुंबापैकी कुणाला काही बरे वाटेनासे झाले की, ट्रीटमेंट घेण्यासाठी ठरलेले ठिकाण म्हणजे गदग आणि ते म्हणजे भास्कर काकांचे घर. तसे पाहिले तर भास्करकाका एमबीबीएस डॉक्टर होते पण त्यांची परीक्षा फार चांगली होती. त्यांनी औषध दिल्यावर सहसा आजार लवकरात लवकर बरा होत असे. माझ्या आठवणीतील अजून



**आठवले  फॅमिली,  ६० वर्षांपूर्वीचा फोटो**

एक गदगचा माझा मुक्काम म्हणजे दहावीच्या परीक्षेनंतर. दहावीत असताना जे फिजिकल एक्झामिनेशन होते त्यामध्ये मला हर्निया झाल्याचे निदान डॉक्टरांनी केले होते त्यामुळे परीक्षेनंतर हार्निया ऑपरेशन करायचे ठरले. परीक्षा झाल्यावर मी, आई व काका भास्कर काकांकडे गदगला गेलो. त्यांच्या ओळखीच्या हॉस्पिटलमध्ये माझे ऑपरेशन झाले. ऑपरेशननंतर दोन-तीन आठवडे विश्रांती घ्यायची होती. चालायचे वगैरेसुद्धा नव्हते अशातच एक दिवशी सगळ्यांच्या मनात सिनेमाला जायचे आले तर भास्करकाका मला म्हणाले, ''तू काय काळजी करू नकोस बंड्या. मी तुला स्कूटरवरून घेऊन जातो.'' आणि भास्करकाका मला स्कूटरवरून सिनेमा बघायला घेऊन गेले. एखाद्या माणसाने प्रेम करावे म्हणजे किती? तर भास्करकाका आणि शालिनी काकू म्हणजे एक नमुना होते.

भास्करकाकांची अजून एक आठवण म्हणजे त्यांच्याकडे मर्फीचा मोठा रेडिओ होता. काही वर्षांनी त्यांनी नवीन रेडिओ आणला. मर्फी रेडिओ त्यांनी पॅक केला आणि काकांना म्हणाले, ''प्रभाकर, आता धारवाडला परत जाताना हा रेडिओ तू घेऊन जा. तुला वापरायला चांगलाच आहे.'' काकांनी विचारलं, ''त्याचे पैसे वगैरे काय द्यायचे कसे द्यायचे?'' भास्करकाका म्हणाले, '' त्याचा विचार नको करू, आपण ते नंतर पाहू.'' असा आम्हाला मर्फीचा आठाचा रेडिओ मिळाला. मी साधारणपणे शाळेत असताना तो मिळाला होता. त्यामुळे त्यानंतर क्रिकेट मॅचची, कॉमेंट्री ऐकायला माझी मित्रमंडळी आमच्या घरी जमत असत.

गदगसंबंधी एक आठवण अजून ताजी आहे. ती म्हणजे, भास्कर काका, काकू यांनाच माणस आवडायची असं नाही तर त्यांच्या सर्व मुलांना म्हणजे प्रभा, राजा, नयना व माधुरी यांनासुद्धा पाहुणे आलेले

खूप आवडत असत. पाहुणे कितीही दिवस राहिले तरी परत जाताना एक गोष्ट ते नक्की करत असत. आणि ते म्हणजे पाहुण्यांचे सामान लपवून ठेवणे आणि सामान शोधता-शोधता ट्रेनची वेळ निघून जाई आणि मग पाहुण्यांना कमीतकमी एक दिवस अजून राहावे लागत असे. बऱ्याच वेळा झालेले आहे आणि मला तर त्या काळी गदगहून परत निघताना एक प्रकारचे दडपण मनावर येत असे. आपले सामान तर कोणी लपविलेले नाही ना? बऱ्याच वेळा असे घडलेले आहे. आपल्या घरी पाहुणे अजून एक दिवस राहावेत या भावनेतूनच ही मुलं हे करत असत, पण असे अजून किती घरी असे होत असेल याची मला कल्पना नाही. माझ्या मते, असे अगदी क्वचितच कुठे घडत असेल.

मी आधी उल्लेख केलाय त्याप्रमाणे काकांना लहान मुले अतिशय प्रिय होती आणि त्याची एक गंमत मी आता आपल्याला सांगणार आहे. ही घटना आहे गदग, येथील. काहीतरी चालू होतं आणि काकांनी सर्व मुलांना सांगितले की, ''आता जो कोणी फ्रॉक घालून आपल्या घराला दोन फेऱ्या मारून येईल त्याला मी पाच रुपये बक्षीस देईन.'' आम्ही सगळेजण एकमेकांकडे बघत होतो. तेवढ्यात गोपाळ पटकन उठला आणि म्हणाला, ''काका, मी दोन फेऱ्या नक्की मारून येतो, पण मला तुम्ही पाच रुपये बक्षीस नक्की देणार ना?'' आणि चक्क त्याने फ्रॉक घालून गदगच्या घराला दोन प्रदक्षिणा घातल्या आणि काकांसमोर उभा राहिला आणि म्हणाला, ''द्या आता माझे बक्षीस.'' आणि काकांनी तेवढ्याच कौतुकाने त्याला ते बक्षीस दिले होते.

**मुळगुंदच्या आठवणी**

हे कर्नाटकच्या जिल्ह्यातील एक शहर आहे.

गदगपासून साधारण बारा किलोमीटरवर आहे. दर उन्हाळ्यात मुळगुंदला जाणे हे एक ठरलेलेच असायचे. मुळगुंदचे घरही सांगलीच्या घरासारखे मातीचे घर. एक मजली, खूप मोठे होते. आवारात

जमिनीखाली काही धान्य साठवून ठेवण्यासाठी गोदामे होती. पाठिमागच्या बाजूला एक मोठी विहीर होती आणि मोठा गोठा होता. तो गोठासुद्धा एखाद्या मोठ्या घराएवढा होता. विहिरी जवळच गोबर गॅस प्लँट होता. म्हशी, गाई असल्यामुळे त्यांच्या शेणापासून तो गोबर गॅस चालत असे. घरासाठी लागणारा गॅस तिथून मोफत तयार होत असे. घर खूप मोठे होते. मातीचे होते. जाड भिंती होत्या. त्यामुळे अगदी उन्हाळ्यातसुद्धा फारसे उघडायचे नाही. उन्हाळ्यात आम्ही बरेच जण तिथे जमायचो. सगळी मुलं मी, वामनकाकांच्या मुली म्हणजे त्यांची मुलं, द्वारकाआत्या व तिची मुलं अशी बरीच लहान मुलं एकत्र तेव्हा जमलेली असायची. मुळगुंदमध्ये दोन शेतं होती. एक होता मळा आणि दुसरा होता गद्दा. मळा हा मुळगुंद बस स्टँडजवळ होता व गद्दा, व्यंकटापूर या एका गावाकडे जाताना लागणाऱ्या रस्त्यावरती होता. मळ्याजवळच, त्यांच्या पाठीमागे एक मोठा डोंगर होता. आणि हा पूर्ण कातळी डोंगर होता.

तिथे पावसाळ्यात घरंगळत जाणारे पाणी पडून जात असल्यामुळे इथे एक असा थोडा गुळगुळीत भाग निर्माण झाला होता. ती आम्हा मुलांची मूळची दगडावरची अतिशय उंच अशी घसरगुंडी. घसरगुंडीवर आम्ही नेहमी खेळायला जात असू.

मुक्कामी सगळ्या मुलांचा कार्यक्रम काय तर सकाळी उठल्यावर चहा आणि थोडा नाश्ता झाला की गद्दा किंवा मळ्यामध्ये मोठ्या विहिरी होत्या, त्या विहिरीवरती पोहायला जाणे. आमच्यापैकी बऱ्याच मुलांना तेव्हा पोहणे येत नसे. माझे बाबा म्हणजे काका यांचे ठरलेले काम आहे अशा मुलांना पोहायला शिकवणे. त्यांची पोहायला शिकवायची पद्धत फार सोपी होती. आम्हा मुलांना, वर उचलून, एकदम विहिरीत फेकून देत. लगेच स्वतः उडी मारून, मूल गटांगळ्या

खाऊ लागली की हात-पाय कसे मारायचे हे त्याला शिकवीत. या पद्धतीने चार-पाच दिवसात त्या मुलांना पोहता येत असे. भरपूर वेळ पोहून नंतर पायी चालत घरी गेलं की अशी प्रचंड भूक लागलेली असे की काय विचारू नका. सगळी मुलं मग जेवणावर अक्षरशः तुटून पडत असू. दुपारी घरात बसून काही खेळ वगैरे झाल्यावर संध्याकाळ झाली की, सर्व मुलांना घरातील सर्व कंदील एकत्र आणून ते साफ करून त्याच्यामध्ये रॉकेल भरून ते कंदील पेटवून प्रत्येक खोलीमध्ये लावणे हे एक अलिखित काम दिलेले असे. आम्ही सर्व मुले अगदी आनंदाने हे काम पार पाडत असू. मूळच्या घरातील अजून एक आठवण म्हणजे पोहायला जाण्याचा उल्लेख मी मघाशी केलेलाच आहे. दुसरी आठवण म्हणजे आमच्या गद्दा आणि मळा या दोन्ही शेतामध्ये आंब्याची बरीच झाडे होती. हे अगदी साधे रायवळ आंबे असत, पण अतिशय गोड आणि अतिशय मधुर. या आंब्याची अढी आमच्या मूळच्या घरातील आवारातील एका कोपऱ्याच्या खोलीमध्ये केलेले असे. या खोलीला कुलूप लावलेले असे, परंतु कडीतून हे कुलूप अगदी अलगद काढता येत असे. हे कुलूप काढून एका मुलाला आत पाठवून, त्या खोलीच्या खिडकीतून, एक एक आंबा बाहेर काढला जाई. हे नित्यनेमाचे आमचे रोजचे उद्योग असत. असे आंबे काढून, आमच्या घरासमोरील एका शाळेमध्ये संध्याकाळी दुपारी जाऊन बसत असू. उन्हाळ्याची सुट्टी असल्यामुळे शाळा बंद असे. तेथे बसून मनसोक्त आंबे खाऊन घरी परत येत असू. घरातील बऱ्याच मोठ्या मंडळींना याची कल्पना असावी, पण मुलं अगदी गमतीने आंबे खातात. त्यामुळे बहुतेक मोठ्या मंडळींनी आमच्याकडे याबाबतीत दुर्लक्ष केले असावे.

मूळ मुक्कामी काकांच्या दोन-तीन आवडत्या गोष्टी होत्या. एक म्हणजे सकाळी सर्व मुलांना घेऊन पोहायला जाणे. परत आल्यावर

आमच्याकडे एक बैलाची एक्का गाडी अशी एक होती. त्याला मागच्या भागात चौकोनी कप्पे केलेले होते. त्या कप्प्यांमध्ये घागरी ठेवण्याची जागा होती. ती गाडी घेऊन ते आमच्या मुळगुंदमधील एका ओढ्यावर जाऊन प्यायचे. पाणी भरून घरी घेऊन येत असत. आमच्या आवारात विहीर होती, पण ती खाऱ्या पाण्याची होती. त्यामुळे वरील वापरासाठी फक्त त्या पाण्याचा उपयोग होत असे. पिण्यासाठी मात्र पाणी या ओढ्यावरूनच भरून आणावे लागत असे. हे दुसरे काम. तिसरे काम म्हणजे मुळगुंदमध्ये लाकडी चार-पाच मोठ्या पेट्या होत्या. जसे मी आधी उल्लेख केला आहे तसं विसूकाकांच्या धारवाड येथील घरातील किबे वाड्यात यांच्या घरी असलेल्या लाकडी पेट्यासारख्या मोठ्या पेट्या होत्या. सगळे काम झाल्यावर पेटीवर ताणून देणे म्हणजे झोप काढणे हा एक काकांचा अतिशय आवडता कार्यक्रम होता.

काकांना आंब्याचे प्रचंड वेड किंवा आवड होती आणि मुळगुंदला गेल्यावर तर काय घरचे आंबे असल्यामुळे प्रश्नच नव्हता. एकदा आम्ही गोठ्यामध्ये सगळेजण बसलो होतो. काका आंबे कापून सगळ्यांना देत होते आणि नंतर काय झाले कुणास ठाऊक, आमची कापायची सुरी गायब झाली. आम्ही सगळे जण शोधत होतो. रामकृष्ण माझ्यापेक्षा अडीच वर्षांनी मोठा होता. सगळं शोधत असताना आम्हाला ती सुरी काय सापडेना. शेवटी तो म्हणाला, ''प्रभाकरकाका, बहुतेक गाई-म्हशींनी खाऊन टाकली असेल. तिच्या पोटात आहे का आपण बघूया का?'' हे ऐकून आम्हाला सगळ्यांनाच खूप गंमत वाटली होती.

मी आधी उल्लेख केला आहे त्याप्रमाणे विठूकाका हे सर्व मुलांचे किती आवडते आजोबा होते याचं एक उदाहरण. विठूकाका सिगारेट खूप ओढायचे. त्यांचा आवडता ब्रँड होता पिवळा हत्ती. असेच एकदा गोठ्यात आम्ही सगळे बसले असताना विसूकाकांनी एक सिगारेट

विठूकाका, राधा काकू व रामकृष्ण



ओढली. त्याच्यानंतर रामकृष्ण त्याला म्हणाला, ''विठूकाका, तुम्हाला एक मला विचारायचे विचारू का?'' विठूकाका म्हणाले, ''विचार.'' तो म्हणाला, ''की काका, नियु यष्ट चुट्टा हाल माडतीरी?'' कानडीतून बोललेला एक संवाद होता. याचा अर्थ असा की, ''दिवसात तुम्ही किती सिगारेट तुम्ही वाया घालवता?'' विशेषतः त्या काळात लहान मुलाने मोठ्यांना असे काही अवघड प्रश्न विचारले की मोठ्यांची प्रतिक्रिया काय असू शकते याचा सर्वांनाच अंदाज असावा, पण विठूकाकांनी मात्र या प्रश्नाचे अतिशय हसत उत्तर दिले होते.

मुळगुंदच्या या आमच्या एकंदरीत प्रवासामध्ये तो किती वेगळा होता याची जाणीव मला जवळपास रोज होते. मुळगुंदमध्ये आठवले घराण्याला प्रचंड मान होता. कानडीमध्ये बहुतेक सर्व जण अपनावर असे म्हणत असत. त्याचा अर्थ मालक किंवा श्रीमंत असा होता.



मी, रामकृष्ण, इंदूआत्या

आमच्या घरी काम करण्यासाठी बरेच नोकर मंडळी होती. सगळ्यांची नावे मला आठवत नाहीत, परंतु एकाचे नाव अजूनही आठवते. मध्यंतरी कधीतरी या व्यक्तीस मी भेटलो

होतो, कुठल्यातरी लग्नाच्या निमित्ताने. त्याचे नाव कादरी. मला कित्येक वर्षं कादरी व इतर काही कामगार मंडळी हे मुसलमान आहेत याची कल्पनासुद्धा नव्हती. हे कामगार मंडळीसुद्धा आमच्या घरी, आमच्या कुटुंबाचे सदस्य असल्यासारखे वावरत असत. फक्त देवघरात ते जात नसत, पण गेल्या काही वर्षांत आपल्या राजकारणामुळे जातीजातींमध्ये किती अंतर किती प्रचंड असूया किंवा राग निर्माण झाला आहे, हे बघितले की, पूर्वीचे दिवस किती चांगले होते असे राहून राहून वाटते.

मूळ मुक्कामी अजून एक लक्षात राहणारी आठवण म्हणजे रोज संध्याकाळी लहान-मोठी सगळेजण बसून पत्ते खेळत असत. बहुतेक रमीचा डाव रंगत असे आणि तो अर्थात पैसे लावून, पण अतिशय कमी असे. डाव संपला की, त्या दिवशी जमलेले सगळे पैसे एकत्र ठेवले जात.  असे पाच-सहा दिवस झाले की त्या पैशातून कुरमुरे व बाकी साहित्य आणून घरी भेळ करून आम्ही सगळेजण या भेळीचा आस्वाद घेत असू.  असे फारच कमी कुटुंबात घडत असेल. साधारणपणे या गोष्टीला माझ्यामते, पंचावन्न ते साठ वर्षं होऊन गेली, पण खूप छान खेळीमेळीचे वातावरण आमच्या कुटुंबात असे. आमच्या आठवले कुटुंबात सख्खे चुलत किंवा मुलगा किंवा मुलगी तरुण किंवा म्हातारे असा भेदभाव अजिबात नव्हता हेच यातून दिसते.

मुळगुंद येथील मुक्कामी आम्हा मुलांचा अजून एक आवडता खेळ होता. तो म्हणजे दगडी घसरगुंडी.  मी आधी उल्लेख केल्याप्रमाणे मुळगुंद बस स्टँडच्या मागे एक मोठा डोंगर होता आणि त्याला कल्य मुळगुंद म्हणजे दगडी मुळगुंद असेच म्हणत असत. या डोंगरावर क्वचितच एखाददुसरे झाड असावे.

पावसाच्या पाण्याने गुळगुळीत असा भाग तयार झालेला होता. हीच ती आमची घसरगुंडी. आम्ही संध्याकाळी बऱ्याचवेळा या घसरगुंडीवर जाऊन खेळत असून. एकदा आमच्या सर्व मुलांच्या

मनात आले की, आपण सीताराम काकांना उद्या संध्याकाळी घसरगुंडीवर घेऊन येऊ.  सीतारामकाका म्हणजे सीताराम वाटवे म्हणजे अविदादा वाटवे यांचे काका. अतिशय मनमिळाऊ आणि सीतारामकाकांना सुद्धा मुले खूप आवडत असत. आम्ही आदल्या दिवशी त्या घसरगुंडीवर जाऊन कॅरम बोर्डसाठी वापरतो ती बोरिक पावडर त्या घसरगुंडीवर टाकली. दुसऱ्या दिवशी प्रचंड आग्रह करून सीतारामकाकांना आमच्याबरोबर घसरगुंडीवर घेऊन गेलो. आणि ''काही होत नाही काका तुम्ही मस्तपैकी आमच्याबरोबर घसरगुंडी खेळा.'' असे सांगत आम्ही मुलं कोणी बसलो नाही. काका फक्त बसले. तुम्ही आधी घसरा आम्ही नंतर घसरू, असे म्हटले. त्या दिवशी सीतारामकाका धोतर नेसून आलेले होते, आणि बोरिक पावडर लावल्यामुळे ते इतक्या प्रचंड वेगाने घसरत खाली गेले की या सर्व भानगडीत त्यांचे धोतर फाटले. हे सगळे झाल्यावर मात्र आम्हा सर्व मुलांना भीती वाटली की आता सीताराम काका रागावतील किंवा घरी गेल्यावर बाकी सर्व मोठ्या मंडळींना हे सर्व सांगतील. सर्व मुलांना आता काही ना काही शिक्षा होईल. परंतु यापैकी काहीच झाले नाही. सीतारामकाकांनी हे सर्व इतके हसण्यावारी नेले की आम्हालाच आमची लाज वाटली. घरी याबद्दल ते काही बोलले नाहीत. घरच्यांना कोणाला त्यांचे धोतर फाटले वगैरे सर्व कल्पना आली नाही. या घटनेमुळे सीतारामकाका अजूनही कायम आठवणीत राहिले.

■ ■

# ४. कारवारच्या माझ्या आठवणी

**कारवारची थोडी माहिती**

उत्तर कर्नाटक



जिल्हा : मुर्डेश्वर, तालुक : भटकळ येथे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वांत उंच शिलालेख

टोपणनाव : काश्मीर ऑफ कर्नाटक

कर्नाटक यूके शोधक map.svg

समन्वयक : १४.६ ओ एन ७४.७ Amo ECoordinates : १४.६ ओ एन ७४.७ ओ ई

**मुख्यालय कारवार**

तालुका कारवार, अंकोला, कुमाता, माननावार, भटकळ, सिरी, सिद्दापूर, येलापूर, मुंडगोद, हलील, ज्योदा सरकार

उपायुक्त डॉ. हरीश कुमार के. आय.ए.एस.

जिल्हा पंचायत अध्यक्ष– जयश्री एम.

**क्षेत्र**
एकूण १०,२९१ किमी २ (३,९७३ वर्ग मैल)
क्षेत्र श्रेणी ५ रा
उंची ५०० मीटर (१,६०० फूट)
लोकसंख्या- (२०११)
**एकूण १,४३७,१ ९ ६**
घनता- १४० / किमी २ (४०० / वर्ग मैल)
भाषा :
अधिकृत कन्नड
प्रादेशिक कन्नड, कोकणी
वेळ क्षेत्र UTC + ५: ३० (IST)
दूरध्वनी क्रमांक + ९१० (838x)
आयएसओ ३१६६
वाहन नोंदणी
कारवार केए ३०
सिरीज केए ३१
होननावार केए ४७
दंडली केए ६५
कोस्टलाइन
१४२ किलोमीटर (८८ मैल)
लिंग प्रमाण ९ ७
साक्षरता ८४.०६%



भारतीय प्रायद्वीपच्या पश्चिमी किनाऱ्यावर कारवार हे गोवा जिल्ह्यापासून केवळ १५ किमी अंतरावर आहे आणि बेंगलोरच्या राजधानीपासून ५२० किमी अंतरावर आहे. हे उत्तर कन्नड जिल्ह्याचे मुख्यालय असून ते एक ऐतिहासिक शहर आहे. कारण १५ व्या शतकापासून ते एक व्यवहार्य व्यापारिक पोस्ट आहे. केरळच्या

मसाल्याच्या खजिनांच्या जवळील जवळजवळ नैसर्गिक बंदर आहे, पोर्तुगीज, ब्रिटिश, अरेबियन आणि आता भारतीय नौदलाने त्याच्या स्थानाचा फायदा घेतला आहे. काळी नदी कारवारच्या अगदी जवळ अरबी समुद्रात जोडली गेली आहे, जेथे काळी नदी पुलाजवळील प्रसिद्ध सदाशिवागड किल्ला बांधला गेला आहे. नदी, पूल, किल्ल्यातील अंतर आणि हळुवारपणे नारळाच्या झाडे पर्यटकांना परिपूर्ण चित्र देतात. प्रादेशिक संस्कृती आणि मोर कारवार यांचे मुस्लीम आणि ख्रिश्चन लोकसंख्या मोठ्या प्रमाणात कारण, ते टिपू सुलतानाने राज्य केले आहे आणि ब्रिटिश आणि पोर्तुगीज राजवटीत अनेक मिशनरींनी गोव्याच्या निकटतेने भेट दिली आहे. कारवारच्या स्वदेशी लोक उत्तरा कन्नडचे आदिवासी म्हणून ओळखले जातात आणि सुमारे ५५% लोक कन्नड भाषेत कोंकणी बोलतात. संस्कृत, करवानी लोक करवणार लोक, गोव्याच्या जवळ आहेत, देशाचा एकमात्र कोकण राज्य आहे, जरी त्यांनी कर्नाटकचा भाग म्हणून निवडण्याचे निवडले आहे. आणि पाहण्यासारखे आणि बरेच काही – कारवारच्या परिसरात आणि





पर्यटन परिसरातील पर्यटन स्थळे बंदरांशिवाय मच्छीमार आणि पर्यटन हे दोन मुख्य उद्योग आहेत. त्यांच्या सुवर्ण किनारी, नारळ आणि कॅसुरिनस झाडे आणि

सभोवतालच्या निर्जन भागात असलेले प्राचीन बेटे पर्यटकांना एक दुर्मीळ हेवन देतात. देवबाग, कुडी आणि काजू बागसारख्या कारवाडच्या सुंदर समुद्र किनाऱ्यामध्ये स्नॉर्कलिंग, जलतरण, सर्फिंग आणि डायविंगसारख्या जल क्रीडा, साहसी पर्यटकांसाठी आदर्श स्थान तयार करतात. पर्यटनस्थानात रूची असलेल्यांसाठी अनेक ऐतिहासिक मंदिरे, मंडळे आणि मशिदी आणि मकबरे आहेत. या मंदिरांमध्ये प्राचीन कलाकृती आणि विस्मयकारक वास्तुशिल्पीय ठिकाणे आहेत. मागील दशकात भारतीय नौसेनेने येथे एक आधार उभारला आहे आणि सुरक्षेच्या कारणास्तव बंदर बंद करण्यात आले आहे. तथापि, प्रत्येक वर्षी, नेव्ही आठवड्यादरम्यान, नेव्ही अभ्यागतांना परवानगी देते आणि या दरम्यान आपण सुंदर नैसर्गिक बंदरांची एक झलक पाहू शकता ज्याने सदस्यांपासून लोकांना जगभरात आकर्षित केले आहे.



**लोकसभा मतदारसंघ : उत्तर कन्नड लोकसभा मतदारसंघ**

हवामान मान्सून (कोपेन)

पर्जन्यमान २,८३५ मिलीमीटर (१११.६ इंच)

सरासरी उन्हाळी तापमान ३३ डिग्री सेल्सियस (९१ डिग्री फॅ)

सरासरी हिवाळ्याचे तापमान २० डिग्री सेल्सिअस (६८ डिग्री फॅरेनहाइट). वेबसाइट uttarakannada.nic.in

कारवार, अंकोला, कुमठा, होन्नावर आणि भटकळ तालुक्यांसह तटीय मैदान आहे. मालेनाडु, सिरी, सिद्दापूर, येलापूर, दांडेली, हलील, ज्योदा आणि मुंडगोड तालुक्यांसह.


**इतिहास**

**कोडालमने श्री विष्णुमूर्ती मंदिर**

**नंदीगड्डा गावातून काळी नदी व सदाशिवगड किल्ला**



उत्तर कन्नड जिल्ह्यातील पहिले ज्ञात आहेत. उत्तर कन्नडमध्ये सन ३५० ते ५२५ पर्यंत कदंब राज्य होतं. त्यांनी बनवसीवर राज्य केले. चालुक्यांनी कादंबसांच्या अधीन झाल्यानंतर, चालुक्य, राष्ट्रकूट, होयसाळ आणि विजयनगर साम्राज्य यांसारख्या साम्राज्यांची सत्ता होती. प्रसिद्ध मोरक्कन प्रवासी इब्न बट्टुता हूनूर येथे नवाता सुलतान जमाल अल-दीनच्या संरक्षणाखाली जिल्यारवत काही काळ राहिले होते. हे ठिकाण सध्या होसापट्टाना म्हणून ओळखले जाते आणि होनवावर शहरात वसलेले आहे. इ.स. १७५० मध्ये मराठा साम्राज्याचे शासन आले आणि १७९९ साली चौथ्या म्हैसूर युद्धाच्या समाप्तीनंतर ब्रिटिशांना म्हैसूर साम्राज्याचे काही भाग मिळाले. मद्रास प्रेसिडेंसीमधील कानारा जिल्ह्याचा हा भाग अनियंत्रितपणे होता. १८५९ मध्ये जिल्हा उत्तर आणि दक्षिण कानारा जिल्ह्यामध्ये



विभागले गेले. १८६२ मध्ये ब्रिटिशांनी उत्तर कन्नड जिल्ह्याला मुंबई प्रेसिडेंसीकडे हस्तांतरित केले.

१९४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्यानंतर बॉम्बे प्रेसीडेंसीची पुनर्बांधणी मुंबई राज्य म्हणून झाली. १९५६ मध्ये बॉम्बे स्टेटचा दक्षिणी भाग म्हैसूर राज्यात जोडला गेला, ज्याचे नाव कर्नाटक १९७२ मध्ये बदलले गेले.

महत्त्वपूर्ण आणि सुंदर, ऐतिहासिक महत्त्व असलेल्या सदाशिवगड किल्ल्याचे आता एक लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे, जो काली नदी पुलाजवळ स्थित आहे,






जो नदीच्या संगमावर आणि अरबी समुद्राच्या संगमावर बांधला गेला आहे. प्रसिद्ध बंगाली कवी आणि नोबेल पुरस्कार विजेते रवींद्रनाथ टागोर यांनी १८८२ मध्ये उत्तरा कन्नडला भेट दिली. २२ वर्षीय रवींद्रनाथ टागोर यांचे भाऊ सत्येंद्रनाथ टागोर यांच्याबरोबर राहिले, जो



उत्तर कन्नड जिल्ह्यातील जिल्हा न्यायाधीश होता. गोव्यातील पोर्तुगीजांच्या छळामुळे या परिसरात स्थलांतरित झालेल्या चाराडो कुटुंबांची मोठी संख्या आहे.

सदाशिवगड हा उत्तर कन्नड जिल्ह्यातील कारवार नजीक आहे. हा किल्ला काली नदीच्या उत्तर किनाऱ्यावरील जुन्या किल्ल्याच्या जागेवर बांधला गेला होता. त्यामध्ये सुमारे आठ मीटर उंचीचे रामपार होते जे सुमारे दोन मीटर रुंद होते. तोफांसाठी टॉवर्स होते. किल्ला सर्वोच्च बिंदूवर होता. पश्चिमेकडे, खडकाच्या पायथ्याशी समुद्राजवळ एक आच्छादन होते. किल्ल्यात एक कमानदार गेटवे होता.



सदाशिवगडच्या पूर्वेकडील टेकडीच्या वरच्या भागावर संवर्गड एक अतिशय लहान किल्ला होता, सुमारे साठ मीटर वीस मीटर. पूर्वेकडील आणि उत्तर पूर्वेकडील पूर्वगामी हे एक उपकिल्ले होते.

सदाशिवगडची अजून एक आठवण म्हणजे, प्रसिद्ध, मराठी सिने नायिका, जयश्री गडकर यांचे हे जन्मस्थळ. कारवारहून गोव्याला जाण्यासाठी हा अगदी जवळचा रस्ता होता. कारवारजवळ, काळी नदी व अरबी समुद्राचा संगम आहे. काळी नदीचे मोठे पात्र, लाँचमध्ये

बसून कापावे लागे. पैलतीरी सदाशिवगड आहे. तेथून मडगाव, गोव्याला जाणेसाठी बस मिळायची. आम्ही कारवार येथे असताना, बऱ्याच वेळा गोव्याला जात होतो. गोवा स्वतंत्र झाला होता, परंतु, १९६५ ते १९६७ च्या काळात, तेथील बस, टॅक्सी, मोटार कार, सर्व, पोर्तुगालहून आयात केलेल्या होत्या. त्या काळातले, गोवाचे वैशिष्ट्य म्हणजे, रस्त्याच्या कडेला, फणस सोललेला विकायला असे व केळ्याच्या घडा सारखा तो गऱ्याचा जणू घडच दिसे.




आता कारवार व सदाशिवगड, ब्रिजने जोडले गेले आहे, त्यामुळे आता नदी पार करणे खूप सोपे व जलद झाले आहे.

कारवार हे अगदी वेगळ्या प्रकारचं गाव जसं आपलं कोकण असतं तसं हे कर्नाटकातील कोकण असं म्हणा. आम्ही राहायला येथे नाडकर्णी कंपाऊंडमध्ये गेलो. तिथे आम्हाला एक स्वतंत्र तीन किंवा चार खोल्यांचा बंगला मिळाला होता. हा बंगलासुद्धा कोकणात असतो तसा टिपिकल बंगला होता. समोरच्या भागात किंवा लाकडी ग्रील तयार केलेले होते आणि त्याला आतून लावायसाठी लाकडी सरकवायची अशी पट्टी होती. हे सगळं सांगायचं कारण तुम्हाला नंतर लक्षात येईलच.



आमच्या शेजारच्या बंगल्यामध्ये पर्वतीकर नावाचे एक कुटुंब राहात होते. पर्वतीकर कुटुंबात तीन मुली होत्या. त्यातली एक मुलगी तिचं नाव

आता आठवत नाही पण तिला टोपण नाव अन्यि असे होतं. आम्ही सगळेजण तिला anni म्हणायचं. हे कुटुंबसुद्धा अतिशय लाघवी आणि आमचे खूप चांगले संबंध त्यांच्याबरोबर होते. नाडकर्णी कुटुंबाच्या प्रमुख म्हणजे काकी. काकींना एक मुलगा होता. त्यांचे नाव आता आठवत नाही. त्यांना एक छंद होता गारगोट्या पांढऱ्या रंगाच्या घेऊन बराच वेळ ते एकमेकांवर घासत बसत. त्याचा उद्देश काय होता ते त्या माझ्या बालमनाला तेव्हा तरी कळले नाही. काकी आम्हाला नेहमी विचारायच्या, ''आज खास प्रकारचे मासे केलेत नमुन्यासाठी देऊ का?'' आम्ही कोणीच मासे खात नव्हतो. त्यामुळे आम्ही नाही म्हणायचो, पण त्या दरवेळेस विचारायच्या हे मात्र नक्की. काका कारवारला बदली होऊन आले ती एक वेगळी पोस्ट होती. आताच्या पिढीला हे खरंच गमतीशीर वाटेल. ती पोस्ट होती Wire Less Inspector म्हणजे वायरलेस लायसन्स. त्या काळी रेडिओ ज्यांच्याकडे होते त्यांना वायरलेस लायसन्स घ्यावं लागत असे. एक प्रकारच्या जाळीची अशी लांबलचक पट्टी घराबाहेर, अँटेना म्हणून लावावी लागे व असा




रेडिओ वापरण्यासाठी पोस्ट डिपार्टमेंट एक ठरावीक रक्कम लायसन फी म्हणून भरावी लागे. काकांचे काम होते की सबंध कारवार जिल्ह्यामध्ये दौरा करून ज्या घरात रेडिओ किंवा अँटेना लावलेला आहे त्यांनी लायसन्स फी



भरलेली आहे की नाही हे बघणे. यासाठी काकांना एक जीप व दोन पोलीस कायम दिलेले होते. काकांबरोबर मी कारवार जिल्ह्यामध्ये बऱ्याच ठिकाणी जाऊ शकलो. उदाहरणार्थ सुपारीसाठी प्रसिद्ध असलेले गाव अंकोला, कुमठा, सिरसी, वगैरे. नंतर अशी अजून बरीच ठिकाणं मी काकांबरोबर पाहिली. काकांना जीप व त्यात दोन पोलीस याचे मला प्रचंड आकर्षण व अप्रूप होते. या कारवारच्या आमच्या घराच्या शेजारी म्हणजे रस्ता ओलांडून पलीकडच्या कंपाऊंडमध्ये अण्णा पटवर्धन राहायचे. अण्णा पटवर्धन हे काकांचे पोस्ट ऑफिस सहकारी तर होतेच, परंतु आमचे एक दुसरे नाते म्हणजे, सुमती काकूचे, अण्णा हे धाकटे भाऊ. अण्णांना तेव्हा एक मुलगी होती. नाव तिचं निर्मल. ती आमच्याकडे नेहमी यायची. अगदी छोटी होती. मला वाटतं, तीन-चार वर्षांची असावी. संध्याकाळ झाली, काळोख झाला की, ''काका आता काळोख झालाय, मी एकटी कशी जाऊ?'' असे म्हणायची. काकांनासुद्धा राम काकांच्याप्रमाणे लहान मुलं प्रचंड आवडायची. त्यांची खूप चेष्टा-मस्करी करायचे. आणि मग त्यांना खाऊ द्यायचे. निर्मलला सोडायला कधी काका किंवा कधी मी जात असे.

आम्ही कारवारला तीन वर्षे राहिलो. मी पाचवी ते सातवी हिंदू हायस्कूल येथे शिकलो. कारवारला असतानाच मी सायकल चालवायला शिकलो. सुट्टीच्या दिवशी म्हणजे एखाद्या शनिवारी किंवा रविवारी किंवा इतर कुठल्या सणावारी काकांना ऑफिस नसले की मला सायकल चालवायला मिळायची. याचे मला प्रचंड आकर्षण आणि केवळ सायकल चालवायला मिळते यासाठी आईने काही दिलेली कामे म्हणजे बाजारात जाऊन, नारळ विकत घेऊन येणे किंवा तेल आणणे अशी काम मी तेव्हा केलेली मला स्पष्टपणे आठवतात. हा काळ होता साधारणपणे १९६२ ते १९६५. या काळी स्वस्ताई किती होती याची कल्पना आपल्याला येईल. मला एका रुपयाला तीन नारळ आणलेले आठवतात तसेच गोडतेल साधारणपणे चार रुपये किलोने मी आणलेलं मला आठवते आहे.

कारवार मुक्कामी काकांच्या फिरतीमुळे बऱ्याच वेळा घरी मी

आणि आई असे दोघेच. आई माझा अभ्यास संध्याकाळी घ्यायची आणि इतिहास, भूगोल वगैरे असे विषय शिकवायला लागली की मला बऱ्याच वेळा झोप यायला लागायची. मी पेंगायला लागलो की, आई वाचून दाखवायचे ते ऐकायचं आणि शेवटी मी झोपी गेलो की आई निवांतपणे पुस्तक खाली ठेवून मला झोपू द्यायची.

अशाच एका संध्याकाळी आई आणि काका काही कामानिमित्त बाहेर गेले होते. मी संध्याकाळीच झोपलो आणि मला गाढ झोप लागली. काकांनी व आईने मला खूप हाका मारल्या, पण मी काही जागा झालो नाही. आमच्या घराच्या समोरच्या भागात लाकडाचे ग्रील असल्यामुळे हात घालून आडवी लाकडाची पट्टी बाजूला सरकवून ते दोघे आत आले. मला त्या दिवशी जाग आलीच नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी मला काकांनी हा किस्सा सांगितला.

या कारवारच्या घरातली अजून एक आठवण. अगदी मला स्वच्छपणे आठवते ती म्हणजे मी आधी नमूद केल्याप्रमाणे काकांना कुठल्याही कामाची आवड किंवा कुठे काम येत नाही असे कधीच नव्हते. या घराला रंग काढायचे असे त्यांच्या मनात आले. बाहेरचा रंगारी बोलून ते सहज करता आले असते. परंतु स्वावलंबन स्वतः करण्याची मजा ती कोणाला बोलून करण्यात नाही. यामुळे त्यांनी हे काम स्वतः करायचे ठरविले. कुठून तरी एक उंचच्या उंच शिडी त्यांनी मागवली. शिडी लावून रंगकाम करत होते. रंग घेण्यासाठी त्यांनी आमच्याकडे असलेले एक पितळेचे भांडे ज्याला एक हँडल होते ते त्यांनी शिडीच्या वरच्या पायरीवर बांधून रंगवत होते. शिडी घसरली आणि पडली. भांडं खाली पडलं. ते भांडे चांगलं मजबूत, जाडजूड होते, पण ते पूर्णपणे चेपून गेले. ज्याला म्हणतात, इनसाईड आऊट तसं त्याचा आकार झाला. हा प्रसंग मी बहुतेक पाचवीत असतानाचा, तसा मी लहान होतो. झाला प्रकार पाहून मी प्रचंड घाबरलो. मी इतक्या जोरात किंकाळी ठोकली की सर्व शेजारी मंडळी धावत आमच्या

घरी आले. त्यांना कळेना की काय झालं? हा इतक्या जोरात का किंचाळला? आणि मग तो प्रसंग त्या सगळ्यांनी बघितला. नंतर मला काका म्हणाले, ''अरे एवढ्यानं घाबरलास?'' म्हटलं, ''मला वाटले काय करू?'' पण तो एक प्रसंग माझ्या मनामध्ये कायमचा कोरला गेलेला आहे.

मघाशी मी उल्लेख केला तसे कारवार म्हणजे कर्नाटकातील कोकण तिथे पाऊस प्रचंड पडायचा आणि अगदी मुंबईत कसा पडतो तसा.

**या घराबद्दलची अजून एक आठवण**

एकदा एक साप आमच्या घरात वर लपलेला आढळला. मला याची प्रचंड भीती वाटली, पण काका तसे धैर्यवान होते. त्यांनी तो मारला की काय ते आठवत नाही, पण त्यांनी या परिस्थितीत आमची सर्वांची सुटका केली होती.

अजून एक प्रसंग. कारवार हे तसं बऱ्यापैकी मोठे बंदर किंवा मोठ्या बोटींचा धक्का. परदेशातल्या बऱ्याच बोटी येत असत आणि या बोटीवरचे खलाशी बरेच वेळा रात्री गावी चोरी करण्याच्या उद्देशाने किंवा अशाच काही उद्देशाने फिरत असतात. एकदा असेच दोन चोर आमच्या घराच्या खिडकीतून बघत होते. हे काकांच्या लक्षात आले. त्यांनी पटकन समोरचे दार उघडून घराच्या मागच्या बाजूला एकटेच कोण आहेत बघायला गेले. मला मात्र या प्रसंगाची प्रचंड भीती वाटली होती. एकदा काका फिरतीवर गेले होते त्या दिवशी नेमकी शिवरात्र होती. म्हणून मी आणि आई आमच्या घराच्या जवळपास एक महादेवाचे मंदिर होते. आम्ही पायी गेलो होतो. साधारणपणे अर्धा एक तास जाण्यास आणि तेवढाच येण्यास असा लागत असावा. आम्ही महादेवाचे दर्शन घेऊन परत येत असताना पिशवीतील नारळ मी बाहेर काढून फोडलेला नारळ मी जोडला. त्याबरोबर एकदम आई मला म्हणाली, ''अरे असं का केलं? फोडलेला नारळ, कधीही परत जोडायचा नसतो.'' मला कळलं नाही असं का म्हणते तर ती मला

म्हणाली, ''असा नारळ जोडला की काहीतरी वाईट बातमी कानी पडते किंवा घडते असा एक समज आहे.'' दुर्दैवाने हा माझा नारळ जोडणे व वाईट बातमी नंतर समजणे याचा कुठेतरी



संबंध होता. आठ पंधरा दिवसांत आम्हाला मुळगुंद येथे हे श्री जगन्नाथ काका यांचे शिवरात्री दिवशी निधन झाल्याची बातमी समजली. माझ्या त्या बालमनावर याचा परिणाम झाला. मला सारखे वाटत होते की आपण तो नारळ जोडला म्हणून तर कदाचित ही घटना घडली नसेल ना? कोणास ठाऊक? पण असल्या घटना आपल्या कायमच्या लक्षात राहतात.

**कारवारच्या मुक्कामी अजून एक आठवण**

काका एकदा फिरतीला बाहेर गेले होते. आणि अचानकपणे, ठरलेल्या दिवसाच्या आधी परत आले. त्याचे कारण काकांना सतत उचकीचा त्रास सुरू झाला होता आणि डॉक्टरांना बोलावले. बरेच काही औषधे वगैरे केली पण काही परिणाम होत नव्हता. काकांची उचकी काही केल्या थांबत नव्हती. सततच्या उचकीमुळे काकांना प्रचंड अशक्तपणा आला होता. नंतर एक दोन तीन दिवसात काय झाले कल्पना नाही, पण काकांची उचकी आधी कमी झाली आणि नंतर पूर्णपणे थांबली.

असाच अजून आठवणीत राहिलेला प्रसंग म्हणजे काकांचे एक सहकारी, बहुतेक नाडकर्णी आणि बहुतेक ते अकोला येथे राहात असावेत. त्यांचे दात काढायचे म्हणून ते कारवारला आले होते. हे गृहस्थ आतिशय बावळट म्हणता येणार नाही, पण अतिशय घाबरट होते. यांना दात काढायचे या कल्पनेने, अक्षरशः गर्भगळीत झाले होते.

दात काढताना शेवटी डॉक्टरांनी त्यांच्या नाकासमोर त्यांच्या एका मदतनीसास कांदा धरायला सांगितलं, असे काकांनी नंतर घरी आल्यावर आम्हाला सगळ्यांना सांगितले. हे गृहस्थ नंतर आमच्या घरी दात काढले म्हणून तीन-चार दिवस मुक्कामास होते

आम्ही कारवार मुक्कामी असताना बरेच नातेवाईक मंडळी आमच्याकडे येऊन गेले. त्यापैकी लक्षात राहणारी दोन म्हणजे एक जगदीश मामा जो आपल्या सर्व मित्रांसोबत (माझ्या मते पाच ते सहा मित्र होते) सायकलवरून सांगलीहून कारवारला सहल म्हणून आले होते. तो प्रसंग अजूनही लक्षात आहे. आमच्याकडे कोणी पाहुणे मंडळी आली की माझे एक लिखित काम म्हणजे या सर्वांना कारवारचा समुद्रकिनारा दाखवून आणणे. कधी बरोबर काका यायचे, पण बऱ्याच वेळा मी एकटाच जात असे.

एकदा काय झाले, सुरूमामा आला होता आणि नेहमीप्रमाणे त्याला मी समुद्रकिनाऱ्यावर फिरायला घेऊन गेलो. तेव्हा ती हवा, तो वारा व समुद्राच्या लाटांचा आवाज आणि अतिशय स्वच्छ, सुंदर असा किनारा बघून साहजिकपणे सुरूमामा मला म्हणाला, ''मन्या, काय मजा आहे तुझी? काय धमाल?'' मी एक-दोन मिनिटे काही बोललो नाही. मामा म्हणाला, ''का रे काही बोलत का नाहीयेस?'' म्हटलं, ''खरं सांगू का मामा, मला या समुद्राचा किनाऱ्याचा आणि कारवारचा खरं म्हणशील तर अतिशय कंटाळा आलाय. कधी एकदा काकांची बदली परत धारवाडला होते असे झाले आहे.'' तेव्हा मी सातवीत होतो. नशिबाने लगेच त्या सुट्टीत आमची बदली धारवाडला झाली.

कारवारच्या शाळेतील एक गंमत आठवली ती आता सांगावीशी वाटते. मी बहुतेक सहावीत होतो. माझ्या वाढदिवसाला कोणीतरी मला राजा या एका प्रसिद्ध ब्रँडचे पेन मला भेट म्हणून दिले होते. मी कौतुकाने शाळेत घेऊन जायचं आणि माझे मित्र सहकारी होते त्यांना

मी ते दाखवले होते. एकदा सुट्टीत डबा घेऊन जेवायला गेलो असता परत आल्यावर सहजपणे माझ्या दप्तरातील कंपास बॉक्समध्ये उघडून पाहिले तर माझे पिन गायब झाले होते. लकिली या पेनचा रंग, त्याच्यावर लिहिलेलं नाव, त्याचा सिरियल नंबर वगैरे माझ्या लक्षात होता. मी ताबडतोब आमच्या क्लास टीचर व आमच्या हायस्कूलचे प्रिन्सिपल भेंडे सर यांना जाऊन माझे पेन चोरीस गेले आहे अशी तक्रार नोंदवली होती. यानंतर एक चार-पाच दिवसांनी माझा एक जवळचा मित्र अशाच प्रकारचे पेन घेऊन काही नोटस् लिहीत असताना मी पाहिले. या मित्राने चलाखीने त्याचे टॉप खिशाला आणि बाकी काही एक दोन गोष्टी काढून टाकल्या होत्या, परंतु रंग व त्याच्यावरचा नंबर हा मी बघून खात्री माझी पटली की हे माझेच पेन आहे. मी तडक सरांकडे गेलो आणि त्यांना घडलेली ही घटना सांगितले व क्लास टीचर ताबडतोब माझ्याबरोबर वर्गात आल्या. त्यांनी या मुलाकडील पेन तपासले. त्यांची खात्री पटली आणि मग त्यांनी ते पेन माझे मला परत दिले. माझे त्यांनी खूप कौतुक केले. भेंडे सर आम्ही राहात होतो त्या मास्टर स्वीटमध्येच एखाद दोन बंगले सोडून राहात असत. एकदा काका काही कामानिमित्त बाहेर पडले असताना भेंडे सर त्यांच्या घराच्या बाहेर उभे होते. त्यांनी मुद्दामहून काकांना हाक मारून जवळ बोलावले आणि ही घडलेली घटना त्यांना सांगून त्यांनी काकांना सांगितले, ''तुमचा मुलगा खूपच धीट आहे. मला आवडले या वयात इतका विचार करून किंवा न घाबरता त्याने येऊन मला सांगावे याचे मला खरेच कौतुक वाटले.'' काकांनी घरी आल्यावर ही गोष्ट मला मुद्दाम सांगितली.

कारवार येथे मुक्काम असताना माझ्या घडलेल्या दोन समुद्र प्रवासाचे वर्णन नक्कीच करावेसे वाटले. पहिला होता प्रवास काकांबरोबर कारवार ते मेंगलोर. काकांची पोस्टची एखादी कॉन्फरन्स वगैरे मेंगलोरला होती. मला काकाने विचारले, ''तू येशील का माझ्याबरोबर?'' तर मी



त्वरित 'हो' म्हटलं. मग आम्ही कारवारहून बोटीने मेंगलोरला निघालो.

आम्ही दोघेही बऱ्यापैकी उघडा असतो, म्हणून सर्वांत वरच्या डेकवर झोपायला गेलो. काही वेळानंतर, तेथे इतका प्रचंड वर होता की, पांघरुणासारखे उडू लागले व आम्हाला झोप काही लागेना. आमचा गाशा गुंडाळून खालच्या डेकवर आलो आणि मग झोपलो. मला वाटतं, दोन-तीन दिवस आम्ही मेंगलोरमध्ये होतो. काका सकाळी त्यांच्या कॉन्फरन्ससाठी जायचे जाताना माझ्यासाठी थोडेसे पॉकेटमनी म्हणून पैसे देऊन जायचे आणि सबंध दिवस मी आपला जीव रमवायचो.

असाच बोटीने केलेला दुसरा प्रवास म्हणजे मी आणि आई वरून बोटीने, कारवारहून मुंबईला गेलो होतो. तेव्हा भाऊमामा ठाण्याला राहत होता. आम्ही सिंधिया कंपनीच्या बोटीने कारवारहून मुंबईला गेलो. या प्रवासाला जवळजवळ २४ किंवा थोडे जास्त तास लागले



होते. बोट बऱ्याच जणांना लागली होती. आईलासुद्धा थोडा त्रास झाला. मला नशिबाने अजिबात कुठल्याही प्रकारचा त्रास झाला नव्हता. मी माझा प्रवास अतिशय छान मजेत उपभोगत होतो. बोटीवर अक्षरशः हवं तेथे फिरत होतो. फारच मजेदार अनुभव होता तो. चोवीस तासांनंतर एकदाचे मुंबईला आम्ही पोहोचलो. बोट धक्क्याला लागायला तास दीड तास लागला. ती प्रचंड अशी मोठी बोट दोरीने ओढून ओढून धक्क्याला लावायला लागायची तेव्हा. ही गोष्ट आहे साधारणपणे १९६५ सालची. आम्हाला घेण्यासाठी, आम्हाला उठवून घेणेसाठी, भाऊमामा, सुरूमामा व अविमामा, भाऊंच्या धक्क्यावर आले होते. तेथून आम्ही लोकलने ठाण्याला गेलो. तेव्हाचा लोकलचा प्रवास आणि नंतर मी मुंबईत काम करत असतानाचा लोकलचा प्रवास? म्हणजे १९६५ साली व नंतर १९८४ साली, आणि आताची गर्दी, पाहून त्या काळी, प्रवास खरोखरच खूप सोपा होता असे जाणवते.

या मुंबई भेटीमध्ये आम्ही मुंबईतील बऱ्याच नातेवाइकांना भेटलो दहिसरला गेलो. दहिसरला सदुकाका व निर्मलाकाकू, त्यांची मुलगी पद्मा, निर्मलाकाकूचा भाऊ किरण, रामूकाका व लताकाकू, त्यांची मुले, मीरा, मंगल, मुकुंद व अरविंद, मधूकाका व अरुंधतीकाकू व त्यांची मुले, अभिराम, घनश्याम, अश्विनी आणि ताराआत्या व तिचे यजमान सीतारामपंत-त्यांची मुले शुभा ताई, शशी ताई, शरद, माधव व विनय या सगळ्यांची भेट व्हायची. तसेच डोंबिवलीत काही नातेवाईक होते त्यांना भेटायचो. आमच्या या मुंबईच्या भेटीमध्ये मला एक खेळ आवडला म्हणून घेतला. तो साधारण असा आयताकृती होता. त्याचे थोडक्यात वर्णन म्हणजे एका कोपऱ्यात खाच. या खाचेमागे एक लिव्हर होती. खाचेमध्ये एक काचेची गोटी टाकून ही लिव्हर ताणून लगेच सोडली की, ही गोटी जोरात किंवा वेगाने या खेळाच्या पटावर, घरंगळत जायची व कोठल्या तरी एका जागेच्या अर्क मध्ये अडकल्याची. या अर्कला एक विशिष्ट नंबर असायचा, तो त्या खेळाडूंचा स्कोर

धरला जायचा. असे चार ते पाच वेळा खेळून त्या खेळाडूचा अंतिम स्कोर मनाला जायचा. सुरुवातीला हा खेळ पाहून सर्व मोठ्या लोकांनी माझी खूप चेष्टामस्करी केली, परंतु नंतर त्यांना हा खेळ खूपच आवडला व सर्व मोठी मंडळी हा खेळ खेळू लागली. सुट्टीच्या दिवशी रविवारी माझ्याऐवजी मला सोडून बाकी सगळी मोठी मंडळी या माझ्या खेळाबरोबर खेळू लागली. काही दिवसातच तो खेळ प्रचंड लोकप्रिय झाला. त्याची आठवण मला अजूनही आहे.

या पुस्तकात कदाचित मी आधी नमूद केले आहे त्याचा उल्लेख आता करणार आहे. मी रबर टेक्नॉलॉजिस्ट का झालो? किंवा रबर टेक्नॉलॉजीमध्ये आपली करिअर करावी असे मला का वाटले? त्यासंबंधी एक गंमत आपल्याला सांगतो. एके दिवशी भाऊ मामांनी मला विचारले, ''काय आमच्या फॅक्टरीत येणार का?'' भाऊमामा त्या वेळेस अंधेरीला मोडक रबर या कंपनीमध्ये काम करीत होता. अंधेरीला जाण्याचा मार्ग म्हणजे ठाणे ते घाटकोपर लोकलने जाणे. घाटकोपर होऊन अंधेरीसाठी बेस्टच्या बसेस होत्या. येथे न चुकता नमूद करावेसे वाटते ते म्हणजे बेस्ट (बॉम्बे इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट), खऱ्या अर्थाने सार्वजनिक उत्कृष्ट बससेवा होती. ही १९६५ सालची गोष्ट आहे, आज सुद्धा ती एक भरवशाची व तितकीच छान बस सेवा आहे. याबद्दल बेस्ट कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केलेच पाहिजे. एके दिवशी मी मामाबरोबर वरीलप्रमाणे प्रवास करून मोडक रबरमध्ये गेलो. सबंध दिवस कंपनीत मी होतो. तसं मला मामाने निघताना सांगितले होते की, ''आपण सकाळी गेलो की माझी संध्याकाळी ड्यूटी संपल्यावर आपल्याला निघता येईल तर तुला सबंध दिवस तेथे काढावा लागेल. कंटाळा आला मला जायचंय असं काही म्हणून चालणार नाही.'' मला अजिबात कंटाळा आला नव्हतं. मी सबंध फॅक्टरीमध्ये फिरत होतो. मला सगळे अतिशय आवडलं होतं. माझ्या मते, एखादी फॅक्टरी पाहणे हे माझ्या आयुष्यात तेव्हापर्यंत पहिल्यांदाच घडले होते. संध्याकाळी मामाची

ड्यूटी संपल्यावर आम्ही घरी जाण्यासाठी निघालो. तेव्हा मामाचा एक सहकारी आता नाव आठवत नाहीये, त्याने या 'मोडक रबर'मध्ये बनलेला एक रबरचा बॉल, रंग मात्र आठवतोय काळा होता, मला बक्षीस म्हणून दिला. मग काय विचारता? कारवारला परत गेल्यावर आमच्या घराजवळच्या क्रिकेट टीमचा कॅप्टन मीच झालो. कारण माझ्याकडे बॅट होतीच आणि आता बॉलही आला होता. त्यामुळे कोणाची हिम्मतच नव्हती मला कॅप्टन पदावरून दूर करण्याची. सांगायचा उद्देश या कंपनीच्या पाहणीनंतर आणि तो रबराचा बॉल मला भेट म्हणून मिळाल्यावर कधीतरी माझ्या मनात असे आले असणार की, आपण मोठा झाल्यावर भाऊमामासारखंच रबर टेक्नॉलॉजिस्ट व्हायचं. कदाचित, या फॅक्टरी भेटीमुळे मी मोठा झाल्यावर, माझ्या या करिअर निवडण्याच्या प्रक्रियेसाठी भाऊमामाचे जे योगदान आहे, त्याबद्दल माझ्या मनात आज सुद्धा अतिशय चांगली भावना आहे आणि मी त्याचा कायम ऋणी राहणार आहे.

कारवारची अजून एक आठवण सांगायची म्हणजे एकदा सुरूमामा कारवारला आला होता. आंब्याचे दिवस होते. त्याने आंब्याची एक पेटी आणली. आंब्याची किंमत किती असेल? फक्त सात रुपये. त्याच्या या मुक्कामात त्याने मला बक्षीस म्हणून इंजिनिअरिंग मेकॅनो घेण्यासाठी पंचवीस रुपये दिले होते. माझ्यासाठी ती प्रचंड मोठी रक्कम होती.

कारवारची अजून एक गंमत. हिंदू हायस्कूलमध्ये असताना बहुतेक सहावीमध्ये असेल. आमच्या ॲन्युअल गॅदरिंगमध्ये मी चक्क एक गाणे म्हटलं होते. ते गाणे होते प्रसाद सावकार यांचे गाजलेले, 'जयगंगे भागीरथी'. अगदी व्यवस्थित हातवारे करीत मी ते म्हटले होते, सुदैवाने किंवा दुर्दैवाने ते माझे पहिले व शेवटचे गाणे ठरले ही गोष्ट वेगळी. या गाण्याचे बऱ्याचजणांनी कौतुकही केले होते. हा प्रसंग माझ्यासाठी अगदी वेगळा होता आणि माझ्या शाळेतल्या–कॉलेजमधल्या एकंदर

शिक्षणापैकी मी भाग घेतलेला असा पहिला आणि शेवटचा प्रयोग होता.

हिंदू हायस्कूलमध्ये असतानाची अजून एक आठवण. आमच्या वर्गात गणाचारी नावाचे दोन जुळे मुलगे व एक वर्षाने मोठी त्यांची बहीण असे तिघे जण एकाच वर्गात पाचवी, सहावी, सातवीला होते. यांची नावे आता मला खरे तर आठवत नाहीये, पण आमच्या वर्गात एक मुलगी होती तिचे नाव मात्र मला अजूनही आठवते. ते कदाचित प्रसिद्ध हॉटेलच्या नावाशी संबंधित असल्यामुळे असेल कदाचित. या मुलीचे नाव होते रंजना कामात अतिशय दिसायला छान आणि स्वभावाने वगैरे अतिशय नम्र अशीही मुलगी मला अजूनही आठवते, ते कदाचित कामत या प्रसिद्ध हॉटेलच्या नावामुळे सुद्धा असेल.

कारवारला मी, हिंदू हायस्कूलमध्ये, इयत्ता पाचवी ते सातवी शिकलो. आम्ही या शाळेजवळचा 'नूना मास्टर स्ट्रीट' येथे राहात होतो. आमचे घर म्हणजे एक छोटा सुंदर बंगला होता. अगदी कोकणात असतो तसा. कौलारू छप्पर उंच, कारण पाऊस खूप पडायचा. समोर व्हरांडा व त्याला लाकडी ग्रील. आजूबाजूला खूप मोकळी जागा, नारळाची, सुपारीची, पपनस व इतर अनेक झाडे, मोकळे अंगण.

घरमालकांचा वेगळा बंगला होता. नाडकर्णी हे त्यांचे आडनाव. अतिशय चांगली माणसे. छोटे पण खूप प्रेमळ व सुखी कुटुंब. कुटुंब प्रमुख एक वयस्कर आजी, त्यांना काकी म्हणायचे. त्यांचा एक मुलगा व सून व दोन छोटी मुलं. छोट्या मुलाचे नाव गुरू होते. अतिशय गोड मुलगा होता, त्याच्या बहिणीचे नाव सुगंधा. नावाप्रमाणेच खूप गोड होती.


आमच्या घराशेजारी, अजून एक बंगला होता. तेथे पर्वतीकर नावाचे एक कुटुंब राहात होते. त्यांना चार मुली. सर्वांत लहान होती अन्यी. ती माझी लहानपणची मैत्रीण.


नूना मास्टर स्ट्रीटच्या उजव्या हाताला आम्ही राहायचो. डाव्या

हाताला दुसऱ्या कंपाऊंडमध्ये, पटवर्धन अण्णा राहायचे. तेही पोस्टमध्ये नोकरी करायचे व काकांचे सहकारी होते. श्री. पटवर्धन अण्णा म्हणजेच, श्री. सुमती काकूंचे सख्खे लहान भाऊ. श्री. पटवर्धन अण्णा व श्री. शांता काकूसुद्धा अतिशय प्रेमळ. माझे खूप लाड करायचे. त्यांना त्या वेळी एक छोटी मुलगी होती. तिचे नाव निर्मल.

**रेडिओ लायसन (परवाना)**

सहज जुनी कागदपत्रे चाळत होतो. त्यात हे वडिलांच्या नावावर असलेले पासपोर्ट आकारासारखे दिसणारे रेडिओ परवानाचे पुस्तक सापडले. तेव्हा कळाले की त्या वेळेस रेडिओ ऐकण्यासाठी परवाना काढावा लागत होता आणि परवाना पोस्टात (डाकघर) जाऊन काढावा लागतं असे आणि दरवर्षी पोस्टात जाऊन परवान्याचे नूतनीकरण (renewal) करून घ्यावा लागत असे. १५ रुपयांचे पोस्टाचे तिकीट लावावे लागायचे.



त्या परवाना पुस्तकावर नाव, पत्ता तसेच रेडिओ कंपनी, मॉडेल नंबर, चॅसी नंबर सगळं बरेच काही लिहिलेले पहायला मिळाले.




खूप वर्षे घरी रेडिओ होता. त्या वेळी काही रेडिओसुद्धा चौकोनी आयताकृती असे मोठे असायचे. आता मध्ये काचेच्या बारीक ट्यूबसारखे उभे गोल पार्ट असायचे. खराब होऊन काळे झालेले बदलताना बघायचो. असं बरंच काही...

पण त्या काळी रेडिओ करण्यासाठी परवाना licence काढावं लागत असे. हे आजही कागदपत्रे चाळल्यानंतर कळले. तर त्याबद्दल माहिती घेतली ती येथे शेअर करीत आहे.

**भारतातील रेडिओचा इतिहास**

रेडिओद्वारे प्रसारित करण्यात आलेल्या भारतातील आपत्कालीन माहिती कोणाला विसरता येईल? भारतातील रेडिओचा इतिहास खूप खास आहे! जेव्हा करमणुकीची सर्व साधने देशात उपलब्ध नव्हती, तेव्हा रेडिओ हे लोकांशी संवाद साधण्याचे साधन होते.

पूर्वीच्या काळात लोकांच्या जीवनात रेडिओचे खूप महत्त्व होते. आज आपल्याकडे करमणुकीची अनेक साधने आहेत. अशा परिस्थितीत रेडिओची उपयुक्तता, महत्त्व कुठेतरी कमी झालेले आहे. तथापि, आत्तापर्यंत हे सामान्य लोकांपर्यंत आणि देशातील कोपऱ्यातील प्रसारणाचे स्वस्त साधन आहे. हे ऐकण्यासाठी, ना किंमत द्यावी लागेल की, ना कुणाची परवानगी.

तथापि, एक काळ असा होता की, रेडिओ ऐकण्यासाठी एखाद्याला

'परवाना' घ्यावा लागला! ही काल्पनिक गोष्ट नाही. हे १०० टक्के सत्य आहे. भारतात एक काळ असा होता की, रेडिओ ऐकण्यासाठी परवाना आवश्यक होता.

तर मग जाणून घ्या लोकांना रेडिओ ऐकण्याचा परवाना कधी घ्यावा लागला आणि का? रेडिओने स्वातंत्र्याचे हत्यार बनवले, पण १९२४ मध्ये भारतात रेडिओने पाय रोवला होता. सुरुवातीला त्याचा फारसा उपयोग झाला नव्हता, परंतु १९२७ पर्यंत त्याचा सर्वत्र वापर झाला आणि रेडिओ क्लब ऑफ बॉम्बेने प्रथम प्रसारित केला.

त्या वेळी इंग्रज सरकार रेडिओच्या प्रसाराची काळजी घेत असत. सुरुवातीला काही कंपन्यांनी रेडिओचा व्यवसाय ताब्यात घेतला. तथापि, १९३० पर्यंत या कंपन्या बुडून गेल्या. तर १९३२ मध्ये गुलाम भारत सरकारने प्रसारण सुरू केले आणि त्यासाठी भारतीय प्रसारण सेवा म्हणून स्वतंत्र विभाग तयार केला गेला.

दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिशांना असे वाटले की रेडिओ प्रसारण करून लोकांमध्ये आपल्याविषयी बंडखोरीची भावना वाढली जात आहे. या कारणास्तव, ब्रिटिश सरकारने सर्व रेडिओ प्रसारण परवान्यांचे परवाने रद्द केले आणि सर्व ट्रान्समीटर त्यांच्याकडे जमा करण्याचे आदेश जारी केले. अशावेळी एक हौशी रेडिओ ऑपरेटर नरिमन अबराबाद प्रिंटरने त्याच्या जवळील ट्रान्समीटरचे भाग वेगवेगळे केले आणि ते ब्रिटिशांच्या नजरेपासून लपवून ठेवले.

पण काँग्रेसला हे सर्व माहीत होते. गांधीजी आणि इतरांच्या अटकेनंतर आणि इंग्रजी सेन्सॉरशिपनंतर काँग्रेस नेत्यांनी नरिमन प्रिंटरकडे संपर्क साधला आणि यानंतर मुंबईच्या सी व्ह्यू बिल्डिंगच्या वरच्या मजल्यावर ट्रान्समीटर बसविण्यात आला. तो कार्यान्वित करून २७ ऑगस्ट १९४२ पासून त्यावरून स्वातंत्र्याचा संदेश देण्यात येऊ लागला.

तथापि, त्यानंतर जवळजवळ २ महिने नंतर रेडिओ ब्रिटिशांनी पकडला.

ते लपविण्यासाठी नरिमन प्रिंटर व इतर साथीदारांना चार वर्षे शिक्षा झाली. ब्रिटिश सरकारने रेडिओचे प्रसारण थांबविले. विना परवाना रेडिओ ऐकणे हा गुन्हा आहे!

भारतीय टेलिग्राफ ॲक्ट १८८५ अंतर्गत जारी केलेल्या टपाल विभागाने रेडिओ ऐकण्यास परवानगी दिली. त्या वेळी परवान्याशिवाय रेडिओ ऐकणे हा गुन्हा मानला जात असे. यामध्ये शिक्षा म्हणून वायरलेस टेलिग्राफ कायदा १९३३ अंतर्गत तरतूद करण्यात आली.

घरगुती आणि व्यावसायिक रेडिओ ऐकण्यासाठी दोन प्रकारचे परवाने दिले गेले. दोघांसाठी वेगवेगळे शुल्क होते. त्याचवेळी परवाना पासपोर्टसारख्या पुस्तकासारखा दिसत होता. त्यावर एक वर्षाचा कालावधी असलेल्या टपाल विभागाने टपाल तिकीट लावले होते.

त्या वेळी रेडिओ सिग्नलदेखील खूप कमजोर होते, ज्यासाठी टेलिव्हिजनप्रमाणे छतावर अँटेना देखील स्थापित करावी लागायचा. अशा प्रकारे, इंग्रजांनी रेडिओवर पूर्णपणे आपले राज्य स्थापित केले होते आणि स्वातंत्र्यानंतर सरकारने रेडिओ परवाना फी बंद करून टाकली.

एक काळ असा होता की, रेडिओची लोकप्रियता कमी होऊ लागली. १९८० नंतर, भारतात नवीन करमणुकीच्या माध्यमांमध्ये वेगाने वाढ झाली आणि यामुळे रेडिओ लोकांपासून दूर गेला.

घरात टीव्ही वाढत होते आणि मोठी लोकसंख्या रेडिओपासून दूर जाताना दिसली. तथापि, अद्याप रेडिओचे महत्त्व कमी झाले नव्हते, परंतु हळूहळू तो क्षीण होत चालला होता.

हे ऐंशीच्या आसपासचे असावे, जेव्हा रेडिओ ऐकण्यासाठी फी आणि परवाने पूर्णपणे रद्द केले गेले. यापूर्वी याचा आनंद घेण्यासाठी एखाद्याला किंमत मोजावी लागली. हे ऐकण्यासाठी परवानेही बनविण्यात आले.

रेडिओ ऐकण्यासाठी फी व परवान्याची व्यवस्था संपवण्यामागील

एक कारण देखील होते. कारण ऐंशीच्या दशकाचा काळ जेव्हा टेलिव्हिजनचा ट्रेंड सुरू झाला. त्यामुळे सरकारला एक प्रकारे रेडिओचे अस्तित्व वाचवावे लागले. करमणुकीचे एकमेव साधन म्हणून लोक रेडिओची किंमत देऊन पैसे वाढवत असत. त्याच्याकडे इतर कोणतेही साधन नव्हते. किंमत देऊन रेडिओ ऐकणे ही लोकांची शक्ती होती. या क्षेत्रातील आणखी एक नवीन संसाधन, टेलिव्हिजनच्या साहाय्याने रेडिओला नापसंत होण्याची भीती सरकारला त्रास देऊ लागली होती.

या कारणास्तव, रेडिओवर चोवीस तास चालणारी एफ.एम. सेवा सुरू केली गेली जेणेकरून अधिक मनोरंजन सेवा श्रोत्यांना मोठ्या संख्येने कनेक्ट करू शकतील. रेडिओला एक नवीन ओळख मिळविण्यातही सेवेला यश आले. मोठमोठ्या शहरांमध्ये टॅक्सी, रिक्षा, दुकाने आणि इतर ठिकाणी रेडिओ वाजविण्याचा सूर याचे उदाहरण देतो.

तथापि, सरकारच्या बऱ्याच प्रयत्नांनंतरही टीव्ही आणि इंटरनेट या दोहोंनी प्रथम रेडिओच्या लोकप्रियतेवर मोठा प्रभाव पाडला. बदलत्या काळाबरोबर लोकांचे लक्ष रेडिओवरून हलू लागले. प्रत्येकजण नवीन मार्गांकडे जाऊ लागला. तथापि, असे असूनही, रेडिओ आजपर्यंत आपल्यात कायम आहे. जे ऐकतात त्यांच्यात थोडीशी घट झाली आहे, परंतु तरीही ती आवडली आहे.

१९८० मध्ये सरकारने रेडिओ कर आणि परवाना काढायचे बंद करून टाकले. रेडिओसारख्या कशासाठी तरी परवान्याची गरज आहे याची कल्पनाही कदाचित कुणाला केली असेल. आता आमच्या फोनवर, कारवर आणि आता इंटरनेटवर रेडिओ आहे. तंत्रज्ञान कितीही बदलले, असले तरीही रेडिओचे काम अद्याप तेच आहे. आजही ते स्वस्त दरात लोकांचे मनोरंजन करतात...

■ ■

# ५. सांगलीच्या आठवणी

सांगली शहर कृष्णा नदीच्या काठावर वसलेले आहे. कृष्णा आणि त्याच्या उपनद्या नदीच्या दरीमुळे अनेक सिंचन आणि शेतीविषयक फायदे आहेत जे जिल्ह्याचे आणि शहराचे अर्थव्यवस्था चालवतात. वारणा आणि पंचगंगा सारख्या इतर लहान नद्या कृष्णा नदीत वाहतात.

**इतिहास**

या शहराचे मूळ नाव सहगल्ली–सुरुवातीच्या रस्त्यावरील योजनेचे वर्णन करणारे मराठी शब्द सहा (सहा) आणि गॅली (लेन) – जे नंतर सांगलीला संक्षिप्त केले गेले. सांगली जिल्हा ही अलीकडील निर्मिती आहे, १९४९ साली उशिरा बनली गेली. ती नंतर दक्षिण सातारा म्हणून ओळखली गेली आणि १९६१ साली सांगलीचे नामकरण करण्यात आले. अंशतः काही तालुक्यांचे बनलेले आहे जे एकदा जुने सातारा जिल्ह्याचा भाग बनले आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात, पटवर्धन व राज्यपालांचे काही भाग आणि डाफल्स यांचे विलीनीकरण झाले. कुंडल, सांगलीच्या आसपासचा प्रदेश एकदा चालुक्यची राजधानी होता. कुंडल सुमारे १,६०० वर्षांचा एक प्राचीन गाव आहे. कुंडन्यपुर (त्याचे जुने नाव) कर्नाटकचा एक भाग होते. पुलकेशिने त्यांची राजधानी म्हणून वातीपी (कर्नाटकमधील बदामी) निवडली. शिवाजीच्या काळात,

सांगली, मिरज आणि आसपासच्या भागात मुघल साम्राज्यातून कब्जा करण्यात आला. १८०१ पर्यंत, सांगली मिरज जहागिरीमध्ये समाविष्ट करण्यात आली. १७०१ मध्ये चिंतामणराव पटवर्धन आणि



सांगली गणपती मंदिर

त्यांचे मामा गंगाधरराव पटवर्धन यांच्यातील कौटुंबिक भांडणे झाल्यानंतर सांगली १८८२ मध्ये मिरजपासून विभक्त झाले. १७८२ मध्ये मिरजचा सहावा प्रमुख म्हणून त्यांचे शिशू बंधू गंगाधरराव पटवर्धन यांचा जन्म झाला. चिंतामणराव यांनी सैनिकांना मिरज घुसखोरीची आज्ञा दिली. निजाम आणि टिपू सुलतान यांच्या विरोधात इंग्रजांच्या बरोबरीने मराठा सैन्याने कार्य केले. १८०० मध्ये जेव्हा त्यांनी मिरज येथे परतले तेव्हा त्यांच्या अनेक मोहिमांनंतर आणि बहुमताने पोचल्यावर त्यांना त्याच्या काकावर नियंत्रण मिळण्यास नकार मिळाला. या अवस्थेत घृणास्पद, तरुण भगिनींनी कौटुंबिक मूर्ती ताब्यात घेतली आणि राजवाड्यात प्रवेश केला. १८०१ मध्ये त्यांनी स्वतःला सांगली येथे एका नवीन राजधानीत स्थापन केले आणि तो शक्य तितक्याच आपल्या पितृभूमीवर नियंत्रण ठेवण्याचे ठरविले. पेशवेच्या न्यायालयात ब्रिटिश रहिवाशांनी १८१२ मध्ये कराराच्या अंमलबजावणीस सामोरे जाण्याचा निर्णय घेतल्याशिवाय सातत्याने भांडणे आणि मतभेदांनी लढा देण्याची धमकी दिली. पंढरपूरची संधी औपचारिकरित्या १८१७ मध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मान्यताप्राप्त केली आणि त्यानंतर वेगवेगळ्या करारांनी

**सांगली मॅप**



HEIC १८९१ मध्ये चिंतामणराव यांनी पन्नास वर्षे राज्य केले. दरम्यान, त्यांनी ब्रिटिशांसोबत फार जवळचे संबंध ठेवले. दक्षिण मोहिमांमध्ये त्यांच्या सहभागामध्ये ड्यूक ऑफ वेलिंग्टनशी घनिष्ठ संबंध होता, ज्यांच्याशी त्यांनी दीर्घकाळ मैत्री केली. त्यांनी इतर अनेक मोहिमांमध्ये सेवा दिली, अगदी कंपनीच्या शत्रूंना लढा देण्यासाठी. तथापि, त्याच्या आवडी फक्त सोल्डरिंगपेक्षा अधिक व्यापक होते. त्यांनी उद्योग आणि कृषी यांना प्रोत्साहित केले, धार्मिक बाबींमध्ये रस घेतला आणि एक शतकापेक्षा अधिक काळ ते सर्वसामान्य बनले आणि आंतर-सांप्रदायिक आणि आंतर-विश्वास समजून घेतले. १८५१ मध्ये त्यांचा मृत्यू झाला आणि पन्नास वर्षांचा, सन्मान व आदराने त्यांचा मृत्यू झाला.

धुंडिराजराव आपल्या वडिलांना केवळ शासक म्हणूनच नव्हे, तर त्यांच्या वडिलांनी सुरू केलेले चांगले कार्य पुढे चालू ठेवले. तथापि, त्यांनी शिक्षण, विद्यालय, महाविद्यालये आणि व्यावसायिक संस्थांचे निर्माण करण्यामध्ये रस घेतला. हा विविध कृषी उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे आज सांगली जागतिक हळद व्यापाराचे केंद्र आहे, आशियातील सर्वांत मोठी साखर रिफायनरी आहे आणि भारतातील द्राक्षाच्या उत्पादनासाठी ही एक महत्त्वाचे केंद्र आहे. सात विवाह असूनही, त्याने केवळ दोन मुलींना कामावर घेतले. उत्तराधिकाऱ्यांना ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून निवडलेल्या दूरच्या नातेवाईकांकडे सोडण्यात आले आणि त्यांच्या ज्येष्ठ विधवांनी दत्तक घेतले.

विनायकराव चिंतामणराव, जो दत्तक घेण्यावर चिंतामणराव धुंडिराजराव म्हणून यशस्वी ठरले, त्यांचे दोन लोकांपेक्षा कमी प्रतिष्ठित नव्हते. त्यांनी साठ वर्षे राज्य केले. या काळात त्यांनी आपल्या लोकांच्या भौतिक, शैक्षणिक, आध्यात्मिक आणि राजकीय विकासामध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा केली. त्यांनी औद्योगिक आणि कृषी विकासास अभूतपूर्व प्रमाणात प्रोत्साहन दिले, यामुळे त्या क्षेत्रामध्ये त्याचे छोटेसे राज्य बनले. कला, विज्ञान, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय

महाविद्यालयांच्या स्थापनेसह अनेक क्षेत्रात शैक्षणिक सुविधा विस्तारित करण्यात आली. राज्य बँकेच्या पायाभूत सुविधांद्वारे भांडवलात प्रवेश, ज्यामुळे गरीब शेतकरी आणि उद्योजकांकडून निधी उभारण्यास मदत झाली. स्थानिक आणि राज्य पातळीवरील प्रतिनिधींनी लोकशाहीच्या वाढीस प्रोत्साहन दिले. त्यांनी चेंबर ऑफ प्रिन्सेस, लंडनमधील भारतीय गोलमेज परिषदेच्या कार्यात आणि भारतासाठी संघीय संरचना तयार करण्यासाठी स्थापित समितीवर युद्ध प्रयत्नांना समर्थन देण्यासाठी सक्रिय भाग घेतला. १९४७ मध्ये ब्रिटिश आणि गांधी यांचे मित्र म्हणून त्यांनी उत्साहपूर्वक आश्वासन दिले आणि १९४७ मध्ये डोमिनियन इंडियामध्ये प्रवेश केला आणि नंतर त्याचे राज्य मुंबईसह विलीन केले. राजा विजयसिंहराव पटवर्धन १९६५ मध्ये त्यांचे आजोबा झाले. १८४२ मध्ये 'सीता स्वयंवर' नावाचे पहिला मराठी नाटक पटवर्धन राजवाड्या मध्ये झाले होते.

माझा जन्म सांगली येथे दिनांक १५ डिसेंबर १९५३ मध्ये झाला. पहिले नातवंड आणि तेही एक मुलगा त्यामुळे बालपणी माझे माझ्या आजोळी खाडिलकर घराण्यामध्ये अमाप कौतुक झाले.

सांगली शहरतील गावभाग नावाच्या भागात, माकडशिंगी पोलीस चौकी नजीक कृष्णा नदीच्या काठाजवळ, तीन खाडिलकर वाडे होते. यातील मधला वाडा म्हणजेच माझे आजोळ. दहावीच्या परीक्षेपर्यंत, दर उन्हाळ्याच्या सुट्टीत, मी आईबरोबर सांगलीला येत असे. सांगलीला दोन कुटुंबे अनेक वर्षं एकत्र राहिली. मोठे भाऊ नारायणराव लक्ष्मण खाडिलकर व त्यांच्या पत्नी यशोदा खाडिलकर (आईचे काका व काकू), व पुरुषोत्तम लक्ष्मण खाडिलकर व

**सांगली रेल्वे स्टेशन**



खाडिलकर वाडा



खाडिलकर वाडा प्रवेशद्वार





त्यांच्या पत्नी रमाबाई खाडिलकर (आईचे वडील व आई). नारायणराव (आम्ही सर्व जण त्यांना मामा म्हणायचो) व पुरुषोत्तम (आप्पाकाका) यांची मोठी बहीण लक्ष्मीबाई परांजपे याही आयुष्यभर या दोन भावांच्या बरोबर राहिल्या. दुर्दैवाने अगदी तरुणपणी त्यांना वैधव्य प्राप्त झाले. खरे तर हा वाडा, त्यांच्याच मालकीचा, परंतु अगदी उदार मानाने त्यांनी तो दोन्ही भावांना देऊन टाकला व स्वतःही आयुष्यभर बरोबर राहिल्या.

पुरुषोत्तम लक्ष्मण खाडिलकर व त्यांच्या पत्नी रमाबाई खाडिलकर या दांपत्याला पाच मुले, त्यात माझी आई सर्वांत मोठी- लीला, नंबर दोन- गणेश (भाऊ मामा), नंबर तीन- लक्ष्मण (अविनाश), नंबर चार- सुरेश, नंबर पाच- जगदीश.

नारायणराव लक्ष्मण खाडिलकर व त्यांच्या पत्नी यशोदा खाडिलकर

**महादेव देऊळ, सांगली**



या दाम्पत्याला तीन मुली झाल्या, परंतु दुर्दैवाने त्या तिघीही अल्पवयात मरण पावल्या. नारायणराव लक्ष्मण खाडिलकर हे त्या काळचे, M.A. B.T. अतिशय हुशार, उत्तम बुद्धिबळपटू. राष्ट्रीय पातळीवर, अनेक बक्षिसे जिंकली होती. परंतु त्या काळी, त्यांना म्हणावे अशी संधी मिळाली नाही, ते म्हणजे केवळ ब्राह्मण असल्यामुळे. मामाचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे, सांगली येथे, खास मुलींच्या शालेय शिक्षणासाठी, त्यांनी कन्या शाळेची स्थापना केली व शेवटपर्यंत या शाळेसाठी झटत राहिले.

पुरुषोत्तम लक्ष्मण खाडिलकर हेही त्या कालचे, B.A. B.T. अतिशय हुशार, उत्तम बुद्धिबळपटू. राष्ट्रीय पातळीवर अनेक बक्षिसे जिंकली होती, परंतु त्या काळी, त्यांनाही म्हणावे अशी संधी मिळाली नाही, ते म्हणजे केवळ ब्राह्मण असल्यामुळे.

माझा जन्म याचा वाड्यात, १५ डिसेंबर १९५३ साली पहाटे झाला. अनेक वर्षांनी खाडिलकर घराण्यात तिसऱ्या पिढीची सुरुवात व तीसुद्धा, एक मुलगा म्हणून, बालपणी



**अप्पा काका, मोठी आई, मामा व मामी**

माझे प्रचंड लाड झाले. माझा बुद्धिबळ शिकण्याचा श्रीगणेशा येथेच एका सुट्टीत झाला, मामी व मोठी आईने मला बुद्धिबळ शिकविलं व काहीच दिवसांत मी त्या दोघींना हरवू लागलो.

सुट्टीतील सांगली मुक्कामी, माझे एक आवडते काम म्हणजे, दळण आणणे व किराणा सामान आणणे. या दोन्ही कामांत माझा फायदा असा असायचा की, त्या निमित्ताने मला मामाची सायकल चालवायला मिळायची व या कामाबद्दल, मामी किंवा मोठी आई मला, चार आणे बक्षीस द्यायची. शिवाय किराणा दुकानाचे मालक राजा पाटील, दरवेळी मला एक चॉकलेट मोफत द्यायचे.

थोडा मोठा झाल्यावर, अजून एक आकर्षण म्हणजे, सांगलीत मे महिन्यात नूतन बुद्धिबळ मंडळतर्फे बुद्धिबळ स्पर्धा भरविली जात असे. भारतातील एकापेक्षा एक गाजलेले बुद्धिबळपटू येथे भाग घेत. हे सामने पाहणे म्हणजे एक पर्वणी असे. हे सामने पाहून परत घरी येताना, प्रतापसिंह उद्यानात, खास सांगलीच्या भडंगाची भेळ खाणे, हा जणू नित्य नेम. अर्थात, यासाठीचे आर्थिक अनुदानकर्ते म्हणजे, मामी किंवा मोठी आई.

■ ■



**भाऊ मामा, मामी, सुरूमााम, अविमामा**


मोठी आई, अप्पा काका, मामा, मामी


मामा, मामी आणि मोठी आई


उर्मिला मामी, सुनंदा मावशी, सुधा मावशी,  आई

अविमामा, विभूषा व मी




शैलजा मामी, प्रथिता मामी, उर्मिला


विभा व खाडीलकर फॅमिली


सांगलीचा पूल


सांगलीच्या सांबाच्या देवळातील लघुरुद्र


अनु, राहूल, रुपाली, विभूषा

## ६. दावणगिरीच्या आठवणी

हे दक्षिण भारतातील कर्नाटकच्या मध्यभागी एक शहर आहे. हे राज्यातील सातवे सर्वांत मोठे शहर आहे आणि नामांकित दावणगिरी जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय आहे. आतापर्यंत एक कापूस केंद्र म्हणून आणि म्हणून कर्नाटकचे मँचेस्टर म्हणून ओळखले जाते. शहराच्या व्यावसायिक उपक्रमांमध्ये आता शिक्षण आणि कृषी–प्रक्रिया उद्योगांचे प्रभुत्व आहे.

१९९७ मध्ये प्रशासकीय सुविधेसाठी चित्रदुर्गच्या पूर्वी अविभाजित जिल्ह्यातून वेगळे झाल्यानंतर दावणगिरी स्वतंत्र जिल्हा बनला. दावणगिरी समृद्ध पाक परंपरांसाठी प्रसिद्ध आहे, ज्यामध्ये संपूर्ण कर्नाटकच्या व्यंजनांच्या विविधतेचा समावेश आहे, कारण राज्यातील भौगोलिक स्थितीमुळे त्याचे केंद्रबिंदू आहे. त्यांच्यातील उल्लेखनीय असे सुगंधित बोन डोस आहे जे शहराच्या नावाशी संबंधित आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी फ्लॅगशिप स्मार्ट सिटीज मिशनच्या अंतर्गत स्मार्ट शहराच्या रूपात विकसित होणाऱ्या शंभर भारतीय शहरांमधून दावणगिरी निवडले गेले आहे. शहरी विकास मंत्रालयाद्वारे २८ मार्च २०१६ रोजी हाती घेतलेल्या या मिशन अंतर्गत विकसित होणाऱ्या पहिल्या २० शहरांच्या यादीमध्येही या चित्रपटाचा समावेश करण्यात आला.

■ ■

## ७. काकांना मुले किती आवडायची?



यांचे अजून एक गमतीदार उदाहरण म्हणजे रट्टीहल्लला ब्रँच पोस्टमास्तर असताना त्यांनी पोस्ट ऑफिसमध्ये चक्क एक बरणी चॉकलेटने भरून ठेवलेली असायची. शाळा सुटायच्या वेळेस ते बाहेर उभे राहायचे आणि येणाऱ्या मुलांना जवळ बोलावून त्यांच्या गमती करून, त्यांना काहीतरी नवीन गोष्टी सांगून ऑफिसमध्ये बोलावून घ्यायचे. प्रत्येकाला चॉकलेट द्यायचे. काका गेल्यानंतर कळले.



काका या मुलांचेना किती प्रिय होते याचे एक उदाहरण तुम्हाला देतो. काका गेल्यानंतर मुलांना कळले की, आठवले पोस्टमास्टर आता आपल्यात नाहीत ते रात्री

अपघाती निधनाने पडद्याआड गेले आहेत. मुलांना हे सहन झाले नाही. दुसऱ्या दिवशी ही मुलं शाळेत गेली नाहीत. माझ्या मते, याच्यापेक्षा मोठी ती श्रद्धांजली काय असावी? लहान मुलांना वाटले की, आज आपण शाळेत जायचे नाही, ही काकांवरील त्यांच्या प्रेमाची पावतीच नाही का?

■ ■

## ८. पाऊसपाण्याच्या काही आठवणी

पाऊसपाण्याच्या काही आठवणी. ही घटना आहे साधारण १९८९ सालची. या वर्षी रायगडमध्ये जांभुळपाडा येथे जगबुडी नदीला आलेला प्रचंड पूर आला होता. त्याचे कारण होते ढगफुटी. बारा एक तासात इतका प्रचंड पाऊस पडला की, बोलायची सोय नाही.

मी आणि भाऊ जोशी सकाळी नेहमीप्रमाणे पालघरला जाण्यासाठी निघालो. वाटेत सगळीकडे प्रचंड पाऊस होता. Hardilia केमिकल्स येथे बऱ्यापैकी पाणी जमलेले होते. आम्ही सायन हॉस्पिटलजवळ सकाळी पावणेसात वाजता पोहोचलो. जवळजवळ गुडघ्याएवढे पाणी तुंबले होते. माझे आणि भाऊ जोशीच्या लक्षात आले, या पुढे दादरला जाण्यात काही अर्थ नाहीये. सर्व रेल्वे गाड्या बंद पडल्या असणार. आम्ही चक्क बसमधून उतरलो, रस्ता क्रॉस केला आणि सायन–पनवेलकडे निघालेल्या दिशेने जाणाऱ्या बसमध्ये बसलो. आठसाडेआठ वाजता पनवेलला पोहोचलो. सगळीकडे पाणी तुंबले होते. पनवेलमध्ये घरी गेलो. तेव्हा आम्ही पायोनियर सोसायटीमध्ये तळमजल्यावर राहात होतो. घरात जवळपास गुडघाभर पाणी आलेले होते. आई व विभूषा (तेव्हा तीन वर्षांची असेल) घरी होते. विभूषाला आणि आईला पलंगवर बसविले. नंतर बघतो तर काय पावसाच्या पाण्याबरोबर एक

साप घरी आला होता. त्या सापाला पकडून घराबाहेर टाकले. व्यवस्थित दार लावून घेतले आणि पाऊस थांबायची वाट बघत बसलो. बऱ्याच वेळानंतर पाऊस थांबला.

१९८९ सालचा तो पूर म्हणजे एक केवळ आश्चर्य किंवा धक्कादायक घटना होती. याआधी कधी रायगड जिल्ह्यात असा पूर आलेला नव्हता. आमच्या पनवेलच्या घराजवळ गद्रे नावाचे एक वकील राहात होते. त्यांचे जांभुळपाडा येथे वडिलोपार्जित घर होते. पूर्णपणे मातीचे होते. त्या दिवशी जसं पाणी साठू लागले तसे गावातल्या लोकांनी वकिलांना बऱ्याच वेळा येऊन सूचना दिली. 'तुम्ही घरी थांबू नका, पाण्याची पातळी फारच वाढी आहे, तरी कृपया बाहेर पडा' अशी विनंती केली. या वेळेस काही तरी वेगळंच घडतेय असे सांगितले. पण गद्रे वकिलांनी काही ऐकले नाही व घरीच बसून राहिले. शेवटी प्रचंड पूर आला व त्यांचे घर वाहून गेले. त्यांचा काही पत्ता लागला नाही. नंतर एक-दोन दिवसांनी त्या पडलेल्या घराच्या मागे त्यांचे प्रेत सापडले.

पायोनियर सोसायटी या भागातल्या सर्व लोकांत एक प्रकारची हळहळ व्यक्त होत होती. याच संबंधीची अजून एक आठवण म्हणजे सुरूमामा पनवेलला एक्झिक्युटिव्ह इंजिनियर असताना त्याचा एक कॉन्ट्रॅक्टर बसप्पा रायगड जिल्ह्यात धरणांची वगैरे बरीच कामे करीत असे. तो नेमका या दिवशी याच रायगड जिल्ह्यात कुठेतरी होता. जसे पुराचे पाणी वाढू लागले तसा तो एका झाडावर चढून बसला. जवळपास रात्रभर त्याला त्या झाडावर मुक्काम ठोकावा लागला होता. अतिशय भयानक अशी परिस्थिती होती. हे केवळ एका अचानक ढगफुटीमुळे झाले होते. आठ ते दहा तासात जवळपास तीस-चाळीस इंच पाऊस पडून गेला होता.

असाच एक पावसाळा कायमचा लक्षात राहिला. तो म्हणजे ३१ जुलै १९७८. दुर्दैवाने याच दिवशी काकांचे अपघाती निधन झाले. आम्ही पनवेलहून रात्री दहा वाजता आमच्या शेजारी सालढाणा साहेब यांच्या गाडीने खोपोलीपर्यंत गेलो. खोपोलीला सुरूमामाचा एक कॉन्ट्रॅक्टर

बसप्पा यांच्या गाडीने पुढे साठी रवाना झालो. गाडी चालवायला सुरूमामाचा ड्रायव्हर सिप्पी हा होता. वाटेत आम्ही वसंतकाकांना, पुण्यातून त्यांच्या घरून बरोबर घेऊन पुढे रवाना झालो. रट्टिहल्लीला दुसरे दिवशी दुपारी पोहोचलो. जवळपास दुपारचे तीन वाजले होते व पाऊस एकसारखा पडताच होता.

असाच एक लक्षात राहणारा पावसाळा म्हणजे मुंबई सेंट्रलला मी अविमामाच्या घरी गेलो होतो. त्या दिवशीसुद्धा प्रचंड पाऊस पडत होता. ही साधारण १९७४ सालची गोष्ट असावी. मराठा मंदिर येथे जवळपास कमरेइतके पाणी भरले होते. त्या पाण्यातून वाट काढत मी अविमामाच्या घरी पोहोचलो. नशिबाने त्या पावसाळ्याच्या आधीच अविमामाने तळमजल्यावरील घर बदलून दुसऱ्या मजल्यावर घेतले होते. त्यामुळे घरी राहता आले. तळमजल्यावरील सर्व लोकांनी आपल्या वरील मजल्यावरती आसरा शोधला होता. जवळपास रात्रभर पुराचे पाणी साठलेले होते.

१९८२ साली, एकदा एका पावसाळ्यात मी विलेपार्लेला गेलो होतो. माझा सुट्टीचा दिवस होता. आप्पांनाही सुट्टी होती. प्रथिता व आईपण घरी होत्या. आप्पांच्या मनात आले की, आपण आता गरम गरम बटाटेवडे घेऊन यावे. त्या पावसात मी आणि आप्पा छत्री घेऊन पार्ले स्टेशन जवळील एका ठरावक वडापाव गाडीवाल्याकडे गेलो. रस्त्यावर पाणी साठलेले होते. त्याची फिकीर न करता आम्ही तिथे गेलो. गरम-गरम बटाटेवडे बांधून घेतले व घरी जाऊन मनसोक्त खाल्ले.

असाच एक पावसाळा लक्षात राहील असा म्हणजे मी पद्माच्या लग्नासाठी दहिसरला गेलो होतो. पहाटेपासून प्रचंड पाऊस पडत होता. थांबायचं नाव घेत नव्हता. नशिबाने पद्माचे लग्नचे कार्यालय बोरिवली येथे असल्यामुळे आम्ही कार किंवा रिक्षाने लग्नासाठी हॉलवरती जाऊ शकलो. लग्न व्यवस्थित पार पडले. तो दिवसही लक्षात राहण्याजोगा होता.

■ ■

# ९. माझ्या प्रवासाच्या काही आठवणी

**बसचा प्रवास**

लहानपणी बसने प्रवास करताना माझे लक्ष सतत, ड्रायव्हरवर असे. इच्छित ठिकाणी पोहोचलो की ड्रायव्हर कसा होता हे न विसरता मी सर्वांना सांगत असे.

लहान असतानाचा एक कधीही न विसरणार प्रवास म्हणजे, सांगली ते रत्नागिरी, उत्तम पटवर्धनच्या लग्नासाठी. हा प्रवास लक्षात राहण्याचे कारण म्हणजे, कै. श्री. गोपाळ गोडसे हे होय. श्री. गोपाळ गोडसे हे उत्तमचे सख्खे मामा. हे गोष्ट साधारणपणे १९६०-६२ सालची असावी. त्या वेळी ते तुरुंगात कैदेत होते. सख्ख्या भाच्याच्या लग्नासाठी पॅरोलवर त्यांची काही दिवस सुटका झाली होते. पॅरोलवर असल्यामुळे कायम दोन पोलीस बरोबर असत. हे पोलीस त्यांची छोटी मोठी कामेसुद्धा अगदी सहज करीत, हे सर्व पाहून मला एक प्रकराची भीती, कुतूहल व आश्चर्य वाटत असे.

रबर टेक्नॉलॉजीसाठी, कळंबोली ते सेंच्युरी मिल्स, प्रभादेवी, मुंबई माझा प्रवास पनवेल ते सेंच्युरी बाजार, प्रभादेवी १९७५-७६ सालचा. मी रबर टेक्नॉलॉजी डिप्लोमा करण्यासाठी आठवड्यातून तीन वेळा पनवेलहून प्रभादेवीला जात असे. या काळात ठाणे खाडी पूल अगदी नवीन झाला होता व वाहतुकीस खुला झाला होता, परंतु

कळंबोली आमची कंपनी होती जेथे मी नोकरी करत होतो तिथे परगावाहून येणाऱ्या मुंबईकडे जाणाऱ्या बसेस थांबत नसत. त्यामुळे कळंबोली ते मुंब्रा बसने प्रवास व मुंबईहून दादरपर्यंत लोकलने प्रवास असा आठवड्यातून तीनदा होत असे. आमचा क्लास संध्याकाळी सहा ते आठ या काळात असे आणि त्यासाठी मला पनवेल घेऊन जवळपास साडेतीन वाजता निघावे लागायचे. सहापर्यंत मी इंडस्ट्रीज मनोर या बिल्डिंगमध्ये सिंथेटिक अँड केमिकल्स या कंपनीच्या लॅबोरेटरीमध्ये आमचे क्लासेस रबर इंडस्ट्रीमध्ये नावाजलेले बरेच मोठे टेक्नॉलॉजिस्ट आम्हाला शिकवायला येत असत. त्यातील काही नावे जी मला आता आठवतात ती म्हणजे पंडित साहेब नोकरी करत होते, डॉक्टर अरविंद घाग जय मनसेमध्ये काम करत होते, मित्र नायक जे एका रबर इंडस्ट्रीजमध्ये मुंबईत कामास होते. नंतर कवीश्वर जे ठाण्याहून यायचे. आणि ज्यांचा फिक्समध्ये हातखंडा होता तसेच डब्ल्यू. जी. देसाई किंवा मंडळ देसाई हेसुद्धा ठाण्याहून लेक्चर घेण्यासाठी यायचे या सर्वांत अतिशय विद्वान, खुशाल व कधी एखादी छोटीशीच सुद्धा नोट किंवा कॉपी बरोबर न ठेवता तासन्तास लेक्चर देणारी एकच व्यक्ती आणि ती म्हणजे पंडित साहेब. पंडित साहेब हे स्वभावाने अतिशय मृदू, नम्र आणि कायम समोरच्या मुलांना काहीतरी कळते अशा समजुतीचे. अतिशय हुशार आणि रबर टेक्नॉलॉजी मध्ये मुरलेले असे हे पंडित साहेब यांची लेक्चर्स आम्ही कधीच चुकवायचो नाही. ते राहायचे ठाण्याला. संध्याकाळी ठाण्याच्या बंगल्याच्या आवारातील बागेमध्ये नित्यनेमाने काम करीत असत. कित्येक वेळा मी ठाण्याला त्यांच्या बंगल्यात त्यांची परवानगी न घेता काही शंका किंवा प्रश्न घेऊन त्यांना भेटावयास गेलेलो आहे. प्रत्येक वेळेस त्यानी माझे चांगले स्वागतच केले. या माणसाला मी कधीच रागावलेलं पाहिलं नाही.

कालांतराने पुणे येथे रहावयास आल्यावर एकदा मला योगा क्लासमध्ये त्यांचे चुलत भाऊ भेटले व पंडितसाहेब पुण्यातच राहतात सिंहगड रोडला राहतात, असे कळले. मी त्यांच्या चुलत भावाकडून त्यांचा पत्ता घेतला आणि मुद्दाम त्यांच्या घरी जाऊन भेटून आलो. पंडित साहेबांना या गोष्टीचा अतिशय आनंद झाला.

पंडित साहेबांसारखेच कायम लक्षात राहणारी अजून एक व्यक्ती म्हणजे डॉक्टर अरविंद. ते भाऊमामाचे व्यक्तिगत मित्र त्यामुळे पनवेलला ते बऱ्याच वेळा घरी येत असत. डॉक्टर म्हणजे एक अतिशय दिलखुलास व्यक्तिमत्त्व अतिशय हुशार, हजरजबाबी व अतिशय चांगल्या स्वभावाचे. येता जाता त्यांचे केलेले विनोद मला अजूनही आठवतात. खूप छान मैत्री होती आमची खूप छान मार्गदर्शन त्यांच्याकडे आम्हाला मिळाले.

या प्रमाणेच अजून एक लक्षात राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे वामनराव देसाई हे ठाणे येथे राहायचे. भाऊमामाचे व त्यांचे बंड अतिशय जवळचे संबंध होते. आम्ही बराच वेळ वामनरावांना भेटायला त्यांच्या ठाण्याच्या घरी गेलो होतो. वामनराव म्हणजे एक अतिशय स्ट्रेट फॉरवर्ड माणूस. त्यांच्या कामामध्ये अतिशय निष्णात. रेक्लेम रबर तयार करणे हा त्यांचा हातखंडा. असे बरेच प्रकल्प त्यांनी भारतात आणि परदेशात स्थापन केले. त्यांच्या घरीसुद्धा कधी गेलो तर आता हा माणूस का आलाय असं कधी त्यांना वाटलं नाही. त्यात अशी त्यांची जाणीव करून दिली नाही आणि काही अभ्यासाविषयी तर काही माहिती हवी असेल तर ती कायम ते देत असत.

प्रभादेवी येथील आमचा क्लास रात्री आठ वाजता संपला की प्रभादेवीहून बीएसटीच्या बसने दादर. दादरहून लोकलने मुंब्रा व मुंब्र्याहून बसने पनवेल असा माझा प्रवास घडत असे. पनवेलला पोहोचायला रात्री साडेदहा ते अकरा वाजत. बऱ्याचवेळा जेवायची सुद्धा शक्ती नसायची. प्रवासातच काही थोडेफार खाऊन कधी एकदा घरी पोहोचतोय आणि झोपतोय असे व्हायचे. असे आठवड्यातून तीन दिवस आणि जवळपास दोन वर्ष आम्ही क्लासेस केले. दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत एक महिना इन्टेन्सिव्ह ट्रेनिंग कोर्स आयोजित केला जायचा आणि जवळजवळ ९० टक्के हा कोर्स पंडित साहेब स्वतः एकटे आयोजित करायचे. काही वेळा कवीश्वर साहेब पण क्लासेस घ्यायचे. मी आधी नमूद केल्याप्रमाणे पंडित साहेब आमच्या रबर टेक्नॉलॉजीच्या क्लासमध्ये दोन महिने आम्हाला इतकी उत्कृष्ट ट्रेनिंग देते, पण स्वतःला चहाचंसुद्धा व्यसन नाही.

आमचा इन्टेन्सिटी ट्रेनिंगचा क्लास सकाळी साधारणपणे नऊ

वाजता सुरू होई. तो थेट संध्याकाळी साडेपाच-सहा वाजेपर्यंत चाले. मध्ये एक तास जेवणाची सुट्टी. या दोन महिन्यांच्या कालखंडामध्ये पंडित साहेबांनी एकदा सुद्धा काही नोटस् बरोबर आणल्या आहेत आणि ती बघून त्यांनी त्यांचे लेक्चर आम्हाला दिले हे मला आठवत नाही सगळं काही त्यांना जवळजवळ तोंडपाठ असल्यासारखे होते आणि हे ट्रेनिंग मला रबर टेक्नॉलॉजिस्ट बनवण्यात खूप अंशी कारणीभूत ठरलेले आहे. त्यामुळे पंडित साहेबांची आठवण ती कधी न पुसता येण्यासारखी आहे.

**पनवेल ते मुंब्रा, पुढे J & J साठी**

मला १९८४ मे महिन्यामध्ये जॉन्सन अँड जॉन्सन, परमासेल, इंडस्ट्रियलटेप्स, डिव्हिजनमध्ये नोकरी मिळाली. हा एक विलक्षण योगायोगच होता टाइम्स ऑफ इंडिया मध्ये जॉन्सनची जाहिरात मी पाहिले त्यांना एक रबर टेक्नॉलॉजिस्ट हवा होता. माझे ज्ञान अतिशय मर्यादित होते. मला दोन-तीन प्रकारची माहीती होती. एक म्हणजे इन्सुलेशन टेप, दुसरी म्हणजे मेडिकल आणि तिसरी म्हणजे पॅकिंग लागणारे टीप. माझे पाच इंटरव्ह्यू झाले व कुठलाही वशिला किंवा ओळखपाळख नसताना केवळ रबर टेक्नॉलॉजी केलं होतं म्हणून मला ही नोकरी मिळाली. मी विचार करत होतो की, या कंपनीमध्ये रबर टेक्नॉलॉजी केलेल्या माणसाचे काय काम असावे बरे, पण नंतर विचार केला, जाऊ दे आपल्याला काय करायचंय एका माहिती नॅशनल कंपनीमध्ये नोकरी मिळते हे काय कमी आहे का? तीही अतिशय चांगल्या पगारावर. जॉन्सनमध्ये नोकरी मिळण्याआधी माझा महिन्याचा पगार होता रुपये तीनशे. जॉन्सनमध्ये मला सुरुवातच ३८०० रू.ने सुरू झाली म्हणजे जवळपास एका वर्षात मला जे पैसे पगार मिळत होते आधी ते मला प्रत्येक महिन्यात मिळणार होते. काका गेल्यानंतर माझ्या डोळ्यात पहिल्यांदा पाणी आले होते दुसऱ्यांदा डोळ्यात पाणी आले ते ज्या दिवशी जॉन्सनची अपॉईंटमेंट ऑर्डर माझ्या हातात पडली त्या दिवशी. मला आठवते ११ मे ८४ रोजी मी जॉन्सनला जॉईन झालो त्याच दिवशी संध्याकाळी बाहेर बस स्टॉपवर आल्यावर

माझ्या लक्षात आले की खरंच एका रबर टेक्नॉलॉजिस्टची गरज जॉन्सनमध्ये होती, कारण १९८४ साली आम्ही जो जवळ दीडेकशे प्रकारच्या बनवत होतो त्यातल्या जवळजवळ ७५ प्रकारच्या या रबर वापरून केलेल्या असून मी जॉईन होण्याआधी रबर बनवण्यासाठी एक ठरावीक असा सुपरवायझर नव्हता. माझ्याकडे ते काम आले. पुढील महिन्यातील कार्यक्रम बघून त्याप्रमाणे सर्व रॉ मटेरियलची व्यवस्था करून ठेवणे हे माझे काम.

आमची फॅक्टरी सफेद पूल साकी नाक्या जवळ होती. मी पनवेलहून बसने मुंब्रा व मुंबई ते घाटकोपर लोकलने जात असे. घाटकोपरला आमचे स्टाफ बस येत असे. जर चुकले तर रिक्षाने किंवा बेस्टच्या बसने जावे. मी साधारणपणे सकाळी सहा-सव्वा सहाला पनवेलहून बाहेर पडत असे. आठ वाजता माझी ड्यूटी सुरू होत असे. त्या काळी मुंबईतल्या लोकांना पनवेल म्हणजे प्रचंड लांब असे वाटत असे. माझे घर ते जॉन्सनची फॅक्टरी हे अंतर जवळपास ४८ ते ५० किलोमीटर होते म्हणजे तसे फारसे नव्हते, परंतु वाहतुकीची सोय म्हणावी तशी नसल्यामुळे ते खूपच लांब वाटत असे. संध्याकाळी साडेसहा वाजता ड्यूटी संपली की सफेद पूल बसस्टॉपवर उभे राहणे, बसने घाटकोपर स्टेशनला जाणे व घाटकोपरवरून लोकलने मुंबईला जाणे, नंतर मुंबईवरून बसने पनवेलला जाणे हा माझा दिनक्रम असे. घरी यायला जवळपास आठ ते साडेआठ वाजत असत. असे मी जवळपास अडीच वर्षं केलं. अधूनमधून कधीतरी विलेपार्लेला आई आप्पांच्याकडे मुक्कामास जात असे. अधून-मधून दहिसरला सदूकाकांच्याकडेही जात असे.

जॉन्सनमध्ये आम्हाला शनिवारी साप्ताहिक सुट्टी असायची व रविवारी अर्धा दिवस सुट्टी असायची. त्यामुळे बऱ्याचवेळा रविवारी मी माझी अल्विन पुष्पक हीच कुठे घेऊन जात असे. कारण एक वाजता ड्यूटी संपली की तासाभरात मी घरी पोहोचत असे. बस किंवा लोकलने जाण्या-येण्यात कमीत कमी दोन ते अडीच तास लागत असे. तर तेवढाच वेळ वाचवायचा म्हणून आणि स्कूटर चालवायची आवड म्हणून रविवारी मी बहुतेक स्कूटरने जात असे

## पनवेल ते दादर, पुढे पालघरसाठी

१९८७ साली मला हायटेक टिप्स प्रायव्हेट लिमिटेड, पालघर येथे फॅक्टरी मॅनेजर म्हणून नवीन नोकरी मिळाली. हा कारखाना संपूर्णपणे नवीन होता त्यामुळे अगदी सुरुवातीपासून सगळे काम येथे करायची संधी मिळाली. सुरुवातीला सहा महिने मी पनवेलहून रोज पालघरला जाऊन रात्री परत येत असे. हा एक विलक्षण अनुभव होता. मी पहाटे पावणेसहाची बस पनवेलहून पकडायचो ही बस साधारण सात वाजता दादरला पोहोचायची दादरला उतरल्या उतरल्या पळत-पळत दादर वेस्ट स्टेशन गाठायचे व प्लॅटफॉर्म क्रमांक तीनवरती खाली उतरायचे. सव्वा तासाच्या आत जर पोहोचलो तर आम्हाला फिरोजपूर जनता ट्रेन मिळायची जर थोडा उशीर झाला तर ०७:३५ सौराष्ट्र एक्सप्रेस आम्हाला मिळायची. शक्यतो फिरोजपूर जनता ने जायला आवडायचे. कारण बोरिवलीहून सुटल्यावर थेट पालघरपर्यंत विनाथांबाता जात असे. सौराष्ट्र एक्सप्रेस मात्र नालासोपारा पुढे असे तीन-चार ठिकाणी थांबत असे. पालघरला पोहोचल्यावर आमच्यासाठी ठरवलेली एक रिक्षा असे. या रिक्षाने आम्ही दिवाणी इंडस्ट्रीयल इस्टेट येथील आमच्या कंपनीमध्ये जात असून माझ्याबरोबर माझ्या कंपनीतले दोन-तीन सहकारीही याचे शिक्षण घेत. संध्याकाळी साडेचार वाजता हा रिक्षावाला परत आम्हाला घेण्यासाठी कंपनीत येत असे. पाच वाजेपर्यंत आम्ही पालघर रेल्वे स्टेशनला पोहोचत असू. सव्वा पाच वाजता सौराष्ट्र एक्सप्रेस किंवा पावणेसहा वाजता फिरोजपूर जनता ट्रेन, तेव्हा बऱ्याच वेळा या ट्रेन उशिराने धावत असत, पण वाट बघण्यापलीकडे काही घडणे शक्य नसायच साधारणपणे संध्याकाळी सात ते सव्वासातपर्यंत आणि दादरला पोहोचत असू. त्यानंतर दादर-पनवेल बसने पनवेल गाठणे आणि जर लवकर पनवेलला पोचलो तर साधारण रात्री नऊपर्यंत आम्ही पोचत असू.

हा प्रवास मला सुखाचा वाटला. याचे कारण म्हणजे, नेमका याच वेळेस भाऊ जोशी यांची पालघरला इरिगेशनच्या ऑफिसमध्ये बदली झाली होती. त्यामुळे रोज सकाळी व संध्याकाळी भाऊ जोशी प्रवासात बरोबर असत. त्यामुळे गप्पा मारणे, इकडच्या-तिकडच्या गमती सांगणे

यामुळे  प्रवास अगदी मजेत होत असे. या प्रवासाबद्दलची एक अजून आठवण सांगण्याजोगी आहे. सकाळी पावणेसहाची बस पकडायची. या बसमध्ये मी आणि भाऊ जोशी या व्यतिरिक्त अजून एक हमखास ठरलेला माणूस म्हणजे वर्तक गुरुजींचा मुलगा. याचे खास वैशिष्ट्य म्हणजे हा बसमध्ये आल्याआल्या घंटा वाजवायची सुरुवात करायचा आणि ''चला चला लवकर बस सोडा. पुढच्या बस मिळत नाहीत उशीर होतो.'' असे म्हणायचा. मी आणि भाऊ हे बरेच दिवस ऐकत होतो. एक दिवशी मी वर्तकला विचारले, ''का रे बाबा, तू पुढे कुठे जातोस दादरहून कुठल्या बस तुझ्या चुकतात?'' ''काय सांगू पुढे मला बांद्र्याला जायला उशीर होतो.'' मी आणि भाऊ एकमेकांकडे बघून बघितलं आणि हसलो. वर्तकला लक्षात आले. काही वेळाने त्यांनी मला विचारले, ''तुम्ही का बरं, विचारलं आणि तुम्ही दोघे हसलात का?''

आम्ही म्हटलं, ''काय नाही आपलं असंच काहीतरी कारण असेल म्हणून हसलो.''

''बरं मला एक सांगा, तुम्ही कुठे जाता?''

मी वर्तकला सांगितलं, ''अरे काही नाही रे आम्ही दादरहून पालघरला जातो.'' हे ऐकल्यावर काय परिणाम व्हायचा तोच झाला. दुसऱ्या दिवशीपासून बसमधील घंटा वाजवणे हे वर्तककडून पूर्णपणे बंद झाली. काय गमती असतात पाहा. कुणाला कशाची कुणाला कशाची काळजी असेल काही सांगता येत नाही बुवा.

पालघर ते दादर या प्रवासातील दोन आठवणी नक्कीच सांगण्या जोग्या आहेत. एक आठवण म्हणजे, एकदा कॉल करून येताना वसई रोड येथे आमची ट्रेन थांबली. बराच वेळ थांबले आणि मग चौकशी केल्यावर कळले की पुढे एका मालगाडीचा अपघात झाल्यामुळे बराच वेळ वसईला थांबणार होती. त्या दिवशी पहिल्यांदा जंगल किंवा मोफत जेवण याचा आस्वाद आम्ही घेतला वसई गावात वसई रोड जवळ जाऊन जेवण करून परत ट्रेनमध्ये येऊन बसलो आणि कधीतरी एकदा ट्रेन सुरू झाली आणि दादरला पोहोचली.

दुसरा अनुभव म्हणजे पालघरहून एकदा येत असताना आपल्या

भारतीय टीमची न्यूझीलंड बरोबर फिफ्टीफिफ्टी वन डे मॅच चालू होती आणि बहुतेक सुनील गावस्करची ती शेवटची मॅच होती. मी व माझा एक मित्र म्हणजे आमच्या कंपनीचा कॉन्ट्रॅक्टर कीर्ती आम्ही ट्रेनच्या दारामध्ये बसून माझ्याकडील ट्रांजिस्टरवरती कॉमेंट्री ऐकत आलो होतो. त्या मॅचमध्ये सुनील गावस्करने शतक ठोकले होते आणि ते सुद्धा अतिशय विक्रमी वेळात. हा प्रवास आमचा अतिशय लक्षात राहण्याजोगा झाला होता.

पालघर ते दादर ट्रेन प्रवासामधील अजून एक आठवण. रफिक भाई हा सुतार काम करायचा. पालघरमध्ये एक मेडिकल टीसी कंपनी होती. तेथे त्याने सुतारकामाचे कॉन्ट्रॅक्ट घेतले होते व काम करत होता. मनाने अतिशय चांगला. गुजराती माणूस मन मोठे असे म्हणतात ते खोटे नाही. अतिशय सुस्वभावी चांगला माणूस आणि बऱ्याच ठिकाणीच्या गमती बऱ्याच. ते बरेच अनुभव सांगत असत. तर या माणसाला शिक्षण वगैरे बेताची असल्यामुळे इंग्लिशचा फारसा गंध नव्हता, पण गुजराती माणसांना एकंदरीतच इंग्रजी शब्द वापरायची हौस दांडगी असते. एकदा अशीच गंमत झाली मला म्हणाला मला एसीडीसी झाले. म्हणजे काय? मला दोनच प्रकार माहीत होते की लोकल ट्रेन कशी चालते आणि इलेक्ट्रिक करंट वरती चालते. त्याला नक्की म्हणजे काय झाले हे मी त्याला विचारलं. म्हणजे काय झाले बाबा. ''काय नाही सकाळपासून डोकं दुखतंय, २३ उलट्या झाल्या.'' मग मला कळलं की याला म्हणायचंय की ॲसिडिटी झालीय. मी त्याला थोडं पाणी दिलं आणि मग बोरिवली येईपर्यंत त्याची तब्येत ठीक झाली. या रफिकभाईने नंतर आमच्या पनवेलच्या नवीन घरी म्हणजे नित्यानंद सदनमध्ये आमचं फर्निचरचा सगळं काम खूप छान पद्धतीने करून दिलं होतं. मध्यंतरी पालघरची नोकरी सोडल्यावर ती आमचा फारसा संबंध राहिला नव्हता. एकदा काही कारणास्तव पालघरला ट्रेनने चाललो होतो. नेमका रफिकभाईचा मुलगा किशोर ट्रेनमध्ये भेटला. सहज म्हणून मी चौकशी केली तर तो म्हणाला की, ''रफिक भाई तो ऑफ हो गया'' म्हणजे काय, तो गुजर एक चांगला मित्र गमावला त्या दिवशी मला जाणीव झाली आणि खरोखरीच वाईटही वाटते.

## ट्रेनचा प्रवास

नासिक रोड ते मुंबई हुकलेला प्रवास

मी साधारणपणे पाच वर्षांचा असताना नाशिकला दादा काकांच्या कडे एका सुट्टीत गेलो होतो. मी, आई व काका असे दिग्गज आणि नंतर नाशिकहून आपण मुंबईला जाऊ. मुंबई पाहून नंतर धारवाडला परत जाऊ, असा काकाने बेत ठरवला. आम्ही नाशिक रेल्वे स्टेशनवर गेलो. पंजाब मेल थोड्याच वेळात आली. गाडी पूर्णपणे भरलेली होती. आत शिरणे अशक्य होते. काकांनी एक युक्ती लढवली. मला एका उघड्या खिडकीतून आज डब्यात सोडले आणि तेव्हा आई दाराने आत यायचा प्रयत्न करू लागले, पण काही केल्या आपली लोकं दार उघडत नव्हते. एवढ्यात गाडी सुरू झाली. आतील एका माणसाने पटकन आम्हाला उचलून खिडकीतून काकांकडे परत गेले, परंतु आमचे सामान एक बॅग व एक पाण्याची किटली, एक मोठा तिथेच डबा वगैरे गोष्टी मात्र गाडीमध्ये राहिल्या. या पाण्याच्या किटलीची आठवण म्हणजे ती आम्ही आमच्या शेजारी राहणाऱ्या देशपांडे या घरमालकांच्या स्वयंपाक करणाऱ्या बाई यांच्याकडून उसनी घेतली होती. धारवाडला परत आल्यावर नवीन किटली व डबा विकत घेऊन आईने त्यांचा त्यांना परत केला. त्या दिवशी त्या डब्यातून त्या माणसाने मला जर खिडकीतून बाहेर टाकले नसते तर कदाचित मी पाचव्यावर्षी मुंबईत पोहोचलो असतो आणि आपण वेगवेगळ्या कथा ऐकतो त्याप्रमाणे कदाचित एखादा मोठा कलाकार किंवा अजून काही मोठा माणूस झालो असतो. कदाचित काही नाव कमावलं असतं काही कल्पना नाही.

## मुंब्रा ते घाटकोपर J & J साठी

जॉन्सनमध्ये काम करत असताना पनवेल ते मुंब्रा बस नाही व मुंबईहून लोकांना घाटकोपर हा प्रवाससुद्धा लक्षात राहण्याजोगा आहे एकदा माझी बस चुकली म्हणून मी मुंबईला टॅक्सीने चाललो होतो. मुंबईजवळ त्याने मला सोडलं. खाली उतरत असताना आरशामध्ये माझ्या शर्टची बाही अडकून माझा नवीन शर्ट फाटला सकाळची वेळ

होती. जेमतेम सात वाजले होते. मी घाटकोपरला तसाच गेलो. नंतर एखाद्या रेडिमेड दुकान उघडायची वाट बघत थांबलो. त्या दिवशी मला कंपनीत पोहोचायला जवळजवळ दहा वाजले. माझ्या साहेबांनी मला विचारलं, ''का रे काय झालं दोन तास उशीर झाल?'' ''असा प्रकार घडला शर्ट फाटल्यामुळे मला घाटकोपर येथे थांबावं लागलं. दुकान उघडल्यावर मी कमीत कमी किमतीचा एक टी-शर्ट विकत घेतला. तो बदलला आणि मग मी कंपनीत येऊ शकलो.'' हे ऐकून माझ्या साहेबांना सुद्धा गंमत वाटते

**माझा व प्रथिताचा प्रवास, कोईमतूर ते मुंबई**

माझे व प्रथिताचे लग्न ३१ मे १९८० साली झाले. त्यानंतर आम्ही फिरण्यासाठी म्हणून उटीला गेलो. उटीला जाण्याचे कारण म्हणजे तेव्हा जगदीश मामा वेलिंग्टन येथे स्टाफ कॉलेजमध्ये पोस्टिंग झाले असल्यामुळे राहात होता. वेलिंग्टन म्हणजे तिच्या अगदी जवळजवळ आमच्याकडे फारसा पैसा नव्हता. त्यामुळे कुठेतरी खूप लांब जाणे शक्य नव्हते. हॉटेलला राहायची चैन परवडणारी नव्हती. त्यामुळे उटी हे ठिकाण आम्ही निवडले होते. तर जातानाचा आमचा प्रवास मुंबई ते कोईमतूर जयंती जनता एक्सप्रेसने झाला. येतानाचे रिझर्व्हेशन मात्र झालेले नव्हते, पण बघू काहीतरी करू, मिळेल असे वाटले. आमच्या येथील मुक्काम, येथील फिरणे खूप छान झाले आणि मग परतीच्या प्रवासाला आम्ही निघालो. येताना मी, प्रथिता व राजश्री मानेची आई अशी तिघेजण होती. रिझर्व्हेशन काही मिळालेले नव्हते. मग शेवटी प्रतिथा आणि राजश्री मामीची आई यांनी लेडीज कंपार्टमेंटमध्ये बसायचे व मी जेंटस् कंपार्टमेंटमध्ये बसायचे असे ठरवले. जयंती जनता वेळेवर कोईमतूर स्टेशनला आले. या दोघींना लेडीज कंपार्टमेंटमध्ये कशीबशी जागा मिळाली. यांना जागा मिळाल्यावर मी धावत धावत कंपार्टमेंटमध्ये जेमतेम आत शिरू शकलो. हा डबा तुडुंब भरलेला होता. बसायलासुद्धा जागा नव्हती. खाली बाकावर नाही, पण ठीक आहे. प्रवास सुरू झाला याच आनंदात होतो. मग जिथे ट्रेन थांबेल तेथून किती वेळ थांबणार आहे याची चौकशी करून मी धावत

सुटायचं आणि लेडीज कंपार्टमेंट मध्ये प्रथिता आणि मामीच्या आईला भेटण्यासाठी जायचं. जाताना काहीतरी खाण्यापिण्याचे साहित्य घेऊन जायचं. हे दोन्ही गाडीच्या दोन टोकाला होते. त्यामुळे या सगळ्या प्रवासात माझी बऱ्यापैकी दमछाक झाली. या प्रवासाला जवळपास ३६ ते ३८ तास लागत होते. म्हणजे माझी चूक झाली असेल याची कल्पना तुम्हाला आली असेल

## मुंबई ते इंदूर

१९८६ साली मी नोकरी सोडून इंदोरला पंकज टायर्समध्ये नोकरी स्वीकारली. याला कारण म्हणजे डॉक्टर अरविंद हे.एच कुमार या कंपनीसाठी पीतमपूरमध्ये एका नवीन प्रोजेक्टवर काम करीत होते. एस. कुमारने मिसलीन टायरबरोबर एक जॉईंट व्हेंचर प्रोजेक्ट पीतमपूर येथे सुरू करायचे ठरले होते व डॉक्टर घागांनी मला विचारले की, ''नाशिकमध्ये नवीन कंपनी सुरू होते आहे. तुला अशा कंपनीत काम करायची इच्छा आहे का? डॉक्टर घाग असल्यामुळे मी त्वरित ही त्यांची विनंती मान्य केली आणि मी इंदूरला तिचा पुढचा प्रोजेक्ट सुरू होण्यास जवळपास सहा महिने अवधी असल्यामुळे मला तोपर्यंत हेच कुमारच्या पंकज टायर या इंदूरमधील कंपनीत टेक्निकल मॅनेजर म्हणून काम करावयास सांगण्यात आले. या काळात मी बऱ्याच वेळा इंदूर-मुंबई प्रवास केला इंदूरला जॉईन होण्याआधी माझे हार्नियाचे ऑपरेशन झाले होते त्यामुळे पहिला विमान प्रवास मी डॉक्टरांबरोबर विमानाने मुंबई ते इंदूर असा केला. नंतर मला इंदूरमध्ये कंपनीत माझ्या राहत्या घरी म्हणजे येथे रामबाग कॉलनीमध्ये श्री. भालेराव यांच्या घरी मी भाड्याने राहात होतो. तिथे मला घ्यायला कंपनीचा एक माणूस येत असे. मला गरज वाटू लागल्यावर मी पनवेलहून माझी स्कूटर इंदोरला न्यायचे ठरवले. त्यासाठी मी स्कूटर व्यवस्थित पॅक करून बॉम्बे सेंट्रल रेल्वे स्टेशन व त्याचे बुकिंग केले व शक्यतो मी जाणाऱ्या त्याच गाडीने ती लगेच ट्रान्सपोर्टमध्ये टाका असे सांगितले मला वाटले की, हे काम नक्की झाले असेल, परंतु ऐन वेळी तेथील लोकांनी आम्हाला काही चहा पाणी दिले नाही. याचा राग म्हणून त्याने पेट्रोलचा वास

येतोय या कारणास्तव माझी स्कूटर गाडीमध्ये चढवले नाही. दुसऱ्या दिवशी मी इंदोरला पोहोचलो आणि लगेच पार्सल रूममध्ये गेलो व माझी स्कूटर द्या असे मी त्यांना विनंती केली की त्याने त्यांचे रजिस्टर बघितले आणि तुमची स्कूटर आलेली नाहीये असे सांगितले. मला एक प्रकारचा धक्काच होता. मी ताबडतोब मुंबईला अविमामाला फोन केला आणि त्याला विचारले की, स्कूटर आली नाही. काय झालंय नक्की माहीती आहे का? तो रेल्वे स्टेशनवर गेला आणि त्याने चौकशी केले आणि मग त्याला कळले की काल ती स्कूटर लगेच चढवली गेली नाही. कारण अर्थात त्याला लगेचच कळले. त्याने जे करायला हवे ते केले आणि माझी स्कूटर मला तीन-चार दिवसांत मिळाली. मग कंपनीत रोज जायचं माझा प्रश्न मिटला.

## मुंबई ते जयपूर

एकदा काही कामानिमित्त मी मुंबईहून जयपूरला ट्रेनने जात होतो. या ट्रेनला भोजन कंपार्टमेंट नव्हते आणि ट्रेन आमची जवळपास चार-पाच तास उशिरा धावत होती. जवळपास खाण्यापिण्याचे काही साहित्य नव्हते. जिथे ट्रेन थांबवली होती तिथे जवळपास काही मिळतही नव्हते. आमच्या कंपार्टमेंटमध्ये आम्ही पाच-सहा जण होतो. त्यातील एक व्यक्ती होती कोट्याची ही व्यक्ती म्हणजे एक सरदारजी. अतिशय चांगल्या मनाचा हा सरदार होता आणि आमच्या सगळ्यांचे हाल डब्यात या कंपनीमध्ये लोकांचे बघितले होते. स्टेशन यायच्या आधी एक तासभर त्याने घरी फोन करून आमच्या पाच जणांच्यासाठी प्रत्येकी दोन-तीन पराठे घेऊन ये, असे आपल्या सहकाऱ्याला फोनवरून सांगितले होते. बरोबर पाण्याच्या बाटल्या सुद्धा त्याने मागवल्या होत्या स्टेशन आल्यावर तो पटकन खाली उतरला. त्याच्या माणसाकडून त्या डब्यातले पराठे त्यांनी आम्हाला काढून दिले, पाण्याच्या बाटल्या दिल्या आणि आम्हाला म्हणाला की आता निवांत बसून शांतपणे खा. कारण ट्रेन पुढे जयपूरला जाण्यासाठी अजून अडीच ते तीन तास लागणार होते. या सरदारजीच्या रूपाने आम्हाला देवच पावला असे मला त्या वेळी वाटले. कोण कोणाचा कोण पण अशा काही वेळेस

कसे कोण कोणाला मदत करतात आणि 'दाने दाने पे लिखा है खानेवाले का नाम' असे का म्हणतात ते या वेळी नक्की पटले.

**अहमदाबाद ते पुणे**

माझा ट्रेनचा अजून एक लक्षात राहणारा प्रवास अहमदाबाद ते पुणे एक्सप्रेसने साधारणपणे चार-पाच वर्षांपूर्वी. साधारणपणे चार-पाच वर्षांपूर्वी काही कामानिमित्त मी अहमदाबाद येथे गेलो होतो. अहमदाबादला पहाटे पोहोचलो. सबंध दिवस काम केले आणि त्याच दिवशी रात्री दहा वाजता दुरांतो एक्सप्रेसने अहमदाबादवरून पुढे निघालो. डबा रिकामा होता. त्यामुळे निवांत झोप लागलेली होती. पहाटे कधीतरी जाग आली. गाडी थांबलेली होती. कुठले स्टेशन आहे बघू या तरी म्हणून खाली उतरलो. बघतो तर काय आमची गाडी उभी होती. म्हणजे आमचा प्रवास फक्त दोन-तीन तासांचा झालेला होता आणि पुण्याला पोहोचायला कमीत कमी आठ-नऊ तास तरी लागणार होते. नंतर कारण कळले अहमदाबाद पुणे या लाईन वरती पुढे कुठेतरी अपघात झालेला होता. बहुतेक मालगाडी रुळावरून घसरलेली होती. त्यामुळे सर्व गाड्या प्रत्येक स्टेशनवर एकामागे अशाच थांबलेल्या होत्या. जवळ फक्त प्यायचे पाणी होते, दुरांतो एक्सप्रेसला पॅन्ट्री कार नसते त्यामुळे खाण्यापिण्याची काही सोय नव्हती. शेवटी एकदाचा दुपारी तीनच्या सुमारास आमची गाडी कर्जतला पोचली. नशिबाने आमचा डबा शेवटी शेवटी असल्यामुळे खाली उतरल्यावर समोरच एक छोटेसे दुकान होते. त्याच्या बाहेर काही हातगाड्या उभ्या होत्या. पटकन खाली उतरलो पहिल्यांदा एक कप चहा प्यालो नंतर बटाटेवडा बांधून घेतला, पाण्याची बाटली विकत घेतली आणि अजून एक चहा पिऊन गाडीत येऊन बसलो. या दिवशी निर्जली एकादशी म्हणजे काय याचा अनुभव आला. सबंध दिवसात पहिला चहा मिळाला तो दुपारी तीन वाजता. थोडाफार खायला मिळालं ते तेव्हाच. संध्याकाळी साधारणपणे सहा वाजता पुण्याला पोहोचलो. तब्बल बारा तास उशिरा पहाटे सात वाजता पोहोचणारी गाडी संध्याकाळी सहा वाजता पोचली होती. हा प्रवास नक्कीच लक्षात घेण्याजोगा होता.

## बसने केलेले काही प्रवास

### पुणे ते नागपूर

मित्रांनो, काही बसप्रवास पण असेच लक्षात राहण्याजोगे आहेत. पहिला अनुभव आहे पुणे ते नागपूर बसचा प्रवास. साधारणपणे १९९८ सालची ही गोष्ट असेल. तेव्हा मी नागपूरला महिन्यातून एकदा तरी जात असे. नागपूर येथे आमदार किशोर काशीकर यांच्या कंपनीमध्ये काही टेक्निकल मदत देण्यासाठी जात असे. असाच एकदा पुण्याहून संध्याकाळी निघालो. त्या दिवशी प्रचंड पाऊस पडत होता आणि वाटेत आमची बस एका ठिकाणी थांबली. कारण नागपूर-पुणे-नागपूर या महामार्गावर एक नदी तुडुंब भरून वाहात होती. पुराच्या पाण्यामुळे आणि या एकाच ठिकाणी आम्हाला जवळपास बारा तास तरी थांबावे लागले. नशीब म्हणजे जवळपास एक चहाची गाडी होती. त्यामुळे एक-दोनदा चहा तरी आला आणि सकाळी आठ वाजता नागपूरला पोहोचलो. आम्ही रात्री दहा वाजता वगैरे पोहोचलो हा प्रवास नक्कीच लक्षात राहणारा असा होता.

### अहमदाबाद ते पुणे

काही वर्षांपूर्वी मी अहमदाबादला गेलो होतो. परत येताना जे रेल्वेचे तिकीट मिळाले नाही म्हणून नीता वोल्वो या बसने येण्याचे ठरवले. आमची बस बडोदापर्यंत आले. नंतर पुढे हायवे लागताना बसमध्ये काहीतरी बिघाड झाला आणि ती सारखी बंद पडू लागली. एखादा किलोमीटर पुढे आणि परत पुढे असे करत करत आम्ही एकदाचे पोहोचलो. वरती आम्हाला दोन एक तास थांबावे लागले तोपर्यंत रात्रीचे दहा-अकरा वगैरे वाजले होते. पाठीमागून येणाऱ्या नीता ट्रॅव्हल्सच्या एका बसने आम्हाला मग उभ्याने तलासरीपर्यंत प्रवास करावा लागला. तलासरी इथे नीता वोल्वोची अजून एक बस उभी होती. त्या बसने आम्हाला पुणे येथे यावे लागले, पण ती नेहमीची बस नसल्यामुळे ते मुंबईला गेले. मुंबईहून मग पुण्याला. त्यामुळे सकाळी साधारणपणे सात वाजता पोहोचायचे ते आम्ही रात्री जवळपास साडेनऊ-दहा वाजता पोहोचलो. हा प्रवास लक्षात राहील असाच होता.

**विमानाचा प्रवास**

पहिला विमानाने प्रवास, मुंबई ते अहमदाबाद, श्री. ग. प. खाडिलकर या नावावर, साधारणपणे १९७४-७५ साली. आता माझ्या काही विमान प्रवासाच्या आठवणी सांगू इच्छितो. माझा पहिला विमान प्रवास हा साधारण ७४-७५ साली झाला. तो सुद्धा फारच लक्षात राहण्याजोगा. कारण मी चक्क गणेश खाडिलकर या तिकीटावर मुंबई-अहमदाबाद असा विमानाचा प्रवास केला. खरंतर काही कामानिमित्त भाऊमामाला अहमदाबाद येथे जायचे होते, पण ऐन वेळेस आमच्या कंपनीमध्ये काही महत्त्वाचे काम निघाल्यामुळे भाऊमामाला जाणे शक्य नव्हते. म्हणून भाऊमामा मला म्हणाला की, माझ्याऐवजी तू जा आणि अमुक एक काम ठरलेले आहे ते तिथे जा, कर आणि परत ये. त्या काळी विमान प्रवास आतापेक्षा फारच सुलभ होता. मला आठवते, विलेपार्ले येथील सांताक्रूझ येथील विमानतळ म्हणजे बस स्टँड किंवा रेल्वे स्टेशनपेक्षा फारसे वेगळे काही नव्हते. पार्ल्याच्या घरासमोर सेंटॉर हॉटेल. त्या थोडं पुढे गेलं की सांताक्रूझ विमानतळ होते आणि त्याकाळी तिथे फक्त तारेचे कुंपण होते. छोटीशी एक इमारत होती आणि तिथे उभी असलेली विमाने आम्हाला तारेच्या कुंपणाच्या पलीकडून अगदी आरामात दिसत असत. विमान प्रवास करतानासुद्धा आता इतका सिक्युरिटी किंवा बाकी काही प्रश्न नसतो. त्यामुळे काही अडचण नाही. आता मी गणेश खाडिलकर या नावाने पहिला विमान प्रवास करू शकलो. आज पासपोर्ट, बाकी सगळी कागदपत्रं असूनसुद्धा विमान प्रवास म्हणावा इतका सोपा राहिलेला नाहीये. त्याला कारणही तसेच आहे. ७५ च्या काळात दहशतवाद किंवा बाकी आता जे काही आपण प्रश्न निर्माण झालेत तसे काहीच नव्हते आणि जग किती सुंदर होते. असे आता हे सगळे दिवस आठवले की वाटते, आज-काल कुणाची कुठल्याही प्रवासात कुठल्याही प्रकारची खात्री अशी देता येत नाही. कधी काय होईल याचा काही नेम नसतो जग हे किती असुरक्षित झाले आहे, हे विशेषतः विमान प्रवास करताना नक्कीच जाणवते. प्रत्येक विमानतळावरती एकीकडे कडक सिक्युरिटी चेक बाकी सगळ्या तपासण्या करूनसुद्धा माणूस पळवला जातो किंवा काही विमानांना

अपघात घडवून आणला जातो. हे किती भयानक आहे. ७५ साली मात्र असे काही नव्हते. म्हणजे गेल्या चाळीस-पंचेचाळीस वर्षांत जगणे किती असुरक्षित झाले आहे याचा एक नमुनाच नाही का?

## दुसरा विमान प्रवास, मुंबई ते फ्रॅन्कफर्ट ते हॅम्बुर्ग १९८७ साली

माझा दुसरा विमान प्रवास तो चक्क परदेशाचा. मला जर्मनीला जाण्याचा योग आला. जर्मनीतल्या कंपनीकडून कोटिंग मशीन खरेदी केले होते व या मशीनची ट्रायल घेण्यासाठी मी मुंबईहून जर्मनीला गेलो होतो. हा माझा पहिलाच परदेश प्रवास आणि खरोखरीच लक्षात राहण्याजोगा होता. मी फ्रॅंकफर्टला पोहोचलो. तेथून पुढे विमानाने हॅम्बुर्गला पोहोचलो. नंतर मी जे सामान चेकिंगसाठी दिले होते ते यायची वाट पाहिली. बराच वेळ झाला तरी माझी एक मोठी बॅग काही परत मला मिळाले नाही. माझी कपड्याची बॅग मला मिळाले होती, परंतु माझ्यासाठी ती मोठी बॅग जास्त महत्त्वाची होती. कारण या बागेमध्ये मी ट्रायल घेण्यासाठी लागणारे वेगवेगळ्या प्रकारचे कागद, फाईल, फिल्म वगैरे बऱ्याच गोष्टी बरोबर घेतल्या होत्या. बऱ्याच वेळानंतर ती बॅग मला मिसिंग आहे असे सांगण्यात आले व काउंटरवर जाऊन मला याची कंप्लेंट देण्यास सांगण्यात आले. मी त्या काऊंटरला गेलो. तिथे कंप्लेंट बुक उपलब्ध होता. आणि सोबत एक फाईल होती. त्या फाईलमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या बॅग असे फोटो छापलेले होते. आपली बॅग कशी दिसते त्याचे वर्णन किंवा त्या फोटोचा नंबर आपल्या कंप्लेंटमध्ये लिहायचा व मधील माझ्या हॉटेलचा पत्ता येथे नमूद करायचा. अशा प्रकारची व्यवस्था तिथे होती. हे सगळे करून नंतर मी एक टॅक्सीने येथील माझ्या रिझर्व्हेशन केलेल्या हॉटेलमध्ये मी पोहोचलो. या सगळ्या प्रकारात मी हॉटेलला पोहोचलो तेव्हा संध्याकाळचे सहा-साडे सहा वाजले होते. अतिशय दमलो होतो. आपली बॅग जर मिळाली नाही तर आपण ट्रायल कशा घ्यायच्या हे काळजी मला लागून राहिली होती. तशातच जर्मनीमध्ये ७५ सालची गोष्ट आहे. फारसे कोणी इंग्लिश बोलत नव्हते. मला जर्मनचा अजिबात गंध नव्हता. आत्तासारखे तेव्हा मोबाईल फोन नव्हते. त्यामुळे गुगल

ट्रान्सलेटर वगैरे काही सुविधा नव्हत्या. तोडकं-मोडकं इंग्लिश तिथले लोक बोलायचे. कसाबसा मी माझ्या रूमपर्यंत पोहोचलो. बाथरूममध्ये जाऊन जरा हातपाय धुतले आणि थोडावेळ झोपलो. साधारणपणे दहा वाजता मला जाग आली. खिडकीतून बाहेर पाहतो तर काय आपल्याकडे कसं चार-पाच वाजता बाहेर प्रकाश असतो तसा प्रकाश होता मला दोन मिनिटं कळेचना की, मी रात्री दहा वाजता उठलो की सकाळचे दहा वाजले. थोड्या वेळाने काळोख होत गेला आणि माझ्या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले

**मोठी बॅग हरवली व हॉटेल रूम मध्ये आणून दिली**

त्यानंतरचा तर पूर्ण दिवस किंवा रात्र माझा अतिशय मानसिक तणावाखाली गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी माझे साहेब म्हणजे डॉक्टर सेट हे लंडनहून आले. ते माझ्या हॉटेलमध्ये मला भेटले. मला म्हणाले, ''श्रीकांत, काय झालं. तू इतका नर्व्हस का दिसतोयस ? मग मी त्यांना झालेला प्रकार सांगितला. ते मला म्हणाले, ''अरे काळजी करू नकोस. तुझी बॅग तुला परत मिळेल. ते घेऊन येतील. विमान कंपनी तुझी बॅग आपल्या हॉटेलमध्ये घेऊन येईल.'' ते असे म्हणाले तरी माझा त्याच्यावर विश्वास बसणे शक्य नव्हते. मला म्हणाले, ''काही काळजी करू नकोस. अंघोळ वगैरे कर, आपण ब्रेकफास्ट करून घेऊ तोपर्यंत तुझी बॅग तुझ्या रूममध्ये परत आलेली असेल. काळजी करू नकोस.'' मी सगळं आवरलं आणि आम्ही ब्रेकफास्टला गेलो आणि एक तासाभराने परत आलो तो खरोखरच माझी बॅग माझ्या रूममध्ये परत आणून ठेवलेली होती. फक्त दोन-तीन ठिकाणी फाटली होती. या बॅग संबंधित माझी एक अतिशय आठवणीत राहण्याजोगी घटना होती ती म्हणजे ही बॅग मला जॉन्सन आणि जॉन्सनमध्ये काम करत असताना सजेशन ॲवॉर्ड म्हणून मिळालेली होती. आमच्या रनर बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये पाचशे किलो मशीनमधल्या काही बिघाडामुळे खराब झाले होते व आमच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंटच्या लोकांनीसुद्धा रिजेक्ट केले होते. त्यावर मी काही प्रयोग करून ते प्रयोग यशस्वीपणे राबवून हे रिजेक्ट झालेले असे मी परत कामात आणले होते आणि या

माझ्या प्रदर्शनाबद्दल मला त्या वर्षी सजेशन ॲवॉर्ड म्हणून ही बॅग बक्षीस मिळालेली होती.

**नंतर अनेक वेळा**

दुबई ते मुंबई, कॅथे पॅसिफिक एरलाईन्स

कपबशीमध्ये झुरळाचे पिल्लू

आता मी आपल्याला माझा एक अनुभव सांगतो. कॅथे पॅसिफिक एअरलाईन्सने मी दुबईहून मुंबईला निघालो होतो. ती साधारणपणे १९९७ सालची गोष्ट आहे. दुबईहून विमानाने टेक ऑफ केले आणि मग काही वेळाने नाश्ता देण्याची सुरुवात झाली. छान नाश्ता होता. नाश्त्यानंतर कॉफी देण्यासाठी सुरुवात झाली. त्या काळात पॅसिफिक या विमानामध्ये आपली नेहमीसारखी कॉफी देण्यात येत होती. बशी वरती कप असा उलटा झाकलेला होता. मी कॉफी घेण्यासाठी कप उचलला आणि मला धक्का बसला. कारण बशीमध्ये चक्क झुरळाचे पिल्लू होते. मी पटकन त्या दिवशी सर्व्ह करणाऱ्या एअर होस्टेसला बोलावलं आणि तिला दाखवले. बघितल्यावर तिलासुद्धा धक्का बसला. तिने पटकन माझ्या हातून ते काढून घेतले आणि मला लगेचच दुसरी छान गरम कॉफी त्यांनी आणून दिली. कॉफी थोड्या वेळाने फ्लाईट मॅनेजर माझ्याकडे आला आणि मला म्हणाला, ''सर, जरा तुम्ही येता का मागे? आम्हा सर्वांना काय वाटतंय ते तोंडी नाही सांगता येणार. तुम्ही तिथे कृपया या.'' मी तिथे गेलो तर तिथे गेल्यावर तिथे जवळपास सगळेच कर्मचारी होते. सगळ्यांच्या चेहऱ्यावर एक अतिशय आदराची अशी भावना होती. त्यांनी माझ्या हातात एक बॅग दिली. त्या बॅगेमध्ये एक व्हिस्कीची बाटली होती, काही चॉकलेटस् होती. पॅसिफिक या विमान कंपनीकडून तुम्हाला सप्रेम भेट, असं त्यांनी सांगितलं. कशासाठी व का याच्यात वेगळा आहे का? मला तुम्ही का देताय?'' तर तो म्हणाला, ''सर, तुम्ही तुमच्या कपबशीत झुरळाचं पिल्लू दिसलेलं बघून त्याचा गाजावाजा न करता शांतपणे आमच्याशी बोलून ते आमच्या निदर्शनास आणून दिलं हे तुम्हाला वाटत नाही, पण हे तुम्ही खूप मोठे काम केले. हे जर सगळ्या प्रवाशांना कळतं तर आमच्या एअरलाईनची

किंमत शून्य झाले असती. त्यामुळे या एअरलाईन्सतर्फे तुम्हाला एक छोटीशी भेट.'' मला वाटतं, अशा प्रकारचा अनुभव फार कमी लोकांना आला असेल. मी जे काय केलं ते मला मनापासून पटलं तेच मी केलं. त्याच्यात माझा कुठेही असा विचार नव्हता किंवा यामुळे आपल्याला काही बक्षीस मिळेल असं मला वाटलं नाही, ते नजरचुकीने झाले होते आणि मुद्दाम केलले नव्हते. असं आपल्या घरीसुद्धा होऊ शकते, तर त्याबद्दल त्यांना दोष का द्यायचा?

## दुबई ते मुंबई, एमिरेट्स एरलाईन्स
## फ्री रिटर्न तिकीट

असाच एक अनुभव जो मला घेता आला तोसुद्धा दुबई ते मुंबई या प्रवासादरम्यान. यावेळेस एअरलाइन्स होती एमिरेट्स एअरलाईन्स. आमचं पेमेंट, चेक वगैरे सगळं होऊन, पासपोर्ट इमिग्रेशन वगैरे सगळं होऊन आम्ही बोर्डिंगजवळ बसलेलो होतो. तेवढ्यात एक अनाउन्समेंट झाली. काही कारणास्तव त्यांचे फ्लाईटमध्ये काही बदल केले होते. काही टेक्निकल दोषामुळे त्यांना त्यांचे जम्बो जेटच्या ऐवजी दुसरे छोट्या फ्रेमचे विमान दुबईवरून मुंबईला पाठवायचे होते. यासाठी त्यांना काही प्रवासी पाठवायचे होते. कोणी बदल करायला तयार असतील त्यांना एअरलाईन्सतर्फे एक रिटर्न तिकीट मोफत दिले जाईल व फ्लाईटपर्यंतचा वेळ एअरपोर्टवर काढायला लागू नये म्हणून त्यांना दुबई शहरात एका चांगल्या हॉटेलमध्ये तात्पुरते राहायची व्यवस्था करण्यात येईल. मी ताबडतोब इमिग्रेशन काऊंटरला गेलो. माझी तयारी दर्शवली व त्यांनी मला लगेचच एक रिटर्न तिकीट गिफ्ट म्हणून दिले. नंतर एअरपोर्टवरून बाहेर पडण्यासाठी इमिग्रेशन मध्ये जाऊन पासपोर्ट जमा करायला सांगण्यात आला. तसा मी केला. त्याची मला पोचपावतीसुद्धा मिळाली. दुबई शहरातील एका हॉटेल आम्हाला देण्यात आले आणि एका बसने आम्हाला तिथे सोडण्यात आले. दोन्ही फ्लाईटमध्ये जवळजवळ सात-आठ तासाचे अंतर होते. दुसरी फ्लाईट निघण्याच्या आधी आम्हाला हॉटेलमध्ये परत एअरपोर्टवर आणण्यात आले व इमिग्रेशन काऊंटरवरती जाऊन आपापले पासपोर्ट घेण्यास

सांगण्यात आले. तसे मी त्या काउंटरवर गेलो व माझे रिसीट दाखवली व माझा पासपोर्ट मागितला. या खात्यामध्ये काहीतरी गडबड झालेली होती. खूप वेळ माझा पासपोर्ट काही त्यांना सापडेना झाले, माझ्या मनात चलबिचल सुरू झाली की, आपला हा निर्णय चुकला की काय? आता आपला पासपोर्ट मिळाला नाही तर करायचे? आपण जेव्हा परदेशी प्रवास करतो तेव्हा एका गोष्टीची कायम काळजी घेणे अतिशय गरजेचे असते हे मला आप्पा सप्रे यांनी बऱ्याच वेळा मी परदेशी जाताना बजावून सांगितलं. ते मला नेहमी म्हणायचे, परदेशात जाताना सगळ्यात महत्त्वाचं काय जपशील तर आपला पासपोर्ट. आपले सामान, आपले पैसे, इतर काही गोष्टी हरवल्या तरी काही बिघडत नाही, पण जर पासपोर्ट हरवला तर मात्र काही खरं नाही, मला आप्पांच्या सल्ल्याची येथे अतिशय प्रकर्षाने आठवण झाली. नशिबाने थोड्या वेळात माझा पासपोर्ट त्यांना मिळाला. त्यांनी मला तो दिला व नंतर मी त्या ठरलेल्या विमानाने मुंबईला परत आलो. पुढच्या वेळेस मी दुबईला गेलो तेव्हा माझ्याकडे फ्री रिटर्न तिकीट असल्यामुळे मी ज्या कंपनीत कामासाठी जात होतो त्यांना माझ्या या दुसऱ्या कामासाठी काही पैसे खर्च करावे लागले नाही. हासुद्धा एक आगळावेगळा असाच अनुभव म्हणावा लागेल. असा अनुभव अजून कुणाला आहे का असेल तर जरूर मला कळवावा, ही विनंती.

## शारजाह ते मुंबई

सकाळी ४ च्याऐवजी संध्याकाळी ४ वाजता एअरपोर्टवर. आता मी माझा शाहजाह मुंबई या विमान प्रवासाचा एक अनुभव सांगणार आहे या वेळेस अरेबिया एअरपोर्ट मध्ये मी काम करत असलेल्या आमच्या युरो गर्ल्स पॅकेजिंग या कंपनीपासून म्हणजेच फेज दोनपासून अगदी जवळ होता. मी राहत होतो त्यामुळे अतिशय सोयीस्कर होते. रेल्वेचे तिकीटसुद्धा बऱ्याच कमी दरात मिळत असायची. आणि प्रवास माझ्या वैयक्तिक पैशातून करायचो त्यामुळे कमीत कमी तिकीट ही माझा एक माझी गरज होती. माझी फ्लाईट टायमिंग झीरो अवर असलेली होती. पण मी त्याच्याकडे लक्ष दिलं नव्हतं आणि मी

माझ्या ड्रायव्हरला सांगून दुपारी अडीच वाजता शारजा एअरपोर्टवरती पोहोचलो आणि चेक इन काउंटर माझे तिकीट दिले तर तिने मला सांगितले तर ही फ्लाइट तर गेली आहे. तुम्हाला दुसरे तिकीट घ्यावे लागेल. मी म्हणालो, ''मी तर चार वाजताची फ्लाईट बुक केली आणि तिथे अक्षरशः माझा पचका झाला. त्यांनी माझ्या निदर्शनास आणून दिले की फ्लाईट होती पहाटे चार वा. आणि आता दुपारचे चार वाजता मग काय मी त्यांच्या ऑफिसकडे गेलो त्यांना झालेला प्रकार सांगितला आणि त्यांना नवीन तिकीट मला देण्याची विनंती केली. तो खूपच को-ऑपरेटिव्ह होता. त्याने मला थोडे कन्सेशन देऊन नवीन तिकीट देऊ केले. मी त्याचे पैसे त्यांना क्रेडिट कार्डने चुकते केले, नवीन तिकीट घेतले आणि एकदाचा मुंबईला संध्याकाळी सात साडेसातच्या सुमारास पोचलो

**पुणे ते चेन्नई**

एक तास उशिरा, विमानाची वेळ नीट न पाहिल्यामुळे

असाच अजून एक विमान प्रवासाचा अनुभव. मी पुण्याहून मद्रासला जाणार होतो आणि तिकिटावरची वेळ मी व्यवस्थितपणे पाहिली नव्हती. ती वेळ काहीतरी ०५:४५ अशी होती. मी ते नीट बघितले नाही. माझ्या डोक्यात ६:४५ अशीच होती आणि मी साडेपाच वाजता एअरपोर्टवर पोचलो. मला गेटवर सांगण्यात आलं की तुमची फ्लाईट निघाली. तुम्हाला जाता येणार नाही. तुम्हाला दुसरे तिकीट घ्यावे लागेल. तुम्ही वेळ बघा किती वाजलेत चाळीस मिनिटे आधी बंद होतात. आता तर जवळपास पाच पंचेचाळीस वाजलेले आहेत. ही सर्वस्वी माझी चूक होती. त्यासाठी मला नवीन तिकीट घ्यावे लागले. या वेळेस मात्र मला कुठल्याही प्रकारचे तिकीट कन्सेशन मात्र मिळाले नाही. पण माझी चूक असल्यामुळे मला काहीही करता आले नाही

**मुंबई ते युक्रेन जेट एअरलाईन्स**

हा पण एक विलक्षण अनुभव होता युक्रेनचा. येथे वी.वू बँकेच्या कामाच्या निमित्ताने मी जाणार होतो. माझा व्हिसा व तिकीट मी बेटी

डब्ल्यू व्हिसा सर्व्हिसेस, पुणे येथून घेतला होता. मी पुण्याहून मुंबई एअरपोर्ट ला गेलो व जेट एअरवेजच्या काउंटरवर गेलो. मला व्हिसा आहे का असे विचारले, त्याची गरज नाहीये, मी पुढे युक्रेनला जाणार आहे आणि तुमच्या मुंबई ते असे माझे तिकीट आहे. तर तिथल्या स्टाफने मला सांगितले, हे जरी खरे असले तरी पॅरिसला गरज असते तो विसा तुमच्याकडे नाहीये त्यामुळे आम्ही तुम्हाला ह्या फ्लाईटने जाऊ देऊ शकत नाही. आता काय करणार? तर ते म्हणाले की, तुम्हाला तुमचे तिकीट कॅन्सल करून नवीन तिकीट बुक करावे लागेल. ''ठीक आहे तुमचं जेट एअरवेजची फ्लाईट असेल तर त्या फ्लाईटमध्ये मला तिकीट मिळवून द्या.'' तर ''माफ करा, फ्लाईट पूर्णपणे बुक केलेली आहे.'' ''मी आता काय करू.'' तर ते म्हणाले, ''तुम्ही हे तिकीट कॅन्सल करा आणि मग तुम्हाला दुसरं तिकीट विकत घ्यावे लागेल.'' मी मुंबई एअरपोर्टवरील काउंटरला गेलो. त्याला म्हटलं, ''यात माझी काही चूक नाहीये. माझ्या ट्रॅव्हल एजंटनं मला याची कल्पना दिलेली नव्हती नाहीतर मी त्याला सूचना केली असती. तर मला तुम्ही माझे तिकीट कॅन्सल करून नवीन तिकीट बुक करून द्या.'' ''नाही ते असे शक्य नाही. आम्ही फक्त तिकीट कॅन्सल करू शकतो.'' मग मी चौकशी केली की, अजून कुठली ऑफिस किंवा ट्रॅव्हल एजंट ऑफिस आहेत का? तर मला सांगण्यात आलं की, खबर ट्रॅव्हल्स येथे आहे. तुम्ही तिथे जाऊन चौकशी करा. मी तिथे चौकशी केली, माझी फ्लाईट होती पहाटे चार वाजताची आणि साडेसहा वाजता. मला हे तुम्ही तिकीट द्या, मी क्रेडिट कार्ड दिले आणि मग लगेच त्यांना म्हटलं, हे तिकीट मला कॅन्सल करून द्या आणि त्यात तुम्ही नमूद करा की मी वेळेवर आलेलो होतो, परंतु ट्रान्सीटव्हिसा नसल्यामुळे एअरलाईन्सने माझे तिकीट कॅन्सल केले आहे. त्याने त्याप्रमाणे मला एक चिठ्ठी तयार करून दिली. याच्यावरती तुमचा शिक्का आणि सही मला हवे. तो सुरुवातीला शिक्का द्यायला तयार नव्हता. मला शिक्का हा पाहिजे नाहीतर मी एअरपोर्ट मॅनेजरला याबद्दलची कंप्लेंट करणार, म्हटल्यावर त्याने ताबडतोब मला शिक्का मारून सही करून दिला.

खरेतर जेट एअरलाइन्स चेक इन काउंटर वरती मला प्रवास करता

येणार नाही हे कळल्यावर एक प्रकारचा धक्काच बसला होता. त्यातून सावरायला मला दहा–पंधरा मिनिटे लागली. मी प्रथम काय केले. टॅक्सी ड्रायव्हरने मला एअरपोर्टवरती सोडले होते, त्याला मी फोन करायचा प्रयत्न केला परंतु त्यानं त्याचा फोन बंद केलेला होता. त्यामुळे त्याच्याशी कॉन्टॅक्ट करणे अशक्य होते. जर कॉन्टॅक्ट झाला असता तर कदाचित त्याच टॅक्सीने पुण्याला परत आलो असतो. नंतर माझा काय करता येईल याचा विचार सुरू झाला. मग मी ट्रॅव्हल एजंटला ताबडतोब एअरपोर्ट वरूनच मोबाईल मधून मेल पाठवला. सोबत जेट एअरवेजकडून मला मिळालेली कॅन्सलेशनची रिसीटही जोडली आणि त्यांना म्हणजे बीटी डब्ल्यू च्या माणसाला सांगितले की ही चूक तुमच्याकडून झालीय. त्यामुळे या तिकिटाचा पूर्ण परतावा मिळाला पाहिजे. त्याची व्यवस्था तुम्ही करा. आणि नंतर सकाळी माझे विमान दुसरे तिकीट बुक केले होते ते सुटायच्या आधी फोन करून झालेल्या सर्व प्रकाराची कल्पना दिली व तिला सांगितले की सकाळीच मी ऑफिसमध्ये जाऊन झाल्या प्रकाराची पूर्ण कल्पना त्यांना दे.

कालांतराने मी बेटी डब्ल्यू बरोबर कायम संपर्कात राहात होतो आणि त्यांना माझा रिफंड कधी मिळणार असे विचारत होतो, तर एक दिवशी मला त्यांचा फोन आला आणि त्याने सांगितलं की रिफंड येणार नाही. मी त्यांना कारण विचारलंइतर त्याने सांगितलं की पॅसेंजर एअरपोर्ट वरती रिफंड कोणाला आलाच नाही. हा दुसरा धक्का होता, पण नशिबाने मी त्यांच्या एअरपोर्टच्या कॉन्टॅक्ट ला जाऊन माझे तिकीट कॅन्सल करून घेतले व व्हिसा नसल्यामुळे जेट एअरवेज माझे तिकीट कॅन्सल करायला लागले अशी रिसीट जोडलेली होती ती बघण्यास त्यांना सांगितलं हे सगळे जर त्या वेळेस मला सुचले नसते तर माझे सुमारे ७५ हजार रुपये पाण्यात गेले असते. जेट एअरवेजसारखी मोठी कंपनी सुद्धा ग्राहकांना कशी वेठीस धरते हे एक अतिशय चांगला अनुभव किंवा एक घटना सर्वांनी लक्षात ठेवावी. नशिबाने हे कंपनीत बंद झाली आहे परंतु असाच अनुभव आपल्याला दुसऱ्या एअरलाईन्स कडूनही येऊ शकतो. म्हणून मुद्दाम हा अनुभव तुमच्याशी किंवा तुम्हाला

सांगावे असे मला वाटते त्या दिवशी जर मी त्या रिसीटवरती त्यांचा सही, शिक्का घेतला नसता तर मला माझे पैसे मिळाले नसते. म्हणजे या एलाइन्स कंपन्या सुद्धा किती पोचलेल्या असतात याचे हे जिवंत उदाहरण!

## कारने पनवेल ते पेण

आता थोडेसे माझ्या कारने केलेल्या प्रवासाबद्दल. मला १९९० साली पीएस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये मॅनेजर म्हणून काम मिळाले. ही कंपनी होती पेणला. पेण खोपोली रोडला सापोली या गावी ही कंपनी होती. पनवेलच्या माझ्या घरापासून ही कंपनी जवळपास ४५ किलोमीटर अंतरावर होती. मी सुरुवातीला सकाळी कारणे स्वतः ड्राइव्ह करत जात असे. साधारणपणे सकाळी सात वाजता निघत असे. संध्याकाळी साडेपाच सहाला काम संपले की कारने पनवेलला परत येत असे. या प्रवासातील काही अनुभव आपल्याला सांगण्यासारखा आहे. मी पेणला रोज जात असल्याचे लोकांना कळले होते. सुरुमामाच्या पनवेल येथील ऑफिसमधील एक गोडबोले नावाचा सहकारी त्याचा धकटा भाऊ जो भाऊमामाच्या सोसायटीमध्ये राहात असे. बऱ्याच वेळा मला आदल्यादिवशी भेटून उद्या किती वाजता जाणार आहे असे विचारायचा. काम होतं म्हणायचा. कारण तुमच्याबरोबर घेऊन जाल का असे विचारायचा. मी कधीही त्याला नाही म्हणायचो नाही. तर बराच वेळा त्याच्या आईला किंवा पनवेलला घेऊन येणे असा प्रकार मी केलेला आहे. याची गंमत म्हणजे, यांचे थोडे वय झालेले असल्यामुळे त्यांना गावात त्यांच्या घराजवळ सोडून मग पुढे मला माझ्या कंपनीत जावे लागायचे व जेव्हा-केव्हा त्यांना पेण पनवेलला यायचे असायचे तेव्हा त्यांच्या घरी जाऊन त्यांना मला त्यांच्या घरून पिकअप करावे लागायचे. या गोडबोले बद्दलची एक तुम्हाला गंमत सांगावीशी वाटते. एकदा हा गोडबोले पेणहून पनवेलला माझ्याबरोबर येत होता आणि आम्ही जंगलामध्ये पोचलो आणि माझ्या कारचे एक टायर पंक्चर झाला. मी गाडी बाजूला घेतली. टायर बदलायचा प्रयत्न करू लागलो. पण

बघतो तर काय स्टेपनीमध्ये हवाच नव्हती. त्या दिवशी मी माझी कार नेलेली नव्हती. माझी कार काही कामासाठी गॅरेजमध्ये दिली असल्यामुळे मी पनवेलमधील माझा मित्र राजू कोसे याची मारुती व्हॅन एक दिवसासाठी घेऊन आलो होतो. आता पहिले काम होते की जवळपास कोणी टायरचे पंक्चर काढणारा माणूस बघणे, स्टेपनीमध्ये हवा भरून घेणे आणि मध्ये जॅक लावून नंतर पुढे येणे. या सगळ्या धावपळीत मी असताना या गोडबोलेंनी मला विचारले, ''श्रीकांत, मला जर घाई पनवेल ला जायचंय तर मी पुढे गेलो तर चालेल का? मी दोन मिनिटं विचार केला, या माणसाला मी धडपड करतोय याची काही किंमत दिसत नाहीये. जाऊ दे काय बोलणार? ''ठीक आहे चालेल.'' मग मी एका टेम्पोने चार किलोमीटर पुढे गेलो. तिथे मला एक टायरवाला भेटला. त्याच्याकडून मी स्टेपनी दुरुस्त करून घेतली.

नंतर दुसऱ्या एका वाहनाने टायर घेऊन मी माझी गाडी पार्क केली होती तिथे आलो. बदलले टायर वाटेत गॅरेजवाल्याकडे थांबून पंक्चर काढून घेतले. इतक्यात बाजूला मला गोडबोले दिसला. मला म्हणाला, ''श्रीकांत, मला कुठलेही दुसरे वाहन मिळाले नाही. मी वाट बघत होतो. मी आता परत तुझ्याबरोबर आलो तर चालेल का, मी तत्परतेने त्याला हो चालेल म्हणालो मनात विचार आला, किती हा निर्लज्ज माणूस आहे, ज्या माणसाला दहा-पंधरा मिनिटे माझ्याकडे देण्यास वेळ नव्हता त्याला आज परत माझ्या गाडीत बसून पनवेलपर्यंत येण्याची लाज कशी वाटली नाही? असो. पण अशी माणसे असतात

या अशाच पेण पनवेल या प्रवासाबद्दल अजून एक आठवण म्हणजे मी खोपोली पेण रोडने गावात येऊन उजव्या बाजूला वळून पनवेलच्या बाजूला लागलो की त्या कॉर्नरला पेण रेल्वे स्टेशन होते. संध्याकाळच्या वेळेस तिथे बऱ्याच वेळा पोलीस उभे असायचे. हे सगळे आपली ड्यूटी करून पनवेलला परत जाणारे असायचे. मी माझ्या गाडीमध्ये कायम अशा पोलिसांना लिफ्ट द्यायचं. एके दिवशी एक पोलीस माझ्या बाजूच्या सीटवर बसला होता. १५ मिनिटांनी त्याने मला विचारले, ''मी झोपलो तर चालेल का?'' ''झोपा की अवश्य.'' मी इथे ड्यूटीवर येऊन मला ३६ तास झाले ना आम्हाला

जेवण करून विश्रांती घ्यायचीय. गेलो की कधी घरी जातोय दोन घास खातोय आणि झोपतोय असे झालेले आहे तर आपली हरकत नसेल तर मी झोपतो.'' ''काही काळजी करू नका, तुम्ही खुशाल झोपा.'' मग पनवेलजवळ आल्यावर मी त्यांना उठवले आणि त्यांना म्हणालो, ''पनवेल आलंय. तुम्हाला कुठे उतरायचंय ते सांगा.'' त्याला हव्या त्या ठिकाणी सोडून मी पुढे गेलो. गाडीतून खाली उतरताना त्या पोलिसाच्या चेहऱ्यावर जे कृतज्ञतेचे भाव होते ते अजूनही माझ्या लक्षात राहिलेले आहेत.

**पनवेल ते खोपोली**

१९९४ साली इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, खोपोली येथे नोकरी मिळाली. मग मी पनवेलहून खोपोलीला रोज जाऊ लागलो. हे अंतर कमी होते व संपूर्ण हायवे होता त्यामुळे वेळही थोडा कमी लागायचा. मी तिथे फक्त एक वर्ष काम केले. आमच्या कंपनीचे मालक होते मिस्टर अरोरा, सीईओ होते चावला साहेब हे एक आर्मी रिटायर्ड ऑफिसर होते. आमच्या याच कंपनीमध्ये खान नावाचा एक मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह होता याबाबतची गंमत. खान कायम गुड बुकमध्ये राहण्यासाठी बाळासाहेबांची अतिशय मर्जी संभाळून आणि त्यांना आवडेल असेच बोलत असे. आम्ही या खानची नेहमी गंमत करायचो की, तू अमीर खान नाहीयेस आणि ते जुही चावलाचे बाबा नाहीयेत. त्यामुळे इतका मस्का मारून काही उपयोग होणार नाही. आपलं काम नक्की चांगलं करत जा. त्याने तुझा फायदा होईल. याच कंपनीमध्ये अरोरा रावसाहेबांनी दिल्लीहून हरिलाल नावाच्या एका ऑपरेटरला आणलेले होते. हा हरिलाल या क्षेत्रात बरेच वर्षं काम केलेलं होतं. मुळात कामगार होता परंतु बऱ्याच वर्षांच्या अनुभवामुळे त्याला याबाबतीत आपल्याशिवाय इतर कुणालाही कळत नाही अशा प्रकारची घमेंड होती. या माणसाचे आणि माझे फारसे काही जमेल असे मला अगदी पहिल्या दिवसापासून वाटत नव्हतं आणि झाले अगदी तसेच. त्यामुळे काही दिवसांनी मी कंपनी सोडले आणि पनवेल येथे स्वतःचे एक छोटेसे युनिट चालू करायचे ठरवले

**पनवेल ते मुरबाड**

Sonal -dhesive प्रायव्हेट लिमिटेड सोडल्यानंतर साधारणपणे १९९६ साल मी सिद्धार्थ फिल्टर्स या कंपनीला जॉईन झालो. या कंपनीचा कारखाना मुरबाड येथे होता. मग मी पनवेलहून मुरबाडला रोज जाऊ लागलो. हा मार्ग पनवेल ते कल्याण आणि कल्याणवरून पुढे आळेफाटा मार्गे मुरबाड. पनवेल ते मुरबाड हे अंतर जवळपास ७५ किलोमीटर होते आणि मी रोज दीडशे किलोमीटर ड्रायव्हिंग करायचो. या कंपनीमध्ये माझे सहकारी होते प्रॉडक्शनसाठी माझा असिस्टंट होता, त्याचे नाव होते सी. आर. यादव तो पूर्वी जॉन्सन अँड जॉन्सन मध्ये इंजीनियरिंग डिपार्टमेंटमध्ये ऑपरेटर होता. त्याला कामाची जाण चांगली होते फक्त एकच होती. ते म्हणजे दारू पिणे आणि त्यामुळे त्याच्या आठवड्यातून एक-दोन दांड्या तरी ठरलेल्या असत. कामात खूप चांगला परंतु दारूच्या व्यसनामुळे एखाद दिवशी जास्त झाली दुसऱ्याविषयी दांडी असा प्रकार असे. यादव मला कल्याण येथे भेटत असे आणि मग कल्याण-मुरबाडपर्यंत माझ्या कारने तो येत असे. तसेच संध्याकाळी परत येताना मुरबाड कंपनीतून कल्याणपर्यंत मी त्याला रोज सोडत असे. त्याच्या नेहमीच्या दांड्याला कंटाळून एक दिवस साहेब त्याला म्हणाले सी. आर. वाय हे तुमचे इनिशियल असले तरी आम्हाला रोज रडायला का लावत आहे. सी.आर.वाय. याचा अर्थ म्हणजे रडणे. आम्हाला कृपया रडायला लावू नका ना. रोज वेळेत कामावर या. बाकी काही नको.

तर या सिद्धार्थ प्रिंटर्स मध्ये माझे मालक होते सिद्धार्थ आणि त्याने कोणाच्या तरी सांगण्यावरून स्वस्तात मिळते म्हणून एक मशीन घेतले होते, पण आम्हाला जे काम करायचे त्या कामासाठी त्याचा काही फारसा उपयोग नव्हता. त्यामुळे आम्ही सर्वांनी मिळून ते मशीन पूर्णपणे बदलण्याचे ठरवले. यासाठी फॅब्रिकेशन व बाकीची काही कामे करण्यासाठी आम्ही संदीप नावाच्या एका इंजिनियरला कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमले. संदीप डोंबिवलीला राहायचे. अतिशय हुशार तरुण असा

इंजिनिअर. त्याच्या कामात तत्पर. एकदा आमचे मशीनचे मॉडिफिकेशनचे काम चालू होते. संदीप थोडासा मला अस्वस्थ वाटला. मी त्याला विचारलं, ''काय झाले बाबा, आज असा तो म्हणाला काय करू? करू आज का अस्वस्थ? सहा ते नऊ सिनेमाची तिकिटं बुक केलीत बायको मागे लागले सिनेमाला जाऊया म्हणून आज काही करून मला लवकर जावे लागेल.'' ''संदीप, ते शक्य नाहीये. आपले आजचे काम पूर्ण झाल्याशिवाय आपल्याला निघता येणार नाही. मी हवे तर तुम्हाला तुमच्या घरी सोडायला येतो आपण लवकरात लवकर काम आटपून आणि मग घरी जाऊ या. याप्रमाणे आम्ही काम केले आणि आम्हाला त्याच्या घरी पोहोचायला सव्वासात वाजले होते. त्यामुळे ६ ते ९ सिनेमाचा प्रॉग्रॅम हा निश्चितपणे बारगळला होता. अपेक्षेप्रमाणे संदीपच्या बायकोला प्रचंड राग आलेला होता. आम्ही घरी गेल्यावर थोड्या वेळाने त्याची बायको माझ्यासाठी पाणी घेऊन आली. मला पाणी दिलं आणि व चहा घेणार का विचारलं, ''काही हरकत नाही चालेल.'' संदीपींर विचारलं ''मला पाणी?'' मी त्याला म्हणालो, ''संदीप, तुला पाणी वगैरे काही नाही. तुझी आता मी गेल्यानंतर बिनपाण्याने या माझ्या विनोदावर त्याची बायको सुद्धा मनमुराद हसली आणि जो काही थोडासा तणाव निर्माण झाला होता तो निवळला नंतर मला संदीप भेटला आणि म्हणाला, ''सर आम्ही नऊ ते बाराच्या शोला गेलो आणि एकंदरीत हा प्रकार झाला होता तुम्ही घरी आल्यामुळे तो बघता-बघता निवळून गेला. तुम्हाला या बद्दल धन्यवाद द्यायचे होते.'' ''ठीक है, कोई बात नही. असं होतं रे बाबा. समजून घे तुझ्या बायकोला सिनेमा बघता आला उशिरा का होईना.'' पण या सगळ्या नंतर माझा आणि संदीपचा संबंध फारसा राहिलेला नाही. कारण त्या काळात मोबाईल वगैरे काही नव्हते. आता तो कुठे असतो काय करतो काही कल्पना नाही, पण त्याचे बऱ्यापैकी चांगले काम चालले असावे असे वाटते

## पुणे ते नासिक ते पुणे

मी २००४ ते २००८ पर्यंत दुबईमध्ये नोकरी केली. दुबईत असताना नाशिकचे संदीप कौशिक यांच्याशी माझा संपर्क आला आणि संदीप कौशिक यांच्या नाशिक येथील मोंटॅक्स फायबर ग्लास प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत मी फुलटाइम टेक्निकल ॲडव्हायझर म्हणून काम करण्याचे ठरले. मी २००८ डिसेंबरमध्ये परत आलो व २००९ जानेवारीपासून मोंटॅक्स ग्लासमध्ये काम करू लागलो. इथे काही दिवस मी हॉटेलात राहत असे. पण एकंदरीत हॉटेलचा खर्च व एक प्रकारचा परावलंबी जीवन याचा कंटाळा आल्यामुळे मी नाशिकमध्ये इंदिरानगर या भागात एक फ्लॅट भाड्याने घेतला. माझे पहिले काम होते की एक नवीन प्रोजेक्ट सुरू करण्यासाठी याचा प्रोजेक्ट रिपोर्ट बनवणे या कामात माझे जवळजवळ दीड ते दोन महिने गेले. मी प्रोजेक्ट रिपोर्ट तयार केला व आमच्या कंपनीतल्या सीए व बाहेरचे एक या दोघांना त्याचा अभ्यास करून तो स्टेट बँकेला सादर करण्यासाठी जवळपास आणखीन दोन महिने लागले. दर आठवड्यात हे दोघेजण नाशिकला घेऊन या प्रोजेक्ट रिपोर्टसंबंधी माझ्याशी चर्चा करीत असत. शेवटी मी बनवलेला रिपोर्ट थोड्याफार फरकाने त्यांनी स्टेट बँकेला सादर केला व स्टेट बँकेने विक्रमी वेळात म्हणजे साधारण दोन ते तीन आठवड्यांत आमचे कर्ज मंजूर केले. ते कर्ज होते जवळपास दीड ते दोन कोटींचे. या कामामुळे मला प्रोजेक्ट रिपोर्ट बनवण्यामध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला. त्याचा मला पुढे माझ्या कन्सल्टन्सीच्या कामांमध्ये खूप उपयोग झाला.

या प्रोजेक्टसाठी आम्ही नितीन हिरो मशीन– आर.के.गुप्ता यांच्याकडे कोटिंग मशीनची ऑर्डर दिली. त्यांना कोटिंग मशीनचे पूर्ण स्पेसिफिकेशन ड्रॉईंग वगैरे मी एम एस एक्सेल मध्ये बनवून दिली. या कामासाठी मला बऱ्याच वेळा जावे लागायचे. तसा मी दुबईत असताना सुद्धा बऱ्याच वेळा कंपनीच्या कामासाठी ये-जा करीत असे. दुबई ते चेन्नई आणि एखाद दिवस पुणे असा माझा त्यावेळेस प्रवास. गुप्तासाहेबांनी मशीन

बनवले व ते नाशिकच्या आमच्या फॅक्टरीत बसवले. दरम्यान आता या कंपनीमध्ये आपण शेवटपर्यंत काम करू शकू असे वाटल्यामुळे मी इंदिरानगरमध्ये १ बीएचके फ्लॅट विकत घेतला व तिथे मी माझा संसार परत एकदा थाटला. मला आठवते, संकष्टीला मी खिचडी करून डब्यात घेऊन जात असे. संदीप कौशिकला मी केलेली खिचडी खूप आवडायची आणि बऱ्याच वेळा तो संकष्टीच्या दिवशी मला आठवण करून माझ्या डब्यातील खिचडी हमखासपणे बघत असेल. या अनुभवामुळे मी संकष्टीला जास्तच खिचडीबरोबर घेऊन जात असे

या इंदिरा नगरमधील सोसायटीचे नाव होते नारायण पार्क. छान चांगले शेजारी होते. गाडी पार्क करायला जागा होते आणि मुख्य म्हणजे कंपनीपासून अगदी जवळचे दोन-तीन किलोमीटर आहे. या फ्लॅटमध्ये सुद्धा काही आठवणी सांगण्याजोग्या आहेत. आमच्या शेजारी गुप्ते नावाच्या एक मॅडम राहात असत. त्यांना दोन मुले होती. एक मुलगा, एक मुलगी. काही दिवसांपूर्वीच त्यांचे मिस्टर काही किरकोळ आजारातून मरण पावले होते. गुप्ते मॅडम यांचे वडील त्यांच्यासोबत राहात असत. त्या काळात स्वाईन फ्लूची साथ आली होती आणि गुप्ते मॅडमच्या मुलीला एक दिवशी रात्री एकदम बरे वाटेना. गुप्ते मॅडमच्या मुलांनी आमच्या दारावरची बेल वाजवली आणि मी दार उघडले. गुप्ते मॅडम म्हणाल्या, आठवले सर, माझ्या मुलीला फार बरं नाहीये. तुम्ही कृपया आम्हाला एखाद्या हॉस्पिटलमध्ये घेऊन जाल का? ठीक आहे, आपण जाऊ. या गावात. एका हॉस्पिटलमध्ये डॉक्टर उपलब्ध होते. तिथे त्या मुलीला जी जरुरी ट्रीटमेंट हवी होती ती घेतली आणि रात्री दोन वाजता आम्ही परत आलो. त्यांना घरी सोडून झोपी गेला.

माझा फ्लॅट छान होता आणि घरात सगळ्या सुखसोयी मी करून ठेवलेल्या होत्या. त्यामुळे मी सगळ्या नातेवाइकांना आमंत्रण द्यायचो. ''तुम्ही या नाशिकला. पण दिवसभर तू कामावर जाणार आम्ही काय करणार?'' काही नाही आराम करा, मी संध्याकाळी परत आलो की आपण काहीतरी गंमत करत जाऊ, इकडे तिकडे फिरत जाऊ, तर

एकदा भाऊ मामा असे तिघेजण तीन-चार दिवस नाशिकला माझ्या इथे राहण्यासाठी आल्या. काही निमित्ताने दोन-तीन सुट्ट्या जोडून आलेले होत्या. त्यामुळे मला कंपनीत जायचे काही कारण नव्हते आणि हे तीन-चार दिवस आम्ही खूप मजेत घालवले. विशेष म्हणजे या तीन-चार दिवसात आम्ही एकदाही बाहेर कुठे जेवायला वगैरे गेलो नाही. सकाळचा नाश्ता सकाळचे जेवण, संध्याकाळचा नाश्ता रात्रीचे जेवण हे सगळे आम्ही सर्वांनी मिळून घरीच केले. मी करत होतो, काही वेळा भाऊमामा थोडी मदत करे, तर काहीवेळा विभा मदत करे, इथली एक गंमत सांगण्याजोगी म्हणजे अभिमान इथे आल्यापासून कायम आमच्या सुफ्यावर आडवा असायचा. ते बघून एक दिवस सुरुमामा म्हणाला, ''अरे आराम करतोस ठीक आहे, पण जरा कूस तरी बदल. एकाच बाजूला सारखा झोपून वाढवावी लागेल हा विनोद अजूनही माझ्या लक्षात आहे.

■ ■

## १०. विविध ठिकाणचे अपघात

काका शिडीवरून खाली पडले तो प्रसंग.

या घटनेचा उल्लेख, माझ्या कारवारच्या आठवणीमध्ये सविस्तर पणे केला आहे. किमनिक रबर फॅक्टरी मध्ये, रात्री कामगाराचा मिक्सिंग मिल मध्ये हात जाणे. साधारणपणे १९७५ किंवा ७६ सालची गोष्ट आहे. मी रबर मॅन्युफॅक्चरर्स, कळंबोली येथे नोकरी करत असतानाची हकिकत आहे. आमच्या कंपनीच्या शेजारी कोचरेकर यांची किमनिक रबर इंडस्ट्रीज ही छोटी फॅक्टरी होती. मी माझी ड्यूटी संपवून घरी म्हणजेच भाऊमामाच्या घरी गुलमोहर पनवेल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीमधल्या घरी आलो होतो. संध्याकाळी कोठे तरी फिरून वगैरे आलो. त्या दिवशी पनवेलमध्ये मी घरी एकटाच होतो. मामा-मामी कुठेतरी बाहेरगावी गेलेले होते. रात्री साधारणपणे दहा-साडेदहा वाजता, मला किमनिक रबर इंडस्ट्रीमधून कोणाचा तरी फोन आला. आता नाव आठवत नाहीये. तिथे एक अपघात झाला होता. त्यांच्या रबर मिक्सिंग मिलमध्ये इथे काम करणाऱ्या एका कामगाराचा हात अडकला होता. कसेबसे त्यांनी ते मशीन बंद करून त्याचा हात बाहेर काढला होता, परंतु गंभीर जखम, फ्रॅक्चर वगैरे झाले होते. मला त्यांनी

विनंती केली, तुम्ही काहीतरी व्यवस्था करा व एखादा डॉक्टर मिळतो का पाहा. गंभीर असा अपघात झालेला आहे. कळंबोली ते पनवेल पाच किलोमीटर अंतर होते, परंतु त्या काळी, अतिशय मागासलेले असे खेडेगावात होते. तिथे कुठल्या सुखसोयी, डॉक्टर, दवाखाना वगैरे काहीच नव्हते. त्यामुळे पनवेलहून काहीतरी करणे गरजेचे होते. मी पनवेलमध्ये तसा नवीन होतो त्या वेळेस, मला कुठलेही वाहन वगैरे चालवता येत नव्हते. आता काय करावे या विचारात मी होतो. एकदम डोक्यात विचार आला की, आपण डॉक्टर बापट यांच्या घरी जाऊ व त्यांना याची कल्पना देऊ व त्यांना विनंती करू की, माझ्याबरोबर तुम्ही कंपनीत चला. डॉक्टर बापट हे पनवेल येथील विरुपाक्ष मंदिराजवळ राहात असत. मी रात्री साडेदहाच्या सुमारास त्यांच्या घरी गेलो. त्यांच्या दारावरची बेल वाजवली. पनवेल त्या काळी छोटे गाव असल्यामुळे साडेआठ नंतर सगळे शांत शांत असे वातावरण असे. डॉक्टर बापट यांनी लगेच दार उघडले, त्यांना पण एकदम कळेना, आता या वेळी कोण आले असेल? दार उघडल्यावर मला त्यांनी पाहिले. मला ते ओळखत होते. भाऊमामाची आणि त्यांची चांगली ओळख होती. कदाचित त्यामुळे असेल त्यांना थोडक्यात झालेला प्रकार सांगितला व त्यांना विनंती केली की, आपण जर माझ्याबरोबर आत्ता आला तर बरं होईल. आपण त्या कंपनीत जाऊन त्या माणसाला First aid देणे गरजेचे आहे व जमले तर त्याला पनवेलला घेऊन एखाद्या हॉस्पिटलमध्ये ताबडतोब भरती करावे. माझ्या विनंतीस मान देऊन डॉक्टर बापट ताबडतोब माझ्या बरोबर निघाले.

आम्ही दोघे किमनिक रबरमध्ये गेलो. डॉक्टर बापट यांनी या माणसाचा ताबडतोब First aid दिला. त्या कामगाराला पनवेलला घेऊन आलो आणि एका हॉस्पिटलमध्ये त्याला भरती केले. दुसऱ्या दिवशी त्या कामगाराचे ऑपरेशन वगैरे झाले. किमनिक रबरचे तीन डायरेक्टर होते. एक कोचरेकर, दुसरे महाजनी आणि तिसरे भाटिया.

या तिघांनी मला दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी प्रत्यक्ष भेटून वेळेवर जी मदत त्यांच्या कामगारांना मिळाली, त्याबद्दल माझे आभार मानले व माझे खूप कौतुक केले. नाती किंवा संबंध हे असे जोडले जातात. किमनिक रबरमध्ये बहुतांशी कोणीतरी एक जण मुक्कामाला कंपनीमध्ये राहात असे. नेमकं त्या दिवशी या पैकी कोणीही उपलब्ध नव्हते।

**माझा स्कूटरचा ठाणे खाडी पुलावरील अपघात**

काही प्रसंग आपल्या मनावर कायमचे कोरले जातात तसाच माझा स्कूटरवर झालेला अपघात. साधारणपणे १९८५ साली मी जॉन्सन अँड जॉन्सन या कंपनीमध्ये नोकरी करत होतो. माझी अल्विन पुष्पक नावाची स्कूटर होती. तो रविवार होता हे मला नक्की का आठवते तर जॉन्सन आणि जॉन्सनमध्ये आम्हाला साप्ताहिक सुट्टी शनिवारी व रविवारी अर्धा दिवस सुट्टी असे. त्या दिवशी रविवार असल्यामुळे अर्धा दिवस काम करून लवकर घरी परत येता यावे यासाठी मी स्कूटर घेऊन गेलो होतो. येताना त्या काळचा नवीन खाडीपूल, मानखुर्द आणि वाशी गाव याला जोडणारा, या पुलावरून येत असताना पुलावर बरेच खड्डे पडलेले होते. मी हेल्मेट वापरत होतो, परंतु एका खड्ड्यात माझी स्कूटर गेली आणि नंतर काय झाले माझे मला कळले नाही. बहुतेक पुढचे चाक जाम झाले होते. मी स्कूटरवरून फेकला गेलो. रस्ता खराब असल्यामुळे, मला बरेच लागले, परंतु हेल्मेट घातल्यामुळे डोक्याला मार लागला नाही. त्या दिवशी, मी बरोबर स्कूटर दुरुस्ती करण्यासाठी, बरेच काही साहित्य विकत घेतले होते. ते सर्वत्र विखरून पडले. मागून एक जीप येत होती. एक साऊथ इंडियन माणूस जीपमध्ये होता. त्याने माझा हा अपघात बघून जीप बाजूला थांबवली. धावत माझ्याजवळ आला. मला त्याने उठवून पुलाच्या बसवलं. त्याच्या ड्रायव्हरने माझी स्कूटर उभी करून रस्त्याच्या कडेला लावली. सर्वत्र विखुरलेले पार्ट (नवीन विकत घेतलेले) त्यांनी गोळा केले. एका पिशवीत भरले आणि मला विचारले, ''आता तर

काय करशील? कुठे राहतोस?'' मी पनवेलला राहतो असे सांगितले. आता बस पकडून मी पनवेलला परत जाईन असे म्हटले. हा खरंच भला माणूस होता. मला म्हणाला, ''एक काम कर. तू आमच्याबरोबर आमच्या जीप मध्ये बस. आम्ही तुला जिजामाता हॉस्पिटलमध्ये वाशीला घेऊन जातो. तिथे तू आत जाऊन First aid घे आणि मग मी तुला वाशीच्या बस स्टँडवर सोडतो. तिथून तू पुढे जा.'' आम्ही जिजामाता हॉस्पिटलजवळ गेल्यावर तो म्हणाला, ''मी आतमध्ये मात्र येणार नाही. तू आज जाऊन काय झालं तो प्रकार डॉक्टर सांग आणि ते तुला प्रथमोपचार नक्की देतील.'' त्याप्रमाणे मी आत गेलो आणि मला लगेच प्रथोमपचार मिळाला.

मी हॉस्पिटलमधून बाहेर आलो. या सदगृहस्थाने मला विचारले, ''आता काय करणार पुढे?'' मी म्हटले की आता बसने मी पनवेलला घरी जातो. पण तो म्हणाला, ''नाही, तुला खूप मार लागला आहे. एक काम कर थोडा वेळ माझ्या घरी चल. तेथे थोडा वेळ आराम कर. तुला जरा बरं वाटू लागलं की, मी तुला बस स्टँडला सोडतो.'' मग मी त्याच्या घरी गेलो. थोडा वेळ त्याच्या घरी आराम केला. नंतर म्हटलं, ''आता मला बरं वाटतंय, आता मला बस स्टॅन्डपर्यंत सोडाल तर बरं होईल. मी आता घरी जातो.'' तो बस स्टॅन्डपर्यंत आला व नंतर त्याच्या मनाने काय विचार केला, माहीत नाही. तो म्हणाला, ''तू असं जाऊ शकणार नाहीस. मी तुला पनवेलला सोडायला येतो.'' आणि हा गृहस्थ चक्क मला पनवेलला घरी सोडायला आला. ह्या माणसाचं नाव माझ्या लक्षात नाहीये पण त्यांनी माझ्यासाठी जे काही केलं ते मी या आयुष्यात कधीही विसरणार नाही. आता या गोष्टीला जवळपास ३५ वर्षे होऊन गेली, पण तो प्रसंग माझ्या चांगलाच लक्षात राहिला आहे. त्याच्या घरी जाऊन आल्यामुळे त्याचे घर मला माहीत झाले होते. त्या काळी मोबाइल फोन वगैरे काहीच सोय नव्हती, पण या माणसाने जे माझ्यासाठी केले त्या उपकाराची परतफेड म्हणून मी

एक दिवस संध्याकाळी त्याच्या घरी गेलो. त्याच्यासाठी मी एक कॅसेट तयार केली होती. या कॅसेटमध्ये बरीच हिंदी, मराठी, जुनी गाणी रेकॉर्ड केलेली होती. जीपमधून प्रवास करताना माझ्या लक्षात आले होते की, या गृहस्थाला गाण्याची खूप आवड होती. त्याच्या मते, गाण्याला कुठलीच भाषा नसते किंवा कुठलाही धर्म नसतो. चांगलं गाणे कधीही ऐकायला आवडते. हे माझ्या लक्षात होते. त्यामुळे तो साउथ इंडियन असला तरी माझ्या आवडीची व माझ्या संग्रही असलेले काही हिंदी व मराठी गाणी या कॅसेटमध्ये रेकॉर्ड करून त्याच्यासाठी घेऊन गेलो होतो. या गृहस्थाला या माझ्या कृतीचेसुद्धा खूप कौतुक वाटले होते.

जॉन्सन अँड जॉन्सनमध्ये काम करीत असताना एकदा मी आणि प्रथिता स्कूटरवरून पार्ल्याला चाललो होतो. घाटकोपर स्टेशनचा ब्रिज क्रॉस केल्यावरच्या पुढील रस्त्यावर डांबरीकरणाचे काम चालू होते. आमची स्कूटर होती. त्या ओल्या डांबरावरून स्कूटर घसरून मी खाली पडलो. माझा शर्ट डांबराने पूर्ण माखला गेला. नंतर आम्ही तसाच पार्लेला गेलो व शर्ट बदलला. त्या दिवशी मुक्काम होता. आप्पांना खूप काळजी वाटत होती की मला कुठे लागले नाही याची, पण नशिबाने तशी काही दुखापत वगैरे झाले नव्हती. कारण स्कूटरचा वेग फार कमी होता.

फुटूरिस्टीक टेपमध्ये असताना, मी आणि माझे साहेब, माझ्या हिरव्या रंगाच्या मारुती व्हॅनने काही कामासाठी नाशिकला गेलो होतो. नाशिकहून चेंबूरला कुमार साहेबांना भेटणेसाठी, नाशिक-मुंबई महामार्गावर, भिवंडी नजीक मला गाडीमध्ये काहीतरी जळल्याचा वास आला. मी गाडी बाजूला लावून खाली उतरून पाहिलं तर काय, व्हॅनच्या वायरिंगने पेट घेतला होता. अगदी योग्य वेळी जळका वास आल्यामुळे पुढील अनर्थ टळला होता. मी ताबडतोब रस्त्यावरील माती, वाळू गोळा करून, त्या जळणाऱ्या वायरवर फेकून, आग

वीझवली. कुमार साहेबांना फोन करून, त्यांचा ड्रायव्हर व गाडी मागविली व माझी van tow करत, चेंबूरला घेऊन गेलो. दुसऱ्या दिवशी मी ही गाडी विकून टाकली. नंतर जवळपास एक वर्ष मी स्कूटरने कंपनीत जात होतो. अगदी जिवावर बेतलेले, थोडक्यात निभावले.

पनवेलला कोकण रबरमध्ये काम करीत असताना एकदा शैलजा मामीचे ठाण्याला काहीतरी काम होतं. मामाला वेळ नव्हता म्हणून मामा मला म्हणाला, ''तू स्कूटर घेऊन मामीला ठाण्याला घेऊन जा. तिथले काम झाले की परत या.'' आम्ही निघालो. स्कूटरला ब्रेक थोडा कमी लागत होता. तळोजाजवळ तेव्हा रस्ता खूपच अरुंद होता. अचानकपणे काही म्हशी आडव्या आल्या. मी ब्रेक लावायचा प्रयत्न केला, पण तो काही लागला नाही. आम्ही दोघेही स्कूटरवरून खाली पडलो. मला थोडेफार खरचटले. मामीला मात्र गुडघ्याला मार लागला आणि मुख्य म्हणजे तिचा चश्मा या सगळ्या भानगडीत फुटला. आम्ही दोघेही तसेच ठाण्याला गेलो. ठाण्यात मामीचे जे काय काम होते ते केले. परत पनवेलला आलो आणि मग सरळ मामीच्या डॉक्टर पोतनीस यांच्याकडे गेलो. डॉक्टरांनी विचारले, ''काय झाले?'' मामीने सांगितले, स्कूटरवरून जात असताना असा अपघात झाला. डॉक्टर म्हणाल्या, ''ठीक आहे. आता कशा आलात?'' मामी म्हणाली, ''स्कूटरवरून आलो व सरळ तुमच्याकडे आलोय.'' डॉक्टर म्हणाल्या, ''धन्य आहे तुमची. इतके सर्व होऊनही तुम्ही अजूनही स्कूटरवर फिरत आहात? तुमची कमाल आहे.'' दुसऱ्या दिवशी पहिले काम म्हणजे मेकॅनिककडे जाऊन स्कूटरचा ब्रेक ठीक करून घेतला.

स्कूटरवरील अजून एक आठवण म्हणजे कोकण रबरमध्ये आम्ही काम करत असताना आमचे येथे फॅक्टरी इन्स्पेक्टर, मिस्टर बोर्जिस एकदा फॅक्टरी व्हिजिटला आले होते. नंतर दुसऱ्या फॅक्टरीत जात असताना त्यांच्या स्कूटरचा अपघात झाला. त्यांना बऱ्यापैकी मार

लागला होता. त्यांचा मामांना फोन आला. ते पनवेलमध्येच कुठेतरी होते. ते म्हणाले, ''माझा अपघात झालाय. मी हॉस्पिटलमध्ये आहे. माझी स्कूटर अमुक ठिकाणी ठेवलेली आहे, ती कृपया पार्ल्याला पोहोचवता येईल का?'' मी तेव्हा नवीनच स्कूटर शिकलेला होतो. मामाला वेळ नव्हता. मामा मला म्हणाला, ''तू त्या सांगितलेल्या ठिकाणी जा स्कूटर घे आणि पार्ल्याला त्यांच्या घरी स्कूटर सोडून ये.'' मला मुंबईची फारशी काही माहिती नव्हती, पण मामाने सांगितले म्हणजे हे काम करणे भाग होते. मामांनी काही खुणा सांगितल्या, मला म्हणाला नाही कळलं तर विचार. कोणीही सांगेल आणि मग विचारत विचारत ती स्कूटर घेऊन पार्ल्याला गेलो. बोर्जिस साहेबांच्या घरी स्कूटर लावली तसेच त्यांना कळवले व मग बसने पनवेलला परतलो.

**तेजाचा पेण जवळील अपघात**

मी पनवेलला राहात असताना पीएसएल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड येथे नोकरी करत असतानाची ही घटना आहे. साधारणपणे १९९१-९२ सालची असे. शेखरदादा सप्रे यांची मुलगी तेजा व तिचे काही क्लासमेट हे एका सहलीसाठी जीपने कोकणात गेले होते. कोकणातून परत येत असताना पेणजवळ कुठेतरी त्यांच्या जीपला अपघात झाला. तिच्या काही मित्रांना किंवा मैत्रिणीला थोडीफार दुखापत झालेली होती. ते ज्याच्या लक्षात होते की मी पेण येथे नोकरीस रोज येत असे. बहुतेक तिच्याकडे माझा फोन नंबर होता किंवा शेखरदादा कडून घेतला असावा. मला ऑफिसमध्ये पेणमध्ये तेजाचा फोन आला व झाल्या प्रकाराची कल्पना तिने दिली. माझ्याकडे तेव्हा बहुतेक मारुती व्हॅन होती. मी लगेच ऑफिसमधून बाहेर पडलो. तिने सांगितलेल्या ठिकाणी गेलो. सर्वांना पेणमध्ये दवाखान्यात घेऊन गेलो. त्यांना first-aid वगैरे मिळाला. जीपला फार काही झालं नसल्यामुळे नंतर ते त्याच वाहनातून पुढे मुंबई निघाले. ही घटना मी विसरलो होतो, पण

मध्यंतरी कधीतरी तेजा भेटली होती तेव्हा तिनेच मला या गोष्टीची आठवण करून दिली.

मी PSS येथे नोकरी करत असताना आमच्या कंपाऊंडमध्ये तीन फॅक्टरी होत्या. एक म्हणजे PSS जिथे मी नोकरी करत होतो, त्याच्या शेजारी नंजाप्पा पेपर प्रायव्हेट लिमिटेड आणि त्याच्या शेजारी लिमिनार इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड. यापैकी नंजाप्पा पेपरमध्ये पॅकेजिंगसाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या पेपरचे प्रॉडक्टस् तयार होत असत. एके दिवशी दुपारच्या वेळेस नंजाप्पा पेपर मधील लॅमिनेशन मशीनमध्ये एका कामगाराचा हात अडकला आणि गंभीर स्वरूपाची जखम झाली. त्याचा हातसुद्धा फ्रॅक्चर झाला होता. त्यांच्या फॅक्टरीतील सुपरवायझर प्रत्यक्ष धावत माझ्या ऑफिसमध्ये आला. मला म्हणाला, ''साहेब, मला तुमची मदत हवी आहे. आपण या माणसाला घेऊन पेणला एका दवाखान्यात जाऊ या.'' आम्ही ताबडतोब या माणसाला माझ्या कारमध्ये मागच्या सीटवर झोपवून पेण येथील एका दवाखान्यात घेऊन गेलो. तेथील डॉक्टरांनी ताबडतोब प्रथमोपचार केला, पण एकंदरीत त्याची परिस्थिती बघून ते म्हणाले की, ''हे गंभीर प्रकारचे फ्रॅक्चर आहे. तुम्ही त्याला ताबडतोब पनवेलला हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलात तर बरं होईल.'' मग तो जखमी कामगार त्यांचा सुपरवायझर व मी पनवेलला निघालो. पनवेलला आमच्या घराजवळ डॉक्टर पुराणिक यांचे हॉस्पिटल होते. या हॉस्पिटलमध्ये आम्ही त्याला भरती केले. डॉक्टर पुराणिक स्वतः उपलब्ध होते. त्यांनी ताबडतोब एक्स-रे वगैरे सगळी व्यवस्था करून फ्रॅक्चर झाल्याचे मला सांगितले. आता काय करायचे असे विचारले. मी त्याला म्हटलं, ''ठीक आहे, ऑपरेशन वगैरे करायचं असेल ते ताबडतोब आपण चालू करा. मी तुम्हाला काय ॲडव्हान्स वगैरे हवा असेल तर देतो. त्यांच्या मालकांना कळवतो. ते उद्या तुम्हाला भेटून पूर्ण पैसे द्यायची व्यवस्था करतील.'' याप्रमाणे ताबडतोब ऑपरेशन वगैरे वेळच्यावेळी पार पडले. संध्याकाळी पेपर मिलचे

मालक जगदीश नंजाप्पा यांना मी फोनवरून झालेल्या प्रकाराची कल्पना दिली. दुसऱ्या दिवशी ते स्वतः आले. ते हॉस्पिटलमध्ये कामगाराला भेटून डॉक्टरांना भेटून बाकी सगळी व्यवस्था करून पेणला फॅक्टरीमध्ये आले. आल्या-आल्या प्रथम ते माझ्या ऑफिसमध्ये आले. माझा हात हातात घेऊन त्यांनी माझे भरभरून कौतुक केले. धन्यवाद दिले. म्हणाले, ''तुम्ही अतिशय वेळेवर खूप चांगली मदत केली. त्याबद्दल आम्ही आपले ऋणी आहोत.''

**पालघर येथील हायटेक टेप प्रा. लि.**

येथे नोकरी करत असतानाची ही घटना आहे साधारणपणे १९८८-८९ सालची. हिंदुजा हॉस्पिटल ही आणखीन एक घटना मनात कायम घर केलेली आहे. पनवेलचा माझा मित्र, अँजीलो लुईस, (रबर टेक्नॉलॉजी आम्ही दोघांनी एकदम केलेली होती.) आमच्या शेजारी असणाऱ्या स्पासा रबर प्रायव्हेट लिमिटेडमध्ये प्रॉडक्शन मॅनेजर म्हणून काम करत होता. माझे पनवेलमध्ये आल्यावर झालेल्या काही मित्रांपैकी एक. एक अतिशय उमदा, खूप छान स्वभावाचा. लोकांना मदत करणारा व कायम हसतमुख असा एक विलक्षण माणूस. रबर टेक्नॉलॉजी आम्ही केले १९७५-७६ साली. आम्ही पनवेलहून मुंबईला सेंच्युरी बाजार प्रभादेवी येथे इंडस्ट्रीज मनोर या बिल्डिंगमध्ये आठवड्यातून तीन दिवस संध्याकाळी सहा ते आठ लेक्चर्सला जायचं.

नंतर परीक्षेच्या आधी एक महिना Intensive Training ला सुद्धा जायचो. बऱ्याचवेळा आम्ही अविमामाच्या मराठा मंदिर येथील रिझर्व्ह बँक क्वार्टरमध्ये (म्हणजेच भायखळ्याला किंवा मुंबई सेंट्रल स्टेशनच्या समोर) अभ्यासाला एकत्र बसत असू. तर या लुईसवरती साधारणपणे १९८८ साली, (स्पासा रबर प्रायव्हेट लिमिटेडमध्ये संप झाला व) संपावरील कामगारांनी, नवीन पनवेल येथे एके दिवशी सकाळी खुनी हल्ला केला. दोघातिघांनी पकडून एकाने त्याच्या पोटात चाकू खुपसला. त्याने खूप आरडाओरडा केला. मदतीसाठी कोणीही पुढे आले नाही

त्याची बायको म्हणजेच, पायोनियर सोसायटी, पनवेल येथे आमच्या समोरील घरात राहणारे, श्री. भोपळे मास्टर (पनवेल रेल्वे स्टेशन), यांची मुलगी नूतन माझी चांगल्यापैकी मैत्रीण होती. नूतनला कोणीतरी या घटनेबद्दल सांगितले. मग बिचारीची खूप धावपळ झाली. तिने ताबडतोब हॉस्पिटलमध्ये नेले. पनवेल येथे हॉस्पिटलमध्ये काही उपचार होऊ शकले नाहीत व लुईसला सायन हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. या सुमारास मी पालघर येथे हायटेक टेपमध्ये नोकरी करत होतो. लगेचच्या शुक्रवारी मी त्याला भेटायला गेलो. काही दिवस बरा होता, परंतु अचानक त्याची तब्येत बरेच ढासळली म्हणून मग हिंदुजा हॉस्पिटलमध्ये त्याला हलविण्यात आले. जवळपास २ महिने तो मृत्यूशी झगडत होता, परंतु एके दिवशी मृत्यूने त्याला गाठलेच. नेमका शुक्रवार होता, मी हॉस्पिटलमध्ये होतो. नंतर त्याचा देह त्याच्या, मेट्रो सिनेमा जवळील मुंबईच्या घरी व नंतर चर्चमध्ये नेण्यात आला. ख्रिश्चन समाजात, चर्चमधील दफनभूमीत, प्रत्येक कुटुंबाला ठरवून दिलेल्या जागी, हा देह पुरण्यात येतो. त्या आधी मृत देहाला, नवीन सूट-बुटात सजवण्यात येते. हे सर्व सोपस्कार झाल्यावर, मृताच्या घरी जाऊन, सर्वांना भेटून, एक एक घोट वाईन घेणे असा एक प्रघात असतो. तो दिवस अजूनही लक्षात आहे. एक चांगला मित्र दुर्दैवाने गमावला याची खंत अजून ही मनात ताजी आहे.

मी 'हायटेक टीप्स' पालघर येथे नोकरी करत असताना सुरुवातीला सहा महिने रोज पनवेलहून पालघरला प्रवास करत असे, पण फॅक्टरी सुरू झाल्यावर मी तिथेच पालघरमध्ये एक फ्लॅट भाड्याने घेतला होता. येथील एक आठवण हा अपघात नाहीये, पण पूर्वीच्या काळी दरोडेखोर येऊन कसे दरोडा घालत असत ते प्रत्यक्ष मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. मी राहतो तो फ्लॅट दुसऱ्या किंवा तिसऱ्या मजल्यावर होता. रात्री साधारणपणे साडेबारा-एकच्या सुमारास खूप मोठा आवाज झाला. आधी काय होते ते कळलेच नाही. नंतर खिडकीतून खाली

पाहिले तर आमच्या समोरच्या काही बंगले असलेल्या सोसायटीमध्ये, एका बंगल्यावर सात-आठ दरोडेखोर दरोडा घालायच्या बेताने आले होते. त्यांनी आपल्याबरोबर लाकडाचा एक मोठा ओंडका आणला होता. तो उचलून समोरच्या दारावरती आपटून त्यांनी ते घर फोडलं. घरामध्ये राहणाऱ्या सर्व माणसांना धाक दाखवून त्यांच्या मुसक्या आवळल्या. घरातून जे काय मिळेल ते त्यांनी लंपास केले. नंतर असे कळले की, या बंगल्यामध्ये एक तलाठी राहत असे व हा तलाठी त्याच्या ऑफिसमध्ये अतिशय कुप्रसिद्ध असा माणूस होता. कुठलेही काम पैसे घेतल्याशिवाय तो करत नसे, अशी त्याची ख्याती होती. याच रागापोटी एखाद्या खेडेगावच्या लोकांनी मिळून हा घातलेला दरोडा असावा अशी माझी समजूत होती. नंतर याबद्दल फारशी काही माहिती मिळाली नाही, पण तो प्रसंग अजूनही माझ्या डोळ्यांदेखत घडलेला असल्यामुळे तसाच जिवंत आहे.

**आप्पाचा गोदरेजमधील जीवघेणा अपघात**

आप्पांचा गोदरेज कंपनीमध्ये झालेला अपघात ही असाच. कधीही न विसरता येईल असा. साधारणपणे १९८५ सालची ही गोष्ट असावी. तेव्हा मी जॉन्सन आणि जॉन्सनमध्ये सफेद पूल येथे नोकरीस जात असे. एके दिवशी मला दुपारी कंपनीमध्येच पार्ल्यातून फोन आला. फोनवर आई बोलत होत्या. त्यांनी मला आप्पांचा अपघात झाल्याचे बातमी सांगितली. त्यांना नानावटी हॉस्पिटलमध्ये ठेवले असे कळवले. मी कंपनीतून लगेच निघालो आणि नानावटी हॉस्पिटलमध्ये पोहोचलो. गोदरेज कंपनीने आप्पांच्या या अपघाताची पूर्ण जबाबदारी स्वीकारून त्यांना ताबडतोब हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. आता अपघात कसा झाला याबद्दल थोडेसे मला आठवते. पावसाळ्याचे दिवस होते. या काळात आप्पा सेवानिवृत्त झाले होते, परंतु वेगवेगळ्या कंपनीमध्ये मॅनेजमेंट ट्रेनिंग ते घेत असत. अशाच एका ट्रेनिंग प्रोग्रॅमसाठी ते गोदरेज या कंपनीत गेले होते. त्यांना घेण्यासाठी गोदरेज कंपनीने घरी

मारुती व्हॅन व ड्रायव्हर पाठवला होता. गाडी गोदरेज कॅम्पसमध्ये आत शिरल्यावर एका विशिष्ट बिल्डिंगच्या समोर पार्क करत असताना ड्रायव्हरचा पाय कदाचित ओला झालेला असल्यामुळे ब्रेकवरून सटकला आणि ॲक्सिलेटरवर गेला आणि मारुती व्हॅन समोर उभ्या असलेल्या ट्रकवरती आदळली. हा दणका किती जबरदस्त होता याची कल्पना करता येणार नाही. गाडीची समोरची काच फुटली व त्याच्या काचा आप्पांच्या चेहऱ्यावरती बऱ्याच ठिकाणी आत घुसल्या. नशिबाने सीटची स्प्रिंग तुटल्यामुळे अप्पा मागे फेकले गेले. त्यामुळे बचावले. अन्यथा अतिशय वाईट असा हा अपघात ठरू शकला असता.

या अपघातानंतर आप्पांवर बऱ्याच प्रकारच्या शस्त्रक्रिया झाल्या. बरेच दिवस आप्पा हॉस्पिटलमध्ये होते. या काळात मी पार्ल्याला मुक्काम केला होता. रोज माझी ड्यूटी करून संध्याकाळी हॉस्पिटलमध्ये मी जात असे. सर्व झाल्यावर एक शेवटचे ऑपरेशन म्हणजे तोंडाला मार लागल्यामुळे आप्पांचे दात व कवळीही पूर्णपणे डिसलोकेट झालेली होती. त्यासाठी शेवटचे ऑपरेशन करण्यात आले. तेव्हाचं ते दृश्य बघून मी आप्पाला म्हटलं की, ''आप्पा आपण नेहमी म्हणतो की, तोंडाला कुलूप लावता येत नाही. पण आता तुमचं बघा ना तुमचे दात पूर्णपणे तारेने बांधून ठेवले आहेत. तुम्हाला तोंड उघडता येत नाही. म्हणजे एक प्रकारे तुमच्या तोंडाला कुलूपच लावलेय की!'' आप्पा इतके महान होते की, त्यांनी या स्थितीत ही माझ्याकडे हात उंच करून दाद दिली. या काळात आप्पांना फक्त लिक्विड डायट वरती ठेवण्यात आले होते. दातांच्या फटीतून द्रवपदार्थ जे काही आत जाऊ शकतील तेवढे देणे गरजेचे होते.

PSS (I) Pvt& Ltd, Pen

राजू पाटील हा माझा PSS इंडिया प्रायव्हेट लिमिटेड येथे काम करतानाचा एक सहकारी. ही घटना साधारण १९९२ सालची आहे. राजू हा मूळचा कोल्हापूरचा. PSS India प्रायव्हेट लिमिटेडमधील

माझे एक साहेब, श्री. प्रदीप जाधव यांच्या मेहुणीचा मुलगा. अतिशय मेहनती, सुस्वभावी, कुणालाही मदत करायची तयारी असा तरुण. माझा खूप आवडता होता. दुर्दैव किंवा अपघात हा कसा व कुठे कुणाला होतो हे खरंच काही सांगता येत नाही. आता या राजूच्या बाबतीत पाहा आमच्या शेजारच्या कंपनीमध्ये कोणीतरी आजारी होता. त्याला हॉस्पिटलमध्ये नेऊन त्याची देखभाल करून परत रिक्षाने येत असताना त्या रिक्षाला अपघात झाला. रिक्षा पलटी झाली व राजूच्या डोक्याला बऱ्यापैकी मार लागला. ताबडतोब पेण येथील एखाद्या दवाखान्यात काही प्रथम उपचार घेऊन तो परत आला. काही दिवसांनी मात्र त्याला डोक्यात प्रचंड वेदना होऊ लागल्या. म्हणून त्याचं सिटीस्कॅन वगैरे सगळं करण्यात आलं. CT Scan मध्ये त्याच्या कवटीला hairline fracture झाले असल्याचे आढळून आले. मग त्याला मुंबईत हिंदुजा हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले. बरेच दिवस हॉस्पिटलमध्ये होता. काही वेळ तब्येत सुधारत होती. काही वेळा गंभीर भासत होती। मी बहुतेक दर शुक्रवारी फॅक्टरीला सुट्टी असलेल्या दिवशी हिंदुजा हॉस्पिटलमध्ये जाऊन राजूला भेटत असे. त्याची विचारपूस करत असे, पण दुर्दैव! एका शुक्रवारी मी गेलो तर राजूची स्थिती फारच चिंताजनक झालेली होती. पुढे एक-दोन दिवसातच या दुखण्यातून त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. राजू मला अजूनही अतिशय चांगला आठवतो. फार सज्जन मुलगा होता, परंतु त्याचा अंत अतिशय दुर्दैवी झाला असेच म्हणावे लागेल.

याच हिंदुजा हॉस्पिटलसंबंधी एक आठवण अजूनही ताजी आहे. साधारण १९९७ साली आम्ही पनवेल येथे राहात असताना, विभूषा आजारी पडली. सुरुवातीस किरकोळ फ्लूचा ताप वाटला. काही उपचार केले, नंतर मग पनवेलला हॉस्पिटलमध्ये ठेवावे लागले. एके दिवशी तिचं हिमोग्लोबीन फारच कमी म्हणजे ७-८ वगैरेपर्यंत खाली आला. पनवेलच्या डॉक्टरांनी तिला ताबडतोब हिंदुजा हॉस्पिटलमध्ये हलवायला

सांगितले. मला अतिशय भीती वाटू लागली, हिंदुजामध्ये आधीचे २ अनुभव काही चांगले नव्हते. परंतु काही इलाजच नव्हता. मी विभूषा व प्रथिताला घेऊन, मारुती व्हॅनने हिंदुजा गाठले. विभूषाला मध्ये ठेवण्यात आले. उपचार चालू होते, परंतु म्हणावा तसा गुण येत नव्हता. रक्त द्यावे लागत होते, वरचेवर. रक्त दिले की २-३ दिवस ठीक जात परंतु, पुन्हा हिमोग्लोबीन खाली जात असे. मला आठवते एके दिवशी तर तो ३-४ पर्यंत खाली घसरला. डॉक्टरांनी काही इंजेक्शन तातडीने मागवले. नेमक्या ३-४ दिवस सुट्ट्या आल्या होत्या. इंजेक्शन तातडीने आणणे गरजेचे होते. पैसे बरेच म्हणजे ६५,००० वगैरे लागणार होते. माझ्या जवळ १००० सुद्धा जेमतेम असतील. अप्पा व मी विचारात पडलो होतो. इतक्यात पार्ल्यात शेजारी राहणारे, अप्पा जोगळेकर यांना ही बातमी कळली. अप्पा जोगळेकर यांच्यासारखा सज्जन माणूस मी कदाचित पाहिलाच नसेल. त्यांनी धावपळ करून ही रक्कम जमविली व सरळ हिंदुजात येऊन मला दिली. मी लगेच केमिस्टला नेऊन दिली. वेळेवर इंजेक्शन मिळाल्यामुळे, इलाज सुरू होऊ शकला. याच दरम्यान पुण्याहून सुभगा व डॉक्टर प्रकाश घाटगे, हिंदुजामध्ये आले. डॉक्टरांनी हिंदुजामधील डॉक्टर मंडळींशी चर्चा करून, होमिओपॅथी पद्धतीनेसुद्धा उपचार करावा असे सुचविले. हिंदुजामधील डॉक्टरांनी लगेच परवानगी दिली. कालांतराने विभूषा पूर्णपणे बरी झाली.

डॉक्टर प्रकाश घाटगे यांना, विभूषाला बरे करण्याचे संपूर्ण श्रेय द्यावेच लागेल. या सर्व घटना जवळपास दोन ते अडीच महिने चालू होत्या.

या काळातील, अजून एक आठवण. एके दिवशी काही औषधे तातडीने हवी असल्यामुळे मी मारुती व्हॅन घेऊन गेलो होतो. परत आल्यावर मिळेल तेथे गाडी पार्क करून हॉस्पिटलमध्ये डॉक्टरना दिली. काही वेळाने गाडी पार्क केली होती तेथे गेलो तर काय, गाडी

जागेवर नव्हती. पोटात गोळा आला. म्हटले, ''चोरीला गेली गेली की काय?'' परंतु नशीब, नो पार्किंगमध्ये लावल्यामुळे पोलीस गाडी खेचून घेऊन गेले होते. मग आणखी एक काम, माटुंगा पोलीस स्टेशनला जाऊन गाडी सोडविणे. तिकडे गेलो तर पोलीस म्हणाले, ''दंड भरा व घेऊन जा.'' पोलिसांना मग सर्व हकिकत सांगितली व दंड करू नका, मी सध्या खूप अडचणीत आहे अशी विनंती केली. आणि पोलिसांनी ती मान्य केली. या सर्व घटनेनंतर पनवेल सोडायचा निर्णय घेतला. पनवेलमध्ये डासांचे प्रमाण खूपच जास्त होते. विभूषाचा आजार हा काही व्हायरल इन्फेकशनमुळे झाला होता.

हिंदुजा हॉस्पिटलसुद्धा शेवटपर्यंत या आजाराचे निदान करू शकले नाहीत व या आजारावर, ॲलोपॅथीमध्ये काही औषध नव्हतेच. हिंदुजा मधील डॉक्टरसुद्धा, प्रयोगांमागे प्रयोगच करीत होते. डॉक्टर प्रकाश घाटगेंच्या औषधामुळेच विभूषा बरी झाली हे अगदी खरेच.

**काकांचा अपघाती मृत्यू**

माझे प्रिय काका यांचा अपघाती दुर्दैवी मृत्यू दि. ३१ जुलै १९७८ साली झाला. मी पनवेलला भाऊमामाकडे राहात असे. ३१ जुलैला रात्री नऊच्या सुमारास दूरदर्शनवरती बातम्या सुरू होणे आधीचे संगीत लागले व भाऊमामाच्या घरी फोन खणखणला. दिल्लीचा फोन आहे असे कळल्यावर मामाने मला बोलवले व मला म्हणाला, ''श्रीकांत, तुझा फोन आहे. बहुतेक काका बोलत आहेत.'' मी फोन घेतला आणि एक प्रचंड मोठा धक्का मला बसला. फोनवरती काकांचे पोस्टाचे सहकारी बोलत होते. त्यांनी मला सांगितलं की, ''तुझे बाबा, प्रभाकर आठवले यांचा संध्याकाळी साडेसात वाजता गच्चीवरून खाली पडून, डोक्याला मार लागून जागीच मृत्यू झाला आहे.'' हे मी सगळे ऐकत होतो परंतु माझा विश्वास बसेना. मी मामाला म्हटलं, ''अरे काकांचे कोणीतरी सहकारी आहेत. ते म्हणतात की काका गेले, जरा तू बोल मला काही त्याचा अर्थ लागत नाहीये.'' भाऊ मामाने फोन घेतला.

त्याने सगळं ऐकलं, मी जी बातमी ऐकली होती ती दुर्दैवाने खरी होती. मामाने ताबडतोब सुरूमामाला फोन करून कळवले. काही वेळापूर्वीच सुरूमामा भाऊमामाच्या घरून आपल्या घरी गेला होता. हा आम्हा सर्वांनाच एक प्रचंड मोठा धक्का होता. मला तर काय करावे काही सुचतच नव्हते. भाऊमामा, सुरूमामाने आपापसात बोलत ताबडतोब रट्टिहल्लीला निघायचे ठरवले. यासाठी मग गाडीची व्यवस्था करणे भाग होते. मग भाऊमामाने सालढाणा साहेबांना फोन करून त्यांची गाडी व ड्रायव्हर आहेत का ते विचारले. मग सालढाणा साहेबांच्या गाडीने आम्ही खोपोलीला गेलो, तेथे सुरूमामाच कॉन्ट्रॅक्टर होता. बसाप्पाची गाडी व सुरुमामाचा ड्रायव्हर सिप्पी घेऊन आम्ही पुण्यास निघालो. सिप्पी हा एक अतिशय भला माणूस व अतिशय चांगला ड्रायव्हर होता. जुलै महिना होता. ३१ तारीख होती. पाऊस धो-धो पडत होता. आम्ही साधारण दहा वाजता रात्री पनवेलहून निघालो. आम्ही वाटेत पुण्यात वसंतकाकांच्या घरी गेलो. वसंत काकांना अपरात्री उठवले. सारा प्रकार त्यांना सांगितला. तेही पटकन खालीच बसले. त्यांनाही काही सुचत नव्हते. काहीही झाले तरी हा मोठा धक्का होता. तेसुद्धा पाच मिनिटात तयार झाले. आमच्या गाडीमध्ये मी भाऊमामा, मामी, सुरूमामा, वसंत काका, मी व सिप्पी ड्रायव्हर एवढे सगळेजण होतो. सबंध प्रवासात सर्वत्र सतत पाऊस पडत होता. आम्ही साधारणपणे बाराच्या सुमारास दुसऱ्या दिवशी दुपारी राणीबेन्नूर येथे पोहोचलो. त्यानंतर रट्टिहल्लीला जाताना मी रस्ता चुकलो आणि मग आम्हाला रट्टिहल्लीला पोहोचायला दुपारचे तीन वाजले. तोपर्यंत काकांच्या शेजारी आई होती व शेजारची मंडळी होती.

गदगहून भास्करकाका, शालिनीकाकू व दादा काका आलेले होते. साधारणपणे ते पोहोचेस्तोवर काका गेल्यापासून आई एकटी होती, पण शेजारीपाजारी मंडळी फार चांगली असल्यामुळे ती सतत आईच्या सोबत जागी होती. माझा आयुष्यातील एखाद्या जवळच्या

माणसाचा बघितलेला हा पहिला मृत्यू होता. तोही माझ्या वडिलांचा. हा प्रसंग म्हणजे ३१ जुलै १९७८, रात्री नऊ वाजल्यापासून ते काकांचे पुढचे सगळे कार्य हे सर्व प्रसंग अजूनही माझ्या डोळ्यासमोर ताजे आहेत. काही गोष्टी माणूस आयुष्यात कधीही विसरू शकत नाही असे म्हणतात हे खरेच.

**सिप्पी ड्रायव्हर व त्याची पत्नीचे अपघाती निधन**

आत्ताची जी आठवण आता आपल्याला सांगणार आहे, ती आहे ड्रायव्हर सिप्पी बाबतची. मी मघाशी त्याचा उल्लेख केला होता. हा अतिशय चांगला गृहस्थ होता. हा इरिगेशन डिपार्टमेंटमध्ये ड्रायव्हर होता. याची पत्नी बहुतेक ख्रिश्चन होती. त्यांचा प्रेमविवाह होता, परंतु घरी काही न काही कारणाने कायम त्यांचे भांडणे होत असत. असेच काहीतरी पुढील वर्षी म्हणजे १९७९ साली झाले. नेमका तेव्हाही पावसाळाच होता. जुलै महिनाच होता. पनवेलच्या गाढी नदीला प्रचंड पूर आला होता. या भांडणाच्या भरात सिप्पीची बायको घरातून बाहेर पडली व गाढी नदीच्या पुलावर उभे राहून तिने चक्क पुरात उडी मारली. तिच्या पाठोपाठ सिप्पी ड्रायव्हरसुद्धा गेला होता. आपल्या बायकोने उडी मारली हे पाहून या सद्गृस्थानेही उडी मारली. नंतर या दोघांचे काय झाले ते आजतागायत आम्हाला कुणालाही कळले नाही. या दोघांचाही या पुरात अंत झाला हे नक्की.

**१० डिसेंबर २०१८ ला माझा, टाइल कटरचा अपघात**

माझा १० डिसेंबर २०१८ ला सकाळी साधारणपणे पावणे आठ वाजता झालेला अपघात. आमच्या घरी एक बाल्कनी क्लोज करून तेथे मी माझे ऑफिस व लॅब तयार केलेली आहे. या लॅबमध्ये एक नवीन सेल्फ मी तयार करीत होतो. मला तो प्रसंग चांगला आठवतोय. त्या दिवशी पहाटे भारत–ऑस्ट्रेलिया यांची टेस्ट मॅच चालू होती. सात वाजता सकाळी तेथील लंच टाईम झाले. आमचा घरी चहा झाला व मी माझे उरलेले काम पूर्ण करण्यासाठी म्हणून माझ्या ऑफिसमध्ये

आलो. एक लाकडी शेल्फ  तयार केले होते.  एक फळी मला एका विशिष्ट आकारात कापायची होती. त्यासाठी मी माझ्याकडे असलेला एक कटिंग मशीन हातात धरून कटिंग करत होतो.  शेवटचा कट घेत असताना काय झाले नक्की माझ्या लक्षात आले नाही. तो कटर माझ्या हातातून निसटला व माझ्या टी-शर्ट मध्ये अडकला. टी-शर्ट पूर्णपणे पिळला गेला आणि त्याचा कटर जो  जवळपास सुदर्शनचक्र सारखाच होता. त्याचा अँगल फिरला गेला व मला गालावरती साधारणपणे कानापासून ते ओठापर्यंत  लांब अशी मोठी जखम झाली. प्रचंड रक्त वाहू लागले.  मी जेमतेम त्या कटिंग मशीनचे बटन बंद केले. जवळपास असलेल्या साफ करण्यासाठी ठेवलेले एक फडके तोंडावरती दाबून धरले.  बेसिनवर  गेलो. तिथे ते दाबून धरलेले फडके काढले आणि बघतो तर काय प्रचंड मोठी जखम झालेली होती. मी पाण्याने ती  धुतली.  या मोठ्या कटमुळे माझी कातडी ओठापासून जवळपास ३ ते ४ इंच लोंबत होती.  मी माझा दाढी करण्यासाठी लागणारी छोटी कात्री तिथेच होती ती घेऊन ती कातडी कापली. नीरजला व प्रथिताला हाक मारली.  त्यांना  म्हटलं, ''ताबडतोब मला सह्याद्री हॉस्पिटलमध्ये घेऊन चला.''  मला खूप मोठी जखम झाली आहे.  त्यांना सांगितले , ''आईला आत्ता लगेच काही सांगू नका.  ती एकदम घाबरून जाईल आणि मग मी आणि नीरज स्कूटरवरून सह्याद्री हॉस्पिटलमध्ये गेलो . हॉस्पिटलमध्ये मला पटकन दाखल करून घेईनात. तिथल्या डॉक्टरांना शंका आली, हा अपघात आहे की दुसरा काही प्रकार आहे, पण नशिबाने भूषण म्हणजे माझा जावई विभूषाचा नवरा त्याच्या कोणी तरी ओळखीचे असल्यामुळे त्याने फोन केला. मला हॉस्पिटलमध्ये दाखल करून घेतले गेले. मग जो गरजेचा होता तो प्रथम उपचार केला आणि डॉक्टरांना बोलवण्यात आले. गालावरती जखम असल्यामुळे तेथील ड्यूटीवरील डॉक्टरांमध्ये प्लास्टिक सर्जरी करणे गरजेचे होते. अशी कुठल्याही प्रकारची सर्जरी किंवा ऑपरेशन

करण्याआधी फिटनेस आहे की नाही बघण्यासाठी माझे डायबेटीसवर उपचार करणेसाठी डॉ. अतुल जोशी व प्लास्टिक सर्जन डॉक्टर देशपांडे यांना बोलविण्यात आले. काही वेळाने ही दोन्ही डॉक्टर मंडळी आली. माझी ब्लड शुगर चेक करण्यात आली. १४० का १४५ होती. मला डॉक्टर अतुल जोशी म्हणाले, ''अरे वा आठवले, शुगर अगदी कंट्रोलमध्ये आहे.'' मी म्हणाले, ''डॉक्टरसाहेब त्याचं काय आहे, एखादा अपघात होतो आणि काही वेळा स्मृती भ्रष्ट होते आणि अशाच माणसाला परत एखादा अपघात होतो आणि गेलेली स्मृती परत येते तसेच काहीसे माझ्या शुगर बाबतीत झाले असावे.'' डॉक्टर जोशींनी हात जोडून मला नमस्कार केला. मला म्हणाले, ''आठवले तुम्ही या स्थितीतही विनोद करू शकता हे पाहून मी मानलं तुम्हाला.''

यानंतर डॉ. देशपांडे यांनी प्लास्टिक सर्जरी केली. हे ऑपरेशन जवळपास अडीच ते तीन तास चालले. मला चार-पाच दिवस हॉस्पिटलमध्ये राहावे लागले व नंतर घरी सोडले. त्यानंतर दर आठवड्यात मला डॉ. देशपांडे यांच्या क्लिनिकमध्ये दाखवायला जावे लागे. या सर्व प्रकारातून बरे होण्यासाठी जवळपास दोन-तीन महिने लागले.

■ ■

# ११. माझी करिअर अशी घडत गेली

माझी पहिली नोकरी

Rubber Adhesive Manufacturers (R-$M^2$)

१६ मे १९७३ रोजी मी Rubber Adhesive Manufacturers या कंपनीत सुपरवायझर म्हणून जॉईन झालो. या कंपनीचे मालक होते हक्कूभाई भाटिया व जनरल मॅनेजर होते माझे मामा म्हणजेच पु. ल. खाडिलकर. आधी वर्णन केल्याप्रमाणेही कंपनी काही मला नवीन नव्हती. गेल्या तीन वर्षांतील उन्हाळी सुट्टीमध्ये जवळपास दोन महिने मी दरवर्षी पनवेलला घेऊन या कंपनीत मामाबरोबर रोज कामासाठी जात असे. ही कंपनी जवाहर को–ऑपरेटिव्ह, इंडस्ट्रीयल इस्टेट, कळंबोली येथे होती. मामाच्या घरापासून म्हणजे मिडल क्लास सोसायटी, गुलमोहर बंगला, पनवेल येथून जवळपास साडेचार ते पाच किलोमीटर इतक्या अंतरावर होती. मी रोज सायकलने कंपनीत जात असे. काहीवेळा मामाबरोबर त्याच्या गाडीने किंवा स्कूटरवरून जात असे, परंतु बऱ्याच वेळा सायकलने जात असे. कळंबोली येथे पोहोचले की डाव्या हाताला एक नवीन रस्ता तयार झाला होता. या रस्त्याने पुढे गेले की नवीन मुंबई म्हणजेच आत्ताचे कोकण भवन, नेरूळ, वाशी, वाशिगाव.

त्याच्यानंतर नवीन बांधलेला ठाणे खाडीपूल. त्यानंतर देवनार टोल नाका व नंतर चेंबूर असा हा रस्ता मुंबईकडे जात असे.

कळंबोली येथे उजव्या हाताने किंवा सरळ पुढे गेले तर तळोजा नंतर मुंब्रा, ठाणे, जुना मुंबई पुणे महामार्ग होता. या कंपनीतील माझे काही अनुभव मी सांगणार आहे. या कंपनीत आम्ही वेगवेगळ्या प्रकारचे रबराची अधेसिव्ह, रबर कॅलेंडर, कुशन कंपाउंड किंवा गम कंपाउंड तसेच सायकलसाठी लागणारे काही रबरचे पार्ट बनवत होतो. रबर फॅन बेल्ट, व्ही  बेल्ट हे आमचे मूळ उत्पादन होते. हे बेल्ट, मोपेड, कार, टेम्पो, ट्रॅक्टर व लॉरीला लागत असत. आणि हे बेल्ट R-M² या ब्रँडने, आम्ही हिंदुस्तान पेट्रोलियम (HP) ला सप्लाय करत असू. आमच्याकडे जवळपास पंधरा–वीस प्रकारचे v-belt आम्ही तेव्हा बनवत होतो. बनवायची पद्धत, त्याचं रबर कंपाउंड फॉर्मेशन वगैरे सगळं भाऊ मामा व त्याचे गुरु डॉक्टर अरविंद घाग यांनी मिळून विकसित केलेले होते. या वेळेस आमचे या क्षेत्रातले नंबर वन चे competitor होते Fenner ही चेन्नई मध्ये असलेली एक मोठी मल्टिनॅशनल कंपनी होती. आमचे फॅन बेल्ट सुद्धा Fenner च्या तोडीस तोड असे होते.

त्याचबरोबर आम्ही सायकल ट्यूब पंक्चर काढण्यासाठीचे लाल रंगाचे एक रबर बेस अधेसिव्ह बनवत होतो. ह्या अधेसिव्हला प्रचंड मागणी होती. नेहमीच्या कामात ते बनवण्यात आम्हाला अडचण येत होती. त्यासाठी मग कंपनीने बनवण्याचे काम कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर कामगारांना दिले होते. त्या वेळेस जवळपास या कंपनीमध्ये ४० ते ४५ कामगार होते. या कंपनीत मी नवीन जरी असलो, तरी आधीची तीन वर्षं सुट्टीत घेऊन काम केल्यामुळे जवळपास सर्व कामगार व माझे इतर सहकारी हे माझे चांगले परिचयाचे झालेले होते. माझे सहकारी होते श्री मोरेश्वर कोशे व आमच्या ऑफिसमध्ये काम करणारी क्लार्क, मंगल धारप. या सर्वांचे माझे अगदी व्यक्तिगत संबंध निर्माण झालेले

होते. कामगार मंडळी बरीच होती, पण त्यातील काही लक्षात राहणाऱ्या व्यक्ती म्हणजे लिंग्या. हा आंध्र प्रदेशचा माणूस होता. मिक्सिंग मिलवर दिवसभर काम करायचं पडेल तितके. संध्याकाळनंतर मात्र एकदा बाटली ढोसायचा. या लिंग्याचं संध्याकाळ नंतर काही खरे नसायचे.

दुसरा लक्षात राहणारा माणूस म्हणजे जोमा गोवारी. हा माणूस पण मिक्सिंग मिलवर काम करायचा. जातीने आगरी होता आणि याची बोलायची एक फार विशिष्ट अशी शैली होती. तो इतका फास्ट बोलायचा की, लिंग्या या माणसाने त्याचे नाव इंग्लिश असे ठेवले होते. थोडक्यात काय, तू काय बोलतोस ते आम्हास पटकन कळत नाही म्हणून त्याचे नाव इंग्लिश. माणूस शिकलेला असो किंवा नसो, पण अंतर्गत जी विनोदबुद्धी असते ती दिसून येते.

आणखीन बरेच काही सहकारी होते. त्यातील अजून एक लक्षात राहणारा माणूस म्हणजे हरिश्चंद्र पाटील. बेल्ट बिल्डिंग सेक्शनमध्ये काम करत असे. अतिशय सुस्वभावी, पापभीरू असा माणूस, पण नंतर का कुणास ठाऊक, या माणसाला दारूचे व्यसन लागले आणि नंतर पार कामातून गेला. या सर्वांत अतिशय लक्षात राहणारा व ही कंपनी सोडल्यावरसुद्धा नंतर बरेच वर्षं माझ्याबरोबर इतर कंपनीत काम करणारा माणूस म्हणजे बाळकृष्ण बताले. बताले ही एक अतिशय नावीन्यपूर्ण अशी व्यक्ती होती. आम्ही सगळेजण त्याला मास्तर असे म्हणायचो. या मास्तरांचे एक वैशिष्ट्य म्हणजे याच्या डिक्शनरीमध्ये नाही हा शब्द कधीच नव्हता. कुठचंही काम कधीही सांगा, त्याने कधी नाही म्हटले नाही. कामामध्ये कधीही चूक न करता, दिलेले काम कायम वेळेत पूर्ण करणे हा त्याचा हातखंडा होता. बताले हा खरोखरीच अतिशय गुणवान होता. कुठचेही काम तो अतिशय अचूक पद्धतीने करायचा. माझी आणि त्याची चांगली मैत्री झालेली होती. या माणसाला एक नाद होता. तो म्हणजे मटका खेळणे. या मटका खेळण्यातून त्याला एकदा, जवळपास सोळा-सतरा हजार रुपये मिळाले.

त्यातून मग त्याने आपल्या घरी काही नवीन गोष्टी आणल्या, नवीन सायकल घेतली आणि मग काही दिवस मास्तर एकदम फॉर्ममध्ये होता. या मटका खेळण्यावरून व त्याच्या दारू पिण्याच्या सवयी वरून बरेच जण त्याची थट्टामस्करी करीत असत. अशी मस्करी करण्यात एक नंबर कोण असेल तर, आमचा वॉचमन / सिक्युरिटी गार्ड श्री कदम. या कदम यांचा एक चुलतभाऊ आत एक अतिशय कुशल कामगार म्हणून काम करीत असे. ही कदम मंडळी म्हणजे ज्यांची जमीन कोयना धरणामध्ये पाण्याखाली गेली त्यांना पनवेल जवळ सरकारने बदली जमीन पनवेल–मुंब्रा मार्गावरील रोहिंजन या गावी दिली होती. त्यामुळे मूळचे कोकणातले परंतु नंतर रायगड जिल्ह्यात स्थलांतर झालेली अशी ही मंडळी.

या कदम सिक्युरिटी गार्डबद्दल पण एक अतिशय मजेशीर गंमत आपल्याला सांगायची आहे. आमच्या मालकाचे श्री. हक्कूभाई भाटिया. हे राहायचे मुंबईला. प्रिन्सेस स्ट्रीटजवळ मेट्रो सिनेमाजवळ त्यांचे वन रूम किचनचे घर होते. अर्थात, रूम मोठी होती. यांची फॅमिली खूपच मोठी होती. स्वतः श्री हक्कूभाई, त्यांची आई, बायको आणि चार मुले. तसेच श्री हक्कूभाईची बहीण व तिची चार मुले. ही सगळेजण या छोट्या जागेत अगदी मजेत राहत असत. हक्कूभाईचे ऑफिस प्रिन्सेस स्ट्रीटच्या मागे पोपटवाडी नावाच्या गल्लीमध्ये होते. हे ऑफिसही तसे छोटे होते. नंतर प्रिन्सेस स्ट्रीटला एका बिल्डिंगमध्ये तिसऱ्या मजल्यावर एक नवीन ऑफिस सुद्धा घेतलेले होते. हक्कूभाई हे अतिशय जाड होते. म्हणजे त्यांच्या Office चेअरमध्ये ते जेमतेम मावत असत. जसा हा माणूस देहाने प्रचंड होता तसाच मानानेही अतिशय विशाल होता. अतिशय प्रेमळ माणूस असा मालक म्हणून लाभण्यासाठी खरंच नशीब लागते.

तर या हक्कूभाई आणि त्यांच्या कुटुंबास संबंधीत गंमत सांगतो, जी आमचे सिक्युरिटी गार्ड कदम यांच्याशी संबंधित आहे. खाडिलकर

साहेबांनी या गार्डला एक कायम सूचना दिलेली होती की, ते कंपनीमध्ये नसताना एखादा कोणी अनोळखी माणूस आला तर त्याला कंपनीच्या गेट मधून आत प्रवेश देणे नाही. हक्कूभाई आणि त्यांची कंपनी बहुतेक शनिवार–रविवारी कळंबोलीला कंपनीमध्ये येत असत. आमच्या ऑफिसवर एक छोटासा राहण्यायोग्य असा फ्लॅट यांनी तेव्हा तयार केलेला होता. ते बहुतेक शनिवार–रविवार इथे येऊन राहात असत. असेच एका शनिवारी संध्याकाळी कंपनी बंद झाल्यानंतर म्हणजे ऑफिस बंद झाल्यानंतर हक्कूभाई त्यांच्या गाडीतून वरील सांगितल्याप्रमाणे आठ–दहा मंडळी अक्षरश: या गाडीत कोंबून आली. ड्यूटीवर कदम गार्ड होता. हक्कूभाई म्हणाले, ''गेट उघड.'' हा गार्ड तेव्हा नवीन लागला होता व त्याने हक्कूभाईंना या आधी कधी पहिले नव्हते. कदम यांचा पूर्वीचा अनुभव म्हणजे हे एक्स आर्मीत होते त्यामुळे शिस्तीला एकदम कडक. त्याने हक्कुभाईना सांगितले, ''आपण कोण हे मी जाणत नाही व मॅनेजर साहेबांच्या आज्ञेनुसार मी आपल्याला आत घेऊ शकत नाही.''

हक्कूभाईंनी सांगायचा बराच प्रयत्न केला की, ''अरे बाबा, मी या कंपनीचा मालक आहे, मला आत सोड. खाडिलकर साहेबांनी जे सांगितले ते इतर सर्वांना लागू होते. माझ्यासाठी नाही.'' पण कदमने ते काही केल्या ऐकले नाही.

नेमका त्या दिवशी फोन बंद पडला होता. मग काय हक्कूभाई सरळ पनवेलला आमच्या घरी आले आणि त्यांनी खाडिलकर साहेबांना सांगितले की, ''अहो काय तुमचा वॉचमन? मला कंपनीत आत सोडत नाहीये, त्याला फोन करून सांगा किंवा चिठ्ठी द्या किंवा तुम्ही स्वतःच या व आमची व्यवस्था करा.'' मामाने काहीतरी व्यवस्था केली आणि एकदाचे हक्कूभाई आणि त्यांची कंपनी, कंपनीतील फ्लॅटमध्ये राहू शकले.

माणूस मोठा कसा असतो मनाने याचे उदाहरण आता मी आपल्याला

देतो. दुसऱ्या दिवशी सकाळी ऑफिस सुरू झाल्यावर हक्कूभाईनी खाडिलकर साहेबांना सांगितले की, ''या कदम वॉचमनला कृपया बोलवा.'' कदम आले. त्यांना वाटले की, बहुतेक आता आपली नोकरी जाणार, आपण मालकालाच कंपनीत आत घेतले नाही. त्यामुळे आता दुसरे काय होणार?, परंतु झाले ते वेगळेच. हक्कूभाईंनी बोलायला सुरुवात केली. त्यांचे बोलणे म्हणजे टिपिकल गुजराथी मराठी असे होते. मनाचा फार निर्मळ स्वच्छ माणूस आणि अतिशय चांगला. काल जो काही प्रकार झाला त्याबद्दल मला तुमच्याशी बोलायचे आहे असे कदमला सांगितले. कदम यांचा बीपी किती वाढला असेल मला कल्पना नाही, ते म्हणाले, ''कदम, काल तुम्ही जे काय केलं त्याच्याबद्दल मला काय वाटते तुम्हाला कल्पना आहे का?''

कदम म्हणाले, ''साहेब, माझी चूक झाली, मला कल्पना नव्हती, आपण मालक आहेत याची, म्हणून मी आपल्याला अडवले. पण मला माफ करा.'' हक्कूभाई म्हणाले, ''अरे बाबा, तू माफी मागावी म्हणून मी तुला इथे बोलाविले नाहीये, तर मला तुझे कौतुक करायचे आहे. तू तुझी ड्यूटी अतिशय उत्कृष्टपणे पार पडली आहेस. त्याबद्दल तुझे कौतुक करून तुला छोटेसे बक्षीस द्यायचे आहे.'' म्हणून त्यांनी चक्क त्याला काही पैसे बक्षीस म्हणून देऊ केले. कदम याने ते पटकन घेतले नाहीत. पण मग खाडिलकर साहेबांनी त्यांना सांगितले की, ''कदम, हे घ्या. हक्कूभाई खरेच मनापासून, तुमचे कौतुक करीत आहेत. खरंच या कलियुगात अशा प्रकारचा मालक मिळणे हे नशीबच नाही?''

या कंपनीत काम करत असतानाचा अजून एक अनुभव म्हणजे साधारणपणे १९७५ साली आमच्या कंपनी कामगारांनी संप केला. खरे तर कामगार व खाडिलकर साहेब यांचे संबंध खूप चांगले होते, परंतु ठाकूर नावाच्या एका युनियन लीडरने कामगारांना भडकावून त्यांना संप करण्यास भरीस पाडले. झाले. काम बंद पडले. खाडिलकर साहेबांनी

रीतसर पोलीस कंप्लेंट नोंदवून पोलीस प्रोटेक्शन मागून घेतले. आणि मग आमच्या कंपनीमध्ये २४ तास तीन ते चार पोलीस हे कायम घेऊन बसू लागले. हा संप दीड ते दोन महिने चालला, पण या संपामुळे काय झाले तर या तीन-चार पोलिसांपैकी भायदे म्हणून एक हवालदार त्यांची आणि माझी खूप छान गट्टी जमली. आम्ही छान मित्र झालो असे म्हणा. आम्ही रोज कंपनीत जायचं जे जमेल तेवढे काम करायचं आणि बाकी मग भायदे साहेबांशी गप्पा असा आमचा दिनक्रम असे. दुपारचे जेवणसुद्धा बरोबर एकत्र बसून जेवत असू.

काही दिवसाने कामगारांना फारसे काही न मिळता संप मागे घेण्यात आला. मात्र या संपानंतर सर्व कामगारांना प्रॉव्हिडंट फंड सुरू करण्याची व्यवस्था झाली. या कंपनीत मला बरेच काही शिकायला मिळाले, जसे ऑफिसमध्ये सगळे काम, रबर टेक्नॉलॉजीबद्दल सर्व काही, आणखीन बऱ्याच गोष्टी. त्यांनंतर सांगणारच आहे.

तर त्यांच्या दृष्टीने सर्व कामगारांचे फॉर्म भरणे हे काम माझ्याकडे आले. त्या वेळेस माझ्या असिस्टंट होत्या एक बाई, शेख मॅडम. त्या पनवेलच्या थोडं पुढे शेडुंग या गावी राहात असत. असाच फॉर्म भरत असताना एका एक कामगाराचे नाव होते आत्माराम पाटील. मी बाकी सगळी माहिती भरली आणि नंतर त्याला विचारलं, ''तुझी जन्मतारीख काय?'' तर ती त्याला काही माहीत नव्हती. ''अंदाजे तुझं वय किती असेल?'' असे विचारले, तो म्हणाला, ''२० च्या आसपास असेल.'' त्या प्रमाणे अंदाजे जन्मतारीख लिहून त्याचे वय वीस दाखविले. नंतर त्याच्या वडिलांची माहिती भरायची होती. मी म्हटलं, ''तुझ्या वडिलांचे नाव सांग, आणि त्यांचे वय?'' त्याने नाव सांगितले आणि वय मला नक्की माहीत नाहीये. पण अंदाजे ३५ असेल. यावरून एक खूप मोठा विनोद झाला याचा अर्थ आत्माराम आपले पिताश्री साधारणपणे पंधरा वर्षाचे असताना जन्मला. बरोबर आहे का याच्यावरून जो काय ऑफिसमध्ये हशा पिकला तो अजूनही मला आठवतो.

या कंपनीत काम करताना अजून काही माझे फायदे झाले. ते असे आमच्या कंपनीच्या शेजारी किमनिक इंडस्ट्रीज म्हणून एक छोटी रबर कंपनी होती. ही पार्टनरशिप फर्म होती. तीन पार्टनर होते. मुख्य होते ते म्हणजे कोचरेकर साहेब, नंबर २ महाजनी साहेब आणि नंबर तीन म्हणजे क्लिअरन्स भाटिया. यातील भाटिया हा माझा खूप चांगला मित्र झाला होता. संध्याकाळी कंपनीचे काम संपल्यावर बऱ्याच वेळा मी किमनिक रबर मध्ये बसून गप्पा मारीत असेल. या कंपनीत कारसाठी लागणारी रबर मॅट बनवली जात. ही मॅट एका थ्री व्हीलर टेम्पोमध्ये भरून रोज संध्याकाळी मुंबईला घेऊन जात. हे काम बहुतेक वेळा भाटिया स्वतः करीत असे. त्याचे घर सांताक्रूज येथे होते. मी मामा-मामी बऱ्याच वेळा एखाद्या सुट्टीच्या दिवशी त्यांच्याकडे सांताक्रूजला राहायलासुद्धा गेले आहोत.

साधारणपणे १९७४-७५ सालची गोष्ट आहे. भाऊ मामा व मामी काही कामानिमित्त सांगलीला गेले होते. स्कूटर त्याने मुद्दाम कंपनीमध्ये आणून ठेवली होती. माझ्या मनात स्कूटर शिकायची खूप इच्छा होती. पावसाळा सुरू झाला होता. एके दिवशी मी स्कूटरला किक मारून स्कूटर चालू करायचा प्रयत्न केला. बराच वेळ प्रयत्न केला, पण ती स्कूटर काही चालू होईना. शेवटी माझ्या ताब्यात जवळजवळ चाळीस कामगार असल्यामुळे मी दोघा-तिघांना बोलाविले. त्यांना म्हटलं, मला स्कूटरला मागून धक्का मारा. मी स्कूटर चालू करतो व स्कूटर चालू झाली. मग पहिल्या गिअरमध्ये मी आमच्या इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये बऱ्याच चकरा मारल्या. मला स्कूटर थोड्या प्रमाणात चालवता यायला लागल्याने नित्यनेमाने मी पुढचे चार-पाच दिवस वेळात वेळ काढून स्कूटर चालवायचो. आधी एकाच गिअरमध्ये नंतर दुसरा तिसरा आणि चौथा. १५ दिवसांत स्कूटर पूर्णपणे शिकलो आणि काही दिवसांनी भाऊमामा सांगलीहून परत आला. त्याला कुणाकडून तरी कळलं की, मी गेल्या पाच-सहा दिवसात काय कामगिरी



केली, तर मी स्कूटर कुणाची मदत न घेता शिकलो. म्हणजे पहिल्या दिवशी दोघांनी धक्का मारला तर तेवढे सोडले तर. भाऊमामाने मला बोलावलं. मला वाटलं बहुतेक आता मामा लेफ्ट-राईट फायर करणार, पण तसे काही झाले नाही भाऊमामाने माझे कौतुक केले की, ''अरे वा छान. एकदा व्यवस्थित लायसन्स काढून घे. म्हणजे जेव्हा मी गाडीने येईल तेव्हा तुला स्कूटरने कामावर येता येईल.''

यानंतर विनाविलंब मी आरटीओ ऑफिसमध्ये जाऊन माझं स्कूटरचं लायसन्स काढून घेतलं. आणि बी.एस्.सी. बरोबर अजून एक नवीन क्वालिफिकेशन आपल्याला मिळाले असेच मला वाटू लागले.

त्यानंतरही अजून एक गंमत सांगण्यासारखी आहे. आमच्या कंपनीमध्ये सुद्धा एक थ्री व्हिलर टेम्पो होता. आठवड्यातून चार-पाच वेळा कंपनीमध्ये यायचं. येताना मुंबईहून आम्हाला लागणारे रॉ मटेरियल भरून घेऊन यायचं. संध्याकाळी टेम्पो कंपनीत उभा असायचा आणि रात्रीची दुसरी शिफ्ट संपली की, रात्री साडेबारा-एक वाजता सगळा माल खाली करून, तयार झालेला माल टेम्पोमध्ये भरून वरती ताडपत्री वगैरे बांधून पहाटे टेम्पो मुंबईला घेऊन जाण्यासाठी तयार करून ठेवण्यात यायचा. सुरुवातीला या टेम्पोवर पोपट कदम नावाचा एक ड्रायव्हर होता. काही दिवसाने तो सोडून गेला आणि मग बाबू नावाचा एक ड्रायव्हर (जो सांगली-कोल्हापूर या भागातला होता) तो रुजू झाला. बाबू ड्रायव्हर रोज पहाटे पाच-साडेपाचला मुंबईला जाण्यासाठी

निघायचा. या वेळी काही कारणास्तव मी दुसऱ्या पाळीमध्ये काम करीत असे. त्यामुळे काम संपले की, रात्री आमच्या ऑफिसवरील फ्लॅटमध्ये झोपत असे. एके दिवशी माझ्या मनात विचार आला की, आपण आता टेम्पो चालवायला शिकलं पाहिजे. मी बाबूला तसे सांगितले. बाबू म्हणाला, ''तुम्ही काही दिवस माझ्याबरोबर मानखुर्दपर्यंत या. मी कसे चालवतो ते फक्त निरीक्षण करा, नंतर आपण बघू.'' त्याप्रमाणे मग दुसऱ्या दिवशीपासून माझे ड्रायव्हिंग संबंधीचे शिक्षण सुरू झाले. मी पहाटे उठायचं, बाबूबरोबर मानखुर्दपर्यंत जायचो. बाबू मला मानखुर्द बस स्टॉपजवळ सोडायचा. रस्ता क्रॉस करून पलीकडच्या बाजूने तेव्हा नुकतेच सिडकोने दादर-पनवेल अशी बस सेवा सुरू केली होती, या बसने मी पनवेलला उतरायचो. घरी जाऊन आंघोळ वगैरे करायचो, नाश्ता करायचा आणि मग रात्रपाळी केलेले असल्यामुळे झोपायचो. हे ड्रायव्हिंगचे प्रशिक्षण माझे जवळपास दोन-तीन महिने चालू होते. मी अगदी लक्ष देऊन बाबू टेम्पो कसा चालतो, कसा गियर बदलायचा, स्पीड कमी-जास्त कसा करायचा, रस्त्याच्या कडेने सरळ रेषेत टेम्पो कसा चालवायचा हे बघून बघून शिकलो. अगदी बारीक निरीक्षण केलेल्या या माझ्या तपश्चर्येला काही दिवसांनी फळ आले. बाबूला वाटू लागले की, आता थोडेफार त्याला गाडी चालवायला द्यायला हरकत नाही.

यानंतर काही दिवसांनी बाबू मला टेंपो चालवायला देऊ लागला आणि बघता बघता चार-पाच आठवड्यात मी व्यवस्थित गाडी म्हणजेच टेंपो चालवू लागलो. त्याचा खूप मोठा फायदा झाला. म्हणजे मला यानंतर चारचाकी कुठलीही गाडी चालवता येऊ लागली. एकदा काय झाले, भाऊमामा आणि मामी काही कामानिमित्त परत सांगलीला गेले होते. मामा नाहीये या संधीचा फायदा उठवून मी एक दिवशी संध्याकाळी टेंपो घेऊन पनवेलला घरी गेलो. टेंपो आमच्या कंपाऊंडमध्ये पार्क केला. अचानकपणे दुसऱ्या दिवशी सकाळी भाऊ मामा-मामी सांगलीहून

परत आले. कंपाऊंडमध्ये टेंपो बघून त्याला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, ''श्रीकांत, टेम्पो इथे कसा आहे? बाबू टेंपो येथे का लावून गेला?'' आता मला प्रश्न पडला की खरं सांगावे का काहीतरी थाप मारावी? जाऊ दे. आपण आपलं खरं सांगू, फार तर काय मामा रागवेल. मी त्याला सांगितले, ''मामा असे आहे की गेल्या दोन-तीन महिन्यांत मी रोज पहाटे बाबूबरोबर मानखुर्दपर्यंत टेंपोने जात असे आणि या कालखंडात मी आता टेंपो व्यवस्थित चालवायला शिकलो आहे. काल संध्याकाळी माझी इच्छा झाली म्हणून मी टेंपो स्वतः चालवत पनवेलला घेऊन आलोय. आज सकाळी कंपनीत घेऊन जाणार होतो. तू अचानक सांगून परत आल्यावर त्यामुळे तुला हे कळले.'' झाले, आता मला वाटलं बहुतेक आपले काही खरं नाही. पण तसे काही झाले नाही. गेल्या वेळेप्रमाणे, यावेळेसही मामाने माझे कौतुक केले आणि पुढे मागे मला टेंपो कायदेशीररित्या देऊ लागला.

आता मला फोर व्हिलरचं लायसन्स कसा मिळालं याबद्दलची गम्मत सांगणार आहे. आमच्या R-M² या कंपनीमध्ये एक जुनी जीप स्टेशन वॅगन होती. ती जीप कन्व्हर्ट करून त्याचा फोर व्हीलर टेंपो करण्यात आला होता. पाठीमागची बसायची सगळी जागा काढून, लाकडी बॉडी बांधली होती. ती जीप एका टेम्पोमध्ये कन्व्हर्ट करण्यात आली होती. असे काही कन्व्हर्जन केले की, त्याला आरटीओची परमिशन घेऊन त्याच्याकडं आपल्याला तसे रजिस्ट्रेशन करून घ्यावे लागते. या कामासाठी जीप तयार झाल्यावर कळंबोली येथे कंपनीत आणण्यात आली. त्या काळात रायगड जिल्ह्यासाठी आरटीओ ऑफिस पेण येथे होते. परंतु आठवड्यातून एक दिवस पनवेलला कॅम्प असे. एका कॅम्पला मी आणि बाबू ही कन्व्हर्ट केलेली जीप पासिंगसाठी घेऊन गेलो. तेव्हा उपाध्ये साहेब आरटीओ होते. नंतर काही कारणासाठी ते आमच्या कंपनीत ऑफिसमध्ये खाडिलकर साहेबांना भेटायला आले. व्यवस्थित मीटिंग झाली आणि मग खाडिलकर साहेबांनी मला सांगितले,

''श्रीकांत, उपाध्ये साहेबांना त्यांच्या ऑफिसमध्ये सोडून ये.'' ही कन्व्हर्ट केलेली जीप चालवत मी उपाध्ये साहेबांना त्यांच्या ऑफिसमध्ये सोडायला पनवेलला गेलो. उपाध्ये साहेब माझ्या शेजारी बसलेले होते. ते आरटीओ ऑफिसर होते. त्यांनी सहज म्हणून मला विचारले, ''अरे वा श्रीकांत! चांगली चालवतो आहेस गाडी, लायसन्स वगैरे आहे का नाही?'' मी दोन मिनिटं काही बोललो नाही, गप्प बसलो. उपाध्याय साहेबांच्या हे लक्षात आले. मला म्हणाले, ''अरे गाढवा, लायसन्स नाहीये आणि एका आरटीओ ऑफिसरला तू गाडी चालवत त्याच्या ऑफिसला सोडायला येतो आहेस? काय लाज वाटते का नाही?'' मी अतिशय घाबरलो होतो. थोड्या वेळाने उपाध्ये साहेब हसले व मला म्हणाले, ''जाऊ दे. काही काळजी करू नकोस. तुझी काय ट्रायल कशाला घ्यायची आता? एक काम कर पुढच्या आठवड्यात मी येथे असेन तेव्हा ये व लायसन्स घेऊन जा.'' असं मला फोर व्हीलरचं लायसन्स साधारणपणे १९७५ च्या सुमारास मिळालं. माझ्या मते, आरटीओ ऑफिसरला बाजूला बसून घेऊन शिकाऊ लायसन्ससुद्धा नसताना, गाडी चालवत घेऊन जाणे व पुढील आठवड्यात पक्कं लायसन्स मिळविणे, अशा पद्धतीने, हे एक जगावेगळे उदाहरण असेल. कदाचित हजारात एक असा मी असावा.

रबरमध्ये काम करत असताना मी माझे रबर टेक्नॉलॉजीचे दोन वर्षांचे शिक्षणही पूर्ण केले. (Part Time Diploma - LPRI). त्यासाठी मी ज्या दिवशी माझा क्लास असेल त्या दिवशी पहिल्या पाळीमध्ये काम करीत असे. तीन वाजता सुट्टी झाली की, बसने मुंब्र्याला जाऊन, मुंब्रा ते दादर लोकलने व दादर ते प्रभादेवी बेस्टच्या बसने प्रवास करीत असे.

या आधी सांगितल्याप्रमाणे आमचे मालक हक्कूभाई, हे मोठ्या मनाचे होते. त्यांना एकदा हे कळले की, मी पहिल्या पाळीत का येतो? आणि मग दुपारी प्रभादेवीला जाऊन क्लास करतो. मला म्हणाले, ''श्रीकांत, तुम्ही इतक्या रात्री पनवेलला काय जाते?'' हे म्हणजे

त्यांचे टिपिकल गुजराथी मराठी. ''तुम्ही आमच्या घरी का नाही येते? आमच्या घरी का नाही राहते? दुसऱ्या दिवशी सकाळी तुम्ही पनवेलला जाते तर चालते?''

आता मी काही त्यांच्या घरी जाणार नव्हतो, पण एखादा मालक आपल्या अगदी ज्युनियर स्टाफला घरी बोलवू शकतो हे खरंच आज कालच्या काळात जवळपास अशक्य आहे. अजून एक यांच्याबद्दलची आठवण म्हणजे यांच्या ऑफिसमध्ये मुंबईला कधी मिटींगला गेलो की मालक किंवा मामाला कधीही बाहेर दुपारी हॉटेलात जेवायला जायची वेळ येत नसे. कारण तसे आम्हाला करू देत नसत. आम्ही गेलो की, ते घरी सूचना द्यायचे आणि मग त्यांच्या घरून, आम्हा सर्वांना जेवण एका मोठ्या, टिफिन कॅरियर मधून येत असे. बरेच कप्पे असलेला व बराच मोठा डबा असे. त्यांच्या बरोबरच आम्ही ऑफिसमध्ये कित्येक वेळा जेवलेले आहोत.

याच प्रिन्सेस स्ट्रीटवरील ऑफिसबद्दल एक आठवण सांगायची आहे.

साधारणपणे १९७५ सालची गोष्ट आहे. तेव्हा जगदीशमामा पनवेलला आलेला होता आणि या सुट्टीमध्ये जमले तर लग्न करायचा त्याचा विचार होता. त्यासाठी मग गुलमोहर या बंगल्यामध्ये बऱ्याच मुली पाहण्याचे प्रोग्रॅम झाले. प्रत्येक प्रोग्रॅम झाला की, जगदीश मामा, माझे काय मत आहे मुलीबद्दल असे हमखास विचारत असे. मामाचे आणि माझे अतिशय मैत्रीपूर्ण संबंध होते आणि एकमेकांना आम्ही खूप आवडायचो. त्यातून मग एका मुलीची निवड झाली. तिचे नाव होते राजश्री सखदेव. राजश्री मामी दादरला रानडे रोड येथे राहात असे. राजश्रीमामीचे बाबा, त्यांना आम्ही सगळे भाऊकाका म्हणत असू, ते शाळेमध्ये हेडमास्तर होते. राजश्री मामीचा भाऊ म्हणजे माधव IIT ग्रॅज्युएट झाला होता किंवा त्याचे शिक्षण चालू होते. राजश्री मामीची आईसुद्धा एका शाळेमध्ये शिक्षिका होत्या. अतिशय आनंदी आणि स्वभावाने अतिशय गरीब असे हे कुटुंब होते. मामीच्या लग्नानंतर मी त्यांच्या कुटुंबाचा एक भाग झालो होतो. विशेषत: भाऊ काकांना माझे खूप कौतुक होते. जगदीश मामाची काही तत्त्वे होती की, लग्नं अतिशय

साधेपणाने झाले पाहिजे. मुलीकडून आणि मुलाकडून अगदी मोजके आणि जवळचे नातेवाईक असले पाहिजेत. कुठलाही हॉल किंवा कार्यालय न घेता, एखाद्या मोठ्या रूममध्ये, एखाद्या ठिकाणी असे लग्न झाले पाहिजे आणि ते रजिस्टर पद्धतीने झाले पाहिजे. रजिस्टरला आपण कार्याच्या ठिकाणी बोलून हे आपण लग्नं करायचे असे त्याचे मत होते.

अशा प्रकारची जागा कुठे मिळेल या दृष्टीने आम्ही सर्व विचार करत होतो. भाऊमामाला एक कल्पना सुचली. तो म्हणाला, ''आमच्या प्रिन्सेस स्ट्रीटच्या ऑफिसमध्ये तुझे लग्न आपण लावले तर चालेल का?'' जगदीशमामाने त्याला परवानगी दिली. मग आम्ही हक्कूभाई एक सोपस्कार म्हणून विचारले. हक्कूभाईंनी आम्हाला लगेच परवानगी दिली आणि व जगदीशमामाचे लग्न आमच्या R-M² च्या ऑफिसमध्ये १९७५ साली लागले.

या लग्नांबद्दल अजून एक लक्षात राहिलेली गोष्ट म्हणजे, जगदीश मामा आर्मीमध्ये होता आणि आर्मीच्या शिस्तीत कायम असायचा. लग्नाची वेळ ठरलेली होती. त्या दिवशी त्याने सूट बूट वगैरे परिधान केला होता. लग्नाच्या वेळेस थोडा उशीर झाला होता. याचा निषेध म्हणून जगदीशमामाने आपला कोट काढून ठेवला. तो म्हणाला की, आता लग्न झाले तर मी कोट न घालता करीन. उशीर झाल्याबद्दल खेद किंवा राग व्यक्त करण्याची ही त्याची पद्धत होती. थोड्या वेळाने सखदेव मंडळी आली आणि मामाचे लग्न लागले, पण त्याने ठरवले होते त्याप्रमाणे लग्न लागताना कोट मात्र घातला नाही.

रबर मॅन्युफॅक्चरर्समध्ये नोकरी करत असतानाची अजून एक आठवण मला सांगावीशी वाटते. ती म्हणजे, १९७५ साली झालेला रेल्वेचा संप. त्या वेळेस जॉर्ज फर्नांडिस हे युनियन लीडर होते. रेल्वेचा संपूर्ण देशामध्ये संप घडून आला होता. भाऊमामा काही कामानिमित्त हैद्राबादला जाण्यासाठी पनवेलहून व्हि.टी. स्टेशनला गेला होता. मामी आधीच हैद्राबादला गेलेली होती. त्या दिवशी संध्याकाळी मी सिनेमाला गेलो

होतो. नऊ वाजता सिनेमा संपल्यावर परत घरी येत असताना कोपऱ्यावरती मामाच्या बंगल्यामध्ये मला दिवे दिसले. माझ्या मनात पाल चुकचुकली. ''अरे बापरे! मामा परत आलाय की काय? का चोर घरात शिरले?'' माझ्या नशिबाने माझी पहिलीच शंका खरी ठरली. भाऊमामा परत आलेला होता. त्याला कारण म्हणजे त्या दिवशी मुंबई व्हि.टी. स्टेशनला कुलूप लागले होते. सर्व रेल्वेच्या सेवा बंद पडलेल्या होत्या आणि त्यामुळे मामा परत आलेला होता. मी बेल वाजवली. मामाने दार उघडले आणि दारातच त्यांनी मला खडसावून विचारलं, ''कुठे गेला होतास?'' मी सांगितले, ''सिनेमाला गेलो होतो.'' मला म्हणाला, ''मी बाहेरगावी जायची वाट बघत होतास काय?'' मी म्हंटले, ''तसे काही नाही, मला कंटाळा आला म्हणून गेलो.''

तर मला म्हणाला, ''मला खोटे सांगू नकोस. दर महिन्यात किती सिनेमा बघतोस?'' मी म्हटले, ''एखाद-दोन बघतो.'' तर म्हणाला, ''तू खोटे बोलतोय.'' मी सांगितलं की, ''मी खोटं नाही बोलत.'' यावर तो म्हणाला, ''खोटं बोलू नकोस. मी तुझी डायरी बघितली आहे, तू ४ ते ५ सिनेमा दर महिन्यात बघतोस.''

मित्रांनो, जरा विचार करा की ४५ वर्षांपूर्वी मोठ्या माणसांचा धाक किती असू शकतो. १९७५ साली, म्हणजे ४५ वर्षांपूर्वी मी ग्रॅज्युएट झाल्यावर नोकरी करायला लागल्यावर दोन वर्षांनी सिनेमाला न सांगता गेलो किंवा न विचारता गेलो याचा मामाला खूप राग आला होता. त्यात वाईट काही नव्हतं, पण त्या काळी धाक कसा कसा असायचा याचे हे एक उत्तम उदाहरण. याच्यानंतर मी एक बदल केला. तो काय असेल बरे? सिनेमा बघणं काय सोडलं नाही, परंतु माझी डायरी लिहिणे त्या दिवसापासून मी बंद केले.

याच काळातली अजून एक सांगण्याजोगी आठवण म्हणजे भाऊमामाकडे ॲम्बॅसिडर कार होती आणि मुंबईला आमच्या ऑफिसमध्ये मिटिंग असली की, आम्ही बहुतेक वेळा कार घेऊन जायचो. एकदा अशीच मुंबईची मिटिंग आटोपून आम्ही रात्री जवळपास साडेनऊ

वाजता पनवेलला परत आलो. आणि पनवेल बस स्टँडसमोर काही काढण्यासाठी गाडी थांबविली. नंतर सुरू केल्यावर रिव्हर्स गिअर पडायला लागला. काही केल्या दुसरा कुठलाही गिअर पडत नव्हता. गिअर सेटिंगमध्ये काहीतरी गडबड झालेली होती. मामाने एक युक्ती लढवली. आम्ही बरोबर पनवेल बस स्टँडसमोर उभे होतो. नशिबाने बस स्टँडसमोरचा एक रस्ता पनवेल गावात जाणार होता. या रस्त्याने मग आम्ही म्हणजे मामाने रिव्हर्स गिअरमध्ये गाडी हळूहळू चालवत आमच्या गुलमोहर या बंगल्यापर्यंत आणली. हा प्रसंग का आठवतो तर, एका खिडकीतून मामा मागे पाहात होता व दुसऱ्या खिडकीतून मी मागे पाहात होतो. घरी पोहोचायला आम्हाला जवळपास अर्धा तास लागला. दुसऱ्या दिवशी आमची दोघांची मान धरली होती. मामाची उजव्या बाजूने तर माझी डाव्या बाजूने. नंतर मग आमच्या पनवेल मधल्या मेकॅनिकला, नूराभाई याला मामाने निरोप पाठवला. नूराभाई येऊन गाडी घेऊन गेला आणि गाडीचे काम करून संध्याकाळी त्याने गाडी परत आणून दिली.

एक अतिशय लक्षात राहण्यासारखा हा एक अनुभव. या नूराभाई मेकॅनिकबद्दलची एक आठवण सांगावीशी वाटते. त्या काळात भाऊमामा रोटरी क्लब मेंबर होता व रोटरी क्लब पनवेलने रक्तदान शिबिर आयोजित केले होते आणि भाऊमामा त्याच्या परीने त्याच्या ओळखीची जेवढी माणसे बोलवता येईल तेवढी बोलवत होता. त्याच्या लक्षात आले की आपल्याला नूराभाई पण बोलवायला हवे. मामाने निरोप पाठवला व तो आला. रक्तदान करण्यासाठी त्याला बेडवर झोपायला सांगितल्यावर तो अक्षरशः रडायला लागला. ''मला रक्त द्यायचं नाही मला फार भीती वाटते.'' म्हणाला. बरेच रोटरी मेंबर्सनी त्याला समजावून सांगितले. रक्त दिले तर काही प्रॉब्लेम होत नाही. एका दिवसात आपण दिलेले रक्त भरून निघते तर तुझे काही घाबरू नकोस. पण शेवटपर्यंत त्यांनी त्याने काही केल्या ऐकले नाही. मग त्याचे रडणे बघून शेवटी त्याला सोडून देण्यात आले.

ॲम्बॅसिडर कारबद्दलची अजून एक आठवण आहे. मी आणि भाऊमामा एकदा पुण्याला निघालो होतो तेव्हा आतासारखा एक्सप्रेस हायवे नव्हता. फक्त दोन पदरी एक रस्ता होता, खोपोली मार्गे. खोपोलीनंतर बोरघाट सुरू व्हायचा. अतिशय अवघड घाट होता, वेडीवाकडी वळणं होती व खूप चढ होता. विशेषत: शिंग्रोबा या मंदिराजवळ फारच चढ होता, खूपच वेडीवाकडी वळणे होती. या ठिकाणी ही गाडी थांबली की, फार पंचाईत होत असे, कारण ॲम्बॅसिडर कारला तेव्हा हँड ब्रेक नसायचे. त्यामुळे गाडी थांबली की, पटकन खाली उतरून, मागील टायरपाशी एखादा दगड लावावा लागे (जेणेकरून गाडी मागे जाणार नाही) हे काम मी तत्परतेने करीत असे. पुन्हा गाडी चालू झाली की तो दगड रस्त्याच्या कडेला टाकावा लागे. हे काम या घाटातून जाताना कमीत कमी तीन-चार वेळा तरी केलेले मला अजूनही आठवते.



याच ॲम्बॅसिडर कारबद्दलची अजून एक अतिशय मजेदार आठवण कायम माझ्या लक्षात राहिली. ती अशी- पनवेलमध्ये एक नामवंत वकील होते. त्यांचे नाव रामभाऊ लिमये. त्यांचे वडीलही अतिशय निष्णात असे वकील होते. अतिशय चांगले नाव असलेले असे वकील होते. भाऊमामाची व रामभाऊंची चांगली मैत्री होती. त्याला दोन कारणं होती. रामभाऊ हे स्वभावाने अतिशय चांगले मनमिळाऊ होते व रामभाऊंच्या पत्नीचे माहेरचे आडनाव आठवले असल्यामुळे, माझ्याबद्दल दोघांनाही एक प्रकारची आपुलकी होती. तसेच रामभाऊ व मामा हे दोघेही रोटरी क्लबचे मेंबर होते. रामभाऊ व वहिनी बऱ्याच वेळा आमच्याकडे गुलमोहर बंगल्यामध्ये संध्याकाळी किंवा केवळ



रात्री जेवायला वगैरे सुद्धा येत असत.

एकदा असेच आलेले असताना मला म्हणाले, ''काय



मग उद्या माझ्याबरोबर येणार का? उद्या खोपोलीला चाललोय आणि नंतर मग पेणला जाणार आहे. खोपोलीचा रमाकांत वडेवाला, माझा अशील आहे, हवे तितके बटाटावडे खा. मग येतोस का?'' मी मामाला विचारले, ''जाऊ का?'' मामा ''ठीक आहे जा.'' म्हणाला. दुसऱ्या दिवशी सकाळी मी रामभाऊंच्या बरोबर खोपोलीला गेलो. रमाकांत मध्ये त्यांचे काम चालू होते तोपर्यंत मी भरपूर वडे खाल्ले. महत्त्वाचे म्हणजे एक पैसा देणे नव्हते. कारण त्यांच्या वकिलांचा मी मानलेला भाचा. त्यामुळे अगदी मानाने मला हवे तेवढे खाता आले. रामभाऊंच्या तेथील काम झाल्यावर आम्ही पेणला निघालो. खोपोली-पेण हा अंतर्गत रस्ता अगदी अरुंद व जवळपास जंगलातून होता, त्या दिवशीही खूप पाऊस पडत होता. हा आतील मार्गाने असा रस्ता होता. घनदाट जंगल होते. आम्ही खोपोली सोडून काही अंतर गेलो आणि आमची कार बंद पडली. बरोबर रामभाऊंचा ड्रायव्हर रामदास होता. रामदासने बरेच प्रयत्न करून बघितले. बोनेट ओपन करून पाहिले काही तिथे गडबड झाली नाही ना ते बघितले. नंतर बऱ्याच

प्रयत्नानंतर रामभाऊंच्या मनात आले. रामदास डिक्की उघड बघू, त्या वेळेस कारच्या डिक्कीमध्ये एक फ्युएल पम्प लावलेला असे व पेट्रोलमध्ये काही कचरा आला तर तो फ्युएल पम्पमध्ये अडकून कार बंद पडत असे. तो पंप उघडणे काही शक्य नव्हते म्हणून त्या फ्युएल पम्पवर एक स्पॅनरने ठोकले व रामदासने कार स्टार्ट केली. काही अंतर गेल्यावर कार परत बंद पडली. मग रामभाऊंनी एक युक्ती लढवली. ते रामदासला म्हणाले, ''तू डिक्कीत बस. मी स्वतः गाडी चालवतो, तू आपला ठक करत रहा.'' असे आम्ही कसेबसे पेणला पोहोचलो.

पेणला पोहोचल्यावर रामभाऊंच्या ओळखीच्या एका गॅरेजमध्ये आम्ही कार ठेवली आणि मग त्यांनी पंपाचे काम करून घेतले. या सगळ्या कार्यक्रमांमध्ये साधारणपणे तासाभरात पोहोचण्याऐवजी आम्हाला तीन तास लागले.

मला पुन्हा भूक लागलेली होती. पेणलासुद्धा रामभाऊच्या एका अशिलाचे हॉटेल होते. तेथे बसून, पोटभर मिसळ-पाव खाल्ला व संध्याकाळी रामभाऊंचे काम संपल्यावर आम्ही, पेणहून पनवेलला परत आलो. एक अविस्मरणीय अशी ही ट्रीप होती.

साधारणपणे १९७७ सालच्या अखेरीस भाऊमामाने, $R\text{-}M^2$ मधील नोकरी सोडली. त्याचे कारण सांगावे की न सांगावे या द्विधा मन:स्थितीत मी होतो. परंतु आत्तापर्यंत जे काही घडले ते सर्व आपल्यासमोर यावे म्हणून थोडक्यात सांगावेसे वाटते. $R\text{-}M^2$ मध्ये काम करत असताना बऱ्याच वेळा संध्याकाळी मी किमनिक रबर इथे काही रबर मोल्डिंगचे काम करीत असे. त्यासाठी लागणारे रबर कंपाऊंड मी $R\text{-}M^2$ मधून घेऊन जात असे. किमनिक रबरमध्ये आम्ही एक रबर मोल्डिंग प्रेस (आम्ही म्हणजे मामाने पैसे गुंतवून) बसला होता. संध्याकाळी मी त्याच्यावर काम करीत असे. काही वेळा गरज पडेल तर आमच्याच कंपनीतला एक माणूस, शांताराम याला बरोबर घेऊन जात असे.

यासंबंधी मी बऱ्याच वेळा भाऊमामा सुचविले होते की, आपण हे काम करतो हे हक्कूभाईंना सांगावे असे. पण तेव्हा मी फारच ज्युनियर होतो आणि मामाने मला प्रत्येक वेळेस सांगितले की, कधी काय सांगायचे ते मला माहीत आहे. तू या बाबतीत फारसे काही बोलू

नकोस. तुला जमेल तसे काम करत राहा. R-M² मध्ये बरेच काही कंप्लेंट यायला सुरुवात झाली आणि त्याबद्दल नक्की काही सोल्यूशन मामाच्या मनात होते का नव्हते, हे मला माहीत नाही. पण मामाचे मित्र डॉक्टर अरविंद घाग यांना कन्सल्टंट म्हणून हक्कूभाई यांनी नेमले आणि त्यामुळे डॉक्टर घाग बरेच वेळा कळंबोलीच्या कंपनीत येऊ लागले. बऱ्याच वेळा ते यायचे तेव्हा मामा कंपनीमध्ये नसायचा. ते मला विचारायचे, ''खाडिलकर साहेब कुठे आहेत?'' पण मी सांगायचो, ''मला कल्पना नाहीये. मी काय विचारू शकत नाही की तुम्ही कुठे जाताय?'' या सगळ्या गडबडीमध्ये कुठून तरी हक्कूभाईंना कुणकुण लागली की, मी संध्याकाळी किमनिक रबरमध्ये काही रबर मोल्डिंगचे काम करतो.

एक दिवशी दुपारी हक्कूभाई आले. मामा नेमका तेव्हा कंपनीमध्ये नव्हता. हक्कूभाई मला म्हणाले, ''श्रीकांत, आपण जरा एक फेरी मारून येऊ.'' मला गाडीत घेऊन सरळ किमनिक रबरमध्ये गेले. तिथे शांताराम काम करीत होता त्या रबर मोल्डिंग प्रेसजवळ थांबले व मला म्हणाले, ''या माणसाला कोठे तरी पाहिले आहे. मी त्यांना सांगितले की हा शांताराम आहे व आपल्या कंपनीत काम करतो.''

त्यांनी विचारलं की, ''तो इथे काय करतोय?'' मी म्हटलं, ''त्याला इथे काही मोल्डिंगचे काम करायला मी सांगितले होते.'' ते म्हणाले, ''ठीक आहे.'' R-M² कंपनीत परत गेल्यावर त्यांनी मला या बाबतीत संपूर्ण माहिती विचारली. ''यासाठी लागणारे रबर तुम्ही कुठून घेता? तिथे तुम्ही मोल्डिंग करता हे तुम्हाला कोणी सांगितले आहे का? कोणाची परवानगी घेतली आहे का?''

मी त्यांना सांगितले की, ''यासाठी लागणारे रबर मी R-M² मधून घेऊन जातो.''

''शांताराम काम करतो ते त्याला काम करायला कोणी सांगितले?'' म्हटलं, ''मी त्याला सांगितले.'' त्यांनी मला विचारलं, ''तुम्ही सगळं काम करत आहेत याची खाडिलकर साहेबांना कल्पना आहे का?'' मी

एक-दोन मिनिटं विचार केला आणि त्यांना सांगितलं, ''नाही, याबाबतीत खाडिलकर साहेबांना काही कल्पना नाहीये.'' हक्कूभाई म्हणाले, ''या सर्वाचा काय परिणाम होईल याची तुम्हाला कल्पना आहे का?''

मी त्यांना सांगितले, ''मला कल्पना आहे एका प्रकारे मी कंपनीत चोरी केल्यासारखा प्रकार आहे आणि तुम्ही द्याल ती शिक्षा मला मान्य आहे.'' हा सगळा प्रकार झाल्यावर हक्कूभाई मुंबईला निघून गेले. मी संध्याकाळी घरी गेलो आणि भाऊमामाला झालेला सगळा प्रकार सांगितला. यावर मामा काही बोलला नाही. काही वेळाने त्याने मला एक पाकीट दिले खाकी रंगाचे आणि मला म्हणाला, ''उद्या सकाळी तू मुंबई ऑफिसला जा, हक्कूभाईंना भेट आणि हे पत्र मी दिले म्हणून त्यांना सांग.'' मी म्हटलं, ''तू कुठे जातो आहेस?'' तर म्हणाला, ''मी आणि मामी आता सांगलीला निघालो आहे.'' थोड्या वेळात मामा सांगलीला निघून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी मी ते पत्र घेऊन आमच्या मुंबई ऑफिसला गेलो. बहुतेक मी येणार याची हक्कूभाईना कल्पना असावी. गेल्यावर मला ''बसा'' म्हणाले. व आणि त्यांच्या हातात दिलं त्याने ते पत्र उघडून बघितलंही नाही. त्यांना कल्पना होती. थोड्या वेळाने मला म्हणाले की, ''खाडिलकर साहेब आपली कंपनी सोडून जात आहेत. त्यांनी राजीनामा दिला आहे. तुम्हाला काय करायचे?''

मी सांगितले, ''मला कंपनीत काम करायची इच्छा नाहीये. माझ्याकडून चूक झाली आहे. आणि त्याबद्दल तुम्ही मला जी द्याल ती शिक्षा मान्य आहे.'' तर हक्कूभाईंनी मला सांगितलं, ''श्रीकांत, तुम्हाला जर काम करायचे असेल तर तुम्ही करू शकता. तुम्ही मला काल जे काय सांगितले, माझ्या मते तुम्ही मला खरे बोललेला नाहीयेत. अजूनही मला सांगा खरं काय झालं.'' मी त्यांना सांगितलं, ''मी काल तुम्हाला जे काही सांगितलं तेच खरं आहे. मी हे काम स्वतः करत होतो. याबद्दल मामाला काहीही कल्पना नव्हती.''

त्यानंतर मी काही वेळाने ऑफिसमधून बाहेर पडलो. राजीनामा देऊन जायची गरज नव्हती. कारण तेव्हा मी फारच ज्युनियर माणूस होतो.

हक्कूभाईच्या ऑफिसमधून बाहेर पडल्यावर मी मुंबई सेंट्रलला अवीमामाच्या घरी गेलो. संध्याकाळी अवीमामा रिझर्व्ह बँकेतून आल्यावर आम्ही दोघे फिरायला म्हणून बाहेर पडलो. हक्कूभाईच्या ऑफिसमध्ये झालेल्या प्रसंगाची मी अवीमामाला पूर्ण माहिती दिली. नशिबाने त्याच वेळेस जगदीश मामासुद्धा सुट्टीवर आलेला होता. तोही मुंबई सेंट्रलला अवीमामाकडे राहिलेला होता, त्यालासुद्धा हे सगळं नंतर सांगितले. अवीमामाने सांगितल्याप्रमाणे, मी एक काकांना रट्टिहल्लीला एक पत्र पाठवले. काही दिवसांनी काकांचे मला उत्तर आले व मी जे काय केले किंवा मला सुचले त्याबद्दल त्यांनी माझे अक्षरश: प्रचंड कौतुक केले होते. त्यांनी असे लिहिले होते, त्या वेळेस तुला हे कसे सुचले? खरंच परमेश्वराचे जेवढे आभार मानावे तेवढे थोडे आहेत. परमेश्वराने तुला योग्य ती योग्य वेळी बुद्धी दिली याबद्दल मला खरेच कौतुक वाटते.

**कोकण रबर प्रॉडक्ट्सचा उदय**

या सर्व प्रकारानंतर सुमारे दोन-तीन महिने मी व मामा दोघांनाही नोकरी नव्हती. पुढे काय करायचे काही नक्की सुचत नव्हते. याच वेळेस आमच्या मदतीला उभे राहिले ते म्हणजे, भाऊमामाचे मित्र, श्री सालढाणा साहेब. हे मित्र तर होतेच, शिवाय रोटरी क्लब मेंबरही होते. त्यांची पनवेल इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये 'स्पासा रबर रोलर प्रायव्हेट लिमिटेड कंपनी' नावाची कंपनी होती. या वेळेस मामाने आपण ठाण्याच्या घरी जावे असे ठरविले आणि मग तिथून पुढील नोकरीचे काही प्रयत्न करावे असे ठरले. त्या दृष्टीने त्याने मला ठाण्याच्या घराची जरा रंगरंगोटी करावी असे सुचवले. मी म्हटले, ''ठीक आहे काही हरकत नाही.'' मी आणि बताले मास्तर दोघेजण तीन-चार दिवस ठाण्याच्या

ब्लॉकमध्ये जाऊन राहिलो व आम्ही दोघांनी तो फ्लॅट पूर्णपणे रंगकाम करून साफसफाई करून तयार केला. हे काम झाल्यावर पनवेलला एके दिवशी सालढाणा साहेब आमच्या घरी आले आणि मग भाऊमामाला व मला म्हणाले, ''खाडिलकर, आता नोकरी कुठे करताय? स्वतःचा काही उद्योग चालू करा रे, मी काय लागेल ती मदत करतो, पनवेल इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये मी तुम्हाला एक प्लॉट मिळवून देतो.''

सालढाणा साहेब म्हणाले, ''रबर मोल्डिंगची फॅक्टरी चालू करा, तुम्हाला लागेल ती मदत मी करतो. त्या दृष्टीने आमची विचारसरणी सुरू झाली आणि मग मामांनी ठरवले की, 'आपण एक फॅक्टरी सुरू करू.' त्याप्रमाणे पनवेल इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये ऑफिसमध्ये जाऊन भाऊ मामाने मिळण्यासंबंधी एक अर्ज दाखल केला. कालांतराने आम्हाला प्लॉट मंजूर झाला व इंडस्ट्रीयल इस्टेटतर्फे आम्हाला एक शेड बांधून मिळाली. त्याच्यानंतर या फॅक्टरीसाठी लागणारे मशीन्स संबंधी प्रयत्न सुरू झाले. सुरुवातीला रबर मिक्सिंग मिलर दोन मोल्डिंग प्रेस घेणेचे ठरले. मशीन घेण्याचे ठरले. यासाठी मग आम्ही मुंबईला 'जीजी इंजिनिअरिंग वर्क्स' येथे गेलो. त्याचे मालक एक सरदारजी होते. मामाला ते चांगले ओळखत होते. मामाने त्यांना सांगितलं की, ''आम्हाला ३ मशीन्स हवी आहेत.'' तर ते म्हणाले, ''ठीक आहे, दोन-तीन महिन्यांनी या आणि तिन्ही मशीन घेऊन जा.'' मामाने विचारले, ''पैशाचं काय?'' तर ते म्हणाले, ते आपण नंतर बघू. तू मशीन तर घेऊन जा आणि काम चालू कर.'' आणि खरंच दोन-तीन महिन्यात आम्हाला सर्व मशीन्स मिळाली. सगळी मशीन्स आम्ही आमच्या कोकण रबर प्रॉडक्टस् या नवीन कंपनीत बसवली. या कंपनीचे नाव भाऊ मामाने 'कोकण रबर प्रॉडक्ट' असे ठेवले होते, कारण त्या वेळेस ते पनवेल म्हणजे कोकणाची जणू काही सुरुवात होती. लवकरच आम्ही आमचे काम सुरू केले. सुरुवातीला सालढाणा साहेबांची आम्हाला प्रचंड मदत झाली. सालढाणा हा खरंच एक अतिशय चांगला देव माणूस होता. त्यांची मला वैयक्तिकरित्यासुद्धा

खूप मदत झाली. ती म्हणजे १९७८ साली काकांचे अकस्मात, अपघाती निधन झाल्यावर, आमचे रहिहल्लीला असलेले सगळे सामान मी कोकण रबरमध्ये एका रूममध्ये आणून ठेवले होते.

काकांच्या निधनानंतर मी व आई भाऊमामाकडे राहात होतो. लवकरात लवकर आपले घर असावे असे आम्हाला दोघांनाही वाटत होते. तसेच आमचे सगळे सामानसुद्धा कोकण रबर एका रूममध्ये ठेवलेले होते. त्या दिशेने मी घराची शोधमोहीम सुरू केली. बऱ्याच ठिकाणी, भाडेतत्वावर घरे पहिली परंतु, मनाजोगते घर काही मिळत नव्हते. भाडं खूप असणारे व बाहेरून पाणी आणणे किंवा कॉमन संडास बाथरूम आणि साधारणपणे दहा हजार रुपये भाडे हे सगळे मला एकंदरीत अवघड वाटत होते. सालढाणा साहेबांना हे सर्व कळले. सालढाणा साहेब त्या वेळेस पायोनियर सोसायटीमध्ये राहात असत. त्यांच्या शेजारीच एक फ्लॅट रिकामा होता. हा फ्लॅट विलेपार्ले इथली श्री. घळसासी नामक एका व्यक्तीचा होता. त्यांनी हा फ्लॅट एक गुंतवणूक म्हणून घेऊन ठेवलेला होता. मला सालढाणा साहेबांनी बोलावले व म्हणाले की, ''हा फ्लॅट बघ तुला कसा वाटतोय? तुला आवडला असेल तर मी या घरमालकाशी बोलतो.'' मी होकार दिल्यावर ते या व्यक्तीशी बोलले व जर हा फ्लॅट विकणार असाल तर, श्रीकांतला द्या, एक ब्राह्मण मुलगा आहे , नुकतेच त्याचे वडील एका अपघातात वारले आहेत, तर बघा योग्य किंमत ठरवा व त्याला हा फ्लॅट विका अशी विनंती केली. लवकरच ते त्या मालकाशी बोलले व त्या फ्लॅटची किंमत रुपये १८,००० ताबडतोब देणे व दर महिना १८५ रुपये लोन रिपेमेंट करणे, या बोलीवर, घराच्या व्यवहाराचे नक्की केले. नशिबाने काकांच्या प्रॉव्हिडंट फंडमधून त्या वेळेस आम्हाला २४ हजार रुपये मिळाले होत. मी आई व मामाशी बोलून हा फ्लॅट घेण्याचे ठरवले. मग घर मालक घळसासी यांना भेटून ठरल्याप्रमाणे १८ हजार रुपये देण्याचे ठरले. त्यानंतर सालढाणा साहेब मला म्हणाले की, ''अरे

एवढी रक्कम घेऊन तू कसा जाणार? तू एक काम कर, पैसे काढून घे व माझ्याबरोबर चल. आपण गाडीने विलेपार्लेला जाऊ, पैसे त्यांच्याकडे देऊ, त्यांच्याकडून सर्व कागदपत्र घेऊ आणि घराची किल्ली घेऊ.'' एक दिवस खास माझ्यासाठी सालढाणा साहेब त्यांच्या अतिशय बिझी शेड्यूल मधून वेळ काढून माझ्यासाठी मुंबईला आले. आम्ही पार्ल्याला गेलो, पैसे मालकांना दिले, कागदपत्रं आणि किल्ली घेतली व पनवेलला परत आलो.

घर ताब्यात मिळाल्यावर पुढचे काम म्हणजे त्या घराचे रंग रंगोटी व साफसफाई. बताले मास्तर होताच मदतीला तयार, मग मी व बताले मास्टर, दोघांनी मिळून दोन-तीन दिवसात घराचे रंगकाम साफसफाई पूर्ण करून, कोकण रबरमध्ये ठेवलेले सगळे घर सामान आम्ही या पायोनियर सोसायटीमधील घरी हलविले. साधारणपणे १५ दिवसांत, सगळे घर व्यवस्थित लावून मी आणि आई या घरी राहायला आलो.

पायोनियर सोसायटीमधील घराच्या निमित्ताने बऱ्याच आठवणी मनात दाटून आल्या आहेत. त्यातील काही आता मी आपल्याला सांगू इच्छितो. आमच्या शेजारच्या फ्लॅटमध्ये सालढाणा साहेब राहायचे आणि समोरच्या फ्लॅट मध्ये साळवी मॅडम राहायच्या. या दोघी बहिणी होत्या. दोघी अविवाहित होत्या. मोठ्या होत्या काशिताई आणि धाकट्या होत्या यमुताई. काशीताई या शाळेमध्ये शिक्षिका होत्या, तर या यमुताई या टेलिफोन डिपार्टमेंटमध्ये ऑपरेटर होत्या. यमुताई कित्येक वर्षं पनवेलहून व्हि.टी., मग काही वर्षांनंतर दादरला, त्यानंतर काही वर्षं चेंबूरला रोज बसने प्रवास करीत असत.

या दोघी साळवी भगिनींचा आम्हाला फार मोठा आधार होता. काका गेल्यानंतर आईची मन:स्थिती खूपच बिघडलेली होती. अशा वेळी तिला कोणीतरी चांगली मैत्रीण असणं ही काळाची गरज होती. ही गरज, साळवी भगिनींनी अतिशय चांगल्या प्रकारे भरून काढली. विशेषत: रोज रात्री जेवण झाल्यावर यमुताई आमच्या घरी येऊन

आईशी गप्पा मारीत असत. या जोडीमध्ये अजून एक व्यक्ती होती. तिचे नाव म्हणजे संध्या भोपळे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे भोपळे मास्तरांची ही दुसरी कन्या. आमच्या घरी जेवण झाल्यावर रोज रात्री आई, यमुताई व संध्या यांची बैठक असायची आणि इकडच्या तिकडच्या गप्पांच्या नादात आई हळूहळू पनवेलमध्ये रमू लागली. यमुताईंचा खरोखरीच आमच्यावर फार जीव होता. खूप प्रेम करत होत्या. असे म्हणतात ना की, नाती ही रक्ताची असावीत असे काही नाही, काही नाती रक्ताची नसतात, पण ती रक्ताच्या नात्यापेक्षा मजबूत असतात हेच खरे. आम्हाला त्यांचा खूपच आधार होता व त्यांची मदत ही खूप होत होती, विशेषत: मी कामानिमित्त बाहेर गावी गेलो की आईची काळजी नसायची.

हळूहळू कोकण रबरमध्ये आमचा जम बसू लागला. आम्हाला बऱ्यापैकी ऑर्डर मिळू लागल्या. आधीचा माझा व मामाचा अनुभव आणि जे पडेल ते काम करायची तयारी यामुळे कोकण रबरमध्ये मी काय केले नाही हेच ठरवणे कठीण जाईल. या कंपनीचा प्रॉडक्शन मॅनेजर मीच होतो. या कंपनीचा मेंटेनन्स इंजिनियर मीच होतो. मार्केटिंगसाठी मी खूप फिरत असे. रट्टिहल्लीहून घरातील सर्व सामान कोकण रबरमध्ये आणून ठेवल्यावर वॉचमन ठेवण्याची या काळात आमची ऐपत नसल्यामुळे मग मी बरेच दिवस, मी रात्रीचे जेवण झाल्यावर झोपायला जात असे.

झोपायला कंपनीत गेल्यामुळे, सकाळी लवकर उठून रबर मोल्डिंग प्रेसचे हिटर्स चालू करून, मिक्सिंग मेलवर, त्या दिवशी लागणाऱ्या रबर कंपाऊंड मिक्सिंग करून, आठ वाजेपर्यंत बाकीचे कामगार मंडळी कामावर येईस्तोवर मी सर्व दृष्टीने तयारी करून ठेवत असे. एकदा सगळे कामगार आले आणि मोल्डिंगचे काम सुरू झाले की, मी मग घरी जाऊन अंघोळ करून नाश्ता करून माझा व बाळूमामाचा डबा घेऊन परत येत असे.

कोकण रबरमध्ये काम करत असताना मोल्डिंग केल्यानंतर, रबर पार्टचे फिनिशिंग करावे लागे. म्हणजे ट्रीमिंग करावे लागे. रबर मोल्डिंग केल्यावर, जो जादा रबरचा भाग असेल तो कापून काढावा लागतो, त्याला ट्रीमिंग असे म्हणतात. त्याच्यासाठी कात्री किंवा ब्लड वापरावे लागते. फिनिशिंगमध्ये माझा बऱ्यापैकी हातखंडा होता. साधारणपणे भाऊमामा आणि मामी दोघे मिळून जेवढे फिनिशिंग करायचे त्याच्या जवळपास दुप्पट काम, मी तेवढ्याच वेळात करीत असे. हे काम ही कंपनी बंद झाली की संध्याकाळी किंवा रात्री घरी बसून आम्ही करीत होतो.



कोकण खबरमध्ये आम्हाला खोपोलीच्या पँक पेपर मिल येथून एक नवीन प्रकारचा रबराचा पार्ट बनवायची ऑर्डर मिळाली होती. ऑर्डर खूप मोठी नव्हती, परंतु दर महिन्यात असायची. तो एक रबर तू मेटल बाँडेड पार्ट होता. तो त्यांच्या पेपर मिलचा कपलिंगचा एक भाग होता. त्याच्यामध्ये दोन मेटलचे पार्ट म्हणजे एक मेटल बूश व एक मेटलची रिंग होती व या दोन्ही मेटलच्या पार्टना जोडण्यासाठी रबर मोल्डिंग करावे लागे. हे मोल्डिंग आम्हाला मोठ्या प्रेस वरतीच करावे लागायचे. एका मोल्डिंगमध्ये जवळपास, दीड किलो रबर कंपाऊंड लागायचे. हे मोल्डिंग करायला प्रेशरही बरेच लागायचे. आमच्या प्रेस, हॅन्ड ऑपेरेटेड असल्यामुळे काही वेळा मोल्डिंग ठीक होत नसे, म्हणून मी हे मोल्डिंगचे काम, बदलापूरला, मामाचा एक मित्र, श्री. राव यांच्या कंपनीमध्ये करायचे ठरविले. राव यांच्याकडे हायड्रोलिक मोल्डिंग प्रेस असल्यामुळे, प्रेशर चांगले मिळे व मोल्डिंग एकदम छान होत असे.

यासाठी मेटलचे पार्ट व रबर कंपाउंड घेऊन बदलापूरला राव यांच्या कंपनीत जात असेल. जवळपास २० ते २५ किलो हे कमीत कमी वजन असायचे. पनवेलहून बदलापूरला जाणारा एक शॉर्टकट होता. त्याला पाईपलाईन रोड असे म्हणत. अतिशय अरुंद रस्ता होता आणि रोडवरती खड्डे वगैरे भरपूर होते. मुख्य म्हणजे तो अतिशय निर्मनुष्य असा रस्ता होता. वाटेत बऱ्यापैकी एक जंगल होते आणि दिवसासुद्धा त्या रोडने जाणे म्हणजे दिव्य होते. रस्त्यात एखादा माणूसही दृष्टीस पडत नसे. अशा या रोडने मी स्कूटरवरून सकाळी लवकर निघून सबंध दिवस बदलापूर येथे थांबून हे मोल्डिंग पूर्ण करून परत रात्रीपर्यंत पनवेलला येत असे. सोबत जवळपास ३० ते ३५ किलो वजन असे. हा एक विलक्षण अनुभव होता आणि केवळ कुठल्याही कामाची तयारी किंवा कुठल्याही प्रकारची भीती नसल्यामुळेच मी हे करू शकलो असे मला वाटते.

कोकण रबरमध्ये अजून एक आठवण लक्षात राहणारी म्हणजे आमच्यासमोर सुधाकर म्हणून एक कंपनी होती याचे दोन मालक होते प्रभाकर जाईल व थत्ते. यापैकी जाईल हे पनवेलला राहायचे आणि ते मुंबईला राहायचे. ते अधूनमधून येत असत. प्रभाकर जाईल आमचे चांगले मित्र झाले होते. रोज त्यांची आमच्याबरोबरची बैठक ठरलेली असायची. असे दुपारी तीन वाजता आले की, ''काय श्रीकांत, चहा झाला का?'' असे विचारून आमच्याकडे येऊन बसत आणि मग मी, प्रभाकर जाईल आणि मामा चहा पीत असतो. प्रभाकर जाईल चांगले गृहस्थ आमचे चांगले मित्र होते आणि एकंदरीत एक भला माणूस होता. प्रभाकर जाईल यांच्याकडे सुधाकर प्रॉडक्शनमध्ये जुने भंगाराचे पत्रे आणून त्याच्यापासून एलेक्ट्रोलिजिस प्रोसेसने किंवा इतर बरेच प्रकारचे मेटलच्या पावडर बनवल्या जात. या एलेक्ट्रोलिजिस प्रोसेससाठी त्यांच्याकडे मोठ्या मोठ्या चौकोनी लोखंडी टाक्या होत्या आणि इलेक्ट्रॉन प्रोसेस मला जॉब असतो तो ॲसिडिक असतो. त्यासाठी

कोकण रबर पनवेलमधील सहकारी



थँक्स आतून रबर लाईनिंग केलेले असायचे. आमची रबर फॅक्टरी आहे आणि काम आम्ही करू शकतो म्हटल्यावर त्यांनी सुधाकर प्रोडक्शन त्यांचे टँक दुरुस्तीसाठी मुंबईला पाठवणे बंद केले आणि आम्हाला त्यांचे काम वरचेवर मिळू लागले. हे काम थोडे किचकट असते. रबरचे कोटिंग पत्रे सोडताना कुठेतरी रबर कापले जाऊन त्यामधून ॲसिड अजून हळूहळू गळून जायला सुरुवात व्हायची. त्यासाठी हा कट केलेला कट झालेल्या रबरचा पार्ट तेवढा कापून तिथे एक नवीन पॅच लावून नंतर त्याच्यामध्ये तिने त्याचे रबरचे करून टँक एक दिवस पाण्याने भरून ठेवून लिकेज नाही ना, हे चेक करून परत देणे हे आमचे काम असे. या कामाचे आम्हाला स्क्वेअर फूटने बऱ्यापैकी रेट मिळत असे. या कामात अधिक काम केले नव्हते, परंतु कसे करता येईल हे डोके वापरून मी बऱ्यापैकी त्याच्यामध्ये माझा हातखंडा होता, हे काम मी स्वतः करीत असे. कामगार देण्यासारखे हे काम नव्हते. महिन्यातून ठरावीक टँक आम्हाला रिपेअर करण्यासाठी येत असत.

आधी उल्लेख केला त्याप्रमाणे साहेब आम्हाला काही मुलींची कामे देत असत. कालांतराने एक-दोन वर्षांमध्ये रवी कुलकर्णी हा त्यांचा मानलेला भाचा तो त्यांच्या कामासाठी त्यांच्या कंपनीत जॉईन झाला. रवी कुलकर्णीने मुंबई आयटीमधून डी. लीट. केले होते. अतिशय हुशार असा हा मुलगा स्वभावाने अतिशय चांगला आणि त्याने मग प्रिंटींगसाठी लागणारे रबरचे पार्ट तयार करणे तसेच रबर रोलर बनवण्यासाठी लागणारे आपले मीटरचे शर्ट तयार करण्याचा कारखाना चालू केला. त्याच्यासाठी लागणारे रबरचे पार्ट आम्ही कोकण ड्रॉवरमध्ये

बनवून त्याला देऊ लागलो. तू आम्हाला चांगला बिझनेस रेग्युलरली दर महिन्यात मिळू लागला. रवीची आणि माझी थोड्याच दिवसात चांगली गट्टी जमली आणि आम्ही चांगले मित्र झालो.

कोकण रबरबद्दल अजून एक आठवण सांगावीशी वाटते म्हणजे, ही कंपनी सुरू करायची असे कळल्यावर माझ्या काकाने भाऊमामाला पूर्ण पाठिंबा दिला होता व त्या काळात म्हणजे साधारणपणे ७७ किंवा ७८ साली त्यांच्या बचतीमधून सुमारे पंधरा हजार रुपये मामाला कंपनी सुरू करण्यासाठी मदत म्हणून दिले होते. त्या काळातली ही रक्कम बरीच होती. काकांचा पगार आणि त्यांची एकंदरीत बचत याचा विचार केला तर ही रक्कम खूपच मोठी होती.

साधारणपणे याच काळात म्हणजे १९७५ साली सुरुमामाची गडहिंग्लजहून पनवेलला कार्यकारी अभियंता म्हणून बदली झाली. सुरुमामा आमच्या (भाऊमामाच्या) घराजवळच राहात असे. त्याच्या घराच्या मालकांचे नाव होते जोशी. त्यांना पनवेलमध्ये सगळेजण टाटा जोशी असेच ओळखत असत. ही जोशी कंपनीसुद्धा खूप चांगली होती. सुरुमामाला पनवेल येथे आल्यावर, बऱ्याच वेळा फिरतीसाठी बाहेरगावी जावे लागे. शोभा मामीला सोबत म्हणून मी सुरुमामाच्या घरी रात्री झोपायला जात असे. तेव्हा रूपाली अगदी छोटी होती आणि अतिशय गोड मुलगी होती. तिला सुरुमामा, नाना या टोपण नावाने हाक मारत असे. दुसरे कुणी तिला नाना म्हणाले की, ''नाना म्हणायचं नाही बापू रागवतात.'' असे ती म्हणत असे, ''पण रुपाली फक्त मी म्हटलं तर चालेल ना?'' असे विचारले की, ''हो



**पनवेलचे सहकारी व भाऊमामा**

फक्त तू म्हटलेस तर चालेल.'' असे ती जवळपास सर्वांना, बिनशर्त परवानगी देत असे.

१९७८ साली, राहुलचा जन्म झाला. सुरुमामाकडे घरकामासाठी एक ऑर्डरली होता. त्याचे नाव सागवेकर. सागवेकर हा एक अतिशय चांगला माणूस. तो एक नोकर नसून कुटुंबाचा हिस्सा असल्याप्रमाणे जे पडेल ते काम, मन लावून करीत असे. मला रुपाली राहुलप्रमाणे, 'श्रीकांतदादा' असे म्हणत असे. मला काय हवं नको याची विचारपूस व लागेल ती मदत करण्यात त्याचा हातखंडा होता.

सागवेकरकडे काही अतिशय चांगले गुण होते. तो मालिश खूप छान करीत असे. अतिशय मन लावून भरपूर वेळ देऊन, हे काम तो करीत असे. दुसरा त्याच्या अंगचा गुण म्हणजे आयुर्वेदिक औषधे बनवण्यामध्ये त्याचा हातखंडा होता. विशेषत: मला आठवते, मूळव्याधीवर त्याच्याकडे एक जालीम औषध त्यांनी तयार केलेले होते. हे औषध म्हणजे वेगवेगळ्या वनस्पतींची पूड आणि ही पुढील २१ दिवसात घ्यावी लागे, पण त्यानंतर मूळव्याध पूर्णपणे भरत असे. मला मूळव्याध झाली होती व सागवेकरच्या औषधाने मला खूप चांगला उपयोग झाला. माझी मूळव्याध कायमची बरी झाली.

सुरुमामा १९७५ साली पनवेलला बदली होऊन आला, तेव्हाची एक विलक्षण आठवण म्हणजे, 'शोले' हा जी. पी. सिप्पी यांचा गाजलेला सिनेमा, मुंबईला मिनर्व्हा या थिएटरमध्ये रिलीज झाला. या सिनेमाचा तेथे रोज चारचा शो १९७८ सालापर्यंत सतत चालू होता. १९७८ साली सुरुमामाची बदली पनवेलहून मडगावला झाली व नेमक्या याच सुमारास शोले हा सिनेमा ३ वर्षांनंतर फक्त मॅटिनीपुरता सुरू राहिला. शोले मी बरेच वेळा पाहिला होता व अजूनही काही वेळा, लहर आली की पाहतो. शोलेबद्दल काही आठवणी अजून ताज्या आहे.

मामाचे मित्र किंवा गुरू डॉ. अरविंद घाग, यांचा मुलगा निहार, त्या वेळी साधारणपणे ७ ते ८ वर्षांचा असेल, अमजद खानची नक्कल,

हुबेहूब करत असे. मलासुद्धा शोले बरेच वेळा पहिल्यामुळे, जवळपास सर्व संवाद, पाठ आहेत.

आमचा लग्नापूर्वी, साखरपुडा दहिसर येथे सदुकाकांच्या घरी झाला. व आम्ही दोघे (मी व प्रथिता) फिरायला म्हणून मुंबईला गेलो. शोले सिनेमा पाहायचा म्हणून मरीन लाईनला उतरून चालत, मिनर्व्हा थिएटरला जायचे ठरले. दुपारची गर्दीची वेळ असल्यामुळे मी प्रथिताला लेडीज कंपार्टमेंटमध्ये बसायला सांगितले. जवळ भेटायचे ठरले. या नंतर काही केल्या प्रथिताचा चेहरा काही मला नीटसा आठवेना. माझ्या जवळ तिचा फोटोही नव्हता. मनात प्रश्न पडला आता हिला ओळखायचे कसे? मग विचार केला, जी मुलगी मरीन लाईन स्टेशनवर, पुढील गेट जवळ येऊन थांबेल तीच आपली होणारी बायको. नशिबाने प्रथिताला माझा चेहरा आठवत होता म्हणून आमची भेट झाली व नंतर आम्ही सिनेमा पहिला.

सुरुमामाचा कोकण रबरला एक खूप मोठा आधार होता. आम्हाला कधीही काही गरज पडली की, सुरुमामा सढळ हस्ते आम्हाला मदत करत असे. वैयक्तिकरित्या सुरुमामाने प्रचंड मदत केलेली आहे. त्याची परतफेड करणे जवळपास या जन्मी तरी अशक्य आहे. सुरुमामामुळे अजून एक माझा खूप मोठा फायदा झाला होता, तो म्हणजे मी पनवेलला आल्यावर मला अगदी मोजकेच म्हणजे एक दोनच मित्र होते. एक म्हणजे नितीन सोमण, पण तो माझ्यापेक्षा वयाने बरेच लहान होता आणि दुसरा म्हणजे रामभाऊ लिमये यांचा भाचा, नाव- संजीव वैद्य. तो मूळचा पुण्याचा. सुट्टीत पनवेलला आला की, आमची दोघांची चांगली गट्टी जमत असे. सुरुमामामुळे मला बरेच मित्र मिळाले. सुरुमामाची काम करण्याची पद्धत फार वेगळी होती. माणसे कशी जोडायची किंवा पब्लिक रिलेशन म्हणजे काय हे मी जर कोणाकडून शिकलो असेल तर ते सुरुमामाकडून. सुरुमामाने त्याच्या ऑफिसमध्ये सगळ्यात तरुण सहकाऱ्यांचा जणू काही एक क्लब बनवला होता.

आठवड्यातून बऱ्याच वेळा संध्याकाळी ते एकत्र जमत असत आणि बऱ्याच वेळा सुरुमामा मलाही बोलवत असे. त्यामुळे मला पनवेलमध्ये बरेच मित्र मिळाले. यात खरे मित्र झाले ते म्हणजे तीनच. त्यांना मित्र म्हणायचे कारण रक्ताचे नाते नव्हते म्हणून, जर तसा विचार केला तर रक्ताच्या नात्यापेक्षा अतिशय जवळची अशी आमची कौटुंबिक मैत्री झाली. हे तीन मित्र म्हणजे सुभाष कुलकर्णी (सुभ्या), रामचंद्र जोशी (जोश्या) आणि विवेक करंदीकर (मामा) या तिघांनी माझा पनवेलमधला एकटेपणा पूर्णपणे घालवला.


Majhe Mitra v Sakari sobat Joshya

आमची अतिशय घट्ट मैत्री झाली. आमची ही मैत्री एकमेकांचे स्वभाव आवडले म्हणून झाली होती. कुणाच्या खिशात किती पैसे आहेत हे बघून कधीच झाली नव्हती, किंबहुना त्या काळी आमच्या सगळ्यांच्या जवळपास तेवढेच पैसे असत, पण त्या काळात आम्ही काय मजा केली आहे, धमाल केली ती आत्ता आठवले की विश्वास बसत नाही. गंमत आहे खरंच, किती कमी पैशातसुद्धा माणूस आनंदात राहू शकतो याचे उदाहरण.

या काळात म्हणजे, १९७८ पासून ते अगदी आम्ही पनवेल सोडले ते १९९८ सालापर्यंत, आमची जवळपास रोज भेट होत असे. संध्याकाळी कोकण रबर मधील काम संपल्यावर आम्ही सर्व, पनवेल इंडस्ट्रीयल इस्टेटच्या क्लबमध्ये चिकार वेळ टेबल टेनिस खेळत असू. नंतर पनवेल बस स्टँडसमोर एक दूध कोल्ड्रिंकवाला होता. त्याच्याकडे, एक एक ग्लास ढोसून, सुभाषच्या घरी जात असू. सुभाषचे नुकतेच लग्न झाले होते, परंतु रात्री ८ पर्यंत आमचा मुक्काम त्याच्या घरीच असे. सुभ्याची बायको, म्हणजेच नीलम ही पण अतिशय प्रेमाने, यांचे

बरेच करत असे. तिलाही आम्ही आलेले चालत असे. संध्याकाळी मग आमचा, बुद्धिबळाचा डाव रंगत असे.

आमच्यात सर्वांत जास्त विनोदी स्वभावाचा म्हणजे मामा करंदीकर. मामाचे काही विनोद अजूनही आठवतात. बरेच वेळा आम्ही रात्री सुभाषकडेच जेवायला थांबत असू. जेवण झाल्यावर पान खाण्यासाठी जवळ एक टपरी होती. त्याचे नाव होते उग्गाप्पा. या त्याच्या नावाची फोड, मामाने फारच मजेशीर केली होती. उगाच गप्पा व ते खरंही होते, हा माणूस अतिशय गप्पिष्ट होता व सतत काही ना काही बडबड करीत असे.

**मराठे, मामा करंदीकर, दत्ता जोशी व तात्या जोशी**



कोकण रबरमध्ये असताना आम्हाला मोल्ड आम्हाला मुंबईहून बनवून घ्यावे लागत. आग्रीपाडा येथे हे मुंबई सेंटरजवळ आमचा एक मोल्ड मेकर होता. त्याचे नाव होते अकबर. तो कधीही वेळेवर आम्हाला मोल्ड बनवून द्यायचा नाही. एका मोल्डसाठी कमीत कमी मला ५ ते ६ वेळा चकरा माराव्या लागायच्या. शेवटी कंटाळून मामाशी बोलून आम्ही एक लेथ मशीन कोकण रबरमध्ये विकत घेतले. त्याच्यावर मी स्वतः मोल्ड बनवायला शिकलो. सुरुवातीला मला लेथ मशीन चालता येत नव्हते, परंतु मी रवी कुलकर्णीच्या मदतीने त्याचा एक कामगार व पाटणकर इंजिनिअरींग इथे काम करणारा प्रमोद बेलापूरकर याच्या

**जोश्या, मराठे, मी व मामा करंदीकर**



मदतीने लेथ मशीन चालवायला शिकलो. मी स्वतः मोल्ड बनवत असताना एकदा अगदी शेवटचे फिनिशिंग चालू असताना तो मोल्ड माझ्या करंगळीवर जोरात आपटला. हा मल्टि कॅव्हिटी मोल्ड होता, त्यामुळे तो ऑफ सेंटर लावलेला होता. मी हाताने पॉलिशपेपर धरून, कॅव्हिटी आतून पॉलिश करत असताना माझा हात सोडला आणि उजव्या हाताच्या करंगळीवरती मोल्डची येथील लोखंडी प्लेट जोरात आपटली. माझी करंगळी जवळजवळ तुटल्यात जमा होती. मला अक्षरशः दोन मिनिटं काय झालं तेच कळले नाही. मामाला दाखवलं, मामा मला ताबडतोब वेलणकर डॉक्टरांच्या दवाखान्यात घेऊन गेला. वेलणकर डॉक्टर म्हणजे एक अफलातून व्यक्ती होते. माझे व्यक्तिगत मित्र होते. संध्याकाळी आम्ही आदर्श कॅफेमध्ये चहा प्यायला आणि सिगारेट ओढायला बसू तेव्हा डॉक्टर हमखास तेथे आलेले असत. वेलणकर डॉक्टरांनी मला भूल वगैरे न देता अक्षरश: चप्पल वगैरे शिवतात तसे माझ्या करंगळीला टाके घातले. ते म्हणाले की, ''थोडं दुखेल, पण तिकडे बघू नकोस, दुर्लक्ष कर. मी पाच मिनिटात टाके घालतो.'' त्यांनी खरोखर पाच मिनिटांत टाके घातले. नंतर मला पंधरा-वीस दिवस उजव्या हाताने फारसं काही काम करता येत नव्हते.

कोकण रबरमध्ये आमचे दोन मोल्डिंग प्रेस होते. त्याला इलेक्ट्रिकल हीटिंग होते. इलेक्ट्रिकल मेंटेनन्सचा प्रॉब्लेम आम्हाला येत असे. बरेच वेळा इलेक्ट्रिशयन वेळेवर मिळत नसे किंवा पैसे पण बरेच द्यावे लागायचे. त्यासाठी मग मी वायरमन कोर्स करायचे ठरवले. त्याच्यासाठी आठवड्यातून तीन दिवस संध्याकाळी



**कोकण रबर पनवेलमधील सहकारी व भाऊमामा**



**कोकण रबर पनवेलमधील सहकारी**

मी दादरला एका इलेक्ट्रिकल इन्स्टिटट्यूटमध्ये वायरमनचा कोर्स शिकण्यासाठी जाऊ लागलो. ही इन्स्टिटट्यूट, राजश्री मामीच्या रानडे रोड, येथील माहेरच्या घराजवळ होती. या इन्स्टिटट्यूटमध्ये गेलो की, बऱ्याच वेळा माझा क्लास संपला की राजश्री मामाच्या घरी जात असे. मी आधी नमूद केल्याप्रमाणे राजश्री मामीचे वडील म्हणजे भाऊकाका यांचे आणि माझे खूप छान जमत होते. आमचे खूप छान मैत्रीचे असे संबंध होते. भाऊकाकांना माझे खूप कौतुक होते. त्यामुळेच असेल कदाचित, बऱ्याच वेळा मी त्यांना भेटून चहा वगैरे घेऊन मग पनवेलला परत येत असे.

कोकण रबरमध्ये आमचा चांगला बऱ्यापैकी मोठा प्लॉट होता. तिथे मग आम्ही बरेच झाडे लावली होती. समोरच्या भागात आणि मागच्या भागात  बऱ्यापैकी फळझाडांची (नारळ, आंबा, चिकू, पेरू वगैरे) बाग केलेली होती. शिवाय फुलांची पण बरीच झाडे लावली होती. आम्ही दर पावसाळ्यात नवीन झाडे लावायचो आणि ती बऱ्यापैकी वाढली होती. संध्याकाळी थोडा वेळ बागेत बसले की अगदी छान वाटत असे.

पनवेल येथे पायोनियर सोसायटीमध्ये राहात असताना (लग्नाआधी) सुट्टीच्या दिवशी, शुक्रवारी मी डोंबिवली, दहिसर किंवा मुंबई सेंट्रल येथे जात असे. ह्या माझ्या गाठीभेटींचे मध्ये बरेच काही असे मजेशीर अनुभव आहेत.

ते मी आता तुम्हाला सांगणार आहे. सुरुवात करतो दहिसर पासून. दहिसरला आठवले मंडळींची बरेच घरे होती. उदाहरणार्थ सदूकाका, रामकाका आणि मधुकाका येथे राहत. तसेच ताराआत्या, तिच्या दोन मुली शोभाताई आणि शशीताई ही सर्व मंडळी भेटायची.

दहिसरला गेलो की, विनय, माधव आणि शरद यांच्याशी बऱ्याच गप्पागोष्टी होत. ताराआत्या आणि सीतारामपंत हे माधवबरोबर त्याच्या घरी राहात. विनयचे लग्न अजून झाले नव्हते. तीही माधवकडेच राहात असे.

शरद आणि सुलभावहिनी सदूकाका राहात असलेल्या पटेल कॉलनीमध्ये तळमजल्यावर राहात असे. सदूकाका पहिल्या मजल्यावर

राहात असत. त्यांचा फ्लॅट एका कडेला होता व तेथून दहिसर रेल्वे स्टेशनचा प्लॅटफॉर्म अगदी व्यवस्थित दिसत असे.

बऱ्याच वेळा गुरुवारी संध्याकाळी मी दहिसरला मुक्काम करत असे. दर वेळी माझ्या, सर्व घरांच्या भेटी ठरलेल्या असत. मधुकाकांच्या कडे अगदी नेहमी जात असे. तेव्हा घनश्याम व अश्विनी हे छोटे होते आणि या दोघांना चिडवणे किंवा छळणे हा माझा आवडता छंद होता. या दोघांना मी अगदी हैराण करत असे.

दहिसरला गेल्यावर सदूकाका व निर्मलाकाकू माझे खूप कौतुक करीत. निर्मलाकाकू नवीन नवीन पदार्थ करत असे. त्यापैकी काही आठवतात. एक तर पिकलेल्या केळ्यांची भजी खूप छान करायची आणि दुसरे म्हणजे बटाटेवडे. बऱ्याच वेळा मी त्यांच्याकडे हे पदार्थ खाल्ले आहेत. सदूकाकांना मी बरेच टेपची सॅम्पल दिली होती. ( हाय टेक टेप पालघर येथे असताना, १९८८ साली). मी दर वेळी गेलो की तेही सॅम्पल काढून बसायचे व त्याचा चिकटपणा वगैरे पाहून, नेहमी माझी कौतुक करीत. रामकाकांना सुद्धा मी नवीन काय करतोय याची खूप उत्सुकता असे.

एखाद्या शुक्रवारी मी डोंबिवलीला सुधामावशीकडे जात असे. सुधामावशीच्या घराजवळच एक टॉकीज होते. त्याचं नाव बहुतेक गोपी. तिथे मी बरेच सिनेमे बघितले. तेव्हा कनक छोटी होती. शाळेत जात होती. बऱ्याच वेळा माझ्याबरोबर मी तिला मी घेऊन जात असे. सुधामावशी व मधुभाऊ या दोघांना मी खूप आवडत असे आणि हे दोघे माझे खूप कौतुक करीत असत.

कोकण रबरमध्ये असताना १९८० असत. ठरले व ३१ मे १९८० रोजी आमचे लग्न पार्ल्यातील पु. ल. देशपांडे सभागृहात झाले. आमचे लग्नं ठरले त्याला कारणीभूत म्हणजे सदूकाका आणि निर्मलाकाकू. प्रथिता, निर्मलाकाकूची सख्खी मावसबहीण तिच्या रेफरन्सने माझी आणि अप्पांची भेट झाली आणि मग मी काय करतो राहतो कुठे, आमची कंपनी कशी आहे वगैरे बघण्यासाठी आप्पा, शेखर दादा व विष्णू काका असे तिघं पनवेलला आले. आधी ते घरी आले. जुना एक वन बीएचके फ्लॅट होता, पण चांगला होता. ते येणार

म्हणून मी माझा एक मित्र सुरजित सिंग, (हा सुरुमामाचा मेकॅनिकल स्पेअर पार्टचा कॉन्ट्रॅक्टर होता व याचे स्पेअर पार्ट दुकान होते.) याच्याशी बोलून मला एक दिवस तुझी गाडी लागेल असे सांगून ठेवले होते. आप्पा वगैरे सर्व जण आले तेव्हा मी त्यांना गाडीमधून कोकण रबर दाखवायला घेऊन गेलो. ते तिघेजण खूप खूश झाले. आम्ही परत घरी गेलो. घरी गेल्यावर इकडचे तिकडचे सगळे विषय बोलून झाले. मग आप्पांनी मला विचारले, ''तुझा सध्या मिळकत किती आहे? किती पैसे कमवतोस?'' मी त्यांना सांगितलं, मला तीनशे रुपये मिळतात आणि आईला फॅमिली पेन्शन साडेतीनशे रुपये मिळते. तसे आम्ही साडेसहाशे रुपयात आमचं घर चालवतो.'' ते म्हणाले, ''एवढ्यात कसं काय तुमचं जमतं?'' मी म्हटलं, ''घराचा हप्ता फक्त १८५ रुपये आहे आणि बाकीच्या पैशात आमचं घर व्यवस्थित चालतं, पण आता लग्न करायचे आहे. लग्नं झाल्यावर तिघांचा साडेसहाशे रुपयात भागणार नाही, त्यामुळे माझी एकच अट आहे, ती म्हणजे मुलीला शक्यतो नोकरी असावी.'' यानंतर आप्पा, शेखर दादा आणि विष्णू काका विलेपार्लेला परत गेले आणि ते सरळ रामकृष्ण हॉटेलच्या शबरी या रेस्टॉरंटमध्ये गेले. त्यांनी ओली आणि रंगीत अशी पार्टी केली. हे मला नंतर लग्न झाल्यानंतर पार्ल्याला गेलो असताना, स्वतः अप्पांनी मला सांगितले. ते म्हणाले, ''मला काय आवडलं ते म्हणजे तुझा खरेपणा. तू प्रामाणिकपणे तुझा पगार किती आहे हे आम्हाला सांगितलेस, तुझी फॅक्टरी दाखवलीस. घर आम्ही बघितलं हे सगळं बघून आपल्या मुलीला एक चांगला होतकरू आणि प्रामाणिक असा नवरा मिळणार, आम्हाला चांगला जावई मिळणार अशी आमची तिघांची खात्री पटली आणि त्यामुळे आम्ही या लग्नाला होकार दिला.''

■ ■

## १२.१. माझी करिअर अशी घडत गेली... (पूर्वार्ध)

कोकण रबरमध्ये आमचे काम करताना अजून दोन नातेवाइकांची आम्हाला खूप मदत झाली त्यांचा उल्लेख करणे अतिशय गरजेचे आहे. यापैकी नंबर एक म्हणजे अविदादा वाटवे. ते रेल्वेमध्ये खूप मोठ्या पोस्टवर होते. मला वाटतं, कंट्रोलर ऑफ स्टोअर्स आणि त्यांच्या मुंबई सेंट्रलच्या ऑफिसमध्ये मी बऱ्याच वेळा त्यांना त्यांचा सल्ला घेण्यासाठी भेटायला जात असे. काही वेळा मी त्यांच्या बुधवार पार्क येथील क्वार्टर्समध्येसुद्धा रात्री राहायला जात असे. आम्हाला खूप मदत केली आमची कंपनी रेल्वेमध्ये रजिस्टर सप्लायर म्हणून नोंद करून घेण्यासाठी जी काय गरज होती ती सगळ्यांनी पूर्तता केली होती, परंतु आमच्या कंपनीची एकूण उलाढाल खूप कमी असल्यामुळे व आमची मशिनरी अतिशय कमी असल्यामुळे हे काम पूर्णपणे होऊ शकलं नाही. तरीसुद्धा विद्यार्थ्यांच्या मदतीमुळे आम्हाला रेल्वेमध्ये लागणाऱ्या रबर पेट्स ऑर्डर एका टेंडरमध्ये मिळालेली होती, ती आम्ही पूर्ण करू शकलो नाही. त्याचे कारण आमचे भांडवल फार कमी होते. मशिनरी अगदी कमी होते व ट्रायलसाठी लागणारे सुद्धा डिलिव्हरीच्या वेळेस आम्ही देऊ शकलो नाही. मी तसा इंडस्ट्रीमध्ये

नवीन होतो आणि मार्केटिंगबद्दल मला फारसे एक्स्पोजर नव्हते आणि मला पण मार्केटिंगसंबंधी फारसे एक्सपोजर नसल्यामुळे अतिशय चांगले अशी संधी असून सुद्धा त्या संधीचा लाभ आम्ही कधीच घेऊ शकलो नाही.

कोकण रबरमध्ये आम्हाला मदत करणारे अजून एक व्यक्ती म्हणजे श्री. माधवराव छत्रे. हे म्हणजे हिंदू आत्याचे यजमान त्यांचे ऑफिस कल्याण येथे होते. त्यांच्या मदतीने आम्ही रेल्वेसाठी एक विशिष्ट प्रकारचे गॅस्केट विकसित केली होती. आमचे रेल्वे रजिस्ट्रेशन नसल्यामुळे आम्हाला टेंडरमध्ये भाग घेता येत नव्हता. त्यामुळे मोठी ऑर्डर आम्हाला मिळू शकली नाही, पण आम्हाला छोट्या-छोट्या वर्षातून दोनदा तरी माधवराव छत्रे यांच्यामुळे मिळत असत. माधवराव छत्रेसुद्धा एक अतिशय साधे मदत करणारे व स्वभावाने अतिशय गरीब अशी व्यक्ती आणि त्यांच्याकडे गेलो की कायम ते मला प्रोत्साहन देत असत. एक-दोन वेळा माझा त्यांच्या कोर्टमध्ये राहण्याचा योग आला होता.

मी वर उल्लेख केल्याप्रमाणे दर शुक्रवारी म्हणजे सुट्टीच्या दिवशी मी विरारला किंवा डोंबिवलीला किंवा मुंबई सेंट्रलला जात असे. काही आठवणी अजूनही ताज्या आहेत त्या म्हणजे निर्मलाकाकू आणि काका यांचे प्रेम व दरवेळेस निर्मलाकाकू काहीतरी विशिष्ट असा पदार्थ करत असे. त्यातले लक्षात राहणारे दोन म्हणजे बटाटेवडे आणि पिकलेल्या केळ्यांची भजी हे दोन्ही पदार्थ फारच छान करत असे. सदू काकांना माझ्या टिप्सबद्दल खूप कुतूहल होते आणि आम्ही लहान असताना संजूकाका कॅमलिनमध्ये काम करत असताना कर्नाटकात त्यांच्या व्यावसायिक दौऱ्यासाठी आले होते. संध्याकाळी घरी आल्यावर कॅमलिनने बनवलेले नवीन उत्पादने विशेषत: त्यांची वेगवेगळ्या प्रकारची पेन-पेन्सिल हे आम्हाला दाखवीत असत आणि परत जाताना त्यातले एखादे बक्षीस म्हणून पण आम्हाला मिळत असे. तसेच मी देशाला

गेल्यावर मी हायटेक टिप्स पालघर येथे बनवलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या सॅम्पल त्यांना दिली होती तर अगदी हमखास दरवेळेस ते या टीप्स बाहेर काढून त्या कितीची गट आहेत वगैरे बघून त्याची क्वालिटी वगैरे सगळे तपासून दरवेळेस मला प्रोत्साहन देत असत.

दहिसरला रामकाकांनासुद्धा मी दरवेळेस भेटायला जात असे आणि मग आमच्या एकंदर कामकाजाबद्दल नवीन काय काय तयार होते, काय नवीन टिप्स आणि डेव्हलप केले याबद्दल आमचे बऱ्याच वेळा बोलणे होत असे. त्यांना सुद्धा माझ्या कामाचे प्रचंड कौतुक होते. दहिसरमध्ये माझे दुसरे आकर्षण म्हणजे मधूकाकांचे घर. त्यांच्याकडे मी कायम जात असे आणि त्या वेळेस घनश्याम आणि अश्विनी अगदी छोटे होते आणि या दोघांना मी प्रचंड खेळवत असे. त्यांच्याशी बऱ्याच गमती करत असे. ते दिवस मला अजूनही आठवतात.

एखाद्या शुक्रवारी मी मुंबई सेंट्रलला अभीमामाकडे जात असे अभी मामाकडे गेले की, अभीमामाच्या दोन्ही मुलींना विभा आणि वैजू यांना माझे कौतुक होते, त्या दोघी छोट्या होत्या आणि या दोघांची थट्टामस्करी मी खूप करीत असे. विभाबद्दल एक प्रसंग नक्कीच सांगायला मला आवडेल. एका शुक्रवारी मी मुंबई सेंटरला गेलो. विभाची सहामाही किंवा अशी कुठली तरी परीक्षा झाली होती आणि परीक्षा देऊन ती दुपारी झोपली होती. संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास मामीने चहा केला आणि मग मी म्हटलं, विभाची थोडी गंमत करू म्हणून मी विभाला म्हटले, ''शाळेत जायचे का नाही? उठ लवकर, चहा झालाय आणि मग पटकन चहा प्यायला ये नाहीतर शाळेत जायला उशीर होईल.'' हे मी बोलत असताना अभीमामा मामी किंवा वैजू काही एक चकार शब्दही बोलले नाही आणि विभाला इतकी गाढ झोप लागली होती की ती पटकन उठली आणि उठून दात घासायला लागल्यावर तिच्या लक्षात आले की सकाळ नाही तर संध्याकाळी आहे. त्यानंतर ती काय लाजली आणि त्याच्यानंतर आम्ही

## अविमामा आणि भाऊमामा



सगळेजण जे काय हसलो ते अजूनही माझ्या लक्षात आहे.

अविमामाच्या मुंबई सेंट्रल येथील रिझर्व्ह बँकेच्या संबंधीची अजून एक आठवण म्हणजे मी रबर टेक्नॉलॉजीचा कोर्स करत असताना वर्षाच्या शेवटी एक महिना ट्रेनिंग कोर्स केला जाईल, तेव्हा बहुतेक मी मुंबई सेंटरला जाऊन राहात असे. सबंध दिवस लेक्चर्स त्याच्यानंतर संध्याकाळी मग घरी येऊन अभ्यास आणि लेक्चर संपल्यावर पूर्णपणे घरी थांबून अभ्यास. माझ्याबरोबर काही वेळा माझा मित्र आधी उल्लेख केल्याप्रमाणे श्री. लुईस हासुद्धा येत असे. मुंबई सेंटरमध्ये या माझ्या मुक्कामात मामी व मुली सांगलीला सुट्टीला गेलेल्या असत त्यामुळे घरी मी आणि अभिमान दोघेच असू. आम्ही मुंबई सेंट्रल येथे गीता भवन येथून चपात्या पार्सल करून आणत असू व आंबे आणत असू. रोज आमचं आमरस आणि पोळ्या असे जेवण असे. एकदा एका बुद्धिबळ स्पर्धेच्या निमित्त सांगलीहून अप्पाकाका सुद्धा मुंबई सेंट्रलला येऊन राहिले होते. त्यामुळे त्या वर्षी आम्ही तिघेजण दररोज रात्री आमरसपोळीचा आस्वाद घेत असू.

आम्ही पनवेलला पायोनियर सोसायटीमध्ये राहात होतो तेथील काही आठवणी आता मला सांगाव्याशा वाटतात. आम्ही तळमजल्यावर राहात होतो. समोरच्या फ्लॅटमध्ये यमुताई व काशी जाईल राहात असत. आणि मधल्या फ्लॅटमध्ये श्री साहेब. मी वर उल्लेख केल्याप्रमाणे आम्हाला पायोनियर सोसायटीतील घर मिळण्यासाठी साहेबांनी खूप मदत केली होती. त्यांची आम्हाला खूप मदत होत असे. आमच्यावर सय्यद म्हणून कुटुंब राहात होते ते मूळचे नगरचेच होते आणि सुट्टीला

ते नगरला जात असत. एकदा ते नगरला गेले. त्या काळात पायोनियर सोसायटीमध्ये पाण्याचे फार दुर्भिक्ष होते. दिवसातून एकदाच पाणी येत असे. तेसुद्धा टँकरने पुरवठा होत असे. त्यामुळे आमच्या पाण्याच्या टाकीत पाणी आले की मोटर चालू करून ते सगळीकडे भरून ठेवणे हे एक मोठे काम असे. एकदा नगरला जाताना सय्यद हे आपला नळ बंद करायला विसरले आणि त्यामुळे सबंध घरांमध्ये पाणी भरून नंतर ते यांमधून आमच्या घरी लिक व्हायला लागले. पायोनिअर सोसायटीचं बांधकाम इतके चांगले नसल्यामुळे लिकेज फारच व्हायला लागले. आमच्याकडे त्यांची किल्ली नव्हती आणि तेव्हा मोबाईल फोन नसल्यामुळे त्यांना कॉन्टॅक्ट करणे फार अवघड होते. शेवटी मी आमच्या फ्लॅटमधून वरील फ्लॅटच्या गच्चीत जाऊन दार तोडून आत जाऊन नळ बंद केले आणि नंतर सय्यदना नगरच्या पत्त्यावर एक तार पाठवली किंवा कुठून तरी फोन वगैरे केला नंतर मग ते परत आले. हे सगळे करताना मला काय अशी भीती वाटली नाही, पण नंतर मात्र सय्यद परत आल्यावर त्यांनी जर माझी कंप्लेंट केली आमचे घर याने का उघडले तर काय करायचे, ही काळजी मला लागून राहिली होती, परंतु श्री. सय्यद हे परत आल्यावर त्यांनी आपली चूक मान्य केली आणि पुढे काही अनर्थ झाला नाही.

पायोनियर सोसायटीमध्ये आमच्यासमोर राहणाऱ्या साळवी मॅडम यांच्याबद्दल पण मला काही सांगायचे आहे. या दोघी भगिनी अतिशय प्रेमळ होत्या आणि विभूषा झाल्यावर यमुताईंनी तिचे फार लाड केले. आमच्या कुटुंबाचाच भाग झाल्या होत्या. त्यांच्या वरच्या फ्लॅटमध्ये एक लोटलीकर नावाचे कुटुंब राहात असे. त्यांची तळोजा येथे वॉशिंग मशीन बनवण्याची कंपनी होती आणि मला आठवते, दर शुक्रवारी सुट्टीच्या दिवशी एक आठवड्याचे साठलेले कपडे घेऊन ते कंपनीत जाऊन आपल्या वॉशिंग मशीनमध्ये सर्व कपडे धुऊन आणत असत. या कुटुंबामध्ये एक आजोबा होते आणि दोन मुलगे होते. मोठा मुलगा

मुंबईला जाऊन मशीनसाठी लागणाऱ्या सर्व पार्टची खरेदी करत असत आणि त्यांच्याबद्दलची आठवण म्हणजे त्याला मुंबईला जायचं असेल की अलीकडचे तीन-चार दिवस ते त्याचे प्लॅनिंग करीत असत आणि मला या गोष्टीची फार गंमत वाटत असे. माझ्या मते, मी किंवा मामा आठवड्यातून तीन-चार दिवस तरी मुंबईला काही ना काही कामासाठी जात असू.

मी जसे मुंबईला बऱ्याच वेळा जात असेल तसेच एखादी जोडून सुट्टी आली की सदूकाका, निर्मलाकाकू व पद्मा पनवेलला या पायोनियरच्या घरामध्ये बऱ्याच वेळा येत असत आणि तेव्हा मी आणि सदूकाका कधीतरी नॉनव्हेज खात असू आणि आम्ही आलो की मुद्दाम काही एखादा छान पदार्थ चिकन किंवा मटण वगैरे करून आम्हाला कौतुकाने आणून देत असत. त्यामुळे सदूकाका, निर्मला काकू यांचीसुद्धा त्यामुळे त्यांच्याबरोबर खूप छान अशी मैत्री निर्माण झाली होती.


Surumama, Shobha Mami

सुरुमामा १९७५-७८ या काळात पनवेल येथे कार्यकारी अभियंता म्हणून काम करीत होता. तेव्हा तो फिरतीवर गेला की बऱ्याच वेळा रात्री मी झोपायला सुरुमामाच्या घरी जात असे.


Rahul, Mama, Mami, Rupali

शोभामामीला थोडीशी सोबत आणि रुपाली आणि राहुल हे दोन्ही मुलं लहान असल्यामुळे त्यांच्याकडे थोडेफार बघणे, त्यांच्या गमती करणे हे एक माझे ठरलेले काम होते. सुरुमामाकडे काम करण्यासाठी ऑफिसकरिता एक शिपाई घरी कायम असे. त्याचे नाव सागवेकर. हा एक अतिशय गुणी आणि अतिशय कष्टाळू अशी व्यक्ती होती. तो रुपाली, राहुल यांना शाळेत घेऊन जाणे, शाळेतून परत घेऊन येणे, घरचे काही खरेदी वगैरे करणे ही सगळे कामे करीत असे आणि मग फावल्या वेळात इतर बरीच काही कामेसुद्धा करत असे. एकदा तो सायकलवरून रुपाली व राहुल यांना शाळेत घेऊन चालला होता. रुपाली पुढे बसली होती आणि राहुल मागे कॅरिअरवर बसला होता आणि एका खड्ड्यामध्ये काय झाले कुणास ठाऊक, राहुल खाली पडला आणि त्याचे लक्षच नव्हते. त्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे नेहमी तो अभंग किंवा असे. काहीतरी म्हणत असे तो आपल्याच नादात सायकल चालवत होता आणि मग राहुल जोरात ओरडा करून, ''अरे सागवेकर, मी खाली पडलो असे सूचित केले आणि मग त्याच्या लक्षात आलं. राहुलला घेऊन, ''राजा, तुला कुठे लागलं तर नाही ना बघूया.'' वगैरे त्याचे खूप चौकशी केली, काळजी घेतली आणि हा खूप मोठा किस्सा तेव्हा घडला होता.

माझ्या लग्नाच्या आधी म्हणजे १९८० सालापर्यंत मी सांगलीत पण वर्षातून एक-दोनदा जात असे. सांगलीत आमच्या गप्पा रंगत असत आणि यासाठी ठरलेले ठिकाण म्हणजे सांगलीचे स्वयंपाकघर. या स्वयंपाकघराला लागून सामान ठेवण्यासाठी म्हणून कोठीची खोली अशी होती आणि या दोन्हीमध्ये एकूणच उंबरा होता. आणि ती माझी आवडीची जागा होती. अप्पाकाका, मोठी आई, मामा, मामी, मी वगैरे आमच्या काही ना काही अशा गप्पा रंगत असत. बऱ्याच वेळा मी किंवा मोठे एखाद्या घराण्याबद्दल काहीतरी सांगत असत. असं बऱ्याच वेळा झाल्यावर एकदा चहाला मी आलो आणि मग सर्वांनी

मग आज कुठल्या घराण्याबद्दल आपली चर्चा होणार आहे या माझ्या प्रश्नाची त्या वेळेस सर्वांनाच खूप गंमत वाटली आणि खूप वेळा खूप ह्याबद्दल हसली होती.



अशीच एक आठवण, ती म्हणजे काकांचे निधन झाल्यावर त्यांचे दिवस वगैरे सगळे मी आणि दादाकाका यांनी हरिहर येथे पार पाडले आणि नंतर मी सांगलीला गेलो. सांगलीला अप्पाकाका, मोठी आई, मामा-मामी हे सगळे तशी प्रचंड दु:खात होती. सर्वांनाच काका गेल्याचे एक प्रचंड दडपण आले होते. खाडिलकर कुटुंबामध्ये सुद्धा काका अतिशय प्रिय अशी व्यक्ती होती आणि सर्व जण त्यांना 'पंत' असे म्हणत असत. या वेळेस जगदीशमामा पण सांगलीला आलेला होता. एका श्रावणी सोमवारी संध्याकाळी साडेसहा-सात वाजता सर्व जण जेवणासाठी बसलो होतो. आमच्या शेजारी प्रकाश खाडिलकर राहात असे. प्रकाश खाडिलकर, त्याचे बाबा दादा आणि त्याचा धाकटा भाऊ प्रभाकर या तिघांची सांगलीमध्ये त्या वेळेस प्रिंटींग प्रेस होती. जवळजवळ दररोज संध्याकाळी जेवणाच्या वेळेस प्रकाश आमच्या घरी येत असे व आमच्या सर्वांच्या गप्पा रंगत असत. सांगलीमध्ये एक अलिखित नियम होता, कोणी गावाला जाणार असेल की त्या व्यक्तीला सोडायला जाण्यासाठी म्हणून बस स्टँडवर प्रचंड गर्दी होत असे. जाणारा एक पोचवायला दहा असे बरेच वेळा होत असे.

कोकण रबरमध्ये काम करत असताना साधारणपणे १९८४ साली टाइम्स ऑफ इंडियामध्ये जॉन्सन अँड जॉन्सन या कंपनीची एक जाहिरात आली होती. जॉन्सन अँड जॉन्सन परमसेल इंडस्ट्रीयल रबर टेक्नॉलॉजीची

गरज होती. मी ती जाहिरात पाहिली आणि मी माझा अर्ज पाठवून दिला आणि नशिबाने मला इंटरव्ह्यूसाठी बोलावणे आले. टीप संबंधी मला अशी काही कल्पना नव्हती. मला दोन–तीन प्रकारच्या टिप्स माहीत होत्या. या कंपनीमध्ये माझे पाच इंटरव्ह्यू झाले आणि मला जॉन्सनमध्ये नोकरी मिळाली. ११ मे १९८४ रोजी. मला एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती म्हणजे माझ्या आयुष्यामध्ये मे महिन्यामध्ये बऱ्याच अशा महत्त्वाच्या घटना घडून गेलेल्या आहेत. सर्वांत पहिले म्हणजे मी माझी नोकरीची सुरुवात केली ती तारीख होती सोळा मे. त्याच्यानंतर माझे लग्न झाले ते ३१ मे रोजी. यानंतर मी जॉबला जॉईन केले ते ११ मे रोजी. जॉन्सन अँड जॉन्सन सोडल्यावर मी येथे कुमारला जॉईन झालो तेसुद्धा मे महिन्यातच.

■ ■

## १२.२. माझी करियर अशी घडत गेली... (उत्तरार्ध १)

मी कोकण रबर सोडून जॉन्सन अँड जॉन्सनमध्ये ११ मे १९८४ रोजी रुजू झालो. माझ्या करिअरमध्ये मला एक अतिशय चांगला ब्रेक मिळाला. रबर टेक्नॉलॉजी वापरून रबर पासून बनवलेली वेगवेगळ्या प्रकारची अधेसिव्ह बनवायची टेकनॉलॉजी मला जॉन्सन आणि जॉन्सन मुळे आत्मसात करता आली. उत्तरोत्तर माझी कारकीर्द एका वेगळ्या उंचीवर जाऊ शकली त्याला कारण म्हणजे जॉन्सन अँड जॉन्सन. जॉन्सन अँड जॉन्सन मधील काही आठवणी मला इथे मुद्दाम सांगाव्याशा वाटतात.

ही नोकरी मला केवळ योगायोगानेच किंवा मी रबर टेक्नॉलॉजी केले होते व अधेसिव्ह बनवायचा, माझंही रॅम मधील अनुभव कमी आला होता. १९८४ च्या फेब्रुवारी महिन्यात, टाइम्स ऑफ इंडिया मध्ये एक जाहिरात आली होती. जॉन्सन अँड जॉन्सन लिमिटेडला एक रबर टेक्नॉलॉजिस्टची गरज होती. मी रीतसर अर्ज केला. काही दिवसांनी मला मुलाखतीचा कॉल आला. माझ्या ५ मुलाखती, वेगवेगळ्या थरावर झाल्या व माझी निवड झाली. कोणाचीही ओळख पाळख नसताना केवळ, मेरिटवर मला ही नोकरी मिळाली याचा मला खूप आनंद झाला.

मग माझ्या मनात आले की, जॉन्सन अँड जॉन्सनला रबर

टेकनॉलॉजिस्टची काय गरज असावी बरे? कारण तेव्हा मला अधेसिव्ह टेपबद्दल फारशी काही माहिती नव्हती. मला फक्त ३ प्रकारच्या टेप माहीत होत्या. एक म्हणजे मेडिकल टेप, दुसरी इलेक्ट्रिकल इन्सुलेशन टेप ( पावसि) व तिसरी पॅकिंग टेप. मी विचार करत होतो की या प्रकारच्या ३ टेप बनविणेसाठी माझ्यासारख्या रबर टेकनॉलॉजिस्टची काय गरज आहे? पण मग विचार केला की जाउ दे ना, मला काय करायचे आहे? चांगला मल्टिनॅशनल लिमिटेड कंपनीमध्ये जॉब मिळतो आहे. तोही अतिशय चांगल्या पगारावर? मंडळी माझा अजूनही विश्वास बसत नाही मला एका वर्षात जेवढा पगार मिळत असे त्याहून अधिक प्रति महिना मिळाला होता. मला अपॉईंटमेंट लेटर मिळाले व आयुष्यात दुसऱ्यांदा डोळ्यात पाणी आले. ( पहिल्यांदा, ३१ जुलै १९७८ साली काकांचे अकस्मात निधन झाल्यावर.)

मी प्रॉडक्शन डिपार्टमेंटमध्ये होतो व आमच्या इथे प्रोडक्शन डिपार्टमेंटमध्ये बरीच सब डिव्हिजन होती. उदाहरणार्थ अधेसिव्ह मेकिंग, कोटिंग डिपार्टमेंट, स्लीटिंग, पॅकिंग, प्रिंटिंग वगैरे. अधेसिव्ह मेकिंगची मला चांगली माहिती असल्यामुळे या डिपार्टमेंटमध्ये मी खूप चांगले काम करु शकलो.

सहा महिन्यांनंतर माझा प्रोबेशन पिरियड संपून माझी नोकरी कायमस्वरूपी तर झालीच, पण माझ्या चांगल्या कामाबद्दल मला एक छोटे प्रमोशनही मिळालं. मला अजून दोन डिपार्टमेंटचा हेड करण्यात आले. ही माझ्यासाठी एक मोठी संधीच चालून आली. मला मिळालेली दोन नवीन डिपार्टमेंट होती हॉटमेल्ट कोटिंग व क्लाथ इन्स्पेक्शन.

जॉन्सन अँड जॉन्सनमध्ये एक होतं मेल्ट कोटिंग माचीच्या होते, ते छोटे मशीन होते, परंतु प्रिंटेड लेबलसाठीचा स्टॉक या मशीनवर तयार होत असे. या निमित्ताने, मला मेल्ट अधेसिव्ह व त्याचे कोटिंग हा नवीन विषय किंवा टेक्नॉलॉजी आत्मसात करता आली.

क्लॉथ इन्स्पेक्शन या भागात, आम्ही घेत असलेली वेगवेगळी क्लॉथ, उदाहरणार्थ, कॉटन, रेयॉन, नायलॉन, ग्लास क्लॉथ वगैरेचे

इन्स्पेक्शन, कोटिंग करणेपूर्वी करावे लागे.  या क्लॉथमध्ये काही दोष, विव्हिंग, लांबी रुंदी, जाडी, एक मीटर द मीटर चे वजन, या सर्वाचे टेस्टिंग केले जाई.  सगळ्या सप्लाय चांगला आहे आमच्या स्पेसिफिकेशन प्रमाणे आहे किंवा नाही याचा रिपोर्ट तयार करावा लागे.

एका इन्स्पेक्शन मशीनवर या सर्व कापडांचे इन्स्पेक्शन करून त्याचा रिपोर्ट तयार करून माझे साहेब श्री. किशोर कौशिक यांना तो द्यावा लागे. या डिपार्टमेंटला एक सिनियर ऑपरेटर पाटील, हा काम करीत असे. त्याने मला एक सूचना केली. त्याने  मला  सांगितलं, ''आठवले साहेब, तुम्ही या मशीनचा काऊंटर जो आहे तो एकदा तपासून पहा. त्याचे कॅलिब्रेशन करावे असे मला वाटते.'' त्याने  दिलेली ही सूचना का कुणास ठाऊक, मला फार महत्त्वाची वाटली. मी आमच्या इंजिनियरिंग डिपार्टमेंटचा हा काऊंटर बदलून द्यायची मागणी केली. डिपार्टमेंटने माझी मागणी लवकरात लवकर पूर्ण केली.

ही स्टेप पुढे जाऊन फारच मोठी खळबळ माजवणारी ठरली. त्याच्यानंतर जे काही निदर्शनास आले ते बघून मला आमच्या सिनियर ऑपरेटर पाटीलने ही सूचना का केली होती हेही ध्यानी आलं. क्लॉथच्या सप्लायमध्ये लेबलवर १००० मीटर परंतु प्रत्यक्षात ९०० ते साडेनऊशे मीटर असा सप्लाय गेले कित्येक वर्षे होत असावा. अर्थात, यात काही वरिष्ठ मॅनेजर्सचा हात असावा असे वाटले.

ही बाब मी माझे साहेब श्री. किशोर कौशिक यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी तत्काळ मला याबद्दलचा एक रिपोर्ट तयार करून लवकरात लवकर द्यायला सांगितला. तसा रिपोर्ट मी तयार केला आणि त्यांना सुपूर्द केला. माझ्या साहेबांनी वेळ न घालवता वरच्या मॅनेजमेंट म्हणजे प्रॉडक्शन मॅनेजर आणि मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजर यांना सुपूर्द केला.

या माझ्या रिपोर्टचा परिणाम जो व्हायचा तो लगेच झाला. मला आमचे प्रॉडक्शन मॅनेजर श्री. अरोरा साहेब व मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजर

कंवल साहेब यांनी त्यांच्या केबिनमध्ये ताबडतोब भेटण्यास बोलाविले. मी त्यांच्या केबिनमध्ये गेल्यावर माझ्या कामाबद्दल त्यांनी स्तुती केली आणि मग मला त्यांनी प्रश्न विचारला की, ''श्री. आठवले, तुम्ही हा विभाग सांभाळायला घेतल्यानंतर, लगेच व अचानक असा शॉर्ट सप्लाय कसा काय होऊ लागला, आम्हालाही काही कळत नाहीये. तुम्ही आम्हाला काही मला माहिती देऊ शकाल काय?''

मी त्यांना सांगितलं की, ''आमच्या मशीनचा काऊंटर मी आत्ता नुकताच बदलून घेतला आहे. तो मीटर बरोबर काम करतोय की नाही याची मी तपासणी पण केली आहे. उदाहरणार्थ, या मशीन वरती १०० मीटर वाइंडिंग करून आम्ही जमिनीवरती २५ मीटरचे मार्किंग करून हे १०० मीटर आम्ही प्रत्यक्षपणे मोजून बघितले आहे. मीटर १०० मीटर दाखवतो तसेच प्रत्यक्षात ते कापडी १०० मीटर आहे की नाही याची मी खात्री करून घेतली आहे या माझ्या कामाबद्दल कंवल साहेबांनी माझे कौतुक केले. त्यांनी मला सांगितले की, ''हा तुमचा रिपोर्ट आम्ही ग्राह्य धरतो, परंतु जर का हा रिपोर्ट चुकीचा ठरला तर आपण काय करायचं?''

मी एक क्षणाचाही विलंब न लावता त्यांना सांगितले, ''तसेच जर झाले तर मला एक कोरा कागद द्या. त्याच्यावरती मी सही करून आपल्याकडे ठेवून देतो. जर माझा रिपोर्ट चुकीचा ठरला तर माझा नोकरीचा राजीनामा असं समजून तुम्ही मला कामावर कमी करू शकता.'' मला असा कुठलाही पेपर सही करून द्यावा लागला नाही.

यानंतर जो प्रकार झाला तो फारच वेगळा होता. माझा शॉर्ट सप्लाय रिपोर्ट अकाऊंट डिपार्टमेंटकडे सुपूर्द करण्यात आला. अकाऊंट्स डिपार्टमेंटने शॉर्ट सप्लायबद्दल पैसे कापून त्याप्रमाणे त्याची तशी एक सूचना किंवा नोटीस, सप्लायर्सना पाठवून दिलं आणि जॉन्सन अँड जॉन्सनमध्ये एक प्रकारे एक इतिहास घडला होता. या सर्व प्रकाराबद्दल अकाऊंट डिपार्टमेंटमधल्या स्टाफने माझे खासगीत खूप कौतुक केले व अशा प्रकारचे धाडस मी दाखवले व त्याला वाचा फोडली याबद्दल

त्यांनी माझी पाठ थोपटली. याचे बरेच श्रेय मला मिळाले परंतु या श्रेयाचा खरा मानकरी होता, आमचा सिनियर ऑपरेटर पाटील. त्याने मला हिंट दिल्यामुळे, हे सगळे रामायण पुढे घडले व एक भ्रष्ट प्रकार उघडकीस आला.

जॉन्सन अँड जॉन्सन मधील हॉटमेल कोटिंग मशीन ही लॅबोरेटरी मॉडेल होते. आम्ही फक्त चार इंचाच्या रुंदीमध्ये कोटिंग करत असे, परंतु या कामांमध्ये मी बरेच सुसूत्रता आणली आणि आमचं प्रॉडक्ट चांगल्या प्रकारे बनू लागलं. या दोन कामाचा परिणाम म्हणजे (माझे सहा महिन्यात प्रोबेशन संपल्यावर ती कायमस्वरूपी नोकरी तर मिळालीच) मला एक प्रमोशनसुद्धा मिळाले.

जॉन्सन अँड जॉन्सनमध्ये काम करीत असताना अजूनही भरीव कामगिरी माझ्याकडून घडली. ती आमच्याकडे तीन मोठे सिग्मा मिक्सर होते आणि तीन मिक्सिंग मिल होत्या. या तीन सिग्मा मिक्सरपैकी एका मिक्सर मध्ये, सिग्माचे ब्लेड आतील स्टील पत्र्याला घासून, ऑईल स्टीलचा पत्रा लीक झाला व बाहेरचे कुलींग जॅकेट मधील पाणी, सिग्मा मिक्सर मधील अधेसिव्ह मध्ये मिसळून ती अख्खी बॅच ५०० किलोची रिजेक्ट झाली. आमच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट किंवा क्वालिटी कंट्रोल डिपार्टमेंटने ही बॅच, पुन्हा वापरता येईल का यावर बरेच काम केले, परंतु तसे त्यांना काही जमले नाही.

कोठल्याही लिमिटेड कंपनीच्या नियमाप्रमाणे, ५०० किलोचे रिजेक्शन प्रॉडक्शन डिपार्टमेंटच्या माथी ठोकण्यात आले. खरे तर प्रोडक्शन डिपार्टमेंटची काहीही चूक नव्हती, ना आमच्या इंजीनियरिंग डिपार्टमेंट काही चूक होती. ही केवळ एक घटना मशीनमधल्या काही फॉल्ट मुळे घडलेली होती.

हे अधेसिव्ह आता कसे वापरात आणता येईल यावर, काम करून कसे परत कामात आणता येईल यावर आमच्या जॉन्सन आणि जॉन्सन क्वालिटी कंट्रोल सर्कलच्या मीटिंगमध्ये बरीच चर्चा झाली आणि क्वालिटी कंट्रोल हेड डॉक्टर मन्ना यांनी सांगितले की ही बॅच,

संपूर्णपणे रिजेक्ट करावी लागेल. क्वालिटी कंट्रोल डिपार्टमेंटमध्ये, १० ते १२ डॉक्टर कामास होते व त्या सर्वांच्या मते या बॅचमध्ये काहीही करता येणे शक्य नव्हते.

प्रॉडक्शन डिपार्टमेंटची काहीही चूक नसताना, ५०० किलो अधेसिव्ह रिजेक्शन कॉस्ट, आमच्या डिपार्टमेंटवर टाकण्यात आली होती.

माझे साहेब श्री. किशोर कौशिक यांना मी एक कल्पना बोलून दाखवली. ती आपण सिलिका ग्रानुले मधून ही बॅच फिल्टर केली तर, सिलिका, पाणी शोषून घेईल व कदाचित ही बॅच वापरता येऊ शकेल.

साहेबांना माझी कल्पना आवडली आणि व्यक्तिगतरित्या त्यांच्या अधिकारात त्यांनी मला हा प्रयोग करायला सांगितला. अर्थात, या प्रयोगाबद्दल आमच्या लॅबोरेटरी (क्वालिटी कंट्रोल) मधील इतर कोणाशी न बोलता व गाजावाजा न करता हे काम करण्याचे ठरले.

त्यासाठी माझ्या साहेबांनी मला प्रिन्सेस स्ट्रीट येथील मार्केटमध्ये जाऊन सिलिका जल माझ्या व्यक्तिगत पैशाने विकत घेण्यास सुचवले. मी तसे केले आणि नंतर लवकरात लवकर आम्ही एक फिल्टर तयार केला, यात सिलिका मधून अधेसिव्ह पास होईल अशी व्यवस्था केली व ५ किलो अधेसिव्ह आम्ही या पद्धतीने फिल्टर केले त्याची कोटिंग ट्रायल करून पहिली व काम होते आहे याची खात्री पटल्यावर एक वेगळा बॅच नंबर देऊन, सॅम्पल क्वालिटी कंट्रोलला दिले व ही बॅच चक्क पास झाली.

ही अधेसिव्ह तेथे पूर्णपणे आमच्या स्पेसिफिकेशन मध्ये बसल्यामुळे क्वालिटी कंट्रोल ही बॅच पास केली. त्याच्यानंतर माझा आत्मविश्वास वाढला व मी आमच्या परचेस डिपार्टमेंटला रिक्वेस्ट करून, एक नवा फिल्टर न सिलिका जल मागून घेतलं आणि रोज थोडी थोडी असे करत ती पूर्ण ५०० किलो ची बॅच मी रिकव्हर केली. या बॅचला आम्ही एक नवीन नंबर देऊन सॅम्पल क्वालिटी कंट्रोलला दिले. या बॅचचे अधेसिव्ह पूर्णपणे आमच्या स्पेसिफिकेशनमध्ये बसल्यामुळे क्वालिटी कंट्रोलने ही बॅच पास केली.

अशा प्रकारे ५०० किलो अधेसिव्ह, पूर्णपणे कमी झाले व त्या वर्षी मला, बेस्ट सजेशन अवॉर्ड मिळालं. या माझ्या कामासाठी मला त्यावर्षीच बेस्ट सजेशन ॲवॉर्ड म्हणून एक मोठी बॅग बक्षीस मिळाली.

ही सर्व घटना साधारणपणे १९८५ अखेर ते १९८६ च्या सुरुवातीला घडली होती. याच वर्षी मला अजून तीन बक्षीस मिळाली. ही तिन्ही बक्षिसे खेळातील होती. जॉन्सनमध्ये इंटर डिपार्टमेंट क्रिकेट कॉम्पिटिशनमध्ये, आमच्या अधेसिव्ह डिपार्मेंटला पहिले बक्षीस मिळाले.

रमीमध्ये मला, वैयक्तिकरित्या चॅम्पियन म्हणून बक्षीस मिळालं. तसेच आमच्या इंटर लोकेशन बुद्धिबळ स्पर्धेमध्येसुद्धा पहिले बक्षीस मला मिळालं. बुद्धिबळ स्पर्धेमधील बक्षीस जास्त लक्षात राहण्यासारखे होते, कारण या स्पर्धेत मी आमच्या मुलुंड येथील प्लँटमध्ये काम करणारे बुद्धिबळपटू, (नॅशनल बी लेव्हलचे) श्री. मोदी या गृहस्थांना फायनल राऊंडमध्ये हरविले होते. त्यामुळे हे वर्ष माझ्या अतिशय चांगले लक्षात राहणारे ठरले.



**जॉन्सन अँड जॉन्सन मधील अजून काही आठवणी**

जॉन्सन अँड जॉन्सनमध्ये मिक्सिंग डिपार्टमेंटमध्ये माझा एक ऑपरेटर होता, नारायण. हा एक कोकणातला माणूस होता. तब्येतीने अगदी जाडा होता. नारायण हा कामाच्या बाबतीत अतिशय तत्पर होता. त्याच्याकडून काम करून घ्यायची एक ट्रिक होती. नारायणकडून काम करून घ्यायचं असेल तर मी त्याला जवळ बोलवायचो, त्याच्या पाठीवर हात ठेवायचा, ''काय नारायण कसा आहेस? घरी सगळे ठीक आहेत का? चहा प्यालास की नाही? नाही तर पिऊन ये.'' म्हणून त्याच्या खिशामध्ये मी बळेबळेच एक सिगरेट ठेवायचो. तेव्हा मी फोर स्क्वेअर किंग्स सिगरेट ओढायचो. नारायण पडत्या फळाची

आज्ञा मानून, चहा पिऊन आला की मी सांगितलेल्या वेळी बॅच तयार करून देत असे.

त्याचा माझ्यावर खूप जीव होता तसाच माझाही त्याच्यावर होता. आमचे काम आमच्या डिपार्टमेंटमध्ये अतिशय चांगल्या प्रकारे होत असे. त्याच डिपार्टमेंटमध्ये आमचे तीन सिग्मा मिक्सर आणि दोन रिॲक्टर होते. मोठ्या प्रमाणात आम्ही तिथे सॉल्व्हन्ट वापरत असू. अतिशय काळजीपूर्वक काम करावे लागे. कारण हे सगळे सॉल्व्हन्ट ज्वालाग्राही होते आणि एकदा नको ते झाले. आमच्या एका सिग्मा मिक्सरला स्टॅटिक इलेक्ट्रिसिटीमुळे आग लागली, पण नारायण मी व आमचे बाकी काही सहकारी मिळून आम्ही पाच ते दहा मिनिटात ती आग विझविली. त्याच्यानंतर ती बॅच मात्र आम्हाला पूर्णपणे रिजेक्ट करावी लागली, परंतु एक मोठा अनर्थ मात्र नक्की टळला.

जॉन्सन अँड जॉन्सन मध्ये स्टाफसाठी कॅन्टीन होते. तेथे सकाळी व दुपारी नाश्ता व चहा मिळत असे. जेवणासाठी मात्र, घरून डबा न्यावा लागे. कॅन्टीनमध्ये ४ ते ५ मोठी स्टीलची टेबले होती. गंमत म्हणजे एका टेबलावर प्रचंड गर्दी व्हायची. या टेबलावर मी असायचो. माझा क्वालिटी कंट्रोलमधील अतिशय जवळचा मित्र म्हणजे विनायक आपटे, नंतर आमचे रिसर्च अँड डेव्हलपमेंट मॅनेजर डॉक्टर यांची पर्सनल सेक्रेटरी मिता व आमचे पर्सनल मॅनेजर दिनेश गांधी व यांची पर्सनल सेक्रेटरी अजिता, सुनील गोडसे असा या टेबलवर प्रचंड हास्य कल्लोळ होत असे. सर्वच एकापेक्षा एक विनोदी कलाकार होते.

एक प्रसंग अगदी मजेशीर आहे तो आपल्याला सांगावासा वाटतो. मी जॉन्सनमध्ये जेव्हा लागलो त्याच सुमारास प्रिंटींग डिपार्टमेंटमध्ये सुनील गोडसे नावाचा एक प्रिंटींग टेक्नॉलॉजिस्ट कामास लागला होता. आमच्या प्लँटमध्ये, पर्सनल मॅनेजर होते दिनेश गांधी. एकदा असेच आमचे चहापाणी चालू असताना विनायक आपटेने एक कोटी केली.

तो म्हणाला, ''मित्रांनो, काळ किती बदललाय बघा. एकेकाळचे

शत्रू, म्हणजे गांधी आणि गोडसे, बघा आज एका टेबलावर बसून चहा पीत आहेत. अजून काय हवे?'' या कोटीवरती आम्ही सर्व जण खूपच हसलो होतो.

अशीच अजून एक गंमत म्हणजे आमच्या प्लँटचे प्रॉडक्शन मॅनेजर होते सुधीर अरोरा. त्यांची चालायची स्टाईल फारच टिपिकल होती. थोडक्यात, बायकी होती. ही व्यक्ती स्वभावाने पण अतिशय सॉफ्ट होती. तर असे हे अरोरा साहेब. यांचे चालणे त्यांच्या स्वभावाप्रमाणे नाजूक किंवा बायली होती. एकदा चहासाठी कॅन्टीनमध्ये येत असताना त्यांच्याकडे बघून एका सहकार्याने विचारले, ''आता अरोरा चालत आहेत ते पाहून कुठले गाणे आठवते?'' तर मिताने उत्तर दिले, ''गोरी चालो ना हंस की चाल जमाना दुश्मन है,'' या कोटीवर आम्ही प्रचंड हसलो होतो.

यांचे दोन असिस्टंट एक म्हणजे माझे साहेब किशोर कौशिक कॉटिंग डिपार्टमेंटचे हेड व प्रिंटींग डिपार्टमेंटचे हेड बर्मन हे दोघेही अरोरा साहेबांना बरेच छळत, काही ना काही अडचणी सांगून त्यांना त्याचा सल्ला मागत, परंतु अरोरा ही अधेसिव्ह टेपमध्ये नवीन असल्यामुळे असा काही सल्ला ते देऊ शकत नसत. शेवटी ते या दोघांना विनंती करीत की, तुम्हीच यात मार्ग काढा व काम पूर्ण करा. मग ही दोघेही काम करून, एक मोठा उपकार केल्यासारखे मिरवत. तर कौशिक आणि बरमन म्हणजे अरोरा साहेबांच्या मागे लागलेले राहू-केतू होते म्हणून.

जॉन्सन अँड जॉन्सनमध्ये असताना अजून दोन प्रसंग लक्षात राहिलेले  ते म्हणजे पावसाळ्यामध्ये मुंबईतला पाऊस प्रचंड प्रमाणात आणि त्यामुळे आमच्या सफेद पूल किंवा कुर्ला-अंधेरी रोडवर दर पावसाळ्यात पाणी साचत असे.  एकदा तर ते इतके प्रचंड प्रमाणात पाणी साचले की, आमच्या प्लँटमध्ये गुडघाभर पाणी आलं. मग पुढचे दोन-तीन दिवस आमचं सर्व काम ठप्प होतं. पाणी गेल्यामुळे आमच्या कच्च्या मालाची बरीच नासधूस झाली होती. आमच्या

मशिनरीमध्ये विशेषत: इलेक्ट्रिक मोटरमध्ये शिरलेले पाणी वगैरे काढून, प्लँट परत चालू करायला दोन-तीन दिवस तरी गेले होते. दर पावसाळ्यात असा कमीतकमी एक ते दोन वेळा तरी असे प्रसंग येत असत.

जॉन्सन अँड जॉन्सनच्या शेजारीच बेडेकर मसाले यांची कंपनी होती. आम्हाला सतत वेगवेगळ्या मसाल्यांचे वास कायम येत असे. त्याची खूप आम्हाला गंमत वाटत असे. दुसरी लक्षात राहणारी एक गंमत म्हणजे जॉन्सन आणि जॉन्सन महिन्यातून एकदा फ्रेश प्रॉडक्ट म्हणून आम्हाला जॉन्सन अँड जॉन्सनची सर्व प्रॉडक्ट सवलतीच्या दरामध्ये आधी नमूद केल्याप्रमाणे किंवा ओरडत दिल्याप्रमाणे देत असे. तेव्हा विभूषा अगदी लहान होती. मी जॉन्सन अँड जॉन्सनची बेबी पावडर, साबण आणि इतर लहान मुलांना उपयोगी अशा बऱ्याच गोष्टी तिथून दर महिन्यात विकत घेत असे. काही वेळा आम्ही या गोष्टी आमच्या नातेवाईक मंडळीपैकी ज्यांना लहान मुले आहेत त्यांना काही कारणांनी भेटवस्तू म्हणून देत असू.



**विभूषा**

जॉन्सन अँड जॉन्सनमध्ये प्रत्येक सहा महिन्यांनी कुठल्या ना कुठल्या मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्राम आम्हाला कंपनीकडून आयोजित केला जात असे. बरेच प्रोग्राम झाले, पण एक खास असा आठवणीत राहणारा म्हणजे आमचे कॉर्पोरेट मॅनेजमेंटचे पर्सनल मॅनेजर परेरा या साहेबांनी एक असाच प्रोग्राम आयोजित केला होता. हे प्रोग्राम बहुतेक मोठ्या हॉटेलमध्ये होत असून त्यामुळे दोन-तीन दिवस अगदी मजेत जात असत. अशाच एका प्रोग्राममध्ये परेरा साहेब आम्हाला करिअर ग्रोथवरती एक लेक्चर देत होते. त्यांनी एक ग्राफ काढला होता आणि त्याच्या आधारे असं नमूद केलं होतं की साधारणपणे पंचवीस वर्षांपर्यंत आपले शिक्षण वगैरे पूर्ण होते आणि मग आपण कुठे ना कुठे

नोकरीस लागतो आणि पंचवीस ते साधारणपणे ४५ वर्षे आपण आपल्या करिअर ग्रोथ होत राहते. ४५ नंतर फार कमी लोकांना पुढची काही पदे मिळतात आणि साधारण साठाव्या वर्षी अशी व्यक्ती ही रिटायर होत असे, पण ते म्हणाले, भारतामध्ये अशाही काही करिअर आहेत त्याची सुरुवातच मुळी साठ-पासष्ठ नंतर होते आणि मग जवळपास जिवंत असेपर्यंत ती चालू राहते. तर अशी ही करिअर कोणती? आम्ही बराच विचार करत होता. त्यांनी मग उत्तर दिले. ते म्हणाले, ''ही करिअर म्हणजे पोलिटिकल. मुळात ६५ नंतर सुरू होते व मरेपर्यंत चालू राहते.''

S. Kumar's Pankaj Tires Pvt.Ltd., Indore

जॉन्सन अँड जॉन्सनमध्ये असताना एक दिवस डॉ. अरविंद घाग यांचा मला फोन आला. ते म्हणाले, ''काय जॉब कसा काय चाललाय? मजेत ना?'' मी म्हटलं, ''हो, सगळं छान चाललंय.'' ते म्हणाले, ''एक चांगलं ओपनिंग आहे. फक्त महाराष्ट्राबाहेर आहे.'' मी त्यांना विचारले, ''कुठे आहे?'' तर म्हणाले, ''मध्यप्रदेशातील इंदूर येथे आहे.'' त्यांनी मला एस कुमार या कंपनीबद्दल व त्यांच्या येऊ घातलेल्या मिचोलीन टायर कंपनीबरोबर जॉईंट व्हेंचरमध्ये एक नवीन प्रोजेक्ट प्रीतमपूर येथे येत असल्याबद्दल सांगितलं. मला त्यांनी विचारले की, ''तुला याच्यामध्ये इंटरेस्ट आहे का?'' मी म्हटलं, ''जर चांगला स्कोप असेल तर जरूर मला इंटरेस्ट आहे.'' त्यानंतर माझा मुंबई येथे एस. कुमारचे टायर डिव्हिजनचे डायरेक्टर श्री. विकास कासलीवाल यांची गाठ पडली. म्हणजे तो खरे तर इंटरव्ह्यू होता, परंतु डॉक्टर घाग नी माझे नाव पुढे केल्यामुळे हा इंटरव्यू फक्त नावाचा होता. मला थोडेफार पगारात वाढ मिळून टेक्निकल मॅनेजर ही पोस्ट विकासबाबूंनी देऊ केली. ''कधीपर्यंत जॉईन होता येईल?'' असे विचारले. मी त्यांना म्हटलं, ''राजीनामा दिल्यावर कमीत कमी एक महिना मला इथून रिलीव्ह होण्यासाठी लागेल.'' तर ते म्हणाले, ''काही हरकत नाही.'' आणि मग मी जॉन्सनमध्ये राजीनामा दिला. साधारणपणे मे

महिन्यात मी इंदोरला पहिल्यांदा डॉक्टरांबरोबर गेलो. काय योगायोग पहा, हा नोकरीतील बदलसुद्धा मे महिन्यातच घडून आला होता. नेमके त्या वेळेस माझे हर्नियाचे ऑपरेशन झाले होते. त्यामुळे स्पेशल केस म्हणून मी डॉ. घाग यांच्याबरोबर विमानाने इंदूरला रवाना झालो. माझ्या कल्पनेप्रमाणे साधारणपणे एक आठवडा तिथे राहून एकंदर कामाचे स्वरूप सगळे बघून नंतर मला जे आवश्यक आहे ते सर्व सामानाची बांधाबांध वगैरे करण्यासाठी पनवेलला एक आठवडा सुट्टी घेऊन आलो. नंतर सामानाची बांधाबांध करून मी इंदूरला परत आलो.

साधारणपणे १९८६ साली मी इंदूरला नोकरीनिमित्य गेलो. त्या वेळेस विभूषा अगदी छोटी होती. मला पनवेल बस स्टँडवर सोडायला प्रथिता आणि विभूषा आली होती. मुंबई सेंट्रलहून इंदूरला मी ट्रेनने जाणार होतो. मी बसमध्ये बसल्यावर विभूषाला एकदम जाणवले की, बाबा आता बहुतेक कुठे बाहेरगावी चालला. तिला अगदी जेमतेम बोलता येऊ लागले होते. पण ती जोरजोरात 'नो नो' असे बऱ्याच वेळा म्हणाली. तिला माझे जाणे आवडलेले नव्हते. हे शब्द अजूनही मला आठवतात.

इंदूरला पंकज टायरमध्ये सुरुवातीला मला काम करण्यास सांगण्यात आला. माझे बरेच सहकारी महाराष्ट्रीय होते. त्यातले काही आठवतात ते म्हणजे श्री. पागनीस, श्री. फाटक, आणि उमदेकर. यापैकी पाठक यांच्या ओळखीमुळे मला इंदूर येथील रामबाग कॉलनी येथे श्री. भालेराव यांच्या घरात भाड्याने राहण्यासाठी जागा मिळाली. रामबाग कॉलनी, इंदूर म्हणजे जवळपास ९० टक्के महाराष्ट्रीय माणसांचा भाग. सुरुवातीला मी थोडे दिवस एकटाच राहात होतो. माझ्याच बरोबर पंकज टायरमध्ये मुंबईतून दोन तरुण मुलांना सुपरवायझर म्हणून नेमले होते. एकाचे नाव होते शैलेश गोडबोले, दुसऱ्याचे नाव होते इंगळे. हे दोघेही डॉ. घाग यांच्या ओळखीमुळे पंकज टायर मध्ये लागले होते. दोन्ही तरुण होते, पगार तसे बेताचे होते, बाहेर कुठे राहणार मिळेल अशा काळजीत होते. मी त्यांना माझ्याबरोबर राहण्यास

हरकत नाही असे सांगितले. मग दोघेही माझ्याबरोबर राहू लागले. आम्ही घरात जे हवे ते सर्व साहित्य वगैरे खरेदी करून बऱ्यापैकी घर बसवले होते. तिघांच्या जेवणखाणासाठी मग आम्ही एका मावशींना स्वयंपाकासाठी, श्रीमती भालेराव यांच्या ओळखीतून कामास ठेवले. त्या आमच्या सकाळचा नाश्ता व दुपारचा जेवणाचा डबा तयार करून देत असत. संध्याकाळी आम्ही कामावरून परत आल्यावर आमच्यासाठी रात्रीचे जेवण त्या परत वेगळे तयार करीत असत. एकंदरीत सगळे खूप छान चालले होते.

काही दिवसांतच माझी, माझे दोन सहकारी व श्री. गोपाळ भालेराव, त्यांचे बंधू दिलीप भालेराव व त्यांच्या पत्नी या सर्व कुटुंबाशी आमची चांगलीच गट्टी जमली. आम्ही बऱ्याच वेळा शनिवार-रविवारी संध्याकाळी पत्ते खेळत असू गंमत म्हणून.

मी जेव्हा पंकज टायरमध्ये जॉईन झालो तेव्हा कंपनीची परिस्थिती फारशी चांगली नव्हती. कंपनीच्या आवारात प्रचंड टायर ठेवलेले होते. सुरुवातीला माझी समजूत होती की, हे सगळे टायर बाहेर पाठविणेसाठी तयार असावेत, पण तसे नव्हते. हा सगळा माल मार्केटमधून परत आलेला होता. पंकज टायर त्या वेळेस, सायकल टायर, सायकल रिक्षा टायर, मोपेड टायर व ट्यूब बनवत असत. आमच्या टायरमध्ये खूप क्वालिटी कम्प्लेंट होत्या. त्यामुळे एवढा सप्लाय झाला तेवढा सगळा माल मार्केटमधून रिजेक्ट झालेला होता. काही दिवसांतच आमची पंकज टायरमध्ये मिटींग झाली. ही मिटींग श्री. विकास कासलीवाल, डायरेक्टर साहेबांनी आयोजित केली होती.

एकंदर सगळी परिस्थिती त्यांनी मला समजून सांगितली आणि मग त्यांनी मला विचारले की, ''आता आपल्याला काय करता येईल? आधी या टायरची क्वालिटी सुधारणे हे अतिशय महत्त्वाचे झालेले आहे.'' मी विकास साहेबांना सांगितलं. ''मला या सर्व टायरची फॉर्म्युलेशन एकदा व्यवस्थित अभ्यासून पाहावे लागतील. एक-दोन दिवसात मी आपल्याला याबद्दल काहीतरी सांगू शकेन.'' असे म्हटले.

त्याप्रमाणे त्यांनी मला मी मागितला तितका वेळ दिला. मी व माझा एक सहकारी प्रसादने या आधी टायर कंपनीत काम केले होते. आम्ही दोघांनी ही सर्व फॉर्म्युलेशन तपासून पहिली व आमच्या लक्षात आले की, या फॉर्म्युलेशनमध्ये बरेच मोठे प्रमाणात बदल करावे लागणार आहेत.

दोन-तीन दिवसांनी परत मिटींगवेळी मी विकास साहेबांना सांगितले की, सध्याच्या फॉर्म्युल्यात आपल्याला बरेचसे बदल करावे लागतील, त्याच्यात काही सुधारणा कराव्या लागतील, तरच आपल्याकडे चांगले टायर बनू शकतील. ते म्हणाले, ''ठीक आहे काय हरकत नाही, पण टायरच्या किमतीचं काय?'' मी त्यांना एक सूचना केली की, ''आपण आधी चांगले टायर बनवूया. ते कसे टिकतात त्याचा परफॉर्मन्स कसा आहे हे आपण तपासून पाहूया. त्याच्यानंतर ते टायर मार्केटने ॲक्सेप्ट केले तर आपण त्याच्या कॉस्टिंग वर काम करूया.''

विकास साहेबांनी ताबडतोब मला परवानगी दिली. ते म्हणाले, ''ठीक आहे तुमच्या नवीन फॉर्मुल्याप्रमाणे टायर बनवा, पण ते चांगले आहेत की नाही याची आपल्याला खात्री कशी पटेल?'' यासाठी मी आणि प्रसाद यांनी ठरवल्याप्रमाणे आमचा प्लॅन तयार होता. आम्ही त्यांना सांगितले की, आपले जेवढे डीलर्स आहेत त्यांना आपण आपल्यातर्फे चार ते पाच रिक्षाचालकांना आपले टायर काही दिवसासाठी ट्रायलसाठी मोफत द्यावे. त्यात एक अट असेल, ''आठवड्यातून एक दिवस हे रिक्षावाले आपल्या कंपनीमध्ये येऊन आपल्याला त्या टायरची स्थिती दाखवतील. मी आणि प्रसाद, टायरची झीज किती झाली आहे याचा एक रिपोर्ट तयार करू. आपल्या स्पेसिफिकेशनमध्ये ते बसत असतील व झीज खूप प्रमाणात असेल व टायर चांगलेच चालू लागले असे वाटते तर आपण त्याप्रमाणे पुढची कार्यवाही करू.'' श्री. विकास कासलीवाल हे एक अतिशय हुशार, तरुण व चांगले काम करणाऱ्यांना कायम संधी देणारे असे व्यक्तिमत्त्व होते त्यांनी आमच्या प्लॅनला ताबडतोब मान्यता दिली.

पुढच्या दोन-चार दिवसात आम्ही नवीन फॉर्म्युलेशनप्रमाणे रिक्षा टायर व सायकल बनवून आमच्या डीलरच्या काही रिक्षावाल्यांना नवीन तयार बसून दिले. दर आठवड्यात आम्ही त्याची तपासणी करू लागलो. साधारणपणे दोन महिन्यांमध्ये आम्हाला याचे रिझल्ट मिळू लागले. टायर पूर्वीच्या मानाने खूप चांगल्या प्रकारे बनले आहेत असे या सर्व रिक्षावाल्यांचे मत बनले. तसे त्यांनी आपापल्या डीलर्सना सांगितले. पंकज टायरचे डीलर्स आमच्याकडे परत येऊ लागले. आता क्वालिटी चांगली झाली आहे, आम्ही तुमचे टायर विकत घ्यायला तयार आहोत असे त्यांनी सांगितले आणि हळूहळू आमची एकंदर उलाढाल वाढू लागली.

याच काळात अजून एक चांगली घटना घडली ती म्हणजे TI सायकल्स नी नवीन कॉन्ट्रॅक्ट करून आम्हाला व्हाईट साईडवाल्या टायरची मोठी ऑर्डर देऊ केली. मी आणि प्रसादने काही दिवसांत व्हाईट साईडवाली टायर्स तयार केली व त्याची सॅम्पल्स दिली. TI सायकल्सनी ती तपासून त्याला आवडल्याचे कळवले. आम्हाला TI सायकल्सची एक मोठी ऑर्डर कायमस्वरूपी मिळाली.

पंकज टायरमध्ये अगदी सुरुवातीच्या काळात मला हवे तसे, माझ्या सहकाऱ्यांचे किंवा कामगारांचे सहकार्य मिळत नव्हते, पण जसे जसे कंपनीमध्ये सुधारणा होत आहे व कंपनीचे टायर चांगले बनता आहेत व आपल्याला नवीन ऑर्डर्स मिळतात. हे बघून ही स्थिती खूप लवकर बदलली व सर्व सहकारी आणि कामगार मला पूर्णपणे सहकार्य करू लागले.

पंकज टायरमध्ये आमच्या इंजिनिअरिंग डिपार्टमेंटमध्ये अमरजित सिंग नावाचा एक तर सरदारजी उत्तर भारतातून रुजू झाला होता. त्याची आणि माझी चांगली गट्टी जमली. मी त्याला कायम ''पुत्तर'' अशी हाक मारत असे आणि ''तो बोलो क्या करू पिताजी आपके लिए?'' असा म्हणत असे. मला म्हणायचा, ''एक बार हमारा सरसों का साग और मक्के की रोटी, खाऊन बघा.'' एका सुट्टीच्या दिवशी तो

मुद्दाम त्याच्या घरून  हे सर्व करून घेऊन आला. ते आम्हा तिघांनाही खूप आवडले. त्याच्यानंतर अमरजितसिंग बऱ्याच वेळा आमच्यासाठी सरसों का साग व मक्के की  रोटी घेऊन येत असे.

पंकज टायरमधील एक आठवण आपल्याला नक्की सांगावीशी वाटते ती म्हणजे, एकदा असाच मी काही प्रयोग करत होतो. अगदी शेवटच्या क्षणी काही केमिकल मिक्स करायची म्हणून बाजूला ठेवलेली होती.  कामाच्या व्यापामुळे व काही कारणामुळे नेमकं मी ही केमिकल मिक्स करायला विसरलो.  टायर मोल्डिंग प्रेसमध्ये  टाकण्यात आले तसे एकदम माझ्या लक्षात आले, आपल्याकडून एक मोठी चूक झाली आहे. ही केमिकल न टाकल्यामुळे प्रेसमध्ये सर्व टायर चिकटून बसले होते.  सर्व मोल्ड काढून पूर्ण  साफ करून मगच  परत प्रेस सुरू करावे लागणार होते. आमच्याकडे असे  दहा प्रेस  होते, पण एक बंद पडल्यामुळे  त्या दिवशी जवळपास दहा टक्के प्रोडक्शन कमी होणार होते.  हे अगदी  सकाळीच घडले होते. नेहमीच्या रिवाजाप्रमाणे सकाळी साडेदहा वाजता आमच्या कंपनीचे जनरल मॅनेजर, श्री मेहता साहेब (हे श्री. विकास कासलीवाल  साहेबांचे मावसाजी होते)  त्यांनी एकंदर सर्व पाहणी केली आणि मला म्हणाले, ''श्रीकांतजी, आज एक प्रेस बंद है क्या?''  मी त्यांना सांगितले, ''काही कारणामुळे, माझ्या चुकीमुळे एक गडबड झाली आहे.''

एक प्रेस आम्हाला खाली काढून सगळे मोल्ड साफ करून ते परत बसवावे लागणार आहेत त्यामुळे आज ९ च प्रेस चालू राहतील व १०% प्रॉडक्शन कमी होईल. मेहता साहेब याबद्दल काही बोलले नाहीत. ते म्हणाले, ''ठीक आहे.'' आणि आपल्या ऑफिसमध्ये पहिल्या मजल्यावर ती निघून गेले.

काही वेळाने आमच्या कंपनीचा शिपाई माझ्याकडे आला आणि मला म्हणाला, ''आपको मेहता साब ने उनके ऑफिस में बुलाया है।'' मला वाटले, आता बहुतेक झालेल्या चुकीबद्दल मेहता साहेबांकडून फायरिंग  ऐकावे लागणार. माझ्या बऱ्याच सहकाऱ्यांनासुद्धा असेच

वाटले की आता श्रीकांत आठवले यांचे काही खरे नाही. मी ऑफिसमध्ये गेलो त्यांना नमस्कार केला. मी ''मेहतासाहेबांना माझ्याकडून चूक झाली आहे आपण द्याल ती शिक्षा मला मान्य आहे.'' मेहतासाहेब म्हणाले, ''तुम्ही खुर्चीत बसा. तुम्हाला का बोलावले याची तुम्हाला कल्पना आहे का?'' मी म्हटलं, ''हो, मला थोडीफार कल्पना आहे. माझ्यामुळे आज आपले दहा टक्के प्रॉडक्शन कमी होणार आहे. त्याबद्दल तुम्ही मला कदाचित मला बोलणार असाल. कदाचित त्याबद्दल दंड किंवा मेमो देणार असाल.'' तसे मेहता साहेब हसले आणि म्हणाले की, ''तुम्ही पूर्णपणे चुकला.'' मी म्हटलं, ''हो सर, मला मान्य आहे.'' तर ते म्हणाले, ''तसं नाही, मी तुमच्यावर काही कार्यवाही करणार आहे असे तुम्हाला वाटते. या बाबतीत तुम्ही चुकलात असं मला म्हणायचं होतं. मी बोलावण्याचे कारण वेगळेच आहे. पंकज टायर या कंपनीमध्ये आजपर्यंतच्या इतिहासात, बहुतेक पहिल्यांदाच माझा कोणी सहकारी मला खरं ते कारण सांगतोय असे मला वाटलं. याच्या आधी कुठेही चूक झाली की ती लपवण्यासाठी वेगवेगळ्या गोष्टी सांगून वेळ मारून नेणे हे मला अनुभवायचे होतं, पण आज तुम्ही जे मला स्वच्छपणे आणि खरे ते सांगितलं ते ऐकून मला खरोखर बरं वाटले.'' ते म्हणाले की, ''जो माणूस नवीन काही काम करतोय त्याच्याकडून कधीतरी कळत नकळत अशी चूक होणे हे साहजिक असतं. तर तुम्ही या चुकीबद्दल वाईट वाटून घेऊ नका. याबद्दल तुम्हाला कुठल्याही दंड किंवा शिक्षा आम्ही करणार नाहीये, उलट तुमचं अभिनंदन करण्यासाठी मी तुम्हाला येथे बोलावलेले आहे. आम्हाला अशाच सच्च्या व चांगल्या कामाची अपेक्षा आहे. तुम्ही असेच चांगले काम करीत राहा. तुमच्याकडून या कंपनीला खूप काही अपेक्षा आहेत. आजची ही घटना मी ताबडतोब विकास बाबूंना कळवली आहे. त्यांनीसुद्धा तुमचे अभिनंदन केले आहे.''

इंदूर येथे मी एकंदरीत एक वर्ष आणि पंधरा दिवस जवळ ३८० दिवस काम केले, पण माझ्या कारकिर्दीमधील हे दिवस अतिशय

चांगले लक्षात राहण्याजोगी ठरले यात काही शंका नाही.  पंकज टायर ही कंपनी जवळपास सोळा वर्षांपूर्वी सुरू झाली होती. या कंपनीला फायदा कधीच झाला नव्हता. कारणे अनंत असावीत, परंतु कदाचित त्यांना चांगला टेक्नॉलॉजिस्ट मिळाला नसावा किंवा आपली कंपनी समजून काम करणारा कोणी टेक्निकल मॅनेजर मिळाला नसावा, परंतु माझ्या चांगल्या काम करण्याचा एक परिणाम असा झाला की जेव्हा मिचोलीन टायर पीतमपूर येथील फॅक्टरी सुरू  होण्याचे दिवस आले, तेव्हा डॉ. घागना मी म्हटले की, ''आता मला तुम्ही पीतमपूर या प्लँटमध्ये कधी शिफ्ट करणार? पंकजमध्ये मला काम करावे असे वाटत नाही. इथे मला फारसे शिकण्यासारखे आता काही नाहीये.'' तसे डॉ. घाग, विकास बाबूंशी बोलले, विकास बाबूंच्या पुढील भेटीत त्यांनी मला बोलावून घेतलं. ते मला म्हणाले, ''तुम्हाला पीतमपूर येथे जायचे आहे?''  मी त्यांना ''हो'' असे म्हटले. ते म्हणाले, ''का असे तुम्हाला वाटते?'' मी सांगितले की, ''मला नवीन  टेक्नॉलॉजी शिकायची इच्छा आहे.''  विकासबाबू म्हणाले की, ''ते आता जवळपास शक्य नाहीये. तुम्ही आल्यानंतर इथे इतक्या चांगल्याप्रकारे काम करत आहात की, तुम्हाला पंकजमधून मिचोलीन, पितमपूर येथे तुमची बदली करणे जवळपास अशक्य आहे. तुम्हाला इथेच काम करावे लागेल. तुम्हाला काही अजून सुविधा हव्या असतील त्या व कंपनीकडून अजून काही हवे असेल तर सांगा.  तुम्हाला ते आम्ही त्वरित मंजूर करू.'' मी विकास बाबूंना सांगितले की, ''मला पैशासाठी किंवा अजूनही काही सुविधासाठी मला तिथे जायचे नाही तर मला नवीन टेक्नॉलॉजी आत्मसात करायची आहे.  त्यासाठी जायचे व त्यासाठी मी आठवड्यातून एक दिवस इंदूर येथे येऊन सर्व कामकाजावर ती लक्ष ठेवण्यास तयार आहे पण तसे घडू शकले नाही.

दरम्यानच्या काळात सुरेश काकांचा मुलगा जयराम याने नुकतेच मेकॅनिकल इंजिनिअरिंग पूर्ण केले होते. तो एकदा सहज म्हणून इंदोरला माझ्याकडे आला होता. मला म्हणाला, ''श्रीकांतदादा, तुमच्या कंपनीत

एखादे ओपनिंग असेल तर मला जॉब मिळतो का बघ. मी म्हटलं, ''मी नक्की प्रयत्न करतो.'' डॉक्टर घाग पुढील वेळेस इंदोर येथे आले असता मी जयरामबद्दल त्यांना सांगितलं. ते मला म्हणाले की, ''तुझा भाऊ असेल तर काहीच प्रश्न नाही. त्याला इंटरव्ह्यूसाठी बोलून घे.'' त्याप्रमाणे जयरामला मी बोलवून घेतले आणि एकाच इंटरव्ह्यूमध्ये त्याचे पीतमपूर प्लँटसाठी सिलेक्शन झाले. याबाबतीत जयराम जेव्हा केव्हा मला भेटतो तेव्हा ही आठवण मला नेहमी सांगतो. तो म्हणतो, ''श्रीकांतदादा, मी फक्त एकदा तुला म्हणालो, ते मनावर घेऊन लगेच बोललास व माझ्या पहिल्याच इंटरव्ह्यूमध्ये मला नोकरी मिळाली. त्यासाठी मला कायम तुझे कौतुक वाटते आणि केलेल्या मदतीबद्दल अतिशय मी ऋणी राहीन.''

या इंदूरच्या घरी मी मघाशी म्हटल्याप्रमाणे घरमालक भालेराव व आमचे कित्येक वर्षांपूर्वीचे नाते असल्यासारखे संबंध निर्माण झाले होते. एकदा प्रथिता, बाळ असलेली विभूषा व आई पनवेलहून माझे घर, कंपनी वगैरे बघण्यासाठी इंदोरला आल्या. पावसाळा होता, पण इंदूरमध्ये तितकासा काही पाऊस पडत नाही, पण १९८७ साली ही सर्व आलेली असताना आठ दिवस सतत पाऊस पडला. आम्हाला कुठेही बाहेर फिरावयास जाता आले नाही. तेव्हा एक दिवशी मी रिक्षाने या सर्वांना कंपनीत म्हणजे पंकज टायरमध्ये घेऊन गेलो आणि एकदा या तिघांना घेऊन आम्ही हॉटेलात जेवण्यासाठी गेलो. याव्यतिरिक्त आम्हाला एक दिवस ही कुठे बाहेर पडता आले नाही. विभूषा येणार व तेव्हा ती जेमतेम दोन वर्षांची असल्यामुळे श्री भालेराव वहिनींनी आम्हाला एक मोठे जाजम घरात घालण्यासाठी दिले होते. लहान असल्यामुळे घरात कायम इकडे तिकडे रांगत असे.

काम संपल्यावर संध्याकाळी घरी आल्यावर मी, शैलेश व इंगळे सर्व जण विभूषाशी खेळत असू. अतिशय गमतीशीर असा काळ होता. त्यामुळे म्हणून आठ दिवसांत आम्हाला कुठेही बाहेर जाता आले नाही. सर्व जण मुंबईतला पाऊस तुम्ही मध्यप्रदेश मध्ये घेऊन आलात असे म्हणू लागले.

अशीच भालेराव यांच्या घराची अजून एक आठवण म्हणजे आमच्याकडे मुंबईहून काही पाहुणे मंडळी आली. शशिताई व श्री. बुवा तसेच अश्विनी, मेधा वहिनी ही सर्व मंडळी मध्यप्रदेश बघण्यासाठी आली होती म्हणून इंदूरलाही जाऊ म्हणून आमच्याकडे आली. आम्ही सर्व जण दोन-तीन दिवस महू, पीतमपूर व इतर जवळपासची ठिकाणे बघण्यासाठी गेलो. आमच्या घरी बाकी सर्व सुखसोयी असल्यामुळे संध्याकाळचे जेवण घरीच होत असे. आमच्या काम करणाऱ्या मावशी या सर्वांचे अगदी आनंदाने करीत होत्या. या सर्व मंडळींबरोबरचे आमचे तीन-चार दिवस अतिशय मजेत गेले होते.

मला पीतमपूरमध्ये बदली मिळणार नाही व मिचोलीन टायरमध्ये काम करता येणार नाही हे समजल्यावर ती मुंबईला परत यायचा निर्णय घेतला. त्या दृष्टीने मी मला दुसरी कुठली नोकरी मिळते का या प्रयत्नात होतो. एकदा काही कामानिमित्त पनवेल आलो असताना परत जाते वेळी माझे जॉन्सनमधील साहेब, किशोर कौशिक यांना भेटण्यासाठी ग्रँड रोड येथे त्यांच्या घरी गेलो होतो. त्यांनी मला ''एक नवीन कंपनी पालघर येथे चालू होत आहे व त्यांना एक व मॅनेजर हवा आहे, तुझी इच्छा असेल तर मी त्यांच्याशी बोलतो.'' असे सांगितलं. ''ठीक आहे तुम्ही बघा आणि असेल तर मला कळवा.'' असे मी त्यांना म्हणालो. त्यांना भेटण्यासाठी किंवा इंटरव्ह्यूसाठी येऊ शकेन असे किशोर कौशिक साहेबांना सांगितले. त्यांनी मग याबाबतीत हालचाली केल्या व हायटेक प्रायव्हेट लिमिटेडचे डायरेक्टर डॉ. हितेन शेठ यांच्याशी ते बोलले आणि माझा इंटरव्ह्यू ठरविला. मी पुढील वेळेस मुंबई डॉक्टर हितेन शेठ यांना भेटलो आणि आमच्या पहिल्या भेटीतच त्यांनी मला कंपनीत घेण्याचे ठरवले व रीतसर मला अपॉईंटमेंट लेटर वगैरे दिले. मला पगार तर निश्चितच वाढवून मिळालेला होता. शिवाय मला १९८७ साली ऑगस्टमध्ये जर्मनीला हॅम्बुर्गला जाण्याचा योग येणार होता. मी इंदोरला परत गेलो आणि एक-दोन दिवसात माझा राजीनामा लिहून मेहता साहेबांकडे दिला. माझा राजीनामा बघून

ते जवळपास हादरलेच. त्याने ताबडतोब विकास बाबूंना कळवले आणि बहुतेक त्यानंतर लगेच विकास बाबू इंदोरला आले. आल्याबरोबर प्रथम त्याने मला बोलाविले. मला विचारले की, ''तुम्ही राजीनामा दिला आहे का? तुम्ही जाऊ नका, आमच्याकडे काय करता येईल का ते सांगा. तुम्हाला जर पीतमपूरला काम करायचं असेल तर तसे काही तरी आम्ही व्यवस्था करतो. त्यासाठी आम्हाला थोडासा वेळ तुम्हाला द्यावा लागेल. तुमच्या जागी आम्हाला दुसरा कोणीतरी रबर टेक्नॉलॉजिस्ट नेमावा लागेल. त्यानंतर आम्ही तुमची बदली पीतमपूर येथे करू.''

विकासबाबूंनी आपुलकीपोटी मला दिलेल्या ऑफरबद्दल मला आनंद झाला, पण आता ते शक्य होणार नव्हते. मी विकासबाबूंना तसे सांगितले की, ''माझा एका ठिकाणी इंटरव्ह्यू झाला आहे व मला जर्मनीला जाण्याचा योग मिळतोय. तरी कृपया मला अडवू नये. आपण म्हणाल तितके दिवस मी इथे काम करतो, पण मला परत जावेच लागेल.'' त्यानंतर जवळपास दीड-दोन महिने मी पंकज टायरमध्ये काम केले आणि नंतर मी इंदूरहून पनवेलला परत आलो. मी राजीनामा दिला आहे, ही बातमी आमच्या कंपनीमध्ये सगळीकडे लगेच पसरली. तेव्हा कंपनीमध्ये जवळपास अडीचशे कामगार काम करत होते. त्यांची युनियनसुद्धा होती. तर एके दिवशी रात्री साधारणपणे साडे-दहा अकरा वाजता या युनियनचे ११ मेंबर मी राहत असलेल्या ठिकाणी म्हणजे रामबाग येथे घरी आले. रात्री इतक्या उशिरा बेल वाजलेली ऐकून मला आधी कळले नाही कोण आले असेल. दार उघडले तर आमच्या युनियनचे सगळे मेंबर व लीडर शर्माजी सगळे दाराबाहेर उभे होते. आम्ही एकमेकांना नमस्कार केला आणि त्यांना विचारलं, ''आज इतक्या उशिरा तुम्ही का बरं आलायत? काही गडबड झाली आहे का? काही अडचण आहे का?'' तर ते म्हणाले, ''हो साहेब, एक मोठी गडबड झाली आहे. त्या संबंधी आम्हाला तुमच्याशी बोलायचे आहे.'' मी सर्वांना आत बोलाविले, मग मी शैलेशला सर्वांसाठी चहा करायला सांगितलं. चहापान झाले. मग मी, आमचे युनियन लीडर

शर्माजी यांना विचारले, ''आता बोला काय झाले आहे?'' शर्माजी मला म्हणाले, ''सर, आज हमने एक बहुत बुरी खबर सुनी है। हमने सुना है की, आप ने इस्तीफा दिया है और आप कंपनी छोड रहे है।'' मी म्हटले, ''तुम्ही बरोबर ऐकले आहे मी राजीनामा दिला आहे आणि मी परत मुंबईला जात आहे.'' पण ते सर्व जण एका मुखाने म्हणाले, ''नाही सर हं. आपको जाने नही देंगे। तुम्हाला कुठल्याही प्रकारची अडचण असेल तर सांगा. उद्या आम्ही झेंडे लावून सगळे कामकाज बंद करू आणि मॅनेजमेंटला तुम्हाला जे काय हवे ते मिळवून द्यायची व्यवस्था करू.'' मी हात जोडले आणि त्यांना म्हटले, ''कृपया असे काही करू नका. माझे आणि मॅनेजमेंटचे विशेषत: विकासबाबूंचे अतिशय चांगले संबंध आहेत. मला मॅनेजमेंटकडून कुठलीही अपेक्षा नाहीये. माझ्या वैयक्तिक कारणासाठी मी मुंबईला परत जायचं ठरवलं आहे. तरी कृपया तुम्ही असे चुकीचे काम करू नका. मी अजून एक-दोन महिने आपल्या सोबत असणार आहे. आपण जेवढे चांगले काम करता येईल ते करण्याचा प्रयत्न करू. तरी कृपया असे काहीतरी आपण करू नका.'' त्यानंतर या सर्वांची समजूत पटली व ते परत गेले. नंतर दोन महिन्यांनंतर मी मुंबईला परत येण्याच्या आधी या सर्वांनी कंपनीमध्ये माझा जंगी सत्कार केला. तो दिवस मला अजूनही आठवतो आहे. त्या लोकांनी प्रेमाची मला एक भेटवस्तू दिली. मला अनेक हार घातले. नंतर ते हार त्यांनी माझ्या स्कूटरवर घालून, माझी स्कूटर पूर्णपणे सजवून टाकली होती. असे क्षण आयुष्यात फार कमी वेळा येतात. या प्रसंगाला जवळपास ३३ वर्षं झाली, पण अजूनही माझ्या डोळ्यांसमोर तो प्रसंग जशाचा तसा उभा राहतो.

■ ■



आई व प्रथिता



नीरजा व आई



नीरजाचा स्वयंपाक



मी व विभूषा



प्रथिता, निलमा, मी व मित्रमंडळ



## १२.३. माझी करिअर अशी घडत गेली... (उत्तरार्ध २)

यानंतर माझा हायटेक टेप प्रायव्हेट लिमिटेड येथील कारकिर्दी वरती मी आपणास सांगू इच्छितो.

हायटेक टेप या कंपनीचा आमचा कारखाना पालघर येथे दिवाणी इस्टेटमध्ये होता. सुरुवातीला मी पनवेलहून पालघरला सहा महिने रोज जाऊन येऊन करत असे. आमचे ऑफिस होते मुंबई व्हिटी स्टेशन जवळ. हॉटमेल्ट अधेसिव्ह वापरून बनवण्यात येणारे टेप भारतात हे या कंपनीचे विशिष्ट होते. माझ्या मते, असा हा चौकी ग पहिला प्रोजेक्ट होता. यासाठी आम्ही कोटिंग मशीन जर्मन घेऊन इंपोर्ट केले होते. या प्रोजेक्टमध्ये आम्हाला इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या मदतीने कॅनडा येथील सल्लागार लाभले होते.

कॅनडाचे व्हाईस प्रेसिडेंट डॉक्टर रॉय डेक्सबरी हे आमचे कन्सल्टंट होते. डॉक्टर रॉय यांच्याकडून मला हॉटमेल्ट टेक्नॉलॉजी म्हणजे काय हे अतिशय चांगल्या प्रकारे शिकायची संधी मिळाली. १९८७ साली ऑगस्टमध्ये मी पहिल्यांदा परदेशी गेलो. मुंबई ते फ्रँकफूर्ट व पुढे हॅम्बुर्ग असा माझा विमान प्रवास होता. विमान कंपनी होती लुफ्तांसा. माझा एकंदरीत दुसराच विमान प्रवास व पहिलाच परदेशातील, त्यामुळे थोडेफार दडपण मनावर होते. मी तेथे हॉटमेल कोटिंग मशीनची ट्रायल

घेण्यासाठी गेलो होतो. आमचे कंपनीचे डायरेक्टर डॉक्टर हितेन शेठ हे लंडनहून थेट हॅम्बुर्गला येणार होते. या विमान प्रवासात माझी हरवलेली बॅग वगैरे उल्लेख आधी एके ठिकाणी केला आहे. तर त्याबद्दल मी आता जास्त काही न बोलता या ज्या कंपनीमध्ये आम्ही गेलो होतो त्याबद्दल थोडे सांगू इच्छितो. या कंपनीचे नाव होते मेलटेक्स. आता ही कंपनी नॉर्ट सॅनची विकत घेतली आहे. १९८७ साली आम्ही जेव्हा गेलो तेव्हा सुद्धा म्हणजे ते ३० वर्षांपूर्वी त्यांच्या ऑफिसमध्ये फक्त एक-दोन कर्मचारी होते. बाकी सर्व काम कॉम्प्युटरवरती होत होते. त्यांच्या शॉप फ्लोअरवरतीसुद्धा कमीत कमी कर्मचारी होते. तेथे काम कॉम्प्युटरवर चालत असे. आमच्या ट्रायल सगळ्या व्यवस्थित पार पडल्या. जवळपास आठ दिवस आम्ही रोज या कंपनीत जात असू. काम संपल्यावर मी जसा गेलो त्याच मार्गे मुंबईला विमानाने परत आलो. हे मशीन भारतात येऊन आमच्या कंपनीत पोहोचेपर्यंत जवळपास तीन महिन्यांचा काळ लोटला.

भारतात भ्रष्टाचार हा किती भयानक व बोकाळला आहे याचे उत्तम उदाहरण १९८७ साली मला मिळाले होते. आमचे कोटिंग मशीन भारतात आल्यावर मुंबई कस्टम डिपार्टमेंटने आमचे मशीनचे कागदपत्र गहाळ झालेले आहेत असे सांगितले. एक ठरावीक रक्कम जर कस्टम्स ऑफिसला दिली तर ती फाईल शोधून आमचे मशीन लवकरात लवकर आमच्या ताब्यात दिली जाईल असे माझ्या डायरेक्टर साहेबांना कस्टम ऑफिसमध्ये सांगण्यात आले. म्हणजे त्यांचे या बाबत गणित कसे होते, तर ही फाईल जर एक महिना सापडली नाही त्यासाठी एक महिन्याचे दमरेज (दंड) चे पैसे अमुक एक लाख होतात. त्याच्याऐवजी इतके जर कस्टम ऑफिसरला दिले तर तुमची फाईल लगेच क्लिअर करू. अशा प्रकारे अडवणूक करून पैसे काढण्याचा प्रकार ३० वर्षांपूर्वी मी प्रत्यक्ष अनुभवला आहे. या कंपनीमध्ये मी तेथील लोकल कामगार भरती केले होते. आमच्या वीस-बावीस जणांच्या टीममध्ये, माझ्या व्यतिरिक्त टेप इंडस्ट्रीमध्ये किंबहुना एकंदर इंडस्ट्रीमध्ये काम केलेले कोणीही जवळपास नव्हते. सर्व टीमला ट्रेनिंग

देण्याचे काम मला त्या काळी करता आले हे माझे भाग्य. आमचे बहुतेक सर्व कामगार हे डहाणू भागातले होते व ते रोज ट्रेनने पालघरला येत असत.

आमच्या हायटेक टेप कंपनीला गमतीने $3M^2$ असे मी म्हणत असे. कारण आमचे तीन कॉन्ट्रॅक्टर होते. मोरे, महाजन व मेहता. मोरे हे आमचं इलेक्ट्रिकल इंस्टॉलेशनचे काम करत होते. महाजन या एका व्यक्तीकडून आम्ही सिलिकॉन कोटिंग काढण्याचे मशीन विकत घेतले होते व मेहता हे आमच्या कंपनीची इमारत बांधत होते, म्हणजे सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर होते. ही तिन्ही माणसं अतिशय लहरी, लबाड व अतिशय कामचुकार अशीच होती. मोरे यांनी आमच्या इलेक्ट्रिकल इंस्टॉलेशनला प्रचंड वेळ लावला होता, पण कमीत कमी काम त्यांनी पूर्ण केले होते. तसेच मेहता या बांधकाम कंपनीने सुद्धा आमची कंपनी बांधायला प्रचंड वेळ लावला होता, पण त्याने शेवटी बांधकाम पूर्ण केले होते. या तिघांमध्ये सर्वांत, अतिशय वाईट अनुभव आम्हाला आला तो महाजन या कंपनीकडून. कंपनीने आम्हाला कोटिंग मशीन देण्यास प्रचंड विलंब लावला व शेवटपर्यंत संपूर्ण मशीन असे कधी यांनी कधी दिलेच नाही. त्यांनी डॉक्टर हितेन सेठ हे या धंद्यातील नवखे आहेत हे हेरून त्यांचा पुरेपूर फायदा घेतला होता. एके दिवशी मी ऑफिसमध्ये गेलो असता माझ्या डॉक्टरसाहेबांनी मला पालघरला जाऊन सिलिकॉन मशीनची कॉलिटी कशी आहे, मशीन कसे आहे हे बघून येण्यास सांगितले. ठरल्याप्रमाणे मी पालघरला गेलो. तिथे आमचा एक केअरटेकर कामगार विक्रम याला, सर्व काम बघण्यासाठी नेमलेला होता. मी कंपनीत गेलो. माझी ओळख दिली आणि त्याला म्हटलं मशीन कुठे आहे? त्या वेळी इमारतीचे बांधकाम अजूनही चालू होते, स्लॅब व्हायची होती. तर हे तथाकथित मशीन येथील ओपन ग्राउंडमध्ये ताडपत्रीमध्ये झाकलेले आहे व मी तुम्हाला दाखवतो असे म्हणून त्याने ताडपत्री बाजूस केली व म्हणाला, ''पहा ते मशीन.'' मला अँगलचा किंवा चॅनलचा एक सांगाडा बघायला मिळाला. मी

त्याला विचारले, ‘‘याचे बाकीचे पार्ट कुठे आहेत?’’ तर विक्रांत म्हणाला की, ‘‘हेच ते मशीन, या व्यतिरिक्त अजून काही नाहीये.’’ या गोष्टीचा मला खरोखरच धक्का बसला. मी दुसऱ्या दिवशी ऑफिसला गेलो व माझा रिपोर्ट डॉक्टर हितेन सेठना दिला. त्यांनी मला महाजन कंपनीचा पत्ता दिला व म्हणाले, ‘‘तुम्ही ताबडतोब या कंपनीमध्ये जा आणि काय परिस्थिती आहे याची पूर्ण माहिती घेऊन मला कळवा.’’ त्याप्रमाणे मी या कंपनीमध्ये गेलो. महाजन हे कंपनीमध्ये उपलब्ध नव्हते व बराच वेळ थांबल्यानंतर ते परत आले आणि ते म्हणाले, ‘‘एक मशीन तर मी पाठवलेले आहे.’’

महाजन यांचे हे वक्तव्य ऐकून मला अजून एक धक्का बसला. मी त्यांना म्हटलं, ‘‘अहो तिथे फक्त एक सांगाडा पाहिला आहे. तुम्ही त्याला मशीन कसे म्हणू शकता?’’ तर ते म्हणाले, ‘‘नाही, अजून बरेच पार्ट तयार होत आहेत. ते जसे तयार होतील तसे मी पाठवून द्यायची व्यवस्था करतो.’’ त्याच्यानंतर मी बऱ्याचवेळा या कंपनीत जात असे. जवळपास दहा वेळा तरी मी या कंपनीत पाठपुरावा करणेसाठी गेलो. अतिशय कूर्मगतीने व कसेबसे एकदा त्यांनी सगळे पार्ट एकदाचे पालघरला पाठवून दिले.

हे मशीन चालू करणे म्हणजे माझ्यासाठी एक मोठे दिव्य होते. या मशीनमध्ये बऱ्याच काही सुधारणा करून बरेच जादा पार्ट बनवून व जोडून घ्यावे लागले. त्यासाठी मग मी पनवेल येथील गोगटे यांच्याकडून बरेच काही पार्ट बनवून घेतले. त्यांचा इंजिनिअर पालघरला आला व एकदाचे हे मशीन आम्ही चालू करू शकलो. या सर्व अतिरिक्त कामांमध्ये आमचे दोन-तीन महिने अक्षरशः फुकट गेले होते.

अजून एक मशीन म्हणजे हॉटमेल बनवण्यासाठी एक मिक्सिंग मशीन आम्ही श्री. गोगटे यांच्याकडून पनवेल येथे बनवून घेतलं. या मशीनचे डिझाईन आम्हाला एका जपानच्या कंपनीकडून मिळाले होते. त्या एका ड्रॉईंगवरून या मिक्सिंग मशीनचे संपूर्ण ड्रॉईंग तयार करून अशा प्रकारचे एक मशीन अतिशय कमी किमतीत पनवेलमध्ये

१९८७ साली मी बनवून घेतले व शेवटपर्यंत आम्ही ते अतिशय चांगल्या पद्धतीने वापरू शकलो.

शेवटी सर्व सोपस्कार करून हवे ते पैसे देऊन आमचे जर्मनीहून आलेले हॉटमेल्ट कोटिंग मशीन एकदाचे पालघर येथे पोचले. इन्स्टॉल करायला आम्हाला एक-दोन दिवस लागले. मग आम्ही ते मशीन चालू करण्याचे काम केले. पहिल्याच दिवशी आम्हाला बऱ्याच अडचणी आल्या. या मशीनचा एक पार्ट म्हणजे करोना ट्रिटिन्ग मशीन हे एका सॉफ्टल या कंपनीचे होते. हा करोना ट्रीटर काही केल्या चालू होईना.

या सर्व गडबडीमध्ये आमचा सबंध दिवस जवळपास गेला. रात्र झाली त्या दिवशी आम्ही कंपनीमध्येच राहिलो. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून परत प्रयत्न केला. मशीन काही चालू होत नव्हते. शेवटी सोफ्टेल या कंपनीचा तो पार्ट आम्ही मशीनमधून बाहेर काढला. त्याची पूर्ण तपासणी करत असताना त्यांच्यातला एक दहा अँपिअरचा काचेचा फ्यूज ब्लो झाला आहे असे लक्षात आले. तो आम्ही फ्यूज बदलला आणि मग आमचे मशीन एकदाचे चालू झाले. सुरुवातीला जवळपास सहा महिने आमच्याकडे कोणी तयार ऑपरेटर नसल्यामुळे, हे मशीन मी स्वतः चालवत असे. नंतर एक जितू या कामगाराला मी या मशीनवर तयार केले. मग हळूहळू तो हे मशीन चालू लागला त्याच्यानंतर मी अजून एक कामगार हे मशीन चालवण्यासाठी तयार केला.

एकंदरितच हायटेक टेपमधील माझं काम हा मला एक अतिशय वेगळा अनुभव होता. या ठिकाणी बऱ्याच गोष्टी मला शिकता आल्या मशीनच्या बाबतीत प्रचंड माहिती स्वतः काम करून मिळवता आली. परंतु विशेष उल्लेख करावा लागेल अशी बाब म्हणजे हॉटमेल्ट अधेसिव्हच रिसर्च व डेव्हलपमेंट. हॉटमेल्ट अधेसिव्हचे फॉर्म्युलेशन कसे कार्य करते हे मला डॉक्टर रॉय यांच्याकडून प्रचंड प्रमाणात शिकायला मिळाले. या कंपनीमध्ये, स्लीटिंग मशीनबद्दल एक अतिशय वाईट अनुभव पण मिळाला, हे मशीन आम्ही भोगल या कंपनीकडून विकत

घेतले होते. ते चालवण्यासाठी अतिशय त्रासदायक असे होते. आम्ही या कंपनीत आम्हाला लागणारा सिलिकॉन पेपर स्वतः बनवत होतो. हा पेपर आम्हाला १ मीटर रुंदीतून ८ इंच या रुंदीत कापावा लागे, हे काम आम्ही या मशीनवर करीत असू.

महाजन या दिव्य माणसाने दिलेल्या मशीनवर आम्ही सिलिकॉन कोटिंग करीत होतो. आम्ही आमचा एक नवीन फॉर्म्युला तयार केला होता, त्याच्यामध्ये कोटिंग हे पूर्णपणे आग प्रतिरोधक किंवा फायर रेटार्डांत करण्यासाठी आम्ही कार्बन टेट्राक्लोराइड या केमिकल्स वापर करीत असू. हे कोटिंग सुरू असताना या केमिकलच्या वाफ व वासमुळे एक प्रकारची नशा येत असे. आणि माझे बरेच कामगार येथे २४ तास काम केल्यावर २ किंवा ३ पेग दारू पिल्यासारखे झिंगत असत. त्यामुळे हे मशीन चालू असताना मी सदैव कंपनीत राहण्याची व्यवस्था केलेली होती.

या कंपनीत सुरुवातीला आम्ही अधेसिव्ह नॅशनल स्टार्च युके येथून मागवत असू. नंतर आमचे मिक्सिन्ग मशीन तयार झाल्यावर आम्ही हे अधेसिव्ह आम्ही पालघरमध्ये बनवू लागलो. महिन्याभरानंतर कधीतरी मशीन साफ करताना निघालेले अधेसिव्ह आम्ही आमच्या शेजारच्या प्लॉटमध्ये टाकत होतो. हे किती चिकट होते याची दोन उदाहरणे मी आपल्याला आत्ता सांगणार आहे. एकदा या बाहेर टाकलेल्या अधेसिव्ह वरती एक साप सरपटत आला व तिथेच चिटकून बसला. काही केल्या त्याला तिथून हलता येईना. आम्हाला शक्य तो सर्व प्रयत्न केला, पण शेवटी तो साप तिथेच मेला. दुसरी गंमत म्हणजे एकदा एक कोंबडी या टाकलेल्या अधेसिव्हवर दाणे टिपत आली व जागेवर चिकटून बसली. कोंबडीचे पाय ते केवढे? तरी सुद्धा ती चिकटून बसल्यावर तिला काही हालत येईना. शेवटी तिला पकडून, उचलून बाहेर काढावे लागले. त्याच्या नंतर कधी या भागात कोंबड्या किंवा इतर प्राणी आले नाहीत हे सांगायची गरज नाही. अशी ही एक मजेशीर घटना त्या काळी घडली होती. माझ्या पालघर येथील या

नोकरीच्या काळात माझा पनवेल ते पालघर व पालघर ते पनवेल हा प्रवास, तसेच पालघरमध्ये राहता असतानाचे आणखीन काय अनुभव मी या आधी नमूद केलेले आहेत ते पुन्हा आता सांगावेसे वाटत नाहीत.

साधारणपणे १९९० साली मी कुर्ला येथे बंडू शिरसाट यांच्याकडे काही कामासाठी गेलो असताना मला पेणजवळ एक नवीन टेप कंपनी सुरू होत आहे व त्याचे एक डायरेक्टर प्रदीप जाधव आहेत व ते सुद्धा जॉन्सनमधून बाहेर पडलेले आहेत अशी माहिती मिळाली. बंडूने मला या नवीन कंपनीचा पत्ता व प्रदीप जाधव साहेबांच्याबद्दल माहिती दिली. त्यांना भेटण्यासाठी त्यांच्या कुर्ला येथील ऑफिसमध्ये गेलो. आमच्या पहिल्या भेटीमध्ये खूप चांगली ओळख व जॉन्सन अँड जॉन्सनचा एक समान दुवा आणि एकंदरीत माझा अनुभव यामुळे त्यांनी मला त्यांच्या नवीन प्लँटसाठी जनरल मॅनेजर म्हणून मला निवडले, मग मी हायटेक टेपमध्ये राजीनामा देऊन 'प्रेशर सेन्सिटिव्ह सिस्टीम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीमध्ये जनरल मॅनेजर म्हणून रुजू झालो.

**Pressure Sensitive Systems (I) Pvt. Ltd.**

PSS येथे मी १९९० साली रुजू झालो. इथे मला स्वतःची अशी चार चाकी गाडी मिळाली. तो माझ्यासाठी व माझ्या कुटुंबासाठी एक मोठा क्षण होता. मी रोज सकाळी पेण येथे कामासाठी जाण्यास निघत असे. ही कंपनी पेण-खोपोली रोडवर सापोली या गावानजीक होती. १९९० साली हा भाग तसा बऱ्यापैकी मागासलेला होता. आमच्या कंपनीची जवळपास पाच-सहा एकर जागा होती व या जागेत तीन कंपन्या होत्या. लमिनार इंडस्ट्रीज ही फ्लेक्झिबल पॅकेजिंग बनवणारी कंपनी, त्याच्यानंतर नंजाप्पा पेपर पॅकेजिंग व त्याच्यानंतर सर्वांत वरती PSS ही आमची कंपनी होती. मी जेव्हा जॉईन झालो तेव्हा हा संपूर्ण प्लॉट माळरानासारखा होता. नावापुरती एक-दोन झाडे होती. पहिल्या वर्षी मशीनचे उभारण्याचे काम, राहिलेले इमारतीचे बांधकाम



वगैरे चालू असल्यामुळे, पहिल्या पावसाळ्यात मी तिथे बऱ्यापैकी झाडे लावायची ठरवले. मग मी मे महिन्यात व जून महिन्यात पनवेल, खोपोली व इतर गावी वेगवेगळ्या नर्सरीमध्ये जाऊन बऱ्याच प्रकारची झाडे अर्थात रोपे विकत घ्यायचो व आमच्या कंपनीत आधीच खड्डे काढून ठेवलेले असत तिथे लावत असे. अशा प्रकारे एखाद वर्षात आम्ही तिथे जवळपास तीन-चारशे तरी झाडे लावली. एक-दोन वर्षांत तो पूर्ण परिसर हिरवागार दिसू लागला. आमच्या कंपनीत बाहेरून कोणी कस्टमर आले की, आमचे एम. डी. श्री. राज प्रहार हे मुद्दाम लोकांना सांगत असत की, आम्ही प्लॉट घेतला तेव्हा या जागेमध्ये थोडीच झाडे होती. आता तुम्ही हे सर्व हिरवेगार झालेले बघताय याचं श्रेय हे आमचे जी. एम. श्रीकांत आठवले यांना द्यावे लागेल. कुठे-कुठे जाऊन कुठल्या- कुठल्या नर्सरीतून वेगळ्या प्रकारची रोपे आणून इथे लावणी करत असतात आणि भर पावसाळ्यात त्याची चांगली निगा राखतात. त्यामुळे आता ती दोन वर्षांत छान वाढली आहेत व संपूर्ण परिसर हिरवागार झालेला आहे. हे ऐकून मला खूप बरे वाटत असे.



हायटॅक टेपप्रमाणे येथे सुद्धा टेप इंडस्ट्रीत काम

केलेल्या माझ्या कंपनीमध्ये माझ्याव्यतिरिक्त अजून दोन व्यक्ती होत्या. एक म्हणजे शेडगे, जो बॉयलर ऑपरेटर होता आणि दुसरा होता धुरी, ज्याने जॉन्सनमध्ये हेल्पर म्हणून काम केले होतं. बाकी सर्व कामगार मंडळी मी सपोली येथील तेव्हाचे आमदार श्री. मोहन पाटील यांना भेटून सापोली गावातील शेतकऱ्यांच्या मुलांना कंपनीमध्ये हेल्पर आणि ऑपरेटर असे भरती करून त्यांना सर्व कामे मी स्वतः शिकलो होतो. या कंपनीमध्ये हायटेकपेक्षा बरीच जास्त मशीन होती. इथे आम्ही रबरपासूनचे स्वतःचे अधेसिव्ह तयार करीत होतो. त्यामुळे रबर मिक्सिंग मेल, सिगमा मिक्सर, कोटींग मशीन, स्लीटींग मीटींग, प्रिंटींग मशीन अशी बरेच मशीन होती. सर्व मशीन मी स्वतः चालू शकत होतो व सुरुवातीला ही सर्व मशीन मी स्वतः चालवत असे. हे काम करता-करता मी आमच्या कंपनीसाठी बरेच ऑपरेटर तयार केले. येथील कामकाजाचासुद्धा मला पुढील माझ्या करिअरमध्ये खूप काही उपयोग झाला.




माझे कंपनीतील इतर सहकारी म्हणजे गिरीश भगत, अकाउंट व एक्साईज वगैरे सगळं सांभाळत असे व राजू पाटील हा सगळा बाहेरची सरकारी कामे, माल वाहतूक वगैरे तसेच राजेश बेळगावकर मला प्रॉडक्शनमध्ये मदतनीस होता. या तिघांपैकी कुणालाही टेप इंडस्ट्रीचा अनुभव नव्हता. त्यामुळे या तिघांनासुद्धा मला थोडेफार ट्रेनिंग द्यावे लागले. राजू पाटील याचा नंतर एक-दोन वर्षांत अपघाती मृत्यू झाला. येथे एकंदरीत माझे काम चांगले चालू होते व ही कंपनी माझी स्वतःचीच




आहे या पद्धतीने मी येथे काम करत असे. एके दिवशी येथील आमदार व वीजमंत्री झालेले श्री. प्रभाकर धारकर यांनी एक मिटींग पेणमध्ये बोलाविली होती. या मिटींगला मी उपस्थित राहिलो होतो. कारण त्या काळात पावसाळ्यात आमच्या कंपनीत वीज वारंवार खंडित होत असे. येथील विजेची लाईन ही अतिशय जुनी होती व जरा जोरात पाऊस पडला, वारा सुटला की, आमची वीज खंडित होत असे. हा त्या भागातील सर्व इंडस्ट्रीचा मोठा असा प्रॉब्लेम होता. आणि हे सर्व धारकर साहेबांना स्वतः सांगण्यासाठी मी मुद्दाम मिटींगला गेलो होतो. मिटींगमध्ये मी आमची मागणी व समस्या व्यवस्थितपणे मांडल्या आणि मिटींग संपवून कंपनीत परत आलो. मला गिरीश भगत याने सांगितले की, राजसाहेबांचा दोन-तीन वेळा फोन येऊन गेला. तुम्ही त्यांना ताबडतोब फोन करा. मी त्यांना फोन केला. ते माझ्यावर खूप संतापले होते. मला म्हणाले, ''तुम्ही कुठे गेला होता?'' मी त्यांना सांगितले की, अशी एक मिटींग बोलावलेली होती व या मिटींगला मी गेलो होतो.'' तर ते म्हणाले, ''ठीक आहे याच्यापुढे तुम्हाला जर कंपनी सोडून कुठे जायचं असेल तर आधी माझी परवानगी घ्या आणि मग तुम्ही कंपनीबाहेर जा.'' मी अतिशय जीव लावून काम केलेल्या व स्वतःची कंपनी समजून काम केलेल्या ठिकाणी हे ऐकून मला अतिशय वाईट वाटले. मी ''ठीक आहे.'' म्हटलं. जिथे माझ्यावर विश्वास नाही किंवा मला एखादे चांगले काम करायचं असेल तेही कंपनीच्या भल्यासाठी, त्याची परवानगी घ्यायची असेल तर इथे काम करण्यात काही अर्थ नाही. मी

राज परिहार साहेबांना सांगितलं की, ''आज संध्याकाळी मी कुर्ला ऑफिसला येत आहे. आपल्याला भेटून झालेल्या घटनेबद्दल सविस्तर माहिती सांगतो.'' मी ताबडतोब माझी गाडी घेऊन वाटेत पनवेलला घरी जाऊन झालेल्या प्रकाराची प्रथिताला कल्पना देऊन मुंबईला कुर्ला ऑफिसमध्ये गेलो.

मी ऑफिसला येणार आहे याची कल्पना प्रदीप जाधव व सुरेश परिहार या बाकी दोन डायरेक्टर साहेबांना आलेली होती. मी ऑफिसमध्ये संध्याकाळी पोहोचलो लगेच राज साहेबांना भेटलो. त्यांना झाल्याप्रकाराची सर्व सविस्तर माहिती दिली. मंत्री साहेबांनी दिलेलं आश्वासन वगैरे सगळं सांगितले. हे सर्व झाल्यावर राजसाहेब मला म्हणाले, ''ठीक आहे, पण याच्यापुढे कुठे बाहेर गेलात तर मला विचारल्याशिवाय, माझी परवानगी घेतल्याशिवाय जाऊ नका.'' मी त्यांना म्हटलं, ''हो याच्यापुढे असं होणार नाही, कारण मी ही नोकरी सोडतोय. मी माझा राजीनामा बरोबर घेऊन आलो आहे.'' माझा राजीनामा त्यांच्या हातात दिला. तो त्यांनी घेतला आणि बाजूला ठेवला मला म्हणाले, ''माझी बाजू समजून घ्या, तुम्हाला मी असे का सांगितले हे तुम्हाला समजून देण्याचा मी प्रयत्न केला आहे, त्याचा चुकीचा अर्थ काढू नका आणि कृपया हा राजीनामा मागे घ्या.'' मी त्याला म्हटले, ''साहेब, जर एका कंपनीचा मुख्य म्हणून मला काम करायचा असेल व प्रत्येक वेळेस मला तुमची परवानगी किंवा तुम्हाला सांगूनच ते काम करावे लागणार असे तर या पद्धतीने मला काम करणे अशक्य आहे. मी कंपनीच्या हिताचा निर्णय कायम घेत आलो आहे त्यामुळे तुम्ही असे निर्बंध लावणार असाल तर मला यापुढे काम करणे अशक्य आहे.'' दोन मिनिटं ते काही बोलले नाहीत आणि मला म्हणाले, ''हा तुमचा निर्णय पक्का आहे? तुम्ही परत एकदा विचार करा! कारण मी तशा सूचना देणार आहे. उद्या जर तुम्ही तिथे गेला तर ते कदाचित तुम्हाला आत सोडणार नाहीत.'' मी त्यांना सांगितले, ''तुम्ही खुशाल कळवा. तिथे जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.'' आणि

खरोखरच नंतर परत या भागात कधीच गेलो नाही कंपनीत जायचा प्रश्नच उद्भवत नाही.

प्रदीप जाधव आणि माझे वैयक्तिक संबंध चांगले होते. त्याचे कारण आम्ही दोघे जॉन्सन अँड जॉन्सनमध्ये काम केलेले होते आणि माझ्याप्रमाणेच प्रदीप जाधव हेसुद्धा कंपनीसाठी प्रचंड मेहनत करत होते. मार्केटिंगचा सगळं भार ते सांभाळत होते. मी कंपनी सोडतो आहे याचे त्यांनाही पण बरेच दुःख झाले होते, पण राज प्रधान त्यांनाही समजून काढण्याची हिम्मत किंवा धाडस, बाकी दोन्ही डायरेक्टरमध्ये नव्हते. त्यामुळे शेवटी ते मला गमावून बसले.

मी या कंपनीमध्ये जवळजवळ साडेचार वर्षं काम केले. साधारणपणे १९९४ साली मी नोकरी सोडली. त्यानंतर पुढे काय करायचे काही ठरलेले नव्हते. खोपोलीला सोनल लिमिटेड म्हणून टेप बनवणारी एक कंपनी होती. त्याचे मालक होते श्री. एम. एल. अरोरा. मी त्यांच्या कंपनीत जाऊन त्यांना भेटलो आणि माझ्यासाठी एखादी पोझिशन असेल तर पाहा असे सांगितले. त्यांनी ताबडतोब माझी विनंती मान्य केली आणि साधारणपणे एका महिन्यात मी सोनलमध्ये जनरल मॅनेजर म्हणून रुजू झालो.

या कंपनीचे प्रॉडक्ट बोप टेप होते आणि माझा एकंदरीत जो अनुभव होता तो सगळ्या स्पेशालिटी टेपमध्ये होता. त्यामुळे या कंपनीमध्ये मी फारसा राहू शकलो नाही.

१९९६ साली मी सिद्धार्थ टेप, मुरबाड येथे एका नवीन कंपनीत जॉईन झालो. ही कंपनी मुरबाड एमआयडीसीमध्ये होती. ही कंपनी सिद्धार्थ राजगरीया यांनी चालू केली होती. या कंपनीमध्ये काही स्पेशल टेप तयार करून जॉन्सन अँड जॉन्सनला सप्लाय करणे अशा प्रकारची कल्पना होती. टेप कंपनी चालू करण्यासाठी सिद्धार्थ यांना जॉन्सन आणि जॉन्सनचे रिसर्च डेव्हलपमेंट मॅनेजर डॉक्टर P.K. Manna यांनी पुढाकार घेऊन सल्लाागार म्हणून काम केले होते. इथे जे मशीन घेण्यात आले होते हे मशीन स्पेशल टेप बनवण्यासाठी नसून एक

साधेसुधे मशीन होते. त्यामुळे सुरुवातीला या मशीनवर आम्हाला बरेच काय काम करावे लागले. या ठिकाणी माझा एक सहकारी होता सी. आर. यादव. त्याचा शॉर्टफॉर्म होता CRY हा जॉन्सनमध्ये काम केलेला इंजीनियरिंग डिपार्टमेंट मधला ऑपरेटर होता. मशीनच्या बाबतीत त्याची मला बऱ्यापैकी मदत होत होती. माझे अजून एक सहकारी होते श्री. आगा. हे बाकी बाहेरची सगळी कामे बघत होते. सी. आर. यादव कल्याणमध्ये राहात असे. रोज सकाळी मला कल्याण बस स्टँडजवळ भेटत असेल व माझ्याबरोबर गाडीने मुरबाडला कंपनीत येत असे. संध्याकाळी असेच आम्ही दोघे मिळून कल्याणपर्यंत जात असू. यादव कामाला अतिशय चांगला माणूस होता, परंतु एक नंबरचा व्यसनी होता. त्याला दारूचे व्यसन होते.

एखाद दिवशी जास्त झाली की, दुसरे दिवशी त्याची दांडी ही ठरलेली असायची. यामुळे बऱ्याच वेळा आमच्या कामात अडथळा येत असे. मी बराच वेळ त्याला समजवायचा प्रयत्न केला होता, परंतु बऱ्याच वर्षांची सवय एकदम जाणे अशक्य. त्याला आगा नेहमी म्हणत असत, ''काय हो यादव, तुम्ही नावाप्रमाणे साहेबांना CRY करता. त्यांना रडायला लावता.''

१९९६ ह्याचा वर्षी मला यूएईमध्ये एक कन्सल्टन्सीचे काम मिळाले. मशीन बनवणारे, माझे एक मित्र गुलजार सिंग यांच्यातर्फे एक संधी मिळाली. यूएईमध्ये उमल क्वीन या राज्यात टेप बनवायची एक नवीन फॅक्टरी सुरू होणार होती. त्यासाठीची सगळी मशिनरी गुलजार सिंग यांची कंपनी देणार होती. त्यानिमित्त माझी, गुलजार सिंग व गुलजार सिंग यांचे कन्सल्टंट अजय मेहता यांची एक मिटींग झाली. या मिटींगमध्ये त्यांनी मला हे काम द्यायचे ठरवले. या कामाचे मला एकूण ८५ हजार रुपये मिळणार होते. त्या काळात ही माझ्यासाठी एक मोठी रक्कम होती. शिवाय माझा जाण्याचा खर्च, राहण्याचा खर्च हे सर्व येथील कंपनी करणार होती. या निमित्ताने मग माझी आणि या कंपनीचे मालक यांची भेट झाली. यांचे नाव होते दिलीप हाटे. त्यांचे ऑफिस

कबूतरखाना, दादर येथे होते. स्कायलार्क बिल्डर्स असे त्यांच्या कंपनीचे नाव होते. उमलक्वीन येथील कंपनीचे नाव त्यांनी स्कायलार्क पॅकेजिंग असे ठेवले होते. त्यांची आणि माझी ओळख झाली आणि आमची वरचेवर भेट होत राहिली. कंपनीमध्ये काय लागेल याच्याबद्दल सगळी व्यवस्था करण्याचे काम सुरू केले. या कंपनीसाठी लागणारे सगळे कामगार व सुपरवायझर मी माझ्या ओळखीतून उपलब्ध केले. या सर्वांसोबत आम्ही मशीन पोहोचल्यावर सर्व जण तिथे गेलो. कंपनीच्या जवळच एका दुसऱ्या बिल्डिंगमध्ये आमची राहायची व्यवस्था कंपनीने केलेली होती. प्रत्येकाची एक वेगळी रूम आणि गल्फ कंट्री असल्यामुळे प्रत्येक रूममध्ये एसी याची व्यवस्था होती. आम्ही सर्व जण एका कुटुंबासारखे तिथे राहात होतो. मशीनची थोडीफार कामे करून आम्ही एक-दोन दिवसात मशीन ट्रायल घेण्यास सुरुवात केली.

मशीन चालू केलेल्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी कोट केल्यानंतर काही केल्या मशीनमधून फिल्म बाहेर पडेना. आम्ही ब्रेक सेटिंग करून बघितले, टेन्शन कंट्रोल करून बघितले. काहीच केल्याने काम होत नव्हते. शेवटी आम्ही ते मशीनचे ड्रायिंग टनेल उघडून बघितले आणि आमचा कुणाचाच विश्वास बसेना. कारण ड्रायिंग टनेल आतून पूर्णपणे वाकून खालून जाणाऱ्या रोलला टच झालेले होते. आम्ही ताबडतोब गुलजार सिंह यांना बोलावून आणले आणि त्यांना हा झालेला प्रकार दाखवला. गुलजार सिंह यांना सुद्धा हा मोठा धक्काच होता. त्यांच्याही लक्षात येईना, असे कसे झाले? ते हतबल झाले होते. मला म्हणाले, ''श्रीकांत, अभी क्या कर सकते है? अभी क्या होगा? कारण हे सगळे जर नवीन बनवून मुंबईहून येथे पाठवायचे झाले तर ते प्रचंड खर्चीक झाले असते व या मशीनमध्ये त्यांना मिळणारा जो काही नफा होता तो कदाचित एक रुपयासुद्धा राहिला नसता. शिवाय या सर्व कामाला बराच वेळ गेला असता.

मी गुलजार सिंग यांना सांगितले, ''तुम्ही काळजी करू नका. मी विचार करून काय करता येईल का ते बघतो.'' ते ऐकून गुलजार ह्यांना

बराच धीर आला. ''जरुर कुछ सोचना और कुछ तो करना। ये तो बहुत बडी मुसीबत हो गई है।'' मी शांतपणे विचार केला, त्या मशीनची पूर्णपणे सर्व दृष्टीने पाहणी केली आणि नंतर माझ्या लक्षात आले की, आपण एकदा वेल्डर, गॅस कटर व काही हेल्पर घेऊन हे मशीन तेथे जागेवर रिपेअर करू शकतो. माझा अभ्यास झाल्यावर तेव्हाचा माझा सहकारी, जो सुपरवायझर म्हणून घेतला होता, त्याला मी माझी कल्पना सांगितली. त्याने सुद्धा माझी कल्पना उचलून धरली. आम्ही दोघेही गुलजार सिंग यांच्याकडे गेलो. त्यांना म्हटलं, ''तुम्ही, मला एक वेल्डर, गॅस कटिंग वाला व ४ हेल्पर द्या. ह्या कामासाठी मोठा हायड्रॉलिक जॅक द्या, वेल्डिंग मशीन द्या आणि गॅस कटिंग ही सर्व मशीनवर काम करून हे मशीन लवकरात लवकर दुरुस्त करतो.'' हे ऐकून त्यांना आनंद झाला. ते मला म्हणाले, ''श्रीकांत, इस काम का कितना पैसा तुम्हें दूँ?''

मी म्हटले, ''मुझे कोई पैसा देने की जरूरत नही है। जो आपका प्रॉब्लेम है, वो मेरा है। आप से हम जादा पैसे नाही लेंगे, आपसे दोस्ती है, कभी मुझे कोई परेशान होगी तभी मुझे मदत करना। आपकी वजहसे मुझे ये पराये मुलुख में पहिला काम मीला है।''

अशा रीतीने पुढचे जवळपास दोन दिवस जास्तीत जास्त तास काम करून या मशीनचा ड्रायिंग टनेल आम्ही पूर्णपणे जागच्या जागी दुरुस्त केले आणि तिसऱ्या दिवशी आम्ही मशीन चालू केले. मग कुठलीही अडचण न येता आम्ही कोटिंगला सुरुवात केली. हे मशीन सुरू झालेले बघून त्या दिवशी गुलजार सिंग यांच्या डोळ्यात आलेले अश्रू मला अजूनही आठवतात. मला वाटले की, आमच्या कामाचे पावती आपल्याला मिळाली. या सर्व कामामुळे या कंपनीचे मालक दिलीप हाटे यांचासुद्धा माझ्यावर खूप विश्वास बसला. एखादी गोष्ट सांगितली की, ते ताबडतोब ऐकू लागले. हे मशीन असे चालू केले, पण त्याच्यानंतर एक वेगळाच एका गोष्टीचा सामना आम्हाला करावा लागला. आमचे कोटिंग व्यवस्थित येत नसे. त्यासाठी या मशीनच्या

कोटिंग सेक्शनमध्ये एक सुधारणा करायची कल्पना मी मांडली. या मशीनमध्ये किस रोल कोटिंग ही पद्धत होती. येथे कुठल्याही प्रकारचा मायर बार वगैरे नव्हता. त्या काळात मायर बार भारतात सुद्धा ताबडतोब मिळत नसे. जवळपास अशक्य असेच होते. मग असा मायर बार तेथेच बनवायचं मी ठरवले. त्यासाठी मला स्टील बार व स्टील वायर याची गरज भासणार होती. मी याची ड्रॉईंग तयार करून फॅक्स मार्फत मुंबईच्या ऑफिसला पाठवली. तेथील एका व्यक्तीने ही ड्रॉईंग माझे मित्र श्री. दिलीप कडवे यांच्याकडे त्यांच्या वर्कशॉपमध्ये घेऊन गेला. नंतर मी फोनवरून माझे मित्र दिलीप कडवे यांच्याशी बोलून मला नक्की काय हवंय हे त्यांना सांगितले. त्याचे बिल बनवून ते स्कायलार्कच्या ऑफिसमध्ये द्यावे व तिथून त्याचे पेमेंट घ्यावे असे सांगितले. शक्यतो लवकरात लवकर दोन स्टीलचे बार व दोन वेगवेगळ्या जाडीच्या स्टील वायर ताबडतोब यूएईला पाठवून देण्याची व्यवस्था करावी असे सांगितलं. आमचा अजून एक कामगार ज्याचे नाव राजेश सरोज, हा उमल क्वीनला पुढील एक चार-पाच दिवसात येणार होता. त्याच्याबरोबर या सर्व वस्तू पाठवून देण्यास मी त्यांना विनंती केली. कडवे यांनी हे काम तत्परतेने मान्य केलं व त्याप्रमाणे हे सगळे पार्ट बनवून पाठवून दिले. मी उमल क्वीन येथे कंपनीत सर्वांना सूचना देऊन ठेवल्या होत्या की, राजेश जेव्हा केव्हा येईल तेव्हा आला की ताबडतोब मला मी झोपलो असलो तरी, रात्रीचे दोन-तीन वाजले असले तरी उठवायला सांगितले. कारण हा मायर बार लवकरात लवकर बनवून तो मशीनवर लावून कोटिंग व्यवस्थित चालू करणे हे गरजेचे होते. माझ्या अंदाजाप्रमाणे त्या दिवशी पहाटे दोन-अडीचच्या सुमारास राजेश पोहोचला. माझ्या सूचनेप्रमाणे मला पहाटे उठण्यात आले. मी व आणखीन दोन कामगार असे मिळून आम्ही पहाटे साडेतीन-चार वाजता मायर बार बसवण्याचे काम चालू केले. सकाळी साधारणपणे सात वाजता आमचे काम बरेचसे होत आलेले होते. म्हणजे जवळजवळ ९५ टक्के काम झाले होते. तेवढ्यात मला कोणीतरी सकाळचा

चहासाठी बोलवण्यात आलं. मी त्यांना सांगितले की, माझे काम होत आले आहे. ते पूर्ण झाले की मी येतो. आपण माझ्यासाठी थांबू नका. पण या एक-दोन मिनिटांच्या संभाषणामध्ये माझे थोडे दुर्लक्ष झाले व त्यामुळे स्टील वायरला पीळ बसला आणि आमची पहाटेची पूर्ण मेहनत वाया गेली. पुन्हा पहिल्यापासून आम्हाला ते काम करावे लागणार होते. मी पहिल्यापासून पुन्हा ते काम सुरू केले.

एवढ्यात पहाटे साहेब तेथे आले व काम झाले की नाही विचारू लागले. मी झालेला प्रकार त्यांना सांगितला. ते म्हणाले, ''लवकर करा किती वेळ वाया जातो आहे?''

तिथे कुठल्या प्रकारचे मशीन नव्हते त्यामुळे स्टील बारवर वायर गुंडाळण्याचे काम हातीच करावे लागणार होते. आम्ही परत सुरुवात केली. सकाळी साडेनऊ-दहा वाजता मला नाश्त्यासाठी येण्याचे बोलणे आले. मी त्यांना सकाळी जे उत्तर दिले तेच दिले. मी नाश्त्यासाठी गेलो नाही. नंतर दुपारी जेवणाचे बोलावणे आले तेव्हा गेलो नाही. शेवटी दुपारी तीन-साडेतीन वाजता दिलीप हाटेसाहेब स्वतः आले व मला म्हणाले, ''आठवलेसाहेब, माझं काही चुकलं असेल तर मला माफ करा. तुम्ही सगळ्यापासून चहा घेतला नाही, नाश्ता घेतला नाही, जेवला नाहीत, दुपारचा चहा सुद्धा घेतला नाही. तुमचं काम थोडा वेळ बाजूला ठेवा आणि कृपया या आणि चहा तरी घ्या, काहीतरी खाऊन घ्या. मी सकाळी जे तुम्हाला विचारलं की आता कधी हे काम होणार? किती उशीर होतोय? याबद्दल मला माफ करा. याबद्दल मला तुम्हाला दोष द्यायचं नव्हतं. आता तुम्ही जे काय काम करताय ते तुमच्या कॉन्ट्रॅक्टमध्ये कुठे लिहिले नाहीये, पण आपले प्रॉडक्शन थांबले आणि ते लवकर चालू व्हावे यासाठी तुम्ही प्रयत्न करतात याची मला कल्पना आहे.'' त्यांनी अक्षरशः हात जोडून माझी माफी मागितली.

मी हाटे साहेबांना सांगितले, ''साहेब, ह्याच्यात तुमची काही चूक नाहीये. तुम्ही माझी माफी मागू नका. मी कोणावरही रागावलो नाहीये,

पण मी माझ्या मनाने ठरवलं आज जोपर्यंत हे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत मी काही घेणार नाही. माझे काम पूर्ण झाले की, मी स्वतः चहा नाश्ता घेऊन वेळ असल्यास जेवणही घेईन. तुम्ही याचे वाईट वाटून घेऊ नका. ही माझी मला मी शिक्षा केलेली आहे आणि मला खात्री आहे, आज संध्याकाळपर्यंत आपण मशीन नक्की चालू करू.'' अतिशय योग्य मायरबार तयार करून, नशिबाने संध्याकाळी सहा वाजेपर्यंत आमचे हे मायरबारचे काम पूर्ण झाले. मग आम्ही मशीन सुरू केले त्याच्यावरती व्यवस्थित कोटिंग येऊ लागले. कोटिंग करून त्याची टेप कट करून ते सॅम्पल मी हाटेसाहेबांना दाखवायला घेऊन गेलो. मी त्याला म्हटले की, ''आता मला जे काय द्यायचे असेल ते द्या. तुम्ही द्याल ते मी खाईन. तुम्हाला दिलेले वचन मी पूर्ण करू शकलो याचा मला आनंद आहे.''

उमल क्वीन येथून साधारणपणे पंचेचाळीस दिवस काम व्यवस्थित सेट करून मी पनवेलला परत आलो. त्याच्यानंतर पळस्पा येथे जोशी कंपौंड (NR जेठालाल या कंपनीमध्ये) श्री. जोशी यांच्या वाड्यामध्ये एक जागा भाड्याने घेऊन विनिप कन्व्हर्टर या नावाने आम्ही एक कंपनी सुरू केली. यासाठी लागणारे कोटींग मशीन आम्ही स्वतः तयार केले. आम्हाला तीन-चार चांगली मोठी कामेही मिळाली व घडी व्यवस्थित बसू लागली, पण एका विशिष्ट कंपनीचे अधेसिव्ह वापरल्यामुळे आमचा सगळा माल रिजेक्ट झाला. आम्हाला हा खूप मोठा फटका होता. तिथे जोशी वाड्यामध्ये आम्हाला भाडेसुद्धा बरेच होते. जवळपास साडेबारा हजार रुपये भाडे आम्ही महिन्याला देत होतो आणि आमच्याकडे पाच-सहा कामगार होते. त्यांचे पगार, बाकी डिझेलचा खर्च हे सगळ्या गोष्टी आवाक्याबाहेर जात होत्या. या कंपनीतून मला घरी आणायला एक रुपयासुद्धा कधी मिळत नव्हता. जे मिळेल ते सगळं खर्च होत होते.

दरम्यान विभूषा प्रचंड आजारी झाली आणि जवळपास अडीच-तीन महिने तिला हिंदुजा हॉस्पिटलमध्ये ठेवावे लागले. त्याची सविस्तर

माहिती मी दुसऱ्या एका सदरामध्ये दिलेली आहे. कंपनीची स्थिती विभूषाचा आजार या सगळ्या परिस्थितीत बुडत्याला काठीचा आधार म्हणतात तसे माझे पुण्याचे दोन मित्र आमच्या पळसा येथील कंपनीत आले. त्यांनी मला सुचवले की, आपण आपली कंपनी पुण्यात घेऊन येऊ. आम्ही दोघेजण आणि तुम्ही दोघं असे मिळून आपण एक प्रायव्हेट लिमिटेड कंपनी सुरू करू. कंपनीच्या सर्व खर्चाची तसेच कंपन्यांशी लागणाऱ्या वर्किंग कॅपिटलची व मार्केटिंगची व्यवस्था आम्ही पाहू. प्रॉडक्शन व नवीन प्रॉडक्ट डेव्हलपमेंट या दोन गोष्टी तुम्ही पहा. हा प्रस्ताव मला एकंदरीत आवडला. त्यामुळे नोव्हेंबर १९९८ साली, मी पनवेल पळस्पा येथून फॅक्टरी पुणे-शिंदेवाडी येथे हलवली. त्यानिमित्ताने शिंदेवाडी येथे माझ्या पुण्यातील दोन मित्रांच्या सहकार्याने आम्ही एक जागा भाड्याने पसंत केली. एक दिवशी आम्ही आमचे मशीन व बाकी सर्व साहित्य एका लॉरीमध्ये भरून शिंदेवाडी येथे आलो तिथे पाहतो तर काय शेडचे काम पूर्ण झालेले नव्हते. भिंती उभ्या राहिल्या होत्या, पण अजून पत्रे लागायचे होते. खालचं फ्लोअरिंग व्हायचं होतं. जवळपास तीन आठवडे आमचे सर्व साहित्य, मशीन ताडपत्रीमध्ये झाकून ठेवले होतं. जवळपास एक महिन्यानंतर आम्हाला ते आज घेता आले. हा एक अतिशय मोठ्या धक्काच होता. त्याच्यानंतर साधारणपणे एक वर्ष आम्ही कंपनी चालवली, पण पनवेलपेक्षाही जास्त अडचणी आम्हाला येत आहेत असे दिसून आले.

आता काय करायचे याच्यापुढे काहीच मला कळेनासे झाले होते. किंबहुना सात तारखेला कामगारांचा पगार, पंधरा तारखेला कच्च्या मालाचे पैसे देणे, ही देणी द्यायची तारीख आली की, मला पोटात गोळा आल्यासारखे वाटायचे. इथेसुद्धा मी घरी एक पैसाही आणू शकत नव्हतो. या सर्व धंद्यातील तणावामुळे मला बहुतेक डायबेटीस किंवा मधुमेह हा आजार १९९८ साली जडला.

या अशा परिस्थितीत ही कंपनी आपल्याला जास्त दिवस चालवता येणार नाही याची जाणीव झाल्यामुळे मी अजून कोणी आपल्याला

पार्टनर मिळू शकतात का? कोणी इन्व्हेस्टमेंट करू शकतात का? याची चाचपणी करत असताना चेंबूरचे श्री. एम. के. कुमार (यांची परामाउंट टेप कंपनी होती) यांच्या संपर्कात मी आलो. त्यांच्याशी एक-दोन मिटींग झाल्यावर त्यांनी आमच्या कंपनीमध्ये पैसे गुंतवायचे तयारी दर्शवली. आधीची भागीदारी मोडून आम्ही नवीन कंपनी Futuristic टेप्स प्रायव्हेट लिमिटेड ही नवीन कंपनी चालू केली. या कंपनीचे एम. डी. झाली. श्री. एम. के. कुमार व दोन डायरेक्टर एक मी स्वत: व बेळगावचे श्री मैत्रिणी साहेब.

**Futuristic Tapes Pvt. Ltd.**

आता आमचे तसं बऱ्यापैकी बस्तान बसू लागले होते. मग मी एक मोठे कोटिंग मशीन करायचे ठरवले. १२५० मिलिमीटर रुंदीचे मशीन आम्ही शिंदेवाडी (जवळपास एका खेडेगावात) येथे १९९८ साली उभे केले. यासाठी लागणारे रोलर मी मुंबईहून माझे मित्र दिलीप कडवे काली इंजिनिअरिंग शिवडी, यांच्याकडे बनवून घेतले, मशीनचे कंट्रोल पॅनल गोरेगाव येथून दिनेश भाई, यांच्याकडे बनवून घेतले व पूर्ण मशीनचे फॅब्रिकेशन शिंदेवाडी येथे आमच्या समोरील श्री. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्याकडून करून घेतले. हे मशीन उभे केल्यावर त्याची पहिली ट्रायल आम्ही सरफेस प्रोटेक्शन टेप करायचे ठरवले. त्यासाठी मी गुजरातमधून पाटकर एक्सत्रूजन या कंपनीमधून मिळवायची व्यवस्था केली. त्याच्यासाठी लागणारे अधेसिव्ह मी भारतात पहिल्यांदा बरेच प्रयोग करून तयार केले. ते नियमित वापरायला सुरुवात केली. यामुळे भारतात वॉटर बेस अधेसिव्ह वापरून सरफेस प्रोटेक्शन टेप करायची पद्धत आम्ही १९९८ साली विकसित केली. मला तो दिवस आठवतो, या दिवशी आम्ही ह्या प्रकारची पहिली ट्रायल केली. ट्रायल सुरू केल्यावर एक लक्षात आले की, फिल्म वाइंडिंग करण्यासाठी एक वेगळ्या प्रकारचे वाइंडिंग स्टेशन हवे. ते आम्ही शिंदेवाडी एका दिवसात दिवस-रात्र एक करून तयार केले व मशीनवर बसवले. आमची ट्रायल त्या दिवशी रात्री जवळपास

साडेबारा-एक वाजता पूर्ण झाली. त्यानंतर मी, एम. के. कुमार साहेब आणि मैत्रिणी साहेब पुणे शहरात गेलो. कुठे काय खायला मिळते काय हे पाहत स्वारगेट जवळ सारसबाग, जवळील एका गल्लीमध्ये एक पावभाजीची गाडी रात्री दोन वाजता चालू होती. या गाडीवरती त्या दिवसातले पहिले जेवण म्हणजे एक-एक प्लेट पावभाजी आम्ही तिघांनी खाल्ली. त्यानंतर हे प्रॉडक्ट खूप चांगले चालू लागले. त्याच्या जोडीला अजूनही काही प्रॉडक्ट आम्ही चालू केले. या कंपनीत मी जवळपास चार वर्षे टेक्निकल डायरेक्टर म्हणून काम केले. एके दिवशी संध्याकाळी श्रीकुमार साहेबांनी माझी काही कागदपत्रे घरी पाठवून ''उद्यापासून आपण कंपनीत आला नाही तरी चालेल,'' अशी मला विनंतीवजा ऑर्डर पाठवून दिली. माझ्या डोळ्यांसमोर अक्षरशः अंधकार होता. हातात दुसरे कुठलेही काम नव्हते. जे काही आहे ते या कंपनीमध्ये करायचे या उद्देशाने मी माझ्या स्वहस्ते जवळपास साडे चार लाख रुपये वेगवेगळ्या प्रयोगांसाठी खर्च केले होते ती मिळायची आशा पण धुळीस मिळाली. उद्यापासून काय करायचे हा मोठा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला. नशिबाने याच वेळेस मला औरंगाबादहून फ्लेक्सओ फिल्म प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत मुलाखतीसाठी बोलावणे आले. ही मुलाखत अतिशय चांगल्या प्रकारे पार पडून मला तेथे जनरल मॅनेजर म्हणून नोकरी मिळाली.

Futuristic Tapes मध्ये झालेला माझा अपमान जिव्हारी लागलेला होता. मी काही चुकीचं न करता काही चुगली करणाऱ्या लोकांच्यामुळे कुमार साहेबांनी मला काढून टाकले होते. ही चूक बऱ्याच वर्षांनंतर त्यांच्या लक्षात आली. आम्ही एकदा भेटलो असता त्यांनी स्वतः ही मान्य केली. त्यांनी मला सांगितले की, ''माझी आणि त्यांची जन्म कुंडली जुळत नसल्यामुळे आम्हाला काही अडचणी येत होत्या व Futuristic Tapes त्या अडचणींवर मात करण्यासाठी त्यांनी मला काढून टाकले होते.'' माझा विश्वास या गोष्टीवर अजूनही बसणं अशक्य.

**Flexo Films Pvt. Ltd. aurangabad**

फ्लेक्सो फिल्म्समध्ये सुरुवातीचा काळ माझा खूपच चांगला गेला. आमचे डायरेक्टर होते, श्री. कुणालबाबूतीरांनी. त्यांच्या वडिलांची आणि माझी जुनी ओळख किंवा थोडीफार दोस्ती होती असे म्हणता येईल. इथे आम्ही कोटिंगसाठीचे मशीन दिल्लीहून श्री. रामलाल यांच्याकडून बनवून घ्यायचे ठरवले होते. त्याप्रमाणे त्याने ते मशीन बनवून सगळे स्पेअर पार्टस् ३ ते ४ लॉरी मधून औरंगाबाद येथे पाठवले. ते दिल्लीचे मशीन होते त्याची किंमत होती फक्त ११ लाख रुपये. ही २००४ सालची गोष्टं आहे. या किमतीत बसवण्यासाठी त्यांनी काही जुने आय बीम किंवा चॅनेल वापरून मशीन बनवलेले होते. ते मशीन उतरून आत घेत असताना काही तोडफोड झाल्यामुळे ते जुने पार्ट उघडे पडले आणि कुणाल साहेबांना असे वाटले की मी पैसे खाऊन हे मशीन विकत घेतले आहे. मुळात हे असे अजिबात नव्हते. मी माझ्या पदरचे पैसे खर्च करून ते मशीन नंतर व्यवस्थित बसवून घेतले. ते मशीन चालू सुद्धा केले, पण त्यांच्या मनात एकदा आलेले परत काढता येणे अशक्य होते. मला फार काळ येथे नोकरी करता येणार नाही असे वाटत असतानाच मी एकदा पुण्याला आलो असताना मला अचानकपणे शारजाहहून श्री. दर्शन मेहता यांचा फोन आला. त्यांनी त्यांच्या कंपनीमध्ये 'जनरल मॅनेजर म्हणून येशील का?' अशी विचारणा केली. माझा इंटरव्ह्यू मग त्यांनी फोनवरती घेतला. माझा बायोडेटा मी त्यांना ई-मेलने पाठवला. त्यांनी मला कंपनीचे अपॉईंटमेंट लेटर इमेलवर पाठवून दिले, पण आपले नशीब खोटे असले की किती अडचणी येतील ते सांगता येत नाही. मला अपॉईंटमेंट लेटर तर मिळाली परंतु, शारजाहचा व्हिसा आला नव्हता. काही दिवस गेले व यूएईचे राजे शेख झायाद यांचा मृत्यू झाला आणि जवळपास एक महिना सर्व शासकीय कामकाज बंद करण्यात आले. त्यामुळे माझा व्हिसा येईस्तोवर जवळपास दोन महिने विलंब झाला. व्हिसा आल्यावर मी शारजाहला गेलो आणि नवीन कंपनीत मी जनरल मॅनेजर म्हणून रुजू झालो.

**Euro Golf Adhesives and Packaging LLC, Sharjah**

युरो गर्ल्समध्ये रुजू झाल्यावर सुरुवातीचे  दोन महिने मी त्यांच्या दुबईच्या ऑफिसमध्ये बसून काम करत होतो. माझे कामाचे स्वरूप होते ते  सर्व प्रॉडक्टचे कॉस्ट शीट बनवणे. आमचे मालक म्हणजेच श्री. दर्शन मेहता यांना एकंदर कॉस्टिंगबद्दल मनात शंका होती  आणि ती रास्त होती. हे मी जवळपास पंचवीस प्रॉडक्टचे कॉस्ट शीट बनवले तो रिपोर्ट मेहतासाहेबांना दिल्यावर उघड झाले. ते कॉस्ट शीट बघितल्यावर त्यांना धक्का बसला. रॉ मटेरियल कॉस्टपेक्षा कमी किमतीने विकले जात होते. यास कारणीभूत होता माझा जॉन्सन अँड जॉन्सनमधील एक सहकारी त्याचे नाव मुद्दाम मी आता नमूद करणार नाही. त्यांनी यामध्ये बरेच बेकायदेशीर व्यवहार करून स्वतःसाठी बरीच माया जमा केली होती. हे सगळे सिद्ध केल्यावर माझ्या साहेबांनी कंपनीमध्ये जाऊन मला संपूर्ण काम हाती घेणेची विनंती केली. त्याप्रमाणे मी रोज कंपनीत जाऊन तिथे काम पाहू लागलो. माझ्यासाठी ही एक विलक्षण मोठ्या आनंदाची गोष्ट होती. कारण, तिथे कुठलेही प्रॉडक्ट खूप मोठ्या क्वांटिटीमध्ये मध्ये म्हणजे कंटेनर लोड मध्ये आम्ही विकत असू किंवा विकत घेत असू. माझे तिथे बरेच सहकारी होते. माझा खरा सहकारी होता तो म्हणजे श्री. प्रकाश पटघर. या कंपनीने मला शारजाहमध्येच राहण्यासाठी एक भाडेतत्त्वावर फ्लॅट  घेऊन दिला. मी एकटाच राहात असल्यामुळे, प्रकाशलासुद्धा माझ्या बरोबर राहायला परवानगी दिली. मग आम्ही दोघे मिळून, परंतु बहुतेक वेळा प्रकाश आमच्या जेवणाखाण्याची व्यवस्था म्हणजे नाश्ता दुपारचे आणि रात्रीचे जेवण असे एकत्र करत असू.  काही काळानंतर प्रकाशचे लग्न ठरले. लग्नानंतर त्याची बायको म्हणजे सुमनसुद्धा शारजाह येथे राहण्यास आली. एका बेडरूममध्ये ते दोघे दुसऱ्या बेडरूममध्ये मी आणि कॉमन रूममध्ये आमचा टीव्ही वगैरे असे आम्ही एकत्र कुटुंबाप्रमाणे राहू लागलो. येथे मी साधारणपणे दीड वर्षे काम केले.

युरो गर्ल्स येथील कामामुळे व मी जनरल मॅनेजर असल्यामुळे

मला गल्फ रिजन मधील बऱ्याच मोठ्या कस्टमरची ओळख झाली. जसे की, बहरीन, सौदी, ओमान, कतार, इजिप्त, तुर्की वगैरे.

अशा बऱ्याच मोठ्या कस्टमरची माझी ओळख झाली व एकंदरीत इम्पोर्ट एक्सपोर्टच्या बाबतीत मला अतिशय चांगले ट्रेनिंग मिळाले असे म्हणायला हरकत नाही. या नोकरीमुळे माझी विस्कटलेली आर्थिक परिस्थिती खूपच चांगल्या प्रमाणात सुधारली गेली. आम्हाला एकंदरीतच बरे दिवस दिसू लागले.

युएई किंवा गल्फमध्ये कुठे काम करताना एक खास असा नियम आहे. एक कंपनी आपण सोडली आणि त्यात देशांमध्ये दुसऱ्या कंपनीत जर आपल्याला नोकरी करायची असेल तर पहिल्या कंपनीतला NOC मिळवावी लागते. कुठलाही मालक सहसा NOC देत नाही. त्यामुळे नोकरी सोडून गेलं की एक वर्षाचा किंवा सहा महिने कमीत कमी BAN लावला जातो. तो तसा लागू नये म्हणून मी सेफ झोनच्या ऑफिसमध्ये जाऊन मला असा कुठलाही प्रकारचा बॅन लागू नये याची मी परवानगी घेतली होती. तरीसुद्धा या मालकांनी माझ्या नावाने खोट्या VISIT VISA टाकून मला UAE मध्ये येण्यास सहा महिने मज्जाव केला होता.

**Focus Air Conditioning LLC Dubai**

शारजाहची नोकरी सोडून मी भारतात म्हणजे पुण्यात परत आलो. जवळपास सहा महिने इथे राहून नंतर FOCUS AIR CONDITIONING LLC या दुबईतील कंपनीत जनरल मॅनेजर म्हणून रुजू झालो. या कंपनीकडे काही अनुभव विलक्षण होते. या कंपनीमध्ये भारतातल्या गोरेगावमधील एका मशीन मॅन्युफॅक्चररने अतिशय कामचलाऊ असे मशीन सप्लाय केले होते आणि त्याच्यामध्ये कुठलीही चांगली टेप बनविणे हे जवळपास अशक्य होते. मी, माझे मालक श्री. अमिरुद्दिन ठाणावाला व बरकत ठाणावाला यांना तसे सांगितले व ते मशीन आपल्याला ताबडतोब आपल्या पद्धतीने आपल्याला हवे तसे बनवून घ्यावे लागेल असे सांगितले. त्यासाठी आम्ही चेन्नई येथील

हिरो मशीनचे राजकुमार गुप्ता यांना या मशीनचे मॉडिफिकेशनचे काम सुपूर्द केले. त्यानिमित्त मला चेन्नईला वरचेवर यावे लागत असे. दोन महिन्यांमध्ये आम्ही हे काम पूर्ण करून आमचे मशीन चालू केले. यासाठी मी वॉटर बेस टेक्नॉलॉजी डेव्हलप केली आणि ती अतिशय प्रभावीपणे आम्ही कार्यान्वित केली.

या मशीनचे मॉडिफिकेशन ते काम चालू असताना एक दिवशी आमचे मार्केटिंग मॅनेजर कंपनीमध्ये आले व मला म्हणाले की, ''MD साहेब ने कह है आप जैसा है वैसा मशीन चालू कर के प्रॉडक्शन चालू करो।'' मी त्याला स्पष्टपणे नकार दिला आणि हे मशीन मॉडिफिकेशन झाल्याशिवाय चालू करणे अशक्य असे सांगितले. त्यांनी मला सांगितले, ''काही करा, आपण प्रोडक्शन चालू करा.'' मी म्हटले, ''ते शक्य नाहीये, पण मी एक काम करतो मशीन चालू करतो व कंपनीबाहेर, खुर्ची टाकून बसतो, मग टेप जशी बनेल, याची सर्व जबाबदारी तुमची राहील. तुम्ही आणि साहेब येथे येऊन मशीन व्यवस्थित चालावा व संपूर्ण जबाबदारी घ्या व काही बिघाड झाला किंवा आग वगैरे लागली तर तुम्ही ते निस्तरा.''

यानंतर मात्र तो परत आला नाही व मशीन तयार झाल्यावर आमचे टेप उत्कृष्ट बनले हे असे करण्यामागे एक कारण म्हणजे युएई मध्ये कुठल्याही प्रकारचा अपघात कंपनीमध्ये झाला की, त्या कंपनीच्या मॅनेजरला आधी पोलीस अटक करतात. त्याला तुरुंगात टाकतात. मग चौकशीला सुरुवात होते. या चौकशीत जर मॅनेजर निर्दोष आढळला तर त्याची सुटका होते. मला कुठल्याही परिस्थितीत असे काही होऊ द्यायचे नव्हते म्हणून मी मशीन चालू करण्यास नकार दिला होता.

येथे जॉईन झाल्यावर सुरुवातीला थोडेफार काम असे. त्यामुळे माझ्या डोक्यात विचार आला की, आपण आता युएईफचं ड्रायव्हिंग लायसन्स मिळवलं पाहिजे. त्यासाठी मी तिथल्या ड्रायव्हिंग स्कूलमध्ये नाव नोंदवून दर दिवशी २ क्लास लावून एका महिन्यात मला युएईफचं ड्रायव्हिंग लायसन्स मिळालं. माझ्या दृष्टीने ती एक मोठी गोष्ट होती.

कारण युएईमध्ये तुमच्या क्वालिफिकेशनबरोबरच तुमच्याबरोबर जर ड्रायव्हिंग लायसन्स असेल तर त्याला प्रचंड किंमत आहे. मला स्वतःला गाडी चालवायचा शौक किंवा हौस नव्हती. मी माझ्या मालकाला सांगितले, ''काही अडीअडचणीच्या दिवशी लायसन्स असावा म्हणून मी घेतला आहे, पण मला कंपनीने गाडी देण्याची गरज नाहीये. मला रोज सकाळी व संध्याकाळी ड्रायव्हरने पिकअप व ड्रॉप करावे या पलीकडे मला गाडी काही लागत नाही. त्यामुळे माझ्यासाठी, गाडी विकत घेण्याची गरज नाहीये.'' त्याप्रमाणे मी रोज सकाळी-संध्याकाळ माझा ड्रायव्हरची वाट पाहात असे. माझ्या ड्रायव्हरचे नाव होते जलील. तो एक पाकिस्तानी होता, पण अतिशय चांगला माणूस होता. मला खूप मान देत असे. संध्याकाळी घरी आल्यावर मी संध्याकाळचे जेवण दुसऱ्या दिवशीचा नाश्ता आणि दुसऱ्या दिवशीचा डबा याची सगळी व्यवस्था करत असे. आम्हाला शुक्रवारी साप्ताहिक सुट्टी असे, त्यामुळे दर गुरुवारी संध्याकाळी मी घरचे सगळे कामे करीत असे. सुरुवातीला काही शुक्रवारी ३ ते ४ आठवडे मी बाहेर कुठे ना कुठे जात असे, पण नंतर माझ्या लक्षात आले की, एकदा का आपण बाहेर पडलो की प्रत्येक शुक्रवारी माझे १५० ते २०० दिराम खर्च होत असे. तेव्हा १ डिरहॅम म्हणजे जवळपास, साडेबारा रुपये होते (आता १ डिरहॅम म्हणजे १९ ते २० रुपये झाले आहेत.), म्हणजेच १८०० ते २५०० रुपये, दर शुक्रवारी आणि हे माझ्या हिशोबाने खूप खर्चीक होते. म्हणून नंतर मी शुक्रवारी बाहेर जाणे बंद केले. मी सकाळी किंवा दुपारी किंवा संध्याकाळी एखादा सिनेमा माझ्या घरच्या टीव्हीवर बघत असे. मी बऱ्याच सीडी पुण्याहून व दुबईतही विकत घेतल्या होत्या. माझ्या आवडीचा सिनेमा बघत असे. बाकी सर्व कामे मी घरी करत असे. स्वयंपाक-पाणी, घर सफाई, कपडे धुणे, इस्त्रीसाठी फक्त मी कपडे बाहेर देत असे. संध्याकाळी न चुकता मी आमच्या घराजवळील खाडीवर फिरावयास जात असे. बऱ्याच वेळा या एकटे राहण्याचा मला कंटाळासुद्धा येत असे. बऱ्याच वेळा असे वाटे की नको ते पैसे,

नको ती सर्व सुखे, आपण आपल्या माणसात परत जावे, परंतु दोन्ही मुलींचे शिक्षण त्यांचे पुढचे लग्नकार्य वगैरे यासाठी आपल्याला पैसे साठविणे गरजेचे आहे, या गरजेपोटी मी युएईमध्ये साडेचार वर्षे नोकरी केली आणि ज्या वेळेस माझी खात्री पटली की, आता दोन्ही मुलींचे सर्वकाही करण्यासाठी आपल्याकडे पुरेसा पैसा साठला आहे, त्या दिवशी मी अमीर साहेबांना भेटून भारतात परत जायची विनंती केली।. हा काळ होता साधारण २००८ डिसेंबर केली.

**Montex Fiber Glass Pvt. Ltd, Nashik**

मॉन्टेक्स फायबरग्लास नाशिक येथे मी जून २००८ पासून २००९ अखेरपर्यंत पूर्णवेळ आधारावर मुख्य तांत्रिक सल्लागार म्हणून काम केले. मी फोकस एअर कंडिशनिंगमध्ये काम करत असताना आशिष कौशिक यांनी २००८ मध्ये ते दुबईमध्ये मुक्काम केलेला असताना मला भेटण्याची विनंती केली. आम्ही हॉटेलमध्ये भेटलो आणि ही खरोखर चांगली भेट होती.

श्री. आशिष यांना FSK लॅमिनेट्स तयार करण्यासाठी चीनमध्ये असलेल्या मशीनच्या निर्मात्या शोधून काढायची इच्छा होती. मी चीनमध्ये अशा मशीन निर्मात्यास शोधून काढण्यात यशस्वी झालो. नंतर मी स्वत: व आशिष चीनला गेलो आणि या निर्मात्यास भेटलो. आम्ही त्याला २ मशीनची ऑर्डर दिली. सुमारे ४ महिन्यानंतर पुन्हा मशीनची चाचण्या घेण्यासाठी भेट दिली व नंतर मशीन मॉन्टेक्स नासिक प्लँटमध्ये यशस्वीरित्या स्थापित केले.

आशिष यांच्या दूरध्वनीवरून आलेल्या टिप्पण्या मला अजूनही आठवतात, जेव्हा मी त्यांना फोन केला आणि मला कळवले की, मी चीनमधील मशीन निर्माता शोधला आहे. त्यांच्या शब्दात ते म्हणाले, ‘‘श्रीकांत, तू आमच्यासाठी एक जॅकपॉट जिंकला आहेस.’’

त्यानंतर आम्ही एका बहुउद्देशीय अॅडेसिव कोटिंग मशीन आणि हॉट मेल्ट कोटिंग मशीनसाठी चेन्नईच्या हीरो मशीन्स प्रायव्हेट लिमिटेडचे श्री. राजकुमार गुप्ता यांच्यासमवेत खरेदी ऑर्डर दिली. सॉल्व्हेंट आणि

वॉटर बेस कोटिंग मशीनमध्ये ५ भिन्न प्रकारच्या कोटिंग पद्धती होत्या. संपूर्ण मशीन वैशिष्ट्यांसह सुसज्ज होते. या मशीनचे संपूर्ण इंजिनिअरिंग ड्रॉईंग मी २००८ मध्ये तयार केले होते. आम्हाला हे मशीन फक्त २८ लाखात पडले होते. अशाच प्रकारच्या अष्टपैलू मशीन आम्हाला कोणत्याही इतर भारतीय मशीन निर्मात्याकडून ५० लाखांपेक्षा कमी किंमतीत मिळाली नसते. चीनच्या कोणत्याही मशीन निर्मात्याकडून १ कोटी किंवा युरोपीयन मशीन निर्मात्याकडून सुमारे १० कोटी रुपये अशी या मशीनची किंमत असावी.

तथापि, या मशीनमध्ये काही कमतरता होत्या, मी मशीन बनवणारे गुप्ता, यांना वारंवार आठवण करून देऊनसुद्धा त्यांनी मशीनच्या रोलरचे बॅलन्सिंग केले नव्हते. शेवटी माझे काम उत्तम प्रकारे करूनही, कोटिंग मधील असमतेमुळे काही समस्या उद्भवल्या आणि यामुळे मी आणि आशिष यांच्यात गैरसमज निर्माण झाला.

या प्रकल्पातील माझ्यासाठी आणखी एक यश म्हणजे MS एक्सेलमध्ये या ॲडेसिव्ह टेप प्लँटचा संपूर्ण प्रकल्प अहवाल तयार केला होता. टेप आणि इतर उत्पादनांच्या जवळपास ४० प्रकारच्या उत्पादनांच्या मिश्रित उत्पादनासाठी सुमारे ४५ पृष्ठांसह हा एक अतिशय व्यापक प्रकल्प अहवाल होता. मला आमच्या सीएला व बाह्य सीएला देखील, हा समजायला किमान ५ ते ६ वेळा मिटींग घ्याव्या लागल्या. शेवटी त्यांनी तो आमच्या स्टेट बँक ऑफ इंडियाला सादर केला. २००८ मध्ये संपूर्ण प्रकल्पाची किंमत ३.५ कोटी इतकी होती. मला हे सांगण्यात आनंद होतो की, SBI ने केवळ ३ ते ४ आठवड्यात याला मंजुरी दिली.

माझ्यासाठी येथे आणखी एक मोठी उपलब्धी होती, ती म्हणजे मी उत्पादन, गुणवत्ता नियंत्रण आणि विपणन विभागासाठी संपूर्ण आयएसओ मॅन्युअल तयार करू शकलो. मी ISO व त्या शिवाय इतर अनेक कागदपत्रे तयार करू शकतो जसे की, प्रॉडक्ट टीडीएस, सर्वांसाठी एमएसडीएस.

या सर्व चांगल्या घडामोडी घडत असताना एके दिवशी शॉप फ्लॉओरवर कोटिंग ट्रायल चालू असताना आशिष, माझ्या एका वरिष्ठ ऑपरेटरशी असभ्य भाषेत बोलले. ते म्हणाले, ''आज तुम्हाला एक दर्जेदार उत्पादन तयार करता आले नाही, तर मी तुम्हाला माझे बूट दाखवीन.'' मला ही भाषा अजिबात आवडली नाही मी श्री. आशिष यांना विनंती केली की, ''आपण तुमच्या केबिनमध्ये जाऊ व या विषयी चर्चा करू.'' आम्ही त्यांच्या केबिनमध्ये गेलो. मी नम्रपणे श्री. आशिष याना सांगितले की, ''आपल्या कामगारांशी बोलताना अशा प्रकारची अपमानास्पद भाषा कधीही वापरू नका.'' श्री. आशिष माझ्या सूचनेस सहमत झाले नाहीत. उलट ते म्हणाले की, ''मी या कारखान्याचा मालक आहे आणि मला जे हवे ते मी बोलू शकतो.'' त्यांच्या या भूमिकेला मी कडाडून आक्षेप घेतला आणि त्यांना सांगितले की, ''त्यांनी माझ्याबरोबर शॉप फ्लोअरला यावे आणि सर्व कामगारांची माफी मागावी.'' ते यावर सहमत झाले नाहीत व त्यांनी आपली भूमिका कायम राखली. मी त्याला सांगितले की, त्यांनी कामगारांचा मान ठेवला नाही तर त्याच्याबरोबर काम करणे मला खूप कठीण जाईल. ते म्हणाले, ''तुम्ही निर्णय घेण्यास मोकळे आहात.'' माझी प्रतिक्रिया अगदी सोपी होती. मी त्याला सांगितले की, ''या परिस्थितीत मी तुझी नोकरी लगेच सोडत आहे.'' मी माझ्या केबिनमध्ये गेलो. माझा लॅपटॉप व इतर सर्व सामान उचलून ताबडतोब कारखाना सोडला. खरं तर, मला नाशिकमध्ये स्थायिक होण्याची आणि माझ्या कारकीर्दीच्या शेवटच्या दिवसापर्यंत या कंपनीत काम करण्याची कल्पना होती. म्हणूनच मी इंदिरानगर, नाशिक येथे नवीन फ्लॅट घेतला होता आणि मी माझ्यासाठी पूर्ण घर सजविले होते. तथापि, नशिबात आणखी काही कल्पना होती. नंतर मी पुण्याला परत आलो आणि माझा नाशिकचा फ्लॅट विकून टाकला.

**प्रथित कन्सल्टंटस्, पुणे**

मी डिसेंबर २००९ मध्ये पुण्याला परत आलो आणि नंतर मी माझ्या स्वतःची सल्लागार कंपनी प्रथित कन्सल्टन्सेस जाने २०१० मध्ये

सुरू केली. आता मी पूर्णपणे माझ्या स्वत: चा मालक होतो. मी भूगाव येथे स्वत:ची प्रयोगशाळा आणि अगदी अनुसंधान व विकास केंद्र स्थापित करू शकलो. मी त्यासाठी भूगाव येथे नवीन फ्लॅट घेतला. लेटेक्स बेस प्रेशर सेन्सिटिव्ह ॲडेसिव्ह, लेटेक्स बेस वॉटर प्रुफ कोटिंग आणि इतर अशा काही नवीन प्रोडक्टस्‌वर काम करण्यास सुरुवात केली. २०११ च्या दरम्यान मी त्यासाठी भारतीय पेटंट दाखल केला. सॉल्व्हंट बेस टेक्नॉलॉजीला वॉटर बेसमध्ये बदलण्यासाठी हे माझे चांगले योगदान ठरणार आहे.

या काळात मी माझ्यासाठी २५ हून अधिक नवीन ग्राहक विकसित केले. खरोखर माझी ही सर्वोत्कृष्ट कामगिरी ठरावी. मी या कालावधीत माझ्यासाठी दोन प्रमुख लिमिटेड कंपन्यासाठी सल्लागार म्हणून करार केले. एक हॅरिसन मल्ल्याळम कोचीन, केरळ आणि दुसरे ICHEMCO, इटली.

या कालावधीत, मी मुंबई येथील ICHEMCO इटलीच्या डॉ. अघिन यांना भेटलो. मिटींग खरोखरच चांगली झाली. आम्ही सखोल चर्चा केली. डॉ. अघिन यांनी सर्वप्रथम मला ICHEMCO तयार करत असलेल्या उत्पादनांबद्दल माहिती दिली आणि भारतात त्यांचा व्यवसाय विकसित करण्यासाठी कोणासतरी त्यांची कंपनी प्रतिनिधी म्हणून नेमण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी मला ॲडेसिव्ह उद्योगातील माझ्या अनुभवाबद्दल विचारले. मी त्याला ICHEMCO प्रॉडक्टस्‌बद्दल खूप काही सांगू शकलो. त्यांना सांगितले की, मी हायटेक टेप्स प्रा.लि. मध्ये रुजू झाल्यापासून १९८७ पासून तुमची उत्पादने वापरत आहे. PSS तसेच EGPA शारजाह आणि फोकस एअर कंडिशन दुबईमध्ये, सुद्धा मी आपली प्रॉडक्टस् मी वापरली आहेत. आमच्या चर्चेनंतर डॉ. अघिन खूप प्रभावित झाले आणि त्यांनी जाहीर केले की, लवकरच मला भारतात इच्छेमकोचे एजंट म्हणून नेमले जाईल. लवकरच मला नियुक्ती पत्रही मिळाले.

हे दोन्ही कन्सल्टन्सी कॉन्ट्रॅक्टस् म्हणजे माझ्यासाठी अतिशय

समाधानी व अर्थपूर्ण होते. ICHEMCO ला भारतात स्थापित करण्यासाठी खरोखर मी खूप प्रयत्न केले. अनेक पटांनी Ichemco चा व्यवसाय विकसित करण्यात मला बऱ्यापैकी यश मिळाले, परंतु मी घेत असलेल्या परिश्रमाचे चीज HML मध्ये  म्हणावे तितके यश देऊ शकले नाही. याची दोन वेगळी कारणे होती, भारतीय टेप उद्योगासाठी वॉटर बेस पूर्णपणे नवीन तंत्रज्ञान होते व  हे भविष्यातील तंत्रज्ञान असणार आहे, हे भारतीय टेप उत्पादकांना पटवून देणे खरोखर कठीण होते.

दुसरे म्हणजे, HML GYrb MARKETING फारच गचाळ होते, त्यांना फक्त बाजारपेठेत प्रवेश करणे शक्य झाले नाही किंवा त्यांनी हवा तेवढा प्रचार केला नाही. तथापि, आता हे तंत्रज्ञान हळूहळू एक पर्याय म्हणून मानले जात आहे आणि बरेच टेप उत्पादकांनी ते अवलंबले आहे.

२००८  ते २०११ या काळात माझ्यासाठी आणखी एक कामगिरी अशी होती की माझी SIES स्कूल ऑफ पॅकेजिंगमध्ये व्हिजिटिंग फॅकल्टी म्हणून नेमणूक झाली आणि मी ४ वर्षे, प्रत्येक वर्षी अंदाजे ४८ व्याख्याने देऊ शकलो. माझा सर्वांत मोठा उपक्रम होता २०१३ मध्ये.

२०१३ आणि २०१५ चे दरम्यान मी ५ तांत्रिक पुस्तके लिहून प्रकाशित करू शकलो. माझ्या सर्व तांत्रिक पुस्तकांना आयएसबीएन कोड आहे.

माझी आई लीला आठवले, ९ मे २०१३ रोजी बाथरूममध्ये घसरून पडली आणि तिच्या डाव्या हिप जॉईंटमध्ये अनेक फ्रॅक्चर झाली. त्याच दिवशी दुपारी तिला रुग्णालयात दाखल करावे लागले. दुसऱ्या दिवशी तिचे ऑपरेशन करावे लागले. डॉक्टरांनी मला सांगितले की तिला कमीतकमी ६ महिने पूर्ण बेड विश्रांती घ्यावी लागेल. सुरुवातीला प्रथिताला बँकेतून जवळपास एक महिना रजा मिळाली. नंतर तिला बँकेत जावे लागले. आईची काळजी घेण्यासाठी मी एकमेव

व्यक्ती उपलब्ध होतो. आईची काळजी घेण्यासाठी आम्ही रात्रंदिवस २ नर्स नेमल्या. दिवसभर मला घरीच राहायचे होते. मी फक्त बँकेच्या सुट्टीच्या दिवशी बाहेर जाऊ शकत असे. सुरुवातीला थोडे दिवस मला हे सहन करावे लागले, परंतु नंतर मला काहीही न करता घरीच राहणे खूप अवघड वाटले. काही दिवसांनी, जून महिन्याच्या प्रारंभी, पहाटे, मला प्रेशर सेन्सिटिव्ह ॲडेसिव्ह टेप्सवर टेक्निकल बुक लिहिण्यासाठी जबरदस्तीने घरी मुक्काम ही एक आदर्श परिस्थिती म्हणून वापरण्याची कल्पना आली.

माझ्याकडे युएई येथे असल्यापासूनच्या काळातील अनेक लेख, तांत्रिक माहिती जपून ठेवलेली होती. मी युएईमध्ये काम करत असताना थोडा मोकळा वेळ मिळाला की तांत्रिक लेख लिहीत असे.

तर टेक्निकल बुक लिहिण्याचा प्रवास अशा मार्गाने सुरू झाला. पुढच्या एका बँकेच्या सुट्टी दिवशी मी गोंदवलेला भेट दिली. गोंदवलेकर महाराजांचा आशीर्वाद घेण्याचा उद्देश होता. मी माझ्याबरोबर पेन ड्राईव्हमध्ये जतन केलेली माझ्या तांत्रिक माहिती होती. मी दर्शनसाठीच्या रांगेत मुद्दाम शेवटी थांबलो होतो, हेतुपुरस्सर. गोंदवलेकर महाराजांच्या पादुकाला स्पर्श करून पुजारीजींनी आशीर्वाद घ्यावा अशी विनंती मी केली. पुजारीजी खूप सहकारी होते. त्यांनी आवश्यक ते केले आणि मला सांगितले की महाराजांनी आशीर्वाद दिला आहे, तुमचा उपक्रम यशस्वी होईल. पुढे जाऊन माझे पुस्तक लिहू शकता. मी खूप समाधानाने परतलो. माझा संपूर्ण वेळ या महान कार्यात मी गुंतवून टाकला. अखेरीस ३१ जुलै २०१३ रोजी माझ्या वडिलांच्या ३५ व्या पुण्यतिथी रोजी मी माझे छापील पुस्तक व सीडी काकांच्या स्मृतीला अर्पण करू शकलो. ३१ जुलै २०१३ रोजी आमच्या घरी हा संक्षिप्त कार्यक्रम केला तेव्हा रुपाली आणि मिलिंद बोडस सुदैवाने हजर होते.

अलीकडे म्हणजे २०१९ साली मला EBRD बँक (लंडन येथे मुख्यालय असलेल्या ईबीआरडीने (युरोपियन बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन

अँड डेव्हलपमेंट) ने सल्लागार म्हणून नेमले. माझ्या कारकिर्दीतील ही सर्वोत्तम कामगिरी ठरावी.

मला युक्रेनमध्ये २ प्रकल्प देण्यात आले. एक कीव येथे आणि दुसरा खारको येथे. मी दोन्ही असाइनमेंट्स २०१८ मध्ये पूर्ण करू शकलो. गेल्या वर्षी मला ओडिशा येथे युक्रेनमधील आणखी एका कंपनीकडून दुसरी असाइनमेंट मिळाली. हा प्रकल्प अद्याप पूर्ण झाला नाही आणि तो चालू आहे.

मला पुणे येथील पीव्हीजीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात लेक्चर देण्याची खूप इच्छा होती. मी जवळपास २ वर्षे यासाठी त्यांना भेटत होतो. २०१९ साली मला त्यांच्या मुद्रण विभागासाठी दत्तक प्राध्यापक म्हणून नियुक्त केले आणि आता मी शेवटच्या वर्षासाठी मुद्रण विभागाच्या बीई प्रिंटींगच्या विद्यार्थ्यांना लेक्चर देतो. पुणे विद्यापीठाची स्वायत्त संस्था राहिलेल्या महाविद्यालयाने माझी ३ तांत्रिक पुस्तके टेक्स्ट बुक्स म्हणून या कोर्स साठी 'ॲडेसिव्हस् फॉर पॅकेजिंग' निवडली आहेत.

माझ्यासाठी आणखी एक अलीकडील उपलब्धी म्हणजे NSDC (नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन), भारत सरकार, दिल्ली यांच्याकडून आमच्या कान्व्हर्टिंग इंडस्ट्री Operator कौशल्य विकासाच्या अभिनव प्रशिक्षण कार्यक्रमास मान्यता मिळविली आहे. हा कार्यक्रम सेंटर ऑफ एक्सलन्स, अजित इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, दि व मी संयुक्तपणे आयोजित करणार आहोत.

■ ■

## १३. मी रबर टेक्नॉलॉजिस्ट का झालो?

याला दोन कारणे असू शकतात. एक म्हणजे भाऊमामा (श्री गणेश पुरुषोत्तम खाडिलकर), रबर टेक्नॉलॉजिस्ट होता. दुसरे कारण म्हणजे, मी इयत्ता ६ वी किंवा ७ वीची परीक्षा झाल्यावर. मी आणि आई कारवारहून बोटीने (सिन्दिया कंपनी, साधारणपणे १९६५-६६ साली), मुंबईला गेलो होतो. तेव्हा भाऊमामा हा ठाण्याला राहात होता. बोट मुंबईला भाऊंच्या धक्क्याला लागायला जवळपास, तास ते दीड तास लागला होता. आम्हाला उतरवून घेण्यास, भाऊमामा, अविमामा व सुरुमामा आले होते. या मुक्कामात एक दिवस भाऊमामा मला, त्याच्या कामाच्या ठिकाणी म्हणजेच, मोडक रबर प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडमध्ये घेऊन गेले होता. तेव्हाही फॅक्टरी मरोळ नाका, अंधेरी, मुंबई येथे होती. संबंध दिवस मी फॅक्टरी पूर्ण पाहू शकलो, संध्याकाळी, घरी (ठाण्याला) परतण्याआधी, मामाच्या एका सहकाऱ्याने मला एक रबरचा, काळ्या रंगाचा एक बॉल मला भेट म्हणून दिला. कदाचित तोच हा क्षण असावा, जेव्हा मला, मोठा झाल्यावर रबर टक्नॉलॉजिस्ट व्हावे असे वाटले असावे. सुट्टी संपून कारवारला परत गेल्यावर माझी अगदी चैन होते. संध्याकाळी शाळा सुटल्यावर, क्रिकेट

खेळताना, बॅट माझी, बॉल माझा, त्यामुळे आमच्या टीमचा कॅप्टन, साहजिकपणे मीच. याचासुद्धा परिणाम असावा.

नंतर १९६६ साली, काकांची बदली, परत धारवाडला झाली. होसयल्लापूरच्या पोस्ट ऑफिसमध्ये, पोस्ट मास्टर म्हणून काका रुजू झाले. येथे पोस्ट ऑफिस व राहण्यासाठी क्वार्टर पहिल्या मजल्यावर होती. आमच्या घराचे मालक श्री. बोगार नावाचे होते. अतिशय प्रेमळ अशी व्यक्ती. मला कर्नाटक हायस्कूलमध्ये ७ वी इयत्तेत प्रवेश मिळाला. १९६९ साली मी मॅट्रिक पास झालो. काकांची पुन्हा एकदा बदली झाली व ते धारवाड हेड पोस्ट ऑफिसला रुजू झाले.

काकांनी पोस्ट ऑफिसला जवळ म्हणून, सप्तपूरला घर भाड्याने घेण्याचे ठरविले. सप्तपूरला मोकाशी नावाच्या बंगल्यामध्ये आम्हाला जागा मिळाली. मला कर्नाटक कॉलेजमध्ये ११ वी (१९६७ -६८) व १२ वी (१९६८ -१९६९) साठी प्रवेश मिळाला.




११ वीत गेल्यावर, गणित, फिजिक्स व केमिस्ट्रीसाठी प्रो. श्री. फडके यांचा क्लास सुरू झाला. सकाळी ७ ते ९ नंतर घरी येऊन नाश्ता/ जेवण व मग कॉलेज असा दिनक्रम सुरू झाला.

मी मॅट्रिक परीक्षा पास झालो. त्याचा वर्षी, माझा सर्वांत धाकटा मामा, श्री. जगदीश खाडिलकर, इंजिनियर झाला. त्याने मोठ्या मनाने त्याची सायकल मला भेट म्हणून सांगलीहून पाठवून दिली. ही भेट

म्हणजे मला एक वरदानच ठरली. मला इतका आनंद झाला की आता मला काकांची सायकल मागायची वेळच आली नाही. माझा क्लास व कॉलेज व्यवस्थित सुरू झाले. परंतु १२ वी ला (PUC II), ला मला खूप कमी मार्क मिळाले. फक्त ४७%. कदाचित मराठी माध्यमातून, इंग्लिश माध्यम असा बदल झाल्यामुळे असावे. मी अक्षरशः ढासळून गेलो होतो. परंतु काकांनी या वेळी खूप आधार दिला.

पुन्हा एकदा आम्ही घर बदलले. मला कॉलेज जवळ असावे म्हणून आम्ही देशपांडे बंगल्यात पुन्हा राहायला गेलो. योगायोगाने, देशपांडे बंगल्यामध्ये, आम्ही पूर्वी राहात असलेली जागा रिकामी होती. आम्हाला त्यांनी लगेच घर देऊ केले. मला कर्नाटक कॉलेजला बी.एस्‌सी. साठी प्रवेश मिळाला.

मी बी.एस्‌सी. फर्स्ट इयरला गेलो (१९६९) व काकांची पुन्हा एकदा प्रमोशनवर दावणगिरी इथे बदली झाली. आम्ही देशपांडे बंगल्यातील घर सोडले. काका व आई दावणगिरीला गेले.

आम्ही देशपांडे बंगल्यात राहात होतो त्याच्या शेजारी, कुलकर्णी यांचे वाडा होता व त्या वाड्यात, श्री. बंडोपंत खाडिलकर (आम्ही सर्व जण त्यांना दादा म्हणायचो), म्हणजेच आईचे चुलतकाका व सौ. सरलाकाकू राहत. या दरम्यान दादा व सरलाकाकू, डोंबिवलीला, त्यांच्या मुलीकडे, म्हणजेच सौ. सुधामावशीकडे राहात होते. दादांना मी त्यांच्या धारवाड येथील घरी राहू का असे विचारल्यावर, मोठ्या मनाने त्यांनी लगेच होकार दिला. मी दादांच्या घरी एकटा राहू लागलो. सकाळी चहा वगैरे घरी करायचो, दुपारी कॉलेज जवळील खानावळीत जेवायचो, रात्री मात्र मी घरी वरण-भात असे काहीसे करू लागलो.

एखादं वर्ष असे काढल्यावर, दादा धारवाडला परत आले. सरलकाकूनंतर काही महिन्यांनी आली. सुधामावशीला बाळ झाले होते. बाळाला घेऊन ती धारवाडला आली. बाळ खूप गोड होते. तिचे

नाव 'कनक' असे ठेवले होते. मी मात्र तिला 'पप्पूशेठ' असे टोपण नाव ठेवले होते व हळूहळू शेजारपाजारी सर्व जण तिला याचा नावाने ओळखू लागले. माझा अभ्यास, कॉलेज छान चालले होते. BSC, फर्स्ट इयरला मला मार्क्सही चांगले मिळाले होते. ६५% च्या जवळ पास होते म्हणजेच मी बऱ्यापैकी सावरलो होते.

दोन-चार दिवस जोडून सुट्टी मिळाली की, दावणगिरीला काका व आईला भेटायला जात असे. धारवाडहून बसने दावणगिरीच्या प्रवासाला साधारणपणे ३-४ तास लागत. काही वेळा ट्रेनने सुद्धा जात असे.

दावणगिरीला काकांना, टेलिग्राफ डिपार्टमेंटच्या स्टाफ quarter मध्ये छान घर मिळाले होते. दावणगिरीचे पोस्ट ऑफिसही खूप मोठे होते, नवीन कोरी इमारत होती.

काकाना एकंदरीत फळे फारच आवडायची. दावणगिरीला केळी खूप छान व स्वत: मिळायची. विशेषतः छोटी, सोनकेळी अतिशय मधुर असत. काका घरी कायम एक घड आणून ठेवीत.

टेलिग्राफच्या कॉम्प्लेक्समध्ये स्टाफची मंडळी, संध्याकाळी ड्युटी नंतर, व्हॉलिबॉल खेळात. मी बरेच वेळा त्यांच्यात मिसळून खेळात असे.

दावणगिरीला जाण्याचे, आणखीन एक आकर्षण म्हणजे हरिहर. जेमतेम २० किलोमीटरवर. हरिहरला सौ. शीला आत्या व तिचे मिस्टर कृष्णा राव राहत. दावणगिरीला गेलो की, हरिहरला एक तरी चक्कर नक्की असायची. शीलाआत्याचा मी लहानपणापासूनच लाडका, नंतर कृष्ण रावचा ही, त्यामुळे दर हरिहर भेटीत, एक सिनेमा व हॉटेलात खाणे हे ठरलेले असे.

■ ■

## १४. मी रबर टेक्नॉलॉजिस्ट झालो नसतो तर कोण झालो असतो?

रबर टेक्नॉलॉजिस्ट झालो नसतो तर कदाचित मी मूव्हर्स अँड पॅकर्समध्ये करिअर कदाचित केली असती का ते मी आता आपल्याला सविस्तरपणे सांगणार आहे,

मी आधी उल्लेख केल्याप्रमाणे काकांच्या जवळजवळ दर तीन वर्षांनी बदल्या होत असल्यामुळे काका शिफ्टिंग करण्याच्या आधी कसे पॅकिंग करत असतात हे मी अतिशय योग्य पद्धतीने पाहून ठेवलेले होते. काकांची पॅकिंग करायची फार छान अशी पद्धत होती. त्यांना अशी कामे करायला आवडत असे. सगळे पॅकिंग झाल्यावर एखाद्या लॉरीवाल्याला भेटून त्याच्या सामानामध्ये आपले सामान कसे बसवता येईल तसे बसवून अगदी कमी खर्चामध्ये शिफ्टींग कसे करणे हे मला काकांनी अगदी लहान वयातच शिकवलेले होते. त्याचा पुढे मला इतका उपयोग झाला की काही बोलायची सोय नाही. काकांच्या निधनानंतर सामान शिफ्टिंग करण्यासाठी मी व दादाकाका साधारणपणे ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात गेलो होतो. आम्ही सगळे सामान पॅक केले आणि मग दादाकाकांनी एक लॉरीमध्ये सिमेंटचे पत्रे भरलेले होते अशा

लॉरीची व्यवस्था केली. या सिमेंटच्या पत्र्याच्या बाजूच्या जागेमध्ये आमचे घरचे सामान अगदी व्यवस्थितपणे बसले. कमी किमतीमध्ये आम्हाला पनवेलपर्यंत आमचे सामान नेता आले. हा मार्ग कोल्हापूरपर्यंत नेहमीसारखाच होता. नंतर मग लॉरी ड्रायव्हरने कराडहून पुढे कोकणातल्या मार्गाने आमची लॉरी पनवेलला आणि आम्ही कोकणमध्ये लॉरी नेली. तिथे सगळे सामान उतरून एका रूममध्ये ठेवले. मग नंतर मी घरी गेलो या सगळ्या कामासाठी मला वाटतं जवळपास दोन दिवस आमचा प्रवास चालू होता. हा काका गेल्यानंतरचा माझा सामान पॅकिंग आणि शिफ्टिंगचा पहिला अनुभव होता. त्याच्यानंतर असे बरेच प्रसंग आले. व्यक्तिगत आमच्या बाबतीत म्हणजे आम्ही पनवेलहून पुण्याला तुंगभद्रा सोसायटीमध्ये थोडेफार सामान शिफ्ट केले. कारण सुरुवातीला तुंगभद्रा येथे मी व माझा एक मित्र गिरीश शास्त्री हे दोघेजण राहात असू. हे सारं १९८८-९८ झाले होते. नंतर पनवेलवरून पुण्याला पूर्णपणे स्थलांतरित व्हायचे ठरल्यावर उर्वरित सगळे सामान आम्ही मी आणि प्रथिताने मारुती व्हॅनमध्ये भरून बरेचसे सामान पुण्याला आणले होते. महत्त्वाचे फर्निचर वगैरे आम्ही पनवेलचे घर ज्यांना विकले त्यांनाच फर्निचरही विकून टाकले होते. त्यामुळे बहुतेक मारुती यांच्या दोन-तीन चक्रामध्ये आमचे सगळे पनवेलहून सामान पुण्यामध्ये श्वेता पार्क येथील टू बीएचके फ्लॅटमध्ये आणता आले. हा अजून एक विलक्षण अनुभव होता. तेव्हा जुना रस्ता होता. नवीन रस्ता एक्सप्रेस वे झालेला नव्हता. रात्री आम्ही ट्रॅफिक जाममध्ये खोपोलीजवळ जवळपास ३ ते ४ तास अडकलो होतो. मध्यरात्री कधीतरी आम्ही पुण्याला पोहोचलो. सकाळी मी ते सामान सगळे आमच्या घरी नेण्याची व्यवस्था केली.

पॅकिंग व शिफ्टिंग या क्षेत्रांमध्ये अतिशय महत्त्वाचा आणि लक्षात राहील असा अनुभव म्हणजे सुरुमामाची पनवेलहून मडगावला बदली झाली आणि त्याचे सामान पॅक करून मडगावला नेणे ही जबाबदारी

मला मिळाली. मी व सागवेकर आम्ही दोघांनी मिळून पनवेलमध्ये सगळे सामान पॅक केले. सुरुमामाचं एक कॉन्ट्रॅक्टर गांधी यांच्या ओळखीने आम्हाला एक लॉरी मिळाली. सर्व सामान चढवले व निघताना मी कमीत कमी दोन- तीन वेळा खात्री करून घेतली की गोवा स्टेटचे परमिट मिळाले आहे की नाही? लॉरी ड्रायव्हरने मला खात्री दिली की परमिट मिळाले आहे. आपण काही काळजी करू नका आणि मी निवांतपणे बसून महाराष्ट्राची बॉर्डर महाराष्ट्र आणि गोव्याची बॉर्डर म्हणजे बांदा फाटापर्यंत सुखरूप पोहोचलो. तेव्हा सकाळ झालेली होती. ड्रायव्हरने आपली गाडी बाजूला लावली. म्हटलं काय झालं? तो म्हणाला, ''परमिट अजून माझ्याकडे आले नाही.'' म्हटलं, ''मी येताना तुला तीन-चार वेळा विचारलं तू खात्री दिलीस त्याचं काय झालं?'' तो म्हणाला, ''तुम्ही काही करू नका. मी ऑफिसमध्ये जाऊन चौकशी करतो.'' एक तास-दोन तासाने तो परत आला आणि म्हणाला, ''परमिट काही मिळत नाहीये.'' मी म्हटले, ''आता काय करायचे. तो म्हणाला, मी पलीकडे गोवा हद्दीत जातो एखादी दुसरी लॉरी मिळते का बघतो, आणि मिळाली तर घेऊन येतो.'' ''आम्ही मग काय करायचं?'' तर तो म्हणाला, ''तुम्ही आता येथेच आराम करा.'' नशिबाने तिथे बऱ्यापैकी झाडी होती लॉरी रस्त्याच्या कडेला लावलेली होती. मी आणि सागवेकर वाट बघत आपल्या झाडाखाली बसलो होतो. नशिबाने बांदा फाट्याजवळ काही ऑफिस वगैरे असल्यामुळे आम्हाला चहा आणि नाश्ता वगैरे काही थोडाफार मिळू शकले. सबंध दिवस वाट पाहिली आणि संध्याकाळी ड्रायव्हर दुसरी एक गोव्याची लॉरी घेऊन आला. त्याने आमचं सामान असलेल्या लॉरीला पाठीमागून अशी जोडून लावली. मी म्हटले, ''आता सामान एका गाडीतून दुसऱ्या गाडीत कसे नेणार?'' तो म्हणाला, ''मला माणसं काही मिळाली नाहीत. आता तुम्हालाच बघायला लागेल.'' शेवटी नाइलाजाने मी आणि सागवेकर दोघांनीच पूर्ण सामान

दुसऱ्या लॉरीमध्ये ट्रान्सफर केले. हे सगळे घडत बऱ्यापैकी संध्याकाळ झाली होती. एकदाचे आम्ही बांदा फाट्याहून मडगावच्या दिशेने निघालो. मडगावला आम्ही त्या दिवशी रात्री साडेआठ वाजता पोहोचलो. आम्हा दोघांनाही प्रचंड भूक लागली होती. दुपारपासून आम्हाला खायला काही मिळालेले नव्हते. मामा वडगावला पोहोचलेला होता. त्याला म्हटले, ''लॉरी आलेली आहे. आता मी आणि सागवेकर गावात जाऊन आम्हाला खायला काय मिळते का बघतो.'' तर मामा म्हणाला, ''वाट बघा. तो म्हणाला, गोव्यातली हॉटेल सात साडेसातला बंद होतात. तुम्हाला आता काहीही मिळणं अवघड आहे.'' आम्ही तरी म्हटलं, ''ठीक आहे जाऊन आम्ही प्रयत्न करतो.'' गेलो आणि बघतो तर काय खरोखरच एकही हॉटेल किंवा काही दुकानं उघडली नव्हती. आम्हाला त्या दिवशी रात्री काही मिळाले नाही. लॉरीमध्ये सगळं सामान होते. पण ते जोपर्यंत घरी वर नेऊन लावत नाही तोपर्यंत या सामानाचा काही उपयोग नव्हता. त्यामुळे एक दिवस रात्र आमचा पूर्ण उपास घडला.

दुसरी मला अशी सामान करून शिफ्ट करायची संधी मिळाली. ती म्हणजे अविमामाने जेव्हा डोंबिवलीहून बॉम्बे सेंटरच्या Quarter मध्ये जायचं ठरवलं तेव्हा. मी आणि माझा सहकारी बताले मास्तर आम्ही दोघेजण डोंबिवलीला गेलो. सगळं सामान पॅक केले आणि मुंबई सेंट्रलला घेऊन आलो. त्या वेळेस अविमामाची quarter तळमजल्यावर होती. सामान व्यवस्थित लावून झाले. नंतर आम्ही पनवेलला परत गेलो. कालांतराने एका पावसाळ्यामध्ये या तळमजल्याच्या फ्लॅटमध्ये गुडघाभर पाणी जमले होते. त्या सबंध परिसरात पावसाचे पाणी प्रचंड प्रमाणात तुंबले होते. त्या दिवशी रात्री बाथरूमला जाण्यासाठी म्हणून अविमामा उठला तर त्याच्या पायाला पाण्याचा स्पर्श झाला आणि जवळपास पाऊल भर पाणी तिथे साठलेले होते. नंतर पाण्याची पातळी वाढत वाढत सकाळपर्यंत जवळजवळ

गुडघाभर पाणी साचले होते. जेवढे सामान कॉट वरती ठेवता येईल तेवढे ठेवून पावसाचे पाणी उतरण्याची वाट बघण्यापलीकडे काही करता येणे शक्य नव्हते. या अनुभवामुळे नंतर अविमामाने बिल्डिंगमध्ये तिसऱ्या मजल्यावरती एक फ्लॅट रिकामा झाला होता त्याच्यासाठी अर्ज करून तो फ्लॅट मिळवला.

झाले, मग दुसऱ्या उन्हाळ्यामध्ये मला आणि बताले मास्तरला तळ मजल्यावरून तिसऱ्या मजल्यावर सामान नेण्याची कामगिरी सुपूर्द करण्यात आली. हे काम आम्ही व्यवस्थित केले. यासंबंधी एक अतिशय मजेशीर आठवणी आपल्याला तर सांगणार आहे. सर्व काही सामान हलवणे झाले आणि फक्त गोदरेज कपाट शिल्लक राहिले होते. मी अविमामाला म्हटले, ''तू जाऊन जेवण करून ये. मग नंतर मी आणि बताले मास्तर जेवून येतो.'' आमच्याबरोबर अजून एक दोन माणसं आमच्या कंपनीतील होती. त्याप्रमाणे अविमामा बॉम्बे सेंटरजवळ कल्पना हॉटेल इथे गेला. तिथे पोहोचला आणि एकदम तिच्या लक्षात आले की गोदरेज कपाटात एक मिलिटरी मधली आणलेली रमची बाटली बॉक्समध्ये पॅक केलेली कपाटात ठेवलेली होती. सगळ्यात शेवटी ती बाहेर काढायची म्हणून तेथेच राहून गेली. मामा धावत धावत घरी परत आला. तोपर्यंत आम्ही ते कपाट उचलून तिसऱ्या मजल्यावर नेले सुद्धा होते. मामाने धापा टाकत आधी ते कपाट उघडले. बघतो तर काय ती बाटली कपाट मध्ये अगदी व्यवस्थित शिल्लक राहिलेली होती. त्याच्यानंतर बताले मास्तर, मी, मामा सगळ्यांनी मिळून ती फोडली हे सांगायचे कारण नाही.

आणखीन एक शिफ्टिंगचे काम मी केले ते सुद्धा मावशीचे घर, अबोली पार्क येथून परांजपे यांच्या बाणेर येथील अथश्री या वसाहतीत.

■ ■

## १५. माझे व्यावसायिक मित्र

दुर्दैवाने, काही दिवसांपूर्वी मी एक व्हिजिटिंग कार्ड काढून टाकले. माझा एक व्यावसायिक मित्र, ज्याच्यावर माझा स्वतःपेक्षा जास्त विश्वास ठेवला, त्याने काही फी टाळण्यासाठी (सुमारे ९ लाख रुपये), माझा विश्वासघात केला. पैसे जाण्यापेक्षा हा आघात जास्त जिव्हारी लागला.

या निमित्ताने, मी छोटा असताना माझ्या आजीने सांगितलेली एक गोष्ट आठवली तीच सांगतो आहे.

कदाचित १९५० किंवा १९६० साल असेल. तिच्या शब्दांत 'एक गाव होते. माणसांप्रमाणे अनेक वानरे तेथे राहात. एके दिवशी मुसळधार, वादळी पाऊस पडायला लागला. पाणी तुंबायला सुरुवात झाली. पूर परिस्थिती निर्माण झाली. वानरांची आई आपल्या मुलाची देखभाल करीत होती. पाऊस सतत कोसळत होता, पूर वाढतच राहिला, पाणी वाढू लागले आणि ते  माकडांच्या आईच्या मानेपर्यंत पोहोचले. ती अजूनही किल्ला लढवीत होती, परंतु ती पातळी आणखी उंचावत गेली. आता पाणी नाका तोंडात जाणार, लक्षात आल्यावर वानरांच्या आईने मुलांना (छोट्या वानरांना), खाली पाण्यात टाकून

दिले व स्वतः त्या आपल्या मुलांवर उभी राहिली. कालांतराने पाऊस थांबला. पूर ओसरला, पाण्याची पातळी खाली गेली. वानरमातेने आपला जीव वाचविला, पण गोंडस मुले मात्र गमावली.'

प्रिय मित्रांनो, तुम्ही आश्चर्यचकित व्हाल की मी ही कहाणी आपणा सर्वांना का सांगितली? या कथेचे कारण की, मी आधी नमूद केल्याप्रमाणे, एक व्हिजिटींग कार्ड जे मी कचऱ्याच्या टोपलीमध्ये टाकले, त्याचा या गोष्टीशी अगदी जवळचा संबंध आहे. मी म्हणजे वानरांची पिल्ले व वानरांची आई म्हणजे माझा जुना मित्र, ज्याने माझ्याबरोबर, त्या वानरांच्या आईप्रमाणे केले.

यावर मी काय प्रतिक्रिया दिली? काही नाही, मी नुकतेच त्याचे व्यवसाय कार्ड टाकून दिले आणि त्याच्या नावाविरुद्ध रेड क्रॉस लावला. आशा आहे की मी सर्वांत योग्य केले आहे. तुला काय वाटते? आपण म्हणतो की, इतिहासाची पुनरावृत्ती होते. होय, मी यावर विश्वास ठेवला आहे. वर वर्णन केलेल्या घटना अंदाजे दोन वर्षांपूर्वी घडली.

आज पुन्हा ते घडले, ज्याच्यावर मी सर्वांत जास्त विश्वास ठेवला अशा व्यक्तीला, तो आर्थिक, तांत्रिकदृष्ट्या व्यावसायिकदृष्ट्या अडचणीत मदत केली. आज तो मित्र घरी आला होता. आजची त्याची वागणूक, देहबोली, भाष्य, असभ्यपणा खरोखर धक्कादायक होता।

यामागील कारण मी त्याला, गेल्या २ वर्षांचा कार्तिक आढावा घेणे हा होता, (सादर मित्र माझे जवळपास २ लाख रुपये देणे लागतो) याचा, या मित्राला अतिशय राग आला होता. मी वेळेत मदत केली त्याबद्दल आभार किंवा कृतज्ञता वगैरे बाजूला राहिली, माझ्यावर विश्वास नाही का? मी पैसे बुडवणार नाही, कधी देऊ शकतो हे मात्र सांगू शकत नाही, असे बडबडत निघून गेला.

मी काही वेळापूर्वी त्याचे व्हिजिटिंग कार्ड काढले व केराच्या

टोपलीत टाकले. पैसे मिळतील का नाही हा प्रश्न मला अजिबात पडलेला नाही, परंतु एखाद्याला मदत करावी व ती व्यक्ती, घेतलेले मदत व पैसे देऊ शकत नाही या त्याच्या परिस्थितीचा राग, त्याने माझ्यावर (ज्याने  मदत केली त्या व्यक्तीवर) काढावा याचे मनस्वी दुःख झाले.

परंतु, हे सर्व फेसबुकमार्फत आपण सर्वांशी मनमोकळेपणे सांगितल्यावर, खूप बरे वाटते आहे. मला खात्री आहे की या दोन्ही मित्रांना, ही पोस्ट वाचल्यावर, १०० % जाणीव होईल की ही तर आपल्या कर्तृत्वावर लिहिलेली आहे, मी त्यांची नावे मुद्दाम नमूद केलेली नाहीत. आपले मन हे आपले शत्रू असते असे म्हणतात. या दोन मित्रांना त्याचे मन योग्य ती शिक्षा रोज देत राहील. माझ्यासाठी ती पुरेशी आहे. पैसे काय आज आहेत उद्या नाही, वर जाताना तर साधा, हातरुमालही नेण्याची सोय नाही. मग कसली काळजी. जय श्रीराम.

असेच अनुभव अजूनही, चौघांच्या बाबतीत आले. एक माझा अगदी जवळचा नातेवाईक, स्वतःच्या, वेल्डिंगच्या व्यवसायात पूर्णपणे बुडाला होता त्याला आमच्या फुटूरिस्टीक टेप या कंपनीत मी, production सुपरवायजर म्हणून नोकरी दिली व त्याची पूर्णपणे विस्कटलेली घडी पुन्हा नीट बसवली.

या व्यक्तीसही वेळीअवेळी बरेच आर्थिक मदतही केली परंतु, त्याची जाण मात्र या माणसास अजिबात नाही याचे फार वाईट वाटते.

या व्यक्तीस आता ७५००० रुपये पगार मिळतो, माझे पैसे परत देणे तर सोडाच, एक साधा फोन करणेसुद्धा याला जमत नाही, तेही एका गावात राहात असून. असाच अजून एक सहकारी, त्याला Production मॅनेजरची नोकरी दिली, परंतु वेळ साधून यानेपण मला पूर्णपणे फसविले आहे. याच्यावर कर्जाचा डोंगर उभा होता व राहत्या घरावर जप्ती येणार होती. मी एकरकमी जवळपास ३ लाख रुपये दिले,

यातील एक पैसेही मला ३ वर्षं होऊन गेली तरी परत मिळालेला नाही, अधूनमधून हा भेटतो, जुनी खोटे बोलायची सवय अजून ही गेलेली नाही. दर वेळी काही तरी नवीन बहाणा करून अजूनही तो माझ्याकडून पैसे उकळतो. मी जाणीवपूर्वक मदत करीत राहतो, कारण आर्थिक अडचण आली की माणसाचे काय होते हे मी स्वतः अनुभवले आहे.

माझा एक विश्वासू नोकर (टोपण नाव म्हात्रे), साधारणपणे १९८० सालापासूनच, याला मी लग्नाला पैसे दिले. नंतर ३ ठिकाणी नोकरीला लावून घेतले, परंतु यानेसुद्धा आता अजिबात संबंध ठेवलेला नाही. तो आज सुमारे ३५,००० रुपये पगारावर काम करतो।

अजून एक इसम ( टोपण नाव आनंद १ ). याची व माझी ओळख, सुभाष कुलकर्णीचा मोठा भाऊ (अप्पा) यांनी करून दिली. मला त्यांनी सांगितले की, याचे जवळचे कोणीही नाही, त्यांच्या इरिगेशन खात्यात एक सामान्य रोजंदारीवर काम करतो. ब्राह्मण आहे तरी तू याला कोठे तरी नोकरी मिळवून दिलीस तर बरे होईल. मी याला लगेच PSS मध्ये नोकरी दिली, नंतर WINIP मध्ये व अलीकडे FUTURISTIC टेपमध्ये सुद्धा याला नोकरी दिली. या सर्व मदतीची परतफेड म्हणून याने या कंपनीत, कामगार युनियन करण्याचा प्रयत्न मला वेळेवर समजला मग मात्र मी याला त्वरित कामावरून काढून टाकले. ही व्यक्ती सुद्धा मला २०,००० हजारच्या आसपास देणे लागते.

या सर्व पैशावर मी आता पाणी सोडले आहे. कदाचित गेल्या जन्मीचे ते माझ्या वरील ऋण असावे.

■ ■

# १६. माझी पत्रकारिता

सर्वांना सुप्रभात.

मित्रांनो, मागील २ ते ३ दिवसा दिवसांपासून मला तीव्र पाठदुखीचा सामना करावा लागला होता आणि व्यवस्थित चांगला वेबिनार किंवा वेब क्लास शोधण्याचा मार्ग देखील. मला तुमच्याबरोबर सामायिक करण्यात आनंद झाला आहे, आता मी दोघांमध्ये बरा झाला आहे.

व्हिडिओ मिटींग कशी करावी याबद्दल मला एक ट्यूब व्हिडिओ सापडला. URL येथे

https://www.youtube.com/watch?v=5WywiTZEIS8

आणखी एक अतिशय उपयुक्त व्हिडिओ:

https://www.youtube.com/watch?v=jwYY4x5tQ8Y

जे असे वर्ग आयोजित करण्यास उत्सुक आहेत त्यांच्यासाठी मी हे सामायिक करीत आहे. शुभेच्छा

IFSC बाहेर चाललंय म्हणून दुःख का व्हावं, SSS संपूर्ण रसायनी मुंबईतून जामनगरला गेलीय काँग्रेस काळात. पुण्यात स्थापन होऊन मोठी झालेली बजाज ऑटो सर्व जामानिमा घेऊन उत्तराखंडमध्ये १० वर्षांपूर्वी गेली!

पूर्ण रिलायन्स कॉलनी रिकामी होताना पाहिलीय आणि व्हीआरएस न घेणारे मराठी कामगार कुटुंबीयांना घेऊन जामनगरला गेले आहेत.

यात विशेष काय?

आणि तसंही महाराष्ट्रात उद्योग करणे ही साधी गोष्ट नाही. भयंकर अनुभवांना सामोरे जावे लागते. अहो साधे खड्डे खणायला मजूर सुद्धा कोणत्यातरी राजकीय संघटनेकडून, त्या संघटनेने हुकूम सोडलेल्या दराने घ्यावे लागतात. अहो येथे उद्योग मंत्रीच अभिमानाने 'नाणार', 'रिफायनरी उद्योग' रद्द झाल्याचे आनंदाने जाहीर करतो! आम्हाला खळ्ळखट्याकमध्येच मजा वाटते. चिकाटीने उद्योग व्यवसाय करणारे मारवाडी, गुजराथी, शेट्टी महाराष्ट्राचे हितशत्रू वाटतात.

आम्हाला आण्विक प्रकल्प नकोय ...

आम्हाला ऊर्जा प्रकल्प नकोय ...

आम्हाला तेल रिफायनरी नकोय...

आम्हाला बांधकाम क्षेत्रात इंजिनियर्स नकोयत...

आम्हाला शेतकऱ्यांची, उत्पादकांची लुडबुड सहकारी क्षेत्रात नकोय...

आम्हाला साधा बंगालमधून बाहेर पडणारा आणि मुंबईत माहेरघर आणि पिंपरी चिंचवड मध्ये आजोळ असणारा उद्योग स्वतःकडे वळवता येत नाही ...

मागे एका बातमीत वाचलं होतं, महाराष्ट्रात एकट्या औरंगाबाद MIDC मध्ये १२०० उद्योग बंद पडले. तुम्हाला बाहेरचा कामगार इथे नकोय. मग उद्योग इथे कसे तरतील?

मर्सिडीजला महाराष्ट्रात प्लॅन्ट लावायचा होता, तेव्हा त्यांना आमच्याकडं तुम्हाला द्यायला वीज नाही असे सांगण्यात आले त्यांना.

आज त्यांचा चेन्नई जवळचा प्लॅन्ट उपग्रहातून दिसतो एवढा विस्तीर्ण आहे. त्यात IFSC बाहेर चाललंय म्हणून दुःख का व्हावं?

रायगडमध्ये स्टॉक एक्स्चेंज येणार आहे असं मागे एका बजेटमध्ये ऐकलंय ... त्याचा पाठपुरावा करताना एकाही मराठी करणाऱ्या नेत्याला पाहिलेलं नाही.

आम्हाला बुलेट ट्रेन नकोय साधी... मग IFSC कशाला हवीय?

आम्ही भविष्यातील परिवहन असणारा हायपर लूप प्रकल्प रद्द केलाय, मग IFSC कशाला हवीय?

महाराष्ट्रात एकतर उद्योग या विषयावर मतदान होत नाही. व्यापारी संघटनांचे आवाज दाबले जातात. कोणीतरी टुकार, टपरी चालवणारा राजकारणी त्याच्यावर अध्यक्ष म्हणून बसवला जातो.

महाराष्ट्रातील तरुणाईचा दिवस उच्चवर्णीयांनी पाच हजार वर्षे कसे अत्याचार केले ह्यावर चर्चा करण्यात जातो, पण अजून दहा वर्षांनी आपली दोन वेळा जेवायची काय सोय असणार ह्याचा विचारच त्यांच्या मनाला शिवलेला नसतो.

महाराष्ट्रातील महा माननीय नेते मंडळीसुद्धा अजून पेशवाई आणि पगडीवरच अडकली आहेत. जिथं स्वतःला पुरोगामी म्हणवणारे बहुतेक सर्व धुरीण इंटलेक्च्युअलचे विचार प्रत्यक्षात प्रचंड प्रतिगामी आणि मागासलेले आहेत आणि समाज सुधारक असल्याचा बुरखा घालून फिरणाऱ्यांचे विचार प्रचंड समाजद्रोही आहेत. तिथे सुधारणा कशी होणार? महाराष्ट्रातील उद्योग महर्षी किर्लोस्कर, ओगले, गरवारे, मराठे, फिरोदिया, बजाज अशा अनेक मराठी उद्योगांची आम्ही दखलही घेत नाही.

खांद्याला जुनी शबनम, अंगात फाटके कपडे आणि पायात अंगठा तुटलेली चप्पल घालून विद्रोही भाषणे देत फिरणारा सुधारक? आपल्याला श्रीमंत करेल का? उद्योग व्यवसायात उच्च स्थानी पोहोचलेला उद्योगपती आपल्याला श्रीमंतीचा मार्ग दाखवेल हेच आमच्या जनतेला आणि तरुणाईला कळत नाहीये.

अनेक कंपन्या राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्या महाराष्ट्र सोडून परराज्यात आजवर गेल्या. का गेल्या याचा कुणीही ऊहापोह केलेला नाही.

उगाच काहीतरी एक पकडायचं आणि कुणाला तरी झोडपत बसायचं...

हे सोडून महाराष्ट्राचे नेते महाराष्ट्रात उद्योग कसे टिकतील यावर काही ठोस उपाय योजना का करीत नाही? आणि जर उद्योगच नाहीत तर IFSC हवंय कश्याला?

Big Question? Who can answer please?

मित्रांनो,

कालची, ABP माझा कट्टा वरील बातचीत. माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांना. एक प्रश्न विचारला गेला. एका विद्वान पत्रकाराने (विद्वान असे मुद्दाम म्हटले आहे? कारण हाच तो ज्याने, थोर स्वातंत्र्यवीर सावरकर यांना खलनायक ठरवायचा प्रयत्न केला, स्वत: किती निधर्मी हे सिद्ध करणे साठी, आपला डुकराचे मांस खातानाचा व्हिडिओ प्रसिद्ध केला, समझ ने वाले को इशारा काफी)

प्रश्न : राज्यपाल महोदयांनी, निवडून आलेल्या सरकारच्या मुख्यमंत्री महोदयना, विधान परिषदेवर नेमणूक करण्यात विलंब का केला, किंवा अडथळे का आणले? अशाच आशयाचा.

काय गमत आहे नाही? हे निवडून आलेले सरकार होते का?

होते व म्हणून राज्यपालांनी, जर शप्पथ देऊन नेमणूकसुद्धा केली होती तर, पुन्हा आमदार म्हणून नेमणूक करायची गरज का भासली?

खाल्या मिठाला जगणारा मराठी माणूस, त्यात एक ब्रह्मण (बहुतेक), हे याहून चांगले कोण सिद्ध करू शकतो? जय महाराष्ट्र! जय हिंद!

नमस्कार मित्रांनो

सुप्रभात.

कोविड १९ चे साइड इफेक्ट

आता सुर्य देवसुद्धा लॉक डाउनमध्ये?

नाही हो

मी हा फोटो जाळीच्या अलीकडून घेतला.

पण काही जण म्हणू शकतात, इन्होने सुर्यजी को भी लॉक डाऊन में डाला। इति तरुण नेते, भावी पंतप्रधान

प्रिय मित्रांनो

मी हे दोन दिवसांपूर्वी पोस्ट केले होते.

२ एप्रिल २०२० रोजी मी श्री. आर. एस. मानी यांच्या रूपाने माझा एक चांगला मित्र गमावला आहे याबद्दल मला आज खूप वाईट वाटले. काल त्यांचा मुलगा श्री. सुरेशने मला निरोप पाठविला. माझ्या चांगल्या मित्रांच्या वैयक्तिक इस्टेटमधून माझा एक खरा मित्र गमावला आहे अशी मला एक भावना आहे. येथे मी श्री. आर. एस. मणी बरोबरची एक स्मृती सांगू इच्छित आहे. वयाच्या ७९ व्या वर्षीही मणी खूपच सक्रीय आणि चपळ होते. कर्नाटक राज्यातील बिदर येथील मिथुन पेपर मिल्ससाठी मार्केटिंग संचालक म्हणून ते कार्यरत होते.

सुमारे २ वर्षांपूर्वी ते चेन्नई (त्यांचे मूळ शहर) येथून पुण्यात रेल्वेने प्रवास करीत होते. ते पुणे जंक्शनवर उतरून शिवाजीनगर येथील हॉटेलच्या खोलीत पोहोचले. ट्रेनमध्ये तो लॅपटॉप विसरला, हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने पुणे रेल्वे स्थानकात धाव घेतली आणि कामावर असलेल्या स्टेशन मास्टरला भेट दिली व त्यांना त्याविषयी माहिती दिली. तो आपली गाडी नंबर सामायिक करू शकेल, बोगी नंबर, बर्थ क्रमांक आणि अचूक स्थान, जेथे तो त्याचा लॅपटॉप विसरलेला. स्टेशन मास्टर इतका दयाळू होता की, त्याने ही माहिती आपल्या सहकाऱ्याला दिली, कदाचित तो टीसी त्या वेळी ड्यूटीवर

असेल. काही वेळातच त्याने पुष्टी केली की ड्युटीवर असणाऱ्या रेल्वे कर्मचाऱ्यांनी लॅपटॉप शोधून काढला आहे आणि तो कल्याण रेल्वे स्टेशन मास्टर्स कार्यालयात जमा आहे. श्री. मणी इतके उत्साही होते की, त्यांनी पहिल्या उपलब्ध रेल्वेने कल्याणकडे धाव घेतली. तो ड्यूटीवरील स्टँड मास्टरला भेटला आणि तो त्याचा लॅपटॉप परत मिळवू शकला. नंतर ते पुण्याला परत आले आणि रात्री उशिरा फोन करून मला त्या दिवशी संध्याकाळी भेट न मिळाल्याबद्दल क्षमा करण्याची विनंती केली. सर्वांत महत्वाची किंवा विश्वासार्ह गोष्ट म्हणजे केवळ ७९+ या लहान वयात हे केले.

त्याच्या कंपनीत माझ्यासाठी आणखी एक अविस्मरणीय क्षण आहे, ज्या दिवशी मी संपूर्ण मिथुन पेपर गिरण्यांनी सन्मानित केला, जेव्हा टोकन भेट देऊन स्मृतिपत्रक देऊन परत तेथून प्लँटमधून निघताना. मी त्याचा फोटो जोडत आहे. मला हे किती आवडते? तुम्हाला दिसेल की मी त्यावर केशरी रंगाचा रिबन देखील काढला नाही.

श्री. मणि यांच्या आवडत्या आठवणींना योग्य पात्र श्रद्धांजली वाहण्याची ही माझी स्वतःची पद्धत आहे.त्यांचा आत्म्यास शांती लाभो.

**तुमची इस्टेट किती आहे? किती संपत्ती आहे?**

बिदरच्या जेमिनी पेपर मिल्स, डायरेक्टर मार्केटींग, श्री. आर. एस. मणी यांनी मला हा प्रश्न विचारला, (कारण त्यांना माहीत होते की मी गेल्या ४६+ वर्षांपासून रबर आणि अॅडेसिव्ह टेप उद्योगात कार्यरत आहे).

मी एक विराम घेतला आणि म्हणालो

''सर, हे जाणून घेण्यासाठी तुम्हाला माझ्या घरी भेटावे लागेल. माझे आमंत्रण स्वीकारण्याची मी त्याला रात्रीच्या जेवणासाठी घरी येण्याची विनंती केली. म्हणून तो माझ्या घरी आला. रात्रीच्या जेवणानंतर तो म्हणाला, ''ठीक आहे, चल मला आपली इस्टेट दाखवा.''




मी म्हणालो, ''हो सर, कृपया माझ्या अभ्यासाकडे जा.''

त्याने अनुसरण केले. मी म्हणालो, ''सर, कृपया व्हिजिटिंग कार्डधारकांनी भरलेला हा शेल्फ पहा.'' तो म्हणाला, ''हो मला माहीत आहे पण हे काय आहे?''

मी त्याला विनम्रपणे उत्तर दिले, ''सर ही माझी संपत्ती आहे.''

''लोक, मित्र, सहकारी, व्यवसाय कनेक्शन एकत्रित करणे हे माझे वास्तविक खाते आहे.'' मी म्हणालो, ''हे कोरे चेकसारखे आहे. मी बऱ्याच वेळा एन्कॅश केले. फक्त त्यांना लिहा किंवा त्यांना कॉल करा आणि ते नेहमीच मला आवश्यक मदत/साहाय्य देण्यास भाग पाडतात.'' श्री. मणी यांना हे समजून आनंद झाला आणि ते म्हणाले, ''श्रीकांत, तुम्ही खरोखरच श्रीमंत आहात.'' मी संपत्ती/इस्टेटचा एक नवीन सिद्धांत शोधला आहे.

माझा यावर प्रामाणिकपणे विश्वास आहे आणि मला ठाऊक आहे की असे बरेच मित्र, हितचिंतक आहेत ज्यांनी मला त्याऐवजी एका पदावर ढकलले आहे.

४६+ वर्षांमध्ये मी गोळा केलेली ही सर्वांत मौल्यवान संपत्ती नव्हे काय?

प्रिय मित्रांनो,

राजकारण्यांना पेन्शनविरुद्ध सुप्रीम कोर्टात याचिका दाखल सामायिक करा आणि या कारणाला समर्थन द्या

https://www.facebook.com/100002669372058/posts/2373980772700879/?sfnsn=scwspmo

मी या याचिकेचे १००% समर्थन करतो. खासदार, आमदार यांना निवृत्तीवेतन मिळू नये. कारण राजकारण नोकरी किंवा नोकरी नसून एक स्वतंत्र सेवा आहे. राजकारण म्हणजे लोकप्रतिनिधी कायद्यांतर्गत एक निवडणूक आहे, तेथे निवृत्ती नाही, परंतु त्याच परिस्थितीत ते पुन्हा निवडून येऊ शकतात. (सध्या त्यांना ५ वर्षांच्या सेवेनंतर पेंशन मिळते).

मी आपणा सर्वांना यास पाठिंबा देण्यासाठी विनंती करू शकेल आणि जमेल तितक्या सामायिक करा. आम्ही खरे आहोत की भारताच्या नागरिकांनी आपल्या राष्ट्राच्या हितासाठी यावर कृती केली पाहिजे. जय हिंद, वंदे मातरम्।

**पॅकेजिंग विकास व्यावसायिक**

पॅकेजिंग प्रशिक्षण संस्था, आयआयपी, एसआयआयएस, सीआयपीईटी आणि इतर विद्यार्थी, जे कार्यरत आहेत, टिकाऊ पॅकेजिंग विकास प्रकल्प

पॅकेजिंग विकास विभाग, प्रदूषण नियंत्रण विभाग, प्रदूषण नियंत्रण प्राधिकरण योग्य वेळ नाही का? बंदी? बीओपीपी पॅकेजिंग टेप

आणि

पृष्ठभाग संरक्षण टेप

भारतात

कृपया आपण एक यूट्यूब व्हिडिओ पहा: https://www.youtube.com/watch?v =QYt2tcC9Kvs

अधिक तपशीलांसाठी: https://www.slideshare.net//pla-film-and-it-applications-i

कृपया आम्हाला यू ट्यूब चॅनेलवर सदस्यता घ्या.

https://www.youtube.com/channel/UCgovR9rsYHWKLzdg4N5eLSQ

हा व्हिडिओ पहा आणि स्लाईडशेअरवर माझा आजचा लेख देखील वाचा.

बायो कंपोस्टेबल पॅकिंगची गरज का आहे?

आव्हाने कोणती आहेत?

लवचिक पॅकेजिंग, बाजार कधीही वाढत आहे

भूगोलद्वारे लवचिक पॅकेजिंग मार्केट महसूल,

आलेख / आकृत्या दाखवते की त्याची वाढती वेगवान वेगाने होते. २०२७ पर्यंत जवळजवळ ५३५ अब्ज डॉलर्स

हा व्हिडिओ पहा आणि स्लाइडशेअरवर माझा आजचा लेख देखील वाचा

https://www.youtube.com/watch?v=hd-FVVx03P8

कृपया आम्हाला यूट्यूब चॅनेलवर सदस्यता घ्या:

https://www.youtube.com/channel/UCgovR9rsYHWKLzdg4N5eLSQ

मुळगुंद, ( गदग जवळ, कर्नाटक राज्यात येथील), तंबू टॉकीज मध्ये, उन्हाळी सुट्टीत बरेच पहिले आहेत. तेही अगदी फुकटात, कारण हे तंबू टॉकीज, आठवले घराण्याच्या जागेत होते. माझे, बरोबरचे, गोपाळ, रामकृष्ण, सुमन, प्रभा, राजा छत्रे, मीना यांना कदाचित, सिनेमाची नावे आठवत असतील.

अभिनंदन, भूतपूर्व पंतप्रधान, भूतपूर्व मुख्यमंत्री, आपल्या नातवा, मुलाच्या लग्नं करून दिले याबद्दल. याला म्हणतात, सत्तारुढ पक्षाच्या निर्णय ढाब्यावर बसविणे तोही अगदी शांततेच्या मार्गाने.

Social distencing चे पालन करायचे म्हणून आपल्या मित्र पक्षांना आमंत्रग न देता.

आपले कौतुक करावे तितके थोडेच?

वाहवा वाहवा, क्या बात है?

कोरोनामुळे लोक मरताहेत, मरु देत, त्याचा व आपल्या कुटुंबाचा काय संबंध?

छान, तिसरी आघाडी यदाकदाचित सत्तेवर आलीच तर, पंतप्रधान पद व नागरी कल्याण मंत्रालय नक्कीच आपले. त्या साठी आगाऊ अभिनंदन. सचमुच मेरा भारत महान ह।. जय हिंद, वंदे मातरम्!

भारतीय असाल तर एक गोष्ट नेहमी लक्षात घ्या

आज प्रत्येक व्यक्ती हा आपापले नुकसान सांगत आहे. आणि प्रत्येक व्यक्ती शासनाकडे मदत अपेक्षित करत आहे...

कोरोनासोबत युद्ध हे फक्त शासनाचं युद्ध आहे की प्रत्येक भारतीयानंच हेच लोकांना कळत नाही आहे...

प्रत्येकाला फक्त नुकसानभरपाई हवी आहे...

पण डोकं ठिकाणावर ठेवून नीट विचार करावा...

शासनाकडे जमा होणार टॅक्स बंद

रेल्वे, विमान, शासकीय कार्यालये बंद

मोफत आरोग्य केंद्र सुरू, मोफत जेवण सुरू, EMI बंद, तुमच्या account मध्ये थोडेफार पैसे टाकले जातात.

कर्जमाफी केल्या जाताय.

आपल्याला सगळ्या सुविधा पुरवल्या जाताय...

तरी लोकांना नुकसानभरपाई पाहिजे आहे...

शासनाकडे एवढा पैसे येणार कुठून? थोडा तरी विचार करावा...

त्यामुळे अपेक्षा थोड्या कमी करा... यामध्ये शेतकरी असो ... तो कर्मचारी असो... हातमजुरी करणारा असो... किंवा भीक मागून पोट भरणारा असो.... यामध्ये सर्वांचे नुकसान आहेत....

अगोदर जीव वाचवायला शिका. मग पैसा पैसा करा... जीव असेल तर असे ५६ नुकसान तुम्ही भरून काढणार....

पण तोच नसेल. घरात कुणाचा जीव गेला तर ते नुकसानभरपाई कोण करेल... शासन करेल....

त्यामुळे डोकं ठिकाणावर ठेवून अपेक्षा ठेवा.

हा प्रॉब्लेम शासनाचा नाही फक्त... तर तो प्रत्येक भारतीय व्यक्तीचा आहे... जीवन आहे हे यात नुकसान फायदा हा होणारच आहे, पण प्रत्येक वेळा जर तुम्ही शासनाकडूनच अपेक्षा करणार तर तुम्हाला भारतीय म्हणून घेण्याचा काहीच अधिकार नाहीये. माझ्या या बोलण्याचा खूप जणांना बोचेल पण जो खरंच जागृत भारतीय असेल त्याला नक्की पटेल.

अमेरिका, इटली, चीनसारखे महान आणि हाय टेक्नॉलॉजी असलेल्या देशांमध्ये फक्त १५ दिवसांत तेथे रोजचे हजारोंच्या घरात कोरोनाग्रस्त नागरिक सापडत आहे. तरी आपल्या शासनाने हे प्रमाण किती रोखून ठेवले आहेत. त्याचा अभिमान मानायचा सोडून प्रत्त्येक जण फक्त स्वतःचे रडगाणे सांगत आहे...

त्यामुळे आपणास सर्वांना आग्रहाची विनंती आहे, सपोर्ट करा शासनाला आणि रडगाणे सांगून शासनाला कमजोर बनवू नका. आपले सर्वांचे सहकार्यच आपली नुकसानभरपाई आहे.

सहमत असाल तर पुढे फॉरवर्ड करून प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवा नाहीतर सरळ दुर्लक्ष करून शासनाच्या नावाने रडत बसा.

गैरसमज नको आपण सुज्ञ आहात. या संकटसमयी आपल्या सरकारच्या मागे खंबीर उभे राहू या. वास्तविकतेचा उत्कृष्ट तुकडा. एक महान मूल असणे आवश्यक आहे. स्वर्गीय श्री. आर. के. लक्ष्मण यांना पुनर्विचार करण्यापासून मी स्वत:ला रोखणार नाही

या बालकाला आर. के. च्या आठवणी आणि माझ्यासाठी खूप खूप आशीर्वाद.

प्रिय बालमित्रांनो व आई-वडिलांनो,

या उन्हाळ्याच्या सुट्टीत, काय करायचे?

मुलांना बाहेर खेळायला जाता येत नाही? घरी बसून अगदी कंटाळली आहेत. आमच्याकडे लहान मुलांना आवडतील अशी खूप छान गोष्टींची पुस्तके आहेत. तुम्ही विनामूल्य घेऊन  जाऊ शकता. मग आमच्या घरून घेऊन जा, अगदी मोफत.

फक्त, सोशल डिस्टन्सिंगच्या बंधनामुळे, कायद्याचे पालन करायला हवे. तरी तुमच्या आई किंवा बाबांना मला भेटून घेऊन जायला सांगा किंवा, सेवाभावी संस्थांचे कार्यकर्ते, संध्याकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत. माझा नंबर आहे ९८५०२४२२८२.

बराय मित्रांनो आनंदी रहा.

प्रिय बाल मित्रानो,

व आईवडिलांनो,

या उन्हाळ्याच्या सुट्टीत, काय करायचे?

मुलांना बाहेर खेळायला जाता येत नाही? घरी बसून अगदी कंटाळली आहेत.

लॉकडाऊनमुळे अगदी कंटाळला असाल नाही का?

रोज सकाळी उठलात की, शाळेला जायची घाई नाही, मित्र-मैत्रिणी भेटणे नाही. टिंगल, मस्ती नाही?




कसा काय वेळ घालवायचा? केवढा मोठा प्रश्न? तुम्हालाही व आई-वडिलांनाही? खास तुमच्यासाठी वेगवेगळ्या देशांचे पोस्टाचे स्टँप संग्रह करायला आवडेल?

मग आमच्या घरून येऊन जा, अगदी मोफत. फक्त, सोशलडिस्टन्सिंगच्या बंधनांमुळे, कायद्याचे पालन करायला हवे. तरी तुमच्या आई किंवा बाबांना मला भेटून घेऊन जायला सांगा. संध्या काळी ५ ते ७ वाजेपर्यंत. माझा नंबर आहे ९८५०२४२२८२.

बराय मित्रांनो, आनंदी रहा.

नमस्कार मित्रांनो

लॉकडाऊन, आता मे ३, २०२० पर्यंत वाढविला गेला आहे. आपले सर्वांचे एक सुजाण, समंजस नागरिक म्हणून, हे कर्तव्य आहे की, आपण या निर्णयाचे १००% पालन करू या. लॉकडाऊन जर

पाळणे नाही तर लॉकअपमध्ये, अडकल्याची पाळी ओढवेल. लॉक डाऊनमध्ये, आपापल्या घरी राहायची मुभा आहे, हवे ते काम, जेवण खाण करायची सोय आहे.

लॉकअपमध्ये, पोलीस कोठडीमध्ये या सर्व स्वातंत्र्याला मुकावे लागले. सरकारी खाक्यात व जे मिळेल ते खावे लागेल. कोठडीमध्येच, सर्व? पाय मोकळे करायला १० बाय १० मध्ये? आता तुम्हीच ठरवा, लॉकडाऊन बरे की लॉकअप?

लॉकडाऊनमुळे आजवर जे काही, वेगळे करायची इच्छा होती ते करून पाहायची सुवर्णसंधी आहे. ही संधी आपण वाया घालवायची की या संधीचा १००% लाभ घ्यायचा? कोरोना एक जीवघेणा रोग ठरू शकतो. करोना ब्लड ग्रुप, जात-पात, लहान-मोठा वगैरे काही भेदभाव जाणत नाही. जो कोणी साधी पथ्य पालन नाही त्याला करोना दया-माया दाखवत नाही. घरी राहा, घराबाहेर शक्यतो पडू नका, काळजी घ्या. कोरोना काय कायम राहणार नाहीये, हा एकदाचा समूळ नष्ट झाला की, उभं आयुष्य पडलं आहे, आपापले कर्तृत्व गाजवायला. नमस्कार! जय हिंद जय महाराष्ट्र । वंदे मातरम् ।

श्री. सुयोग ओक, यांची एक अतिशय योग्य सूचना

आता या पुढे महाराष्ट्रात कोणत्याच नेत्याचे स्मारक नको. त्यापेक्षा हॉस्पिटल्स आणि ग्रंथालय उभारू. सर्व जिल्ह्यातून तरुणांनी पुढे यावे. करुया मोहीम सुरू. कोण कोण येणार? नमस्कार सुयोग ओक आपले १००% बरोबर आहे. या कार्यक्रमात मी संपूर्ण सहकार्य द्यायला तयार आहे. हॉस्पिटलसाठी लागणारे साहित्य : उदाहरणार्थ , रबरचे अधेसिव्ह कोटेड पार्टचे उत्पादन भारतात कमी खर्चात, उच्च गुणवत्तेचे, बनविण्यास लागणारी, सर्व टेक्नॉलॉजी व या मार्गदर्शन, तरुण उद्योजकांना (मात्र), देण्यास मी (विनामूल्य) तयार आहे.

सध्या असे बरेच कारखाने आहेत व चीनकडून बराच माल आयात केला जातो. हे सर्व किफायतशीरपणे भारतात बनविणे सहज

शक्य आहे. यावर एक टेक्निकल पोस्ट मी आज तयार करून, फेसबुकवर, लिंक्डइनवर व व्हाटस्ॲप आज मी पोस्ट करीन. इच्छुकांनी माझ्याशी संपर्क करावा.

ई–मेल:

फोन: ००९१ ९८५०२४२२८२,

website:http://punemid.com spatechnicaladviser

जय हिंद । वंदे मातरम।

ही पोस्ट वाचून आपण एक भारतीय असल्याचा अभिमान वाटतो. एअर इंडियाचा संपूर्ण स्टाफ व मोदीजी व सर्व जबाबदार मंत्री आणि अधिकारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन. भारताची मान अभिमानाने ताठ झाली आहे. जय हिंद, वंदे मातरम्।

मित्रांनो, पाकिस्तानी पत्रकार व त्याची मते, आर.एस. एस. बद्दल व आपले, संधिसाधू पुरोगामी नेते, त्यांची, लाचार मते, एक तरुण नेता, आर.एस. एस.वर उठसूट टीका करताना व त्याची चाकरी करणारे अर्ध्या गोवऱ्या पोचलेले थेरडी पाहा. हा व्हिडिओ व आत्मपरीक्षण करा, किती घसरलात, सत्तेच्या हव्यासापोटी?

जय हिंद! वंदे मातरम!•

अजित इंडस्ट्रीज प्रा. लि. चे अजित गुप्ता, एमडी यांची ही माझी एक चांगली पोस्ट आहे. मी नुकत्याच काही ओळी जोडल्या आहेत. आपण या मौल्यवान वेळेचा उपयोग स्वत: व आमच्या नागरिकांना ताजेतवाने करण्यासाठी करूया.

यापूर्वी आपण केलेल्या चुका पाहू या

यातून शिकू या

आणि आमच्या रणनीतीची आखणी करा, ते पुन्हा शेड्यूल करा आणि एकामागून एक लहान भागांमध्ये लक्ष्य ठेवू या.

त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे मर्यादित षटकातील क्रिकेट सामना.

५० षटकांत ४५० धावा हव्या?

हे शक्य नाही कसे ते पाहा.

डेव्हिड ४५० बाय ५०, प्रत्येक षटकात ते ९ धावा

प्रथम इनमध्ये किमान धावा, पुढच्या इनमध्ये आणखी आणि पुढच्या इनमध्ये ८०० धावांचे त्वरित लक्ष्य/लक्ष्य निश्चित करा.

त्याचप्रमाणे, ४० व्या षटकापर्यंत १० प्रती ओव्हर दराने प्रयत्न करा

हातात विकेट राखून पाहा

निकाल?

हातात दोन विकेट आणि दोन षटकांचा बचाव करण्यासाठी शानदार विजय. कालांतराने आमच्या व्यवसायाचे लक्ष्य निश्चित करा आणि आम्हाला आणि आमच्या देशाला सर्व नवीन उंचावर घेऊन जा.

आम्हाला इम्पॉसिबलसारखे काहीही नाही. कारण हा शब्द स्वतःच आपण तोडला तर म्हणतो, मी संवेदनशील आहे. प्रयत्न करा आणि खंडित करा, मी हे करू शकत नाही. ते होईल, मी हे करू शकतो. आनंद घ्या.

स्वत:ची पुनर्बांधणी करा, कार्यसंघावर विश्वास ठेवा, आपल्या स्वत:च्या क्षमतेवर विश्वास ठेवा.

मला क्रिकेटच्या महान खेळाचा संदर्भ द्या.

जय हिंद!

एक विचार मनात आला.

क्रिकेट या माझ्या आवडत्या खेळाशी हा निगडित आहे. आपल्या काही नामांकित, क्रिकेट समालोचकांपैकी एक, समालोचन करताना, एखादा, चेंडू कसा चुकीचा टाकला किंवा फटका कसा चुकीचा मारला हे सांगत असताना, स्वतः खेळात असताना, काय दिवे लावले? याचा विचार कधी करत नाही.

क्रिकेट किंवा इतर कोठलाही खेळ हा शेवटी टीमवर्क असते. एखाद्या खेळाडूचे काही चुकले तर, मैदानात त्याचा पाणउतारा होऊ शकतो. कॅप्टन करत नाही त्याबद्दल आपले नाराजी व्यक्त करू शकतो व तीसुद्धा तशी चूक पुनश्च होऊ नये यासाठी यापाठोपाठ कप्तान या खेळाडूचे मनोबल वाढविणेसाठी या खेळाडूची पाठ थोपटून चांगला प्रयत्न केलास. यात यापुढे काळजी घे असे नमूद करतो.

कुठलाही सामना हा केवळ टीमवर्कनेच जिकता येतो. उदाहरण द्यायचे झाले तर १९८३ साली, भारतानं बलाढ्य वेस्ट इंडिजला हरवून जिंकलेला वर्ल्ड कप. क्रिकेट विश्वात अनेक कप्तान होऊन गेले जे टीममध्ये, आत आले ते, सरळ कप्तान म्हणून अर्थात या मागे त्या खेळाडूचे आधीचे कर्तृत्व.

काही समालोचक ज्यांनी साधी बॅट किंवा बॉलसुद्धा घराला नाही, (गल्ली बोळातील सामना सोडून), त्यालाच जर एकदम कॅप्टन केले तर? आनंदी आनंदच.

निवड समितीच्या लक्षातूनही बाब सुटली तरच नवल. अशा कामचलाऊ कॅप्टनची उचलबांगडी होऊन, कर्तृत्ववान, भूत कप्तान, एक मताने निवडला जातो.

काय मंडळी, पटतंय का?

ही गोष्ट फक्त एक किस्सा म्हणून समजावा. या गोष्टीचा इतर कुठल्याही परिस्थितीशी संबंध जोडू नये.

जय हिंद, वंदे मातरम्।

ढोंग फक्त हुशार किंवा चपळ व्यक्तीच करू शकते. निर्बुद्ध माणूस कधी ढोंग करू शकतो असे वाटत नाही. तसेच भ्रष्ट माणसाचे आहे, गरिबांचा कळवळा असल्याचे ढोंग सतत करत राहणे निर्बुद्ध व अशिक्षित (किंबहुना मुद्दाम अशिक्षित ठेवलेली), मदत करण्याचे ढोंग, हे फक्त हुशार, कपटी माणसेच करू शकतात. जे बोलतो त्याच्या बरोबर विरुद्ध आचरण हे काही नवीन नाही. हेसुद्धा एक हुशार,

पाताळयंत्री माणूसच करू शकतो, निर्बुद्धाचे हे कामच नाही. निर्बुद्ध माणूस जे मनात येईल ते बोलून मोकळा होतो. बऱ्याचवेळा निर्बुद्धपणा व निष्पापपणाचे जवळचे नाते असावे असे माझे वैयक्तिक मत आहे. कदाचित हे चुकीचे असू शकते. जसे झोप लागल्याचे ढोंग फक्त हुशार किंवा चपळ व्यक्तीच करू शकते. झोपेचे ढोंग घेतलेल्या जागे करणे अशक्य असते. खरोखर झोप लागल्याला जागे करणे सहज शक्य असते.

डॉ. संजय उपाध्ये यांची मुलाखत, माझा कट्ट्यावर गप्पा, हा एक अतिशय सुंदर, कार्यक्रम होता. सध्याच्या, काहीशा चिंतातुर वातावरणात, माणसाने, कसे आनंदी राहावे, जे सर्व जगाच्या बाबतीत घडते आहे ते बदलणे आपल्या हाती नाही, परंतु सक्तीचे घर बसणे किंवा सक्तीची रजा, सुट्टीचा, उपयोग कसा करता येईल?

एखादे काम जे मनात घर करून होते ते करता येईल का? हा विचार बरेच प्रेक्षक करू शकले असतील. प्रसन्न जोशीची देहबोली, मात्र खटकली. एबीपीची संपूर्ण टीम व सर्व प्रेक्षक, या कार्यक्रमाचा आनंद घेत असताना, प्रसन्नची देहबोली अप्रसन्न?

डॉक्टर संजय उपाध्येंनी जसे सुचविले, त्याप्रमाणे सध्या कुठलाही कामाचा ताण नाहीये व ही एक संधी असे समजून सध्या मी ४ ते ५ पुस्तक (यातील ४ टेक्निकल (इंग्लिश भाषेत) व १ (मराठी मध्ये) माझ्या आयुष्यवर) लिहितो आहे. ही पुस्तक, वैयक्तिक विनंतीनुसार मोफत आहेत.

पेपर बचाव या तत्त्वानुसार ही सर्वे पुस्तके, इबुक स्वरूपात आहेत. या मालिकेतील, पहिले पुस्तक, ebook on Resin Dispersions, आज, कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाने, जगभरात जे आपले बांधव मृत्युमुखी पडले त्या सर्वांच्या स्मृतीस अर्पण करीत आहे. परमेश्वर करो आणि हे संकट लवकरात लवकर नष्ट हो, ही प्रार्थना.

जय हिंद, वंदे मातरम, भारत माता की जय!

**नमस्कार मित्रांनो,**

आज १६ मे २०२०. मला १६ मे स्पष्टपणे आठवते. हा तोच दिवस आहे, जेव्हा मी माझ्या करिअरची सुरुवात ४७ वर्षांपूर्वी, म्हणजे १९७३, साली केली होती. मी धारवाड येथील कर्नाटक महाविद्यालयातून बी.एस्.सी. (केमिस्ट्री) पूर्ण केले आणि रॅम (रबर अॅडेसिव्ह मॅन्युफॅक्चरर्स), कळंबोली, पनवेल येथे कामावर रुजू झालो.

मला स्पष्टपणे आठवते, रबर टेक्नॉलॉजी माझ्यासाठी अजिबात नवीन नव्हती, कारण मी या कंपनीत शिकाऊ उमेदवार म्हणून, १९७० सालापासून, बी.एस्.सी. (केमिस्ट्री), कर्नाटक कॉलेज धारवाड येथे शिकत असताना, दर उन्हाळी सुट्टीमध्ये, दोन महिने काम करत असे.

जेव्हा मी मागे वळून पाहतो, तेव्हा या ४७ वर्षांच्या मौल्यवान काळाकडे तेव्हा खरोखर आश्चर्यचकित होतो. त्या दिवसात उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा, संधी व त्याच्या तुलनेत, गेल्या ४७ वर्षांत, किती बदल झाला आहे. खरोखरीच हे सर्व कल्पनेच्या पलीकडले आहे.

मी त्या वेळी उपलब्ध पायाभूत सुविधांविषयी बोलत आहे. सेल फोन, टेलिव्हिजन, इंटरनेटबद्दल विसरा, अगदी एक लँडलाइन देखील त्या वेळी एक दुर्मीळ वस्तू होती. ज्ञान किंवा नवीन तंत्रज्ञानाबद्दल माहिती मिळविण्यासाठी, पुस्तके हे एकाच माध्यम होते. टेक्निकल पुस्तकांची उपलब्धता खरोखर खूप दुर्लभ होती. त्या वेळी कोणतीही कुरिअर सेवा उपलब्ध नव्हती आणि तंत्रज्ञान माहिती मिळविण्याचा एकमात्र मार्ग पोस्टल सर्व्हिसद्वारे होता. अगदी फॅक्ससेवा देखील सुरू केल्या नव्हत्या, परंतु टेलेक्स नावाची प्रणाली होती. आंतरराष्ट्रीय कॉलद्वारे फोनवर विसरा. अगदी राष्ट्रीय स्तरावर फोनवर कॉल करणे देखील कठीण होते. आयात करणे इतके अवघड होते की, एखाद्याला आधी आयात परवाना घ्यावा लागे, शिवाय आयात शुल्क प्रचंड होते. उपलब्ध नवीन सामग्रीची माहिती गोळा करणे, अतिशय अवघड होते.

तांत्रिक माहिती मिळविण्यासाठी, एखादा गुरु शोधावा लागे व हे सर्वांनाच शक्य नव्हते. थोडक्यात काय, तर अतिशय अल्प अश्या सुविधा, किंवा सपोर्ट उपलब्ध असे.

म्हणूनच एखादी व्यक्तीची भरभराटही मिळालेला प्रत्यक्ष कामाचा अनुभव व थोरामोठ्यांचे मार्गदर्शन, केवळ यावरच अवलंबून होती.

गेल्या ४७ वर्षांत, या सर्व गोष्टी कशा बदलत गेल्या, हे पाहिले की, विश्वास बसणार नाही, हे खरंच आश्चर्यकारक आहे. आज आपल्याकडे स्वतःचा विकास करण्यासाठी अनेक मार्ग आहेत. त्या काळातील जगाच्या तुलनेत, जग आज खरोखरच किती छोटं किंवा संकुचित झालं आहे नाही का? आज एखादी माहिती इंटरनेटच्या माध्यमातून काही मिनिटांत मिळू शकेल. सेल फोन, ई-मेल किंवा व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून आज आपण जगातील कोणाशीही संपर्क साधू शकतो. आता आपण जगाच्या कोणत्याही भागात इंटरनेटवरून, कोणाही बरोबर बैठक आयोजित करू शकतो. तांत्रिक साहित्य किंवा नमुने किंवा अगदी पुरवठा मिळवणे इतके जलद झाले आहे, आयात करणे इतके सोपे झाले आहे. जेव्हा मी या घडामोडींकडे वळून पाहतो तेव्हा मी स्वत: ला खूप भाग्यवान समजतो.

मला माझे मामा जी. पी. खाडिलकर, डॉ. अरविंद घाग, श्री. आर. आर. पंडित, श्री. डब्ल्यू. जी. देसाई आणि श्री. जी. आर. कविश्वर, श्री किशोर कौशिक, डॉ. पी. के. मन्ना., डॉ. रॉय डेक्सबरी या सर्वांनी, जे मार्गदर्शन केले, हवी ती मदत केली, त्याचे मूल्य करता येणे जवळपास अशक्य आहे. आज मी जो काही आहे, व आयुष्यात या टप्प्यावर पोहोचलो आहे, त्यामध्ये या सर्व थोर मंडळींचा सिंहाचा वाटा आहे. आजच्या दिवशी माझ्या, या सर्व गुरुंचा मी ऋणी आहे. माझ्या सर्व गुरूंचे मी मनापासून आभार मानू इच्छितो. नमस्कार.

जय हिंद! वंदे मातरम!

नमस्कार मित्रांनो,

आज १६ मे २०२०. मला १६ मे स्पष्टपणे आठवते. हा तोच दिवस आहे, जेव्हा मी माझ्या करिअरची सुरुवात ४७ वर्षांपूर्वी, म्हणजे १९७३, साली केली होती. मी धारवाड येथील कर्नाटक महाविद्यालयातून बी.एस्‌सी (केमिस्ट्री) पूर्ण केले आणि रॅम (रबर ॲडेसिव्ह मॅन्युफॅक्चरर्स), कळंबोली, पनवेल येथे कामावर रुजू झालो.

मला स्पष्टपणे आठवते, रबर टेक्नॉलॉजी माझ्यासाठी अजिबात नवीन नव्हती, कारण मी या कंपनीत शिकाऊ उमेदवार म्हणून, १९७० सालापासून, बी.एस्‌सी (केमिस्ट्री), कर्नाटक कॉलेज धारवाड येथे शिकत असताना, दर उन्हाळी सुट्टीमध्ये, २ महिने काम करत असे.

जेव्हा मी मागे वळून पाहतो, तेव्हा या ४७ वर्षांच्या मौल्यवान काळाकडे तेव्हा खरोखर आश्चर्यचकित होतो. त्या दिवसात उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा, संधी व त्याच्या तुलनेत, गेल्या ४७ वर्षांत किती बदल झाला आहे, खरोखरीच हे सर्व कल्पनेच्या पलीकडले आहे.

मी त्या वेळी उपलब्ध पायाभूत सुविधांविषयी बोलत आहे.

सेल फोन, टेलिव्हिजन, इंटरनेटबद्दल विसरा, अगदी एक लँड लाईन देखील त्या वेळी एक दुर्मीळ वस्तू होती. ज्ञान किंवा नवीन तंत्रज्ञानाबद्दल माहिती मिळविण्यासाठी, पुस्तके हे एकाच माध्यम होत. टेक्निकल पुस्तकांची उपलब्धता खरोखर खूप दुर्लभ होती. त्या वेळी कोणतीही कुरिअर सेवा उपलब्ध नव्हती आणि तंत्रज्ञान माहिती मिळविण्याचा एकमात्र मार्ग पोस्टल सर्व्हिसद्वारे होती. अगदी फॅक्स सेवादेखील सुरू केल्या नव्हत्या, परंतु टेलेक्स नावाची प्रणाली होती. आंतरराष्ट्रीय कॉलद्वारे फोनवर विसरा, अगदी राष्ट्रीय स्तरावर फोनवर कॉल करणे देखील कठीण होते. आयात करणे इतके अवघड होते की, एखाद्याला आधी आयात परवाना घ्यावा लागे, शिवाय आयात शुल्क प्रचंड होते. उपलब्ध नवीन सामग्रीची माहिती गोळा करणे, अतिशय अवघड होते. तांत्रिक माहिती मिळविण्यासाठी, एखादा गुरू शोधावा

लागे व हे सर्वांनाच शक्य नव्हते. थोडक्यात, काय तर, अतिशय अल्पशा सुविधा किंवा सपोर्ट उपलब्ध असे.

म्हणूनच एखादी व्यक्तीची भरभराट, ही मिळालेला प्रत्यक्ष कामाचा अनुभव व थोरामोठ्यांचे मार्गदर्शन, केवळ यावरच अवलंबून होती. गेल्या ४७ वर्षांत, या सर्व गोष्टी कशा बदलत गेल्या? हे पहिले की, विश्वास बसणार नाही, हे खरंच आश्चर्यकारक आहे. आज आपल्याकडे स्वतःचा विकास करण्यासाठी अनेक मार्ग आहेत. त्या काळातील जगाच्या तुलनेत, जग आज खरोखरच किती छोटं किंवा संकुचित झालं आहे नाही का? आज एखादी माहिती इंटरनेटच्या माध्यमातून काही मिनिटांत मिळू शकेल. सेल फोन, ई-मेल किंवा व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून आज आपण जगातील कोणाशीही संपर्क साधू शकतो. आता आपण जगाच्या कोणत्याही भागात इंटरनेटवरून, कोणाही बरोबर बैठक आयोजित करू शकत. तांत्रिक साहित्य किंवा नमुने किंवा अगदी पुरवठा मिळवणे इतके जलद झाले आहे. आयात करणे इतके सोपे झाले आहे. जेव्हा मी या घडामोडींकडे वळून पाहतो तेव्हा मी स्वत:ला खूप भाग्यवान समजतो.

मला माझे मामा माझे जी. पी. खाडिलकर, डॉ. अरविंद घाग, श्री. आर. आर. पंडित, श्री. डब्ल्यू.जी. देसाई आणि श्री. जी. आर. कविश्वर, श्री. किशोर कौशिक, डॉ. पी. के. मन्ना, डॉ. रॉय डेक्सबरी या सर्वांनी, जे मार्गदर्शन केले, हवी तो मदत केली, त्याचे मूल्य करता येणे जवळपास अशक्य आहे. आज मी जो काही आहे व आयुष्यात या टप्प्यावर पोहोचलो आहे. त्यामध्ये या सर्व थोर मंडळींचा सिंहाचा वाटा आहे. आजच्या दिवशी माझ्या या सर्व गुरुंचा मी ऋणी आहे. माझ्या सर्व गुरूंचे मी मनापासून आभार मानू इच्छितो. नमस्कार.

जय हिंद! वंदे मातरम!

सुप्रभात मित्रांनो,

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अवसरी, महाराष्ट्राचे

प्राध्यापक डॉ. सदानंद देशपांडे यांनी आयोजित केलेला, कालचा वेबिनार मी यशस्वीरित्या करू शकलो. या बाबतीत मी माझा अनुभव सांगू इच्छितो. वेबिनार आयोजित करणे माझ्यासाठी पूर्णपणे नवीन गोष्ट होती. हा माझा फक्त दुसरा वेबिनार होता. मी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन, माझ्या टिप्पण्यांसकट बऱ्यापैकी करू शकतो. तथापि, उपस्थितांसह माझा स्क्रीन शेअर करून वेबिनार आयोजित करताना, मला एका समस्येचा सामना करावा लागत असे.

माझ्या रेकॉर्ड केलेल्या आवाजाशिवाय पीपीटी कसे शेअर करावे याबद्दल मला अजिबात कल्पना नव्हती. मी फेसबुक, लिंक्डइन आणि अन्य माध्यमांद्वारे पीपीटीमधील तज्ज्ञांच्या मदतीची विनंती केली होती. दुर्दैवाने, मला कोणतीही मदत मिळू शकली नव्हती. परंतु, कालचा हा वेबिनार सुरू असताना, एका तरुण मुलाने मला त्यावर एक पर्याय सुचविला व केवळ या सूचनेमुळे मी हा वेबिनार यशस्वीरित्या पार पडू शकलो. ही सूचना बहुमोल होती व मला त्यामुळे खूप मदत झाली.

मी या तरुण मुलाचे जाहीररित्या आभार मानू इच्छितो व तो कौतुकास पात्र आहे. खरं सांगायचं तर आमच्या उद्योगातील बऱ्याच जणांची अशी भावना आहे की मी स्वतःला पुढे करण्यासाठी तांत्रिक लेख (बऱ्याच वेळा नेटवर उपलब्ध लेख पुन्हा प्रकाशित करत आहे) लिहितो.

माझ्या तांत्रिक लिखाणद्वारे, नवीनतम घडामोडी शेयर करण्याचा माझा हेतू, स्वतःला बढावा देण्याच्या उद्देशाने अजिबात नाहीये. आता ६७ व्या वर्षी याची गरजही नाहीये.

तांत्रिक लेखांचे रिशेअर करण्याचे साधे कारण म्हणजे आमच्या तरुण पिढीला कोटिंग उद्योगातील नवीनतम घडामोडींना माहिती मिळावी. नवीन तंत्रज्ञानाची माहिती, आपल्या तरुण पिढीला देण्यात माझा विश्वास आहे व याचा मला भरपूर आनंद मिळतो.

मित्रांनो, शक्य असेल त्या स्वरूपात आपला अनुभव शेयर करा.

कोविड १९ नंतर लॉकडाऊन उठल्यानंतर बळकट भारताच्या पुनर्निर्माणात आपण हातभार लावू या. शेअर करणे म्हणजे आपले संपूर्ण ज्ञान देणे असा होत नाही. शेअर करण्याने, आपण आपल्या स्वत:च्या अस्तित्वासाठी प्रतिस्पर्धी तयार करत आहात असेही नाही.

एखादी व्यक्ती किंवा संस्था संपूर्णपणे वैयक्तिक नशिबावर आधारित यशस्वी किंवा अपयशी ठरते.

रिलायन्स ग्रुपचे उदाहरण येथे मला एक समर्पक वाटते. ब्रेकअपनंतर एक भाऊ, जगातील एक अव्वल कंपनी घडवू शकतो, तर दुसरा भाऊ, रसातळाला जातो.

सर्व भारतीयांना माझे प्रामाणिक आवाहन आहे की, शेअर करा आणि भारताच्या पुनर्बांधणीत योगदान द्या.

चला येत्या काही वर्षांत भारताला महासत्ता बनवूया.

जय हिंद! वंदे मातरम्!

■ ■

# १७. माझ्या गत जीवनाने मला काय शिकविले?

## १. माणसाने कसे वागावे?

माणसाने कसे वागावे, हे मला प्रामुख्याने माझ्या जवळच्या तीन व्यक्तींनी शिकविले. सर्वांत प्रथम, म्हणजे माझे वडील काका यांनी. त्यांचे संस्कार माझ्या अगदी बालपणीपासून घडत गेले. शक्य तो सर्वांना मदत करावी, काही बंधने आपली आपल्यावर कशी लादावीत हे मी त्यांच्याकडून शिकलो. कोणतेही काम कमी लेखू नये, काम करण्यातील आनंद. एका कामाचा कंटाळा आला की दुसरे काही काम करून आपला कंटाळा कसा घालवावा? काम म्हणजेच परमेश्वर व तीच खरी पूजा हे मी त्यांच्याकडून शिकलो. जगात अशक्य असे काही नाही आपण आपल्या परीने प्रयत्न करीत राहावे यातूनच आपल्याला मार्ग दिसून येतो. अपयशाने खचून न जाता त्या अपयशातून किंवा चुकांतूनच आपण बरेच काही शिकतो हे त्यांनी कुठलीही मॅनॅजमेंटची परीक्षा किंवा अभ्यास न करता स्वतः विकसित केलेली कला होती. सर्व सहकाऱ्यांना जे शक्य असेल ते सहकार्य देऊन, माणसे कशी जोडावी हे मी काकांकडून शिकलो व याची मला माझ्या कारकीर्दीमध्ये अतिशय मोलाची मदत झाली.

**२. आपले हितचिंतक कोण?**

आपले हितचिंतक कोण व आपले विरोधक किंवा टीकाकार कोण हे काळाने फार महत्त्वाचे असते. बऱ्याचवेळा आपली स्तुती करणारेच आपले खरे शत्रू असू शकतात. या उलट आपले टीकाकार आपले गुणदोष आपल्या नजरेस आणून देतात. आपले दोष काय आहेत हे जर वेळेवर कळले तर आपण ते कसे सुधारता येतील यावर विचार करू शकतो, त्यावर मात करू शकतो. स्तुती ही सर्वांनाच आवडते, परंतु ती वारंवार ऐकून आपला आपल्या बाबतीत एक सुखद गैरसमजसुद्धा निर्माण होऊ शकतो. म्हणूनच म्हणतात ना? असावे घर निंदकाचे शेजारी. टीकाकार जे आपल्याला शिकवून जातो ते खरोखरीच बहुमूल्य असते.

**३. मिळाले यश डोक्यात शिरू देऊ नये**

बऱ्याचवेळा कमी श्रमातून मिळालेले यश हे आत्मघातकी ठरू शकते. यश हे नेहमी अथक परिश्रमाअंती मिळाले तर ते कायम स्वरूपी ठरते. आणखीन एक महत्त्वाची बाब म्हणजे, मिळालेले यश कधीही आपल्या डोक्यात शिरू देऊ नये. मी नेहमी परमेश्वराला प्रार्थना करतो की, माझे यश माझ्या डोक्यात शिरू देऊ नको. माझे पाय नेहमी जमिनीवर टेकलेले असू देत. एकदा का आपण हवेत वावरू लागलो की आपला अधःपात हा निश्चित मानावा. या पृथ्वीतलावर जे काही होते आहे त्याचा खरा मालक, हा तो कर्ताकरविता परमेश्वरच आहे. आपण आपले निमित्तमात्र आहोत. जे काही घडते चांगले किंवा वाईट ते त्याच्या इच्छेनुसार घडत असते.

**४. जीवनात रोज आपण काही तरी शिकत असतो.**

यावर माझा अतिशय विश्वास आहे. बरेच वेळा अगदी एखादे लहान मूलसुद्धा आपल्याला बरेच काही शिकवून जाते. आपले डोळे व कान जर का उघडे असतील तर रोज आपण काही तरी नवीन शिकत

असतो. मला, माझ्या जीवनात असे बरेच काही शिकायला मिळाले. एखादी समस्या काही केल्या न सुटणारी, एखाद्या कामगाराच्या सूचनेमुळे सुटल्याचे अनेक वेळा माझ्या कारकिर्दीमध्ये घडले आहे. परमेश्वराने कमी-अधिक प्रमाणात सर्वांना बुद्धी प्रदान केली आहे.

काही उदाहरणे मी देत आहे.

अगदी अलीकडे, मी कीव Ukraine ला गेलो असतानाची, गेल्या वर्षीची. मी एअरपोर्टहून हॉटेलला जाताना टॅक्सी ड्रायव्हरशी इंग्रजीत बोलू लागलो. या ड्रायव्हरने मला जरा थांब अशा अर्थाची खूण केली व त्याचा सेल फोन काढला व तो रशियन भाषेत काही तरी बोलला व सेल फोन मला दाखविला, त्याच्या सेल फोन स्क्रीन वर चक्क इंग्रजीमध्ये एक संदेश मला दिसला. हे पाहून मी थक्क झालो. तो गुगल ट्रान्सलेटर हे सॉफ्टवेअर वापरात होता. या सॉफ्टवेअरमुळे आपण, कोणाशीही, कुठल्याही भाषेत सवांद करू शकतो. या नंतरचा माझा हॉटेलपर्यंतचा प्रवास हा इतका लक्षणीय झाला की, हॉटेल रूममध्ये गेल्यावर, सर्वांत प्रथम मी हे सॉफ्टवेअर माझ्या सेल फोन मध्ये डाउनलोड केले. आता जगात कोठेही प्रवास करायचा म्हटले तरी काही चिंता नाहीये. हे सर्व मला एक दूर देशी एका टॅक्सी ड्रायव्हरने शिकविले.

असे अनेक प्रसंग आहेत जे मला बरेच काही शिकवून गेले आहेत व तेही अगदी जाताजाता.

एबीपी माझाचे जे ब्रीद वाक्य, 'उघडा डोळे पहा नीट,' हे खरेच किती अर्थपूर्ण आहे नाही का? यात आपण एक वाढ करू शकतो, माझ्या मते, 'उघडा डोळे आणि कान, पहा नीट व ऐका ही नीट.'


**५. मला सर्व माहीत आहे, हा समाज आत्मघात करतो.**

एकदा का, मला सर्व माहीत आहे असा समज झाला की, माणसाची प्रगती थांबते हे निश्चित. खरे तर बरेच गोष्टी आपल्याला


माहीतही नसतात.  प्रत्येक क्षेत्रात काही नवीन हे रोज घडतच असते. बऱ्याच गोष्टी आपण प्रवासात, आपल्या दैनंदिन कामात, एखाद्या चांगल्या सिनेमा, नाटकात, टीव्ही  मालिकेत किंवा खेळातूनही शिकत असतो. यासाठी फक्त आपला दृष्टिकोन व स्वतःबद्दलचा फाजील आत्मविश्वास बाजूला ठेवून जगाला शिकवलं पाहिजे.  एखादी नवीन गोष्ट शिकण्याचा आनंद हा काही न्याराच म्हणावा लागेल.

**६. एखादा उत्कृष्ट सिनेमासुद्धा बरेच काही शिकवून जातो.**

माझा यावर फार विश्वास  आहे.  मला अतिशय आवडलेले व बरेच काही शिकवून गेलेले, बरेच सिनेमा किंवा नाटकं आहेत. त्या सर्वांचा उल्लेख करणे जवळपास अशक्य आहे, परंतु काही उल्लेख मी करणार आहे.  या यादीत सर्वांत उच्च ठिकाणी मला हिंदी सिनेमा 'आनंद'चा उल्लेख करावासा वाटतो. (राजेश खन्नाचे काम, जोडीला अमिताभ, रमेश देव व एक छोट्या भूमिकेत जॉनी वॉकर). जीवन कसे जगावे प्रत्येक क्षणाचा आनंद कसा घ्यावा व आपले दुःख विसरून भोवताली सर्वांना कसे आनंदी ठेवावे हे यापेक्षा चांगले कोठे शिकता येईल बरे?




असाच अजून एक सिनेमा मला भावलेला म्हणजे, 'त्रिशूल' (अमिताभ व राखी फेम. अन्यायाचा बदला कसा घ्यावा व वेळ पडताच कसे याच अन्यायी माणसाच्या कामी कसे यावे याच धर्तीवर



अगदी अलीकडील सिनेमा, 'रुस्तुम' (अक्षय कुमार फेम)




**७. निरपेक्ष काम करत राहावे**

आपले काम व इतरांना मदतही बदल्यात कोणतीही अपेक्षा न ठेवता करत राहावे. अपेक्षा ठेवून मदत केली की बरेच वेळा अपेक्षा भंग होण्याची शक्यात असते व त्याचा खूप त्रास होऊ शकतो. जर अपेक्षाच ठेवली नाही तर हा त्रासच होणार नाही.

**८. खरा मालक, कर्ता–करविता आहे**

या जगाचा खरा मालक, म्हणजे कर्ता–करविता, परमेश्वरच होय. आपण फक्त निमित्तमात्र असतो. त्याच्या इच्छेशिवाय काहीही घडत नसते. त्यामुळे आपल्या पदरी पडलेले काम आपण करीत राहावे व हे करताना आपला प्रामाणिक प्रयत्न असावा म्हणजे झाले.

**९. आपल्याला शक्य तेवढी मदत करत राहावे.**

माणसाने आपल्याला जमेल तितकी व जमेल तेव्हा दुसऱ्याला मदत करावी जर तुलना करायचीच झाली तर ती आपल्या पेक्षा उपेक्षित अशा व्यक्तीशी करावी म्हणजे आपणास कितीतरी पटीने परमेश्वराने अधिक दिले आहे याची प्रचिती येते व विनाकारण दुःख होत नाही.

■ ■

## १८. माझ्या पाककृती

नमस्कार मित्रांनो,

आज रविवार. तसे पाहता सध्या रोजच रविवार आहे म्हणा. रविवारचा नाश्ता. एक वेगळी डिश. ही डिश मी सुमन पटघर हिला डेडिकेट करतो. कारण ही डिश तिने मला शिकविली. सुमन ही माझा शारजाहातील सहकारी प्रकाश पटघरची पत्नी.



आजची डिश आहे, रव्याचे थालीपीठ.

**साहित्य :** जाडा रवा, हिरवे मटार दाणे, हिरवी मिरची, कोथिंबीर, जिरे पूड, हिंग, मीठ, तेल, व १ काकडी व १ बटाटा, कीसून.



**कृती :** वरील सर्व मिसळून घ्या. ज्यादा पाणी घालू नका. वरील भिजलेले पीठ/ रवा, १५ मिनिटे झाकून ठेवा.

नंतर, नॉन स्टिक तव्यावर, थापून, मंद आचेवर भाजून घ्या.

एक चविष्ट, पौष्टिक नाश्ता तयार.

काकडीऐवजी दुधीभोपळा, कोहळा, कोबी किंवा मुळासुद्धा वापरता येऊ शकतो. नमस्कार!

**रविवार चा खास बेत. पिझ्झा हट घरी केला.** अगदी सोप आहे.

**कृती :** १. ब्रेड ४ स्लाईस जरासे ओले करून घ्या.




२. नॉनस्टिक तव्यावर मंद अचेत रोस्ट करा, वर थोडं वजन ठेवा.

३. अंडं व चिरलेला टोमॅटो, कांदा, पातीचा कांदा, हिरवी मिरची मीठ, मिसळून घ्या.

४. रोस्ट केलेल्या ब्रेडवर पसरा.

५. वर बटर सोडा

झाला Homemade, crispy, PIZZA, हट,

चला चव बघू या. वाह क्या बात है.

तुम्हाला, चव बघायची आहे?

मग पुढील रविवारी करून बघा. नमस्कार!!



नमस्कार मंडळी, आज वीक एंड? कसला काय सध्या काय रोजच! म्हंटल चला, आज सकाळचा नाश्ता बनवू. लागलो कामाला, आज चा मेन्यू, टोमॅटो ऑम्लेट

सोबत, व्हिडिओ व फोटो जोडले

आहेत. साहित्य व कृती दिसेलच. हल्ली संचारबंदीमुळे एक बरे झाले आहे, आलोच मी, माझ्यासाठी थोडे ठेवा असे म्हणायची सोय नाही. माझी मूठ (झाकलेली) सव्वा लाखाची. आपला अभिप्राय अपेक्षित आहे. नमस्कार !!

नमस्कार मित्रांनो



आजचा नाश्ता, पातळ भाजी, व भारतीय ब्रेड (जड रोट), येताय का? पण काय करणार, कर्फ्यआहे ना? पुन्हा कधी तर जमू या. भारतीय नाश्ता, पदार्थ? अहो जगात तोड नाही हो.

याचा नाश्ता, मी माझी एक आजी, कै. श्रीमती सरला काशिनाथ खाडिलकर, यांच्या स्मृतीला अर्पण करतो. महाराष्ट्रीयन पदार्थ म्हणाल्यावर काही नावं न घेतल्यास राहवत नाही, अगदी बालपणापासून ह्या भाजीची चव अजूनही रेंगाळते आहे. सुरुवात करू.

**मांडे** : माझी काकू कै. श्रीमती शालिनी भा. आठवले यांची आठवण न चुकता येते व त्यानंतर प्रभा आठवले, तसे मांडे पुन्हा कधी खाल्ले नाहीत.

**गुळाची पोळी :** माझी आई फारच छान करायची, आता वयोमानानुसार तिला जमत नाही.

**रवा झटपट थालीपीठ, डोसा, रोटी :** सौ. सुमन प्रकाश पटघर, दुबई, माझ्या अती जवळच्या सहकाऱ्याची पत्नी.

**हिरवी मिरची लोणचे :** माझ्या चुलत सासूबाई, श्रीमती विजया वी. सप्रे

**अतिशय रुचकर, चविष्ट.**

**गुजराथी पदार्थ– उंदीव :** माझ्या सासूबाई, कै. वासंती ग. सप्रे

**मोदक :** श्रीमती प्रतिभा केतकर

**दडपे पोहे :** माझी पत्नी, सौ.प्रथित आठवले

**लावलेले पोहे :** कानडी मध्ये, हचिद अवलक्की, माझे स्वत: केलेले

**कर्नाटक की कढीलिंब चटणी :** माझी आई

**पापलेट व प्रॉन्स :** माझा मामा कॅप्ट सुरेश खाडीलकर यांचा शिपाई – सागवेकर, पनवेल

**फणसाची भाजी, गऱ्याचा शिरा :** डॉ. अविनाश सप्रे याची पत्नी

**बासुंदी व बटाटेवडे :** माझा सहकारी मदन दुसे

तसेच वड्यांसाठी प्रसिद्ध, पनवेलचा वाघे, खोपोलीचे रमाकांत.

ही यादी न संपणारी आहे. पुन्हा काही पदार्थ केला की, शेअर करीन.

तूर्त या पातळ भाजीची कृती

**साहित्य :** २ बटाटे, २ कांदे, २ टोमॅटो, कढीलिंब, लाल तिखट, हळद, जिरे व धणेपूड, तेल, हिंग, मोहरी, चिंच, गूळ, मेथी

**कृती :** १ बटाटा, १ कांदा , २ टोमॅटो चिरून घ्या व मिक्सरमध्ये वाटून घ्या.

गॅसवर कढईत गोडंतेल तापवून, फोडणी करून घ्या, हळद, मोहरी, कडीलिंब, मेथी फोडून घ्या. मग कांदा व बटाटा मध्यम आकाराचा चिरलेला घाला. कांदा तांबूस होईतोवर परतून घ्या. आता, मिक्सर मधील मिश्रण घाला, गूळ व गरम पाण्यात आधीच भिजवून ठेवलेली चिंचेचे पाणी घाला. कढईवर झाकण ठेवून, ५ ते १० मिनिटे उकळू द्या. झाली भाजी तयार.

ब्रेड भाजी, कणकेचे रोट रोटीमेकर मधे करा. ऐटीत खा व खाऊ घाला. नमस्कार !! अजून काही दिवस घरा बाहेर पडू नका. स्वयंपाक घरात जा, वेगवेगळे पदार्थ करून पाहा. या अशा सक्तीच्या सुट्टीचा आनंद घ्या. नमस्कार !!

सीएनएन CNN ची ब्रेकिंग न्यूज:

**कोरोना बाधित :** नियंत्रण ठेवण्यासाठी किंवा बरे करण्यासाठी चहा हे एक स्वस्त परंतु चांगले औषध असू शकते. आम्ही भारतीय भाग्यवान आहोत, अनेक राज्यांमध्ये चहा उत्पादन केले जाते. चहा एक अतिशय कॉमन पेय आहे आणि अगदी गरीब माणसाला सुद्धा परवडणारे.



डॉ. ली व्हेनलिंग, चीनच्या डॉक्टरला ज्यांना कोरोना व्हायरसविषयी सत्य सांगण्यासाठी शिक्षा देण्यात आली आणि नंतर त्याच रोगामुळे मृत्यू झाला.

संशोधनाच्या उद्देशाने केसफाइल्सचे दस्तऐवजीकरण केले होते आणि केसफाइल्समध्ये कोविडचा प्रभाव कमी होण्याचा एक उपचार प्रस्तावित केला होता .

मानवी शरीरावर १९ व्हायरस.

✻ मेथिलॅक्साँथाइन,

✻ थियोब्रोमाइन

आणि

✻ थेओफिलिन ✻

हे रासायनिक संयुगे उत्तेजित करतात जे कमीतकमी सरासरी प्रतिरक्षा प्रणाली असलेल्या मनुष्यामध्ये या विषाणूपासून मुक्त होऊ शकतात.

सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे चीनमधील लोकांना समजण्यास कठीण असलेल्या या गुंतागुंतीच्या शब्दांना प्रत्यक्षात भारतातील चहा असे म्हणतात, होय... आमच्या नियमित चहामध्ये आधीपासूनच या सर्व रसायने असतात. चहामधील मुख्य मेथिलॅक्साँथिन हे उत्तेजक कॅफिन आहे.

चहामध्ये सापडलेल्या अन्य मेथिलॅक्सॉँथाईन्स दोन रासायनिक तत्सम संयुगे आहेत.

थिओब्रोमाइन आणि थिओफिलिन. चहा वनस्पती ही रसायने किडे आणि इतर प्राण्यांना दूर ठेवण्यासाठी एक मार्ग म्हणून तयार करतो. या विषाणूंवरील सर्व उपाय म्हणजे चहाचा एक कप असेल हे कोणाला माहीत असेल आणि म्हणूनच चीनमधील बऱ्याच रुग्ण बरे होत आहेत. चीनमधील रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी दिवसातून तीन वेळा रुग्णांना चहा द्यायला सुरुवात केली. आणि याचा परिणाम शेवटी वुहानमध्ये झाला. या महामारीचा केंद्र अस्तित्वात आला आहे आणि समुदाय प्रसारण जवळजवळ थांबले आहे.

कृपया आपल्या स्वयंपाकघरात चहा रूपात या आशीर्वादांबद्दल त्यांना जागरूक करण्यासाठी आपल्या मित्रांना आणि कुटुंबाला हा संदेश सामायिक करा. प्राप्त केल्याप्रमाणे अग्रेषित केले. हेच कारण असावे कदाचित, जगाच्या तुलनेत भारतात कोरोना बाधित किंवा बळी पडलेले लोक कमी का आहेत. जय श्रीराम जय हिंद जय महाराष्ट्र।

■ ■

# १९. काही न विसरता येणारे क्षण

**सुखद अनुभव : शारजाह येथे पहिलावहिला परदेशातील प्रोजेक्ट केला तेव्हा तेथील कंपनीचे मालक कै. श्री. दिलीप हाटेची साहेब यांची प्रतिक्रिया**

दिलीप हाटे हा यूएईच्या उमाल क्वैन, स्कायलार्कचा मालक होता. मी माझी कन्सल्टन्सी नोकरी पूर्ण केली आणि मी तिथे राहिल्यानंतर जवळपास ४५ दिवसानंतर परत आलो. नंतर एकदा मी किरण परांजपे यांना दहिसर येथे भेटलो. त्याने माझ्या परदेशी सल्लामसलतीबद्दल सहजपणे चौकशी केली. मी म्हणालो की, ''हे मी स्कायार्क समूहासाठी केले.'' त्याला धक्का बसला. ''तो सीएड हाच स्कायलार्क बिल्डर्ससारखा कुरूप आहे, ज्यांचे कार्यालय कबुतरखान्याजवळ आहे, दादर?'' मी ''हो'' म्हणालो. त्याने मला विचारण्यापेक्षा, ''दिलीप हाटे कोण आहे हे माहीत आहे काय?'' मी म्हणालो, ''हो, मी त्याला खूप चांगला ओळखतो. तिथे आम्ही जवळपास ४० दिवस एकत्र राहिलो.'' त्याने



मला विचारले की, ''तो नेहमी कोट घालतो का?'' मी ''हो'' म्हणालो. ''तो नेहमी खिशात हात ठेवतो की नाही?'' असा मला प्रश्न विचारला. मी ''हो'' म्हणालो. ''तो काय करतो? तो कोण आहे हे तुम्हाला ठाऊक आहे का?'' मी म्हणालो, ''हो. मी तुम्हाला संपूर्ण गोष्ट सांगितली आहे. तो अंडरवर्ल्ड डॉन आहे. तो नेहमीच खिशात रिव्हॉल्व्हर ठेवतो. मी ज्याची काळजी घेतो.'' त्याच व्यक्तीने क्षमा मागितली, मला वाईट वाटले आणि मला नमस्कार करण्यासाठी हात जोडून माझा आदर केला. आपण कोणाचीही चिंता करण्याची गरज नाही.

## विक्रम, दुबई येथे माझ्याबरोबर रहा

विक्रम जोशी म्हणजेच मीराचा (रामकाकाची मुलगी) मुलगा. २००५ साली तो दुबईमध्ये नोकरी करीत होता, मी ईजीपीए सोडून फोकस एअरला जॉईन झाल्यावर, शारजाह सोडून दुबई येथे राहू लागलो. बर दुबई या भागात एक फ्लॅट भाड्याने घेतला. सुरुवातीला मी, विक्रम व आदिती असे तिघे राहात होतो. काही दिवसांनी अदिती पुण्यास परत आली व मी आणि विक्रम दोघेच या फ्लॅटमध्ये राहू लागलो. एका रूममध्ये मी व विक्रम व दुसऱ्या रूममध्ये एक पोट भाडेकरू ठेवला. दुबईमध्ये घरभाडे फारच जास्त होते.

आमच्या 1bhk ला जवळपास महिना ६००० डिरहॅम, म्हणजे ७२,००० रुपये होते. लाईट व पाण्याचे बिल दरमहा साधारणपणे १२०० दिराम म्हणजेच १५००० रुपये इतके होते. विक्रम तेव्हा देवल्टचं मार्केटिंग एक्स्क्लुझिव्ह होता. फावल्या वेळात तो अकाउंटन्सी संबंधी एक दूरस्थ शिक्षण कोर्स करीत होता. विक्रम हा स्वभावाने अतिशय गरीब व शांत मुलगा होता. त्याच्या काही गमती. दुबईमधे त्याने दुपारी अंडी खाण्याचा जणू रतीब लावला. एक कप दूध व त्यात ६ अंडी घेऊ लागला. मी त्याला समजविले की, ''विक्रम, अंडी खूप उष्ण

असतात. तेव्हा एकदम ६ अंडी घेत जाऊ नकोस.'' त्याने माझी सूचना लगेच मान्य केली व म्हणाला, ''ठीक आहे मामा, आजपासून फक्त ५ अंडी घेत जाईन.''

संध्याकाळी त्याची ड्यूटी संपून परत आला की तो अभ्यासाला लागे. मला माझी ड्यूटी करून परत आल्यावर भरपूर वेळ असे, रात्रीचे जीवन व सकाळचा नाश्ता मी बनवत असे. मी केलेले सर्व पदार्थ तो आवडीने खात असे. खास करून आंब्याची डाळ त्याला खूप आवडत असे. तसेच, तूर डाळीचे वरण त्याला फार आवडत असे. तो म्हणायचा, ''आमच्याकडे पुण्याला घरी कायम मूग डाळीचे वरण असते.'' मी त्याला म्हणालो, ''म्हणजे अगदी मूग गिळून गप्प बसणे.''

**रवी कुकडे**

साधारणपणे १ वर्षानंतर विक्रमची बदली कुवैतला झाली. काही दिवस मी फ्लॅटमधे एकटा पडलो, परंतु लवकरच मला पुण्याचा रवी कुकडे हा खोली भागीदार म्हणून मिळाला. लवकरच माझे व रवीचे चांगले मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले. रवीसुद्धा एक अतिशय सरळ माणूस. मी जे करीन ते आवडीने खात असे. एके दिवशी रवीचे वडील अचानकपणे हार्टअ‍ॅटॅकने वारल्याचा फोन आला, मग त्याला जी लागेल ती मदत मी केली. साधारणपणे ४ ते ५ तासात त्याची दुबई ते पुणे प्रवासाची ववस्था केली.

विकास कासलीवाल यांची मामाला नोकरी देण्याची तयारी, कारण त्यांनी, मी पंकज टायर सोडून १० वर्षांनंतर ही मला विनंती मान्य केली होती. विकास कासलीवाल म्हणजे, मी पंकज टायर, इंदोर येथे नोकरी करीत असतानाचे माझे साहेब. जगदीश मामाने आर्मीची नोकरी सोडल्यावर प्रायव्हेट सेफ्टीमध्ये नोकरी पाहात होता. एकदा तो मला

म्हणाला की, ''तुझ्या ओळखीत कुठे संधी असेल तर पाहा.'' मला एकदम विकास बाबूची आठवण झाली, कारण 'कुमार'मध्ये रिटायर्ड आर्मी ऑफिसर, सिनियर जागेवर काम करीत होते. मी विकासबाबूला फोन लावला. त्यांनी माझा फोन लगेच घेतला. मी त्यांना सांगितले की, ''माझा मामा, आर्मीतून रिटायर झाला आहे व नवीन नोकरीच्या शोधात आहे. ते म्हणाले, ''तुझा मामा म्हणजे माझा मामा असल्यासारखे आहे.'' मला लगेच भेटायला सांग.'' मामा त्यांना भेटायला, श्रीराम मिल, मुंबई येथे गेला. विकासबाबूनी मुलाखत तर घेतली नाही, उलट मामाला, श्रीराम मिल व एस. कुमारच्या एकंदर कारभारासंबंधी माहिती दिली व कोठे व केव्हा जॉईन होऊ शकता असे विचारले. त्यानंतर मामाला सौदीला दुसरी नोकरी मिळाली. त्यामुळे तो विकास बाबूंना जॉईन होऊ शकला नाही. या सर्व घटनेचा एक प्रकारे मला आनंद झाला तो हा की, मी काम सोडल्यावर १० वर्षांनी फोन केल्यावर त्यांनी मला जो प्रतिसाद दिला तो खरोखरीच चांगला होता पंकज टायर येथे अल्पावधीत त्यांचा विश्वास कमावला असा त्याचा अर्थ होता

**मामा करंदीकर ओकाची मिसळ**

मामा करंदीकर म्हणजे एक अवलिया माणूस. जे मनात येईल ते करणारा. मिसळ पाव म्हणजे, ''मे रे'' भंगार खाणे असे म्हणत जवळपास दररोज संध्याकाळी मिसळ खाणारा. मामा म्हणजे एक हरहुन्नरी व्यक्ती. विनोद बुद्धी तर त्याच्यात ठासून भरलेली होती. वेगवेगळे प्राण्यांचे आवाज काढण्यात तर तरबेज. एकदा सुभाषच्या घरासमोरील भींतीवरून एक मांजर जात होते, मामाने बोक्याचा असा काही आवाज काढला की ते मांजर एकदम टरकले व घाबरगुंडी उडून भिंतीवरून खाली पडले.

मामाचे एक वैशिष्ट्य म्हणजे ज्याच्यावर जीव जडेल त्याला, नेसलेले सोडून देणारा होता. असंच त्याचा एक मित्र म्हणजे सुर्वे. सुर्वेला त्याने बरीच आर्थिक मदत केली होती. नंतर त्याचे याच्याशी का बिनसले काही कळले नाही, एके दिवशी त्याने सुर्वेला गळ्यात घातलेली सोन्याची साखळी विकण्यास भाग पाडून आपले पैसे वसूल केले. काही दिवसांनी मामाची बदली पुण्याला झाली व नंतर आमचे पुढे फारसे संबंध राहिले नाही.

मामा पनवेलला भेट देण्यासाठी, बनियनवर प्रवास करण्यास सदैव तयार असे. माझे व प्रथिताचे लग्न १९८० साली झाले. त्या वेळी मानस (सुभागाचा मुलगा) अगदी छोटा होता. बहुतेक ५ वर्षांचा होता. मी पार्ल्याला गेलो की, तो मला कायम चिकटत असे. मी त्याला खूप आवडत असे. मी पनवेलला येणार का असे विचारले की तो एका पायावर तयार असे. एकदा तर मी असेच विचारल्यावर तो घाईघाईत बनियनवर माझ्या स्कूटरवर जाऊन उभा राहिला. मी त्याला न घेता जाऊ नये म्हणून. पनवेलला आला की ५ ते ६ दिवस राहात असे. मी व प्रथिता कामावर गेल्यावर माझ्या आईबरोबर राहात असे व पायोनियर सोसायटीमधे घराबाहेर एकटा खेळत असे. अधूनमधून 'आज्जी, तू आहेस ना?' असे खिडकीतून विचारून परत खेळायला जात असे. अतिशय लाघवी असा हा मुलगा बघता बघता मोठा झाला. आता सिंगापूरला असतो, पण पुण्यात आला की आमची नेहमी भेट होते.

**मानस (सुभागाचा मुलगा)**



## पार्ले येथे पु. ल. देशपांडे यांची भेट

अप्पा सप्रेंचे (माझे सासरे) अनेक नावाजलेले मित्र होते.

विलेपार्लेला गेलो की या थोर मंडळींना भेटायची संधी मिळत असे. हे मित्र म्हणजे पु. ल. देशपांडे, गानूकाका, मल्लिकार्जुन मन्सूर, बनहट्टी काका, रवी दाते (अरुण दाते यांचे धाकटे भाऊ) विनीत काका.



अप्पांनी लिहिलेल्या पुस्तकाचे (कामाची किमया- मराठीमध्ये व वर्क एथिक्स- इंग्रजीमध्ये) प्रकाशन, २००४ साली पु. ल. देशपांडे सभागृहात झाले. प्रकाशनप्रमुख म्हणून श्री. दत्ता नलावडे लाभले होते. या प्रकाशनच्या वेळी पु. लं. पार्ल्याला घरी आले होते. या दरम्यान २ ते ३ वेळा पु. लं. शी प्रत्यक्ष गप्पा मारण्याचा योग आला होता. गानूकाका तर काय सप्रे कुटुंबाचे एक सदस्यच जणू. त्यांच्याशी माझे खूप छान मैत्रीपूर्ण संबंध तयार झाले होते.

औरंगाबाद येथे ज्ञानेश्वर पाटील यांना अपघात झाला, या वेळी मी त्यांना वेळीच मदत करू शकलो. मी औरंगाबाद येथे फ्लेक्सो फिल्ममधे काम करीत असेन. पाटील, आमचे मशीनचे कंट्रोल पॅनेलचे काम करण्यासाठी आला होता. माझी व यांची आधीपासूनची ओळख होती. एक दिवशी आमचे काम संपवून परत जात असताना त्यांच्या रिक्षाला अपघात झाला. पाटील यांचा हात मोडला. हॉस्पिटलमध्ये भरती व्हावे लागले व ताबडतोब ऑपेरेशन करावे लागणार होते, जवळ पैसे नव्हते. त्याचा मला फोन आला. मी लगेच हॉस्पिटलमध्ये पोहोचलो. जी आर्थिक मदत हवी होती ती केली. ४ ते ५ दिवसांनी ते मुंबईला परत गेले, कालांतराने त्यांनी माझे पैसे परत केले, परंतु एक मित्र कायमचा जोडला गेला. अजूनही आम्ही एकमेकांच्या संपर्कात आहोत

एक्सप्रेस वे मॉलवर सुनील बर्वे भेटला. सा रे गा मा पा मधील चांगल्या कामगिरीबद्दल मी त्याचे अभिनंदन केले. एकदा मुंबईहून पुण्याला परतत अजून असताना, समोर अचानक सुनील बर्वे आला. मी त्यांना म्हटले, ''तुमचे गाणे ऐकतो व मला ते आवडते.'' यावर तो खूश झाला व म्हणाला, ''मग मला वोट कर.'' त्या वेळी, कलाकारांसाठी सा रे गा मा पा हा कार्यक्रम सुरू होता.

पुणे विमानतळावर राहुल देशपांडे यांची एकदा भेट झाली. वसंतराव यांच्या 'तिलारी धरण' येथे त्यांचा एक खासगीत कार्यक्रम झाला होता त्या कामगिरीबद्दल मी त्यांना एक घटना सांगितली. मी त्यांना विचारले की, एक फोटो घेऊ का? ते लगेच ''हो'' म्हणाले. मी फोटो घेतला व त्यांना म्हटले, ''तुमचे आजोबा, वसंतराव यांच्याबद्दल एक किस्सा सांगू का?'' ते ''हो'' म्हणाले. मग मी सुरूमामाने मला सांगितलेला किस्सा त्यांना ऐकविला. ''एकदा वसंतराव, मामाकडे, सावंतवाडीला मुक्कामाला गेले होते. मामाचा एक मित्र विक्रम लिमये व वसंतराव हे दोघे मित्र, त्यामुळे हा योग जुळून आला होता. तर या मुक्कामी वसंत राव यांचा एक खाजगी कार्यक्रम, तिलारी धरणावरती एका संध्याकाळी ठरला. पावसाळ्याचे दिवस होते व तिलारी धरणामध्ये पहिल्यांदा पाणी साठविले जाणार होते. वसंतराव नेहमीप्रमाणे एकदम तल्लीन होउन गाऊ लागले. बहुतेक राग मेघ मल्हार गात होते, मधेच मामा म्हणाला, ''वसंतराव जी बेताने घ्या, ह्या धरणाचे कॅचमेंटचे हे पहिलेच वर्ष आहे.'' यास वसंतरावांनी भरभरून दाद दिली होती.

वसंतराव मामाला म्हणे, ''माझे एक काम आहे, जमले तर पाहा.'' मामा म्हणाला, ''हुकूम करा.'' वसंतराव म्हणाले, ''जांभूळ झाडाच्या लाकडाचे एक वाडगे मिळाले तर पाहा.'' मामाने लगेच एका सहकाऱ्याला आदेश दिला व दोन दिवसात एक मोठे घंगाळे बनवून तो घेऊन आला. ''वसंतराव क्या बात है! आता मी पुण्याला गेलो की अख्ख्या वाड्यात सर्वांना हे जांभूळ पाणी पाजतो.''

**प्रभाकर जाईल, हे आडनाव कसे पडले? सालढाणा साहेब तर मैदानातून किंवा रणांगणातून पळून जाईल.**



पनवेलच्या कोकण रबरमधील एक आठवण. आमच्यासमोर सुधाकर प्रॉडक्टस् ही कंपनी होती. येथे दोन मालक होते एक प्रभाकर जाईल. आम्ही त्यांच्या टाक्याचे ॲसिड प्रूफ लीनिंगचे काम करीत असू. त्यामुळे जाईल साहेबांची व माझी चांगली दोस्ती झाली होती. दररोज दुपारी मी कंपनीत सर्वांना चहा करायचो. जाईल साहेब बरोबर त्या वेळी, ''काय श्रीकांत चहा झाला का? म्हणजे येतो.'' असे जाळी पलीकडून विचरायचे व लगेच यायचे. मग थोड्या गप्पागोष्टी व्हायच्या. सालढाणा साहेबही जाईल साहेबांचे मित्र होते. सालढाणा साहेब नेहमी त्यांची चेष्टा करायचे, 'जाईल हे आडनाव कसे पडले तर, लढाईतून पळून जाईल, अशा काही प्रसंगामुळे पडले असावे.' असे म्हणत. येथे नमूद करावेसे वाटते, सालढाणासाहेब हे खरोखर विद्वान होते. संस्कृत भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते, ते ख्रिश्चन होते परंतु कधी चर्चला गेलेले मला तरी आठवत नाही. आडनावावरून अशीच एक गंमत. सालढाना साहेबांचा मित्र परिवार खूपच दांडगा होता. सुरु मामासुद्धा त्यांचा चांगला मित्र होता. एकदा त्यांचे मित्र किशोर जोगळेकर व वहिनी, सालढाणासाहेबांकडे राहायला आले होते. पनवेल इंडस्ट्रीयल इस्टेटमधे अजून एक मोठी व्यक्ती, श्री. आडमुठे या नावाची होती. ते तेव्हाचे मुखमंत्री वसंतदादा पाटील यांचे जवळचे होते. तर या आडमुठे साहेबांविषयी काही तरी बोलणे सालढाणा साहेबांच्या घरी चालू होते. ते संभाषण संपल्यावर जोगळेकर

वहिनींनी सालढाणा साहेबांना एक प्रश्न विचारला, ''ते आडमुठे साहेब, म्हणजे आडनाव आहे की साहेबच आडमुठे आहेत?'' यावरून बराच हशा पिकला.

**छाया लाड वर छायागीत ही जाईल साहेबांची टिप्पणी**

सालढाणा साहेबांची वैयक्तिक सेक्रेटरी होती, मिस छाया लाड. सालढाणा साहेब तिचे खूप कौतुक करीत असत. जाईल साहेब हे तसे फार मिश्कील होते, एकदा आमच्या कंपनीत चहा-पान चालू होते, योगायोगाने सुरुमामा त्या दिवशी आला होता, जाईल व सुरूमामा हे चांगले मित्र झाले होते. विषय सालढाणा साहेब यांच्यावर सुरू होता. जाईल म्हणाले, ''सालढाणा साहेबांकडे गेलो होतो. अमुक एक काम होते.'' सुरुमामा म्हणाला, ''मग काम झाले की नाही?'' जाईल म्हणाले, ''हो झाले ना, पण त्यापूर्वी बराच वेळ छायागीत ऐकावे लागले.'' (म्हणजेच छायाचे कौतुक) यानंतर 'छाया गीत' हा जणू काही कोड वर्ड झाला होता।

कामानिमित माझा विमान प्रवास खूप घडला. अशाच एक प्रवासाबद्दल. बाहेरील देशातून मी एअर इंडियाने दिल्लीला आलो होतो. दिल्लीतील हे विमान इतके स्मूथ लँड झाले की, मी विमानातून बाहेर पडलो व पायलट बाहेर येईस्तोवर मुद्दाम थांबलो. काही वेळाने पायलट बाहेर पडला. मी त्याच्यासमोर जाऊन 'एक अतिशय स्मूथ लँडिंग झाल्याचा अनुभव आला.' असे सांगून त्याचे अभिनंदन केले. पायलटला सुद्धा हा एक सुखद धक्का असावा, शेवटी पायलटसुद्धा एक माणूसच आहे व एखाद्याने कौतुक केले तर त्याबद्दल निश्चितच आनंद झाला असावा.

१९७५ साली मी एलपीआरआय रबर टेक्नॉलॉजीच्या परीक्षेत झालेल्या पहिल्यांदा नापास झालो. अपयशाबद्दल काकांनी मला लिहिले होते. १९७५ साली मी एलपीआरआय किंवा रबर टेक्नॉलॉजीच्या

परीक्षेत नापास झालो. माझ्या आयुष्यातील नापास होणे हा एकमेव प्रसंग होता. या अपयशाने मी अगदी निराश झालो होतो. अभ्यास मी मन लावून केला होता, परंतु, कुठे तरी  कमी पडलो होतो. परंतु एके दिवशी मला काकांचे पत्र आले. त्यात त्यांनी मला धीर देण्याचा एक उत्कृष्ट प्रयत्न केला होता. मला दिलासा दिला होता, त्यांनी लिहिले होते की, 'अपयशाने तू खचून जाऊ नकोस. शांतपणे तू कोठे कमी पडलास याचा विचार कर व  पुन्हा एकदा अभ्यासाला लाग. मला खात्री आहे तू १९७६ साली नक्की यशस्वी होशील.' मला या पत्रामुळे खूप उभारी मिळाली व मी परत एकदा जोरात अभ्यास सुरू केला व पास झालो.

ही हकिकत धारवाड येथे कॉलेजचे शिक्षण चालू असतानाची आहे. धारवाडला मी व मित्र सिनेमा बघायला जायचो. त्या काळी, ड्रेस सर्कलसाठी तिकीट दर होता ८५ पैसे व बाल्कनी १ रुपया ८५ पैसे. आम्हा सर्व मित्रांना, बाल्कनीमध्ये बसून सिनेमा बघणाऱ्या लोकांबद्दल फार आदर वाटत असे. आम्हाला वाटे की, हे लोक किती श्रीमंत आहेत?

१९७६ साली मी धारवाडला कर्नाटक कॉलेजमध्ये शिकत असताना आमचे कॉलेज कँटीन हेमाडे नावाचे एकजण चालवले होते. तेव्हा बटाटावडा २५ पैसे व चहा १० पैसे असे. १९७६ साली मी धारवाडला कर्नाटक कॉलेजमध्ये शिकत असताना मराठी बोलणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल यांना खास प्रेम होते. आम्ही मित्र मंडळी या कॅन्टीनमधे येथे भरपूर खाऊन पैसे देताना, २ ते ३ प्लेट कमी सांगून या मालकांना गंडवत असू. आम्ही गंडवितो याची कदाचित या मालकांना कल्पनासुद्धा असेल, परंतु मराठी मुले म्हणून ते कदाचित दुर्लक्ष करीत असावेत.

कोकण रबरमध्ये काम करीत असताना आमची ओळख, दिलीप कडवे व म्हापसेकर यांच्याशी झाली, त्यांची खालापूरजवळ खरसुंडी येथे, रबर रोल बनवायची कंपनी होती. तेथे त्यांना काही ना काही

अडचणी येत असत. मी व भाऊमामा त्यांना सर्व तांत्रिक मदत कायम मोफत करीत असू.

एकदा मी त्यांच्या शिवडी, मुंबई येथील वर्कशॉपमध्ये गेलो होतो. काही कच्चा माल ताबडतोब खरसुंडी येथे घेऊन जाणे गरजेचे होते. दिलीपला दुसरे काही तरी तातडीचे काम होते, म्हापसेकरांना गाडी चालवता येत नव्हती. मी त्यांना म्हणालो, ''काळजी करू नका. मी घेऊन जातो. संपूर्ण भरलेली गाडी मग मी एकटा घेऊन गेलो. रोल बनविण्यासाठी मदत म्हणून बऱ्याचवेळा मी या कंपनीत जात असे. संध्याकाळी उशिरापर्यंत काम चालत असे. या कंपनीत, एक कामगार होता काशी कुटे, तो कंपनीतच राहात असे व चौकीदाराचेही काम करत असे. काशी आम्हा दोघांसाठी भात व दाल तडका करीत असे. अगदी साधे जेवणही वेळेवर मिळत असे. त्या जेवणाची चव अजूनही आठवते.

**दुःखद**

माझ्या वडिलांच्या निधनानंतर माझ्या आयुष्यातील सर्वांत दुःखी क्षण. म्हणजे ज्या दिवशी आम्ही डॉ. प्रकाश घाटगे यांना गमावून बसलो. डॉ. प्रकाश हे माझे साडू. ते गेले त्या दिवशी आम्ही सारे त्यांच्या प्रभात रोडजवळील घरी जमलो होतो. मला तारीख आठवत नाही, पण २००१ च्या अखेरीस रात्रीचे जेवण झाले व आम्ही आमच्या घरी पौड रोडला येण्यासाठी निघालो. सखारामपणे १५ ते २० मिनिटांत आम्ही घरी पोहोचलो. लगेचच आमच्या लँडलाईनवर एक फोन आला आणि म्हणजे डॉ. प्रकाश यांची मुलगी मला सांगत होती की, डॉ. प्रकाश काही मिनिटांपूर्वी वारले. हा एक प्रचंड धक्का होता, झाला होता. आम्ही सर्व डॉक्टरांच्या घर निघालो आणि काही मिनिटांत त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. ते कोसळले व त्यातच ते गेले. डॉ. प्रकाश अतिशय सभ्य, शांत, कायम, हसरा चेहरा व कोणालाही मदत करावयास सदैव तत्पर असा देवमाणूस. मी त्यांना कधीही

कोणत्याही प्रकारच्या ताणतणावात किंवा चिडलेले पहिले नव्हते. आमच्या सर्व कुटुंबाला ते एक मोठा आधार होते. औषधांच्या उपचारांसाठी आम्ही त्याच्याकडेच जात असत. केवळ डॉ. प्रकाश यांनी उपचार केल्यामुळे विभूषा बरी होऊ शकली. डॉ. प्रकाश व माझे काका डॉ. भास्कर आठवले यांच्यात प्रचंड साम्य होते आणि ते म्हणजे त्यांची परीक्षा, उपचार इतरांना मदत करण्याची इच्छाशक्ती व पैशाचा विचार कधीही न करणे.

दंत चिकित्सक डॉ. लिमये यांचे निधन झाले. त्यांचा मृतदेह माझ्या मारुती व्हॅनमध्ये ठेवला. पनवेलचा माझा जिवाभावाचा मित्र, मित्रच कारण, रक्ताचे नाते नव्हते, परंतु त्याहीपेक्षा जवळचे. सुभाष कुलकर्णी व त्याची  बायको नीलम या दोघांनाही मी त्याचा सख्खा भाऊच वाटतो. गंमत म्हणजे आमची मैत्री झाली तेव्हा सर्व अविवाहित होतो. नंतर सर्वांत आधी सुभाषचे, नंतर माझे मग भाऊ जोशीचे व शेवटी मामा करंदीकरचे लग्न झाले. लग्नानंतरही आमची ही मैत्री अजूनही टिकून राहिली आहे. आमच्या बायकाही एक मेंदीच्या मैत्रिणी झाल्या व आमची मुलेसुद्धा जवळचे मित्र किंवा मैत्रिणी डॉ. लिमये, हे सुभाषचे सासरे व पनवेलचे नामांकित दंतचिकित्सक. डॉ. लिमये यांना हार्ट ॲटॅक आला व काही उपचार दरम्यान त्याचे  निधन झाले. त्या दिवशी दुर्दैवाने पनवेलमधे एकही ॲम्ब्युलन्स  उपलब्ध नव्हती. मग मी व  सुभाषने माझ्या मारुती व्हॅनमधून, दोन्ही दारे उघडी ठेवून त्यांचा देह त्याच्या घरी नेला. एकदा  मित्र म्हटले की, मग मागचा पुढचा विचार करायचा नसतो? होय की नाही?

माझ्या आयुष्यातील काही दुःखद क्षण जसे की काकांचा अकाली व अकस्मात मृत्यू. हा मी माझ्या आयुष्यात पाहिलेला पहिला मृत्यू. आपल्या नातेवाईकाचा मी पाहिलेला पहिला मृत्यू. तोही माझ्या वडिलांचा. ३१ जुलै १९७८, रात्री ९ ते दुसरे दिवशी, दुपारपर्यंत, मिनिट आणि मिनिट मला अजूनही आठवते. अशी काही दुःखद घटना

घडली माणूस एकदम १० ते १५ वर्षांनी परिपक्व होतो असे म्हणतात ते काही खोटे नाही.

**भाऊकाका (राजश्री मामीचे वडील)**

राजश्री मामीचे वडील म्हणजे भाऊकाका सखदेव. भाऊकाका, अमरनाथ यात्रेला गेले होते. जवळपास १५ वर्षं होऊन गेली असतील या घटनेला. या यात्रेत एकेदिवशी तुफान आले. प्रचंड प्रमाणात हीम वर्षाव झाला व  बरेच यात्रेकरू बेपत्ता झाले. भाऊकाकांचाही काही ठावठिकाणा लागत नव्हता. मामी व मामा साहजिकच अतिशय काळजीत होते. मी सारखा त्यांच्या घरी चौकशीसाठी जात होतो. काहीच माहिती मिळत नव्हती, आणि एक दिवशी बातमी आली की, काही मृतदेह सापडले आहेत. मामा लगेच  तेथे गेला व ज्याची भीती होती तेच नेमके झाले होते. भाऊकाका  या तुफानाचे बळी ठरले होते. त्यांचे शरीर जवळपास १५ दिवसांनंतर  सापडले होते. या १५  जो ताण व तणाव मामी व मामाने भोगला आहे त्याची मला पूर्ण जाणीव आहे.

**अनुराधाचे दुर्दैवी निधन**

११ मार्च २००६ साली अनुराधाचे (जगदीशमामा व राजश्री मामीची मुलगी, आम्ही सर्व तिला 'अंट्टू', म्हणायचो) निधन झाले. खरे तर तिने प्रेमभंगातून आत्महत्येचा दुर्दैवी निर्णय घेतला. आम्हा सर्वांना तो एक प्रचंड मोठा धक्का होता. या दरम्यान मी शारजाहाची नोकरी सोडून पुण्यास परत आलो होतो व दुबईला परत जाण्यासाठी व्हिसाची वाट बघत होतो. ११ मार्चला मी मुंबईत होतो, काही कामासाठी गेलो होतो, दुपारी भाऊमामाचा फोन आला. ही अतिशय वाईट बातमी मला कळली. मी लगेच हिंदुजा हॉस्पिटलजवळ, जेथे अंट्टू राहात असे तेथे गेलो. भाऊमामा आधीच पोहोचला होता, थोड्या वेळात जगदीश मामा व मामी पुण्याहून आले. नंतर आम्ही पोस्टमार्टेम झाल्यावर मृतदेह सायन हॉस्पिटलच्या शवागारात ठेवला. दुसरे दिवाशी सायन येथेच अंत्यसंस्कार करून आम्ही सर्व जण पुण्यास परत आलो. या

नंतर मी बरेच दिवस मामा-मामीकडे जात असे. पुढे काही दिवसांत दुबईचा व्हिसा आला व मी एप्रिल किंवा मे महिन्यात दुबईला गेलो.

## राहुलचे अकस्मात निधन

मी दुबई येथे असताना, अजून एक दुःखद घटना घडली. २००८ मध्ये ऑगस्ट महिन्यात, राहुलचे अकस्मात निधन झाले. आम्हा सर्वांना तो एक मोठाच आघात होता. मी प्रथिताला बजावून सांगितले होती की, मला अशा बातम्या फोनवर सांगत जाऊ नको.

याचे कारण म्हणजे, एकटे व परदेशी राहात असताना आपले एखादे अतिशय आवडते माणूस गेले तर त्याचा प्रचंड मानसिक दबाव येतो व काही केल्या ही घटना स्वस्थ बसू देत नाही, परंतु तिचाही नाइलाज होता. मग राजश्री  मामी म्हणाली, ''ते काही नाही आपण त्याला फोन करून सांगूया. माझा तर यावर विश्वास बसणे अशक्य होते. अगदी लहानाचा मोठा झालेला मी पाहिले होते व आता तो या जगात नाहीये हे मनास काही केल्या पटत नव्हते. दुबईतील कंपनीत महत्त्वाचे काम चालू होते त्यामुळे मला लगेच निघता आले नाही, परंतु २ दिवस रजा घेऊन मी त्या दिवशी कार्यालयात पुण्यास आलो. हे सर्व कार्य चालू असतानासुद्धा, ते राहुलचे शेवटचे कार्य चालू आहे यावर अजूनही विश्वास बसत नाही. खाडिलकर कुटुंबाला दोन वर्षांत दोन प्रचंड मोठे आघात सहन करावे लागले, दोन्ही अतिशय दुर्दैवी अकाली व माझी खूप जवळची भावंडे भुर्र करून उडून गेली. परमेश्वराच्या मनी काय चाललेले असते हे खरंच आपल्याला काळात नाही. असे म्हणतात की, त्यालाही चांगली माणसे फार आवडतात. मग मला असे ही वाटते की, जी दीर्घायुषी असतात, ती माणसे त्याला आवडत नसावीत.

**नीताताईंचा मुलगा प्रसाद :** आमच्या कुटुंबातील ज्या मृत्यूमुळे मला सर्वांत जास्त वाईट वाटले तो म्हणजे नीताताईंचा मुलगा प्रसाद.

प्रसाद वकील होता. तो फक्त माझा भाचाच नव्हता तर तो माझा खूप चांगला मित्र होता. कावीळ झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. २००६ साली त्या वेळी मी दुबईत होतो. मला खरोखरच धक्का बसला होता. हा धक्का पचविणे शक्य झाले नाही. मी स्वतः २ ते ३ दिवस तापाने फणफणलो. यानंतर मी प्रथिताला सांगितले की या पुढे, अशी एखादी वाईट घटना घडली तर मला कृपया कळवत जाऊ नका. मी एकटा असल्यामुळे मला त्याच खूप टेन्शन येते.

**पक्या लेले, माझा बालपणचा मित्र :** आणखी एक मृत्यू जो मी अनेक वर्षांनंतरही विसरलो नाही, तो म्हणजे प्रकाश लेलेचा म्हणावा लागेल. लेले एक गरीब, पण प्रेमळ कुटुंब सांगलीला खाडिलकर वाड्यात आमचे शेजारी होते. मी प्रत्येक उन्हाळ्याच्या सुट्टीत आईबरोबर सांगलीला आजोळी जात असे. पक्का माझा चांगला मित्र होता. एका सुट्टीनंतर आम्ही धारवाडला परत गेलो. आईला माझ्या आजोबांनी सांगलीहून पत्र पाठविले होते. तिने मला सांगितले की, आजारपणामुळे पक्याचा मृत्यू झाला आहे. प्रत्येक सुट्टीत बराच वेळ आम्ही एकत्र खेळायचो. पक्या गेला याचा मला एक भयानक धक्का बसला. मी हे कधीच विसरू शकत नाही. पुढील सुट्टीत सांगलीला गेल्यावर मला वाटे की, जे काही आपण ऐकले ते खोटे असेल व पक्या मला भेटेल, पण असे नाही होत. पक्याच्या अकाली मृत्यूमुळे त्याची मोठी बहीण शकू माझ्याशी खूप खेळायची. पक्याला जाऊन ६० वर्षांनंतरही मला त्याचा चेहरा अजूनही आठवतो.

धनंजय आणि मी. आम्ही खूप चांगले मित्र होतो. हर्षद मेहता घोटाळा दरम्यान त्याने शेअर्स मार्केटमध्ये मोठी रक्कम गमावली. तो फारच सज्जन होता, परंतु या शेअर मार्केटच्या घोटाळ्यात तो पूर्णपणे उद्ध्वस्त झाला, यानंतर काही वर्षांत त्याचे पुण्यात निधन झाले.

धनंजय केतकर आणि विष्णू काकांच्या प्रतिभा हिचे ८ मे १९८० रोजी लग्न झाले. तर माझे व प्रथिताचे ३१ मे १९८० रोजी.

धनंजय हा  फक्त माझा साडू नव्हता तर तू माझा खूप जवळ मित्र झाला होता. तो आणि त्याचे कुटुंब पनवेल येथे विशेषत: गणेश चतुर्थी उत्सवासाठी अनेक वेळा येत असत. धनंजय सिबा फार्मा येथे, अकाउंटस् विभागात काम करीत होता. हर्षद मेहता घोटाळ्याच्या वेळी धनंजयने सर्व काही गमावले, स्वतःचे घर, त्याच्या आईवडिलांचे घर विकावे लागले.  विष्णू काका आणि अजयलासुद्धा बरेच काही विकावे लागले. विशेषत: धनंजय या शॉकमधून पुन्हा कधीच सावरू शकला नाही. हा मधुमेहाचा रुग्ण होता. विलेपार्लेहून पुण्याला स्थलांतरानंतर सुमारे १ ते दीड  वर्षांत  मधुमेहाने तो मरण पावला. एक अत्यंत दयाळू स्वभाव आणि प्रेमळ व्यक्तिमत्त्व म्हणून मला आताही त्याची आठवण येते. हे सर्व दुर्दैवी आहे, परंतु नशिबापुढे कोणाचेही काही चालत नाही हेच खरे.

## मजेशीर

माझ्या मित्राचा पळून जाऊन प्रेमविवाह

पनवेल येथे माझ्या जवळच्या मित्राच्या लग्नाचे रंजक वर्णन करण्याची इच्छा आहे. मी त्याचे नाव सांगू इच्छित नाही, पण माझ्यासाठी अगदी रोमांचकारी अनुभव होता. पनवेल येथील एका मुलीवर त्याचे प्रेम होते. मुलीचे वडील होते, प्रख्यात डॉक्टर.

एक दिवस या मुलीने जाहीर केले की, ती एका मुलाच्या प्रेमात पडली आहे आणि तिला लग्न करण्याची इच्छा आहे. हे तिच्या घरी कोणासही पसंत नव्हते म्हणून मग तिला दूर अज्ञात जागी हलविण्यात आले.

माझ्या मित्राला तिला कोठे हलविले आहे याची कुणकुण लागली. मला त्याने ही बातमी सांगितली. त्यानुसार माझा मित्र व मी एक दोन दिवसात मुंबईतला जॉब तिचा ठावठिकाणा शोधून काढू व तिला भेटू असे ठरविले. ती माहीम येथे एका लायब्ररी नोकरी करते व ही लायब्ररी माहीम पोस्ट ऑफिसजवळ आहे एवढीच माहिती आम्हाला मिळाली होती. आम्ही दोघं या पोस्ट ऑफिसजवळील एक बस

स्टॉपजवळ या मुलीची वाट पाहात थांबलो. बराच वेळ गेला तरी ती काही आम्हाला दिसली नव्हती. मला थोडी शंका होती की ही माहिती खरी आहे किंवा नाही याची आशा जवळजवळ संपली होती म्हणून मी माझ्या मित्राला सांगणार होतो की, जाऊ दे कदाचित ही माहिती चुकीची असेल. आपण निघू या, पण इतक्यात ती आम्हाला बस स्टॉपजवळ येताना दिसली व त्यांची भेट झाली. माझा मित्र व ती एका छोट्या हॉटेलात बसून बोलले. माझ्या मित्राने तिला विचारले की, ''तिचे अजूनही त्याच्यावर प्रेम आहे का ? व लग्न करायची तयारी आहे का?''

तसे तिने कबूल केल्यावर आम्ही ताबडतोब पुण्यास जाण्याचा निर्णय घेतला. आम्ही टॅक्सीने दादरहून पुण्यास निघालो. रात्री खूप उशिरा पुण्यास पोहोचलो व भल्या पहाटे त्यांचे लग्न लागल्यावर मी लगेचच पनवेलला परत आलो. या लग्नाला ४२ वर्षं होऊन गेली, परंतु ती संध्याकाळ, रात्रीचा टॅक्सीतील प्रवास व भल्या पहाटेचे लग्न अजूनही स्पष्ट लक्षात आहे

**महाविद्यालयीन दिवस**

गॅलरीच्या वर्ग कक्षाच्या खिडकीतून उडी मारत मी ज्युनियर कॉलेजमध्ये शिकत असताना घडलेल्या एका घटनेविषयी मी सांगत आहे. मी PUC सेकंड इयरला होतो. आमच्या सुरेंद्र अगदी, गणेश जोशी, मी व प्रकाश लिमये असा मित्रांचा ग्रुप होता. आमचे गणिताचे प्राध्यापकांचा पिरियड चालू होता व त्यांचे शिकविणे आम्हाला कोणालाच आवडत नसे. त्या दिवशी भारत-ऑस्ट्रेलिया क्रिकेट मॅच चालू होती, आमच्या घरी रेडिओ होता व आमचे घर, कर्नाटक कॉलेजला अगदी लागून होते. मध्ये फक्त एक भिंत होती. मी अगदी खिडकीतून उडी मारून पसार झालो. आमच्या मागे मग जोशीने उडी ठोकली, परंतु, तो पर्यंत आमच्या प्रोफेसरना शंका आल्यामुळे ते वर्ग बाहेर उभे राहिले व जोशी पकडला गेला. ते कॉलेजचे दिवस व अशा काही खोड्या आठवल्या की धमाल येते.

सुरेशकाका आणि मधूकाकांच्या साथीने 'मैं सुंदर हूँ' चित्रपट हा सिनेमा पाहिला. सुरेशकाका आणि मधूकाका मला फार आवडत होते व ते अगदी जवळचे होते. मी दोघांनाही आवडत असे. या सिनेमात मुख्य भूमिका विश्वजीत आणि लीना चंदावरकर यांनी निभावली होती. मेहमूदने खूप महत्त्वाची भूमिका साकारली होती. आम्ही सर्वांनी या चित्रपटाचा उत्तम आनंद लुटला होता आणि या सिनेमाच्या आठवणी काही वर्षांनंतर सुद्धा काढीत होतो. मेहमूदने खरोखरच खूप चांगला अभिनय केला होता. खास करून जेव्हा त्याला एक नाणे सापडते तो सीन त्याने फारच छान रंगविला होता. ते नाणे तो खिशात ठेवतो आणि त्याला अशी बरेच वेळा नाणी मिळतात. मग हॉटेलमध्ये जातो व पोटभर खातो व जेव्हा पैसे द्यायला काउंटरवर जातो तेव्हा त्याला कळते की, त्याच्या खिशात काही नाही आहे. हा अभिनय मेहमूदने सुंदर केला आहे. आजही या चित्रपटातील गाणी देखील आठवतात. सुरेश काकांनासुद्धा हे सर्व लक्षात आहे.

**विभाची अंधारात आणण्याची कृती,**

काका माझे वडील त्यांना आंबे इतके आवडत की, १९७८ च्या आंबा हंगामात त्यांनी ३ ते ४ झाडे धरली व हिरवे आंबे तळ मजल्यावरील एका खोलीत पिकण्यासाठी ठेवले. रट्टिहल्लीमध्ये क्वार्टर बरीच मोठी होती. मला आठवते, ७ ते ८ खोल्या होत्या. १९७८ साली मी, ऊर्मिला मामी व मुली, तसेच शोभा मामी व मुले, रट्टिहल्लीला गेलो होतो. काकांनी एके दिवशी रात्री या मुलांना सांगितले की, जो कोणी आता खाली जाऊन, अंधारात २ आंबे घेऊन येईल त्याला मी बक्षीस देणार आहे. विभा अगदी धीटपणे आंबे घेऊन आली. आम्ही सर्व जण आश्चर्यकित झालो. आश्वासनानुसार काकांनी तिला धीटपणा दर्शविल्याबद्दल रोख बक्षिसे दिली.

**सायंकाळी उशिरा विभाने ब्रश करणे**

मी आता जी गम्मत सांगत आहे. ही मजेदार घटना मुंबई सेंट्रलला

अविमामाच्या घरी घडली. मी मुंबई सेंट्रलला गेला होतो व सायंकाळी पाचच्या सुमारास ऊर्मिला मामीने सर्वांसाठी चहा केला. विभा शाळेतून परीक्षा देऊन आल्यावर थोडा वेळ झोपली होती. तिला गाढ झोप लागली होती. मला तिची थोडी गंमत करावीशी वाटली. मी तिला हाक मारली व म्हंटले, ''विभे, चल ऊठ शाळेत जायचे आहे की नाही, चल चल उठ.'' मामीने चहासुद्धा केला आहे. लवकर ऊठ व दात घास. विभा पटकन उठली व बेसिनवर जाऊन, ब्रश घेऊन दात घासू लागली आणि मग तिच्या लक्षात आले की, अरे ही तर संध्याकाळ आहे.

मग आम्ही सर्वांनी याचा आनंद घेतला. मी अविमामा व मामीचा खरोखर आभारी आहे. ही गंमत करताना कोणीही काहीही बोलले नाही.

### कुत्रा चावल्यानंतर अविमामाचा सुपर परफॉर्मन्स

याला जवळपास ३ ते ४ वर्षे होऊन गेली. एकदा अविमामा, जगदीश मामाकडे जाण्यासाठी निघाला होता. कोथरूड डेपो येथे सिक्स सीटर उभ्या असतात. त्यातून जाण्यासाठी रस्त्यावरून चालत जात असताना एका कुत्र्याने अचानकपणे चावा घेतला. मामा तसाच, जगदीश मामाकडे गेला. माझेही काहीतरी काम होते म्हणून मी पण त्याच वेळेस मामाकडे गेलो होतो. एवढ्यात दोघेजण बाहेर पडले.



**अविमामा, मामी, विभा, वैजू**


''काय झालं कुठे चाललाय?'' ते



**मी, विभा व वैजू लहानपणीचे**

म्हणाले. ''तू घरी थांब. आम्ही येतो जरा इमर्जन्सी आहे.'' मी जगदीश मामाच्या घरी थांबलो. थोड्या वेळाने ते दोघे परत आले. अविमामाला कोथरूड डेपोजवळ रस्त्यावरचे कुत्रे चावले होते. त्यामुळे जगदीश मामा त्याला डॉक्टरांकडे घेऊन गेला होता. डॉक्टरांनी त्याला टिटॅनस इंजेक्शन वगैरे दिले. हे सर्व सांगण्यामागे कारण आहे. ते म्हणजे या घटनेनंतर अवि मामा बुद्धिबळाच्या ३ ते ४ टूर्नामेंट खेळला आणि बहुतेक प्रत्येक टूर्नामेंटमध्ये त्याला बक्षीस मिळाले. मी गमतीने म्हटले, ''अविमामा ते कुत्रं म्हणजे गेल्या जन्मी बहुतेक प्रसिद्ध बुद्धिबळपटू बॉबी फिशर असावे.'' आम्ही सर्व मनापासून हसलो. मला मनापासून नमूद करावेसे वाटते ते म्हणजे अविमामाचा खेळाडूपणा. त्याने हा प्रासंगिक विनोद आपल्या अनेक मित्रांनासुद्धा सांगितला होता.

अविमामा



श्री. सॅबॅस्टीन, या लॅमिनार पॅकेजिंग इंडस्ट्री प्रायव्हेट लिमिटेड, कंपनीच्या मॅनेजरने घेतलेली मुलाखत नोकरी देणेसंबंधी. त्याने एका उमेदवारला विचारले, ''तुम कितना पढा है? किंवा कहा तक पढा है?'

मी PSS येथे काम करत असतानाची ही गंमत आहे. आमच्या कंपाऊंडमध्ये लॅमिनार इंडस्ट्रीज नावाची एक फ्लेक्झिबल पॅकिंग बनवणारी कंपनी होती. सबस्टाईन कंपनीचा मॅनेजर होता आणि या कंपनीमध्ये त्यांना नोकर भरती करायची होती. यासाठी मुलाखतीनिमित्त काही गावातील मुले बोलवण्यात आली होती. ही हकिकत आहे साधारण १९९१ सालची. त्या काळी सपोली हे गाव म्हणजे पेण – खोपोली रस्त्यावरती एक खेडेगाव होते. सगळी मुलं जी मुलाखतीसाठी आली होती. त्यांना मराठी व्यतिरिक्त इतर कुठलीही भाषा फारशी येत नसे. हिंदी थोडे फार येत होते व या मुलांना इंग्लिश कळणार नाही म्हणून

त्याने हिंदीत मुलाखत घ्यायचे ठरवले. अशा काही मुलाखती झाल्या आणि एका मुलाला त्याने विचारले, ''तुम कहाँ तक पढा है?'' त्या मुलाने उत्तर दिले, ''एक बार पडा है।'' सबस्टाईनला काही कळेना. मग तो मुलगा म्हणाला, ''एक बार पेड से पडा है।'' सबस्टाईनला याची गंमत वाटली. त्याने विचारले, ''तो कही चोट तो नही लगी?'' त्या मुलाने उत्तर दिले, ''नही चोट को नही लगी।''

ऊर्मिला मामीसाठी मी जवळपास १ वर्ष मुंबई सेंट्रलला अविमामाकडे आठवड्यातून एक दिवस जात असे. ऊर्मिला मामीला घेऊन टॅक्सीने KEM Hospital ला जावे लागे. तेथे डॉ. पैख तिला ट्रीटमेंट देत होते. ट्रीटमेंट ४५ मिनिटे व वेटींग हे सर्व घरून साधारणपणे २ तास येथे लागत. ट्रीटमेंट झाल्यावर मामीला परत मुंबई सेंट्रलला सोडून मी मुंबईतील बाकी काही कामे करून पनवेलला परत जात असे. हे काम मी निव्वळ अविमामासाठी करत असे, कारण अविमामाने मला व्यक्तिगतरित्या खूप मदत केली आहे. अविमामा व मी अतिशय चांगले मित्र आहोत.

**फुटूरिस्टीकटेप्स मध्ये १९९९ मधील घटना**

आम्ही कंपनीतील बॉयलरची जागा, वस्तू शस्त्राप्रमाणे बदलायचे ठरविले. सकाळी या कामाला सुरुवातसुद्धा केली. साधारण १० वाजता, कोलको, हा माझा मित्र व स्मिथ अँड नेफेव या कंपनीचा मॅनेजर आमच्या कंपनीत आला. आम्ही त्या दिवशी कोटिंगची ट्रायल घेण्याचे ठरविले होते. ही बाब मी पूर्णपणे विसरून गेलो होतो. मग काय आमची एकच धावपळ उडाली. वायुवेगाने आम्ही बॉयलरची जागा बदलली व



पिपीलिनेचे वगैरे काम पुन्हा करून, त्याच दिवशी रात्रीपर्यंत ट्रायल यशस्वीरित्या पूर्ण केली.

## जी.एम. चावला व सेल्स चपराशी खान

मी सोनल अधेसिव्हमध्ये काम करत असतानाचीही एक गम्मत आहे. येथे जी. एम. होते चावला. आमचा एक सेल्स चपराशी होता खान. खान हा कायम चावलासाहेबांशी दाबून असायचा. संधी मिळेल तेव्हा, चावलासाहेबांचे गुणगान गायचा व त्यांना खूश ठेवण्याचा प्रयत्न करायचा. खान हा मुलाचा एम. पी. मधील होता. त्याचे वडील एमपीतले एक नामवंत संस्कृतचे पंडित होते. एकदा असेच काही तरी झाले व दुसऱ्या एक सहकार्याने खानची थोडी तर उडविली. तो म्हणाला, ''जी. एम. सर तो चावला है, लेकिन जुही चावला के पिताजी नाही है, तुम खान जरूर हो लेकिन, शाहरूख खान नाही हो.''

शिवकुमार राजगारीया हे सिद्धार्थ फिल्टर्सचे मालक अगदी तरुण माणूस हुशार व सभ्य. माझे यांनी सिद्धार्थचे खूप चांगले संबंध होते. सिद्धार्थचे वैयक्तिक आयुष्य थोडे डिस्टर्ब झाले होते. त्यांनी आंतरजातीय विवाह केला होता. त्यांची पत्नी ख्रिश्चन होती. सिद्धार्थच्या वडिलांना हे लग्नं मान्य नसल्यामुळे, त्यांचे वैयक्तिक संबंध पार बिघडले होते. कदाचित यामुळे असेल, सिद्धार्थ खूप दारू पीत असत. त्यांचा एक मित्र होता विक्रम. दोघे मिळून रोज एक खांब संपवीत असत.

## ऊर्मिला मामीचा बॉयफ्रेंड

२०११ साली विभूषीचे लग्न ठरले. २०११ च्या दसरा या शुभ मुहूर्तावर होते. मी व प्रथिता, अविमामाच्या घरी, लग्नाचे आमंत्रण करायला गेलो होतो. त्या वेळी मामाकडे एक कुटुंब आले होते. माझ्या परिचयाचे नव्हते. मामीने आमची ओळख करून दिली. मामी म्हणाली, ''हा माझा, बाल वर्गमित्र.'' मी लगेच विभाकडे पाहिले, विभाला लगेचच कल्पना आली की आता, हा काही तरी धमाल

करणार. काही वेळाने हे कुटुंब जायला निघाले. मामी त्यांना सोडायला बाहेर गेली.

मी विभाला म्हणालो, ''आज मला धक्का बसला, उर्मिला मामीलासुद्धा बॉयफ्रेंड होता हे ऐकून.'' एवढ्यात मामी घरी अली व म्हणाली, ''काय रे श्रीकांत, काय म्हणत होतास?'' मी म्हटले, ''मामी, तुला बॉयफ्रेंड होता हे ऐकून मी थक्क झालो आहे.'' काही वेळ गेला व मामी म्हणाली, ''अरे श्रीकांत मला, XXX एक नावाचाही बालमित्र होता.''

झाले सगळ्यांची नजर माझ्याकडे. आता हा काय टिप्पणी करतोय. मी म्हंटले, ''अरे बाप रे, हा एका दिवसातील दुसरा धक्का.'' आणि मग एकाच हास्य पिकाला.

**संदीप कात्रेची बिन पाण्याने**

सिद्धार्थ फिल्टर्स येथे आम्ही आमच्या कोटिंग मशीनमध्ये काही बदल करण्याचे काम चालू केले होते. हे काम आम्ही, डोंबिवलीचे इंजिनिअर संदीप कात्रे यांना दिले होते. एके दिवशी संध्याकाळचे ५ वाजले होते. संदीपची चलबिचल चालू झाली होती. मी त्याला म्हटले की, ''आजचे जे काम ठरविले आहे ते झाल्याशिवाय आपण जाऊ शकत नाही.'' संदीप म्हणाला, ''सर ६ ते ९ ची सिनेमाची तिकिटे काढली आहेत.'' मी त्याला सांगितले की, ''काळजी करू नकोस. मी तुला घरी सोडायला येतो.'' आमचे काम पूर्ण झाले व रात्री ७ च्या सुमारास आम्ही त्याचे घरी गेलो. अपेक्षेप्रमाणे त्याची बायको प्रचंड चिडली होती. घरी गेल्यावर मला पाणी आणून दिले व ''चहा घेणार का विचारले?'' संदीप म्हणाला, ''आणि मला पाणी?'' मी एक क्षणही जाऊ न देता म्हणालो, ''तुझी बिन पाण्याने.'' हे ऐकून त्याची बायकोही खोखो हसायला लागली. तिच्या राग कोठल्या कोठे पळून

गेला. दुसऱ्या दिवशी संदीप म्हणाला, ''साहेब, तुमची खरोखर कमाल आहे. तुम्ही घरातील परिस्थिती एका क्षणात पालटवून दिलीत.''

**श्वेता पार्क उंदराची शिकार**

आताची ही गंमत तुम्हाला सगळ्यांना पोट धरून हसायला लावेल यात मला अजिबात शंका नाहीये. त्याचे झाले असे, आम्ही श्वेता पार्क सुतारपथ येथे राहात असतानाची ही गंमत आहे. आमच्या घरी एक उंदीर आला होता व तो उंदीर मारणे हे प्रत्येकाने ठरवले होते. त्यासाठी प्रथिताने आमच्या बेडरूममधील बेडवरील फळी वगैरे बाजूला करून ठेवले होते. एक केरसुणी घेऊन ती तो उंदीर शोधायचा प्रयत्न करीत होती. मी तिला म्हटले, ''तू जरा थांब. मी एका केमिस्टकडे जाऊन उंदरासाठीचं औषध किंवा काही स्प्रे मिळतो का बघून येतो. शक्यतो स्प्रे मिळाला तर बरे, औषध नको. कारण औषध खाऊन उंदीर कुठे मरून पडला तर ते शोधणे अवघड होईल. त्याचा अतिशय घाण वाससुद्धा येईल.'' मी सायकल घेऊन बाहेर पडलो. आमच्या घराजवळील एका केमिस्टकडे गेलो आणि त्याला म्हटलं, ''भैया, आपके पास कोई स्प्रे है क्या चुहे के लिए? तो म्हणाला, ऐसा स्प्रे तो नही है लेकिन मुझे समझ मे नही आ रहा है? आप स्प्रे करना चाहते हो तो आपको ऐसे चुहा मिलेगा कैसे?''

माझा मूर्खपणा माझ्या डोक्यात लगेच आला. मला खरेच याची जाणीव झाली की अरे खरंच आहे एक वेळेस स्प्रे मिळेलही पण तो नेमका उंदरावरती मारायचे स्किल माझ्याकडे कुठे होते? नंतर मी घरी आलो. तसेच तिला म्हंटले असा स्प्रे वगैरे काही नाहीये. प्रथिता आपली केरसुणी घेऊन उंदीर शोधायच्या धडपडीमध्ये त्या बेडवरून सरकून खाली पडली आणि तिच्या गुडघ्याला बऱ्यापैकी इजा झाली. नंतर थोडासा प्रथम उपचार करून नाश्ता-पाणी करून ती बँकेत गेली. बँकेत सहकाऱ्यांनी विचारले, ''अहो आठवले मॅडम, काय झाले? तिने झालेला प्रकार सांगितला. घरी आल्यावर मी आज बँकेत सगळ्यांना

सांगितले की आज मी केलेली उंदराची शिकार कशी निकामी ठरली. यावरून उंदराची शिकार हे प्रकरण आमच्या घरी बरेच दिवस एक विनोदाचा विषय झालेले होता.

**बाबा परमिट रूम कोठे आहे?**

विभूषा लहान असतानाची ही गंमत आहे. आम्ही कोल्हापूरला जात होतो. आम्ही सर्व जण पुण्याहून कोल्हापूरला सुरूमामाकडे निघालो होतो तेव्हा आमची मारुती व्हॅन होती. आम्ही साताऱ्याच्या पुढे गेलो व विभूषा म्हणाली, ''बाबा, येथे परमिट रूम कुठे आहे?''



तिचा हा प्रश्न ऐकून मला दोन मिनिटे काहीच कळेना. मी तिला म्हटले, ''अग तुला परमिटरूम कशासाठी हवी आहे? तुला काय हवे आहे?'' तर मला म्हणाली, ''बाबा मला शूला जायचे आहे.'' म्हणजे तिच्या बालमनाने असे ठरवले होते की, वॉशरूमला किंवा टॉयलेटला परमिट रूम असे म्हणतात. या तिच्या प्रश्नावरून नंतर आमच्या गाडीमध्ये आम्ही खूप धमाल केली होती.

**वेळेचे महत्त्व**

वेळेचे महत्त्व मी सुरूमामा व भाऊमामाकडून शिकलो. हे दोघंही वेळेला खूप महत्त्व देत असत व ही एक चांगली सवय मला यांच्यामुळे लागली. हे दोघंही म्हणतात की, जो आपण दिलेली वेळ पाळू शकत नाही. तो जीवनात कधीही यशस्वी होऊ शकत नाही. याबाबतीत एक किस्सा मला आठवतो, मी मामा, मामी व रामभाऊ लिमये एकदा त्यांच्या गाडीने मुंबईला गेलो होतो. मुंबईत आमचे वेगवेगळ्या ठिकाणी काम होते. संध्याकाळी सव्वापाच ते साडेपाच दरम्यान कबुतरखाना येथे दादरला भेटायचे ठरले होते. मी माझी कामे आटपून वेळेवर जागी

पोहोचलो. पाच वाजून चाळीस मिनिटांनी मी दादर बस स्टॉपला गेलो व बसने पनवेलला गेलो. रामभाऊ व मामा सहा वाजता ठरलेल्या ठिकाणी पोहोचले. मामा म्हणाला की, ''श्रीकांत वाट बघून गेला असेल.'' तो म्हणाला की, त्याला मी वेळ पाळतो हे माहीत आहे, वेळ लागला याचा अर्थ आपण कोठे तरी अडकलो असणार हे समजून तो बसने गेला असेल. नंतर रात्री आम्ही घरी भेटलो.

नीरजाने नाकातील चमकीची फिरकी एकदा, नाकातून गिळली. मग एकच गडबड झाली. आम्ही डॉक्टरांकडे गेलो. डॉक्टरांनी तिला तपासले व म्हणाले, ''काही काळजी करू नका. सकाळी आपोआप पडेल.'' दुसरे दिवशी ती खरोखरच पडली.

**धक्कादायक रवी कुलकर्णी.**

त्याने मला कसे वापरले? आणि पुन्हा कधीही माझ्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला नाही. रवी कुलकर्णी हा माझा पनवेलमधील मित्र. त्याने जेव्हा हैदराबादला टेक्निक रबर फॅक्टरी सुरू केली तेव्हा मी त्याला प्रचंड मदत केली. दर महिन्यात मी पाच-सहा दिवस हैदराबादला जाऊन राहात असे व रोज रबर रोलर बांधायचे कसे वगैरे बाबतीत तिथल्या कामगारांना मी बरेच काही शिकवले. हे माझे काम जवळजवळ वर्ष-दीड वर्ष मी करत होतो. या दरम्यान रवी कुलकर्णी याला रोटरी क्लब ऑफ पनवेलतर्फे अमेरिकेला एक महिना ट्रेनिंगसाठी मोफत जाण्याचा पास मिळाला. रवी कुलकर्णी तिथे गेला आणि तेथील एका अमेरिकन माणसाबरोबर त्याने तिथे पण एक रबर रोलर फॅक्टरी चालू केली आणि नंतर वरचेवर तो अमेरिकेला जाऊ लागला. एखाद वर्षाने तो तिकडे स्थायिक झाला. मी केलेल्या एक-दीड वर्षांच्या मेहनतीबद्दल मला एक रुपयासुद्धा मोबदला मिळाला नाही.

**सुंदर राजा? त्याने मला कसे वापरले?**

सुंदर राजा यानेसुद्धा माझा खूप फायदा घेतला. मला त्यांनी

**अण्णा व रवी कुलकर्णी**



महिना ३५ हजार रुपये पगार मिळेल. शिवाय राहायची व्यवस्था व बाकी मेसमध्ये जेवण वगैरे सगळे मला आश्वासन दिले होते, परंतु एक-दीड वर्ष काम करूनही मला एकंदरीत फक्त दहा हजार रुपये, एकदा मिळाले. तिथे गेल्यावर राहण्याची जेवणाची मोफत सोय होती. जाण्या-येण्याचे विमानाचे तिकीट किंवा रेल्वेचे तिकीट हे मिळत होते. पण या पलीकडे मला याचा काही फायदा झाला नाही. सुंदर राजानेसुद्धा मला पुरेपूर वापरून घेतले अशीच माझी ठाम समजूत आहे.

**ईश्वर मामा आणि त्याचे भविष्यातील गैरवर्तन,**

Futuristic Tapes, मी आमच्या शेजाऱ्यांना दिलेले फोन केलेले पैसे व स्क्रॅप विकून मिळालेले पैसेसुद्धा कंपनीच्या भत्त्यात जमा करीत असे.

Futuristic Tapes मध्ये एम. के. कुमार साहेबांनी त्यांच्या खास विश्वासाचा ईश्वर मामा नावाच्या एका तमिळनाडूच्या, पण मुंबईत राहणाऱ्या माणसाची आमच्या कंपनीमध्ये आर्थिक व्यवहार व बाकी देखरेख करण्याच्या निमित्ताने नेमले. ईश्वरचे मुख्य काम म्हणजे माझ्यावर नजर ठेवणे व रोज संध्याकाळी कुमारना त्याचा रिपोर्ट देणे. तो आल्यावर बऱ्याच गोष्टी बदलत गेल्या. प्रॉडक्शनसाठी फॅक्टरीमध्ये किंवा कंपनीमध्ये महिला कामगार घेण्याबद्दल माझे ठाम मत होते की, आपण आपल्या कंपनीमध्ये महिलांना कामावर ठेवले नाही पाहिजे. ईश्वरने मात्र त्याच्या कुमार साहेबांच्याबरोबर असलेल्या जवळिकीमुळे जवळपास सात-आठ महिलांना पॅकिंगच्या कामासाठी ठेवले. ईश्वरची नियत चांगली नव्हती. विशेषतः बाई माणसाबरोबर त्याचे वर्तन चांगले नव्हते. हे

मला एकंदरीत त्याच्या वागण्या–बोलण्यावरून लक्षात आले होते. मी कुमारसाहेबांना एक–दोन वेळेस याबद्दल एक सूचनासुद्धा केली होती, परंतु कुमारने ती धुडकावून लावली होती. मी कंपनीतून बाहेर पडल्यावर ईश्वर त्या कंपनीच्या सहकार नगर येथील भाड्याच्या फ्लॅटमध्ये काही महिलांना बोलवून घेत असे. असेच एकदा एका बाईबरोबर त्याची काहीतरी भानगड चालू होती. नंतर त्यांचे कशात बिनसले हे मला माहीत नाही, पण या बाईने पोलिसात ईश्वरने बलात्कार केल्याची तक्रार नोंदवली. ईश्वरला पोलिसांनी अटकसुद्धा केली. ही बातमी सकाळ किंवा दुसऱ्या कुठल्यातरी वर्तमानपत्रात त्याच्या फोटोसकट छापून आलेली होती. त्यातून तो कसा बाहेर पडला याची मला कल्पना नाही, परंतु बाहेर पडल्यावर त्याने कुमार यांना दहा–पंधरा लाखाला, फसवून तेथून पळ काढला आणि नंतर तो कुठे गेला हे कुणालाही होते माहीत नसावे.

**एम. के. कुमारचा अधिकाधिक कमविण्याचा लोभ, त्याच्या स्वत:च्या फर्म पॅरामाउंट आणि फ्यूचरिस्टिकमध्ये कमिशन.**

कुमार साहेबांना येनकेन प्रकारे पैसे मिळवणे हा एक अतिशय आवडता छंद होता. माझे त्यांच्याबाबतचे काही अनुभव आपल्याला सांगू इच्छितो. Futuristic Tapes मध्ये मी पाटकर Extrusion या कंपनीमधून कास्ट फिल्म मिळवायची व्यवस्था केली. ही फिल्म वापरून त्याच्यावरती मी विकसित केलेले वॉटर बेस अधेसिव्ह कोटिंग करून Futuristic Tapes भारतात पहिल्यांदा १९९८ साली या प्रकारची टीप बनवण्यास सुरुवात केली. एकदा पाटकर Extrusion चे एक डायरेक्टर रामकृष्ण दोरिक आमच्या कंपनीत आम्हाला भेटायला आले होते. या भेटीनंतर रामकृष्ण दोरिक मला म्हणाले, ''आठवलेसाहेब, आपण माझ्या गाडीतून जाऊ या.'' मी त्यांना सांगितले की, ''माझी स्कूटर आहे,'' तर म्हणाले, ''चला एक दिवस माझ्याबरोबर.'' आम्ही दोघे एका हॉटेलमध्ये नाश्ता–पाण्यासाठी वगैरे बसलो. रामकृष्ण दोरिक



साहेब मला म्हणाले, ''आपण आजची ऑर्डर आम्हाला मिळवून दिलेत त्याबद्दल मी तुम्हाला काय द्यावे?'' मी म्हणालो, ''म्हणजे काय तुम्ही चांगले मित्र आहेत. आम्हाला चांगल्या प्रतीची फिल्म द्या या पलीकडे मला काही नको आहे.'' तर मला म्हणाले, ''आठवले साहेब, तुम्ही कुठल्या जमान्यात राहत आहात. तुम्हाला माहीत आहे का कुमार साहेब आमच्याकडून काय घेतात आम्ही काय देतो?''

मी म्हटले, ''मला काही कल्पना नाहीये.'' ते म्हणाले, ''आम्ही कुमार साहेबांना प्रत्येक किलोमागे एक रुपया कमिशन म्हणून देतो.'' हा काळ होता १९९८ साल. म्हणजे बावीस वर्षांपूर्वी आणि दरमहा आम्ही दहा हजार ते पंधरा हजार किलो फिल्म त्यांच्याकडून विकत घेत होतो. मला कल्पनाच करवत नाही की एक कंपनीचा एमडी. बाकी दोन डायरेक्टरना न सांगता असे पैसे कसे घेऊ शकतो. हे फक्त याच कंपनीत नव्हे तर त्यांच्या दुसऱ्या कंपनीतसुद्धा ते असे वरून पैसा नेहमीच कमवायचे.

कुमार साहेबांची दुसरी कंपनी म्हणजे पॅरामाउंट तेथे इन्सुलेशन टेप बनवायचे. एकदा मी आणि कुमार साहेब आमच्या कंपनीच्या कामासाठी हैदराबादला गेलो होतो. तिथे त्यांचा डिस्ट्रीब्यूटर लाल यांची माझी ओळख झाली. या लाल कंपनीकडून कुमार साहेब प्रत्येक ऑर्डर मागे काही टक्के कमिशन घेत असत.

Futuristic Tapes मध्ये आम्ही Shoe Upper या प्रकारच्या टेप बनवण्यासाठी कुमार साहेबांनी प्रदीप जाधव व अनिल बाळ यांना सल्लागार म्हणून नेमले. माझे मत विचारले असता मी त्यांना सांगितले या प्रकारच्या टेप मी PSS, Johnson & Johnson मध्ये बनवल्या

आहेत. मला याची पूर्ण टेक्नॉलॉजी माझ्याकडे आहे. यासाठी सल्लागार नेमण्याची गरज नाहीये, परंतु त्यांचे मत होते की, मार्केटिंगसाठी प्रदीप जाधव यांची आपल्याला मदत होईल. त्यांच्याबरोबर अनिल बाळ आपल्याला टेक्नॉलॉजीसाठी मदत करेल. ''ठीक आहे, तुम्ही जसे ठरवाल तसे.'' या कामासाठी त्यांनी या दोघांना दीड लाख रुपये एवढी फी मंजूर केली. त्यातील पन्नास हजार रुपये त्यांनी स्वतःकडे ठेवून घेतले. आमचे काम सुरू झाले. मला कुमार साहेबांनी सूचना केली की अनिल बाळला हवी ती सर्व मदत कर, त्याला सहकार्य कर. या वेळेस अनिल बाळचा स्कूटरवरून अपघात झाल्यामुळे मला रोज सकाळी त्याच्या रामबाग कॉलनी येथील घरी जाऊन त्याला बरोबर घेऊन आमच्या शिंदेवाडी येथील कंपनीत जावे लागायचे. अनिल बाळने बरेच प्रयोग केले आणि जसे हवे तसे काही आमचे टेप होत नव्हते. एक दिवशी बाळने मला विचारले, ''श्रीकांत, मला काही सल्ला दे. याच्यात काय करता येईल मला थोडं गाईड केलंस तर बरं होईल.'' म्हटलं, ''नाही बाबा, मी तुला गाईड करू शकत नाही. तुला सल्लागार म्हणून नेमले आहे. मी तुला काही सांगायचं आणि त्याचा परिणाम चांगला मिळाला नाही तर तू नक्कीच माझं नाव बदनाम करशील. तर हे तुला दिलेलं काम कसं करायचं ते बाबा तूच कसे जमेल तसे कर.'' या सगळ्या भानगडीमध्ये क्वालिटी तयार न झाल्यामुळे प्रदीप जाधव मार्केट आणू शकले नाहीत. एक दिवशी या तिघांची मुंबईत कुमार साहेबांच्या ऑफिसमध्ये मिटींग झाली. कुमार साहेबांनी त्यांचे कॉन्ट्रॅक्ट रद्द करीत आहे असे सांगितले. तसेच त्यांनी त्यांना सांगितले की, ''आम्ही दिलेले दीड लाख रुपये परत द्या.'' हे ऐकल्यावर प्रदीप जाधव व श्री. कुमार यांची बऱ्यापैकी बाचाबाची झाली. त्यांनी सांगितले की, दीड लाखातील ५०,००० रुपये तुम्ही याआधीच काढून घेतलेले आहेत. झाला प्रकार नंतर प्रदीप जाधव यांनी मला सांगितला. मला

म्हणाले, ''तुम्हाला जर याची खात्री करून घ्यायची असेल तर आपण कुमारच्या ऑफिसला जाऊ.'' कुमारच्या ऑफिसमध्ये शृंगेरीचे शंकराचार्य गुरुजीच्या फोटो, जो त्यांच्या खुर्चीमागे लावलेला असतो. त्याच्यासमोर आम्ही हे ५०,००० रुपये त्यांना दिले आहेत आहेत. आपण त्यांना विचारू आणि जर ते नाही मिळाले तर मग हा माणूस किती खोटे बोलतोय याचा अंदाज तुम्हाला सुद्धा येईल.

## दुबई येथे मी स्वतः बाथरूममध्ये अडकलो

मी दुबई मध्ये Focus air Conditioning LLC मध्ये काम करण्याची गंमत आहे. मी बर दुबई येथे राहात असे. एके दिवशी सकाळी अंघोळीला गेलो. अंघोळ झाल्यावर मी बाथरूमचे दार उघडायचा प्रयत्न केला तर ते दार काही उघडेना. त्याच्या लॉकची लिव्हर खराब झाली होती व काही केल्या दार उघडेना. बरं अंघोळीला गेल्यामुळे बरोबर मोबाईल घेऊन जाण्याचा प्रश्नच नव्हता. घरामध्ये मी एकटा होतो त्यामुळे कुणाला हाक मारून बाहेरून दार उघडता येईल ही शक्यताही नव्हती. मी त्या बाथरूमच्या खिडकीजवळ उभारून बराच वेळ वॉचमनला हाका मारून पहिल्या. कुणाला मी कुठे आहे हे कळणे अशक्य होते. कारण आमचा फ्लॅट तिसऱ्या मजल्यावर होता. आता काय करावे काही मला सुचत नव्हते, कारण माझा ड्रायव्हर मला घ्यायला यायची वेळसुद्धा जवळपास येऊन ठेवली होती. शेवटी एक प्रयत्न म्हणून मी आमच्या बाथरूममधील जे फोल्डिंग शॉवर असते, ते उचकटून काढले आणि त्याचा हातोडीसारखा उपयोग करून मी दाराचे लॉक अक्षरशः बऱ्याच प्रयत्नानंतर तोडून काढले. कसाबसा बाथरूमच्या बाहेर पडलो. या सर्व भानगडीमध्ये माझी जवळपास ४० ते ४५ मिनिटे खर्च झाली होती. परंतु ती चाळीस मिनिटं मला अजूनही आठवतात. जर आमच्या बाथरुममधे शॉवर हे मोठे हँडल नसते तर मी कसा बाहेर

पडू शकलो असतो? मला अजूनही काही कळत नाहीये. एकेक आठवणी असतात या कायम आपल्या मनामध्ये घर करून राहतात.

## मामा स्टेशन कमांडंट असताना अंटार्क्टिका येथे अपघात

जगदीश मामाची अंटार्क्टिका येथील मैत्रीपार्क या नवीन भारताचे स्टेशन उभे करण्याच्या कामासाठी स्टेशन कमांडर म्हणून नेमणूक झाली होती. त्यांचे जहाज गोव्याहून निघाले तेव्हा आम्ही सर्व जण मामाला बाय बाय करण्यासाठी गोव्याला गेलो होतो. मामा अंटार्क्टिकामध्ये असताना आम्हाला एक बातमी समजली. ती म्हणजे एका तंबूमध्ये कार्बन डाय-ऑक्साइड गॅस सिलिंडर लीक झाल्यामुळे या तंबूतील तीन-चार लोकांचा मृत्यू झाला होता. बातमीमध्ये आम्हाला नाव-गाव काही कळले नव्हते. आम्हाला सर्वांनाच याची प्रचंड काळजी वाटत होती. मी जवळपास रोज राजश्री मामीकडे घरी जात असे. काही माहिती कळली का याची चौकशी करत असे. ते दोन-तीन दिवस आम्हा सर्वांनाच अतिशय तणावाचे होते. नंतर एके दिवशी अंटार्क्टिकाहून मामाचा लँडलाईनवर फोन आला व मामा व्यवस्थित आहे हे ऐकून खूप बरे वाटले. मनावरचा सगळा ताण एका क्षणात नाहीसा झाला. परंतु त्या आधीचे दोन-तीन दिवस फारच काळजीत गेले. अजूनही सगळ्यांच्या लक्षात आहे.

## शारजाह येथे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या सफाई कामगाराला पकडले



मी शारजाह येथे EGPA मध्ये काम करत असतानाची ही घटना आहे. माझ्याबरोबर प्रकाश पटघर हासुद्धा राहात होता. प्रकाशचं लग्न ठरले होते व त्यासाठी त्यांनी काही सोन्याचे दागिने वगैरे खरेदी केले होते. एका

शुक्रवारी आमच्या कंपनीतील स्वीपर आमच्या घरी साफसफाईसाठी आला होता. त्याने साफसफाई व्यवस्थितपणे केली (खरोखरच त्याने व्यवस्थित साफसफाई केली) असे मी म्हटले त्याचे कारण तुम्हाला नंतर लक्षात येईल. काही वेळाने प्रकाश, सहजच आपण नवीन विकत घेतलेले दागिने कुठे आहेत ते पहात होता. बऱ्याच ठिकाणी शोधले, पण ते दागिने काही त्याला सापडले नाहीत. मीसुद्धा प्रयत्न केला, नंतर आम्ही कचरा पेटीमध्ये चुकून गेलेत का ते पाहिले. आमची डस्टबिन खाली रस्त्यावरील मोठ्या डस्टबीनमध्ये जे टाकले जाते. तेथे सुद्धा आम्ही जाऊन बरेच शोधण्याचा प्रयत्न केला पण कुठेच काही आम्हाला सापडले नाही. आम्हाला दोघांनाही याचं टेंशन आलं. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही कंपनीत कामावर गेल्यावर मी सहजपणे विचार करत होतो की आपल्या घरी शुक्रवारी कोण कोण येऊन गेले. आमचे काही सहकारीसुद्धा शुक्रवारी साप्ताहिक सुट्टी असल्यामुळे येत असत. तर एकंदरीत सगळी यादी तयार केल्यावर माझ्या डोक्यात एकदम एक कल्पना आली. सकाळी आपला स्वीपर आला होता. बाकीची सगळी मंडळी माझे सहकारी असले तरी मित्रासमान होती. त्यामुळे माझा इतर कुणावर संशय नव्हता. नेमके या दिवशी म्हणजे दुसऱ्या दिवशी सकाळी आमचा स्वीपर कामावरती आलेला नव्हता. त्याने तब्येत बरी नाहीये म्हणून तीन-चार दिवसाची रजा मागितली होती. तसा अर्ज त्याने घरून पाठवला होता. मला शंका आली, याच्यात काहीतरी गडबड आहे. मी प्रकाशला म्हटले, ''आपण सेफ झोन ऑफिसला जाऊया व कम्प्लेंट करू या आणि सेफ झोनचे पोलीस बरोबर घेऊन आपण आपला स्वीपर ज्या जागी राहतो तिथे छापा टाकू या. त्याप्रमाणे आम्ही सेफ झोनचे पोलीस घेऊन त्याच्या रूमवर गेलो आणि गंमत म्हणजे त्याच्या बॅगेमध्ये आम्हाला हे सर्व दागिने सापडले. पोलिसांनी लगेच त्याला अटक केली. नंतर रीतसर कारवाई करण्यात आली. मला ही कल्पना लवकर सुचली हे बरे झाले. कारण तो स्वीपर पुढच्या

एक–दोन दिवसांत बांगलादेशला परत जाण्याच्या तयारीत होता. तसाच तो गेला असता तर हे दागिने आम्हाला कधीच परत मिळाले नसते.

**मदन दुसे आणि टीम**

भविष्यातील माझी आपली जवळची माणसे मला अंधारात ठेवून दुबईला रवाना झाली. Futuristic Tape मध्ये काम करताना माझे विश्वासू असे सहकारी होते. त्यांची नावे म्हणजे मदन दुसे, श्याम जोशी, काशिनाथ कुटे, अजून दोघं. मी futuristic tape सोडून औरंगाबादला, Flexo Film इथे आल्यावर या सर्वांना कामावरती घेण्यासाठी इंटरव्ह्यूला औरंगाबादला येण्याचे निमंत्रण दिले होते. मला व्यवस्थित आठवते की, काशी व शाम जोशी औरंगाबादला येऊन गेले, पण त्यांच्या देहबोलीवरून त्याना औरंगाबादमध्ये घेण्यात रस आहे असे मला वाटले नाही. कालांतराने त्यांनी मला अनेक व्यक्तिगत अडचणी सांगितल्या व औरंगाबादला येऊ शकणार नाही असे कळवले. धक्कादायक बाब म्हणजे काहीच दिवसात मला मदनचा एक ई–मेल आला. मदनने या सगळ्यांना घेऊन मला न सांगता प्रदीप मानवत याच्या मध्यस्थीने Focus Air Conditioning LLC येथे दुबई येथे फोकसमध्ये नोकरी मिळवली होती व दुबईला जाऊन कामावर रुजू झाले होते. मी या सर्वांना माझे आतिशय जवळचे सहकारी असे समजत होतो, परंतु मदनने मला पूर्णपणे अंधारात ठेवून कुठल्याही प्रकारची कल्पना न देता मला तांदळातल्या खड्यासारखे बाजूला सारून आपली पोळी भाजून घेतली होती. याचे मला अतिशय दुःख झाले. मला त्यांनी बरोबर नेले नाही याचे दुःख नव्हते, परंतु मी प्रत्येक गोष्ट त्यांना विश्वासात घेऊन सांगत असतानासुद्धा अशा एका महत्त्वाच्या घडामोडीबद्दल त्यांनी मला एका शब्दानेही कधीही कल्पना दिली नाही याचे मला खरे तर अतिशय वाईट वाटले होते. या सर्वांना वेळोवेळी मी प्रचंड मदत केली होती. मी कदाचित एक मूर्ख माणूस असावा की,

अजूनही या लोकांना कधी मदत लागली तर मी करीत असतो. याची या सर्वांना जाणीव आहे का नाही याची मला कल्पना नाहीये, पण एखाद्याला अडचणीत मदत करावी ही काकांची शिकवण माझ्या मनात कायमचे घर करून बसली आहे. समोरच्या माणसाने मला काही अडचण सांगितली की मला आतून वाटते की काही असो, पण याला मदत केली पाहिजे. दरवेळेस मी तिची चूक करतो असे मला मनापासून वाटते.

**मला युएईमध्ये प्रवेश करण्यास ६ महिने प्रतिबंधित करण्यासाठी व्हिजिट व्हिसा अर्ज करावा अशी अतुल पटेलची धूर्त सूचना**

युएईमध्ये एक अलिखित असा नियम आहे. एखाद्याने एक कंपनी सोडून दुसऱ्या कंपनीत नोकरी करायची असेल तर पहिल्या मालकाकडून NOC घेणे गरजेचे असते. बरसे मालक अशी NOC देत नाहीत. या उलट नोकरी सोडून तो माणूस परत चालला की, त्याच्यावर सहा महिने ते एक वर्ष BAN म्हणजेच बंदी. मध्ये परत सहा महिने ते एक वर्ष येता येणार नाही याची व्यवस्था केली जाते. मला या नियमाची व UAE मधल्या या पद्धतीची पूर्ण कल्पना असल्यामुळे मी EGPA सोडताना सेफ झोनच्या ऑफिसमध्ये जाऊन त्यांना विनंती केली होती. मी नोकरी सोडतोय आणि मी परत येतोय. एका दुबईतल्या कंपनीत काम करण्यासाठी येतोय. मी स्वेच्छेने व कंपनीचे कुठले नुकसान न करता जातोय तरी कृपया माझ्यावरती आपण BAN ठोकू नये. ऑफिसर माझ्या एका जॉर्डनच्या मित्राचे मित्र होते. त्यांनी माझी मागणी मान्य केली. मला आश्वासन दिले तू परत जाताना तुझ्यावरती कुठल्याही प्रकारचा BAN लागणार नाही. मी नंतर मध्ये रीतसर राजीनामा दिला. माझा पासपोर्ट घेऊन आमचा PRO सेफ झोनमध्ये माझ्या वर BAN ठोकावा यासाठी अर्ज घेऊन गेला. सेफ झोनचे ऑफिसरने यास पूर्णपणे नकार दिला. माझा व्हिसा कॅन्सल करून माझा पासपोर्ट PRO ला परत

दिला. EGPA कंपनीमध्ये आला व मला म्हणाला, ''सर, तुम्ही खूप लकी आहात. आम्ही BAN चा प्रयत्न केला, पण सेफ झोनने तुमच्यावरती BAN ठोकायला त्यांनी नकार दिला आहे. या गोष्टीचा आमचे मालक दर्शन मेहता यांना मोठा धक्का बसला होता. त्यांना काहीही करून मला मध्ये परत येऊ द्यायचे नव्हते. मी पुण्याला परत आलो आणि नंतर फोकस एअरकंडिशनिंगच्या लोकांना माझ्यासाठी employment व्हिसा चा अर्ज देण्यास विनंती केली. त्याप्रमाणे त्यांनी व्हिसाचा अर्ज दाखल केला, पण तो मान्य झाला नाही कारण माझ्या नावाने एक नवा व्हिजिट व्हिसाचा अर्ज दाखल केलेला होता. असा एक व्हिसा जर मंजूर झाला असेल तर तो रद्द झाल्याशिवाय नवीन व्हिसा देता येत नाही. मग Focus Ac च्या बरकत ठाणावाला यांनी मला सांगितले की, ''काही काळजी करू नका. हा व्हिसा तीन महिन्यांचा आहे. बरकतभाईंनी मला सांगितले की काही काळजी करू नका. हा व्हिजिट व्हिसा तीन महिन्याचा आहे. त्याच्या शेवटच्या दिवशी रात्री १२ नंतर आम्ही नवीन व्हिसाचा अर्ज दाखल करू. तुम्हाला व्हिसा नक्की मिळेल याची व्यवस्था करू. त्याप्रमाणे तसे त्यांनी केले व तीन महिन्यांनंतर मला नवीन व्हिसा मिळाला. UAE मध्ये अजून एक पद्धत आहे ती म्हणजे शक्यतो आधी व्हिजिट व्हिसा अर्ज केला जातो. आपण कंपनीमध्ये रुजू झाल्यावर पर्मनंट व्हिसाचा अर्ज करता येतो. त्याबरोबर तिथे सरकारी हॉस्पिटलमध्ये मेडिकल टेस्ट करावी लागते. या टेस्टमध्ये जर तुम्ही पास झाला तर लगेच पर्मनंट व्हिसा मिळतो. मी Focus ac LLC मध्ये गेल्यावर मेडिकल झाली व मला एम्प्लॉयमेंट व्हिसा मिळाला.

EGPA मध्ये जनरल मॅनेजर म्हणून माझी नेमणूक झाली ती माझा एक आधीचा सहकारी सुभाष जोशी यांच्या जागी झालेली होती. सुभाष जोशीचे कारनामे या आधीच्या एका प्रकरणामध्ये मी आपल्याला

सांगितलेले आहेत. सुभाष जोशीला एकंदर परिस्थितीची कल्पना आल्यामुळे त्याने दर्शन मेहता यांना भेटून, ''मी माझ्या पदाचा राजीनामा देत आहे.'' असे सांगितले व कदाचित दिलाही असेल, पण दर्शन मेहतांनी त्याला सांगितले, ''याची काही गरज नाहीये. तू काय काळजी करू नकोस.'' याच वेळेस दर्शन मेहता यांच्या मनात एक वेगळाच खेळ चालू होता. आमच्या कंपनीमध्ये आम्हा सर्वांना मस्टरवरती सकाळी गेल्यावर सही करावी लागे. आमच्या मस्टरमध्ये सर्वांत वरती नाव सुभाष जोशी यांचे लिहिलेले होते. आम्ही बाकी सर्व जण मस्टरवरती सह्या करत होते. सुभाष जोशीच्या नावापुढे ३१ दिवस काहीही लिहिलेले नव्हते. ३१ व्या दिवशी आमचा PRO शेखर याने सर्व दिवसाच्या खाली ABSENT असे लिहून या मस्टरची फोटो कॉपी घेऊन दर्शन मेहता यांच्या दुबई येथील ऑफिसला पाठवून दिली. या फोटो कॉपीच्या जोरावर सुभाष जोशी हे एक महिना कामावर येत नाही आहेत आणि ते बेपत्ता झाले व जाताना कंपनीची काही महत्त्वाची कागदपत्रे सोबत घेऊन गेलेत अशा आशयाची एक तक्रार त्यांनी सेफ झोन ऑफिसमध्ये केली. युएई मध्ये असे बेपत्ता होणे याला absconding असे म्हणतात हा एक गुन्हा ठरू शकतो आणि बरोबर कंपनीची काही कागदपत्रे दिली आहेत असे जर दिसून आले तर तू मोठा गुन्हा ठरतो. मला आत्ता लक्षात आले की, ''तू राजीनामा दिला नाहीस तरी चालेल. तू तुला जायचे तेव्हा तू जाऊ शकतोस.'' असे सांगून दर्शन मेहता यांनी सुभाष जोशी याला मुद्दामहून बेसावध ठेवले. आणि संधीचा फायदा घेऊन किंवा सापळा रचून त्याच्यावर खोटी केस दाखल केली.

## कोकण रबर प्लॉट वाटप व तेथील चारू काका बरोबर वसंतदादा पाटील यांचे निकटवर्तीय

पनवेल इंडस्ट्रीयल इस्टेट येथे कोकण रबर ही कंपनी स्थापन

करण्यासाठी सालढाणा साहेबांनी खूप मदत केली. आम्हाला एक प्लॉट तेथे ॲलॉट झाला. पनवेल इंडस्ट्रीयल इस्टेटचे चेअरमन त्या काळी श्री. चारूभाई शहा हे होते. चारूभाई शहा हे तेव्हाचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे निकटवर्ती होते. काही कारणांमुळे चारूभाई व सालढाणा साहेब यांच्यामध्ये काहीतरी बेबनाव झाला व चारू काका यांनी आपला प्लॉट कोकण रबरला देता येणार नाही म्हणून ही अलॉटमेंट रद्द केली. यामुळे प्रचंड तणाव निर्माण झाला. साहेबांनी आम्हाला सांगितले की, ''खाडिलकर तुम्ही किंवा श्रीकांत तुमच्या प्लॉटमध्ये किंवा तुमच्या शेडमध्ये कायम हजर राहा. सोडून कुठे जाऊ नका. कोणी तरी एकदा माणूस प्लॉटमध्ये कायम असला पाहिजे.'' कारण बळजबरीने त्या प्लॉटवर ताबा मिळवायचा प्रयत्न होण्याची शक्यता होती. परंतु सालढाणा साहेबांच्या प्रयत्नांमुळे व त्यांनी इतर बऱ्याच हालचाली केल्यामुळे तो प्लॉट आम्हाला मिळाला. तिथे आम्ही काम सुरू केले. या संदर्भाततली अजून एक आठवण म्हणजे हा प्लॉट मिळावा असा अर्ज भाऊमामाने त्याच्या वैयक्तिक लेटरहेडवर तो दिला होता. त्यामुळे प्लॉटचे अलॉटमेंट हे खाडिलकर या नावावर झाले होते. त्याचे कारण तेव्हा आमचे कंपनीचे नाव कदाचित ठरलेले नव्हते. परंतु जेव्हा आम्ही या पनवेल इंडस्ट्रीयल इस्टेटच्या रेकॉर्ड मध्ये जी.पी. खाडिलकर हे नाव बदलून कोकण रबर असे नाव दाखवावे, अशी विनंती केली तेव्हा पनवेल इंडस्ट्रीयल इस्टेट या बाबतीत प्लॉट ट्रान्सफर अशी नोंद करावी लागेल व



त्यासाठी ट्रान्सफर फी भरावी लागेल असे सांगितले. त्यामुळे कागदोपत्री कोकण रबर ही पार्टनरशिप कंपनी कधीच झाली नाही. आणि कागदोपत्री मी या कंपनीचा पार्टनर कधीच झालो नाही. काकांनी १९७६ साली त्यांच्या साठवलेल्या रकमेतून १५,००० रुपये ही कंपनी सुरू करण्यासाठी भाऊमामाला मदत म्हणून दिलेली होती. त्यामागची योजना म्हणजे मी या कंपनीमध्ये एक पार्टनर किंवा भागीदारीत असेल अशीच होती. दुर्दैवाने मी कधीच या कंपनीचा भागीदार होऊ शकलो नाही. महिना ३०० रुपये असे जवळपास सात वर्षे या मिळकतीवर मी कठोर मेहनत केली. दिवसातले कमीत कमी बारा ते चौदा तास काम करीत असे. मला बऱ्याच वेळा असे वाटे, या आयुष्यात मला चार आकडी पगार मिळणे जवळपास अशक्य आहे. परंतु आपण म्हणतो परमेश्वर कुठेतरी आहे. त्याची प्रचिती मला १९८४ साली आली. मी टाइम्स ऑफ इंडिया मधील जाहिरात वाचून जॉन्सन अँड जॉन्सन या कंपनीत नोकरीसाठी अर्ज केला. माझ्या पाच मुलाखती झाल्या. कुठलीही ओळख किंवा वशिला नसताना केवळ माझ्या आधीच्या कामाच्या अनुभवावर माझी बी.एस्सी व रबर टेक्नॉलॉजीची डिग्री यावर मला ही नोकरी मिळाली. मला अपॉईंटमेंट लेटर मिळाले. त्यातील पगाराची रक्कम बघून मला खरोखरच माझा त्यावर विश्वास बसला नाही. कारण जॉन्सनमध्ये मला महिना ३८०० रुपये दरमहा मिळणार होते. म्हणजे मला माझी वर्षातली कमाई होती त्याच्यापेक्षा जास्त रक्कम आता दर महिना मिळणार होती.

परदेशातील प्रवासासाठी हवाई तिकीट बुक करताना, कुठल्या देशातून प्रवास होणार आहे व त्या त्या देशाचा व्हिसाची अट नीट तपासून पाहा.

एक महत्त्वाचा बहुमोल अनुभव मी आपल्याला सांगू इच्छितो, आपण जेव्हा परदेशात विमानाने जातो आणि ही जर हा जर आपला

प्रवास एक दोन देशातून असेल तर आपले तिकीट व व्हिसा याचे काम करताना या गोष्टीची कायम काळजी घ्यावी. त्याचे झाले असे– मला युक्रेनला कीव येथे जायचे होते त्यासाठी मी जेट एअरवेज मुंबई ते पॅरिस आणि पॅरिस ते कीव असे एअर टिकीट व व्हिसा BTW जिमखाना यांनी माझे तिकीट बुक केले. मुंबई विमानतळावर जेट कर्मचाऱ्याने, ''मला पॅरिसचा व्हिसा आहे का?'' असे विचारले. ''मी पॅरिसमध्ये थांबणार नाहीये. पॅरिसमध्ये फक्त विमान बदलायचं आहे म्हणजे ट्रान्झिट पॅसेंजर आहे.'' असे मी म्हणालो. तिथल्या कर्मचाऱ्याने मला सांगितले की, ''तरीसुद्धा फ्रान्सचा ट्रान्झिट व्हिसा घेण्याची गरज आहे.'' त्याशिवाय आम्ही तुम्हाला आता या विमानात प्रवेश देऊ शकत नाही. वेळ होती रात्री बारा वाजताची मी त्यांना विचारले, ''मग आता काय करता येईल? मी गेल्या वेळेस होऊन गेलेलो होतो तुमची मुंबई ते कीव अशीच सेवा होती परंतु आम्सटरडॅम मार्गे होती. अशीच सेवा असेल तर अश्या विमानात मला तुम्ही माझे तिकीट बदलून द्या.'' जेट एअरवेजच्या कर्मचारीने मला सांगितले की, आमच्या सगळ्या फ्लाईट पूर्णपणे भरलेल्या आहेत आणि असं काही आत्ता करता येणे शक्य नाही. मी त्यांना विचारले, ''मला काय करता येईल?'' ते म्हणाले, ''आमच्या एअरपोर्टच्या ऑफिसला भेटा आणि पुढची कशी तुम्हाला फ्लाईट मिळू शकते का याचा प्रयत्न करा.'' याप्रमाणे मी तिथे गेलो व चौकशी केली, परंतु पुढचे आठ–दहा दिवस तरी मला प्रवास करता येणे शक्य नव्हते. त्यामुळे ते तिकीट रद्द करून दुसऱ्या कुठल्याही कंपनीचे तिकीट घेऊन मला जाणे भाग होते. मग मी विमानतळावरील अकबर ट्रॅव्हल्स यांच्या ऑफिसमध्ये गेलो. त्यांना विचारले, ''आज मला आता लगेच जाण्यासाठी एखादी दुसरी कुठली फ्लाईट आहे का?'' तर त्यांनी मला टर्किश एअरलाइनची 'मुंबई ते इस्तंबूल' आणि 'इस्तंबूल ते कीव' अशी फ्लाईट आहे व ती सकाळी सहा वाजताची

आहे व त्याचे तिकीट तुम्हाला मिळू शकते असे सांगितले. या तिकिटाची किंमत होती साधारणपणे ८०,००० रुपये. माझे क्रेडिट कार्ड वापरून मी ताबडतोब हे तिकीट विकत घेतले व नंतर जेट एअरवेजच्या काऊंटरला परत गेलो. त्यांना सांगितले की, माझे हे तिकीट रद्द करा. त्याच्यामध्ये हे नमूद करा की, माझ्याकडे ट्रांझिट व्हिसा नसल्यामुळे तुमच्या एअरलाईन्सने मला विमानात शिरू दिलेले नाहीये. त्याप्रमाणे त्याने मला तसे छापील पत्र दिले. मी त्याला म्हटलं, ''याच्यावर तुम्ही तुमचा शिक्का आणि सही करा.'' सुरुवातीला तो कर्मचारी तसे करायला तयार नव्हता. पण मी काही केल्या आणि सही केल्याशिवाय मी येथून जाणार नाही असे म्हटल्यावर त्याने मला शिक्का व सही करून दिली. या सगळ्या कामांमध्ये माझा जवळपास अर्धा-पाऊण तास खर्च झाला होता. प्रचंड मानसिक दमणूक झाली होती. या वेळेस माझ्याकडे सामान पण बरेच होते, कारण आम्हाला कीव मधील कंपनीमध्ये काही ट्रायल्स करणे गरजेचे होते. त्यासाठी मी बरोबर काही सामान घेतले होते. मी एका कॉफीशॉपमध्ये गेलो. एक छानपैकी गरम गरम कॉफी प्यालो. नंतर मी आमच्या ट्रॅव्हल एजंटला म्हणजे मी बी. टी. डब्ल्यू. यांना विमानतळावरून ताबडतोब एक इमेल पाठवला. पहाटे अंदाजे दोन वाजता. त्याच्याबरोबर मी जेट एअरवेजकडून मिळालेल्या पत्राचा फोटो काढून तो सोबत जोडला. या ई-मेलची कॉपी प्रथिताला पठविली. नंतर प्रथिताला फोन वर मेसेज पाठवला की सकाळी साडेदहानंतर बी. टी. डब्ल्यूच्या ऑफिस मध्ये जाऊन झालेल्या घटनेची त्यांना पूर्ण माहिती दे आणि आपण विकत घेतलेल्या तिकिटाचे पूर्ण पैसे परत द्यायची व्यवस्था त्यांना करायला सांग. माझ्या इमेलमध्ये सुद्धा मी अशी विनंती त्यांना केलेली होती. त्यामुळे यापुढे कधीही प्रदेश प्रवास करायचा असेल व मध्ये जर ब्रेक जर्नी असेल आणि हा ब्रेक जर एखाद्या वेगळ्या देशात असेल तर तिथे ट्रान्झिट व्हिसा लागतो का

किंवा शेवटच्या देशात जिथे जायचं आहे त्या देशाचा व्हिसा असेल तर चालतो का याची चौकशी करणे जरुरी आहे. बऱ्याच वेळा ट्रॅव्हल एजंटचे कामगार हे नवीन असू शकतात व त्यांना या सगळ्या नियमांची कल्पना असतेच. त्यामुळे यापुढे परदेशी जाताना तिकीट घेताना या सगळ्या बाबी आपण तपासून पहाव्यात अशी माझी नम्र विनंती आहे.

## स्वतःहून संगणक शिकणे

आम्ही १९९८ मध्ये पनवेलहून आमची कंपनी पुण्यात शिंदेवाडी येथे हलविली. माझ्याबरोबर माझा सहकारी गिरीश शास्त्री हा होता. गिरीश शास्त्री आणि मी आमच्या तुंगभद्रा येथील वन बीएचके मध्ये राहत होतो. आम्ही तेव्हा एक कॉम्प्युटर विकत घेतलेला होता. मी बरेच दिवस गिरीशला मला कॉम्प्युटर शिकव अशी विनंती करत होतो, पण मनापासून त्याला मला कॉम्प्युटर शिकवायची इच्छा नव्हती. मग मी कॉम्प्युटर चालू बंद कसा करायचा एवढे शिकलेले होतो. मी कॉम्प्युटर चालू करून हेल्प मेनूमध्ये जाऊन वर्ड, एक्सेल व पावर पॉइंट हे हळूहळू स्वतः शिकलो. आता मला कॉम्प्युटरमध्ये बरेच काही करता येऊ लागले आहे. त्याच्यामागे माझी मेहनत व हेल्प मेनू मध्ये जाऊन एका ठिकाणी जाऊन त्याच्यावरती मार्ग काय हे शोधून काढून आपले काम कसे करता येईल या तळमळीमुळे. आता मी कॉम्प्युटरवरती बरेच काही करू शकतो. तर हे कॉम्प्युटरमधील प्रावीण्य मला मिळाले याचे श्रेय कुणाला द्यायचे झाले तर मला वाटते ते गिरीश शास्त्री यांना द्यावे लागेल. त्याने जर मला शिकवले असते तर मी जेवढे हवे तेवढेच शिकलो असतो, परंतु गिरीशने शिकवले नाही म्हणून मी जिद्दीने पूर्णपणे यात झोकून देऊन कॉम्प्युटर याबाबतीत पूर्णपणे प्राविण्य मिळवू शकलो. अथक प्रयत्न केला. त्यामुळे माझ्या यशाचा खरा मानकरी माझ्या मते गिरीश असायला हवा.

**सुंदर राजा**

प्रदीप महानोत यांनी माझी व सुंदरराजाची ओळख करून दिली, प्रदीप महानोत, अंजना मशीनरी या कंपनीत संचालकांपैकी एक होता. गोरेगाव येथील अंजना मशिनरी होती. सुंदर राजाने उदय शंकर यांच्या समवेत सन १९९९ मध्ये शिंदेवाडी येथील फ्युचरिस्टिक टिप्स प्रायव्हेट लिमिटेड येथे पॉवर प्लँटला भेट दिली. तमिळनाडूतील राजपालायम येथे ड्राय वॉल टेपचे उत्पादन सुरू करण्याची त्याची महत्त्वाकांक्षी योजना होती. माझ्यासाठी त्या क्षणी हे अगदी नवीन उत्पादन होते जे मी यापूर्वी कधी पाहिले नव्हते. सुरुवातीची बैठक खूपच उत्साहवर्धक होती आणि मी पुणे येथे या उत्पादनांच्या विकासाच्या दृष्टीने पूर्ण पाठिंबा दर्शविला. सुंदर राजा आणि उदय शंकर यांनी भविष्यकालीन भेटी घेतल्यानंतर ग्लास फायबर कपड्यावर आधारित रोल कोटिंग करण्यासाठी घेऊन आले. या कापडावर अधेसिव्ह कोटिंग करणे आवश्यक होते आणि कापडाच्या एका बाजूलाच हे कोटिंग ठेवणे हे खरे आव्हान होते. एखाद्या फॅब्रिकवर कोणत्याही साध्या सब्सट्रेटवर कोटिंग करणे खूप सोपे असते परंतु एका जाळीवर कोटिंग करणे अत्यंत कठीण असते. गुरुत्वाकर्षणामुळे कोटिंग दुसऱ्या बाजूला झिरपणेची खूप शक्यता असते. आपण एका दिवसात कोटिंगची ट्रायल साध्य करू शकू असे मला खात्रीने वाटत होते. अशी ट्रायल आम्ही केली व दिवसाच्या शेवटी मी काही कोटिंग केलेले रोलचे नमुने सुंदरला देऊ शकलो. सुंदर राजा या ट्रायलमुळे खूपच प्रभावित झाला आणि त्याच्या स्वप्नातील एखादा टेप प्रत्यक्षात देता आला याचा मला



आनंद झाला. त्याने मला वचन दिले की, 'मी या नवीन कंपनीमध्ये तुला सामील करून घेईन.' या प्रोजेक्टमध्ये मला व्हाईस प्रेसिडेंट असे पद देणेचे त्याने वचन दिले. त्यांच्या राजपालायम प्लँटमध्ये मी बऱ्याचदा भेटण्यास सुरुवात केली आहे. मी एम. के. कुमार यांच्याशी सुंदर राजाची ओळख करून दिली आणि त्यांच्या साहसी तसेच नावीन्यपूर्ण प्रकल्पाबद्दल त्यांना माहिती दिली आणि भारतातील या उत्पादनाची व्याप्ती पाहता, जे १००% आयातीला पर्याय होते. एम. के. कुमारदेखील खूप प्रभावित झाले. त्यांनी आपला पूर्ण पाठिंबा दर्शविला. राजपालायम येथे नवीन कंपनी स्थापित करण्याच्या उद्देशाने.

**माझ्या परदेश वाऱ्या / परदेशातील प्रकल्प**

हा माझा परदेशातील पहिला प्रोजेक्ट होता. स्कायलार्क पॅकेजिंग शारजाह - १९९६

या प्रोजेक्टने मला बरेच काही शिकविले. भारतात काम करणे व तेच काम परदेशात करणे ही किती वेगळे असते याचा एक फार चांगला अनुभव मिळाला. हा प्रोजेक्ट मला माझे मित्र गुलजार सिंग यांच्यामुळे मिळाला. त्यांनी या प्रोजेक्टसाठी लागणारी सर्व मशीन बनविली होती. एक उदाहरण देतो, आपल्या येथे, MSEB ची वीज मिळणे व टी जोडणे याला कितीही वेळ लागू शकतो. परंतु UAE मध्ये हेच काम काही तासात करतात. मला आठवते, वीज मंजूर झाल्यावर त्यांच्या वीज मंडळाचा एक जेसीबी आला व त्याने वाळूमध्ये एक मोठा चर खणला गेला. त्यापाठोपाठ, एक पिकअपमधून केबलचे रीळ आले व या चरामध्ये केबल टाकली गेली. याच्या पाठोपाठ, दुसऱ्या पिकअपमधून काँक्रीटचा एक मोठा ब्लॉक आणला गेला. याचा पाठोपाठ अजून एक पिकअपने ट्रान्सफॉर्मर आला. हे सर्व क्रेनने काही मिनिटात बसवले गेले. सोबत एखादा हेल्पर, वीज जोडणी अक्षरश: ३ ते ४ तासात पुरणे झाली. यानंतर लगेच तेथील वीज मंडळाचे वरिष्ठ अधिकारी

आले व सर्व काम व्यवस्थित झाले आहे याची खात्री करून घेऊन, आमची वीज चालू करण्यात आली. हे अधिकारी, पाकिस्तानचे होते,



माझे मशीन व टेप पाहून ते म्हणाले की, हिंदुस्तानात किती चांगले काम होते आहे. आमच्या पाकिस्तानात असे काहीही होत नाही

SH-MROCK टेप्स श्रीलंका १९९८

हा माझा परदेशातील दुसरा प्रोजेक्ट. माझे एक मित्र रामदास पाटकर यांच्या ओळखीमुळे हा प्रोजेक्ट मला मिळाला. या कंपनीचे मालक होते मायकल शर्मा. हे एक हिंदुस्थानी होते, परंतु काही वर्षं पूर्वी ते आयर्लंडला स्थाायिक झाले. तेथे त्यांनी एक आयरिश महिलेशी लग्नं केले व तेथेच स्थायिक झाले. काही वर्षांनी श्रीलंका येथे फिरण्यासाठी आले होते. एकदा हॉटेलात बसले असताना पाठीमागील टेबलवर दोन श्रीलंकन बसले होते व ते BOPP टेपसंबंधी काही बोलत होते. त्यांना त्यांचा टेपचा प्लँट विकायचा होता. हे सर्व संभाषण ऐकून, या ना ह्या प्लँटमध्ये गुंतवणूक करावीशी वाटली व काही दिवसातच त्यांनी हा प्लँट विकत घेतला. त्यानंतर या धंद्यातील खाचखळगे त्यांच्या लक्षात आले व एखादा कन्सल्टंट नेमला पाहिजे असे ठरवून ते माझ्या संपर्कात आले व मला हे काम मिळाले.

MULCHAND Packaging (जय कोठारी) शारजाह १९९९

मी आधी सांगितलंय त्याप्रमाणे, SKYLARK Pkg , एक-दीड वर्षांत विकावी लागली व हा प्लँट श्री. जय कोठारी यांनी विकत

घेतला. जय कोठारी व माझी ओळख माझा अजून एक मित्र जॉन फर्नांडीस याने करून दिली. जय कोठारी यांना या प्लँटमध्ये PAPER LABLE STOCK बनवायचा होता व त्यासाठी या मशीनमध्ये काही बदल करणे गरजेचे होते. मी एक दोनदा या प्लँटमध्ये जाऊन काय बदल करायला लागतील हे जय कोठारी यांना समजावून सांगिलं. हे सर्व पार्ट मुंबईत बनवायचे ठरले.

KHASK Imamod Ukraine २०१८ (EBRD प्रोजेक्ट)

हा एक नवीन प्रोजेक्ट मला, अलेक्स नावाच्या माणसामुळे मिळाला. अलेक्स माझा linkedin वरील मित्र होता. आमच्या पुणे व मुंबई येथे दोन मिटिंग झाल्या. अलेक्सने मला EBRD बँकेविषयी सर्व माहिती दिली. त्याप्रमाणे मी EBRD बँकेच्या संपर्कात आलो व हे काम मला मिळाले.

येथे मी त्यांना रबर बेस अधेसिव्ह व PVC च्या काही टेप बनविणेसाठी मदत केली.

KIV- GUM- KIV Ukraine, 2018 (EBRD प्रोजेक्ट)

हा प्रोजेक्ट मला EBRD बँकेने दिला. येथे रबरचे शिट टाल्कम पावडर विरहित बनविण्यासाठी मी मदत केली.

OZOM² Odassa Ukraine २०१९

हा प्रोजेक्ट मला, OZOM² कंपनीचे एक डायरेक्टर, पॉवेल यांच्यामुळे मिळाला. पॉवेल हे पण माझे Linkedin वरील मित्र. हा प्रोजेक्ट अजूनही चालू आहे

**परदेशात टेक्निकल पेपर प्रेझेंटेशन**

PSTC (Pressure Sensitive Tapes Council, USA) टेक्निकल सेमिनार, ओहिओ २००० साली, मी माझा एक पेपर, PSTC ला पाठवला होता. हा एक शोध निबंध होता. PSTC ने माझा पेपर, स्वीकारला व मला पहिल्यांदा अमेरिकेला जाण्याचा योग्य आला.

ASC (Adhesive and Sealants Council, USA) टेक्निकल

सेमिनार, ओरलँडो २००४

२००४ साली, मी माझा एक टेक पेपर, ASC ला पाठवला होता, हासुद्धा एक शोध निबंध होता. ASC ने माझा पेपर स्वीकारला व मला दुसऱ्यांदा अमेरिकेला जाण्याचा योग्य आला.



MKVS (Munich Adhesives and Finishing Symposiu) बर्लिन जर्मनी २०१४

२०१४ साली, मी माझा आणखी एक Tech पेपर, MKVS ला पाठवला होता, हासुद्धा एक शोध निबंध होता. MKVS ने माझा पेपर, स्वीकारला व मला पाहिल्यांदा, बर्लिन, जर्मनीला जाण्याचा योग्य आला.

**ICHEMCO इटली २०१४**





ICHEMCO या इटालियन कंपनीचा मी भारतातील सल्लागार होतो. २०१४ साली, ICHEMCO च्या मिलान प्लँटमध्ये एक कॉन्फरन्स होती. ICHEMCO जे जगभरातील ३० प्रतिनिधी आले होते या कॉन्फरन्समध्ये मी दोन पेपर सादर केले. मला पाहिल्यांदा, मिलान, इटलीला जाण्याचा योग्य आला.

RUBBER EXPO बँकॉक, थायलंड २०१८

२०१८ साली, मी माझे दोन शोध निबंध RUBBER Expo bm पाठविले होते. त्यांनी माझे दोनही पेपर स्वीकारले व मला पाहिल्यांदा, बँकॉक, थायलंडला जाण्याचा योग आला.

■ ■



## २०. जाता–जाता काही न विसरता येणारे क्षण

जाणाऱ्या पावसाच्या गडगडाटप्रमाणे हे सदर लिहिता आले त्याचे सर्वस्वी श्रेय जाते माझ्या अतिशय जिवलग नातेवाइकांना. नाव घ्यायचेच झाले तर रुपाली बोडस (सुरूमामाची मुलगी), सुरेश काका, सुरु मामा, अविदादा वाटवे, प्रभा, चित्रा वाहिनी व अनेक इतर ज्यांनी, फोन करून अथवा मला मेसेज करून या आठवणी जागृत केल्या. माझा या सर्व मंडळींना, सप्रेम नमस्कार आणि धन्यवाद.

१. मी माझी कारकीर्द कशी घडत गेली आहे यासंबंधी या आधीच लिहिले आहे. काल परवा, सकाळचे चहापान चालू असताना, प्रथिताने मला आठवण करून दिली. मला जॉन्सन अँड जॉन्सनमध्ये नोकरी मिळाली व तो माझ्या आयुष्याचा किंवा कारकिर्दीचा टर्निंग पॉईंट होता, परंतु याला जबाबदार होती, माझी आई. आईने मला टाइम्स ऑफ इंडियामध्ये आलेली जाहिरात दाखवली. त्यामुळे मी या नोकरीसाठी अर्ज करू शकलो व पुढे जाऊन मलाही नोकरी मिळाली. ही गोष्ट मी पूर्णपणे विसरलो होतो. मग लागलीच मी आईच्या पाया पडलो व तिला याबद्दल मनापासून धन्यवाद दिले.

२. माझ्या कारकिर्दीत मला जे साध्य झाले त्याचे अजून एक मानकरी होते व ते म्हणजे माझे काका (वडील). पनवेलला कोकण

रबरमध्ये काम करीत असताना, एकदा आई व काका, पनवेलला आले होते मी नेहमीप्रमाणे, पूर्णपणे काळाकुट्ट झालेला, अंगावरील कपडे कमालीचे मळलेले असा घरी आलो. हे पाहून आई, काकांना सहज म्हणाली, ''बघा काय हा ह्याचा अवतार! किती काम करतो, ना कपड्याचे भान ना तब्येतीचे.'' काकांनी या वेळेस तिला समजाविले. म्हणाले,

''अग हेच ते वय आहे, कष्ट करण्याचे व नवीन-नवीन गोष्टी शिकण्याचे. उद्या हा तुला गाडीतून फिरवील की नाही ते पाहाच.'' सुदैवाने काकांचे शब्द खरे ठरले, परंतु ते पाहायला काका मात्र राहिले नाहीत. परमेश्वरसुद्धा किती निष्ठुर असतो नाही का? तो बरेच काही देतो, परंतु त्याबदल्यात अशी एखादी आपली आवडती गोष्ट घेतो, हे जर मला आधी माहीत असते तर आपण म्हणालो असतो, ''परमेश्वरा, नको ती सुबत्ता, नको ते यश. माझे काका मला सदैव लाभू देत.''

३. आता जी आठवण मी सांगणार आहे ती मला, रुपालीने पाठवून दिली. १९७८ साली मे महिन्यात मी, ऊर्मिला मामी व मुली (वैजू व विभा), शोभा मामी व मुले (रुपाली व राहुल), रट्टिहल्लीला खास आंबे खाण्यासाठी गेलो होतो. रुपालीच्याच शब्दांत,

''माझी एक आठवण म्हणजे आम्ही सगळे रट्टीहल्लीला आलो होतो. तेथे तुमच्याकडे एक आरामखुर्ची होती. त्यातला रूळ तुला (म्हणजे मला) पाडण्यासाठी, मी आणि वैजूताईने तो रूळ काढून ठेवला होता. नंतर काही वेळाने वैजूताईच जाऊन बसली आणि पडली. या नंतर सगळ्यांची हसून-हसून पुरेवाट झाली होती.''

अजून एक आठवण, रुपालीच्याच शब्दात, ''आणि आठवतंय म्हणजे तू कमवायला लागल्यावर, आम्हा सगळ्या बच्चे कंपनीला हॉटेलात डोसा व गोल्डस्पॉटची पार्टी दिली होतीस.''

४. आता सांगणार आहे, ती आठवण मला सुरूमामाने सांगितली. ''माझा जन्म, १५ डिसेंबर १९५३ रोजी पहाटे ५ च्या सुमारास झाला.'' व ही बातमी सांगण्यासाठी खाडिलकर वाड्यात राहणारी शेजारची नलू

दाते, यांनी सर्व मामांना (सुरुमामा, जगदीशमामा यांना) पहाटे– पहाटे उठविले व म्हणाली, ''उठा– उठा, लीलाताई बाळंतीण झाली व तुम्हाला भाचा झाला आहे.'' नलूताईना झालेला आनंद म्हणजे जणू, 'राम जन्मला ग सखे, राम जन्मला' या गीतरामायणातील गीतासारखा.

५. ही आठवणही सुरुमामानेच सांगितली. खाडिलकर वाड्यात आमचे अजून एक शेजारी होते, लेले कुटुंब. लेले हे कापडाचा व्यापार करीत. बिचारे सायकलवर गठ्ठे बांधून खेड्यापाड्यात जाऊन कापड विकून चार पैसे मिळवत. त्यांना ५ मुले – राम, गजा, शकू, धोंडिबा व पक्या. पक्या हा माझा बालपणीचा जीवश्चकंठश्च मित्र. दुर्दैवाने पक्या अगदी लहान वयात काहीशा आजाराने हे जग सोडून गेला.

६. सांगलीची खाडिलकर वाड्यातील अजून एक आठवण. तेथे शौचासाठी वाड्याला, बाहेरून वळसा घालून वाड्यामागील बाजूस पायी जावे लागे. सोबत पाणी घेऊन जावे लागे. एकदा सांगलीचे मामा (आईचे काका, नारायणराव) शौचास जात होते. हातात तांब्या होता. मामांचे एक मित्र म्हणाले, ''काय नारायणराव कुठे प्रयाण?' मामा मोठे मिश्कील, म्हणाले, ''येतो जरा फिरून.''

७. पनवेलची एक आठवण. राहुल, रुपाली अगदी लहान मुले होती. त्यांना शाळेत घेऊन जाणे व शाळा सुटल्यावर परत घेऊन येणे हे काम सागवेकर न चुकता करीत असे. सागवेकर हा पापभिरू माणूस, कायम अभंग, पोवाडे भक्तिपर गीत गुणगुणत असे. जणू काही संत तुकारामच म्हणा ना. एकदा असाच या मुलांना शाळेत सोडायला चालला होता. मुखी काही भक्तिपर गुणगुणणे चालू होते. अगदी तल्लीन होऊन गेला होता. वाटेत एक छोटा खड्डा आला व राहुल सायकलच्या कॅरियरवरून खाली पडला. सागवेकरचे लक्षच नव्हते, अगदी गोरा कुंभारप्रमाणे. राहुल जोरजोरात ओरडला, ''अरे सागवेकर, मी पडलो आहे.'' सागवेकरने मग त्याला उचलले व कोठे लागले तर नाही ना याची पाहणी केली. सागवेकर या दोन्ही मुलांवर जिवापाड प्रेम करत असे, राहुलला कायम राजाराम म्हणे.

८. काकांचे पोस्टातील सहकारी, उदाहरणार्थ जाफरभाई, हुबळी मास्टर.

जाफरभाई यांच्या काही गमती.

एकदा बिडी ओढत होते व बिडी टेबलावर अॅश ट्रेमध्ये ठेवली होती. काही वेळाने ते काकांना म्हणाले, ''अरे आठवले, कुछ तो जलाने का बास आ रहा है रे?'' आणि नंतर सर्वांच्या लक्षात आले की, जाफर भाईच्या कोटाच्या बाह्या, पेटती बिडी लागून जळू लागल्या होत्या. काका म्हणाले, ''जाफरभाई, तुम्हारा कोट हि तो जल रहा है।''

''अरे आठवले, इस साल, गुडफ्रायडे शुक्रवार को ही आया है रे? ''

हुबळी मास्टर यांचा ड्रेस कोड- एक मळका कोट घालत व एक छत्री, कायमस्वरूपी कोटामागे अडकवलेली असे.

९. काकांची फोटोग्राफी, नातेवाइकांचे पैकी कोठेही काही कार्यक्रम असो, फोटोग्राफर ठरलेले.

१०. काकांची पोस्ट ऑफिसमध्ये ओळख म्हणजे आंबे खाणारे मास्टर. आंब्याच्या दिवसात ते बरेच मित्रांना घरी जेवायला बोलावयाचे. आईला सक्त ताकीद दिलेली असायची. आंबे संपेस्तोवर, भाजी, आमटी वगैरे काही करायची नाही, फक्त पोळ्या किंवा पुरी व आमरस बस.

११. सरोज मावशीने पाठविलेली आठवण तिच्या शब्दातच ऐकुया: १९७३ साली तुझा B.Sc. चा रिझल्ट लागला तेव्हा तू पनवेलला होतास. माझा पण B.A.चा रिझल्ट तेव्हाच लागला, मी पण पनवेलला भाऊकडे आले होते. तुझा उत्तम निकाल पाहून सगळेच आनंदात होते. ती. मामा आणि मामीपण तिथेच होते. ती, पंत आणि ती लीलाताईही होते. त्या दिवशी संध्याकाळी, कधी नव्हे ते, मामा-मामीसह आपण सगळेच, सिनेमाला गेलो, हे नवलच वाटले म्हणूनच ते चांगलेच लक्षात आहे. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी पंत आणि लीलाताईबरोबर

मी डोंबिवलीला अण्णाकडे गेले, तेव्हा अण्णा जीवन ज्योतमध्ये राहात होता. वैजू मला वाटतं, नुकतीच शाळेत जाऊ लागली होती.

१२. कनकनेही तिच्या काही आठवणी, अमेरिकेहून पाठविल्या आहेत. तिच्याच शब्दात– पनवेलच्या माझ्या आठवणी आहेत. भाऊमामाचे घर, पायोनियर सोसायटीमधील तुझा फ्लॅट आणि सुरू मामाचे घर (जेव्हा ते पनवेलमध्ये होते). मला सागवेकर व त्याचे गायन आठवते. आम्ही बरेच वेळा दिवा–पनवेल ट्रेन प्रवास करून पनवेलला दोन दिवस घालवायचो. माझा पनवेल येथे दीर्घकाळ मुक्काम तुमच्या लग्नाच्या वेळी झाला होता.

योगायोगाने, सुरूमामानेच मला पु. ल. देशपांडेंची पुस्तकरूपी ओळख करून दिली. त्या वेळी मी देवनागरी वाचण्यास सक्षम नव्हते, पण मामाने त्यांच्या पुस्तकातून सांगितलेल्या काही घटना मला खूप आवडल्या व दीर्घकाल लक्षातही राहिल्या.

तुला आठवते का याची मला खात्री नाही, परंतु भाऊमामाच्या घरातून पायोनियरच्या फ्लॅटकडे जाताना, मी तुझ्या स्कूटरच्या मागे बसले होते व एका खड्ड्यात मी स्कूटरवरून खाली पडले.

तुझ्या कथनातून बालपणाच्या काही जुन्या आठवणी परत ताज्या झाल्या. कनकसंबंधी पनवेल येथे अजून एक आठवण. कनक भाऊमामा कडे, काही समारंभ असल्यामुळे आली होती. शैलजा मामीच्या मैत्रिणी आल्या होत्या. कार्यक्रम संपला व सर्व पाहुणे मंडळी घरी गेली. या मैत्रिणीपैकी एकीने घरी जाताना एक चप्पल स्वत:ची व दुसरी कनकची घातली होती. सकाळी कनक जाण्यास निघाली व तिला तिची एक चप्पल सापडेना. इतक्यात ती बाई आली व मामीला म्हणाली, ''अग काल रात्री चुकून मी दुसरीच चप्पल घालून गेले.'' यावर नंतर आम्ही सर्वच खूप हसलो होतो.

१३. कनक एकदा व शैलजामामी एकदा, माझ्या स्कूटरवरून पडल्यामुळे, छोटी विभा मला यानंतर नेहमी चिडवत असे. ''मनू दादाने कनकताईला व शैलजा काकूला पाडले, मी नाही बाबा बसणार त्याच्या मागे.''

खाडिलकर घराण्यात नातवंडांत मी सर्वांत मोठा. सर्व भावंडे, म्हणजे  वैजू, विभा, अमृता, अनु, रुपाली, राहुल, तसेच सरोज मावशीची मुले, सुनील व पिपाणी (हे टोपण नाव होते बर का, तिचा आवाज फारच मजेशीर होता म्हणून आम्ही सर्व तिला पिपाणी म्हणायचो), मला मनू दादा म्हणायची. ही मुले जशी मोठी होत गेली तशी मला श्रीकांत दादा म्हणू लागली. परंतु वैजू व विभा मात्र मला अजूनही मनूदादाच म्हणतात. माझे मनातले सांगू का?

मला वैयत्तिकरित्या मनूदादा म्हटलेलेच आवडते, त्यात जो एक प्रकारचा आपलेपणा आहे तो श्रीकांतदादा या नावात नाही. याचा अर्थ, यापैकी कोणाचेही माझ्याबद्दल वाटणारे प्रेम किंवा जिव्हाळा कमी झाला असे मात्र नाही.

सांगलीला सुट्टीमध्ये ही सर्व मुले व मी जमलो की प्रचंड धमाल करीत असू. त्यात जगदीशमामा पण सुट्टीत सांगलीला आला की काय विचारायची सोय नाही. अप्पाकाका नेहमी म्हणायचे, मन्या व जगदीश दोघे एकत्र आले व ही सर्व मुले एकत्र जमली की काय बोलायची सोय नाही. आता गाढवपणाला ऊत येईल. अप्पाकाकांचा माझ्यावर अतिशय जीव होता व दरवेळी सांगलीहून निघालो की, ''मन्या, तुझ्याशी बरेच काही बोलायचे होते पण राहूनच गेले. असो. पुढील वेळी भेटलो की बोलू.''

अप्पाकाका गेले तो दिवस मला अजूनही आठवतो. १९८७ साली होळीच्या दिवशी ते गेले. मी त्या वेळी इंदोरला पंकज टायरमध्ये नोकरी करत होतो. दुसरे दिवशी कामावर गेल्यावर प्रथिताने फोनवर मला ही वाईट बातमी सांगितली. मी इंदोर-पुणे बसने व पुढे सांगलीला बस ने गेलो. जवळपास ३० तास प्रवास करावा लागला.

१४. सांगली मुक्कामी, सरोज मावशीची एक आठवण. ती खूप छान गाणी म्हणायची. दादा कोंडके यांच्या सोंगाड्या सिनेमातील, 'मळ्याच्या मळ्यामध्ये कोण ग उभी', हे गाणं ती फार छान म्हणायची विशेष म्हणजे अप्पाकाकांनी सुद्धा तिचे कौतुक केले होते. सांगली

मुक्कामी मी व मोठी आई (माझ्या आईच्या आईला मी मोठी आई म्हणायचो) ने काही सिनेमा बघितले होते, यात 'सोंगाड्या' हा सिनेमा ही होता.

१५. काल रात्री व आज सकाळी, सुरेश काकांशी फोनवर या पुस्तकाविषयी बोलणे झाले. सुरेशकाकांनी माझ्या काकांच्या (वडिलांच्या) बऱ्याच आठवणी सांगितल्या. काका सर्व नातेवाइकांना नेहमीच जमेल ती, तशी मदत करीत असत. विसूकाकाचे घरी काहीही कमी पडले की काका त्याची व्यवस्था करीत असत. ही आठवण सुरेशकाकांनीच आज सांगितली. सुरेशकाकांनी त्यांना नोकरी लागल्यावर त्याची परतफेड केली. सुरेशकाकांनी आज मला सांगितले की १९५६ साली, काका नि विठूकाकांना शेतात बसविणेसाठी एक पंप व मोटार घेउन दिली होती. यामुळे शेतात पिकांना पाणी देणे सोपे झाले होते. याची किंमत त्या वेळेस जवळपास तीन हजार रुपये इतकी होती. काकांचा पगार त्या वेळी ३०० ते ४०० रुपये इतकाच होता, परंतु काकांनी पैशाचा विचार कधीच केला नाही. एखाद्याला मदत करायची हे ठरले की झाले. सुरेशकाकांनी सांगितले की, त्यांनी हा पंप व मोटर, हुबळी येथे विकत घेऊन, त्यासाठी एक स्टॅन्ड बनवून घेऊन हे सर्व मुळगुंद येथे जाऊन, विठूकाकाच्या शेतात बसवून दिला होता.

सुरेश काकांनी आणखीन एक आठवण सांगितली. काका मॅट्रिक झाल्यावर लगेच पोस्टमध्ये नोकरी करू लागले. काही काळानंतर ही नोकरी कायम होणेसाठी, सिव्हिल सर्जनचे फिटनेस सर्टिफिकेट जरुरी होते. त्या काळी डॉक्टर दवे हे सिव्हिल सर्जन होते. त्यांनी काकांना फिटनेस सर्टिफिकेट देणेसाठी १०० रुपये घेतले होते.

१६. माझ्या पुण्याच्या काही आठवणी : बालपणी सांगलीहून पुण्याला बरेच वेळा मी व आई यात असे. पुण्यात वसंतकाका तर खूप लाड करायचेच, पण सुनंदा काकूसुद्धा बराच खाऊ करायची. वसंत काका व काकूला सुद्धा माणसे खूप हवी होती. येथे सुद्धा कायम पाहुण्यांची ये-जा नेहमी असे. काका व काकू मनाने फार श्रीमंत होते.

काकांची मिळकत मर्यादित होती, परंतु ही दोघेही कायम आनंदी असत. येणाऱ्या-जाणाऱ्यांचे खूप करीत असत.

पुण्यात आलो की, सोनूताई (म्हणजे माझ्या आजीची धाकटी बहीण) व मामा बेडेकर, यांच्याकडे जायला मला फार आवडत असे. त्याला कारणही तसेच होते, सोनूताई व मामा माझे लाड करीतच, परंतु प्रकाशकाका व बेबी आत्याही खूप लाड करीत. प्रकाशकाका माझ्या बालपणीचा, दुसरा हिरो होता. पहिला हिरो म्हणजे आत्माराम काका. याचे कारण म्हणजे या दोंघांच्याकडे मोटार सायकल होती. प्रकाशकाकाची आताच्या एमएटी सारखी एक वेगळीच गाडी होती व त्या काळी ती खूप गाजलेली होती. बेबी आत्या मला संभाजी पार्क, पेशवेपार्क मध्ये घेऊन जाई. संभाजी पार्कमध्ये, मी पायडल मारून चालवता येणारी खेळातील कार चालवलेले चांगले आठवते. खेळून झाल्यावर बेबी आत्या, मस्त पुणेरी भेळ पुरी व आइस्क्रीम देत असे. तसेच पेशवे पार्कमध्ये मुलांची आगगाडी, फुलराणीमध्ये बसलेले सुद्धा आठवते. या बेडेकरांच्या घरी, दोन किंवा तीन खिडक्यात, खूप छान बाग केलेली होती व त्याला लागलेली फळे किंवा भाज्या मला अजूनही आठवतात. कदाचित, गच्चीत बाग करण्याची स्फूर्ती मला या मुळेच कदाचित मिळाली असेल.

वसंतकाकांच्या घरातील एक किस्सा मला अजूनही आठवतो. तो म्हणजे संध्याचे लग्न. संध्याचा प्रेमविवाह ठरला होता. नेमका त्याचा वेळी मी पुण्यास कोकण रबरचे कामानिमित्त आलो होतो. दुसऱ्या दिवशी संध्याचे रजिस्टर पद्धतीने लग्नं होते. सुमतीकाकू व बापूकाका सोलापूरहून आले होते. काकूने तिच्या मैत्रिणी किंवा नात्यापैकी कोणाला तरी लग्नाचे आमंत्रण दिले होते. संध्याला हे रात्री कळले व ती काकूवर खूपच चिडली. तिचे म्हणणे हेच होते की, कोणालाही बोलावयाचे नाही असे ठरले होते तर तू त्यांना का बोलावलेस? शेवटी काकू त्यांच्या घरी रात्री गेली व लग्नास येऊ नये असे सांगून आली.

या वेळेस काका व आई पुण्यात आले होते. ते लग्नास उपस्थित राहिले, मी मात्र सकाळी पनवेलला परत गेलो.

पुण्यात आलो की, वसंतकाकांच्या दुकानात मी बराच वेळ गप्पा मारत बसलेलो असे. काकांचा एक कामगार होता, कृष्णा नावाचा, अतिशय गरीब व काकांना सर्वतोपरी मदत करणारा होता. काकाचे एक मित्र होते पतंगे. याचीही टेलरिंग कंपनी पुणे कॅम्पमध्ये होती. मला पुण्यात कामासाठी लांब जायची वेळ आली की मी या पतंगेंची स्कूटर घेऊन जात असे. बरेच वेळा मला त्यांची स्कूटर नेलेली आठवते. एकदा-दोनदा मी वनाझ कंपनीत आलो होतो. त्या काळात म्हणजे साधारणपणे १९८० साली, आपटे रोड, डेक्कन जिमखान्याहून वनाझला म्हणजेच कोथरूडला येणे, म्हणजे गावाबाहेर खूप लांब गेल्यासारखे वाटे. वस्ती नव्हतीच त्या वेळी. असेच शकू आत्याचे घर डहाणूकर कॉलनी जवळ. तेसुद्धा गावाबाहेर व खूप लांब वाटत असे. तेव्हा कर्वेनगरहून बस येताना एक डोंगरावरून, घाटासारखा रस्त्याने दिसत असे. अतिशय विरळ वस्ती त्या काळी येथे होती. काकांचा एक खास मित्र एक रिक्षावाला होता, बहुतेक बबन त्याचे नाव होते. काकांच्या दुकानाजवळ, श्री शरदराव गोगटे यांचे पुस्तकाचे दुकान होते. शरदराव हे, पुष्पाताईंचे यजमान. शरदरावांबरोबर बऱ्याच गप्पा होत असत.

कोकण रबरच्या कामानिमित्त मी सोलापूरला २ ते ३ वेळा गेलो होतो. सुलभाताईचे यजमान शामकांत यांच्या कंपनीत लागणारे काही रबरचे पार्ट आम्ही तयार करण्याचे प्रयत्न करीत होतो. सोलापूरला मुक्काम बापूकाका व सुमतीकाकू यांच्या घरी असे. ही दोघेही सर्वांचे खूप करत असत. परिस्थिती बेताची पण मन खूप मोठे. बापूकाकांना सिनेमाचे खूप वेड होते व बहुतेक सर्व नवीन सिनेमा ते पाहात असत. सिनेमा कसा होता असे विचारले की ठीक होता, बरा होता असे म्हणत. एकाही सिनेमाला नावे ठेवलेली मला तरी आठवत नाही. मराठी नाट्यसंगीत हा त्यांचा दुसरा आवडता विषय होता.

१७. सरोजमावशीने पाठविलेली आठवण, तिच्या शब्दांतच : मन्या, माझ्या गाणं म्हणण्याची जी तू आठवण सांगितलीस तो प्रसंग, माझ्या आठवणीप्रमाणे, शैलजा वहिनीने मंगळागौरीचे उद्यापन केले त्यावर्षीचा आहे. सोंगाड्या गाणं ऐकून ती मामांनी मला, 'अजूनी रुसूनी आहे', हे गाणं म्हणायला सांगितले, ते त्या वेळी नुकतंच लोकप्रिय झालेलं. कुमार गंधर्व यांचं गीत होतं. तेही मी म्हटलं होतं. ती. मामांना खूप आवडलं गाणं. त्यांची अशी समजूत होती की सिनेमातलं गाणं कुणीही म्हणेल, कुमार गंधर्वांचं गाणं बिनचूकपणे म्हणणं, हे त्यांना कौतुकास्पद वाटलं. त्या वेळी आपल्याकडे अनेक कार्यक्रम एकत्रितपणे साजरे झाले. शैलजावहिनी आणि पमाताई यांचे मंगळागौरीचे उद्यापन, सुधाताई आणि हेमाताई यांचे मंगळागौरीचे पहिले वर्ष. पमाताईचा प्रदीपही पण तेव्हा नुकताच जन्मला होता. हो, आणि तेव्हाच उर्मिला वहिनीचे, वैजूच्या वेळी डोहाळेजेवण पण झालं. त्याचवर्षी बहुतेक प्रभाकर दत्तात्रेय खाडिलकर यांचे लग्न झाले होते.

१८. मित्रांनो, आज सकाळी अविमामाने सांगितलेली आठवण : 'श्रीकांत तुझ्या काकांची एक आठवण, १९६६ साली मी डोंबिवली येथे भाड्याचे एक घर घेण्याचे ठरविले. अडचण होती, ती म्हणजे डिपॉझिटचे पैसे, ५००० रुपये हवे होते. माझ्याजवळ १५०० रुपये होते. सांगलीच्या मामांनी १००० व अप्पाकाका नि १००० रुपये पाठविले व तुझ्या काकांनी मला २००० रुपये तत्काळ दिले, नंतर सवडीने मी परत केले, परंतु त्यांनी मला कधीही पैसे कधी परत देतो आहेस असे विचारले नाही

१९. अविमामाची मी किती खेचायचो ती एक आठवण. अविमामा व सुरूमामा हे माझे अतिशय चांगले मित्र- आधी व मामा नंतर आहेत. मामाला हल्ली ऐकायला कमी येऊ लागले आहे व त्यासाठी तो मशीन शक्यतो वापरतो. परंतु ऐकू कमी येणे त्याचबरोबर, लक्षात न राहणे हा अजून एक गुण. त्यामुळे, बरेच वेळा तो मशीन लावायला विसरतो. मी मामा व मामाचा मित्र श्री. भिंगारे, आनंदवन यात्रेला गेलो

होतो. आम्ही काही तरी पाहण्यासाठी बाहेर पडलो होतो व अविमामा कानाचे मशीन रूममध्ये विसरला होता. भिगारे किंवा मी मामाला काही सांगू लागलो की ते त्याला ऐकू येत नव्हते. यावरून एक शाब्दिक व प्रासंगिक विनोद मी केला. भिगारेंना म्हणालो, ''मामाची आयक्यू लेव्हल कमी झाली आहे.'' हे मात्र मामाला ऐकू गेले. परंतु खिलाडू वृत्ती म्हणजे काय ते अविमामाकडून शिकले पाहिजे. या विनोदावर आम्ही सर्व जण खूप हसलो होतो, मामासकट.

२०. अविमामाच्या विसरण्यावरून अजून एक गम्मत आठवली. एकदा मी व सुरूमामा, अविमामाला भेटायला मुंबई central bm गेलो. ही भेट आधी ठरलेली होती. नेमका अविमामा, रिझर्व्ह बँक कॉलनीत खालीच भेटला व आम्हाला हात केला, 'काय इकडे कुठे?'

२१. आम्ही पनवेलला राहात असताना, दोनदा, कोकण ट्रिप केली होती. राजापूर जवळ पांगाऱ्याला, डॉ. अविनाश सप्रे यांच्याकडे गेलो होतो. एकदा टेम्पो ट्रॅक्सने व दुसऱ्या वेळी टेम्पो ट्रॅव्हलरने. एका वेळी मी, प्रथिता व छोटी विभूषा, धनंजय व प्रतिभा, दीप्ती व छोटो कौस्तुभ, तसेच अजय, अनघा वहिनी व नेहा आणि छोटा रोहन अशी टीम होती.

या वेळी, 'हम आपके है कौन' हा माधुरी दीक्षितचा नवा सिनेमा आला होता. आमच्या गाडीत सतत या सिनेमाची गाणी, टेप प्लेअरवर वाजत होती, जातानाही येतानाही. पुढे कधीही म्हणजे आजसुद्धा या सिनेमातील गाणी ऐकली की ती ट्रीप हमखास आठवतेच.

पुढील वेळेस, डॉ, प्रकाश घाटगे व सुभगाही ही आले होते. दोन्ही वेळी राजापूरची गंगा आली होती. आम्ही सर्वांनी गंगेपुढील उष्ण झऱ्यात अंघोळ केली होती, रात्री काजवे पाहण्यासाठीही गेलो होतो. पांगाऱ्याच्या घरी इतका छान आराम केला होता की घड्याळ व कॅलेंडरची कधी गरजच भासली नाही. अनघावाहिनींनी रोज काहीतरी विशेष बेत केले होते. त्यातील, फणसाची भाजी व फणसाचे गरे

घालून केलेला गोड पदार्थ अजूनही आठवतो. खूप मजा व खऱ्या अर्थाने लॉर्ड फॉकलंडचे आयुष्य जगलो होतो.

२२. काका गेल्यानंतरची ही हकिकत आहे. मी व आई एकदा गदगला गेलो होतो. त्या वेळी मुळगुंदच्या प्रॉपर्टीवरून आई व शालिनी काकूचे काहीतरी संभाषण झाले. आईने मुळगुंदच्या प्रॉपर्टीमध्ये काही हिस्सा मिळणार नाही. अशा प्रकारचे काही तरी विधान केले. हे मलासुद्धा अजिबात आवडले नव्हते. कसे व कोणी ते दादा काकांना सांगितले हे मला माहीत नाही, परंतु यामुळे दादाकाका आईवर खूप चिडले व आईला यासंबंधी बरेच काही बोलले. या घटनेचा, वसंत काका व सुनंदा काकूनेसुद्धा बराच राग मनात धरला होता. काही दिवसांनी वसंतकाका पनवेलला आमच्याकडे एखाद दोन दिवस आले होते. त्या वेळी आम्ही नित्यानंद या नवीन घरात राहात होतो. एके दिवशी रात्री मी वसंतकाकाना विनंती केली की, ''मला मुळगुंद प्रॉपर्टीबद्दल जो गैरसमज पसरला आहे त्यासंबंधी बोलायचे आहे, अर्थात, आपली परवानगी असेल तर!'' वसंत काकांनी त्वरित मान्यता दिली. मी काकांना सांगितले की, ''आमच्या मनात प्रॉपर्टीमध्ये हिस्सा हवा असे काही नाही व आई जर चुकून काही बोलून गेली असेल तर तिच्या वतीने मी तुमची व दादा काकांची माफी मागतो. हवे तर तसे लिहून देतो.'' काका म्हणाले, ''त्याची काही गरज नाही, तू म्हणालास तेवढे खूप झाले.'' यानंतर मी काकांना एक प्रश्न विचारला. मी म्हणालो, ''वसंतकाका, सध्या मुळगुंदला जी कोर्टकचेरी वगैरे चालू आहे त्याचे काय कारण आहे?'' वसंतकाका म्हणाले की, ''वामन काकाच्या मालकीची एक खोली, भास्करकाका व विठू काकांच्या ताब्यात आहे व या खोलीचा ताबा ते वामनकाकांना देत नाहीयेत. मी म्हटले, ''ठीक आहे, आता मला सांगा की त्या खोलीची वामन काकांना किती गरज आहे? त्या खोलीला अगदी भाड्याने दिली तरी किती भाडे मिळू शकते?'' काका म्हणाले की, ''तसे काही फारसे मिळणार नाही.'' मग मी म्हणालो की, ''वामनकाकांना पेन्शन मिळते शिवाय शेतीचे

बऱ्यापैकी उत्पन्न मिळते. राहायला स्वतःचे घर आहे, बाकी सर्व काही शेतातून पिकते. असे असताना त्यांना या खोलीची किती व का गरज आहे?'' काका म्हणाले की, ''होय. तुझे बरोबर आहे.'' मग मी म्हणालो, ''आता या परिस्थितीमध्ये, आई जर चुकून प्रॉपर्टीसंबंधी जरी बोलली असेल तर त्यात काय चुकले? काकांच्या अचानक निधनानंतर आपले यापुढे कसे होणार या काळजीपोटी जर तिने प्रॉपर्टीचा विषय काढला असेल तर त्यात इतके चिडण्यासारखे काय आहे?'' या वेळी मी पुन्हा म्हणालो की, ''जर आई असे काही बोलली असेल तर ते चूकच आहे.'' ह्या आमच्या अगदी मनमोकळ्या संभाषणानंतर काकांना माझे म्हणणे पटले व त्याचे व काकूचे आई बरोबरचे वागणे पूर्णपणे पहिल्यासारखे झाले.

२३. यानंतर काही वर्षांनी वसंत काकांना कॅंसर झाला व मग पुण्याचे दुकान बंद करून वसंतकाका व काकू मुळगुंदला दादाकाकांचे सोबत राहायला गेले. वसंतकाकांना दादाकाकांचे बद्दल खूप आदर व प्रेम होते. दादाकाका म्हणतील ते प्रमाण असे काहीसे. मुळगुंदला राहायला गेल्यावर मात्र काही दिवसांनी वसंतकाकांचे दादाकाकांच्या बरोबर काहीसे वितुष्ट आले. शेवटी-शेवटी दादाकाका, वसंत काका झोपत त्या खोलीमध्ये आले की वसंतकाका तोंड फिरवून झोपत असत. ते एक शब्दही बोलत नसत. यानंतर काही दिवस वसंतकाका व काकू मिरजेला, काकूच्या माहेरी राहावयास आले होते. हे मला स्वतः दादाकाकांनी, नृसिंह वाडी येथे वसंतकाकांचे दिवस केले तेव्हा दादाकाकांनी स्वतः मला सांगितले होते.

दादाकाका गेल्यावर त्यांचे दिवससुद्धा नृसिंहवाडी येथेच केले. बंगलोरहून हेमादादा आला होता. सुलभावहिनी तेव्हा नेमक्या अमेरिकेला गेली होती. पुण्याहून मी व प्रकाशकाका, अलकाकाकू, बेबीआत्या व कौमुदी गेलो होतो. दिवसकार्य झाल्यावर परतीचा प्रवास मी प्रकाशकाका व कंपनीबरोबर त्यांच्या टॅक्सीने केला होता.

२४. वसंतकाका गेल्यावर काही दिवसांनी, सुनंदाकाकूने कायमचे

मिरजेला राहण्याचे ठरविले. काकू पुण्यास आली व मग आपटे रोडवरील घराचा ताबा त्यांच्या मालकांना दिला. बदल्यात या घरमालकांनी काकूला १ लाख ३५ हजार रुपये रोख दिले. काकू हे पैसे माझ्याकडे ठेवायला देत होती, परंतु मी त्यास नकार दिला व काकूच्या बँक अकाउंटमध्ये हे पैसे भरले. काकूचे घरातील सर्व सामान मी व माझे कंपनीतील सहकारी यांच्या मदतीने, माझ्या मारुती व्हॅनमधून मिरजेला पोहचविले. काही वर्षांनी सुनंदाकाकू गेल्यावर, काकूच्या बंधूंनी मला फोन केला व 'काकूच्या नावे असलेले पैशाचे काय करायचे असे विचारले. मी त्यांना सांगितले, मला तरी काही नको आहे, आपण एकदा हेमा दादाला विचारा व त्यालाही नको असतील तर, एखाद्या समाजकार्य करणाऱ्या संस्था दान करा.' याचे पुढे काय झाले याची मला काहीही माहिती नाहीये.

२५. वसंतकाकांशी जी मनमोकळी मिटिंग झाली त्या वेळी मी काकांना अजून एक गोष्ट सांगितली. त्यांना म्हटले की, तुम्ही वामन काकांची बाजू घेऊन भांडताय हे फार चुकीचे आहे. माझे काका (माझे वडील) जेव्हा गेले हे कळल्यावर दादाकाका लगेच, त्या रात्री रट्टिहल्लीला जाण्यासाठी निघाले, तर वामनकाका म्हणाले, अरे दादा, आत्ता कुठे जातोस इतक्या रात्री, सकाळी बघू. वसंतकाकांना विचारले, 'ही गोष्ट तुम्हाला माहीत होती का? या वामनकाकांनी जेव्हा हुबळीहून मुळगुंदला घर हलविले तेव्हा, माझ्या काकांनी स्वतः सर्व सामान बांधून ट्रकने मुळगुंदला पोहचविले व तेसुद्धा आपल्या स्वतःच्या खर्चाने. अश्या माणसाची तुम्ही बाजू घेता?'' हे ऐकून वसंतकाका सुद्धा थक्क झाले होते

२६. माझी आजी (म्हणजे काकांची आई, सरस्वतीकाकू), बद्दल मला कळायला लागल्या वर खूप वेगळी अशी भावना होती. मला खरोखरीच आजीचे मनापासून फार वाईट वाटायचे. एखाद्याचे नशिबी किती हाल अपेष्टा, दुःख, परमेश्वर ठासून भरतो, याचे मला नवल वाटे. आजी विधवा झाली अगदी तरुणपणी. पदरी ३ लहान मुले.

मिळकतीची काही तजवीज नाही. माझे आजोबा, नरहरीपंत हे पाचही भावांत सर्वांत उत्तम तब्येत असे जणू काही पहेलवान, परंतु त्या काळी त्यांना टायफॉईड झाला.  या रोगावर त्या काळी काहीही औषध नव्हते. यात आजोबांचे निधन झाले. मुले म्हणजे, दादाकाका, माझे वडील व सर्वांत धाकटे वसंतकाका मोठी झाली.  कालांतराने दादा काकांचे लग्न झाले. काही वर्षांत हेमादादा, ५-६ वर्षांचा असताना, काकूचे अपघाती निधन झाले. काकू स्टोव्हवर काम करीत असताना, भाजून मरण पावली. हा आजीवर दुसरा आघात होता.  यानंतर १९७८ साली माझे बाबा (काका) यांचे अपघाती निधन झाले. हा आजीच्या अगदी उतारवयात झालेला तिसरा आघात.

■ ■

## २१. आपली ही जीवनरूपी कॅसेट रिवाईंड करता येईल का?

नमस्कार मंडळी, अगदी राहवलं नाही, म्हणून हा २१ जुलै २०१३ रोजी, तयार केलेला व्हिडिओ (जुने फोटो स्कॅन करून), पुन्हा एकदा प्रसारित करीत आहे.

आज सकाळी अगदी नकळत, जुन्या आठवणी उफाळून वर आल्या. सांगलीचा तो वाडा, सकाळच्या चहाच्या वेळच्या त्या गप्पा, अप्पाकाकाची ती हाक, ''अहो बाबूराव, चहा झाला आहे. किंवा मामाची ती हाक, ''अप्पासाहेब, वाढले आहे. जेवायला या.''

गोपाळदादांची ती न विसरता येणारी हाक, ''बंडू, ए बंडू...''

बुद्धिबळपटू भाऊसाहेब पडसलगीकर व त्यांची हाफचड्डीतील एन्ट्री.

डॉक्टर बंडोपंत पटवर्धन व त्यांच्या चाय पे चर्चा

बाळूकाका व डॉ. बंडोपंत यांचा, दवाखान्यातील संवाद, त्याचे असे झाले की, डॉक्टर बंडोपंतांकडे एकदा एक पेशंट आला. तो स्टुलावरून पडला होता. त्याला प्रथमोपचार देऊन ते बाहेर आले व बाळूकाकांना सांगू लागले याबद्दल. बाळूकाका म्हणाले, ''काय पुलावरून पडला?'' बंडोपंत म्हणाले, ''अहो बाळूमामा, पुलावरून

पडला तर येथे कशाला येईल झक मारायला, एव्हाना पोचला असता की वर.'' आणि मग एकच हशा.

मग आठवतात काही हिंदी सिनेमातील गाणी, 'जाने कहाँ गये वो दिन?' किंवा 'रे मना साद घाली.'

कृपया, आपण सर्वांना माझी विनंती आहे, आपणकडे असे दुर्मीळ फोटो असतील तर जरूर मला पाठवा. आपली प्रिय मंडळी पुन्हा भेटणे अशक्य आहे, परंतु या फोटोद्वारे जुन्या आठवणी आपण निश्चितच उजळवू शकतो ना?

Video link: https://www.youtube.com/watch?v=tMjpMV48Z6Et=219s

आठवले मंडळी, नमस्कार. आज तुम्हा सर्वांना, भूतकाळात घेऊन जात आहे. आपला सर्वांचा प्रिय स्व. डॉक्टर राजा आठवले याची कन्या, ऐश्वर्याने पाठविलेले हे दुर्मीळ फोटो शेअर करीत आहे. नकळत मला ६० वर्षांपूर्वीच्या काळात खेचून घेऊन गेले. एकीकडे हे फोटो पाहून जुन्या आठवणी ताज्या झाल्या, तर दुसरीकडे गेल्या ६० वर्षांत आपण सर्व, काय गमावून बसलो आहोत याची तीव्रतेने आठवण झाली. मग मनात आले की असे शक्य होईल का? एखादी सिनेमाची सीडी जशी रिवाइंड करतो तसा हा गेलेला काळ रिवाइंड करता येईल का? पुन्हा एकदा मुळगुंदला जाता येईल का? उन्हाळ्याच्या सुट्टीत? पुन्हा एकदा भेटता येईल का या सर्व वडीलधाऱ्या मंडळींना? पुन्हा एकदा, ते रसाळ रायवळ आंबे, चोरून खाता येतील का? पुन्हा एकदा दगडी घसरगुंडीवरून घसरता येईल का? पुन्हा एकदा श्याम काकाची फजिती (दगडी घसरगुंडीवरील) करता येईल का?

हे गाणे न राहवून म्हणावेसे वाटले ना? 'जाने कहाँ गये वो दिन?' काळ किती निष्ठुर आहे नाही का? आपण सर्व किती त्याच्यापुढे असहाय्य आहोत नाही का ?

Video link: https://www.youtube.com/watch?v=ZtIfV3EZ6NEt=98s

■ ■


## आठवणीतील काही फोटो म्हणजे माझा फोटो अल्बम

### गदगचे फोटो

















### सांगलीचे फोटो






## आठवले फॅमिली


Vasantkaka Tarunpani


Vasantkaka, V Kaku Laganat


Dadakaka Tarunpani


Prathita, Neeraja, Vibhusha,
Shashwati


Vibhusha v Maitrin


Sadu Kaka, Kiran, Vahini v Nirmala Kaku


Vibhusha, Neeraja Rang Panchmi


Padma v Mule

# खाडीलकर फॅमिली



Appa Kaka, mi v sarv Natvande



Appakaka v Amruta



Mami , Mama, Appakaka, Mothi Aai



Mothi aai v Vibhusha



Appa Kaka, AAi v sarv Mule



Prathita, Mi v Amruta , Uti yethe



Rajashree Mami, Amruta, v Aai



Major Jagadishmama




Avimama, Mami v sarv Bhavande


Amruta, Rahul, Anu, Rupali v Mi

Prathita, Vibhusha, Neeraja, Mi
family

Vaiju, mami, Avi mama, Vibha


Dr. Lt Col. Jagadish Mama

Anu

Anu, Priti, Rajashree Mami

Kaka v sarv Mama

Vibha, rahul, Rupali v Vaiju

Nachiket v Avi mama



Vaiju, Arvind v Nachu



Kaka v sarv Mama





Mam la sendoff Gowat Antaltika la jatana

## पनवेल





Neeraja v Abhas



Neeraja




Vibhusha v Neeraja



Vibhusha v Neeraja



Suru Mama, Avi mama, Kaka v etar


Mothi Aai, Mami v Vibhusha


Prathita v Aai


Anagha Vahini, Rohan, Neeraja


Anu, Amruta v Vibhusha


Prathita, Nilam, v sarv Mitra kami nateyak jasta


Neeraja v Aai


Mami, Sudha Maushi, Sarla Kaku v Prathita


Shashwati

# सप्रे फॅमिली



Prathibha and Dipti



Aai v Unmesha




Vidyesh



Appa, Vishusha, Neeraja




Neeraja



Prathita, Mai attya



Shashwati, Manas v Vibhusha



Manas, Vibhusha



Appa v Anna



Shashwati, Vibhusha, Neeraja, Neha



Vibhusha, Shashwati



Dr. Prakash v Subhaga

Subhaga v Neeraja





Shashwati, Bhubya, Vibhusha



Manas v Mi

Appa , Aai v Mi




Appa V Pu La Deshpande
Appa v Vishnu Kaka
Appa, Anna, Vishnukaka,
Manas v Subhag
Unmesha, Aai, Vibhusha, Appa
Manas v Vibhusha
athita Shooting
Shekhar Dada, Vahini, Parag v Neeraja
Aai, Appa, Vishnu Kaka, Kaku


Pratibha, Manas, Prathita v Dipti


Appa, Dr. Prakash v mi



## मित्र मंडळ


Bhau Joshi v Mama Karand



Mitra asave tar ase


Jivala Jiv denare Mitra


Bhau Joshi , Mama


Datta Joshi


Amache cook , Marathe v Datta



Neelam tai, subhash, Mi v Mama



Bhau Joshi v Pandurang



Alibag Samudra Kinara



Cycle tri to alibagh




Sakhhe Mitra v mi

## माझे करीअर



Mama, Mani , Mi , Prathita, Amruta, An



Mi, Prathita, Vibhusha, Neeraja



Aai, Vibhusha, v Mi Shringeri yethe



Shashwati v Vibhusha Lonavala trip



Bhau Joshi , Batale Panvel



Shekhar Dada, Mi, Ajay, Lata, Unmesha



Joshi Vahini, Anagha, Vibhusha Prathita



Suryadev Majhya Muthit ( iti Joshya )



Pavel chya Factory che Udghatan
Subhaga, Appa, Vishukaka, Avimama, Sadukaka, Subhash nv Vidyesh



Dasharath v Ravi Kulkarni



Amachi Gachitil Bag



Mi 2018 Sali


Appakaka , Mothiaai v Amruta


Basal Mission High School Dharwad


Hema dada


Avimama, Vibhusha, v Mi


Mi, Ramkrishna , Shrikant ( Induattya )


Vithu kaka , Radha Kaku v Ramkrishna



Mi, Ramkrishna , Shrikant ( Induattya )


Appakaka , Mothiaai v Amruta


Aai Tarunpani




कॅमेरासहित काका


Sangli swanthanacha
Hatti





Mothi aai v amruta


Vibha v Vaiju


Urmila mami, Sunanda Kaku, Sudha Maushi, Aai


Dada Kaka v Kaku


Rahul Laghu Rudra Paratana



Banda Mama, Prabhu, Bhaumama, Milind, Mi, Sunumama, Mahesh




BABUSINGH'S
THAKUR PEDHA
Babu singh che Pedhyache Dukan




Dhodda Basappa Tampele Gadag


Sangali Cha wada Padalya


Surumama Sangli til wadyat



आई व हेमादादा



# श्रीक्या ६६ @ पुणे.इन

[illegible] :
[illegible]

**शब्दांकन :**
**श्रीकांत आठवले , दिनांक १६ मार्च २०२०**


श्रीकांत आठवले
बी ८०१ , वास्तूश्री पर्ल
पौड रोड, कोथरुड \पुणे ४११०३८

००९१ ९८५०२४२२८२
ई-मेल : psatechno@gmail.com